ज्ञानदीप लावू जगी

पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : युगप्रवर्तक शिवाजीमहाराज

लेखक : वासुदेव कृष्ण भावे

प्रकाशक : यशवंत वासुदेव भावे, पुणे

प्रकाशन वर्ष : १९५५

मूळ ग्रंथ प्रत : महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे

युगप्रवर्तक शिवाजी महाराज

लेखक

वासुदेव कृष्ण भावे, बी. ए., पुणें
(' पेशवेकालीन महाराष्ट्र ', ' मुसलमानपूर्व महाराष्ट्र ' इत्यादि ग्रंथांचे कर्ते)

मूल्य ५ रुपये

युगप्रवर्तक शिवाजीमहाराज

लेखक

वासुदेव कृष्ण भावे, बी. ए., पुणें

('पेशवेकालीन महाराष्ट्र', 'मुसलमानपूर्व महाराष्ट्र' इत्यादि ग्रंथांचे कर्ते)

वैशाख शुद्ध २, शके १८७७

२४ एप्रिल १९५५

मूल्य ५ रुपये

प्रकाशक :
यशवंत वासुदेव भावे,
बी. एस्सी.,
२२६ सदाशिव पेठ,
पुणें २.

★ ★ ★

★ ★ ★

मुद्रक :
श्री. ज. श्री. टिळक,
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ,
पुणें २.

समर्पण

शिवाजी-उत्सवाचे प्रवर्तक व श्रीशिवाजी रायगड-
स्मारक-मंडळाचे उत्पादक कै० लोकमान्य
बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्य-
स्मृतीस सादर व सविनय
समर्पण.

कांहीं संदर्भ-ग्रंथ

१. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १।२।३.
२. शिवाजी निबंधावली खंड १।२.
३. शिवचरित्र साहित्य खंड १।२.
४. शिवछत्रपतींचें चरित्र (ले. कृष्णाजी अनंत सभासद).
५. शिवचरित्रप्रदीप.
६. जेधे-शकावली.
७. जेधे-करीना.
८. शिवदिग्विजय.
९. संभाजीराजाचें चरित्र (ले. मल्हार रामराव चिटणीस).
१०. शिवाजीचे पूर्वज (ले. वासुदेव वामनशास्त्री खरे).
११. अनुपुराण ऊर्फ श्रीशिवभारत (ले. कवीन्द्र परमानंद).
१२. पर्णालपर्वतग्रहणाख्यान (ले. जयराम कवि).
१३. Shivaji and His Times (Sir Jadunath Sarkar).
१४. मुसलमानी रियासत (ले. गो. स. सरदेसाई).
१५. शहाजीराजे भोसले (ले. गो. स. सरदेसाई).
१६. शककर्ता शिवाजी (ले. गो. स. सरदेसाई).
१७. Shivaji the Great (ले. डॉ. बाळकृष्ण).
१८. क्षत्रियकुलावतंस छत्रपति श्रीशिवाजीमहाराज यांचें चरित्र (ले. कृष्णराव अर्जुन केळुसकर).
१९. मराठा स्वराज्य-संस्थापक शिवाजीमहाराज (ले. चिंतामण विनायक वैद्य).
२०. जंजिरा संस्थानाचा इतिहास (ले. बाळाजी केशव भोसले).
२१. English Records on Shivaji.
२२. सावंतवाडी संस्थानाचा इतिहास (ले. विठ्ठल पुरुषोत्तम पिंगुळकर, सावंतवाडी).
२३. राजधानी रायगड (ले. विष्णु वासुदेव जोशी).
२४. A Pepys of Mogul India (Niccolao Manucci).

२५. Foreign Biographies of Shivaji (Surendranath Sen).
२६. रामदासस्वामींच्या चरित्राची बखर (ले. हनुमानस्वामी).
२७. The Grand Rebel (Dennis Kincaid).
२८. History of Aurangzeb (Sir. Jadunath Sarkar).

नामनिर्देश

संक्षिप्त नांव	संपूर्ण नांव
परमानंद	शिवभारतकर्ता परमानंद
शि. नि. खं. १	शिवाजी निबंधावली, खंड १ ला
डॉ. बाळकृष्ण	' शिवाजी दि ग्रेट ' या इंग्रजी ग्रंथाचे कर्ते.
शि. प्र.	शिवचरित्रप्रदीप.
प. सा. सं. खं. १	शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १ ला.
प. सा. सं. खं. २	शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २ रा.
सभासद	' शिवछत्रपतींचें चरित्र ' याचा कर्ता कृष्णाजी अनंत सभासद.
सरकार	सर जदुनाथ सरकार.
कास्म-ड-गार्डा	शिवाजीचा पोर्तुगीज चरित्रकार.
दि ग्रँड रेबल	याचा कर्ता डेनिस किंकेड, आय्. सी. एस्.
इं. फॅ.	इंडियन फॅक्टरी रेकॉर्ड्स्.
हि. रे. क.	हिस्टॉरिकल रेकॉर्ड्स् कमिशन.
पृ. ४८७	शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २ रा याचें पृष्ठ.

प्रस्तावना

(लेखक : लोकनायक माधव श्रीहरि अणे)

(१) श्री. वासुदेवराव भावे, केसरीचे सुप्रसिद्ध माजी उपसंपादक, यांनीं आग्रह केल्यावरून त्यांच्या या नवीन ग्रंथास प्रस्तावना म्हणून मी चार शब्द लिहीत आहें.

(२) संशोधित साहित्याचा पूर्णपणें विचार करून लिहिलेल्या या श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांच्या चरित्रास, इतिहाससंशोधक म्हणून गाजलेल्या म. म. दत्तोपंत पोतदारांसारख्या, एखाद्या प्रथितयश इतिहासाभ्यासी विद्वानानें प्रस्तावना अथवा पुरस्कार लिहिला असता तर, भावे यांच्या कृतीचें यथार्थ मूल्यमापन अधिकृत रीतीनें झालें असतें. इतकेंच नाहीं तर शिवाजीमहाराजांसारखे चरित्रनायक, भावे यांजसारखे इतिहासपटु, कसलेले चरित्रलेखक व दत्तोपंतांसारखे इतिहाससंशोधनांत तन्मय झालेले प्रस्तावनालेखक, असा कपिलाषष्ठीच्या पर्वणीसारखा दुर्लभ योग जर जुळून आला असता तर, ऐतिहासिक ग्रंथ व ग्रंथकार यांविषयीं महाराष्ट्रांत जी एक प्रकारची उपेक्षाच नसली तरी निदान उदासीनता खास दृष्टीस पडते ती नष्ट होण्यास त्या योगाचा उपयोग झाला असता. महाराष्ट्रास अभिमानास्पद इतिहास आहे. महाराष्ट्रांत कळकळीचे व त्यागी इतिहाससंशोधक आहेत. महाराष्ट्रांत इतिहास-विषयाची व सामग्रीची सूक्ष्म चिकित्सा करणारे लोकोत्तर पंडित झाले व आजहि विद्यमान आहेत. पण महाराष्ट्रांत आपला प्रभावशाली इतिहासकार असल्याचा आत्मप्रत्यय मात्र दृष्टीस पडत नाहीं.

(३) पूज्य गोविंदराव सरदेसाई हे महाराष्ट्राचे इतिहासकार महाराष्ट्रास दृष्टीस पडत नाहींत. त्यांनीं १८९६ पासून १९५५ पर्यंत चालविलेली इतिहासाध्ययन व इतिहास-लेखन यांची खडतर तपश्चर्या दृष्टीसमोर असून सुद्धां, महाराष्ट्राकडून त्यांच्या प्रदीर्घ व प्रचंड कार्याचा यथोचित सत्कार झालेला नाहीं, हें पाहून मनास मोठी विषण्णता वाटते. म्हणूनच इतिहास किंवा ऐतिहासिक विभूतींचें चरित्र लिहिणाऱ्याचा परिचय करून देण्यास

प्रथितयश इतिहास-शास्त्रज्ञांनीं पुढें येऊन व लोकांत कांहीं कारणामुळें आढळून येणारें औदासीन्य नाहींसें करून, नवीन लेखकाचा मार्ग अधिक प्रशस्त, उज्ज्वल व आशादायक करावयास पाहिजे, असें मला वाटतें.

(४) भावे यांनीं प्रस्तुत ग्रंथास असा एखादा प्रस्तावना-लेखक मिळविण्याचा प्रयत्न केला कीं नाहीं हें मला माहीत नाहीं; परंतु ग्रंथाचें हस्तलिखित खाकोटीस मारून ग्रंथ-प्रकाशनाच्या कार्यास साहाय्य मिळवावें म्हणून त्यांनीं जेव्हां कांहीं इतिहासतज्ज्ञांच्या भेटी घेतल्या तेव्हां त्यांना आलेला अनुभव मोठासा उत्तेजक न वाटल्यामुळें, त्यांनीं प्रस्तावना-लेखासाठीं असल्या प्रस्थाचे दारोठे पूजण्याचा कदाचित् कंटाळा केला असल्याचा संभव आहे. असो. याचा परिणाम मात्र, दुधाची तहान ताकावर भागविण्याचा प्रसंग या चरित्राच्या वाचकांवर आलेला आहे हा होय.

(५) भावे यांच्यापूर्वी संस्कृतांत, मराठींत व इंग्रजींत शिवचरित्रावर लहान-मोठे बरेच ग्रंथ झाले आहेत व त्या संबंधानें इतिहाससंशोधकांकडून पत्रें, बखरी वगैरे पुष्कळच साहित्य प्रकाशित झालें आहे. याशिवाय युरोपीय प्रवासी व युरोपीय व्यापारी यांनीं लिहिलेलीं प्रवासवृत्तें, पत्रें व खलितें, इंग्रजी, फ्रेंच, डच व पोर्तुगीज भाषांतून अभ्यासकांस आतां उपलब्ध झालेले आहेत. त्यांची यादी ‘संदर्भग्रंथांची सूचि’ या ग्रंथास जोडली आहे, तेथें पाहण्यास मिळते. एवढ्या विविध व विस्तीर्ण लिखाणाचा मननपूर्वक अभ्यास करून, त्यांतील मजकुराची अथवा माहितीची छाननी व निवड तारतम्यानें करून व ती सुसूत्र ग्रथित करून, ग्रंथ तयार करण्याचें काम निव्वळ प्रयत्नांचें व प्रयासाचेंच नसून सूक्ष्म बुद्धीचें आणि व्यापक व विवेचक प्रज्ञेचेंहि आहे. हा ग्रंथ वाचणाऱ्यांस ग्रंथ-कर्त्याच्या प्रयत्नाचा, परिश्रमाचा व प्रज्ञेचा प्रत्यय प्रत्येक पृष्ठांत येईल, असा मला विश्वास वाटतो.

(६) हा ग्रंथ हातांत घेतल्याबरोबरच त्याचें एक वैशिष्ट्य वाचकांच्या चटकन् लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. पुस्तकाचें नांव ‘युगप्रवर्तक श्रीशिवाजीमहाराज यांचें चरित्र’ हें आहे. महाराष्ट्रीयांत शिवाजीमहाराजांसंबंधानें अत्यंत आदराची कल्पना असल्यामुळें त्यांच्या नांवाचा उल्लेख शिवाजी या एकेरी पद्धतीनें बहुशः करण्यांत येत नाहींच. कांहीं पाश्चात्य इतिहासकार व महाराष्ट्रीयेतर लेखक जेव्हां आपल्या ग्रंथांतून

शिवाजी किंवा शिवा या एकेरी शब्दाचा उपयोग करतांना दृष्टीस पडतात, तेव्हां मराठी वाचकांस किंचित् खटकल्यासारखेंच वाटतें व त्या लेखकाविषयीं मनांत एक प्रकारचा अनादर उत्पन्न होतो. अर्थात् हा केवळ भावनेचाच परिणाम आहे. आपल्या मराठींत ज्याप्रमाणें एखाद्या आदरणीय व्यक्तीसंबंधीं लिहितांना, विशेषतः बहुमानार्थी बहुवचनाचा उपयोग करण्याचा प्रघात आहे, तसा इंग्रज वगैरे पाश्चात्य लोकांत प्रायः नसल्यामुळें त्यांच्या लेखांतून प्रसिद्ध पुरुषांचे उल्लेख एकेरी नांवानें केलेले आढळतात. महाराष्ट्रीय मनुष्य व सामान्यतः भरतखंडांतील कोणताहि सुशिक्षित हिंदु, शिवाजी या एकेरी शब्दानें त्यांचा उल्लेख करीत नाहीं, इतकेंच नाहीं तर नुसते शिवाजीमहाराज एवढेंच न म्हणतां श्रीछत्रपति शिवाजीमहाराज, स्वराज्यसंस्थापक शिवाजीमहाराज, गोब्राह्मणप्रतिपालक शिवाजीमहाराज, धर्मसंरक्षक शिवाजीमहाराज, अशीं एकदोन महत्त्वदर्शक विशेषणें लावूनच त्यांचें नामोच्चारण करतो. पण त्यांच्या सद्गुणसमुच्चयाचा बोध कोणत्या एका विशेषणानें करतां येईल, हा प्रश्न शब्दशास्त्रनिष्णातांनीं सोडविण्यास घ्यावा. इंग्रजी लेखक लोकोत्तर विभूतीविषयींचा, म्हणजेच त्यांच्या ठिकाणीं असलेल्या लोकोत्तर प्रभावाविषयींचा, आपला आदर 'The Great' (दि ग्रेट) या पदांचा त्या विभूतीच्या नांवापुढें उपयोग करून प्रदर्शित करीत असतात, हें इंग्रजी जाणणाऱ्यांना विदित आहेच. 'दि ग्रेट' या शब्दांचा भावार्थ 'श्रेष्ठतम', 'परमश्रेष्ठ' वगैरे शब्दांनीं मराठींत किंवा संस्कृतनिष्ठ भारतीय भाषांतून व्यक्त होण्यासारखा आहे; परंतु 'श्रेष्ठ' व 'श्रेष्ठतम' या शब्दांचा प्रचार व वापर इतका विस्तृत व विपुल झाला आहे कीं, त्यांतून विशिष्ट अर्थाची निश्चित अभिव्यक्ति अपेक्षित करणें कठीण आहे. अति वापरांत आलेलें खरें नाणें हें कालांतरानें गुळगुळीत होऊन जातें व त्यावरील मूल्यनिदर्शक अक्षरांचे छाप पुसट होत होत नष्ट होतात व तें बाजारांत चालेनासें होतें. त्याचप्रमाणें कांहीं अंशीं 'श्रेष्ठ' वगैरे शब्दांची स्थिति आहे.

(७) ग्रंथकार भावे यांनीं जो 'युगप्रवर्तक' हा शब्द वापरला तो फार अन्वर्थक व समर्पक आहे असें मला वाटतें. गो-ब्राह्मण-प्रतिपालक, धर्मसंस्थापक, स्वराज्य-संस्थापक, हिंदी स्वराज्याचे प्रवर्तक, छत्रपति इत्यादि

विशेषणांतून शिवाजीमहाराजांच्या श्रेष्ठ कार्याच्या निरनिराळ्या अंगांचें दर्शन होतें. त्यांतून राजकारण, समाजकारण, अर्थकारण, धर्मकारण इत्यादींची, स्वातंत्र्य प्राप्त करून, महाराजांनीं निराळी घडी बसविली हा अर्थ स्पष्ट आहे. देश किंवा राष्ट्र याचें याप्रमाणें सार्वत्रिक स्थित्यंतर करून व त्याला व्यापक धर्मतत्त्वाच्या अधिष्ठानावर सुस्थिर करून त्याच्या व्यवहाराला अभ्युदयोन्मुख करणें याचेंच नांव युगपरिवर्तन हें होय. युग हें सृष्ट्युत्पत्तीच्या इतिहासांत कालगणनेचें एक माप आहे, हें खरें आहे व जुन्या ज्योतिष-कालगणनेप्रमाणें सृष्ट्युत्पत्तीपासून आतांपर्यंत सहा मन्वन्तरें संपून सातवें मन्वंतर व अठ्ठाविसावें युग सुरू आहे. रोज ब्राह्मण आपल्या संकल्पांत या दीर्घ कालगणनेचा उच्चार करतो व त्यांत एक दिवसाची भर घालून सनातनकालापासून चालत आलेली काळाच्या आयव्ययाची कीर्द सौरगणनेच्या पद्धतीनें अद्ययावत् करून ठेवीत असतो. वारकरी रोज पंढरीच्या विठोबासमोर भक्तिभावानें भक्तजनांच्या उद्धारार्थ ‘ युगें अठ्ठावीस विटेवरी उभा ’ असें म्हणून सर्वसंहारक काळाच्या गतीकडे आपलें लक्ष असल्याचें निवेदन करीत असतो. हें प्रदीर्घ काळाचें सतत अवधान असणें आत्मोद्धारास आणि व्यक्तीच्या व राष्ट्राच्या अभ्युदयास निःसंशय आवश्यक आहे. पण आमच्या प्राचीन ग्रंथकारांनीं युगकल्पनेची दुसऱ्याहि एका तऱ्हेनें मीमांसा केली आहे. तीच भावे यांनीं योजलेल्या युगप्रवर्तक शब्दाचा यथार्थ बोध होण्यास अधिक उपयुक्त आहे असें मला वाटतें. निव्वळ सृष्ट्युत्पत्तीचें गणित करण्याकरितां योजलेल्या युगकल्पनेचा विशिष्ट समाजाचें व संस्कृतीचें इतिवृत्त लिहिणाऱ्या ऋषींनीं एक निराळा व ऐतिहासिक दृष्ट्या उपयुक्त असा विनियोग केलेला आहे. चार युगें ही समाजाच्या किंवा राष्ट्राच्या वयोमानाची निदर्शक न समजतां त्याच्यांतील कांहीं प्रधान गुणदोषांचीं निदर्शक आहेत, असें त्यांचें प्रतिपादन आहे.

कलिःशयानो भवति संजिहानस्तु द्वापरः ।
उत्तिष्ठन् त्रेता भवति कृतं सम्पद्यते चरन् ॥

हें वचन ऐतरेय ब्राह्मणांतील सातव्या शुनःशेपाख्यानांतील आहे. येथें ब्रह्मवादींची दृष्टि युगनिर्णय करतांना काळावरून निघून गुणावर केंद्रित झाली आहे हें स्पष्ट आहे.

अर्थ :– झोपलेले आहेत त्यांकरितां कली आहे. जांभयी देत आहेत त्यांकरितां द्वापर आहे. उठून उभे राहणाऱ्यांकरितां त्रेतायुग आहे व जो चालावयाला लागतो त्याच्यासाठीं कृतयुग आहे.

संकटांत पडून निराशेनें विपत्तींत लोळणाऱ्या भारतवर्षीयांची छत्रपति शिवाजीमहाराजांनीं महंमद घोरीच्या काळापासून आलेली दीर्घकालीन घोर झोप मोडली, बंदुकीच्या बारांच्या टिचक्या वाजवून त्यांना जांभया द्यावयास लावून खडखडीत जागें करून ताठ उभें राहावयास लावलें आणि स्वातंत्र्यप्राप्तीच्या युद्धास प्रवृत्त केलें; सन १६४५ पासून ते १६८० पर्यंतच्या काळांत महाराष्ट्रीय वीरांना, मोगल व दक्षिणेंतील मुसलमान यांच्या दक्षिणेंतील सत्तेचें निर्मूलन करण्यासाठीं व हिंदूंच्या स्वराज्याचें सिंहासन रायगडीं सुस्थिर करण्यासाठीं, पस्तीस वर्षें दिल्लीपासून तंजावरपर्यंत अखंड संचार करीत ठेवलें. म्हणजेच त्यांनीं कलियुगांत पडलेल्या भरतखंडाला कृतयुगांत आणून सोडलें, कलियुगाचा अंत केला व कृतयुग प्रवृत्त केलें. हा सर्व स्फूर्तिदायक इतिहास ग्रंथकर्त्यानें मोठ्या ओजस्वी भाषेनें या ग्रंथांत वर्णिलेला आहे. तो वाचल्यावर 'युगप्रवर्तक' हें उपपद छत्रपति शिवाजीमहाराजांस किती यथार्थतेनें लावलें आहे, हें वाचकांस कळून येईल.

(८) निरनिराळ्या शिवचरित्र-लेखकांनीं आपल्या चरित्रनायकासंबंधीं आपला आदर व्यक्त करण्याकरितां आपआपल्या ग्रंथांस ' क्षत्रिय कुलावतंस छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांचें चरित्र ', ' शककर्ता शिवाजी ', ' मराठा स्वराज्य-संस्थापक शिवाजीमहाराज ', ' शिवाजी दि ग्रेट ', ' शिवाजी व त्याचा काळ ', ' दि ग्रँड रेबल ' (महान् बंडखोर) अशीं नांवें दिलीं आहेत. आंग्ल इतिहासकारांनीं शिवाजीचें राजेपण मान्य केलें नाहीं. याचें एक मोठें द्योतक असें कीं, ' Rulers of India ' या सुप्रसिद्ध ग्रंथमालेंत त्यांनीं शिवाजीमहाराजांचें चरित्र समाविष्ट केलें नाहीं ! हिंदुस्थानासंबंधीं ऐतिहासिक लिखाण ज्या इंग्रजांनीं केलें त्यांपैकीं कोणीहि व्यापक विचाराचे इतिहासशास्त्रज्ञ नव्हते. ब्रिटिश सत्तेचे नोकर म्हणून आलेल्यांनींच हें सर्व लिखाण केलें असल्यामुळें त्यांत त्यांचे पूर्वग्रह प्रदर्शित झाल्याशिवाय राहिले नाहींत. म्हणूनच त्यांचीं मतें सत्यान्वेषणास

अथवा वस्तुस्थितीच्या परिज्ञानास निःसंदिग्ध ग्राह्य आहेत असें मानतां येत नाहीं.

(९) श्रीशिवाजीमहाराजांच्या चरित्रांत एक आश्चर्यकारक व अद्भुत असें वैशिष्ट्य हें आहे कीं, त्यांना हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याची प्रबळ इच्छा, ते १५–१६ वर्षांच्या वयाचे असतांनाच, उत्पन्न झाली व श्रीरोहिडेश्वराजवळ त्यांनीं आपले साथीदार जमवून त्यांस स्वराज्यप्राप्तीकरितां सिद्ध असल्याबद्दलच्या शपथा घ्यावयास लावलें. १६४५ त महाराजांनीं दादाजीपंताच्या वडिलास या संबंधानें लिहिलेल्या पत्रांत 'हिंदवी स्वराज्य' स्थापन करून आम्ही आपले मनोरथ पूर्ण करणार, असा जो दिलासा दिला आहे, तो वाचून त्या बाल-वयांत त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेल्या आत्मविश्वासानें मनुष्य आश्चर्य-चकित झाल्याशिवाय राहत नाहीं. हल्लींचे तरुण पंधराव्या वर्षी विद्या-पीठाची प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाले म्हणजे ते मोठे बुद्धिमान् समजले जातात. शिवाजीमहाराजांनीं पंधराव्या वर्षी मुसलमानी सत्ता उलथून पाडण्यासाठीं एक प्रबळ गुप्त संघ स्थापन केला व एक-दोन गड पराक्रमानें व युक्तीनें हस्तगत करून स्वराज्य-मंदिराच्या महाद्वारांत प्रवेश केला. हाच त्यांचा प्रबळ विश्वास त्यांना संकटाच्या वेळीं निर्भय ठेवीत असे व त्यामुळेंच त्यांना अनेक अचाट साहसाचीं कामें करतां आलीं.

(१०) आपल्याभोंवतीं आपल्या प्राणांस प्राण देणाऱ्या पराक्रमी व बुद्धिमान् सहकारी जवानांचें वलय त्यांनीं अल्पवयांतच निर्माण केलें. लोखंड ज्याप्रमाणें चुंबकाकडे आपोआप ओढलें जातें त्याप्रमाणें तरुण शिवाजीकडे पराक्रमी, शहाणे व साहसी तरुण आकर्षिले जात होते. शिवाजीमहा-राजांस भवानी प्रसन्न आहे, त्यांच्याबरोबर साथ करण्यांत आपलें कल्याणच होईल, असा दांडगा विश्वास ते आपल्या सहकाऱ्यांत उत्पन्न करूं शकत असत.

(११) आग्ऱ्यास ते अटकेंत पडले असतां त्यांची व राजपुत्र संभाजी यांची सुटका व्हावी म्हणून हिरोजी फर्जंद यानें जें अचाट हिम-तीचें काम केलें, तें पाहिलें म्हणजे राज्यस्थापनेस शिवाजीमहाराजांची साथ करणारे लोक कसे खंबीर, हुन्नरी व बेडर होते याची कल्पना येते. स्वामि-

निष्ठेची ज्यांनीं पराकाष्ठा केली असे बाजी पासलकर, बाजी प्रभु, तानाजी मालुसरे, नेताजी पालकर वगैरे नरपुंगवांची लांबच लांब मालिका डोळ्यांसमोर उभी राहते. अशा पराक्रमी विभूतींचें अखंड वलय आपल्याभोंवतीं निर्माण करणें व त्यांचा योग्य वेळीं उपयोग करणें, हेंच खरें नेतृत्वाचें लक्षण आहे व तीच खरोखर चिरकालीन भव्य यशाची किल्ली आहे.

(१२) शौर्य, साहस, धैर्य, झुंझारपणा व कडवी शिपाईगिरी यांबरोबरच दया, क्षमा, विनयशीलता, सत्संगतीची आसक्ति, धर्मबुद्धि, औदार्य इत्याद्यनेक गुणहि त्यांच्या ठिकाणीं होते. त्यांचीं उदाहरणें चरित्र वाचतांना जागोजाग दृष्टीस पडतील. वैभवसंपन्न असून वैराग्य, दंडनसामर्थ्य असून क्षमा, चतुरस्रता असून विनय, त्यांच्या ठिकाणीं असलेला पाहिला म्हणजे ही विभूति निर्माण करतांना ब्रह्मदेवानें विशेष गुणसंपन्न सामग्रीचाच उपयोग केला असला पाहिजे असें वाटतें. कविकुलगुरु कालिदासानें सूर्यवंशी दिलीप राजाच्या ठिकाणीं असणाऱ्या श्रेष्ठ व इतरत्र दुर्लभ अशा अनेक गुणांचें वर्णन केल्यावर त्या गुणसमुच्चयाची उपपत्ति सांगण्याकरितां दिलीपाची उत्पत्ति ब्रह्मदेवानें कशी केली, हें खालील श्लोकांत सांगितलें आहे.

तं वेधा विदधे नूनं महाभूतसमाधिना ।
तथा हि सर्वे तस्याऽसन् परार्थैकफला गुणाः ॥

— रघुवंश १–२९

हें वर्णन छत्रपति शिवाजीमहाराजांच्या जन्मासंबंधींहि पूर्णपणें लागू पडतें.

(१३) त्यांचे सर्व गुण व दोषसुद्धां परार्थैकफल होते. त्यांच्या गुणदोषांची मीमांसा करूं पाहणाऱ्यांनीं या मूलभूत तत्त्वाकडे दुर्लक्ष करतां कामा नये. एकदां परार्थ निश्चित केल्यावर, त्याच्या मार्गांत येणाऱ्या अंतरायाला दूर करून, त्या परार्थाच्याच मार्गानें सतत प्रगत होत राहणें, हाच खरा पुरुषार्थाचा मार्ग, धर्मशास्त्र व नीतिशास्त्र आणि अध्यात्मशास्त्र यांनीं मान्य केला आहे. सामान्य लोकांच्या कृत्यांच्या युक्तायुक्ततेचा निकष हा युगप्रवर्तक विभूतीच्या कृत्यांचा निकष होऊं शकत नाहीं. ज्याचा स्वार्थ मेला व जो परार्थाकरितांच उरला, त्याच्याकरितां मामुली विधिनिषेधाचें शास्त्र निरुपयोगी आहे.

निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ।

शिवाजीमहाराजांच्या चरित्राची चर्चा करतांना, त्यांत परार्थैकफलत्व व स्वातंत्र्यध्येयाची आराधना याहून अन्य कांहीं स्वार्थ होता कीं काय, हेंच पाहिलें पाहिजे. या दृष्टीनें पाहिल्यानंतर त्यांच्या चरित्रांतील उज्ज्वलपणा, उदात्तता, भव्यता व उन्नतपणा हे गुण देवतात्म्या हिमालयाच्या शिखराप्रमाणें आपल्यासमोर उभे राहतात व मनावर इष्ट संस्कार करून वाचकांस सन्मार्गप्रवृत्त केल्यावांचून राहत नाहींत.

(१४) महाराजांच्या चरित्रांतील राज्याभिषेक हा स्वतःच्या वैभवाचा डौल अथवा दिमाख मिरवण्याकरितां नसून 'आतां पारतंत्र्याची रात्र संपली, स्वातंत्र्यसूर्य उगवला' हें सर्व भारतवासीयांस दुंदुभिनादानें घोषित करून त्यांची झोप मोडण्याकरितां व त्यांच्यांत नवचैतन्य उत्पन्न करण्याकरितां होता. त्याचप्रमाणें स्वराज्य हें धर्मराज्य राहील, त्यांत अन्याय होणार नाहीं, याचेंहि त्यांना आपल्या प्रजेस जाहीर आश्वासन द्यावयाचें होतें. म्हणून त्यांनीं तो धार्मिक विधि मोठ्या समारंभानें व औदार्यानें केला.

(१५) श्रीशिवाजीमहाराजांसारख्यांचें कार्य जरी एका विशिष्ट कालीं व विशिष्ट परिस्थितींत घडलें असलें तरी त्याची उपयुक्तता त्या कालस्थलोपाधींनीं मर्यादित नसते. म्हणूनच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व न्यायमूर्ति रानडे, बाबू अरविंद घोष व बिपिनचंद्र पाल इत्यादि थोर राष्ट्रपुरुषांना, स्वराज्यप्राप्तीच्या कलहांत, जनतेसमोर शिवचरित्राचा आदर्श स्वातंत्र्यस्फूर्ति देण्याकरितां ठेवावासा वाटला व त्याचा त्या कार्यांत फार मोठा उपयोग झाला. इतकेंच नव्हे तर, जेव्हां इंग्रजांवर पहिल्या जागतिक युद्धाच्या वेळीं जर्मनांच्या विजयामुळें मोठा बिकट प्रसंग उत्पन्न झाला, तेव्हां त्यांनाहि भारतीयांस युद्धसाहाय्यार्थ बोलावितांना श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांच्या मंगलनामाचें व गुणांचें संकीर्तन करावें लागलें. आजहि स्वतंत्र हिंदुस्थानला स्वातंत्र्यरक्षणक्षम करण्याकरितां भारत सरकार हें सिंहगडाच्या शेजारीं युगप्रवर्तक शिवाजीमहाराजांचा पुतळा उभारून व त्याचें पूजन करून संरक्षण-शक्तिदलाच्या विद्यालयाची स्थापना करीत आहे.

(१६) ज्या शिवाजीमहाराजांच्या उत्सवाचा प्रचार करण्याकरितां लोकमान्य व त्यांचे अनेक अनुयायी यांना देहदंड, हालअपेष्टा व अनेक तऱ्हेचा अपमान व तिरस्कार सहन करावा लागला, त्यांना हें युगपरिवर्तन झालेलें पाहून जो आनंद वाटतो, तो शब्दांनीं वर्णन करतां येत नाहीं.

(१७) हें प्रस्तावनालेखन पुरें करण्यापूर्वी ग्रंथकारानें शिवाजीमहाराज व रामदास यांच्या संबंधानें जें विवेचन केलें आहे त्याचा विशेष उल्लेख करणें आवश्यक वाटतें. कांहीं अर्वाचीन नामांकित लेखकांनीं या संबंधांत केलेल्या लिखाणांत फार मोठें मतवैचित्र्य दिसून येतें; किंबहुना परस्परांमध्यें विरोधहि दृष्टीस पडतो. भावे यांनीं हा प्रश्न केवळ न्यायाधीशाच्या दृष्टीनें हाताळला आहे व उपलब्ध विश्वसनीय पुरावा योग्य तऱ्हेनें जोखून आपला निर्णय दिलेला आहे. शिवाजीमहाराज व समर्थ यांची ओळख आग्ऱ्यास जाण्यापूर्वी झाली असली पाहिजे ही गोष्ट त्यांनीं निर्विवाद सिद्ध केली आहे. दोघांच्याहि स्वराज्यस्थापनेच्या उद्योगाचा आरंभ स्वतंत्रपणें झाला असला पाहिजे. शिवाजीच्या राजकारणांत त्यांचा प्रत्यक्ष भाग होता असें नाहीं, तर शिवाजीमहाराजांचा उद्योग यशस्वी व्हावा म्हणून इच्छिणारे व आपलें आत्मिक बळ त्या कार्यास देणारे ते सत्पुरुष होते. शिवाजीमहाराजांनीं त्यांचा अनुग्रह घेतला होता आणि त्यांच्या अनुष्ठानास व रामोपासनाप्रचाराच्या कार्यास महाराजांनीं सर्वतोपरी साहाय्य केलें होतें. दासबोधांतील राजकारणावरील समासांची संगति यामुळें बरोबर लावतां येते. शिवाजीमहाराज व समर्थ यांमध्यें असा जिव्हाळ्याचा संबंध होता, म्हणूनच संभाजीच्या उन्मत्त वृत्तीमुळें स्वराज्यास धोका येत आहे, हें पाहून त्यांचें मन कळवळलें. त्यांनीं त्याला ओवीबद्ध पत्र पाठवून –

‘ शिवरायाचें आठवावें रूप, शिवरायाचा आठवावा प्रताप ’

असा उपदेश केला. हेंच शिवाजीमहाराज व समर्थ यांच्यामधल्या अत्यंत जिव्हाळ्याच्या संबंधाचें व स्वराज्याविषयीं समर्थांच्या मनांत असलेल्या तळमळीचें प्रत्यक्ष प्रमाण आहे. संभाजीला केलेला उपदेश आजहि सर्व स्वातंत्र्योपासकांनीं आपल्या अन्तःकरणांत नीट वागविल्यास आपणांस प्राप्त झालेल्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्यास आणि भारताची सर्वांगीण उन्नति करण्यास ते समर्थ होतील, असा माझा विश्वास आहे.

(१८) भावे यांनीं युगप्रवर्तक शिवाजीमहाराजांचें चरित्र लिहून एका उत्तम ग्रंथाची मराठी ऐतिहासिक वाङ्मयांत भर घातली; एवढेंच नाहीं तर प्रचलित स्वतंत्र भारतांतील आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठीं भारतीयांस ज्यापासून स्फूर्ति मिळवितां येईल असें साधन निर्माण करून त्यांनीं स्वतंत्र भारताची महनीय सेवा केली आहे. त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानून व प्रस्तावनालेखनाच्या निमित्तानें शिवचरित्राचें पंधरा दिवस वाचन व मनन करण्याची मंगल संधि मला उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्यांना अनेक धन्यवाद देऊन, मी हें लेखन पुरें करतों.

प्र यो ज न

तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम् ।

— कालिदास

'केसरी'च्या संपादक-वर्गांतून निवृत्त झाल्यानंतर माझा नित्याचा लेखनव्यवसाय सुटला. थोडीं वर्षें विश्रान्ति घेतल्यावर मेंदूंत पुनः शक्ति आली. आतां सारा वेळ मोकळा, तो कसा घालवावा हा प्रश्न पडला. तेव्हां वेळ जाण्याकरितां अनेक विषयांवरील ग्रंथांचें परिशीलन केलें व कांहीं ग्रंथ लिहूनहि तयार ठेवले. पण देशाची आर्थिक स्थिति युद्धोत्तर-कालांत इतकी बिघडली कीं, कोणीहि प्रकाशक कोणतेंहि पुस्तक हातीं घेण्यास धजेना. मला तर वेळ घालवावयास कांहीं साधन पाहिजेच होतें. अशा मनःस्थितींत शिवचरित्राकडे सहज लक्ष गेलें. मला विषय असा हवा होता कीं, ज्यांत उरलेल्या आयुष्याचा बराच काळ जाईल. तसा हा विषय होता.

इंग्रजी चरित्रें

पुण्यांतील भारत-इतिहास-संशोधक मंडळांत माझें नेहमीं जाणें असे. त्यांत शिवकालीन पत्रसारसंग्रहाचे तीन खंड असल्याचें मीं ऐकलें होतें. पैकीं पहिले दोन खंड इ. स. १९३० सालीं व तिसरा खंड इ. स. १९३७ सालीं प्रसिद्ध करण्यांत आला होता. या तीन खंडांत मिळून २८०० पत्रांचें सार आहे. मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांत श्रीशिवछत्रपतींचीं अनेक लहान-मोठीं चरित्रें झालेलीं आहेत. इंग्रजींत बंगालचे प्रसिद्ध इतिहासकार सर जदुनाथ सरकार, कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजाचे प्रिन्सिपाल कै. डॉ. बाळकृष्ण, कै. चिंतामण विनायक वैद्य आणि कै. कृष्णराव अर्जुन केळुसकर व कै. नीलकंठ सदाशिव ताकखाव, एम्. ए., या दोघांनीं मिळून लिहिलेलें, अशीं चरित्रें प्रसिद्ध असून त्यांपैकीं सर जदुनाथ सरकार यांनीं लिहिलेल्या चरित्रानें विशेष नांव मिळविलें आहे. त्याची इंग्रजी जाणणाऱ्या वाचकांत इतकी चहा झाली कीं, त्याच्या आतांपर्यंत चार आवृत्त्या निघाल्या. डॉ. बाळकृष्ण यांचें चरित्र त्याहून मोठें म्हणजे दोन

खंडांत आहे. केळुसकर व ताकखाव या द्वयानें लिहिलेलें चरित्र डॉ. बाळकृष्णकृत चरित्रापेक्षां कांहींसें लहान असलें तरी एकंदरीनें बरेंच मोठें म्हणजे सहाशें पानांचें आहे. तें केळुसकरांच्या मराठी चरित्राचें भाषांतर म्हणूनच केलें असलें तरी, त्यांत डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपॉल रॉलिन्सन, न्या. मू. किंकेड, जदुनाथ सरकार, पारसनीस, राजवाडे व लो. टिळक यांचे ग्रंथ व लेख यांचा आणि भारत इ. सं. मंडळ, इतिहाससंग्रह, जेधे शकावली इत्यादि द्वारां जी नवी माहिती उपलब्ध झाली तिचा चिकित्सक बुद्धीनें अभ्यास करून तें १९२१ सालीं प्रसिद्ध करण्यांत आलें. या चरित्राचा आणखी विशेष हा कीं, तें महाराष्ट्रीयांनीं लिहिलें आहे. कै. वैद्य यांचें इंग्रजी चरित्र त्यापेक्षां लहान आहे.

मराठी चरित्रें

इंग्रजी चरित्रें कितीहि चांगलीं झालेलीं असलीं तरी तीं परभाषेंतील; त्यांनीं सर्वसामान्य मराठी वाचकांची भूक भागणें शक्य नाहीं. म्हणून मराठींतहि अनेक चरित्रें लिहिण्यांत आलीं आहेत व तीं संख्येनें इंग्रजी चरित्रांपेक्षां साहजिकच अधिक आहेत. तीं पुढीलप्रमाणें –(१) 'शिवकल्याण राजा' ले. शंकर धोंडो क्षीरसागर, (२) क्षत्रियकुलावतंस छत्रपति श्रीशिवाजीमहाराज यांचें चरित्र, पृ. ५९०, ले. कृष्णराव अर्जुन केळुसकर, (३) महाराजा शिवाजी, ले. सीताराम वासुदेव पेंडसे, (४) शिवछत्रपतींचें चरित्र, ले. राजाराम रामकृष्ण भागवत, (५) मराठा स्वराज्य-संस्थापक श्रीशिवाजीमहाराज, ले. चिंतामण विनायक वैद्य, (६) शककर्ता शिवाजी, ले. गोविंद सखाराम सरदेसाई, (७) श्रीछत्रपति शिवाजीमहाराज यांचें चरित्र, ले. मोरो अप्पाजी सहस्रबुद्धे. याशिवाय सरकारकृत 'शिवाजी व शिवकाल' हें इंग्रजी चरित्र फार नाणावलें म्हणून त्याचा लाभ मराठी वाचकांना देण्याकरितां बडोद्याचे श्री. विनायक सदाशिव वाकसकर यांनीं त्याचें मराठी भाषांतर केलें तें. अशा रीतीनें छत्रपतींचीं अनेक चरित्रें व्यासंगपूर्वक व परिश्रमपूर्वक लिहून या सर्व विद्वान् ग्रंथकारांनीं शिवाजीमहाराजांवरील आपली भक्ति व्यक्त केली आहे.

हीं सर्व चरित्रें आपआपल्या परीनें वाचनीय व अभ्यसनीय आहेत यांत शंका नाहीं. श्री. केळुसकर यांच्या चरित्राच्या दोन आवृत्त्या निघून

त्याचीं हिंदी व गुजराथी या भाषांत भाषांतरेंहि झालीं, इतकी लोकप्रियता त्या ग्रंथानें संपादिली. त्या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीपूर्वी सन १९१९ त जदुनाथ सरकारकृत शिवचरित्राची पहिली आवृत्ति निघाली असल्यामुळें तिचा लाभ केळुसकरांनीं आपल्या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तींत साहजिकच घेतला. त्यानंतर श्रीशिवचरित्र-कार्यालयानें आपले वर निर्दिष्ट केलेले पत्रसार-संग्रहाचे तीन खंड मागाहून बऱ्याच वर्षांनीं प्रसिद्ध केले. त्यांचा उपयोग केळुसकरांना करतां येणें शक्य नव्हतें. त्यामुळें त्यांच्या आधारें लिहिलेल्या विस्तृत शिवचरित्राची अद्यापि उणीव आहे, असें मीं भा. इ. सं. मंडळाचे कार्यवाह श्री. शंकरराव जोशी व श्री. गणेश हरी खरे यांजकडे शोध करतां समजलें. ही माहिती मिळाल्यावर ती उणीव शक्य तितकी यथाशक्ति भरून काढण्याचा मला हुरूप आला. मनानें तोच एक छंद घेतला व मीं आपलें सर्व लक्ष त्या कार्याकडे वाहिलें. शिवकालीन पत्रसारसंग्रहाचें व इतर संबंधी ग्रंथांचें वाचन व मनन करीत असतां माझ्या मनांतील एक भ्रम नाहींसा झाला. मला असें वाटे कीं, शिवचरित्रास आधारभूत अशी विश्वसनीय माहिती अत्यल्प उपलब्ध आहे. जी आहे ती बखरी वगैरे ग्रंथांतील. पण वरील पत्रसारसंग्रहांत अशीं असंख्य पत्रें आहेत कीं, ज्यांच्या आधारें विश्वसनीय चरित्र गुंफतां येईल.

शिवचरित्र-साधनें

शिवचरित्र-साधनांचे दोन भाग पडतात : एक शिवकालीन साधनांचा व दुसरा शिवनिधनोत्तर साधनांचा. पैकीं शिवकालीन पत्रें आतां असंख्य उपलब्ध झालीं आहेत. पण तत्कालीन बखर म्हणजे संकलित चरित्र असें एकहि उपलब्ध नाहीं. नाहीं म्हणावयास कृष्णाजी अनंत सभासद यानें लिहिलेलें 'शिवछत्रपतींचें चरित्र' या नांवाची एक बखर आहे. ती त्यानें राजाराम-महाराज जिंजीस अडकून पडले असतां त्यांच्या आज्ञेवरून त्यांचा नोकर या नात्यानें शके १६१६ त म्हणजे शिवाजी राजे यांच्या निधनानंतर चौदा वर्षांनीं लिहिली. सभासद हा शिवाजीच्या हयातींत विद्यमान व चांगला जाणता, माहीतगार, अनुभवी व मोठ्या पदावर असावा व त्याजपाशीं शिवकालीन इतिहास लिहिण्यास उपयुक्त अशीं कागदपत्रेंहि असावीं. त्या दृष्टीनें त्यानें हें चरित्र मागाहून लिहिलें असलें तरी शिवकालीन समजण्यास

हरकत नाहीं. त्यानंतर अलीकडे उपलब्ध झालेलें कवीन्द्र परमानंदकृत अनुपुराण तथा शिव-भारत. हें काव्य परमानंदानें शिवाजीच्या सांगण्यावरून त्याच्या हयातींत रचिलें. याशिवाय तिसरा साधनग्रंथ जयराम कविरचित पर्णालपर्वतग्रहणाख्यान; तेंहि शिवकालांतच लिहिण्यांत आलें.

वरील तिन्ही ग्रंथ शिवकालीनच असले तरी ते अपुरे आहेत. सभासदाची बखर समग्र शिवचरित्र सांगणारी आहे. पण तिच्यांतील प्रसंगांत कालानुक्रमाचें सूत्र कांहीं ठिकाणीं सुटलें आहे. बहुतेक प्रसंगांची हकीगत खरी आहे, पण अतिशयोक्तीची व तुटपुंजी असून प्रत्येक प्रसंगाची कालनिदर्शक नाहीं. परमानंदाचें शिवभारत फक्त शाइस्ताखानाच्या स्वारीपर्यंतचेंच आहे. त्यांत पुढचें शिवचरित्र नाहीं, पण शिवाजीच्या पूर्वजांचा वृत्तान्त बराच आहे. यांतहि कालनिर्देशाची उणीव फारच मोठी आहे. आतां उरलें जयराम कवीचें पर्णालपर्वतग्रहणाख्यान. तें मुख्यतः शिवाजीनें पन्हाळा किल्ला इ. स. १६७३ त घेतला हें सांगण्याकरितांच आहे. अर्थात् या तिन्ही ग्रंथांवर सर्वस्वीं भिस्त ठेवून शिवचरित्र रचणें शक्य नाहीं.

शिवकालीन ग्रंथांची जर ही स्थिति तर शिवोत्तर कालांतील ग्रंथांविषयीं बोलावयासच नको. या सर्व बखरीच आहेत व त्या शिवकालानंतर बऱ्याच वर्षांनीं रचण्यांत आल्या आहेत, या दृष्टीनें विश्वसनीय नाहींत. त्यांचीं नांवें चित्रगुप्ताची बखर, चिटणिसांची बखर, शिवदिग्विजय, शिवप्रताप व ९१ कलमी बखर हीं होत. जेधे-शकावली व जेधे-करीना यांच्या अलीकडील प्रसिद्धीनें शिवचरित्रसाधनांत महत्त्वाची भर घातली आहे. शकावलींतील पुष्कळसे शक बरोबर आहेत व करीन्यांतहि शिवचरित्रांतील प्रसंगांचीं वर्णनें आहेत. पण त्याविषयींहि असें म्हणावें लागतें कीं, त्यांनाहि इतर साधनांकडून दुजोरा मिळाल्याशिवाय त्यांजवर विसंबून राहतां येत नाहीं; किंबहुना सर्वच शिवचरित्रसाधनांविषयीं असेंच विधान करणें भाग आहे.

अशा स्थितींत पत्रसारसंग्रहाच्या तीन खंडांनीं जर कोणती महत्त्वाची उणीव भरून काढली असेल तर ती ही कीं, त्यांनीं इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच व डच यांचीं पत्रें उपलब्ध करून दिलीं. त्यांत शिवचरित्रांतील विविध प्रसंगांचीं

वर्णनें आहेत व त्यांच्या तारखाहि आहेत. त्यांजवर बोट ठेवून इतर साधनें वाचलीं म्हणजे शिवचरित्र बरेंचसें बिनचूक रचतां येतें. त्यांतील मित्या म्हणजे तारखा कालदृष्ट्या अंधारांतून जाणाराला सडकेच्या कडेनें लावलेल्या विद्युद्दीपाप्रमाणें मार्गदर्शन करतात. पत्रसारसंग्रहांतील पत्रेंहि त्यांजवर सर्वस्वीं अवलंबून राहूं म्हटलें तर शिवचरित्र लिहिण्यास पुरेशीं नाहींत. त्यांत बखरी, काव्यें इत्यादिकांचा तारतम्यपूर्वक व शोधपूर्वक मालमसाला घातला म्हणजेच शिवचरित्रांत रंग भरतो व त्यांत जिवंतपणा येतो.

शिवचरित्राची दुसरी बाजू

आतां मराठींत जीं शिवचरित्रसाधनें उपलब्ध आहेत तीं प्रायः एकांगी आहेत; म्हणजे तीं वाचून मराठ्यांची बाजू तेवढी कळते. शिवचरित्राची दुसरी बाजू मोगल, विजापूरकर व गोवळकोंडेकर यांची होय. ती समजून घेतल्या-शिवाय शिवचरित्राची पूर्तता कदापि व्हावयाची नाहीं. तें साहित्य सांपडलें तर फार्सी भाषेंतच सांपडावयाचें आणि तें फार्सी दप्तर दिल्ली व रजपूत संस्थानें व विजापूर या भागांतच मिळण्याचा संभव. अर्थात् निवळ मराठी व इंग्रजी जाणणारांच्या तें आटोक्याबाहेरचें. परंतु नेमकी तीच उणीव सर जदुनाथ सरकार यांच्या शिवचरित्रानें पूर्णपणें भरून काढली आहे. त्यांना फार्सी भाषेंतील (१) आलमगीरनामा (मिर्झा महमद कासीमकृत), (२) मसीर आलमगिरी (साकी मुसादखानकृत), (३) नसखा दिलकाशा (भीमसेन बऱ्हाणपुरीकृत), (४) अखबारत-इ-दरबार-इ-मौला (लंडन व जयपूर येथील हस्तलिखितें), (५) महमद-नामा (महमद जहूरकृत), (६) तारीख-इ-अली आदिलशहा दुसरा, (७) बुसातिन उस सुलातिन (इब्राहिम अली झुबेरीकृत), (८) अदाव-इ-अलमगिरी (काबिलखानकृत), (९) हत अंजुमान (उदिराज तल्यार, पॅरिसमधील हस्तलिखित), (१०) खतूत-इ-शिवाजी इत्यादि साहित्य परिश्रमपूर्वक हस्तगत झाल्यामुळें व त्यांनीं स्वतः फार्सी भाषेंत नैपुण्य मिळविलें असल्यामुळें त्यांच्या चरित्राला ती अपूर्व जोड लाभली. या फार्सी साहित्याचा विशेष हा कीं, त्यांत दिलेली माहिती तारीखवार आहे. या कारणानें शाइस्ताखानाच्या स्वारीपासून शिवाजीच्या मृत्यूपर्यंत आपणांस मुसलमान राज्यकर्त्यांची बाजू विस्तृत व बहुतांशीं बिनचूक प्राप्त होते.

तिचा मला भरपूर उपयोग करतां आला याबद्दल जदुनाथांचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत. जदुनाथांच्या खालोखाल डॉ. बाळकृष्ण व इतर अनेक इतिहासकार व साधनकार यांचेहि मजवर उपकार आहेत.

मीं या ग्रंथांतील एकहि विधान आधाराशिवाय केलेलें नाहीं व अनुमानेंहि आधाराशिवाय काढलेलीं नाहींत. तरीहि त्यांची पृष्ठसंख्या साडेचारशेंपर्यंत गेली आहे. असें असून त्यांत निवळ चरित्रावांचून दुसऱ्या कशाचाहि अन्तर्भाव करतां आला नाहीं तो नाहींच; कारण चरित्राइतक्याच – शिवाजीचा राज्यकारभार, त्याची न्यायपद्धति, धर्मनिष्ठा, ग्रंथोत्तेजन, तत्कालीन देशस्थिति, पोर्तुगीज व इंग्रज यांचीं कारस्थानें, वतनदारी, लोकजीवन, मुसलमानांचें धार्मिक धोरण, रामदासांची संघटना, साधुसंतांची धर्मसेवा – इत्यादि बाबी महत्त्वाच्या आहेत. त्यांचा परामर्श घेण्याकरितां, या चरित्राला पूरक म्हणून स्वतंत्र ग्रंथ मीं लिहून ठेवला आहे. तो प्रसिद्ध करण्याचा योग येईल तो सुदिन.

प्रकरणांची योजना

शिवचरित्रानें सुमारें पस्तीस वर्षांचा दीर्घकाल व्यापला आहे. त्या काळांत शिवाजीचा संघर्ष विजापूरकर व मोगल यांजप्रमाणें इंग्रज, पोर्तुगीज, कुडाळचे सावंत व सिद्दी यांच्याशीं झाला. पण तो एकसारखा न होतां मध्यंतरीं खंड पडून झाला. कालानुक्रमाचें सूत्र सांभाळून त्यांचा वृत्तान्त दिला असता तर त्यांचा संगतवार बोध वाचकांस न होऊन त्यांचें सम्यक् चित्र वाचकांपुढें उभें राहण्यानें जो ठसा त्यांच्या मनावर उमटावयास पाहिजे तो उमटला नसता. यासाठीं ते प्रसंग त्रुटित न देतां एकत्र एकएका स्वतंत्र प्रकरणांत देण्याची व्यवस्था या ग्रंथांत मीं केली आहे. शिवाजी व सिद्दी यांच्या लढ्यांत मागाहून इंग्रज घुसल्यामुळें त्या त्रिवर्गांचा परामर्श एकाच प्रकरणांत घ्यावा लागला. या व्यवस्थेमुळें 'कुडाळचे सावंत व शिवाजी', 'शिवाजी व पोर्तुगीज', 'शिवाजी व इंग्रज', 'शिवाजी, सिद्दी व इंग्रज' हीं प्रकरणें योग्य ठिकाणीं दिलीं गेलीं नाहींत असा वाचकांचा ग्रह होण्याचा संभव असल्यानें हा खुलासा करावा लागत आहे. श्रीसमर्थ रामदास व शिवाजी यांचा साक्षात् संबंध शिवाजीच्या राजकीय उलाढालींत प्रामुख्यानें येत नसला तरी शिवाजीच्या राजकार-

णाचा तो एक अन्तःप्रवाह वा पार्श्वभूमि आहे, हें जाणून तेंहि एक प्रकरण शिवाजीच्या निर्याणापूर्वी घालण्यांत आलें आहे.

कै. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनीं श्रीशिवछत्रपतींचा उत्सव सन १८९५ सालीं सुरू केला आणि कै. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांनी 'राइझ ऑफ दी मराठा पॉवर' हा छोटा पण नावीन्यपूर्ण ग्रंथ इंग्रजींत लिहिला. तेव्हांपासून सुशिक्षित लोकांचें लक्ष शिवाजीकडे विशेष वळून शिवाजीविषयीं कृतज्ञता व्यक्त करण्याचे अनेकांनीं अनेक मार्ग सुचविले. त्यांत शिवचरित्र-साहित्याचें संशोधन, रायगडा-वरील शिवाजीच्या छत्रीचा जीर्णोद्धार व ऐतिहासिक अवशेषांचें संरक्षण, शिवाजीच्या पुतळ्याची स्थापना व शिवचरित्र-ग्रंथाचें लेखन यांचा समा-वेश करण्यांत आला होता. त्यांपैकीं नवस्वराज्याचा उदय होईपर्यंत शिवचरित्र-साहित्य शक्य तितकें उजेडांत आलें, रायगडावरील छत्रीचा जीर्णोद्धार व ऐतिहासिक अवशेषांचेंहि सरकारतर्फे रक्षण करण्यांत आलें, अनेक पुतळे व त्या सर्वांत श्रेष्ठ व उत्कृष्ट असा पुण्यास नव्या पुलापलीकडे महाराजांचा अश्वारूढ पुतळाहि उभारण्यांत आला. इतकेंच नव्हे तर छत्रपतींच्या नांवाचें क्षात्र विद्यालयहि पुण्यांत स्थापण्यांत आलें. यांपैकीं उरलें तें छत्रपतींचें विस्तृत चरित्र लोकमान्यांच्या लेखणींतूनच उतरणें औचित्याच्या दृष्टीनें अत्यावश्यक होतें व तशी त्यांची इच्छाहि होती.

त्यांनीं मंडालेच्या तुरुंगांत असतां संकल्पित ग्रंथांची जी एक यादी स्वहस्तानें करून ठेवली होती; तींत शिवचरित्राचा प्राधान्यानें निर्देश केला होता. तें महत्कार्य त्यांच्या हातूनच पार पडावयास पाहिजे होतें. परंतु त्यांजवर अनेक बिकट राजकीय प्रश्नांचा भार पडला असल्यामुळें त्यांना या सत्कार्यास हात घालतां आला नाहीं. तें कार्य तडीस नेण्याचा मीं हा नम्र प्रयत्न केला आहे. तो कितपत यशस्वी झाला हें ठरविणें मी वाचकांवरच सोपवितों. मात्र तो अंशतः तरी साधला असें वाचकांचें मत बनल्यास मी आपणांस धन्य समजेन.

भा. इ. सं. मंडळाचें दुर्मिळ व अमूल्य ग्रंथ-भांडार व त्याच्या मंदि-रांत बसून संशोधनाचें अहर्निश अनुष्ठान चालविणारे तपस्वी शंकर नारायण जोशी व गणेश हरि खरे यांचें साहाय्य व सहकार्य लाभलें नसतें तर हें

बिकट कार्य मजकडून पार पडलें नसतें. त्यांना शिवचरित्रांतील सर्व प्रसंग करतलामलकवत् अवगत आहेत. जेव्हां जेव्हां गरज भासे तेव्हां तेव्हां त्यांस भेटून मी त्यांजबरोबर चर्चा करीं व त्यांजपासून शंकासमाधान करून घेईं. या कामीं न कंटाळतां त्यांनीं जी आपुलकीनें तसदी घेतली तिजबद्दल त्यांचे किती आभार मानावे ?

प्रस्तुत प्रयत्नाचें मुख्य प्रयोजन सत्यान्वेषण हें आहे. बखरीवर विसंबून न राहतां कागदपत्रांचा आधार या प्रयत्नास त्याच कारणाकरितां घेतला आहे. त्यामुळें कित्येक प्रचलित पण लोकप्रिय समजुतींना धक्का बसणार आहे. पण त्यास माझा नाइलाज आहे. तसें जर मीं केलें नसतें तर इतिहासाऐवजीं कादंबरी लिहिण्याचा दोष माझ्या पदरीं आला असता.

शिवचरित्र लिहिण्याचीं साधनें अद्यापि पुरेशीं नाहींत. तीं जेव्हां पूर्णपणें हस्तगत होतील तेव्हांच शिवचरित्र लिहावें व तेंहि विस्तृत म्हणजे अनेक खंडांत लिहावें असें म्हणणारे कांहीं संशोधक असतील. त्यांच्या दृष्टीनें माझा हा प्रयत्न अकालीं होत आहे. त्यांस माझें उत्तर असें कीं, साधनें पूर्णपणें उजेडांत आलीं याचें गमक कांहीं नाहीं. तीं कोठें कमी पडतात हें चरित्र लिहिल्याशिवाय कळावें कसें ? बरें, चरित्र लिहिल्यानंतर तो अपुरेपणा लक्षांत आला म्हणजे प्रस्तुत चरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीचा योग आल्यास ती उणीव भरून काढतां येईल. त्यासाठीं खोळंबून बसण्याचें कारण नाहीं. सर जदुनाथ सरकार यांनीं हाच मार्ग अवलंबिला. पहिली आवृत्ति प्रसिद्ध झाल्यानंतर जे नवीन शोध लागले त्यांचा लाभ त्यांनीं पुढच्या आवृत्तीच्या वेळीं घेतला. अशा त्यांच्या चार आवृत्त्या आतांपर्यंत प्रसिद्ध झाल्या. माझा हा प्रयत्न एका व्यक्तीचा आहे. एखाद्या संपन्न संस्थेनें मुबलक द्रव्यनिधि जमवून व अनेक लेखक नेमून त्यांजकडून शिवरायाचें अनेक खंडांत विस्तृत चरित्र लिहिण्याचें मनांत आणलें तर त्यांचा मार्ग मोकळा आहे. तो माझ्या या प्रयत्नानें अडणार नाहीं.

ग्रंथकाराच्या अडचणी

प्रस्तुत स्थिति अशी आहे कीं, अशीं चरित्रें लिहून लेखकास द्रव्यलाभ कांहीं नसतो; इतकेंच नव्हे तर त्याच्या प्रकाशनासाठीं लागणारें भांडवल घालणारा पुस्तकविक्रेताहि भेटत नाहीं. कारण त्यालाहि जें

भांडवल गुंतविलें तें लवकर मोकळें होण्याची आशा नसते. हें माहीत असतांहि मीं हें कष्टप्रद कार्य अंगीकारलें याचें कारण मला लिहिण्याचें व्यसन आहे व द्रव्यप्राप्तीचीं अशीं शालेय पुस्तकें लिहिण्याकडे मनाचा कल नाहीं हेंच होय.

सद्यःकाळांत ग्रंथ लिहिणें हें जितकें सोपें आहे तितकें लिहिलेला ग्रंथ प्रकाशित होणें सोपें नाहीं. कारण ग्रंथलेखन बिनखर्ची असतें, पण प्रकाशनास मोठी रक्कम उभी करावी लागते. वास्तविक ग्रंथकारानें ग्रंथ लिहावा व प्रकाशकानें तो प्रसिद्ध करावा, अशी कामाची वांटणी व्हावयास पाहिजे व तशी पाश्चात्त्य देशांत असतेहि. पण आमच्या या गरीब देशांत ग्रंथकारावरच ग्रंथप्रकाशनाचाहि भार पडत असल्यामुळें कित्येक बुद्धिमान व उद्योगी गृहस्थांना या दुसऱ्या दुर्लंघ्य अडचणीपुढें हात टेकावे लागून ग्रंथरचनेस रामराम ठोकून आपली बुद्धि गंजत व कुजत ठेवण्याचा प्रसंग येतो.

श्रीशिवछत्रपतींच्या चरित्रासारख्या मोठ्या ग्रंथाचें प्रकाशन संस्थानिक वा संस्था यांच्या आश्रयाशिवाय होऊं शकणार नाहीं. सांप्रत महाराष्ट्रीय संस्थानिक अस्तंगत झाले आहेत व प्रकाशक संस्था अत्यल्प व द्रव्यहीन अशाच आहेत. तथापि श्रीशिवाजी-रायगड-स्मारक-मंडळ ही संस्था अशी आहे कीं, तिचें श्रीशिवचरित्र-प्रकाशन हें एक महत्त्वाचें कर्तव्य ठरतें. तसें केळुसकर यांनीं आपल्या शिवचरित्राच्या प्रस्तावनेंत म्हटलेंहि आहे. तें लक्षांत घेऊन श्रीशिवाजी रायगड-स्मारक-मंडळानें प्रस्तुत चरित्राच्या प्रकाशनास तीन सहस्र रुपयांपर्यंत उदार मनानें द्रव्यसाहाय्य करण्याचें योजल्यामुळें हा ग्रंथ आज उजेडांत येत आहे. या उदार आश्रयाबद्दल प्रस्तुत लेखक सदरील मंडळाचा अत्यंत ऋणी आहे. रायगड-स्मारक-मंडळानें या कार्यासाठीं तीन सहस्र रुपयांची रक्कम मंजूर केली नसती तर प्रस्तुत ग्रंथाचें हस्तलिखितहि माझ्या इतर हस्तलिखितांप्रमाणें सांदीकोपऱ्यांत धूळ खात पडण्याची भीति होती.

या ग्रंथास रायगड-स्मारक-मंडळाशिवाय व्यक्तिशः अनेकांचें अनेक प्रकारचें साहाय्य झालें आहे. त्यांपैकींच माझे मित्र रा. सदाशिव विनायक बापट, केसरीचे संपादक व विश्वस्त जयंतराव टिळक, रा. स्मा. मंडळाचे अध्यक्ष श्री. रामराव माधवराव देशमुख, बार ॲट लॉ, यशवंत नरसिंह

केळकर, पुरुषोत्तम प्रभाकर जोशी, सुंदरमेठी बुटाला, ल. गो. विंझे, दत्तात्रेय व्यंकटेश बेळवी, कृष्णाजी बळवंत भावे, रायगड-स्मारक-मंडळाचे कार्यवाह श्री. दिनकर विनायक काळे, बाह्य पृष्ठावरील शिवाजीचें चित्र काढणारे प्रसिद्ध चित्रकार श्री. नी. वा. खरे व ब्लॉक करणारे श्री. के. जोशी आणि कंपनी हे होत. या शेवटच्या दोघांनीं आपलें काम उत्कृष्ट केलें आहे. त्यांचा व तत्पूर्वींच्या सर्वांचा मी फार आभारी आहें.

श्री. जनार्दन सखाराम ऊर्फ तात्यासाहेब करंदीकर, विश्वस्त, केसरी-मराठा संस्था, यांचे आभार मीं किती मानावे हेंच मला समजत नाहीं. त्यांची प्रथमपासून या ग्रंथावर कृपा असून त्यांनीं आपला बहुमोल वेळ खर्चून याचीं मुद्रितें तपासलीं व महत्त्वाच्या सुधारणा केल्या याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

केसरी छापखान्याचा व माझा फार जुना संबंध. तो लक्षांत घेऊन प्रस्तुत ग्रंथाच्या छपाईचें काम त्या छापखान्याच्या चालकांनीं त्यांच्या लौकिकास साजेल अशा प्रकारें उत्कृष्ट व अपेक्षेपलीकडे लवकर करून दिलें, याबद्दल केसरी छापखान्याचे व्यवस्थापक श्री. वसंतराव साठे व भास्करराव कुलकर्णी यांचेहि आभार मानणें माझें कर्तव्य होय.

लोकनायक माधव श्रीहरि तथा बापूजी अणे यांचें वास्तव्य सांप्रत पुण्यांत आहे. त्यांनीं परसत्तेखालीं असतांना व नंतर स्वराज्यांतहि राष्ट्रीय सभेचें सर्वाधिकारी, व्हाइसरायांचे मंत्री, सीलोनमधील हायकमिशनर व अलीकडे बिहार प्रांताचे राज्यपाल इत्यादि महत्पदें भूषवून विद्यमान महाराष्ट्रीयांत अद्वितीय स्थान मिळविलें आहे. ते सांप्रत भीष्माचार्यांप्रमाणें शरपंजरीं पडले असतांहि स्थितप्रज्ञासारखी समाधानी वृत्ति कायम ठेवून आहेत. त्यांनीं हा ग्रंथ वाचला व त्यावर प्रस्तावनेचें पांडित्य-प्रचुर मूल्यवान् लेणें चढवून त्यास त्यांनी भूषविलें हे त्यांचे महदुपकार होत.

शेवटीं ध्यानीं-मनीं-स्वप्नीं नसतां शिवरायाची ही सेवा करण्याची ज्या परमात्म्यानें आपल्या लीलेनें मला बुद्धि, शक्ति व आयुष्य दिलें त्याला शरण जाऊन वाचकांस हा ग्रंथ नम्रभावानें सादर करीत आहें.

शके १८७७
वैशाख शुद्ध २ (अक्षय्यतृतीया)
रविवार दि. २४–४–५५

वासुदेव कृष्ण भावे

अनुक्रमणिका



श्रीशिवछत्रपति

युगप्रवर्तक श्रीशिवाजीमहाराज यांचें चरित्र

प्रकरण पहिलें

कुलवृत्त

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥

— श्रीमद्भगवद्गीता

शिवाजीमहाराजांचें मूळ गांव वेरूळ. तें गांव जरी आज पडीक व उपेक्षणीय स्थितींत असलें तरी त्याचें नांव जगप्रसिद्ध आहे. त्याच्या-जवळच्या लेण्यांची कीर्ति दिगंत पसरलेली असून तीं पाहावयास रसिकांच्या झुंडीच्या झुंडी प्रत्यहीं येत असतात. त्या लेण्यांच्या पायथ्याशींच बारा ज्योतिर्लिंगांपैकीं घृष्णेश्वराचें सुंदर मंदिर आहे. महाराष्ट्रांतून काशीयात्रेस जाण्याची जुनी वाट वेरूळावरून असल्यानें यात्रेकरू त्याच्या दर्शनाकरितां मंदिरापाशींच मुक्काम करीत. वेरूळच्या अनेक लेण्यांत कैलास लेणें हें सर्वांत भव्य व प्रचंड लेणें आहे. तें राष्ट्रकूट राजा कृष्णराज पहिला याच्या कार-

कीर्दीत कोरण्यांत आलें. त्यांतील जंगी शिवलिंग पाहून बाहेर, खालच्या सपाटीवर, घृष्णेश्वर-मंदिर बांधण्याची कल्पना कोणा भक्तास सुचली असल्यास न कळे. हा प्रदेश उन्हाळ्यांत अगदीं रुक्ष भासतो. त्यांतील ओढा आटलेला असतो. त्यामुळें त्याशेजारचें वेरूळ गांव फारच भयाण वाटतें. पण पावसाळ्यांत सर्वत्र हिरवळ दाटली व तो ओढा खळखळ वाहूं लागला म्हणजे वेरूळ गांवाचें दैन्य झाकलें जाऊन त्यास एक प्रकारची रम्यता प्राप्त होते.

वेरुळापासून जवळच सुमारें तीन कोसांवर देवगिरीचा दर्शनीय व मजबूत किल्ला आहे. त्यावर यादव राजे बहुत वर्षें राज्य करीत होते. त्यांचें स्वराज्य जेव्हां अल्लाउद्दिन खिलजीनें अस्ताला नेलें तेव्हां भोंवतालची स्थिति अगदीं बदलून मुसलमान राज्यकर्त्यांबरोबर उत्तरेकडील मुसलमान व रजपूत महाराष्ट्रांत येऊन ठिकठिकाणीं स्थायिक झाले. त्यांपैकींच शिवाजीमहाराजांचे पूर्वज हे होत. ते महाराष्ट्रांत आल्यावर प्रथम देवगिरीजवळ वेरुळास राहत असत. शहाजी आपणांस रजपूत म्हणवीत असे. त्यावरून त्याचे पूर्वज राजपुतान्यांतून महाराष्ट्रांत आले यांत शंका नाहीं. त्यांचें राजपुतान्यांतील घराणें शिसोदें. हें घराणें बहामनी राज्याचा संस्थापक हुसेनखान याजबरोबर इकडे आलें. शिवाजीचा अलीकडचा प्रसिद्ध पूर्वज बाबाजी. बाबाजीचा जन्म इ. स. १५३० त झाला. त्याला ६७ वर्षें आयुर्दाय लाभला. अहमदनगरच्या निजामशाहीचा संस्थापक अहमद निजामशहा. त्यानें इ. स. १४८९ त जुन्नर येथें स्वतंत्र राज्य स्थापल्यावर सन १४९४ त अहमदनगर हें राजधानीकरितां नवें शहर वसविलें. त्याच्यामागून त्याचा पुत्र बुऱ्हाणशहा हा इ. स. १५०८ मध्यें गादीवर बसला. त्याच्या कारकीर्दींत बाबाजीनें निजामशाहींत नोकरी पत्करली असावी. कारण त्या वेळीं कंवरसेन हा ब्राह्मण बुऱ्हाणशहाचा मुख्य प्रधान असल्यामुळें हिंदूंचा त्या राज्यांतील नोकरींत प्रवेश सुलभ झाला. सन १५९७च्या डिसेंबर महिन्यांत बाबाजीनें कसबे पेडगांव परगणे पांडे पेडगांव येथील रामेश्वर भट, चिंतामणि भट आदि आरवी मुद्गल येथील ब्राह्मणांना १। चावर जमीन इनाम दिल्याचा उल्लेख सांपडतो. त्यावरून परगणे पांडे पेडगांव बाबाजीस निजामशाहीमधून जहागीर मिळाला असावा असें वाटतें. पेडगांव दौंडा-

जवळ असून 'वेड घेऊन पेडगांवाला जाणें' या म्हणींतील पेडगांव तें हेंच. प्रस्तुत दानपत्र बाबाजीनें मरणापूर्वी एकच वर्ष दिलें होतें.

बाबाजीचे पुत्र

बाबाजीला मालोजी व विठोजी असे दोन पुत्र होते. ते दोघेहि बापाच्या मृत्युसमयीं चांगले प्रौढ होऊन कर्तेसवरते झाले होते. दोघेहि एका विचारानें राहत. बाबाजीनें मिळविलेल्या वतनांत व जहागिरींत यांनीं पुष्कळच भर घातली. बाबाजीस मालोजी हा सन १५५० त व विठोजी १५५३ त झाला. मालोजीस वयाच्या २७ व्या वर्षी नोकरी लागली. ती लुखजी जाधवाच्या वशिल्यानें लागली, असें वासुदेवशास्त्री खरे म्हणतात. पण मालोजीचा बाप बाबाजी हाच निजामशाहीच्या नोकरींत मोठ्या हुद्द्यावर चढला असल्यामुळें मालोजीस नोकरी लागण्यास लुखजी जाधवाच्या वशिल्याची जरुरी नव्हती.

मालोजीचा मेहुणा म्हणजे पत्नीचा भाऊ वणगोजी नाईक फलटणकर यानें सन १५९६ पूर्वीच विजापूरकरांच्या मुलुखांत दंगा माजविला होता. त्या वेळीं निजामशाहीच्या गादीवर इब्राहिम हा अल्पवयी मुलगा होता, तो मारला जाऊन दिवाण मिआन अंजू हा कारभार पाहत होता. दरबारांत दुफळी माजली होती. आणि चांदबिबी ही पुढें येऊन तिचें, अकबर बादशहाचा मुलगा मुराद याजबरोबर युद्ध चालू होतें. निजामशाहींत अशी अंदाधुंदी माजल्यामुळें मालोजी कांहीं दिवस स्वस्थ घरींच बसला होता. त्याला वणगोजीच्या बंडाव्याची हकीकत कळतांच तो त्यास जाऊन मिळाला. त्या दोघांनीं कऱ्हाडचा कोट घेतला, मोठमोठे सावकार लुटले व पन्हाळ्यापर्यंतचा मुलूख पादाक्रांत केला. वणगोजी व मालोजी कोल्हापुरास रंकाळ्याच्या तळ्यावर असतां त्यांवर विजापूरकरांची फौज अकस्मात् चालून आली; तिचा मालोजीनें अचाट पराक्रम करून मोड केला; हें ऐकून निजामशाही दरबारानें त्याला परत बोलावून आपल्या नोकरींत घेतलें. अर्थात् त्याला आतां पूर्वीपेक्षांहि मोठा दर्जा प्राप्त झाला. त्याला राजा हा किताब, पंचहजारी मनसब व फौजेच्या खर्चाकरितां पुणें, सुपें, चाकण-चौऱ्यायशी व इंदापूर येथील देशमुखी आणि कुटुंब ठेवण्याकरितां शिवनेरीचा किल्ला सन १६०३ मध्यें मिळाला.

शहाजी व शरीफजी

मालोजीस शहाजी व शरीफजी असे दोन पुत्र झाले. शहाजी सन १५९४ त व शरीफजी सन १५९७ त वेरुळास जन्मले. लुखजी जाधवरावाची कन्या जिजाऊ सन १५९६ त जन्मास आली. म्हणजे शहाजीपेक्षां ती अवघी दोनच वर्षांनीं लहान होती. या दोघांचें लग्न सन १६०३ मध्यें झालें. अर्थात् लग्नांत शहाजी ९ वर्षांचा व जिजाऊ ७ वर्षांची होती. अशा लहान वयांत लग्नापूर्वी रंगपंचमीच्या दिवशीं उभयतांनीं एकमेकांवर अजाणतेपणानें गुलाल वा रंग उडवला असल्यास त्यांत नवल नाहीं. मात्र त्या समयास उभयतांच्या लग्नाची भाषा निघाली असल्यास तिचा जाधवरावास राग येण्याचें कांहींच कारण नव्हतें, इतक्या योग्यतेस मालोजी चढला होता; शिवाय तो वणगोजी फलटणकर या घरंदाज सरदाराचा मेहुणा होता, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. चांदबिबीच्या खुनानंतर अकबराचा दुसरा मुलगा दानियल यानें अहमदनगर सन १६०० त घेतलें व अकबरानें अहमदनगरचा सुलतान बहादुरशहा यास आग्र्यास कैदेंत ठेवलें. अहमदनगर हातचें गेल्यावर निजामशाही जिवंत राखण्याचा प्रयत्न करण्याकरितां बुऱ्हाण निजामशहाचा नातू मूर्तुजा विजापुरास पणजोळीं होता; त्यास मलिक अंबरानें आणून बार्शीजवळ परिंडा येथें निजामशाहीच्या गादीवर बसविलें व परिंडा हीच निजामशाहीची कांहीं काल राजधानी केली. येथून पुढें मिआन राजू व मलिक अंबर ही जोडी उदयास येऊन तिनें निजामशाही सावरून धरली. त्यांच्याच राजवटीचा लाभ मालोजीस मिळून त्याचा चांगलाच उत्कर्ष झाला. शहाजीस पांचवें वर्ष लागलें तेव्हां त्यास घेऊन निजामशाहीच्या आज्ञेनें इंदापूरच्या स्वारीवर मालोजी गेला व तींत तो ठार झाला, असें परमानंदानें 'शिवभारतां'त म्हटलें आहे तें खरें दिसत नाहीं. त्यापेक्षां वासुदेवशास्त्री खरे यांनीं लिहिल्याप्रमाणें तो १६२० त मरण पावला हेंच खरें वाटतें. मात्र तो इंदापुरास मेला यांत शंका नाहीं, कारण तेथें त्याचें थडगें आहे. शहाजी पांच वर्षांचा असतांना मालोजी मेला असें धरल्यास त्याचा मृत्युकाल १५९९ त येतो व मरणसमयीं त्याचें वय ४९ वर्षांचें समजावें लागतें. परंतु मालोजीस जीं वतनें मिळालीं त्यांपैकीं बरींचशीं सन १६०० नंतर मिळाल्याचें तत्कालीन पत्रव्यवहारानें सिद्ध झालें आहे. पत्र-

व्यवहारांतील त्याच्या हयातीचा छडा सन १६११ पर्यंत लागतो. अर्थात् त्याचा मृत्यु सन १६११ नंतर केव्हां तरी झाला असला पाहिजे.

मलिक अंबरानें निजामशाहीची गादी तिच्या बचावाकरितां परिंड्याहून औसें व जुन्नर येथें हलविली व पुढें दौलताबाद राजधानी करून तेथेंच त्यानें मूर्तुजास नेऊन ठेवलें. या वेळीं अहमदनगर मोगलांच्या ताब्यांत असून तेथें मोगल सुभेदार खानखानान राहत होता. त्याजपासून अहमदनगर घेण्यासाठीं मलिक अंबराची धडपड सारखी चालू होती. मलिक अंबरानें सन १६०८ त नगरास वेढा घालून खानखानानाला आंत कोंडलें. खानखानानास खानजहान लोदी हा बाहेरून मदत करीत होता. पण त्या उभयतांचा इलाज न चालून अहमदनगर त्यांस मलिक अंबराच्या स्वाधीन करावें लागलें. अंबर अहमदनगर घेऊनच स्वस्थ बसला नाहीं तर खानखानान लोदी बऱ्हाणपुरास असतां अंबरानें आदिलशहा व कुतुबशहा यांची मदत घेऊन बऱ्हाणपुरास सन १६१७ त वेढा घातला. हा वेढा सहा महिने चालू असून अंबराच्या बाजूनें मालोजी व शहाजी मोगलांशीं लढत होते, असें सरदेसाई हे 'मुसलमानी रियासत' भाग पहिला या पुस्तकांत लिहितात. त्यावरूनहि परमानंदाचें विधान खोटें ठरतें. याहि दृष्टीनें खरेशास्त्री यांनीं सांगितलेला सन १६२० हा मालोजीचा मृत्युकालच निरपवाद दिसतो. म्हणजे मरणसमयीं मालोजी ७० वर्षांचा होता व त्या वेळीं त्याचा पुत्र शहाजी २६ वर्षांचा व बापाच्या बरोबरीनें पराक्रमी झाला होता. हा सत्तर वर्षांचा काल मालोजीस आपलें कर्तृत्व पूर्णपणें प्रकट करण्यास पुरेसा होता. या मुदतींत त्यानें कमाईहि चांगलीच केली. त्याचें व विठोजीचें सामर्थ्य, शौर्य व संघटनाचातुर्य पाहून निजामशाही दरबारानें त्या उभयतांना सरगुऱ्होयाती म्हणजे सेनाकर्ते या पदवीनें गौरविलें होतें. त्यानें पुणें, सुपें, चाकण व इंदापूर येथील देशमुखी संपादन केली होती, त्याला दुजोरा कांहींसा तत्कालीन अस्सल कागदपत्रांचाहि मिळतो. त्याजकडे बापापासून चालत आलेलें पेडगांवचें देशमुखीचें वतन असून त्याशिवाय नगर जिल्ह्यांतील चांभारगोंदें, सोलापूर जिल्ह्यांतील मोडनिंबजवळची कुरोली, देवगिरीजवळील कनरड (कन्नड), एलूर, (वेरूळ), देऱ्हाडे हे तीन परगणे आणि जातेगांव, लासूर, इत्यादि गांवें मलिक

अंबरानें सन १६०६ त त्यास दुमाला दिलीं होतीं. शिखर शिंगणापूरहि त्याजकडेच होतें. यांतील कांहीं गांवें सुपें, इंदापूर, दौंड यांच्या आसपास आहेत. सारांश, निजामशहानें प्रारंभीं दिलेले चार परगणे, नंतर दिलेले देवगिरीकडील तीन परगणे व गांवें लक्षांत घेतल्यास मालोजी हा मरणापूर्वी बडा जहागीरदार वा देशमुख झाला असल्याचें सिद्ध होतें. वस्तुतः देशमुख व जहागीरदार यांत म्हणण्यासारखा फरक नाहीं. देशमुख हे लहान जहागीरदारच होत. कारण त्या दोघांची राजाला उद्देशून जीं कर्तव्यें तीं समानच असत.

वेरूळचे भोसले यांचीं वेरूळचा घृष्णेश्वर व सप्तशृंगीची देवी हीं कुलदैवतें होतीं. मालोजीनें घृष्णेश्वरावरील भक्तीनें त्याचें देवालय बांधलें व जहागिरीच्या निमित्तानें त्याचें राहणें नगर व सोलापूर जिल्ह्यांत होऊं लागल्यावर त्यानें शिखर शिंगणापूरचा तलावहि बांधला. कारण शिंगणापूरची पाटिलकी कांहीं काळ त्याजकडे असल्याचें सन १६०६ मधील शंकर भारती गोंदड, वास्तव्य शिंगणापूर, यांजसंबंधींच्या पत्रावरून दिसून येतें.

मालोजी व त्याचा भाऊ विठोजी हे एक विचारानें वागत असत. यामुळें मालोजी व विठोजी यांस जीं वतनें व जहागीर मिळाली तीं बहुतेक सर्व दोघांना समाईक मिळाली होतीं. मात्र शिखर शिंगणापूरची मोकदमी हैबतखानानें सन १६११ त एकट्या विठोजीसच दिली होती. विठोजीला संभाजी, खेळोजी, मंबाजी, नागोजी, परसोजी, त्र्यंबकजी, बकाजी व मालोजी असे आठ पुत्र होते (परमानंद). हे सर्व भाऊ मलिक अंबरच्या तंत्रानें चालत असत. पुढील चमत्कारिक हकीकत परमानंदानें 'श्रीशिवभारतां'त वर्णिली आहे.

'एकदां निजामशहा सिंहासनावर बसला असतां त्याला मुजरा करण्यास अनेक सरदार आले. त्यांत खंडागळे (खंडार्गल) नांवाचा सरदार असून त्याचा हत्ती मस्त होऊन वाड्याबाहेर जमलेल्या सैनिकांना तुडवीत चालला. तेव्हां त्याला धरण्यास लुखजी जाधवरावाचे दत्ताजी प्रभृति पुत्र चालून गेले. त्यांनीं हत्तीला जेरीस आणिलें. उलटपक्षीं खंडागळे त्यांना प्रतिकार करूं लागला, त्याच्या मदतीस विठोजीचे संभाजी व खेळोजी हे पुत्र गेले. संभाजीस शहाजीहि जाऊन मिळाला. या

झगड्यांत दत्ताजी ठार झाला. ही बातमी जाधवरावास कळतांच तो संभाजीस मारण्याच्या इराद्यानें त्या जागीं आला. संभाजीच्या बाजूनें शहाजी लढत आहे असें पाहून जाधवरावानें शहाजीवर तरवारीचा जोरानें प्रहार केला. त्याबरोबर शहाजी मूर्च्छित होऊन पडला, पण कसाबसा वांचला. निजामशहाच्या मनांत याबद्दल जाधवरावास शासन करण्याचें आलें. पण त्याच्या ठिकाणीं तितकें सामर्थ्य नसल्यामुळें त्यानें कपटानें त्याचा नाश करण्याचें योजिलें. हें जाधवरावास कळतांच तो निजामशहाचा पक्ष सोडून मोगलांस मिळाला.' हा प्रसंग मूर्तुजा निजामशहाच्या कारकीर्दीत व सन १६२७त मलिक अंबर मरण पावल्यावर घडला असावा असें वाटतें.

'लुखजी जाधवराव म्हणून एक वजनदार मराठा सरदार (निजामशाहीच्या) दरबारांत होता. तो पूर्वीपासून मोगलास सामील होऊन निजामशाहीविरुद्ध लढत होता. त्यास निजामशहानें कैद करविलें आणि कांहीं दिवसांनीं त्यास व त्याचा मुलगा आचलोजी यास ता. २५–७–१६२९ रोजीं ठार मारविलें' असें सरदेसाई लिहितात (मुसलमानी रियासत, भाग १ ला, पृ. २५७). तें जमेस धरल्यास मूर्तुजा निजामशहाचा जाधवरावास कपटानें मारण्याचा बेत सन १६२९ त सिद्धीस गेल्याचें कळून येतें. मोगली सैन्याशीं लढतांना मलिक अंबराचा पराभव झाला म्हणून जाधवराव निजामशहाचा पक्ष सोडून मोगलांस जाऊन मिळाला हें खरेशास्त्री यांनीं कारण दिलें आहे, त्यापेक्षां परमानंदानें सांगितलेलें कारण अधिक स्वाभाविक वाटतें.

विठोजीचे पुत्र

विठोजीचे पुत्र संभाजी, मंबाजी व त्रिंबकजी हे चांगले कर्ते निघाले. संभाजीनें १७ जुलै सन १६४३ रोजीं 'माहादभट तिमणभट येळूरकर यास त्या वर्षाच्या श्रावण महिन्यापासून श्रीघृष्णेश्वराचा अभिषेक सांगून त्यासाठीं १७ पातशाही होनांची मोईन सुरू केली.' यानंतर तीन वर्षांनीं शिवाजीराजे यांनीं कारकून परगणे इंदापूर यांस आज्ञा करून इंदापूर येथील मोकदमीचें इनाम व त्याच परगण्यांतील मौजे निरवांगी, आथरुणें, मदनवाडी, आकोलें, अवणी, वडकुटे खुर्द, सेटफळ, बाबुळगांव, सादलगांव,

कळंब, सणसर इत्यादि गांवीं असलेली प्रत्येकीं एक चावर जमीन संभाजी-कडे पूर्ववत् चालविण्यास सांगितलें. यांत नमूद केलेलीं गांवें इंदापूर व भिमथडी तालुक्यांत असून त्यांपैकीं कळंब येथें सांप्रत वालचंद शेठजींचा प्रसिद्ध साखरेचा कारखाना आहे व बाभुळगांव, शेटफळ यांसारखीं गांवें दौंड-बारामती लोहमार्गावर आणि कांहीं गांवें निरा व भिमा या नद्यांच्या कांठीं आहेत.

दुसरा पुत्र मंबाजी याच्या ताब्यांत सबंध सुपे परगणा वा त्याचा भाग इ. स. १६४९ त असून तेथील देशकुळकर्ण्यांचा तंटा त्यानें तोडल्याचा उल्लेख सांपडतो. मंबाजीस राजे भोसले उमराव असें म्हटलें आहे. तो सुपे परगण्याचें वतन शिवछत्रपतींच्या कारकीर्दीच्या प्रारंभीं उपभोगीत असावा. याच मंबाजीनें ता. ९ मार्च सन १६५१ मध्यें कारकून, कसबे पाटस परगणे पुणें, यांस आज्ञा करून रघुनाथ विठ्ठल व महादेव तिमणभट राहणार येलूर (वेरूळ) यांस श्रीघृष्णेश्वराच्या अभिषेकाबद्दल सहा होन वर्षास चालू करण्यास सांगितलें आहे. म्हणजे मंबाजीराजे भोसले हे कांहीं काळ पुणें परगण्यांतहि देशमुख असल्याचें ठरतें.

तिसरा पुत्र त्रिंबकजी भोसले यानें ४ एप्रिल सन १६५४ त गणेश बिन विठ्ठल दीक्षित, राहणार वणी, यांजकडे सप्तशृंगीचें परंपरागत तीर्थ-पुरोहितपण दिलें व २२ जून सन १६६९ मध्यें रघुनाथ व यादवभट सेडगे, येलूर, यांस (घृष्णेश्वराच्या) पूजेकरितां श्रावणमासाचे १५ रु. दिले. निजाम-शाहीची अर्धवट अखेर सन १६३३ त झाली. त्या वेळीं जहांगीर बादशहा मरून त्याच्या गादीवर शहाजहान बसला होता. त्यामुळें निजामशाहीच्या पदरीं जे भोसले प्रभृति मराठे व इतर सरदार होते त्यांना शहाजहानास शरण जाण्याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं. निजामशाहीचा पाठीराखा शहाजी सुद्धां त्या वेळीं शहाजहानास शरण गेला तर त्याचे चुलतबंधु म्हणजे विठोजीचे पुत्रहि शहाजहानाची कृपा संपादण्यास उत्सुक झाले असल्यास नवल काय ! सन १६३६ त खानजहान लोदीवर शहाजहानाची मर्जी होती असें दिसतें. कारण त्यानें खानजहानाच्या विनंतीवरून परगणे जळगांवचें देशमुखीचें काम गंगाजी देशमुख याजकडून काढून विठोजीचा चौथा पुत्र परसोजी यास १८ सप्टेंबर सन १६३६ रोजीं दिलें.

विठोजीचा पांचवा पुत्र (अनुक्रमानें दुसरा) खेळोजी हाहि मोठ्या पदावर चढला होता. तो सन १६३६ च्या सुमारास देशमुखीपेक्षांहि सरदारकीसारख्या श्रेष्ठ पदावर असून त्याची सत्ता देशमुखांवरहि चालत होती. त्यानें कारकून व देशमुख, परगणे सुपे व बारामती, यांस हुकूम करून कमलनयन व हिंगलागीर गोसावी यांस इनाम मौजे मुजेवाडी येथें पूर्वीपासून चालू होतें तेंच पुढें चालविण्यास फर्मावलें. सहावा पुत्र परसोजी याचा पुत्र सयाजी हा इ. १६६६ त औरंगजेबाच्या पदरीं असून त्यास औरंगजेब १६ नोव्हेंबर १६६६ मध्यें लिहितो, ‘ पूर्वीपासून नांदनज हा गांव तुम्हांस इनाम आहे. आतां अलमगीरपूर नांवाचा नवा गांव परगणे करोडी सरकार अहमदनगर सुभे औरंगाबाद तुम्हीं वसविला, तो तुम्हांस इनाम दिला. ’

सारांश, विठोजीला मालोजीपेक्षां पुत्र अधिक असून त्यांपैकीं एकहि शहाजीच्या योग्यतेचा नसला तरी वरील सहा पुत्रांपैकीं प्रत्येक जण कमीजास्ती प्रमाणांत उद्योगी, शूर व कर्तबगार होता. ते सर्व जसा काळ येईल तशी त्यास पाठ देणारे होते. निजामशाहीची चलती होती तोंपर्यंत तिची नोकरी त्यांनीं केली. निजामशाही बुडून मोगली अंमल सुरू झाल्यावर त्यांनीं त्याचीहि ताबेदारी पत्करली. शिवाजी औरंगजेबाशीं स्वातंत्र्यार्थ झगडत असतां परसोजीचा पुत्र सयाजी हा औरंगजेबाची एकनिष्ठपणानें सेवा करीत होता. इतकेंच नव्हे, तर विठोजीचा सर्वांत वडील पुत्र संभाजी हा आपला पुतण्या जो शिवाजी त्याच्या वर्चस्वाखालीं राहण्यासहि तयार झाला होता. सर्वांत विशेष खेदाची गोष्ट अशी कीं, अफजलखान शिवाजीस पकडण्याकरितां जावळीकडे आला तेव्हां त्याच्या सैन्यांत मंबाजी भोसले हा शिवाजीचा चुलत चुलता होता. याची शिवाजीस चीड येऊन त्यानें मंबाजी राजे यांना त्यांच्या (स्वराज्यद्रोही) कामगिरीबद्दल बक्षीस द्यावयाचें मिष करून तसा निरोप अफजलखानाकडे पाठविला व त्याजबरोबर आलेले जवाहिराचे व्यापारी यांना आपला माल घेऊन आपणांस भेटावयास बोलावलें (परमानंद).

शिवाजीचे भाऊबंद

मंबाजी भोसले विजापूरकरांच्या सैन्यांत होता तसे परसोजी व

त्रिंबकजी हे शिवाजीचे दुसरे चुलत चुलते शाइस्ताखान शिवाजीवर चालून आला तेव्हां त्याजबरोबर शिवाजीशीं लढण्याकरितां आले होते. (परमानंद). याचा अर्थ शिवाजीशिवाय इतर कोणाहि शिवाजीच्या भाऊबंदास स्वराज्याची व स्वातंत्र्याची कल्पना नसून ते स्वार्थापलीकडे पाहत नव्हते. ते सर्व शंकर-पार्वतीचे भक्त असून त्यांची सेवा करण्यांत दक्ष असत. अर्थात् ते स्वधर्माभिमानी असतांहि हिंदुधर्म बुडविण्यास निघालेल्या अफजलखानास व औरंगजेबास मदत करून स्वधर्मरक्षणासाटीं कंकण बांधलेल्या शिवछत्रपतीचा म्हणजे आपल्या पुतण्याचा नायनाट करण्यास प्रवृत्त झाले होते, हें केवढें आश्चर्य! सारांश, शिवाजीचे हे सर्व भाऊबंद खानदेश, अहमदनगर, सोलापूर व पुणें या जिल्ह्यांत ठिकठिकाणीं देशमुखी व जहागिरी सांभाळून निष्प्रभ आयुष्य कंठीत होते.

प्रकरण दुसरें

शहाजीचें पूर्वायुष्य

सर्वं परवशं दुःखम् ।

मलिक अंबर

अहमदनगरची निजामशाही इ. स. १४८९ त स्थापण्यांत आली व तिचा शेवट इ. स. १६३७ त झाला. म्हणजे एकूण १४८ वर्षें ती टिकली. तिजवर अकबराच्या कारकीर्दीपासून उत्तरेकडून नवीं संकटें येऊं लागलीं. अकबरानें इ. स. १६०० त अहमदनगर घेतलें, त्याच वेळीं निजामशाहीची अखेर व्हावयाची. परंतु निजामशाहींतील बडा मुत्सद्दी मलिक अंबर याच्या कर्तबगारीमुळें तिचें आयुष्य वाढलें व मलिक अंबराच्या मृत्यूनंतर तिच्या शेवटच्या काळांत शहाजीनें तिला कसेंबसें इ. स. १६३७ पर्यंत जगविलें. या दृष्टीनें निजामशाही जिवंत ठेवल्याचें श्रेय मलिक अंबराखालोखाल शहाजीस दिलें पाहिजे.

शहाजी वेरुळास इ. स. १५९४ त जन्मला व त्याचा बाप मालोजी इ. स. १६२० त मरण पावला. म्हणजे शहाजीला मालोजीपासून शिक्षण वयाच्या २६ व्या वर्षापर्यंत लाभलें. या वयांत मालोजीबरोबर शहाजीहि मुलुखगिरीवर अनेक वेळां गेला असावा. मलिक अंबरानें आदिलशाही व कुतुबशाही यांची मदत घेऊन इ. स. १६१७ त बऱ्हाणपुरास वेढा घातला; त्या वेळीं मलिकच्या बाजूनें मालोजी व शहाजी लढत होते असा एकच उल्लेख सांपडतो. यावरून मालोजीच्या नजरेखालीं शिपाईगिरीचें शिक्षण शहाजीस दीर्घकाळ मिळालें असावें असें वाटतें. बापाच्या पश्चात् निजामशाहीची सरदारकी शहाजीस मिळाली व मलिक अंबराचें नेतृत्व सुमारें पांच-सहा वर्षेंपर्यंत त्यास लाभलें. सन १६०५ पासून सेलीम ऊर्फ जहांगीर बादशहा दिल्लीस राज्य करीत होता. जहांगिरास खुस्रू, पर्विझ, खुर्रम व शहर्यार असे चार पुत्र होते. पैकीं खुस्रू बंडखोर असल्यामुळें तो सेलिमास अप्रिय होता. पर्विझ व्यसनासक्त होता व शहर्यार वयानें

लहान होता. त्या सर्वांत खुर्रम फार कर्तबगार व हुशार होता. म्हणून सेलीम ऊर्फ जहांगीर यानें अहमदनगरचें राज्य समूळ जिंकण्याची कामगिरी खुर्रम ऊर्फ शहाजहान याजवरच सोंपविली. या वेळीं अहमदनगरास खानखानान हा मोगल सुभेदार अकबरानें जिंकलेला मुलूख ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करीत होता. त्याचा मलिक अंबरानें सन १६१० त पराभव करून त्यास बऱ्हाणपुरास पळवून लावलें. तेव्हां त्याच्या मदतीस येऊन खुर्रम यानें मलिकाचा पराभव केला व त्याजपासून वऱ्हाड व बालाघाटचा मुलूख घेऊन तह करून तो परत गेला. दिल्लीस खुर्रम गेल्यावर बादशहानें त्याचा गौरव करून त्यास 'शहाजहान' म्हणजे 'जगाचा राजा' असा किताब दिला. ही गोष्ट सन १६१७ त घडली.

परंतु शहाजहान परत निघून गेल्यावर मलिकानें पुनः डोकें वर काढलें. त्यानें मोगलांची दक्षिणेंतील राजधानी बऱ्हाणपूर हिला वेढा घालून मांडवगडापर्यंतच्या मुलुखांत लुटालूट केली. ही बातमी कळतांच शहाजहानानें पुनः दक्षिणेंत स्वारी करून बऱ्हाणपूरचा वेढा उठविला व मलिक अंबरास दौलताबादेपर्यंत मागें रेटीत नेऊन त्याजपासून १८ लाख रुपये खंडणी उकळली.

शहाजहान

शहाजहान दक्षिण जिंकण्याच्या उद्योगांत होता तरी त्याचें लक्ष दिल्लींतील राजकारणाकडे होतें. जहांगिरास खुस्रू, पर्विझ, खुर्रम ऊर्फ शहाजहान व शहर्यार हे चार पुत्र होते. त्यांपैकीं खुस्रूस शहाजहानानें बऱ्हाणपुरास गुप्त रीतीनें वधिल्याचा संशय जहांगिरास आल्यापासून त्याच्या मनांतून शहाजहान उतरला होता. त्याचा पराक्रम व उरक पाहून जहांगिरास शहाजहान आपणांस गुंडाळून ठेवील अशीहि भीति वाटत होती. त्याची बायको नूरजहान हिनें पहिल्या नवऱ्यापासून झालेली लाडिली बेगम हिचें लग्न शहर्यारशीं लावलें असल्यामुळें जहांगिराच्या पश्चात् दिल्लीचें सिंहासन त्यास मिळवून देण्याचा तिचा बेत होता. त्या योगानें तिलाहि शहर्यारचा प्रतिस्पर्धी होणारा शहाजहान विषतुल्य वाटत होता. तिनें जहांगिरास सांगून त्याच्या जहागिरी काढून घेतल्या. इतकें झाल्यानंतर शहाजहानास बापाच्या विरुद्ध बंडाचा बावटा उभारल्याशिवाय

गत्यंतर नाहीं असें वाटून त्यानें सन १६२२ त उघड बंड केलें व तो दिल्लीवर चालून येऊं लागला; म्हणून त्याचा पराभव करण्यास बादशहानें पर्विझ व महाबतखान यांची नेमणूक केली. त्यांनीं शहाजहानाचा अजमिराजवळ पराभव करून त्यास राजपुतान्यांतून पळवून लावलें. राजपुतान्यांतून शहाजहान गुजराथेंत उतरला. सन १६२३ च्या मे महिन्यांत सुलतान पर्विझ यानें ८० हजार सैन्यानिशीं गुजराथेंत येऊन शहाजहानास अहमदाबादेंतून घालवून दिलें. लुखजी जाधवराव हा निजामशाहीची नोकरी सोडून या वेळीं रिकामाच होता व शहाजहानाला मिळेल ती मदत पाहिजेच होती. म्हणून जाधवराव चार हजार फौज व रसद घेऊन मांडूहून त्याच्या कुमकेस आला (अहमदाबाद-सुरत फॅक्टरी, जून १६२३). या युद्धांत पर्विझ व शहाजहान यांचे मिळून चार हजार सैनिक कामास आले.

शहाजहानास पर्विझचा लकडा आतां दुस्सह झाला. त्यांतून सुटण्याकरितां त्यानें पर्विझशीं असा तह केला कीं, जहांगिराची गादी शहाजहानास मिळाल्यावर त्यानें बादशहा व्हावें व पर्विझ यानें त्याचा वझीर या नात्यानें काम करावें. अशा रीतीनें पर्विझशीं दिलजमाई केल्यावर निजामशाही व आदिलशाही यांची मदत मिळविली तरच बादशाही फौजेस जिंकणें शक्य आहे हें जाणून त्यानें मलिक अंबराकडे मदतीची याचना केली. पण शहाजहान आपलें काम झालें कीं उलटल्यावांचून राहणार नाहीं, या भीतीनें शरीरसंबंधानें स्नेहभाव दृढ करण्याकरितां अंबरानें आपली एक काळीकुट्ट मुलगी त्याच्या गळ्यांत सन १६२३ त बांधून त्यास आपला जांवई करून घेतलें. अर्थात् त्यानंतर मलिक अंबर व शहाजहान यांचे परस्पर संबंध कांहीं काल सलोख्याचे राहावे हें स्वाभाविक होय. लुखजी जाधव शहाजहानास मिळाला खरा, पण तो शहाजहानाकडे फार दिवस राहिला नाहीं. शहाजहानास मिळण्यापेक्षां जहांगिराच्या पक्षांत राहणेंच अधिक किफायतशीर असल्याचें दिसतांच तो जहांगिराच्या दक्षिणेंतील फौजेच्या निशाणाखालीं आला. लुखजी आपणांस सोडून गेला आणि बादशाही सैन्य दक्षिणेंत असल्यामुळें त्याजविरुद्ध आपणांस मदत करण्याची मलिक अंबरास छाती होईना असें पाहून शहाजहान दक्षिणेंत न राहतां गोवळकोंड्याच्या हद्दींतून मच्छलीपट्टणाकडे निघून गेला.

शहाजहान मोगल सेनेस मुकल्यावर मोगलांची दक्षिणेंतील सत्ता दुर्बल झाली. या परिस्थितीचा फायदा आदिलशाहाशीं सख्य करून मलिक अंबरास घेतां आला असता व मोगली सत्ता दक्षिणेंतून उखडूनहि काढतां आली असती; पण तसें होऊं शकलें नाहीं; याचें कारण पेट्रो डी लाव्हेल या इटालियन गृहस्थानें आपल्या प्रवासवृत्तांत (इ. १६२४) पुढीलप्रमाणें दिलें आहे.

भातवंडीची लढाई

" गोव्यास अशी बातमी आली आहे कीं, (३१ ऑक्टोबर १६२४) आदिलशहाविरुद्ध बऱ्याच दिवसांपासून मलिक अंबरानें जें युद्ध चालविलें होतें त्यांत शेवटीं त्याचा विजय होऊन त्यानें आदिलशाही सेनापति मुल्ला महंमद यास कैद केलें. हा सेनापति आदिलशहाच्या फार मर्जीतील होता आणि त्याचें मलिकाशीं वांकडें होतें. त्यानें मलिकास विष घालण्याचाहि प्रयत्न केला होता. यामुळें मुल्ला महंमदावर सूड घेण्याचा मलिकाचा मुख्य उद्देश होता. म्हणून तो हातीं लागतांच, असें म्हणतात कीं, त्याची लष्करांतून धिंड काढून लोकांना जाहीर रीतीनें कळविण्यांत आलें कीं, 'चालू युद्धाच्या आणि आदिलशाही व निजामशाही यांत उद्भवलेल्या विरोधाच्या मुळाशीं हा दुष्ट मुल्ला महंमद आहे. याकरितां यास देहान्त शासन करण्यांत येत आहे.'

" या युद्धांत मोगलांनीं आदिलशहाची बाजू घेऊन त्याला वीस हजार स्वार पुरविले होते असें म्हणतात. मलिक अंबर हा शूर सेनापति असून तो थेट विजापूर शहराच्या वेशीपर्यंत जाऊन पोंचला होता आणि आदिलशहा आपल्या राजधानींत कोंडला गेला होता" (प. सा. स. खंड १, पृ. ५०). इटालियन प्रवाशाचें हें वर्णन अहमदनगराजवळ भातवंडीस सन १६२४ त मलिक अंबराचें आदिलशहा व मोगल सैन्य यांजबरोबर जें युद्ध झालें त्यास लागू पडतें.

परमानंदकृत 'शिवभारतां'त या युद्धाचें वर्णन आलें आहे. त्याचा सारांश येणेंप्रमाणें : " निजामशहा व आदिलशहा यांचें वैर होतें. जाधवराव निजामशहास सोडून गेल्याचें समजल्यावर कमजोर झालेल्या निजामशहास जिंकण्याकरितां आदिलशहानें मोगलांची मदत मागितली. तेव्हां जहांगीर-

बादशाहानें इब्राहिम आदिलशहा याच्या मदतीस सैन्य पाठविलें. आतां निजामशहाच्या बाजूनें शहाजी, शरीफजी व विठोजीचे पुत्र मंबाजी, परसोजी प्रभृति सर्व, मुधोजी फलटणकर, नृसिंह पिंगळे ब्राह्मण, मनसूरखान, जोहारखान, हमीदखान, मलिक अंबर बर्बर, त्याचा पुत्र फत्तेखान इत्यादि उभे राहिले. जलालखान, खंजीरखान, सिकंदरखान, बहादुरखान, उदाराम ब्राह्मण, दादाजी विश्वनाथ, राघव, अंचल, जसवंत व बहादुर हे जाधवरावाचे पुत्र आणि स्वतः बलाढ्य जाधवराव हे सर्व मोगलांतर्फे प्राप्त झाले आणि आदिलशहातर्फे मुस्तफाखान, मसूदखान, फरादखान, अंकुशखान, ढुंढिराज नामक ब्राह्मण, रुस्तुम, घाटगे प्रभृति महाराष्ट्रीय राजे मुल्ला महंमदाच्या पुढारीपणाखालीं यथाक्रम आले.

"उत्तरेकडून मोगल व दक्षिणेकडून आदिलशहाचें सैन्य यांच्या चिमट्यांत निजामशहाचें सैन्य सांपडलें. निजामातर्फे मलिक अंबर शौर्यानें लढला. शहाजी, शरीफजी, खेळोजी, मलिक अंबराचे कृष्णमुखी यवन व इतर पराक्रमी वीर यांनीं मोगलांची कत्तल उडविली. मोगल पळून गेले. तीच अवस्था इब्राहिम आदिलशहाच्या सैन्याची झाली. इतक्यांत शरीफजी तीक्ष्ण बाण लागून गतप्राण झाला. तथापि या युद्धांत निजामशहाचा जय झाला!"

पेट्रो डी लाव्हेल व कवींद्र परमानंद या उभयतांच्या वृत्तान्तांत भातवडी या नांवाचा निर्देश नसला तरी ती लढाई भातवडीचीच यांत शंका नाहीं. या युद्धांत निजामशाहीतर्फे मुख्य सेनापति मलिक अंबर, मोगलांतर्फे खंजीरखान व आदिलशाहीतर्फे मुल्ला महंमद हे होते. मुल्ला महंमदाची धिंड काढून त्याचा शिरच्छेद मलिक अंबरानें केला तो भातवडीच्या युद्धांत त्याला पकडल्यावरच. सारांश, मलिक अंबरानें विजापूरकरांची इतकी गाळण उडविली कीं, त्यांना त्यानें विजापुरापर्यंत पळतां भुई थोडी करून सोडली. या युद्धांत मलिक अंबराच्या खालोखाल शहाजीनें पराक्रम केल्यामुळें शहाजीचें निजामशाही दरबारांतील वजन वाढून तो सरलष्कर बनला.

शहाजी निजामशाहीच्या पदरीं २८ जुलै सन १६२५ त सरलष्कर या हुद्दयावर असलेला आढळतो. कारण या तारखेचे त्यानें रामेश्वरभट, राहणार

आरवी, यास पेडगांवाजवळ मौजे वडगांव येथें इनाम जमीन दिल्याचें खुर्दखत आहे. पण यानंतर थोड्या दिवसांनीं मलिक अंबर जिवंत असतांच शहाजी निजामशाही दरबार सोडून आपल्या पुणें प्रांतांतील जहागिरींत राहावयास गेला. याचें कारण परमानंदानें असें दिलें आहे कीं, ' शहाजीचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळें विठोजीचे पुत्र त्याचा द्वेष करूं लागले व मलिक अंबराच्या आश्रयानें राहूं लागले ! कदाचित् मलिक अंबरासहि तो डोईजड वाटून तो त्याच्याशीं नीट वागूं लागला नसावा. विजापूरचा बादशहा इब्राहिम आदिलशहा यास ही बातमी समजतांच असा मोठा योद्धा आपल्या पदरीं असावा अशी साहजिकच इच्छा उत्पन्न होऊन त्यानें त्यास आपल्याकडे घेतलें. मुधोजी नाईक फलटणकर (मूळ विजापूरकरांच्या पदरचा पण आतां निजामशहास मिळून) इब्राहिम आदिलशहाचा शत्रु झाल्यामुळें त्याजवर इब्राहिमशहानें शहाजीस पाठविलें. शहाजीनें मुधोजीचा पराभव केला आणि कर्नाटक व केरळ या प्रांतांत मुलुखगिरी करून आदिलशहाचा खजिना भरला (परमानंद).

परमानंदाच्या माहितीस तत्कालीन पत्राचाहि आधार मिळतो. ता. १० जानेवारी सन १६२६ रोजीं कारकून किल्ले पन्हाळा यास इब्राहिम आदिलशहानें आज्ञापत्र पाठविलें आहे. त्यांत म्हटलें आहे, " शहाजी भोसले सरलष्कर यांनीं अर्जदास्त केला कीं, कर्यात तळबीडची देशगत व किल्ले पन्हाळयाचे हक्क संभाजी व धारोजी मोहिते यांस द्यावे. हालींहि देशगत ओसाड आहे ! त्यावरून पातशहांनीं भोसले सरलष्कर व मोहिते यांचा अर्ज खातिरेस आणून देशगत मोहित्यास बहाल केली."

शहाजी आदिलशाहीच्या पदरीं १९ डिसेंबर सन १६२५ ते २५ जुलै १६२८ पर्यंत होता. शिवाजीच्या जन्मापूर्वीं १॥ वर्ष तो परत निजामशाहीकडे गेला. मधल्या ३–३॥ वर्षांच्या काळांत तो आदिलशहाची नोकरी व पुणें प्रांतांतील जहागीर सांभाळून होता. या काळांत गणेशभट बिन मल्हारीभट, राहणार मोरेश्वर, यास ८ मार्च १६२८ रोजीं त्यानें दिलेलें खुर्दखत, गणो गबाजी तबीब, राहणार पुणें, यांस दिलेलें खुर्दखत (२५ जुलै सन १६२८), रामेश्वरभट बिन नारायणभट, राहणार मौजे आरवी मुद्रल, कसबे पाटस, परगणे पुणें यांस दिलेलें खुर्दखत (३ ऑगस्ट १६२८),

मोरोबा गोसावी याच्या इनामासंबंधीं कारकून परगणे पुणें यांस लिहिलेलें ताकीदपत्र (४ डिसेंबर १६२८), कान बिन राम पाठक मुळया, कसबे जिंती, परगणे पांडिया पेडगांव यांस दिलेलें खुर्दखत (३१ डिसेंबर १६२९) अशीं पत्रें उपलब्ध आहेत. त्यानंतर ता. ४ जुलै १६३१ चें पत्र आहे, त्यांत 'इदिलशाही नामजादी पुणा एऊनु बसली. पुणें लुटून जाळून तलक केलें. कोट पाडिला' असा मजकूर आहे. त्यावरून सन १६३० पूर्वी शहाजी व आदिलशहा यांचें बिनसून आदिलशहातर्फे मुरार जगदेव पुणें प्रांतांत शहाजीवर १६३१ त चाल करून आल्याचें सिद्ध होतें.

शहाजी व आदिलशहा यांचें कां बिनसलें व शहाजी निजामशाहींत परत कां आला याचीं कारणें 'शिवभारतां'त परमानंदानें पुढीलप्रमाणें दिलीं आहेत : "या वेळीं मलिक अंबर मरून निजामशाहीस वांचविण्याजोगा दुसरा कोणी सरदार नव्हता. इब्राहिम आदिलशहा कीं ज्यानें शहाजीस बोलावून घेतलें होतें तो मरण पावला होता. शहाजहान दिल्लीचा बादशहा होऊन निजामशाही जिंकण्यास आला होता व इब्राहिमशहाच्या गादीवर बसलेला महंमदशहा उन्मत्त निघाला होता. म्हणून शहाजी आदिलशाही सोडून निजामशाहीच्या रक्षणार्थ आला व जाधवरावहि मोगलांचा पक्ष सोडून दौलताबादेस निजामशहाच्या पक्षास येऊन मिळाला." हीं कारणें सयुक्तिक दिसतात.

शिवजयंती

आतां शिवाजीचा जन्म शिवनेरीवरच कां झाला याचाहि विचार परमानंदानें केला आहे तो असा : या वेळीं विजयराज हा निजामाचा विश्वासू अंमलदार शिवनेरीवर राहत होता. त्यानें आपली कन्या जयंती ही शहाजीचा पुत्र संभाजी यास दिली. हें लग्न शिवनेरीवर झालें. शहाजीची पत्नी जिजाबाई गरोदर असल्यामुळें लग्न झाल्यावर व्याह्यांच्या संमतीनें स्वजनांसह तिला किल्ल्यावर ठेवून शहाजी दर्याखानावर गेला. खानजहान व दर्याखान रोहिला अशी जोडी जहांगिरानें निजामशाहीचा घेतलेला मुलूख रक्षण करण्याकरितां दक्षिणेंत ठेवली होती. पैकीं खानजहान हा सुभेदार व दर्याखान त्याचा दुय्यम होता. शहाजहान सन १६२८ त दिल्लीच्या गादीवर बसल्यानंतर खानजहान त्यास भेटण्यास

गेला. त्याच्या पश्चात् दर्याखान हा एकटाच दक्षिणेंतील कारभार पाहत होता. त्यास अशा कमजोर स्थितींत पाहून निजामशहानें त्याजवर चालून जाण्याची आज्ञा शहाजीस केल्यामुळें परमानंदानें म्हटल्याप्रमाणें शहाजी जिजाबाईस शिवनेरीवर ठेवून दर्याखानाचें पारिपत्य करण्यास सहा हजार फौज घेऊन खानदेशांत गेला. पण दर्याखानानें त्याचा मोड करून त्यास परत जावयास लावलें (शि. नि. खं. १, पृ. ११).

शहाजहानाचा अज्ञातवास

शहाजी सन १६२५ त निजामशाही सोडून गेल्यावर सन १६२८ त परत निजामशाहींत येईपर्यंतच्या अल्पावधींत फार मोठ्या राजकीय घडामोडी झाल्या; त्यांचा येथें प्रपंच करणें अवश्य आहे. यांपैकीं शहाजहान जुन्नरास येऊन मलिक अंबराच्या आश्रयानें राहिला ही विशेष महत्त्वाची गोष्ट होय. शहाजहान, दक्षिणेंत आश्रय न मिळाल्यामुळें, गोवळकोंड्याच्या राज्यांत गेला असें मागें म्हटलेंच आहे. तो त्या राज्यांतील आंध्र देशांत मच्छलीपट्टण येथें ता. ५ नोव्हेंबर १६२३ च्या सुमारास आला. (इं. फॅ. भाग २, पृ. २८२). पण तेथें त्याच्या पाठीवर मोगली फौज असल्यामुळें त्यास मच्छलीपट्टणाहूनहि पळ काढून बंगाल्यांत जावें लागलें. तो बंगाल्यांत दोन वर्षें होता. तेथेंहि त्याचा पर्विझ व महाबतखान यांनीं पिच्छा पुरविल्यामुळें तेथून काढता पाय घेऊन तो पुनः मच्छलीपट्टणास उतरला. मच्छलीपट्टणाहून १४ डिसेंबर १६२६ च्या सुमारास तो अचानक सुरतेपासून वीस कोसांवर आल्यामुळें तेथील जनतेची गाळण उडून ६।७ दिवस तिनें कामें बंद ठेवलीं. परंतु सुरतेस न येतां तो शांतपणें दखखनकडे त्याच्या ठिकाणीं (जुन्नर) गेला (प. सा. सं. खं. १, पृ. ५५). मलिक अंबर त्याचा सासरा असल्यामुळें त्यानें त्यास आश्रय द्यावा व शहाजहानानें त्याच्या आश्रयास यावें हें स्वाभाविक होय. जुन्नरास तो एक वर्ष होता. पण तेथें तो स्वस्थ नसून त्याचा सासरा आसफखान याजमार्फत बापाशीं त्यानें शरणागतीचें बोलणें लावलें होतें (इं. फॅ. भाग ३). एकीकडे बादशहाशीं तो शरणागतीची भाषा बोलत होता तर दुसरीकडे आपल्या महत्त्वाकांक्षेच्या वाटेंतील मुख्य कांटा उपटून टाकण्याचेंहि त्याचें कारस्थान सुरू होतें. त्याचा भाऊ पर्विझ बऱ्हाणपुरास होता.

तेथील सुभेदार खानजहान लोदी हा शहाजहानाचा दोस्त असल्यामुळें त्यानें पर्विझला विषप्रयोग करून जगांतून नाहींसें केलें (२९ नोव्हेंबर १६२६, प. सा. खं. १, पृ. ५५).

शहाजहानाचें दैव या वेळीं एकसारखें उलट-सुलट हेलकावे खात होतें. ज्याच्या आश्रयानें तो जुन्नरास राहिला तो त्याचा सासरा मलिक अंबर सन १६२७ त मेला. विजापूरचा इब्राहिम आदिलशहाहि १२ सप्टेंबर १६२७ त मरण पावला आणि त्याच्या गादीवर त्याचा पुत्र सुलतान महंमदशहा बसला. शहाजहानाचा बाप जहांगीर हाहि लाहोराजवळ ता. २८ ऑक्टोबर १६२७ रोजीं मृत्यु पावला. शहाजहानाच्या प्रयाणास हा एक शुभशकुनच झाला म्हणावयाचा! बापाच्या मृत्यूची बातमी समजल्यावर चारच दिवसांनीं शहाजहान जुन्नराहून निघाला तो आग्र्यास गेल्यावर त्याला ४ फेब्रुवारी १६२८ रोजीं राज्याभिषेक झाला. शहाजहान दक्षिणेंतून गेल्यावर खानजहान लोदीनें निजामशाही मुत्सद्द्यांशीं अंतःस्थ करार करून मोगलांचा बालाघाटावरचा मुलूख त्यांस दिला. अहमदनगरचा किल्लाहि निजामशहास या वेळीं मिळण्याचा रंग होता. पण नगरचा किल्लेदार शिपादारखान यानें तो किल्ला देण्याचें नाकारलें. निजामशहा व त्याचे मुत्सद्दी यांना, शहाजीला परत बोलावल्यास मोगलांची दक्षिणेंतून हकालपट्टी करण्यास व मलिक अंबराची उणीव भरून काढण्यास मोठी मदत होईल, असें वाटून त्यांनीं त्यास परत बोलावलें व त्यानें २५ जुलै १६२८ रोजीं निजामशाहीची ताबेदारी पत्करली.

पुनः निजामशाहींत

शहाजीनें निजामशाहीची ताबेदारी पुनः पत्करण्यापूर्वीच्या तीन वर्षांच्या काळांत त्याचें आर्थिक दृष्ट्या कांहीं नुकसान झालें कीं काय हें पाहणें इष्ट आहे. ता. १९ डिसेंबर १६२५ रोजीं मौजे निंबोडी परगणे पुणें येथील पाटिलकीची वांटणी झाल्याचा महजर आहे. त्यांत शहाजी आदिलशाहीस मिळाल्यामुळें त्याला निजामशहातर्फे सालप्याच्या घाटांत कोंडल्याचा निर्देश आहे. त्या प्रसंगांत तो पकडला गेला नाहीं हें निश्चित होय. पण त्याचें नुकसानहि फारसें झालें नसावें असें वाटतें. त्याची पुण्याकडील जहागीर त्याजकडे अबाधित चालू होती हेंहि स्पष्ट आहे.

ता. २८ जुलै १६२५ रोजीं तो सरलष्करपदावर असून पुणें परगण्याची व्यवस्था पाहत होता (प. सा. सं.१, पृ. ५२). तसाच तो ८ मार्च १६२८ रोजीं सरलष्कर या हुद्द्यावरून पुणें परगण्यावर हुकमत गाजवीत होता (प. सा. सं. १, पृ. ६०). शहाजीचें नुकसान झालें तें तो परत निजामशाहीस सन १६२८ त मिळाल्यावरच होय. त्याचा सासरा लुखजी जाधवराव व तो असे दोघे एकाच राजवटीखालीं सतत नांदत नसले व क्वचित् विरुद्ध पक्षांतहि असले तरी त्यांचें परस्परांशीं हाडवैर होतें असें बखरकारांनीं जें वर्णन केलें आहे तें खरें नव्हतें. स्वतः परमानंद, शिवकाळांत विद्यमान असलेला, असें कोठेंहि म्हणत नाहीं. उलट निजामशहानें जाधवरावास दौलताबादेस आपल्या राजवाड्यांत मुजऱ्यास बोलावून त्याचा अपमान केला व त्यामुळें संतापून जाधवराव, त्याचे दोघे पुत्र अचलोजी व रघूजी आणि नातू यशवंतराव हे पुरुष निजामशहाविरुद्ध उसळले असतां राजवाड्यापाशीं माजलेल्या दंगलींत ता. २५–७–१६२९ रोजीं मारले गेले. यामुळें शहाजीचें मन निजामशहाविरुद्ध विटलें असें परमानंदानें म्हटलें आहे. शहाजीची कौटुंबिक दृष्ट्या ही मोठीच हानि झाली यांत शंका नाहीं. इतकेंच नव्हे तर शहाजहानानें आदिलशहास निजामशाहीविरुद्ध उठवून त्याजकडून निजामशहाच्या मुलुखावर स्वारी करविली, तींत शहाजीस पुष्कळच झळ लागली. या स्वारींत निजामशहाच्या मुलुखाबरोबर शहाजीचाहि मुलूख सांपडला. आदिलशाही फौजेचा अधिपति रणदुल्लाखान व त्याच्या मदतीस कान्होजी जेधे होता. ते शिरवळचें ठाणें हस्तगत करून कोंढाणा किल्ल्यावर २५ डिसेंबर १६२९ च्या सुमारास चालून गेले. आणि स्वतः मुरार जगदेव यानें शहाजीच्या जहागिरींत घुसून ‘पुणें लुटून जाळून तलक केलें. कोट पाडिला.’ शहाजीच्या जहागिरीवर विशेष गहजब उडण्याचें कारण तो विजापूरकरांस सोडून पुनः निजामशहास मिळाला हें असावें. मुरारपंतानें शहाजीचा पुणें परगणा घेऊन आदिलशाही अंमल त्याजवर बसविला व भुलेश्वर किल्ल्यास ‘दौलत मंगल’ असें नांव देऊन तेथून पुणें परगण्याचा कारभार सुरू केला. त्याच सुमारास महाराष्ट्रांत मोठा दुष्काळ पडून माणूस माणसास खाऊं लागलें आणि ‘शेरभर रत्नें देऊनहि शेरभर कुळीथ मिळणें मुश्किलीचें झालें.’

शहाजी या खेपेस निजामशाहींत अवघीं दोनच वर्षें होता. त्या मुदतींत त्यानें मोठा पराक्रम केल्याचें दिसून येत नाहीं. रणदुल्लाखानानें शिरवळ घेतलें व मुरारपंतानें पुणें जाळलें; त्या वेळीं निजामशहाच्या फौजा विजापुरावर चालून गेल्या होत्या त्यांजबरोबर शहाजी असावा. कारण त्याच्याच अनुपस्थितींत मुरारपंतानें त्याचा पुणें परगणा घेतला असला पाहिजे. शहाजी निजामशाहींत आला काय व लागलीच निघून गेला काय, हें सारेंच विपरीत दिसतें. त्याचें कारण परमानंदानें पुढीलप्रमाणें दिलें आहे : ' निजामशहा विषयासक्त व मद्यपी निघून दुष्ट मंत्र्यांच्या आहारीं गेला. मलिक अंबराचा पुत्र फत्तेखान हा बापाच्या पश्चात् निजामशहाचा वजीर झाला असून तो क्षुद्र बुद्धीचा होता. त्याच्या व दुष्ट हमीदखानाच्या सल्ल्यानें जेव्हां निजामशहानें जाधवरावांस ठार मारविलें तेव्हांपासून शहाजी प्रभृति राजे व मुसलमान सरदार यांचीं मनें विटलीं. ' अशा स्थितींत निजामशाही फार दिवस टिकणार नाहीं अशी शहाजीस निराशा वाटूं लागली असल्यास ती स्वाभाविक होय. पण निजामशाही सोडली तर दुसऱ्या कोणाच्या तरी आश्रयास गेलेंच पाहिजे व असा आश्रय करावयाचा तर निजामशाहीपेक्षां जी सत्ता अधिक प्रबल व खंबीर असेल तिलाच शरण जाणें शहाजीस भाग होतें. अशी सत्ता म्हटली म्हणजे दिल्लीश्वराचीच होय. शहाजहान मोगली साम्राज्याचा या वेळीं धनी झाला असून ' नवी विटी नवें राज्य ' सुरू झालें होतें. बापाच्या वेळची राज्यकारभारांतील ढिलाई काढून टाकून त्याची घडी नीट व मजबूत बसविणें, निजामशाहीस कायमची मूठमाती देऊन निजामशहाचें सबंध राज्य मोंगली साम्राज्यास जोडणें व या रीतीनें दक्षिणेंत शांतता प्रस्थापित करणें हें शहाजहानानें आपलें धोरण ठरविलें.

शहाजहानाचें नवें धोरण

शहाजहान सन १६२८ त बादशहा झाला तेव्हां त्याला दक्षिणेची खडानूखडा माहिती होती. तेथील राज्यकारभार किती बिघडलेला व विस्कळीत झालेला आहे हें त्यानें दक्षिणेंत असतां समक्ष पाहिलें असून त्याचें इंगित बिनचूक ओळखलें होतें. मलिक अंबर हा त्याचा सासरा, त्याची भीड त्याला कांहींशीं वाटावयाची, पण तो मरून गेल्यामुळें तीहि आतां उरली नव्हती. शहाजहान इकडे असल्यावेळीं खानजहान हा

दक्षिणेचा सुभेदार व दर्याखान त्याचा सहकारी होता. खानजहानानें निजामशाहीपासून मोठी लाच घेऊन तिला बालाघाटचा मुलूख परत दिला होता. तो मुलूख परत घेण्यास शहाजहानानें गादीवर बसल्यावर खानजहानास हुकूम सोडला. पण तें काम तो मनापासून करीत नाहीं असें पाहून शहाजहानानें त्याला आग्र्यास आपल्या भेटीस बोलावलें. पण तो बादशहाबरोबर भेटींत उद्धटपणानें वागला. त्यावरून बादशहा आपणांस शासन करील या भीतीनें खानजहान ता. ५–१०–१६२९ रोजीं आग्र्याहून पळाला. लगेच त्याला पकडण्यास बादशहानें फौज पाठविली. तिनें त्याच्या सैन्यास चंबळ नदीवर गांठलें. तेथें झालेल्या लढाईंत खानजहानाचे दोघे पुत्र व एक जावई मारला गेला. आणि तो स्वतः जीव बचावून दक्षिणेकडे गेला. तेव्हां शहाजहानानें इरादतखान यास आजमखान ही पदवी व दक्षिणेची सुभेदारी देऊन खानजहान लोदीच्या पाठलागास पाठविलें.

खानजहान

खानजहान दौलताबादेजवळ येतांच बुऱ्हाण निजामशहानें त्याचा सत्कार करून त्यास सर्व प्रकारची मदत दिली. आणि बीड परगणा त्यास जहागीर दिला. पण निजामशहास पुढील संकटाची कल्पना नव्हती. खानजहान इकडे आल्यावर त्याचा पाठलाग करीत अजमखान दक्षिणेंत आला व त्याजवर नजर ठेवण्याकरितां बादशहा स्वतः १ मार्च १६३० रोजीं बऱ्हाणपुरास येऊन राहिला. त्यानें अजमखानाची संगीन तयारी करून दिली व आदिलशहाकडे वकील पाठवून त्यालाहि निजामशाहीवर उठविलें. उत्तरेकडून मोंगल सैन्य व दक्षिणेकडून आदिलशाही सैन्य अशा कैचींत निजामशाही सांपडत गेली. अजमखानाच्या मदतीसहि ख्वाजा अब्दुल हसन, शाइस्ताखान, आसफखान, खानखानान, मिर्झा राजा जयसिंग असे अव्वल दर्जाचे अतिरथी महारथी होते. इतकी जंगी चढाई करण्याचा मुख्य हेतु असा कीं, विशेष प्राणहानि होऊं न देतां निजामशाही चुटकीसरशी रसातळास नेतां यावी.

निजामशाही बुडवितांना मोगलांच्या दृष्टीनें खानजहान लोदी निजामशहास मिळाला होता, त्याचें पारिपत्य प्रथम करणें आवश्य होतें. याकरितां खानखानान यानें निजामशाहीची तात्पुरती राजधानी दौलता-

बाद ही जुलै १६३० मध्यें घेतल्यावर (प. सा. सं. खं. १, पृ. ७३) मोगली सैन्य आपले निरनिराळे विभाग करून निजामशाहीच्या निरनिराळ्या भागांत शिरले. सेनापति अजमखान खानजहानाचा तपास काढीत त्याची नवी जहागीर बीड, तिजकडे चालून गेला व त्यानें बीड ऑक्टोबर १६३० च्या सुमारास जिंकून घेतलें. त्यामुळें खानजहानास आपल्या काळजासच हात घातल्यासारखें वाटून तो अजमखानास चुकवून माळव्याकडे पळत सुटला. त्याजबरोबर त्याचा हस्तक दर्याखान हाहि होता. त्यांस मोगल सेनापति अब्दुलखान व सय्यद मुजफर यांनीं गांठून सिरोंज येथें लढाई दिली. तींत दर्याखान ता. २४–१–१६३१ रोजीं मारला गेला आणि त्याच्यामागून पांच महिन्यांनीं बुंदेलखंडांत कलिंजरजवळ खानजहान, त्याचे इतर मुलगे व साथीदार यांची तशीच वाट लागली.

मोगली सैन्य निजामशाही सर्व बाजूंनीं ग्राशीत चाललेलें पाहून मूर्तुजा निजामशहा (दुसरा) गडबडून गेला. आधीं त्याला अक्कल बेताचीच होती. त्यांत हें भयंकर संकट दत्त म्हणून उभें राहिलेलें. अशा संकटावस्थेंत जो बरावाईट उपाय सुचला तो त्यानें केला. फत्तेखान नालायक म्हणून वजीरपदावरून काढून त्यास त्यानें कैदेंत ठेवलें होतें; त्याची त्यानें आतां सुटका करून त्यास वजिरीवर नेमून घेतलें. पण त्याचें व फत्तेखानाचें लवकरच वितुष्ट येऊन फत्तेखानानें मूर्तुजास ठार मारून त्याच्या जागीं त्याचा अल्पवयी पुत्र हुसेन यास बसविलें.

मोगलांची ताबेदारी

फत्तेखानाच्या पूर्वीच्या कारकीर्दीचा अनुभव शहाजीस होताच. आतां तो तर हुकूमशहाच बनून राहिला. तेव्हां निजामशाहीचें बारा वाजणार, असा कयास बांधून शहाजी ऑक्टोबर १६३० मध्यें मोगल सेनापति आजमखान याच्या भेटीस गेला. अजमखानास एवढा मातबर सरदार आपल्या बाजूस हवाच होता. निजामशाहीचा एक एक सरदार मोगलांकडे येणें म्हणजे निजामशाहीस क्षय लागणें व मोगलांचें बळ वाढणें, असें असल्यामुळें अजमखानानें शहाजीस पंचहजारी मनसब देऊन त्यास निजामशाहीचे जुन्नर व संगमनेर हे परगणे घेण्यास नोव्हेंबर १६३० मध्यें पाठविलें आणि आपण नासिरीखानासह नांदेडकडे स्वारी करून मे १६३१

रोजीं कंधार किल्ला घेतला. निजामशाहीची अशी वाताहत होत चाललेली विजापूरचा आदिलशहा पाहत होता. निजामशाहीमागून आपणांवर धाड येणार याची जाणीव आदिलशहास असली पाहिजे. आदिलशहा-पेक्षां गोवळकोंड्याचा कुतुबशहा मोगलांपासून बराच दूर असला तरी आदिलशाहीमागून आपलें मरण ठेवलेलें हें तोहि ओळखून होता. या दृष्टीनें या प्रत्येक शाहीस जगावयाचें असेल तर निजामशाहीच्या मदतीस येऊन त्या तीन शाह्यांनीं मोगलशाहीस एकजुटीनें तोंड देणें भाग होतें. तशा प्रकारची त्या त्रिकूटाची एकजूट सप्टेंबर १६३१ पूर्वीं झाली असावी, असें गोव्याच्या पोर्तुगीजांस वाटत होतें (हि. रे. क. ९, प. सा. सं. खंड १ ला, पृ. ७७). पण तिला कितपत यश आलें याचा पुरावा उपलब्ध नाहीं. ता. १० सप्टेंबर १६३१ रोजीं सुरत येथील इंग्रजांच्या वखारीचा प्रेसिडेंट रसेल यानें इराणांतील इंग्रज वखारवाल्यांना एक पत्र लिहिलें, त्यांत ‘ दख्खनचे तीनहि राजे आतां मोगली सत्तेशीं एकजुटीनें लढत आहेत ’ असें म्हटलें आहे (प. सा. सं. खं. १, पृ. ७४). यावरून सन १६३१ त तिन्ही शाह्या एक झाल्या होत्या हें स्पष्ट आहे. पण त्यांची ही जूट दीर्घकाल टिकली नसावी. लवकरच मोगलांनीं आपल्या भेदनीतीनें ती फोडली असावी व निजामशाहीस कांहीं आमिष दाखवून आपल्याकडे वळविलें असलें पाहिजे असें अनुमान करण्यास, ता. ८ सप्टेंबर १६३१ रोजीं इंग्रजांनीं सुरतेहून बॅटमला पाठविलेल्या पत्रांत आधार मिळतो. त्यांत म्हटलें आहे कीं, ‘ दख्खनमधील युद्ध तहकूब झालें आहे. तहा-बद्दल वाटाघाट चालू आहे, तथापि उभय पक्षांचीं सैन्यें जय्यत तयारींतच आहेत. बादशहा बऱ्हाणपुरासच आहे. ’ ही वाटाघाट निजामशाही वांटून घेण्याबद्दल मोगल व विजापूरकर यांजमध्यें चालू होती पण ती निष्फळ ठरली. निजामशाहीस कांहीं काल जीवदान मिळालें. निजामशहास मोग-लांनीं कटांतून फोडलें व त्याचीच मदत घेऊन कटांतला दुसरा साथीदार आदिलशहा त्याजवर मोगल चालून गेले. कारण २४ मार्च १६३२ रोजीं गोव्यांतील पोर्तुगीजांच्या कौन्सिलांत पुढील ठराव झाला – “ निजामशहा व मोगल यांनीं जूट करून विजापुरास वेढा घातल्याची बातमी आली आहे. तेव्हां गोवेकरांनीं विजापूरकरांशीं असलेलें वितुष्ट विसरून त्यांच्या

मदतीस जावें व पोर्तुगीजांच्या बादशहानें विजापूरचें राज्य बुडूं न देण्याविषयीं हुकूम पाठविला आहे तो विजापूरकरांना कळवावा" (हि. रे. क. ९, पृ. १०९; प. सा. सं. खं. १, पृ. ७७).

निजामशाहीची वाताहत

मोगल व निजामशहा यांनीं विजापुरास वेढा दिला तेव्हां मोगल सैन्याचा अधिपति आसफखान होता. त्याला २० फेब्रुवारी १६३२ रोजीं वेढा उठवून विजापूरकरांनीं पळावयास लावलें व त्याचा पाठलाग मुरार जगदेव यानें केला. विजापूरकरांना या युद्धांत इतकें यश मिळण्याचें एक कारण पोर्तुगीजांनीं वरील ठरावांत लिहिल्याप्रमाणें केलेली मदत हें असावें. पोर्तुगीजांपाशीं तोफा व स्फोटक द्रव्य उच्च प्रतीचें असल्यामुळें विजापूरकरांस त्यांच्या जोरावर वेढा उठविणें सोपें गेलें. मोगलांचा पराभव झाला तरी त्याची फिकीर त्यांना वाटली नाहीं. पण त्याचा विपरीत परिणाम मात्र निजामशाहीवर झाला. या पराभवानें निजामशाहींत जी थोडी हिंमत होती तीहि खचली. निजामशाहींत बंडाळी सुरू झाली. तिचे एक एक सरदार बंड करून उठले. सर्वत्र अंदाधुंदी माजली. मुरारपंतानेंहि आपल्या स्वारीनें निजामशाहींत अधिकच घबराट उत्पन्न केला. त्यामुळें निजामशाहीचा सरदार हैबतखान यानें परिंड्याचा किल्ला विजापूरकरांच्या (मुरारपंत ?) स्वाधीन केला. दौलताबादेचा किल्ला सन १६३०त मोगलांनीं घेतला असला तरी आतां तो निजामशाहीकडे होता. सदर किल्ला १७ जून १६३३ रोजीं महाबतखानानें फत्तेखानापासून घेतला. त्यानंतर निजामशाहीचा मृत्यु जवळ येऊन मोगलांनीं जून १६३३ मध्यें तिचें लागलीच दफन केलें. मोगल सेनापति महाबतखान यानें निजामशाहीचा वजीर फत्तेखान व अल्पवयी सुलतान हुसेनशहा यांस बादशहाकडे रवाना केलें आणि बादशहा शहाजहानानें हुसेनशहास ग्वाल्हेरीस कैदेंत ठेवून फत्तेखानास मनसब दिली.

शहाजी सन १६३० च्या ऑक्टोबर महिन्यांत निजामशाही सोडून मोगलांस मिळाला. त्यानंतर तो निजामशाहींत केव्हां परत आला हा एक विवाद्य विषय आहे. मोगलांनीं फत्तेखानाशीं स्नेहाचें वर्तन ठेवून शहाजीची जहागीर काढून फत्तेखानास दिली म्हणून शहाजी अत्यंत संतापून

मोगलांची ताबेदारी सोडून सन १६३१ त निजामशाहींत परत आला असें सरदेसाई म्हणतात (शहाजी राजे भोसले, पृ. ४७). फत्तेखान निजामशाहीचा कर्तुमकर्तुम् वजीर, त्याच्या दुष्कृत्यांना विटून तर शहाजी मोगलांकडे गेला होता, तो, फत्तेखान निजामशाहींत पूर्ववत् सत्ता गाजवीत असतां निजामशाहींत परत येईल कसा ? शिवाय शहाजीस निजामशाहीनें दिलेली जहागीर काढून घेण्यास मोगल हवेत कशाला ? ती फत्तेखान निजामशाहीचा वजीर या नात्यानें केव्हांच काढून घेऊं शकला असता. तसेंच ज्या निजामशाहीच्या वजिरास शहाजीची जहागीर मिळाली त्याच्या हाताखालीं काम करण्याची इच्छा शहाजीस होईल कशी ? आणखी एक मुद्दयाची गोष्ट अशी कीं, जी जहागीर फत्तेखानास मोगलांनीं दिल्याचें सरदेसाई सांगतात त्याच जहागिरीपैकीं परगणे पेडगांव ७ जुलै १६३१ रोजीं शहाजी राजे यांजकडे असल्याचीं दोन पत्रें प. सा. सं. १, पृ. ७५ वर छापलीं आहेत. त्यांवरुन त्या तारखेपर्यंत पेडगांव परगणा शहाजीकडेच असल्याचें सिद्ध होतें.

शहाजीचा नवा पवित्रा

सारांश, सन १६३३ त निजामशाही रीतसर बुडेपर्यंत शहाजी निजामशाहींत मुळींच आला नाहीं. तो आला तेव्हां फत्तेखान व मूर्तुजाचा अल्पवयी पुत्र हुसेन निजामशहा यांस शहाजहान बादशहाकडे आग्र्याला रवाना करण्यांत आलें होतें. अशा रीतीनें निजामशाहीची वाट लागल्यावर कोणाच्याहि ताबेदारीस कंटाळलेला शहाजी मुखत्यारीनें नांदूं चाहत होता. निजामशाही बुडाल्यावर मोगलांच्या दक्षिणेंतील कारभारांत ढिलाई आली. तिचा फायदा घेण्याचें ठरवून शहाजीनें एक नवीनच हिकमत लढविली. निजामशाहीच्या गादीवरील हुसेनशहा ग्वाल्हेरीस अटकेंत होता, त्याच्याऐवजीं निजामशहाच्या वंशांतील मूर्तुजा (तिसरा) नांवाचा एक लहान मुलगा बगलेंत मारून शहाजीनें अहमदनगरच्या पश्चिमेस संगमनेराजवळील डोंगराळ मुलुखांत असलेला पेमगिरी ऊर्फ भीमगड गांठून तेथें निजामशहाची गादी सन १६३३ च्या सुमाराला स्थापली व आपण निजामशहाचा वजीर बनून त्या बाजूचा मिळेल तो मुलूख हाताखालीं घालून बसला. या त्याच्या युक्तीनें जुन्या निजामशाहींतील सरदारांचा त्यास होणारा विरोध कमजोर झाला.

निजामशाहीच्या अखेरीस देवगिरीचा प्रचंड किल्ला मोगलांनीं वेढा घालून घेतला व निजामशहास पकडलें, असें परमानंदानेंहि 'शिवभारतां'त नमूद केलें आहे. यानंतर जें कांहींसें अराजक माजलें त्यांत शहाजीनें गोदावरी, प्रवरा, निरा व भीमा या नद्यांच्या कांठचा निजामशाहीचा प्रदेश पादाक्रांत करून तो सह्याद्रीसुद्धां ताब्यांत आणला व शिवनेरी आदि अनेक गड भराभर घेतले. मोगलांनीं निजामशाही बुडविल्यामुळें शहाजीसारख्या इतर मराठे सरदारांनाहि आपलें नशीब काढण्यास ही संधि चांगली आहे असें वाटून तेहि शहाजीस येऊन मिळाले. त्यांत घाटगे, काटे, गायकवाड, कंक, ठोमरे, चव्हाण, मोहिते, महाडिक, खराटे, पांढरे, वाघ, घोरपडे इत्यादि महाराष्ट्रीय राजे होते, असेंहि परमानंदानें वर्णिलें आहे. शहाजीचें बळ या वेळा फार मोठें वाढलें असलें पाहिजे यांत शंका नाहीं आणि एवढा मोठा जमाव व सैन्य यांच्या जोरावर त्यानें निजामशाहीचें गेलेलें बरेंचसें राज्य काबीज केल्यामुळें शहाजहानाला ही बातमी आग्र्यास कळल्यावर आपण निजामशाही बुडविण्यासाठी खर्च केलेला अगणित पैसा, काळ व मनुष्यबळ फुकट गेलें असें वाटलें असेल. म्हणून निजामशाहीचा पुरता सोक्षमोक्ष लावण्यासाठीं शहाजहानानें पुनः कंबर कसली.

शहाजहान ता. २९–९–१६३५ रोजीं आग्र्याहून निघाला. तेथून बुंदेलखंड व माळवा या प्रांतांत शिरून त्यानें ४ जानेवारी १६३६ रोजीं नर्मदा नदी ओलांडून दौलताबाद गांठली. त्याजबरोबर औरंगजेब, जयसिंह, शाइस्ताखान वगैरे सरदार असून दौलताबादेस आल्यावर पूर्वीं पुढें पाठविलेले खानजमान व खानडौरान हे सरदार त्यांस भेटले. या वेळची शहाजहानाची तयारी मागीलप्रमाणेंच प्रचंड होती. याविषयीं ९ सप्टेंबर १६३६ पर्यंत डचांना मिळालेली माहिती अशी –

"मोगल बादशहा अद्यापि दौलताबादेंत राहिला असून विजापूर जिंकण्याकरितां दोन्ही बाजूंनीं दोन सैन्यें व आपला कनिष्ठ पुत्र (औरंगजेब) याजबरोबर तिसरें अशीं तीन सैन्यें त्यानें रवाना केलीं. कनिष्ठ पुत्रास (औरंगजेबास) दक्षिणेचा सुभेदार नेमलें. गोवळकोंड्याचा राजा मोठा नजराणा देऊन आपखुषीनें शरण येऊन आपल्याच मुलुखांत राहिला आहे. विजापूरच्या राजानेंहि खंडणीचें बोलणें लावलें असतां शहाजहान योग्य

तडजोडीस तयार न झाल्यामुळें व त्यानें विजापूरचा वकील आपल्याकडे आलेला अडकवून ठेवल्यामुळें विजापूरच्या लोकांनीं मोठें सैन्य जमा करून मोगलांवर हल्ला केला. त्यांत मोगलांचें सैन्य पळून गेलें, त्यांचे बरेच योद्धे मारले गेले आणि ६–७ प्रमुख मोगल सरदार कैद करून त्यांस विजापुरास नेण्यांत आलें" (प. सा. सं. खं. १, पृ. ९२).

यावरून मोगल सैन्य दक्षिणेंत आल्यापासून पुढील सहा-सात महिन्यांत त्यानें बरीच प्रगति करून कांहींसें यशहि मिळविलें होतें. शहाजहानानें गोवळकोंडेकरांस शरण आणून त्यांजकडून शहाजीस मिळणारी संभाव्य मदत बंद पाडली. विजापूरकरांसहि शरण आणण्याचा त्यानें प्रयत्न केला, पण विजापूरकर गोवळकोंडेकरांपेक्षां कठीण ठरून त्यांजकडून शहाजहानाच्या एका सैन्य-विभागास चांगलाच मार खावा लागला.

मोगल व आदिलशहा

विजापूरकरांप्रमाणें शहाजीहि मोगली सैन्याशीं आपल्या परीनें लढतच होता. त्याच्या प्रदेशांत औरंगजेब व शाइस्ताखान हे संचार करीत होते. शाइस्ताखानानें संगमनेर व जुन्नर हीं शहाजीचीं स्थळें काबीज केलीं आणि औरंगजेबानें शहाजीचा पाठलाग चालविला. विजापूरकर व मोगल यांजबरोबर लढतांना पुढें ज्या युद्धपद्धतीचा शिवाजीनें अवलंब केला तीच युद्धपद्धति या वेळीं शहाजीस औरंगजेबाविरुद्ध अवलंबावी लागली. किंबहुना ती तशी पुढें अवलंबावी लागेल म्हणूनच त्यानें पेमगिरी, माहुली इत्यादि दऱ्याखोऱ्यांतील किल्ल्यांचा आधींपासूनच आश्रय केला. त्याच्या मदतीस विजापूरकरांनीं रणदुल्लाखानास पाठविलें होतें. पण त्यास मोगली फौजेनें वाटेंत गांठून त्याचा पराभव केला व त्याची मदत शहाजीस मिळूं दिली नाहीं. तथापि शहाजहानास हें युद्ध लवकर संपेल असें वाटेना. शहाजी व विजापूरकर या दोघांचें संयुक्त बल जरी शहाजहानाइतकें नसलें तरी उपेक्षणीय नव्हतें. शिवाय विजापूरकरांनीं त्याचे सरदार कैद करून ठेवले व उलट शहाजहानानें त्यांजकडून तहासाठीं आलेल्या वकिलासच अटक करून ठेवली. त्या कारणानें एकंदर प्रकरण फारच चिडीस गेलें. मैदानी मुलुखांत विजापुरकरांच्या प्रबळ सैन्याशीं सामना द्यावयाचा व डोंगराळ मुलुखांत शहाजीसारख्या कस-

लेल्या योद्ध्याच्या गनिमी काव्यास पुरून उरावयाचें हें कृत्य सोपें नव्हतें. म्हणून आपला आब राखून केवळ दरडावणीनें महमद आदिलशहा शरण येतो किंवा कसें याची परीक्षा पाहण्याकरितां शहाजहानानें त्याला पुढील मजकुराचें पत्र पाठविलें –

" ईश्वरानें आम्हांस पृथ्वीचे बादशहा केलें आहे. तेव्हां विजापूर, गोवळकोंडें, भागानगर, लंका, पडलंका येथें आमच्या नांवानें शिक्का व खुदवा सुरू करणें आम्हांस प्राप्त झालें. तुम्ही आपणांस बादशहा म्हणवितां पण आतां आमची सेवेची दोरी गळयांत अडकवून आमच्या नांवानें शिक्का सुरू करावा. नाहींतर बाज पक्ष्याकडून तुमचें मांस काढून घारीस टाकून लूट करूं. आपण सशासारख्या भ्रांतीच्या झोपेंत आहां. आपणांकडे मकरमत-खान अमीर यास पाठविलें आहे " (प. सा. सं. खं. १, पृ. ८८).

या पत्रास आदिलशहानें दिलेलें उत्तर तितकेंच बाणेदारपणाचें आहे. तें :–

" कोणाचा गर्व व अभिमान ईश्वर चालू देत नाहीं. आम्हीहि पुरातन असून आम्हांकडेहि ईश्वरानेंच अधिकार दिला आहे. तुम्हीं कितीहि आढ्यता मिरविली तरी नवीन आहां. दुसऱ्याचें अकल्याण इच्छिण्यांत आपलाच घात होतो. खंडणी आजपर्यंत दिली तेवढी यापुढें देऊं " (प. सा. सं. खं. १, पृ. ८९).

यानंतर उभयतांचा तह ६ मे १६३६ रोजीं झाला. त्यांतील अटी पुढीलप्रमाणें होत्या :–

(१) विजापूरच्या आदिलशहानें दिल्लीपतीचें मांडलिकत्व मान्य करावें.

(२) निजामशाही राज्याचा मुलूख बादशहा व आदिलशहा यांनीं वांटून घ्यावा. आदिलशहानें बादशाही मुलुखाची मर्यादा ओलांडूं नये व नवीन तहानें हस्तगत झालेल्या मुलुखाचा ताबा बादशहाला बिनतक्रार मिळूं द्यावा.

(३) विजापूरच्या सुलतानाच्या मूळच्या मुलुखाला निजामशाही-पैकीं खालील मुलूख नव्यानें जोडण्यांत यावा. पश्चिमेकडे भीमा व सीना या दोन नद्यांमधील सोलापूर व परिंडा या किल्ल्यांसह, सोलापूर व

वांगणीमहाल; ईशान्येकडील भालकी व चिटगुपा हे परगणे; निजामशाही कोंकण; पुणें व चाकण हे दोन परगणे, हा सर्व मुलूख मिळून दरसाल २० लक्ष होन किंवा ८० लाख रुपये वसुलाचे ५० परगणे होतात. राहिलेला निजामशाहीचा मुलूख निर्विवादपणें मोगलांच्या राज्यास जोडावा.

(४) आदिलशहानें तहाकरितां म्हणून वीस लक्ष रुपये रोख किंवा जिनसांच्या रूपानें द्यावें.

(५) गोवळकोंड्याचें राज्य हें बादशाही संरक्षणाखालील समजून त्याच्याशीं विजापूरकरांनीं सलोख्यानें व वडील भावाप्रमाणें वागून हद्दीबद्दल किंवा मूल्यवान नजराणे देण्याबद्दल तसदी देऊं नये. मांजरा नदी ही उभयतांच्या राज्यांमधील सरहद्द मानावी.

(६) परस्परांनीं एकमेकांच्या नोकरास पळवूं नये किंवा पळून गेलेल्यांस थारा देऊं नये. शहाजहानानें आपण स्वतः व आपले पुत्र यांच्या वतीनें विजापूरकरांच्या नोकरांना बादशाही नोकरींत न घेण्याची हमी द्यावी.

(७) शहाजी भोसल्यानें निजामशाही वंशांतील एका मुलाला पुढें करून जुन्नर, त्रिंबक इत्यादि किल्ले अजूनहि हातांत ठेवले आहेत. ते तो शहाजहानाच्या हवालीं करीपर्यंत त्याला विजापूरकरांनीं आपल्या नोकरींत ठेवूं नये. तसें करण्याचें त्यानें नाकारल्यास त्याला विजापूरच्या मुलुखांत आश्रय किंबहुना प्रवेशहि मिळूं नये (सरकारकृत औरंगजेब, पृ. ३८).

दाभोळाहून सुरतेस इंग्रजांकडे ता. १९ मे १६३६ रोजीं पत्र गेलें त्यांतहि 'विजापुराकडून पत्रें आलीं त्यांवरून विजापूरकरांचा व मोंगलांचा तह होऊन मोगली सैन्य परत जाऊं लागल्याचें कळतें' असा मजकूर आहे (प. सा. सं. १, पृ. ९१).

या बाबतींत परमानंदाची माहितीहि विचारांत घेण्यासारखी आहे तो लिहितो, 'पुढें शहाजीस जिंकण्यासाठीं शहाजहानानें आदिलशहाबरोबर तह केला. आणि त्यांनीं भीमा ही परस्परांमधील हद्द ठरविली. शहाजी हा शहाजहान व महमद आदिलशहा यांजबरोबर तीन वर्षें लढला पण शेवटीं कंटाळून त्यानें निजामशहाच्या राज्यांपैकीं कांहीं मुलूख मोगलांस व कांहीं आदिलशहास दिला व आपला मुलूख आपल्याकडे ठेवला. त्यानंतर लवकरच शहाजी आदिलशहाचा नोकर झाला. त्यास महंमदानें

फरादखानाचा पुत्र रणदुल्लाखान यासह कर्नाटक जिंकण्यास पाठविलें.' परमानंद म्हणतो तीं तीन वर्षें म्हणजे १६३३ ते १६३६ हीं होत व त्यानें आपल्याकडे ठेवलेला मुलूख म्हणजे पुणें, चाकण, सुपें, इंदापूर हे पूर्वीपासून मिळालेले परगणे होत.

शहाजहानानें आदिलशहाशीं केलेला तह त्याला एकंदरींत महाग पडला असें त्यांतील कलमांकडे बारकाईनें पाहिल्यास कळून येणार आहे. आदिलशहास शहाजहानानें जर चारी मुंड्या चीत केलें असतें तर त्यानें निजामशाहींतली एक तसूभरहि जागा त्यास मिळूं दिली नसती. निजामशाहींत त्यानें विजापूरकरांना वांटणी दिली तिचा अर्थच हा कीं, त्या दोघांची जवळ जवळ बरोबरी झाली. विजापूरकरांचा अशा रीतीनें फायदा करून दिल्यामुळेंच शहाजीचा आधार त्यांनीं काढून घेऊन मोगल व निजामशहा यांच्या युद्धास पूर्णविराम देण्याची आपल्याकडून तयारी दर्शविली. शहाजीची समजूत काढून त्याच्या विरोधी हालचाली आपण थांबवितो असें शहाजहानास आश्वासन देऊन त्यांनीं त्यास ता. ११–७–१६३६ रोजीं आग्र्याच्या वाटेस लावलें.

शहाजीची शरणागति

या वेळीं शहाजी माहुलीच्या किल्ल्यावर होता (हा किल्ला ठाणें जिल्ह्यांत शहापूरच्या वायव्येस ४ मैल आहे). त्याजवर आदिलशहानें रणदुल्लाखान व खानजमान यांस पाठविलें. पण त्यांस तावडतोब शरण न जातां कोंकणाच्या त्या डोंगराळ मुलखांत त्यानें त्यांस चार महिने चांगलेंच दमविलें. अखेरीस नाइलाज होऊन त्यानें सहा किल्ले व बाल निजामशहा यांस खानजमानाच्या हवालीं करून आपण रणदुल्लाखानाच्या मध्यस्थीनें ऑक्टोबर १६३६ मध्यें विजापुराकडे प्रयाण केलें. विजापुरास जाण्यापूर्वी शहाजीकडे कोणता मुलूख शिल्लक राहिला हा प्रश्न या ठिकाणीं उद्भवतो. मोगल व विजापूरकर यांच्या दरम्यान झालेल्या तहांत पुणें व चाकण हे दोन परगणे विजापूरकरांस दिल्याचा उल्लेख आहे. पण हे दोन परगणे शहाजीच्या जहागिरीपैकीं असल्यानें ते विजापूरकरांनीं घेतले असते तर शहाजी समुद्रांत इतकीं वर्षें राहून अखेरीस कोरडा व अपेशी निघाला असाच त्याचा अर्थ झाला असता. पण परमानंद म्हणतो कीं, शहाजी व

आदिलशहा यांजमध्यें जो तह झाला त्यांत शहाजीनें आपली जहागीर आपणांकडे ठेवली. म्हणजे अर्थात् पुणें-चाकण इत्यादि परगणे त्याचे त्याजकडेच राहिले. परमानंदाच्या या विधानास शहाजीनें २५ मार्च इ. १६३७ रोजीं कारकून व देशमुख परगणे पुणें यांस लिहिलेल्या पत्राचा कांहींसा आधार सांपडतो. हें शहाजी राजे यांनीं गणेश भट बिन मलारी भट यांस दिलेले खुर्दखत असून त्यांत त्यांजकडे 'इनाम जमीन चावर' चालवावी असा मजकूर आहे (प. सा. स. खंड १, पृ. ९३). अर्थात् हें खुर्दखत शहाजीनें रणदुल्लाखानाशीं तह केल्यानंतर पांचच महिन्यांनीं दिलेलें आहे. त्यावरून पुणें परगणा आदिलशहानें जप्त केला असला तर ४।५ महिनेच जप्त केला असेल असें स्पष्ट होतें. त्याजकडील बाकीच्या परगण्यांचा मोगल व आदिलशहा यांच्या तहांत उल्लेख नाहीं त्या अर्थी पुणें व चाकण यांशिवाय बाकीचे परगणे त्यांजकडून काढून घेतले नसावे.

शहाजीनें इ. स. २५ फेब्रुवारी १६३७ त विजापुरच्या आदिलशहाची नोकरी पत्करली, त्याबरोबर त्याच्या आयुष्याचा पूर्वार्ध संपून उत्तरार्धास सुरुवात झाली. या वेळीं शहाजी सुमारें ४३ वर्षांचा होता. त्यांपैकीं सुमारें वीस-बावीस वर्षें शिपाईगिरींत गेलीं. या काळांत बहुतांशीं त्यानें निजामशहाचीच चाकरी केली. विजापूरकर व मोगल यांच्या सेवेचें त्यास गालबोट लागलें, पण अगदींच थोडीं वर्षें. अखेरीस दोन वर्षें त्यानें मूर्तुजा निजामशहा या मुलास पुढें करून स्वातंत्र्याचें सुख चाखलें. तथापि त्यानंतर पुनः मुसलमानांची चाकरी त्याच्या नशिबीं आली ती मृत्यूपर्यंत. उत्तरार्धांत विजापुरकरांची ताबेदारी त्यानें पत्करली तेव्हां महमद आदिलशहानें त्यास महाराष्ट्रांत राहूं न देतां कर्नाटकांत पाठविलें. यांत त्याचा उद्देश शहाजीचा दीर्घकाल स्वदेशाशीं असलेला संबंध तोडून टाकून त्यास निरुपद्रवी बनविण्याचा असणें शक्य आहे. तथापि दुसऱ्या दृष्टीनें पाहिल्यास शहाजीसारख्या मोठ्या व शूर सरदारास महाराष्ट्रांत करतां येण्यासारखी कामगिरी उरलीच नव्हती. सन १५६५ त विजयनगरचें हिंदु साम्राज्य आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही, बरीदशाही यांनीं धुळीस मिळविल्यावर दक्षिणेकडील तुंगभद्रा ते रामेश्वर येथपर्यंतचा विस्तीर्ण प्रदेश मुसलमानांना जिंकण्यास खुला झाला होता; पण

त्यानंतर लवकरच मोगलांच्या दक्षिणेवरील स्वाऱ्या सुरू झाल्यामुळें निजामशाही, आदिलशाही व कुतुबशाही या तीन प्रमुख शाह्यांना दक्षिण दिशेकडे आपला मोर्चा फिरविण्यास उसंतच मिळाली नाहीं. आतां निजामशाही बुडवून शहाजहानानें आदिलशाही व कुतुबशाही यांजबरोबर तह केल्यामुळें त्यांस वाटणारें उत्तरेचें भय नाहींसें होऊन दक्षिणेकडे कर्नाटकांत शिरण्यास त्यांना निर्वेधपणा प्राप्त झाला.

विजयनगरचें राज्य सन १५६५ त बुडालें तरी त्याचा कांहीं अवशेष बऱ्या स्थितींत राहिला होता. त्याखेरीज त्या सत्तेखालील मांडलिक राजे तुंगभद्रेपासून रामेश्वरापर्यंत ठिकठिकाणीं नांदत होते. त्यांस एक-एकटें गांठून जिंकणें कांहींसें सोपें असलें तरी तें खंद्या व शूर सेनापती-शिवाय पार पडणें शक्य नव्हतें. तें तडीस नेल्यानें आदिलशाही व निजाम-शाही यांना अपार संपत्ति व प्रदेश मिळणार होता. या दोनहि सत्तांना, विशेषतः आदिलशाहीस, मोगलांशीं झगडून आर्थिक झळ पुष्कळच लागली होती व त्यांचें राज्य खिळखिळें व क्षीण झालें होतें. त्यांत नवा जोम व तकवा उत्पन्न होण्यास एखाद्या पौष्टिक गुटिकेची जरुरी होती. ती संधि त्या राज्यांना आतां प्राप्त झाली. शहाजहानानें विजापूर व गोवळकोंडा यांजबरोबर तह केला, तेव्हांच त्यांचाहि परस्परांशीं स्नेहसंबंध जोडला गेला. त्या दोघांनाहि कर्नाटक जिंकणें इष्ट होतें. यास्तव एकमेकांशीं न झगडतां दोघांनीं कर्नाटकांतील आपलीं कार्यक्षेत्रें वांटून घेतलीं. त्या दोघांच्या करारांत कर्नाटकाचा पूर्व भाग कुतुबशहानें व पश्चिम भाग आदिलशहानें जिंकावा असें ठरलें. या ठिकाणीं कर्नाटक म्हणजे ज्यांत कानडी भाषा बोलतात तो प्रान्त एवढाच अर्थ अभिप्रेत नाहीं, तर त्यांत कर्नाटकाबरोबर तामीळ प्रांताचाहि समावेश होतो.

शहाजी महाराष्ट्रांतून विजापुरास बादशहास भेटण्यास गेला तेव्हां बरोबर शिवाजी व कुटुंबांतील सर्व मंडळी घेऊन गेला. तेथें गेल्यावर त्यानें मुधोळचे घोरपडे हे त्याचे भाऊबंद असल्यामुळें त्यांजपासून आपला जहागिरीचा वांटा घेतला. त्यांत त्याच्या वांटणीस कऱ्हाडजवळचीं २६ गांवें, अर्धा वाई परगणा व कर्नाटकांतील जहागिरीचा निम्मा भाग बादशहाच्या मध्यस्थीनें मिळाला. (डॉ. बाळकृष्ण).

प्रकरण तिसरें

शहाजीचें उत्तरायुष्य

अर्थस्य पुरुषो दासः।

शहाजीच्या वांट्याला कर्नाटकांतील जी कामगिरी आली ती त्यास भूषणावह व आनंदायक नव्हती. निजामशाहीच्या नोकरींत असतांना त्याला प्रायः मोगल, आदिलशहा यांसारख्या मुसलमानी सत्तांशींच झगडावें लागत असल्यामुळें त्याला त्याचें सोयरसुतक कांहीं नव्हतें. पण आतां त्याला दक्षिणेंतील हिंदु राज्यें बुडविण्याची पाळी आली. तीं स्वतःकरितां न जिंकतां मुसलमानी आदिलशाहीस जिंकून द्यावयाचीं होतीं. अर्थात् ही कामगिरी स्वाभिमानी व स्वधर्माभिमानी मनुष्यास धर्म-द्रोहाची व विध्वंसक वाटावी हें स्वाभाविक होय. पण कोठेंहि गेलें तरी पोटाकरितां मुसलमानांची सेवा करणें भाग असल्यामुळें शहाजीनें ती कामगिरी पत्करली. ती पत्करतांना त्याच्या अंतःकरणास काय वेदना झाल्या असतील याची कल्पना या काळांत करणें कठीण आहे.

शहाजीस कर्नाटकांत पाठवितांना आदिलशहानें त्याजवर पूर्ण विश्वास मुळींच टाकला नाहीं. त्यानें पूर्वी निजामशाहीची सेवा दीर्घकाल केली असल्यामुळें तो आपणांशीं निष्ठेनें वागेल अशी आदिलशहास खात्री नव्हती. शिवाय तो हिंदु व त्यानें राज्येंहि हिंदूंचींच जिंकावयाचीं, त्यामुळें आदिलशहास त्याजविषयीं निर्धास्त राहणें शक्य नव्हतें. या कारणासाठीं आदिलशहानें त्याची दुय्यम म्हणून नेमणूक करून त्याला रणदुल्लाखानाच्या हाताखालीं दिलें. रणदुल्ला व शहाजी हे सन १६३७ त म्हणजे विजापुरास पोंचल्यावर लागलीच कर्नाटकाच्या स्वारीवर निघाले. बादशहानें निघण्यापूर्वी रणदुल्लाखानास 'रुस्तुमजमा' हा किताब देऊन त्यास गौरविलें. शहाजीनें मोहिमेवर निघतांना आपलीं बायकामुलें बरोबर न नेतां, विजापुरास वा पुरंदरे दप्तर ३ पृ. १३० वर म्हटल्याप्रमाणें, पुण्याजवळ खेडेबारें येथें ठेवलीं असलीं पाहिजेत. कारण त्या वेळीं कर्नाटकांत त्याचें कायमचें वसति-

स्थान अद्यापि ठरावयाचें होतें. आतां विजापूर व खेडेबारें यांपैकीं त्यानें आपली कौटुंबिक मंडळी नक्की कोठें ठेवली असतील असा प्रश्न उद्भवतो. पुरंदरे दप्तरांतील मजकूर इ. १६५३ त म्हणजे कर्नाटकावरील स्वारीनंतर सोळा वर्षांनीं लिहिला आहे व तोहि दुसऱ्या एका संदर्भांत लिहिला आहे. त्या कारणानें तो तितका विश्वसनीय नाहीं व संभवनीयहि नाहीं. कारण शहाजी माहुलीहून विजापुरास गेला तेव्हां त्याचें भवितव्य निश्चित झालें नव्हतें. आणि त्या अस्वस्थतेच्या काळांत पुण्याकडील त्याचें निवासस्थान कायम करणेंहि शक्य नव्हतें. म्हणून विजापुरासारख्या राजधानीच्या शहरींच त्यानें आपलीं कौटुंबिक माणसें कांहीं दिवस ठेवलीं असतील असें मानणेंच सयुक्तिक होय. शहाजीस बेंगळूर सन १६३९ त मिळालें; त्यानंतरच शहाजीनें विजापूर सोडून बेंगळूरच कायमचें वसतिस्थान केलें असलें पाहिजे.

पहिल्या स्वारींत रणदुल्लाखानानें कर्नाटकाचा पश्चिम भाग जिंकण्यासाठीं निवडला. त्यांत हल्लींचें म्हैसूर संस्थान व त्याचा पश्चिम भाग मोडत होता. ही निवड गोवळकोंड्याशीं विजापूरकरांनीं केलेल्या करारास धरूनच होती. कर्नाटकांत या काळांत बरेच लहानमोठे राजे वा नायक असून ते एकमेकांचीं राज्यें जिंकून मोठें होण्याच्या प्रयत्नांत असत. तसा प्रयत्न इक्केरीचा वीरभद्र नायक करीत असतां त्यानें आसपासचा कांहीं प्रदेश जिंकला होता. या आक्रमणांत बसवपट्टणचा केंग नायक असून त्याच्या अंगीं वीरभद्रापासून आपला प्रदेश जिंकून परत घेण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें त्यानें विजापूरकरांची मदत मागितल्यावरूनच रणदुल्लाखानास त्या प्रदेशांत हात घालण्याची संधि मिळाली.

तत्कालीन राजकारणाला तत्त्व असें कांहीं नव्हतें. कोणीहि कोणाशींहि लढत. मुसलमान मुसलमानांशीं लढत व हिंदु हिंदूंशीं लढत. मुसलमान हिंदूंशीं लढत व हिंदु मुसलमानांशीं लढत. मुसलमान मुसलमानांशीं लढतांना हिंदूंची मदत घेत व हिंदु हिंदूंशीं लढतांना मुसलमानांची मदत घेत. सारांश, तेव्हांचे युद्धप्रसंग धार्मिक भूमिकेवरून सतत होत नसून त्यांच्या मुळाशीं सत्ताभिलाष व ऐहिक उत्कर्ष हाच एक हेतु असे. त्यास अनुसरूनच बसवपट्टणच्या नायकानें इक्केरीच्या वीरभद्राविरुद्ध विजापूरकरांची मदत घेतली. त्याप्रमाणें रणदुल्लानें शहाजीच्या साहाय्यानें इक्केरी घेतली.

इक्केरीचा वीरभद्र नायक हा आकस्मिक हल्ला झाल्यानें पळून गेला. त्याचा त्या अफाट विजापुरी सैन्यापुढें निभाव न लागल्यामुळें त्यानें इक्केरीचा किल्ला, अर्धे राज्य व १८ लक्ष होन रणदुल्ला ऊर्फ रुस्तुमजमा यास देऊं करून त्याच्याशीं तह केला.

या विजयानंतर रुस्तुमजमा मोठ्या दिमाखानें विजापुरास परत गेला. पण रुस्तुमजमाची पाठ फिरल्यावर दोन वर्षांनीं वीरभद्रानें विजापूरकरांचें मानेवरील जूं झुगारून दिलें व खंडणीपैकीं उरलेली रक्कम देण्याचें नाकारलें. बरें, खंडणी द्यावयाची नव्हती तर पुढील संग्रामाकरितां भोंवतालच्या नायकांची मदत घेऊन त्यानें तयारी तरी करावयाची होती. पण तीहि न केल्यामुळें विजापूरच्या सैन्यानें त्याजवर चालून येऊन त्याचा अल्पावधींत पूर्ण पराभव केला.. तथापि शहाजीच्या मध्यस्थीमुळें रुस्तुमजमानें त्याचें संस्थान कायम ठेवलें. या पराभवापासून वीरभद्र बिदनूर ही राजधानी करून तेथें राहूं लागला. हीच मोहीम तशीच पुढें चालवून रुस्तुमजमा शहाजीसह बेंगळूर काबीज करण्यास निघाला व अफजलखानास त्यानें शिऱ्याचा किल्ला घेण्यास पाठविलें. तेथील नायक कस्तुरीरंगा अफजलखानास भेटावयास आला असतां खानानें त्याचा भेटींत विश्वासघातानें खून केला! शिऱ्याची त्यानें निर्दयपणानें लूट करून सदर किल्ला केंग नायकास देऊन टाकला. केंग नायक हा म्हैसुराकडील नायकांत घरभेद्या निर्माण झाला असून विजापूरकरांना त्या प्रदेशांत आणण्यास तोच कारण झाला होता. त्यानेंच बेंगळूरचा नायक केंप गौंडा यास धाकदपटशा दाखवून बेंगळूर रुस्तुमच्या ताब्यांत देण्यास भाग पाडलें. रुस्तुमजमानें बेंगळूर व त्याभोंवतालचा प्रदेश यावर शहाजीस सुभेदार नेमलें. केंप गौंडा बेंगळुराहून सावनदुर्ग किल्ल्यांत राहावयास गेला. नंतर बेंगळुराहून विजापुरी सैन्य श्रीरंगपट्टणाकडे वळलें. तेथील राजा कंठीरव नरसराज वोडियार हा शहाजीच्या पराक्रमामुळें शरण आला. या कामगिरीबद्दल रुस्तुमजमानें त्याची फार तारीफ केली. राजानें पांच लक्ष होन खंडणी दिल्यावर श्रीरंगपट्टण त्याजकडेच ठेवण्यांत आलें.

बसवपट्टणचा वेढा

मागील मोहिमेंत बसवपट्टणचा केंग नायक यानें इक्केरीचा नायक वीर-

भद्र याचें घरभेद्या बनून नुकसान केलें होतें. त्यामुळें जळफळणाऱ्या वीरभद्रानें त्याचाच पेंच त्याजवर उलटवून सूड घेण्याचें मनांत आणलें. या वेळीं केंग नायकास विजापुरकरांचें दास्य नकोसें वाटून भोंवतालच्या नायकांच्या मदतीनें त्यानें विजापुरकरांविरुद्ध बंड उभारलें; तें मोडण्याकरितां सन १६३९ त रुस्तुमजमा विजापुराहून म्हैसूर प्रांतांत यावयास निघाला. त्याला केंग नायक व वीरभद्र यांजमधील वैर माहीत असल्यामुळें वीरभद्रास त्यानें आपल्या पक्षास मिळवून घेण्याचें बोलणें लावलें व तें आमंत्रण वीरभद्रानें हंसत पत्करलें. विजापुरी सैन्य बसवपट्टण जिंकण्याकरितां त्याजवर चालून गेलें. बसवपट्टणाभोंवतीं मजबूत तट असून त्यास ठिकठिकाणीं वेशी होत्या. केंग नायक फार मोठी फौज जमवून शहराचें रक्षण करीत होता. रुस्तुमजमाच्या मदतीस इतर नायक असून त्यांशिवाय त्याजबरोबर विजापुराहून आलेले मोठमोठे सरदार होते. त्यांपैकीं अफजलखान व शहाजी यांची योजना मुख्य वेशीवर झाली. सिद्दी रहमान, सोलापुरी व हुसेनी अंबरखान यांना दुसऱ्या वेशीवर व अंकुशखान, याकुत इत्यादींना तिसऱ्या वेशीवर पाठविण्यांत आलें. आंतून गोळयांचा वर्षाव होत असतां अफजलखानानें मोठ्या शौर्यानें शहराचा पेठ भाग काबीज केला. त्यानंतर सर्वांनीं सर्व बाजूंनीं हुल्लड उठवून सर्व शहर काबीज केलें. नंतर केंग नायकानें किल्ला रुस्तुमच्या स्वाधीन करून वर ४० लाख होन खंडणी दिली.

या विजयानंतर चिक्कनायक हळ्ळी, बेलूर, तुमकूर, बाळापूर इत्यादि ठिकाणें घेऊन तें विजयी सैन्य मोठ्या लुटीनिशीं विजापुरास परत गेलें. या मोहिमेंत मिळालेली लूट इतकी मोठी होती कीं, तिच्यांतून विजापुराजवळील बादशहापूर नांवाचें सुंदर उपनगर वसविण्यांत आलें. त्याशिवाय दाद् महाल नांवाचें भव्य न्यायमंदिरहि बांधण्यांत आलें. या मोहिमेंत व नंतरच्या युद्धांत मिळून आदिलशहानें सारा म्हैसूर प्रांत जिंकला, प्रचंड लूट मिळविली व कित्येक हिंदूंना बाटवून इस्लामी धर्माचा प्रसार केला!

विजयनगरचा श्रीरंग

कर्नाटकाची पश्चिम बाजू आदिलशहा जिंकीत असतां पूर्व बाजू जिंकण्याचें काम कुतुबशहानें चालविलें होतें. त्याच्याच कार्य-

क्षेत्रांत विजयनगर सांपडलें होतें. विजयनगर साम्राज्याच्या ठिकऱ्या उडाल्या होत्या तरी त्याचा अभिमान त्या साम्राज्याचा वारस श्रीरंग याच्या ठिकाणीं जागृत होता. श्रीरंग तरुण, तरतरीत व स्वाभिमानी होता. त्याच्या मनांत इस्लामी लाट थोपवून धरण्याचें असलें तरी तितकी ताकद नसल्यामुळें त्यानें भोंवतालच्या नायकांची जूट जमवून व त्यांचें साहाय्य घेऊन इस्लामास तोंड देण्याचा निश्चय केला. पण म्हैसूर प्रांतांतील बसवपट्टणच्या केंग नायकाप्रमाणें श्रीरंगासहि मदुरेचा त्रिमल नायक हा अस्तनींतील निखारा भेटला. तो श्रीरंगाविरुद्ध तंजावर, जिंजी इत्यादि ठिकाणच्या नायकांची जूट जमवून, श्रीरंग आपलें गत साम्राज्य पुनः उभें करणार या समजुतीनें, त्याचा प्रयत्न हाणून पाडण्यास सिद्ध झाला. ही बातमी श्रीरंगास समजल्यावर श्रीरंग त्याची खोड मोडणार असा संभव दिसल्यामुळें त्रिमल नायकानें कुतुबशहाचे पाय धरले. कुतुबशहापाशीं रुस्तुमजमाच्या तोलाचा मीरजुम्ला हा सेनापति होता. तो वेलोरवर चालून आला; पण श्रीरंगानें इक्केरी-बेदनूरचा वीरभद्र नायक याची मदत घेऊन मीरजुम्लास उधळून लावलें व त्याच्या सैन्याची एक तुकडी कैद केली. पण श्रीरंगाचा हा विजय त्याच्या कांहीं हितशत्रूंना पाहवला नाहीं. म्हणून ते गोवळकोंड्याकडे संधान बांधूं लागले. तेव्हां श्रीरंगास गोवळकोंड्यास शह देण्याकरितां विजापूरकरांकडे नाक मुठींत धरून जावें लागलें. त्यानें त्यांस दीड लक्ष होन व २४ हत्ती देऊं करून त्यांची मदत घेतली.

गोवळकोंड्यास विजापूरचा शह मिळतांच श्रीरंगावरील परकीय आक्रमणाचें संकट निदान दोन वर्षें तरी टळलें. या काळांत त्यानें मदुरा, जिंजी व म्हैसूर येथील नायकांना शरण आणलें. पण श्रीरंगाचें नशीब लवकरच फिरलें. त्यानें विजापूरकरांस वश करून घेतल्यामुळें गोवळकोंडेकरांपासून त्याचा बचाव झाला होता तो संपला. आपण एकमेकांविरुद्ध वागलों तर कर्नाटक जिंकण्याचें आपलें कार्य थांबेल हें लक्षांत येऊन आदिलशहा व कुतुबशहा यांनीं परस्परांशीं सख्य जोडलें. त्याबरोबर मीरजुम्ला यानें उदयगिरी घेतली आणि विजापूर व गोवळकोंडा यांनीं मिळून वेलोरला वेढा घालून श्रीरंग रायल याचा पराभव

केला. वेलोर घेतल्यावर मीरजुम्ला यानें कर्नाटकाचा पूर्व भाग पूर्व किनाऱ्यापर्यंत जिंकला.

पूर्व कर्नाटकांत मीरजुम्लाची सरशी होत असतां पश्चिम कर्नाटकांत विजापूरकरांनीं उरलेलें काम पूर्ण करण्यास हात घातला. मागील स्वारींत इक्केरीच्या वीरभद्राचा रुस्तुमजमानें पराभव केल्यापासून तो बेदनुरास राहूं लागला होता. त्याचा धाकटा भाऊ व सेनापति शिवाप्पा यानें मोठा पराक्रम करून बेदनूर राज्याचें सामर्थ्य वाढविलें व त्या धुंदींत त्यानें वीरभद्रास ठार मारून त्याचें राज्य बळकावलें आणि इक्केरी परत घेतली. ही बातमी विजापुरास कळतांच शिवाप्पाचें पारिपत्य करण्यासाठीं खासा महमद आदिलशहाच विजापुराहून मालनाडांत म्हणजे म्हैसूर प्रांताच्या मावळी भागांत जावयास ३ जानेवारी सन १६४४ रोजीं निघाला. त्यानें बंकापुरास मुक्काम करून, रणदुल्लाखान सन १६४३ त मेल्यामुळें त्याच्या अभावीं मुस्तफाखान व खानखानान यांना इक्केरी घेण्यास पाठविलें. त्यांजबरोबर शिवाप्पाचे सैनिक मोठ्या शौर्यानें लढले. पण विजापूरकरांच्या प्रचंड सैन्यापुढें त्यास हात टेकावें लागून त्यानें इक्केरीचा डोंगरी किल्ला विजापूरकरांच्या स्वाधीन केला व त्यामागून त्यांनीं सागरहि घेतलें. अशा रीतीनें तीन महिन्यांच्या आंत इक्केरीची मोहीम समाप्त झाली.

कर्नाटकाच्या पश्चिम भागांत यशःप्राप्ति झाल्यावर पूर्वभागहि जिंकण्याची हाव विजापूरकरांस सुटली. वास्तविक पूर्व भाग हें गोवळकोंडेकरांचें कार्यक्षेत्र ठरलेलें होतें. पण तो करार धाब्यावर बसवून श्रीरंगास साहाय्य करण्याच्या मिषानें महमदशहानें खान-इ-खानान यास त्या भागांत रवाना केलें. त्यानें चार दिवस घनघोर युद्ध करून नंद्याळचा पाडाव केला व त्यामागोमाग शिरवळ, कोपगोंडा, कनकगिरी हींहि स्थळें घेतलीं. पण या आक्रमणानें अस्वस्थ होऊन कुतुबशहानें आदिलशहास बहुमोल नजराणे पाठविले व त्याच्याशीं स्नेह करून त्याचें आक्रमण थांबविलें.

रणदुल्लाखान ऊर्फ रुस्तुमजमा याचें विजापूर दरबारांत त्याच्या पराक्रमामुळें प्रस्थ फार माजलें होतें. त्या योगानेंच चढून जाऊन तो आदिलशहास मानीनासा झाला होता. रुस्तुमजमा म्हैसूर प्रांतांत होता. तो मेल्यावर कर्नाटकांतील इतर प्रदेश जिंकण्याकरितां महमदशहानें वरीलप्रमाणें नवाब

मुस्तफाखान या सेनापतीची योजना केली. तो ५ जून १६४६ रोजीं मोहिमेवर निघाला. तो गदग, लक्ष्मेश्वर यांवरून बसवपट्टणाच्या पश्चिमेस होनहळ्ळी येथें गेला. तेथें गेल्यावर त्यानें रुस्तुमजमाची जहागीर ताब्यांत घेतली. येथें शहाजीहि त्यास येऊन मिळाला. कारण त्यास यापूर्वी, पुढें हिंदु राजांपासून सरहद्दीचें संरक्षण करण्याकरितां पाठविण्यांत आलें होतें. इतर मराठे सरदार व मुसलमान सरदारहि त्यास मिळून मुस्तफापाशीं सेनासागरच जमला. त्या सेनेचें तुमकुर जिल्ह्यांत शिवगंगा येथें श्रीरंग यानें व मदुरा व तंजावर येथील राजांच्या वकिलांनीं स्वागत केलें. तरीहि तेथून हा सेनासागर पूर्वेकडे वळून जिंजीवर कोसळला व त्यापुढें जिंजीच्या नायकानें लोटांगण घातलें. त्यामुळें विजापूरकरांनीं या वेळीं जिंजी घेतली नाहीं.

श्रीरंगाचा पराभव

त्यानंतर विजापुरी सैन्यानें सेलम जिल्ह्यांतील बारा महाल हा प्रदेश जिंकून वेलोरला वेढा घातला. त्या ठिकाणीं तुमुल युद्ध होऊन शहाजी प्रभृति हिंदु सरदारांनीं शौर्य गाजविलें. श्रीरंगाचा सेनापति दामलवार व मलिक रेहन यांची चांगलीच झोंबाझोंबी झाली. पण मुस्तफाखानानें तीर मारून दामलवार यास ठार केल्यावर श्रीरंगाचें सैन्य दशदिशांस पळून गेलें. शेवटीं श्रीरंग रायलानें ५० लाख होन व १५० हत्ती देण्याचें कबूल करून वेलोरचा किल्ला विजापुरी सैन्याच्या ताब्यांत दिला. कर्नाटकाचा आतां नवीन जिंकलेला प्रदेश शहाजी व आसदखान यांच्या स्वाधीन करून मुस्तफाखान लूट घेऊन विजापुराकडे गेला. बादशहानें त्यास कृष्णानदीवर सामोरे येऊन त्याचें प्रचंड स्वागत केलें.

वरील युद्धांत श्रीरंग शरण आला होता तरी त्याचें बरेंचसें सामर्थ्य अद्यापि शिल्लक असल्यामुळें मुस्तफाखान १२ जानेवारी १६४८ रोजीं त्याजवर स्वारी करण्यास पुनः निघाला. त्याला वाटेंत शहाजी व आसदखान येऊन मिळाले. मुस्तफानें शहाजीच्या मदतीनें जंगम घाटांतील मजबूत किल्ले सर केले; या पराक्रमाबद्दल बादशहानें त्यास महाराज व फर्जंद हे किताब दिले. हा काळ शहाजीच्या वैभवाच्या कळसाचा होय. त्यानंतर त्यास उतरती कळा लागली. त्याला कारण शिवाजीनें महाराष्ट्रांत आदिलशाहीविरुद्ध सुरू केलेली बंडाळी हेंच प्रामुख्यानें मानावें लागतें.

मीरजुम्ला व मुस्तफाखान

विजापूर व गोवळकोंडा यांनीं कर्नाटकांतील आपलीं कार्यक्षेत्रें वाटून घेतलीं असलीं तरी आतांपर्यंत तो संकेत मोडल्याचीं उदाहरणें विजापूरकरांकडून अनेकवार घडलीं, तसें आतांहि घडलें. विजापूरकरांनीं आतांपर्यंत गोवळकोंड्याच्या मानानें पुष्कळ अधिक प्रमाणांत कर्नाटकाचा प्रदेश जिंकून घेतला होता. गोवळकोंड्याचें बळ विजापुराच्या दृष्टीनें बरेंच कमी होतें. त्यांचा या बाजूस येणारा मीरजुम्ला हाच काय तो मोठा सेनापति. त्याच्या स्वाऱ्या कर्नाटकांत एकंदरीनें कमी होत असल्यामुळें, विजापूरकरांना त्याजवर इतकी ताण करतां आली, ही गोष्ट लक्षांत येऊन होईल तितका हात मारण्याच्या उद्देशानें मीरजुम्लानें पूर्व कर्नाटकांत उतरून जिंजीला वेढा दिला. तो मदुरेचा त्रिमल नायक याच्या आधिपत्याखालचा होता. त्याला एकट्याला तो किल्ला मीरजुम्ल्याविरुद्ध लढविणें शक्य नसल्यामुळें त्यानें विजापूरकरांचा सरसेनापति मुस्तफाखान याची मदत घेतली व तो वेढा उठविण्यास जिंजीपाशीं आला. तेव्हां मीरजुम्ला यानें मुस्तफाशीं संगनमत करून त्यास अंग काढून घ्यावयास लावलें. मुस्तफानें केलेला हा विश्वासघात शहाजी, खैरियतखान व सिद्दी रहिमन यांना पसंत पडला नाहीं. इतक्यांत ९ नोव्हेंबर १६४८ रोजीं मुस्तफाखान वृद्धावस्थेमुळें अकस्मात् मरण पावला व जिंजीचा किल्ला मीरजुम्लानें घेतला.

शहाजीस अटक

यांतूनच शहाजीच्या अटकेचा प्रसंग उद्भवला. त्या प्रसंगाचें वर्णन शिवभारतकार येणेंप्रमाणें करतो: ‘ एके दिवशीं अगदीं सकाळीं दिलावरखान, मसूदखान, अंबरखान, अदोनी व कर्णपूर (कुर्नूल) येथील राजे, फरादखान, खैरातखान, मलिक रैहनखान, बल्लाळ, सिदोजी, मंबाजी पवार, मंबाजी भोसले इत्यादिकांनीं शहाजीच्या छावणीला वेढा घातला. त्यामुळें छावणींत गडबड उडाली. नंतर खंडोजी, अंबाजी, बाजीराजे घोरपडे, यशवंतराव गाढवे यांनीं शहाजीच्या तंबूंत जाऊन त्याला झोपेंतून जागें केलें. शहाजीच्या जिवलग लोकांनीं त्यांजबरोबर झगडा केला. शहाजी व बाजी घोरपडे यांचीहि झोंबाझोंबी झाली. अखेर शहाजी जखमी व बेशुद्ध होऊन खालीं पडला व त्याला बाजीनें कैद केलें. आणि त्याला घेऊन अफजलखान

कर्नाटकांतील मोठ्या लुटीसह विजापुरास गेला.' त्यापूर्वीं अफजलखानानें गोवळकोंडेकरांपासून जिंजीचा किल्ला लढून घेतला होता असें म्हणतात.

शिवभारतकाराच्या या वर्णनाप्रमाणें शहाजीस बेसावध स्थितींत अचानकपणें कैद करण्यांत आलें असें दिसतें. त्याच्या कैदेचीं अनेकांनीं अनेक कारणें सांगितलीं आहेत. शहाजी मुस्तफाविरुद्ध वागला म्हणून पकडला गेला, असें मराठी बखरकार म्हणतात. सभासद म्हणतो कीं, बादशहानें आपल्या मुलाला (शिवाजी) आवरण्यास पत्र लिहिलें, पण शहाजीनें, माझा मुलगा माझ्या कह्यांत नाहीं, तुम्हांस वाटेल तें करा, असें उत्तर दिलें, म्हणून तो पकडला गेला. बाळकृष्णांच्या मतें मुस्तफाखानानें त्रिमल नायकाशीं विश्वासघात केल्याबद्दल शहाजी तक्रार करूं लागला म्हणून पकडला गेला.

वरील कारणांपैकीं प्रत्येकाचा आतां वेगवेगळा विचार करूं. शहाजी मुस्तफाविरुद्ध वागला म्हणून पकडला गेला हें कारण पुरेसें वाटत नाहीं. कां कीं, मुस्तफाची कृति एकट्या शहाजीसच नापसंत नसून खैरियतखान व सिद्दी रैहन या मुसलमान सरदारांनाहि तितकीच नापसंत होती. शिवाय एवढ्या लहान कारणाकरितां शहाजीसारख्या मोठ्या व विश्वासूक सरदारास ही शिक्षा फाजील जबर होती. त्यापेक्षां सभासदानें दिलेल्या कारणांत तथ्यांश अधिक दिसतो. कारण शिवाजीला ताळ्यावर आणण्यास ती एक खाशी युक्ति होती. गोवळकोंड्याच्या नोकरींत जाण्याविषयीं शहाजीनें कुतुबशाहीकडे पत्रव्यवहार केला होता हेंहि एक कारण होतें. त्रिमल नायकाशीं विश्वासघात मुस्तफानें केल्याविरुद्ध शहाजीनें केलेली तक्रार हें बाळकृष्णांनीं सांगितलेलें कारण मराठी बखरकारांप्रमाणेंच अपुरें आहे.

जिंजीच्या वेढ्यासंबंधीं तत्कालीन वा त्यानंतरच्या लेखकांत मेळ असा मुळींच नाहीं. किंबहुना कर्नाटकांतील सर्व मोहिमांसंबंधीं कांहीं अंशीं अशीच स्थिति आहे. मीरजुम्ला व मुस्तफाखान यांनीं संगनमत केल्यामुळें मुस्तफाखान मीरजुम्लानें घातलेला वेढा उठविण्यास राहिला नाहीं असें कोणी म्हणतात, तर महमदनाम्याच्या लेखकासारखे लोक मुस्तफाखानानें वेढा उठविण्याचें काम तसेंच चालू ठेवलें असतां शहाजी त्याच्या आज्ञेचें

उल्लंघन करून आपल्या फौजेस विश्रांति देण्याच्या निमित्तानें निघून गेला व अशा रीतीनें त्यानें शिस्तभंग केला असें लिहितात. वर लिहिल्याप्रमाणें तेंहि एक कारण शहाजीस कैद करण्याच्या मुळाशीं असेल.

शहाजीला आतां विजापूरकरांच्या नोकरींत शिरून १०-११ वर्षे झालीं होतीं. त्याला इतक्या वर्षांत बाह्यात्कारी त्याचा कितीहि बडेजाव वाढला असला तरी त्याला मानसिक स्वास्थ्य कितपत लाभलें होतें हें सांगणें कठीण आहे. बहुधा तो बेचैन असावा. म्हणूनच आतांपर्यंत कुतुबशाहीची नोकरी करावयाची राहिली होती ती पत्करून आपणांस अधिक सुख लागतें किंवा कसें हें पाहण्यासाठीं त्यानें कुतुबशहाकडे या वेळीं पत्रव्यवहार सुरू केला होता. त्या बाबतींत अब्दुल्ला कुतुबशहा यानें विजापूर दरबारांतील आपल्या वकील हाजी नसीरा यास कळविलें, 'शहाजी भोसल्याकडून आम्हांस २३ डिसेंबर १६४७ रोजीं पत्र आलें, त्यांत मला आपल्या आश्रयाखालीं घ्या असा मजकूर आहे. या पूर्वींहि त्यानें आम्हांस अशींच पत्रें पाठविलीं होतीं व त्या वेळींहि आम्ही त्याची विनंती अमान्य केली होती. आतांहि त्यानें आदिलशहाच्या नोकरींत राहावें असेंच आमचें त्यास सांगणें आहे.' कुतुबशहाकडे शहाजीची चालू असलेली ही खटपट आदिलशहाच्या कानावर गेली नसेल असें नाहीं.

वरील सर्व कारणांचा साकल्यानें विचार करतां पुढील निष्कर्ष निघतो. शहाजीसारखा मातबर सरदार आदिलशहास हवा असल्यानें त्याजविरुद्ध अनेक कागाळया त्याच्या कानावर आल्या असल्या तरी त्यांकडे शहानें लक्ष दिलें नाहीं. पण तो नोकरींत असतां त्याचा पुत्र शिवाजी हाच आपल्या राज्याविरुद्ध मसलती करतो असें दिसून आल्यावर महमदशहास शहाजीस पकडणें भाग पडलें व त्याला तात्कालिक निमित्त जिंजीप्रकरण हें झालें. त्यासाठीं शहाजीस शेवटीं शहानें बंधमुक्त केलें, त्या वेळीं त्यानें घातलेल्या अटी विचारांत घ्यावयास पाहिजेत. त्यांतील मुख्य अट काय होती हें पुढील मजकुरावरून लक्षांत येतें.

इ. १६४९ मे १६ रोजीं महमद आदिलशहानें अहमदखान सरनोबत याजमार्फत "कोंढाणा, बेंगळूर व कंदर्पी हे किल्ले देण्याच्या अटीवर सुटका होऊं शकेल," असें शहाजीस कळविलें. त्याप्रमाणें शहाजीनें शिवाजी व

संभाजी यांस निरोप पाठवून किल्ले दिले व शहाजीची सुटका झाली"
(मुहमंदनामा व शि. प्र., पृ. ५५).

या मजकुराचा कित्येक जण असा अर्थ करतात कीं, शिवाजीप्रमाणें त्याचा भाऊ संभाजी हाहि विजापूरकरांवर उठला असून शिवाजीनें ज्याप्रमाणें कोंढाणा किल्ला बळकाविला होता त्याप्रमाणें संभाजीनें बेंगळूर व कंदर्पी हे किल्ले बळकावले होते. मिळून शहाजीचे दोघे पुत्र दोन बाजूंनीं बंडास प्रवृत्त झाले होते. पण हा अर्थ वस्तुस्थितीस सोडून आहे. शिवाजी विजापूरकरांविरुद्ध बंडाळी करीत होता याविषयीं प्रश्न नाहीं. पण संभाजीसंबंधीं तसें अनुमान काढण्यास जागा नाहीं. संभाजी पूर्वीहि विजापूरकरांविरुद्ध नव्हता व शहाजीच्या सुटकेनंतरहि नव्हता. शहाजी कैदेंत पडल्यावर त्याच्या जहागिरीची व्यवस्था त्याचा कर्ता पुत्र म्हणून संभाजी पाहत होता. शहाजीला बेंगळूरचा किल्ला व त्याभोंवतालचा मुलूख विजापूरकरांनींच दिला होता. तो आतां संभाजी-कडे असल्यामुळें त्यांतील बेंगळूर व कंदर्पी हे किल्ले शहाजीवरचा विजापूर-करांचा विश्वास डळमळल्यामुळें त्यांना त्याजकडे ठेवावयाचे नव्हते इतकेंच. त्यासाठीं संभाजीस बंडखोर ठरविण्याचें कारण नाहीं. बेंगळुरास फराद-खानाचा पराभव संभाजीनें केला म्हणजे संभाजी विजापूरकरांविरुद्ध उठला असें शिवभारतकार म्हणतो पण त्यास इतरत्र आधार नाहीं.

शहाजीची कैदेंतून सुटका करण्याकरितां शिवाजीनें मोगलांकडे संधान बांधून त्यांचें दडपण विजापूरकरांवर आणण्याचा प्रयत्न केला असा लोक-प्रवाद आहे, त्यालाहि ऐतिहासिक कागदांचा आधार सांपडतो. शहा-जहानाचा पुत्र मुरादबक्ष हा या वेळीं दक्षिणेचा कारभार पाहत होता. त्याला शिवाजीनें पत्र लिहिलें, त्याचें उत्तर मुरादानें शहाजीस ३० नोव्हेंबर सन १६४९ त पाठविलें. त्यांत मुराद कळवितो, " तुमचे चिरंजीव शिवाजी यांनीं अर्जदास्त हुजूर येण्याविषयीं पाठविली ती पावली. पेशजीच्या गोष्टी मनांत न आणितां तुमची मोकळीक करण्याविषयीं लिहिलें आहे. त्यास हल्लीं आम्ही दिल्लीकडे जात आहों. परंतु तुम्हांस खुषखबर देतों कीं, तुम्ही सर्व प्रकारें खातरजमा ठेवावी. आम्हीं हुजूर पावलियावरी तुमचे मजकुरां-विषयीं अर्ज करून बंदोबस्त करून देऊं. तुम्ही आपला एक वकील इतबारी

पाठवून द्यावा. त्या समागमें फर्मान पंजाचें पाठविण्यांत येईल. तुमचे चिरंजीव संभाजी वगैरे सरकारकृपेस पात्र होऊन पेशजीप्रमाणें मनसबा व नूतन सर्फराज पावतील. ... तुम्हांकरितां पोषाख पाठविला हा घेऊन आपणांवर पूर्ण लोभ आहे असें मनांत आणावें" (प. सा. सं. खं. १, पृ. १२४). यावरून शहाजीच्या सुटकेवर प्रकाश पडतोच, पण त्याशिवाय संभाजीला मोगल सरकारांत मनसब मिळवून देण्याचा शहाजीचा प्रयत्न होता हेंहि कळून येतें. म्हणजे शहाजी आपल्या पुत्रासुद्धां विजापूरकरांच्या राज्यांतून पाय काढण्याच्या विचारांत होता, असेंहि अनुमान निघाल्याशिवाय राहत नाहीं.

शहाजीस आदिलशहानें कैद केलें त्या वेळीं शिवाजीवर त्यानें सरसुभेदार फत्तेखान यास पाठविलें होतें. पण त्याचा पुरंदराजवळ शिवाजीनें पराभव केला. त्यानंतर शिवाजीनें विजापूरकरांशीं तह केला, त्यांत कोंढाणा किल्ला परत दिल्याचा उल्लेख आहे, पण पुरंदराचा नाहीं. याचें कारण तो किल्ला त्याजकडे त्या वेळीं कायमचा आलाच नव्हता. संभाजीच्या बाबतींत असेंहि म्हणतां येईल कीं, शहाजीला विजापूरकरांनीं कैद केलें, या अन्यायाची चीड येऊन, फरादखान बेंगळूर घेण्यास आला असतां त्यास तो किल्ला देण्याचें संभाजीनें नाकारलें. त्या वेळीं संभाजी व फरादखान यांचा झगडा झाला व शिवभारतकार म्हणतो त्याप्रमाणें संभाजीनें फरादखानाचा पराभव केला असेंहि मानलें तरी विजापूरकरांच्या मनांत तो किल्ला लढून घेण्याचें असतें तर त्यांजपाशीं एकाहून एक शूर असे इतके सेनापति होते कीं, त्यांपैकीं कोणासहि पाठवून विजापूरचा महमदशहा बेंगळूर व कंदर्पी किल्ला सर करूं शकला असता. पण त्याला शहाजीबरोबर भांडण इतकें न वाढवितां सामोपचारानें मिटतें घ्यावयाचें असल्यामुळें त्यानें ते दोन किल्ले सोडण्याची अट शहाजीस घातली व त्याप्रमाणें संभाजीनें किल्ले सोडल्यावर व शहाजीची सुटका झाल्यावर ते किल्ले परत शहाजीस देण्यांत आले, हें पुढें घडलेल्या हकीकतीवरून स्पष्ट होतच आहे.

असो. मुस्तफाखानानें २५ जुलै १६४८ त कैद करून ठेवलेल्या शहाजीला घेऊन ता. १० मार्च १६४९ रोजीं अफजलखान विजापुरास नौरोजच्या समारंभाच्या वेळीं येऊन पोंचला व सुलतानानें त्याला

सरनोबत अहमदखान याच्या ताब्यांत दिलें. त्याजबरोबर कान्होजी नाईक जेधे व दादाजी कृष्ण लोहोकरे हेहि होते. बापास पकडल्याची बातमी कळल्यावर शिवाजीनें मागें लिहिल्याप्रमाणें मुरादबक्षाकडून विजापूरकरांवर दाब आणण्याची खटपट चालविली व आदिलशहानें घातलेल्या अटींप्रमाणें कोंढाणा किल्ला आदिलशहास दिला. कर्नाटकांत संभाजीनेंहि बेंगळूर व कंदर्पी हे किल्ले आदिलशहाच्या स्वाधीन केले, तेव्हां दि. १६ मे १६४९ ला शहाजीची सुटका झाली. इतकें झाल्यावर शहानें कल्याण महालांत शहाजीची भेट घेतली आणि त्याजकडून पूर्ववत् इमानें इतबारें सेवा करण्याचें वचन घेऊन त्यास सन १६५० अखेर कर्नाटकांतील कामगिरीवर पुन्हा पाठविलें. कान्होजी जेधे व दादाजी कृष्ण लोहोकरे यांचीहि त्याच वेळीं सुटका झाली. त्यांस शहाजीनें आपल्यापाशीं न ठेवतां महाराष्ट्रांत मावळांतील आपल्या वतनावर जाऊन राहण्यास सांगितलें. त्यांस तो म्हणाला, 'तुम्ही जमावानिशीं शिवबाजवळ राहावें. त्या प्रांतांतील अवघे मावळे देशमुखसुद्धां त्यास रुजू होऊन त्याच्या आज्ञेंत वर्तून जबरदस्तीनें राहावें.'

शहाजीची सुटका

शहाजी सुटका होऊन कर्नाटकांत आल्यावर विजापूरकरांच्या तिकडील हालचाली कांहीं काल स्थगित झाल्या. याचें कारण असें कीं, त्या वेळीं विजापूरचा बादशहा असाध्य रोगानें आजारी पडला व मोगलांचें दडपण उत्तरेकडून वाढत चाललें. आदिलशहाच्या अडचणींचा फायदा घेऊन गोवळकोंड्याचा सेनापति मीरजुम्ला यानें कर्नाटकांत आपला जम चांगला बसविला. त्याजविषयीं फोर्ट सेंट जॉर्ज (मद्रास) येथील इंग्रज अधिकारी वॉल्टर लिटल्टन यानें विलायतेस पुढील आशयाचें पत्र ता. १७ जानेवारी सन १६५१ रोजीं लिहिलें :–

"सबंध गोवळकोंड्याचा राज्यकारभार मीरजुम्ला पाहतो. त्याला लोक राजाप्रमाणें भितात. त्यानें कर्नाटकाचा मोठा भाग जिंकला असून उरलेलाहि लवकरच जिंकण्याचा त्याचा बेत आहे. त्याच्या राज्यांत सर्व प्रकारचें कापड तयार होतें. हिरे, लोखंड यांच्याहि खाणी आहेत. त्याजपाशीं चार सहस्र घोडे, तीनशें हत्ती, चार-पांचशें उंट व दहा सहस्र बैल

आहेत. मोगल बादशहाची त्याजवर बहाल मर्जी आहे. त्याचा पेगू, तेनासरीम, अचीन, आराकान, इराण, बंगला, मक्का, मालदीव, मादागास्कर इत्यादिकांशीं व्यापार चालतो. त्याजपाशीं त्याचीं स्वतःचीं दहा गलबतें असून अधिक बांधण्याचा त्याचा विचार आहे. ”

यानंतर सुमारें एका वर्षानें विजापूरकरांनीं मीरजुम्लाचें कर्नाटकावरील आक्रमण थांबविण्याची तयारी जारीनें केली. कर्नाटकाचा बराच भाग मीरजुम्लानें आतांपर्यंत जिंकीत आणल्यामुळें त्याच मुद्द्यावर गोवळकोंडा व विजापूर यांचें भांडण लागलें. कर्नाटकाचा किती भाग कोणाकडे असावा हा वादाचा मुद्दा होता. त्याच मुद्द्यावर उभयतांचें युद्ध जुंपलें व तें बरेच दिवस चालल्यावर विजापुरी सैन्यानें मीरजुम्ल्यास ता. १४ जानेवारी १६५२ रोजीं गोवळकोंड्याच्या डोंगरांत कोंडून टाकलें. त्यानंतर गोवळकोंडेकरांनीं ६ लाख होन खंडणी भरल्यावर त्यांचा घेतलेला मुलूख विजापूरकरांनीं सोडला (प. सा. सं. खंड १, पृ. १३३). ही लढाई शहाजीच्या पराक्रमामुळेंच विजापूरकरांनीं जिंकली व त्यायोगानें त्याचें विजापूर दरबारांतील वजन वाढलें असें जयराम पिंडे म्हणतो.

श्रीरंगाचा शेवट

विजयनगरचा राजा श्रीरंगराय याची इस्लामी सत्तेशीं टक्कर देण्याची धडपड अद्यापि चालूच होती. त्याच्या राज्याचा पूर्वभाग व पेनुकोंडा गेल्यावर त्यानें म्हैसूर संस्थानाचा आश्रय करून हिंदु राजांची आघाडी उभारण्याचा प्रयत्न केला. त्यानें म्हैसुरी सैन्याच्या मदतीनें गेलेला कांहीं मुलूख परत घेतला व विजापूरकरांपासून वेलोरहि घेतलें. पण विजापूरकरांनीं त्याजबरोबर लढून तें परत मिळविलें. त्यानंतर विजापूरकरांबरोबर तह होऊन त्यांत त्यांजकडे चंद्रगिरी व कांहीं प्रदेश एवढेंच शिल्लक राहिलें. गोवळकोंड्याचाहि त्यानें धुव्वा उडविला होता, पण मदुरेच्या त्रिमल नायकानें त्याचा विश्वासघात केल्यामुळें श्रीरंगाचा फडशा पडून त्याला आयुष्याचे शेवटचे दिवस वनवासांत काढावे लागले.

दोन शाह्यांची दुर्दशा

सन १६५४ ते ५८ पर्यंत कर्नाटकांत मोठी अशी लढाई झाली नाहीं. कारण गोवळकोंडेकर व विजापूरकर हे त्या काळांत आपआपल्या फिकिरींत

होते. गोवळकोंड्याचा खंदा सेनापति काय तो मीरजुम्ला. त्याच्या कर्तबगारीवर कुतुबशहाची सारी भिस्त. पण त्यास सत्ताभिलाष उत्पन्न होऊन त्यानें कुतुबशहास न जुमानतां कर्नाटकांतील जिंकलेल्या मुलुखांत आपलें वेगळें राज्यच स्थापलें. तो फुटून निघाल्यामुळें कुतुबशाही लुळी झाली. दक्षिणेची अशी हवाल तर उत्तरेकडून मोगलांचें आक्रमण. त्यांनीं कुतुबशहाचा मुलूख लुटून तिकडूनहि त्याचें सामर्थ्य खची केलें. विजापुरांत राज्यक्रांति झाली. तेथील सुलतान महमदशहा बरेच दिवस अंथरुणावर खिळून पडला होता. तो ४ नोव्हेंबर १६५६ रोजीं मरण पावला. त्याच्यामागून गादीवर बसलेला अलीशहा अवघा १८ वर्षांचा असून राज्यकारभार बडीसाहेबीण हिच्या तंत्रानें चालू लागला. अर्थात् 'अबला यत्र प्रबला' व 'बालो राजा' अशी स्थिति विजापुरांत झाली. औरंगजेब दक्षिणेचा सुभेदार असून त्यानें विजापुरी सरदारांवर लांचेचा प्रयोग चालवून त्यांच्यांत फूट पाडली व विजापूरचा मुलूख जिंकण्यास सुरुवात केली. त्यानें कल्याणीच्या किल्ल्यास वेढा घालून तो घेतला. पश्चिमेस शिवाजीचें नवेंच संकट उद्भवून शिवाजी तिकडून विजापुरी मुलूख कुरतडूं लागला. अशा पेंचांत सांपडलेल्या आदिलशाहीस सर्वांत मोठा शत्रु जो औरंगजेब त्याजपासून प्रथम जीव बचावणें भाग होतें. त्यासाठीं आदिलशहास ता. २४ ऑगस्ट १६५७ रोजीं औरंगजेबाशीं तह करून त्यास बिदर, कल्याणी, परिंडा, त्याभोंवतालचा भाग, निजामशाही कोंकणांतील किल्ले व वांगणी परगणा आणि त्यावर दक्षिणा म्हणून १॥ कोट रुपये खंडणी द्यावी लागली. या धक्क्यानें आदिलशाही सत्ता फारच दुर्बल झाली.

आदिलशहाचें कर्नाटकांतील धोरण फार सदोष होतें. त्याचे सेनापति कर्नाटकावर वारंवार स्वाऱ्या करीत, पण त्यांनीं ज्या मुलखावर स्वाऱ्या केल्या तो मुलूख पूर्णपणें कधींच जिंकला नाहीं. तेथील नायक व पाळेगार यांना जिवंत ठेवण्यांत येई. सेनापतीचें लक्ष मुलूख खालसा करण्यापेक्षां खंडणी उकळणें व लूट करणें यावर असे. कारण त्यांत त्यांस ताबडतोब धनलाभ होऊन मुलखाचें रक्षण करण्याची जोखीम घ्यावी लागत नसे. या कारणानें अवशिष्ट नायक, राजे वा पाळेगार पुनः डोकें वर काढीत व त्यांच्या पारिपत्यासाठीं पुनः सरदारांना धांवपळ करावी लागे.

संभाजीचा मृत्यु

हेंच कार्य शहाजी वरील काळांत सुभेदार या नात्यानें कर्नाटकांत करीत होता. त्यानें कांहीं पाळेगारांचीं बंडें मोडलीं. पण कनकगिरीचा पाळेगार जरा डोईजड भेटला. तेव्हां त्याजवर विजापुराहून अफजलखानास पाठविण्यांत आलें. त्याच्या मदतीस बेंगळुराहून संभाजी गेला. या लढाईत संभाजी तोफेचा गोळा लागून ठार झाला. त्या वेळीं अफजलखानानें संभाजीस जरूर ती मदत न केल्यामुळें शहाजीचा खानावर फार रोष झाला. त्यानें कनकगिरीवर जाऊन तो किल्ला सर केला.

मदुरेचा नायक त्रिमल आतां मरण पावला असून त्याची जागा मुतु विराप्पा यानें भरून काढली होती. त्यानेंहि आदिलशाहीस आलेल्या दुर्दशेचा फायदा घेण्यासाठीं आदिलशाहीचें जूं झुगारून दिलें, त्रिचनापल्लीभोंवतीं तटबंदी केली व युद्धाची सिद्धता केली. त्याचें बंड मोडण्यास शहाजी व मुल्ला महमद हे त्रिचनापल्लीवर चालून गेले, पण त्यांचा मुतु विराप्पा यानें पराभव केला. या विजयानंतर मुतु मरून त्याचें कार्य सन १६६० त चोकनाथ नायक यानें पुढें चालविलें. त्याला विजयनगरच्या गत साम्राज्याचा अभिमान असल्यामुळें त्याच्या पुनरुद्धारासाठीं त्यानें तंजावर, मदुरा व जिंजी येथील राजांची जूट केली. या वेळीं जिंजीचा किल्ला शहाजीच्या ताब्यांत होता. तेथून त्यास हुसकण्याकरितां मदुरेचा सेनापति लिंगम नायक ७० सहस्र योद्धयांचें करोल सैन्य घेऊन आला. पण शहाजीनें त्याची मूठ दाबून त्यास वाटेस लावण्याचा प्रयत्न केला; तरी लिंगम नायकानें शहाजीचा तंजावरावर जाऊन मोड केला. मात्र मूठ दाबण्याचा उपयोग एवढाच झाला कीं, जिंजीचा किल्ला शहाजीकडेच राहिला.

गोवळकोंड्यांत आतां कांहीं त्राण राहिलें नाहीं असें पाहून शहाजीनें कुतुबशाहीच्या कक्षेंतील कर्नाटकाचा पूर्व किनारा जिंकण्याचें ठरवून त्याप्रमाणें फुलचेरी जवळील (पांदेचरी) तेगनापट्टणास वेढा घालून तें शहर २४ फेब्रुवारी १६६१ रोजीं घेतलें व ऑक्टोबर १६६१ त पोर्टोनोव्हो घेऊन मीरजुम्लाची पूर्व समुद्रावरील सत्ता बुडविली.

शहाजीचा मृत्यु

शहाजी कर्नाटकांत एकामागून एक जय मिळवीत असल्यानें त्याज-

वर आदिलशहाची बहाल मर्जी बसावयास पाहिजे होती. पण महाराष्ट्रांत शिवाजीनें धुमाकूळ घातल्यामुळें त्याचा बाप शहाजी याचीहि त्यास भीति वाटूं लागली. या वेळीं शहा विजापूर सोडून बंकापुरास राहिला होता. त्यानें शहाजीस कैद करून आपल्यासमोर आणलें (प. सा. स. खं. १, पृ. २३२). पण शहाजीच्या राजनिष्ठेविषयीं खात्री पटवून घेतल्यावर अलीशहानें पुनः त्यास कर्नाटकांतील कामगिरीवर पाठविलें. त्यानंतर सन १६६४ त शिमोगा जिल्ह्यांतील पाळेगारांचा बंदोबस्त करण्यास शहाजी गेला; पण तुंगभद्रेच्या कांठीं बसवपट्टणाकडे शिकारीस गेला असतां २३ जानेवारी १६६४ रोजीं घोड्यावरून पडून मरण पावला. मरणसमयीं त्याच्या ताब्यांत बेंगळूर, बाळापूर, कोलार, नंदी, बसवपट्टण, आरणी, जिंजी, तेगनापट्टण, हुसकोट व पोर्टोनोव्हो हा प्रदेश होता. त्याच्यामागून त्याचा पुत्र व्यंकोजी कर्नाटकाचा सुभेदार झाला. त्यानें पुढें तंजावराचें राज्य जिंकून आपल्या जहागिरीस जोडलें.

शहाजीचें मूल्यमापन

मरणसमयीं शहाजीचें वय सत्तरीच्या घरांत असावें. त्याच्या जन्मतिथीविषयीं एकवाक्यता नसल्यामुळें मृत्युसमयींचें त्याचें नक्की वय सांगणें शक्य नाहीं. तथापि वृद्धावस्थेंत तो लढाया मारीत होता व घोड्यावर बसून शिकारीस जात होता यावरून तो प्रकृतीनें शेवटपर्यंत सुदृढ होता. त्यानें वयाच्या विसाव्या वर्षी शिपाईगिरीचा पेशा पत्करला असें मानल्यास तो तब्बल ५० वर्षें म्हणजे अर्धशतक घोड्यावर खोगीर ठेवून मुलूखगिऱ्या करीत असल्याचें ओघानेंच कबूल करावें लागतें. शिपाईगिरीचें जीवित कष्टाचें, हालअपेष्टेचें व चिंतेचें. तें त्यानें अर्धशतक व्यतीत केलें. यावरून तो काटक, कष्टाळू व प्रकृतीनें निकोप होता. त्याचें सर्व आयुष्य मुसलमानांची सेवा करण्यांत गेलें. तो शूर, पराक्रमी व इमानी असतांहि केवळ हिंदु म्हणून निजामशाहींत काय किंवा आदिलशाहींत काय त्याजकडे सतत दुय्यम स्थान व परावलंबित्व राहिलें. तें त्याच्या मानी स्वभावास न मानवल्यामुळें त्यानें निजामशाहीच्या अखेरच्या काळांत मूर्तुजाशहासारख्या लहान मुलास गादीवर बसवून दोन वर्षें का होईना स्वतंत्रपणें वावरण्याचा प्रयत्न केला. पण तो अयशस्वी ठरून त्याच्या नशिबांतील ताबेदारी

शेवटच्या क्षणापर्यंत सुटली नाहीं आणि स्वतः स्वधर्मनिष्ठ असूनहि कर्नाटकांत हिंदूंचीं राज्यें बुडवून तीं आदिलशाहीस मिळवून देण्याचा अनिष्ट प्रसंग त्याजवर आला. शिवाजी मोठा होऊन सन १६४५ पासून हिंदूंचें स्वतंत्र राज्य स्थापण्यांत आपलें बुद्धिसर्वस्व व शक्तिसर्वस्व खर्च करीत होता. हा त्याचा उद्योग १९ वर्षेंपर्यंत सतत डोळ्यापुढें दिसत असतां त्याच काळांत शहाजी कर्नाटकांतील हिंदूंचीं राज्यें बुडवीत होता, हा ठळक विरोध डोळ्यांत भरल्याशिवाय राहत नाहीं.

यावरून म्हणावेंसें वाटतें कीं, इतर अनेक मराठे सरदार मुसलमानांच्या अर्थात् आदिलशहाच्याहि पदरीं होते, त्यांपैकींच शहाजी हा एक होता. मात्र तो इतरांपेक्षां शौर्यानें, पराक्रमानें व कर्तृत्वानें पुष्कळच श्रेष्ठ होता. पण कोणाचीहि ताबेदारी पत्करून आपलें ऐहिक ऐश्वर्य वाढवावयाचें हें एकच ध्येय इतर मराठे सरदारांप्रमाणें शहाजीचेंहि होतें. तथापि तो त्यांजपेक्षां अधिक स्वाभिमानी असल्यामुळें वारंवार सोसाव्या लागणाऱ्या अपमानानें अस्वस्थ होई व अशाच मनाच्या अस्वस्थ स्थितींत त्यानें आदिलशहाचा नोकर असूनहि गोवळकोंडेकरांच्या पदरीं जाण्याचा अनेकवार अयशस्वी प्रयत्न केला. इतकेंच काय पण आपणांप्रमाणें आपला वडील पुत्र संभाजी यानेंहि आदिलशाहींतील जहागिरीवर पाणी सोडून बाहेर पडावें व मोगल बादशहाकडे मनसबदारी करावी यासाठीं मुरादबक्षाकडे त्यानें वशिला लावला.

शहाजीला विशेष जाच सोसावा लागला तो शिवाजीनें विजापूरकरांविरुद्ध बंडाळी सुरू केल्यापासून. त्याजविषयीं त्यानंतर आदिलशहास व त्याच्या मुसलमान सरदारांस आणि मुत्सद्द्यांस संशय येऊं लागला. तेव्हां आपलें इमान शाबीत करणें शहाजीस फारच जड गेलें असलें पाहिजे. त्यामुळेंच त्याजवर दोनदां कैदेची पाळी आली. भारतांत इंग्रजी राज्य असतां बाप सरकारी नोकरींत मोठ्या हुद्द्यावर व मुलगा स्वराज्याच्या चळवळींत अशीं उदाहरणें हमेशा घडत. त्या वेळीं सरकारी नोकरींतील देशी अधिकाऱ्यांची जी तारांबळ उडत असे तीच, किंबहुना त्याहूनहि अधिक शहाजीची उडत असली पाहिजे. कारण इंग्रज वरिष्ठ अंमलदार एकंदरींत समंजस, सुशिक्षित व विचारी असल्यामुळें हाताखालच्या

नोकराच्या राजनिष्ठेविषयीं एकदां खात्री पटली म्हणजे त्याला धारकीं धरीत नसत. तशी वागणूक आडदांड, प्रायः अशिक्षित व धर्मवेड्या मुसलमान वरिष्ठांची शहाजीच्या बाबतींत कशी राहावी? या दृष्टीनें शहाजीस शेवटच्या सोळा वर्षांत उत्तरोत्तर अधिकाधिक जाच सोसावा लागला असेल यांत शंका नाहीं.

भोसले हे आपणांस उदेपूरच्या राजघराण्यापैकीं म्हणवितात. त्यांतील राणा सज्जनसिंग इ. स. १३२० च्या सुमारास आपल्या कांहीं अनुयायांसह दक्षिणेंत नशीब काढण्यास आला व हसनगंगू या ब्राह्मनी राज्यसंस्थापकाच्या नोकरींत राहिला. त्याजपासून शहाजीचा आजा बाबाजी याजपर्यंत भोसल्यांच्या किती तरी पिढ्या महाराष्ट्रांत गेल्या. त्यांतील सर्व पुरुष मुसलमानांच्या सेवाधर्मांतच वाढले. सुमारें अडीचशें वर्षें मुसलमानांच्या सेवेंत गेल्यामुळें त्यांजवर इस्लामी संस्कृतीचीं किती पुटें चढलीं असतील याची कल्पना करणेंहि शक्य नाहीं. त्यांचा पोषाख, त्यांचे विचार व त्यांचे आचार त्यांच्या अन्नाबरोबर त्यांच्या ठिकाणीं पूर्णपणें भिनले असतील. खुद्द शहाजी व त्याचा भाऊ शरीफजी हीं नांवेंच मुळीं मुसलमानी असून शरीफजी हा तर मुळीं एका मुसलमान अवलियाच्या कृपेनेंच झाला होता असें म्हणतात. इतक्या प्रतिकूल वातावरणांत त्यांनीं स्वधर्म व स्वधर्मनिष्ठा टिकविली हेंच आश्चर्य होय.

शहाजीस जिजाबाईपासून सहा पुत्र झाले असें परमानंद म्हणतो. त्यांपैकीं संभाजी व शिवाजी हे दोघेच जिवंत राहिले. शिवाजी शहाजीस त्याच्या वयाच्या ३६ व्या वर्षाच्या सुमारास झाला. त्या वेळीं जिजाबाई चौतीस वर्षांची होती. शहाजीची दुसरी भार्या तुकाबाई ती मोहित्यांची कन्या. तिजबरोबर शहाजीचें लग्न केव्हां झालें हें नक्की समजत नाहीं. बहुधा तें इ. स. १६२६ च्या आंत-बाहेर झालें असावें. अर्थात् त्या लग्नांत शहाजी ३२ वर्षांचा असावा. त्याच्या या वयाच्या मानानें शहाजी व तुकाबाई यांच्या वयांत १८–२० वर्षांचें तरी अंतर असलें पाहिजे. म्हणजे जिजाबाईपेक्षां तुकाबाई पुष्कळच तरुण होती. त्यामुळें ती शहाजीची दुसरी बायको या दृष्टीनें अधिक लाडकी असणें स्वाभाविक होय. तिजपासून

व्यंकोजी झाला. याशिवाय तत्कालीन चालीप्रमाणें त्यास रक्षापुत्र भिवजी, प्रतापजी, संताजी व रायभानजी असे चौघे होते.

शहाजीच्या काळांत शिक्षणास महत्त्व नव्हतें. सर्वसामान्य ब्राह्मणांनाहि लेखन, वाचन व हिशेब यांपलीकडे ज्ञान नसे. संस्कृत भाषेत प्रवेश केल्याशिवाय विद्वत्तेच्या क्षेत्रांत प्रवेश होत नसे. आणि संस्कृत भाषा फार अवघड व ती शिकल्यापासून आर्थिक लाभ अगदींच अल्प या कारणानें ब्राह्मणांतीलहि विरळा माणसें त्या मार्गास जात. ही जर ब्राह्मणांची स्थिति तर मराठा जातीविषयीं बोलावयासच नको. या दृष्टीनें शहाजीचें शिक्षण लिहिणें, वाचणें व हिशोब यांपलीकडे गेलें नसेल. मात्र तो विद्वानांचा पोशिंदा व मुसलमान अमीर-उमरावांप्रमाणें गायन, वादन व नर्तन यांचा भोक्ता असल्यामुळें त्याजपाशीं विद्वान् व गुणीजन आश्रयार्थ येत व तो त्यांचा उदार हस्तानें परामर्श घेई. तसाच तो मुसलमानी रीतरिवाजांत वाढल्यामुळें ऐष-आरामी व कांहींसा चैनीहि बनला असावा (सनदा-पत्रांतील माहिती, पृ. १४५). तो पुण्यास असतां त्याची सुलतान नरुद्दीन ही कलावंतीण होती. तिला त्यानें अर्धा चावर जमीन इनाम दिली होती. याच वातावरणांत शहाजीचे दोघे पुत्र संभाजी व व्यंकोजी लहानाचे मोठे झाले. ते आदिलशाही राज्यांत सरदार या नात्यानें जेवढें मर्यादित कार्यक्षेत्र मिळालें त्यांतच अखेरपर्यंत संतुष्ट राहिले. ते विशेष अशा कोणत्याच गुणानें चमकले नाहींत. शहाजीचा तिसरा पुत्र शिवाजी हाहि बेंगळुरास प्रौढपणापर्यंत बापाच्या तालमींत वाढला असता तर त्यानें जें पुढें अखिल भारतांत अलौकिक कार्य केलें तें त्यास करतां आलें असतें कीं नाहीं याविषयीं मन साशंक होतें. या दृष्टीनें शहाजीस शिवाजीला अगदीं कोवळ्या वयांत मावळांतील स्वतंत्र वातावरणांत पाठविण्याची सुबुद्धि सुचली, हें महाराष्ट्राचेंच काय पण अखिल भारताचें महद्भाग्य समजलें पाहिजे.

प्रकरण चौथें

शिवाजीचें बालपण

भवो हि लोकाभ्युदयाय तादृशाम् ।

महाराष्ट्रांत आगमन

शिवाजीचा जन्म फाल्गुन वद्य ३ शके १५५१ (ता. १९ फेब्रुवारी १६३०) रोजीं शिवनेरीवर झाला. त्याचें वर्णन शिवभारतकार परमानंद यानें पुढीलप्रमाणें केलें आहे : "त्याचे खांदे उंच, नेत्र कमलासारखे, शरीर निकोप, वर्ण सुवर्णासारखा, नासिका ताज्या पळसाच्या फुलासारखी, मुख हंसरें, स्वर मेघासारखा गंभीर, छाती विशाल व बाहु मोठे होते." त्याच्या जन्मकाळीं शहाजी शिवनेरीवर नसून खानदेशांत दर्याखान पठाणाशीं लढण्याकरितां गेला होता. अशा रीतीनें महाराजांच्या जन्मालाच लढाई लागली होती ती मरेपर्यंत पुरून उरली. भोसल्यांचें कुळच उच्च, खानदानीचें व अनेक पिढ्या जहागीरदारांचें. त्यांचा शरीरसंबंधहि महाराष्ट्रांतील उच्च कुलशीलसंपन्न व श्रीमान् मराठे घराण्यांशीं झालेला. त्या कारणानें शेलक्या व सुंदर मुली त्यांच्या घरीं पडाव्या व त्यांजपासून सुंदर, उमदी व सुदृढ प्रजा जन्मास यावी हें स्वाभाविक होय. या दृष्टीनें परमानंदानें महाराजांचें रेखाटलेलें चित्र काल्पनिक व अवास्तव नसून हुबेहूब असलें पाहिजे यांत शंका नाहीं. कारण त्यांना परमानंदानें समक्ष पाहिलें होतें व त्यांचीं आज उपलब्ध असलेलीं चित्रें त्या वर्णनास धरूनच आहेत. पुण्यास नव्या पुलापलीकडे शिवाजीनगरांत उभा केलेला शिवाजीमहाराजांचा पुतळा परमानंदानें आपल्या डोळ्यांनीं पाहिलेल्या महाराजांचेंच दर्शन आपणांस घडवितो असेंच म्हटलें पाहिजे.

महाराज जन्मले त्या वर्षीं महाराजांचे ग्रह उच्चीचे असले तरी महाराष्ट्राचे ग्रह उच्चीचे नव्हते. कारण त्या वर्षीं महाराष्ट्रांत उग्र स्वरूपाचा दुष्काळ पडला असून लोक आपआपलीं गांवें सोडसोडून जिकडे पोट भरेल तिकडे निघून गेले होते. पुण्यापासून दोन-एक कोसांवर महंमदवाडी

नांवाचें एक खेडें आहे. तेथें जाऊजी बिन हरजी व बापूजी बिन खेऊजी घुले हे राहत असून त्यांचें पाटिलकीच्या वतनाबद्दल भांडण लागलें होतें. तें मायेवाडी तर्फ कऱ्हे-पठार येथील मजालसीनें ६ डिसेंबर १६३३ रोजीं मिटविलें. त्या संबंधाचा कबूल कतबा झाला त्यांत त्या दुष्काळाची स्थिति व दादाजी कोंडदेव यांनीं केलेली कामगिरी सांगितली आहे. त्यावरून वरील दुष्काळाची कल्पना येते. ती हकीकत अशी : "बापू बिन खेऊ पाटील आपला भाऊ दुकाळ पडिला म्हणून पांढरी टाकून गेले. यावर वडील मेले. आम्ही वांचलों. सुकाळ झाला. यावरी रा. दादाजी कोंडदेऊ सुभेदार दिवाण झाले. याणीं मुलूक लाविला. देशमुख व देशकुलकर्णी यांस ताकीद केली कीं गांव लावणें. आपणांस कौल देऊन गांव लाविला. येक दोनी वेळां तुज आणावयास आलों. तूं बोललास मागें जेंसें चालिलेंस तैसेंच चालशील व गोतास लिहून देशील तर येईन. गोतास लिहून दिलें कीं, चुलत्याच्या व बापाच्या तकसिमेपैकीं निमी तुज दिली. वडील मान आपला. धाकटा मान तुझा" (प. सा. सं. खं. १, पृ ८३).

याच सुमारास विजापूरचा सेनापति मुरार जगदेव हा शहाजीची जहागीर लुटावयास व पुणें जाळावयास आला. त्याविषयीं ४ जुलै १६३१ रोजीं, वाल बिन दाद पाटील लोणकर मोकदम मुंढवें यानें, रामाजी होनदेव होनप देशपांडे तर्फ हवेली परगणे पुणें यांस पत्र लिहिलें आहे. त्यांत म्हटलें आहे : "मौजे मजकूरची मोकदमी आपली मिरास. संचणी-उगवणीबद्दल निमी मोकदमी लाहूजी लोणकरास वडिलीं दिली. यावर दुकाळ पडला. इदिलशाही नामजादी पुणा येऊन बसली. पुणें लुटून जाळून तलक केलें. कोट पाडिला. मग निमी मोकदमी तुम्हांस १०४॥ होनांस दिली असे" (प. सा. सं. खं. १, पृ. ७५).

शिवाजीस जन्मून वर्ष दोन वर्षे झालीं नसतील तोंच त्यास तेथून शहाजीनें संगमनेराजवळ पेमगिरी तथा भीमगड यावर नेऊन ठेवलें. भीमगडावर शिवाजीचा पाळणा हलूं लागला नाहीं तोंच तेथून जवळच कोंकणांत ठाणें जिल्ह्यांतील माहुलीच्या किल्ल्यावर त्याची रवानगी झाली. मांजरी जशीं आपलीं पिलें तीन ठिकाणीं चाळविते तशीच शिवाजीची स्थिति झाली. म्हणजे जन्मापासून पहिल्या सात वर्षांत महाराजांचें रक्षण

मावळ व कोंकण यांतील किल्ल्यांनींच केलें. अखेर सन १६३७ त निजामशाहीस तिलांजली देण्याची पाळी आल्यावर शहाजी शिवाजीस त्याच्या सातव्या वर्षी विजापुरास घेऊन गेला. विजापुरास कुटुंब व परिवार ठेवून शहाजी कर्नाटकांत मोहिमेवर गेला व त्यास सन १६३९ त बेंगळूरची जहागीर मिळाली. तथापि तेथें कायम राहण्याची सोय लागण्यास १–२ वर्षें तरी लागलीं असतील. म्हणजे सन १६४०–४१ च्या सुमारास शिवाजी आपल्या मातुःश्रीसुद्धां बेंगळुरास राहूं लागला असावा. बारा वर्षांचा झाल्यावर शिवाजीस सन १६४१–४२ च्या सुमारास पुणें परगण्याचा पोट-मोकासा देऊन शहाजीनें बेंगळुराहून पुण्यास पाठविलें. या एकंदर हालचालींचा विचार करतां कोणत्याहि एके ठिकाणीं शिवाजीचें बूड वर्ष दोन वर्षांहून अधिक काळ टिकलेलें दिसत नाहीं. अशा अस्थिर स्थितींत शहाजीस शिवाजीच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यास कितपत फावलें असेल याविषयीं शंका आहे.

ही स्थिति एकट्या शिवाजीचीच काय, पण त्याच्यापूर्वी शहाजी, मालोजी यांचीहि असल्यास नवल नाहीं; त्या दृष्टीनें पुस्तकी शिक्षणाच्या बाबतींत सर्वांचीच आबाळ झाली असली पाहिजे. शिवाजी बेंगळूरास व इतरत्र असतां त्याचें शिक्षण शहाजीच्या नजरेखालीं किती झालें याविषयीं परमानंद लिहितो : ‘ शिवाजी सात वर्षांचा झाल्यावर त्यास मूळाक्षरें शिकविण्यांत आलीं. गुरुजी पहिलें अक्षर लिहिण्यास सांगतात तोंच हा दुसरें अक्षर लिहून दाखवीत असे. ’ यावरून वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत त्यास लिहितां-वाचतां चांगलें येऊं लागलें असेल. अर्थात् त्या काळांत अभ्यासाची हल्लींप्रमाणें क्रमिक पुस्तकें नसून बखरी व मुलांकरितां लिहून ठेवलेल्या पौराणिक कथा याच त्याच्या वाचण्यांत आल्या असतील. त्या वाचून त्यास पूर्वजांची, तशीच रामकृष्णादि अवतारी पुरुष व भीमार्जुनादि वीर पुरुष यांच्या थोर कृत्यांची स्थूल माहिती झाली असेल.

परमानंदानें शिवाजीची वर्णिलेली बौद्धिक तीव्रता अतिरंजित असली तरी त्याचें बुद्धिवैभव असामान्य होतें यांत शंका नाहीं. त्याची बाराव्या वर्षींच पुण्याकडे रवानगी करण्यांत घाई झाली असें कोणासहि वाटेल. पण तत्कालीन मुलें हल्लींपेक्षां लवकर व्यवहार पाहूं लागत. शिवाय शहाजीनें

इतकी घाई केली यास घरगुती परिस्थितीहि कारण झाली असेल. जिजाबाई व तुकाबाई या दोघी सवती, त्यांचें एकमेकींशीं पटत नसेल व शहाजी बाहेर मोहिमांवर असतां घरीं त्यांचीं भांडणेंहि विकोपास जात असतील. जिजाबाईचीहि आतां पंचेचाळिशी उलटली असून ती चांगली पोक्ती-पुरवती बायको झाली होती. तिला पांच-सहा मुलेंहि झालीं होतीं व त्यांपैकीं शिवाजी हा तिचें शेंडेफळहि असेल. सारांश, तिचा संसार पुरा झाला होता. तिच्या पुढच्या चरित्रावरून ती मोठी कारभारीण बायको दिसते. अशा अनुभवी, पोक्त व कार्यकुशल मातेच्या नजरेखालीं ठेवण्याची व्यवस्था करून शिवाजीला शहाजीनें पुण्यास पाठविण्याचें ठरविलें यांत त्याचें व्यवहारचातुर्य व विचारशीलताच दिसून येते.

शिवाजीची पुण्याकडे रवानगी करतांना मोठ्या जहागीरदाराच्या इतमामास शोभेल असाच लवाजमा त्याजबरोबर दिला होता. हत्ती, घोडे, अमात्य व अध्यापक यांसह तो पुण्यास जावयास निघाला. बेंगळूर व पुणें यांजमधील अंतर ६५० मैलांचें आहे. त्याचा प्रवास डोलींतून, पालखींतून वा हत्तीच्या अंबारींतून व्हावा हें स्वाभाविक होय. अशा प्रवासांत त्या काळीं दररोज बारा कोसांची मजल मारण्यांत येई. त्या हिशेबानें पाहिल्यास शिवाजीला पुण्यास येण्यास सुमारें एक महिना लागला असेल. हल्लींचा पुणें-बंगलोर रस्ता आहे, त्यास धरूनच पूर्वीचा मार्ग असल्यानें सह्याद्रि डाव्या हातास ठेवून त्याची मार्गक्रमणा एक महिना-भर चालू होती. त्या अवधींत त्यानें वाटेनें किती तरी अरण्यें, वाऱ्या व गांवें पाहिलीं असतील. तुंगभद्रा, मलप्रभा, घटप्रभा, कृष्णा, नीरा इत्यादि नद्यांच्या पुण्योदकानें त्यानें स्नान केलें असेल, तेंच पुण्योदक प्राशन करून आपला देह अन्तर्बाह्य पवित्र केला असेल व त्याजवर यावनी संस्कृतीचीं चढलेलीं पुटें झाडून टाकून स्वतंत्रतादेवीच्या मंगलमय मूर्तीस निवास करण्यास आपलें हृदयमंदिर निर्मळ व पावन करून ठेवलें असेल.

पुणें हें शहाजीच्या राजधानीचें ठिकाण असल्यामुळें तेथें त्यानें सन १६३६ त लालमहाल नांवाचा वाडा बांधला होता. शिवाजीस आपल्या लवाजम्यासह राहण्यास तो वाडा पुरेसा होता. तो पुण्यास आल्यावर जिकडे-तिकडे मराठीच मराठी. बेंगळूरच्या वातावरणांतून

बाहेर पडल्यानंतर जिकडून तिकडून मराठी ही मायबोली कानीं येऊं लागतांच ती त्याला संगीताप्रमाणें मधुर वाटली असेल. बेंगळूर व पुणें येथील हवापाणी जवळ जवळ सारखें असलें तरी पुण्याची सर बेंगलुरास थोडीच येणार आहे! त्या वेळचें पुणें अगदीं लहानच होतें. त्याच्या शेजारून वाहणाऱ्या मुठा नदीच्या तीरावरून मावळतीस नजर टाकली असतां किती तरी खोल खोरें दिसत होतें व त्यांतून बारमास थंड वाऱ्याचे लोटच्या लोट अंगावर येत होते. त्या खोऱ्यांतून आंत नजर फेकली कीं ती, आतां ज्यांना आपण तोरणा व राजगड म्हणतों, त्या पर्वतापाशीं जाऊन थांबत असे.

पुणें कांहीं झालें तरी राजधानीचें गांव. त्याला परचक्राची भीति. तशी भीति भोंवतालच्या खेड्यांना नसल्यामुळें कात्रजच्या घाटापलीकडचें खेडेबारें पसंत करून व तेथेंहि एक वाडा बांधून कधीं त्यांत तर कधीं पुण्यांत शिवाजीस ठेवण्याचा परिपाठ दादाजीपंतानें पाडला. खेडेबारें हें नांवाप्रमाणेंच अगदीं खेडें. तेथें घरांत वा घराच्या उंबरठ्यावर बसूनसुद्धां भोंवतालीं उंच उंच माना करून उभ्या असलेल्या पर्वतश्रेणी डोळ्यांना दिसून त्या भावनामय शिवाजीच्या अंतःकरणांतील सुप्त आकांक्षांना चेतना देत. तो इंद्राच्या ऐश्वर्यासहि लाजविणारा पुरंदर किल्ला व सिंहाप्रमाणें उग्र व धीरगंभीर रूप धारण करणारा कोंढाणा किल्ला त्यास आपल्याकडे येण्यास खुणावी आणि त्या कोंढाण्याकडून रुणझुणू करीत जाणारी शिवगंगा त्यास स्वातंत्र्याचा मुरलीरव ऐकवी. अशा त्या नादब्रह्मांत देहभान विसरलेल्या शिवरायाला आपल्या 'आकांक्षांपुढति तिथें गगन ठेंगणें' वाटलें असल्यास नवल काय?

शिवाजी पुणें प्रांतांत राहावयास आल्यापासून त्याचा पुढील पांच वर्षांचा काळ शांततेचा गेला. युद्धें चालूच असलीं तर तीं कर्नाटकांत; त्यामुळें या काळांत शिवाजीला आपली स्वातंत्र्ययुद्धाची पूर्वतयारी करण्यास पुष्कळ फुरसत मिळाली. आई राजकारणांत मुरलेली व दादाजीपंत कारभारांत वाकबगार. अशा दोघांच्या नजरेखालीं शिवाजी लहानाचा मोठा होत चालला होता. पुण्यास आल्यावर 'घोड्यावर बसून दौडीला जाणें, उडी मारणें, तरवार, धनुष्य, भाला, पट्टा चालविणें, मल्लयुद्ध खेळणें

निशाणबाजी करणें इत्यादि युद्धविषयक शिक्षण त्यास देण्यांत आलें. त्याप्रमाणेंच श्रुति, स्मृति, पुराणें, भारत, रामायण व शास्त्रें यांचा अभ्यास त्याजकडून करविण्यांत आला ' (शिवभारत).

शिवाजीची साक्षरता

शिवाजीला संस्कृत भाषेचें ज्ञान श्रुति-स्मृतींसारखे ग्रंथ जाणण्याइतकें झालें होतें, हें शिवभारतकाराचें विधान खरें वाटत नाहीं. इतकी जर त्याची तयारी झाली होती तर त्याचा उपनयनसंस्कार त्या वयांत कां करण्यांत आला नाहीं अशी शंका साहजिकच येते. कारण तो संस्कार झाला असता तर त्यास धरून वेदशास्त्रांचा अभ्यास त्याजकडून घडणें क्रमप्राप्त होतें. मात्र शिवभारतकारांच्या म्हणण्याचा अर्थ इतकाच घ्यावयाचा कीं, जिजाबाईपाशीं भारत-रामायणादि पुराणें सांगण्यास जे शास्त्री पंडित ठेवले असतील त्यांच्या तोंडून त्या व इतर ग्रंथांचें ज्ञान त्यास होऊन शिवाजी बहुश्रुत झाला असेल. मात्र ग्रँट डफसारखे इतिहासकार शिवाजीला मुळीं लिहितां-वाचतां येत नव्हतें असें प्रतिपादितात, तें प्रतिपादन निखालस खोटें असलें पाहिजे. त्याचें एक कारण, जिजाऊ व दादाजी यांनीं त्यास महाराष्ट्रांत आल्यावर पुढील पांच वर्षांत अगदीं निरक्षर राहूं दिलें असेल हें शक्य वाटत नाहीं व त्याची साक्षरता सिद्ध करणारा पत्रव्यवहारहि आतां सुदैवानें पुढें आला आहे.

शिवाजी मोठेपणीं राज्यकर्ता झाल्यावर त्याचा संबंध इंग्रजांसारख्या परराष्ट्रीय लोकांशीं येऊं लागून त्यांचा परस्परांशीं राजकीय बाबतींत पत्रव्यवहार होऊं लागला, तेव्हां त्याची साक्षरता आपोआपच उघडकीस आली. शिवाजीनें राजापूर येथील रेव्हिंग्टन प्रभृति इंग्रजांना कोंकणांत वासोटा, सोनगड या किल्ल्यांवर अटकेंत ठेवलें होतें. तेव्हां रेव्हिंग्टन, टेलर्स व गिफर्ड यांनीं सुरतेच्या इंग्रज अधिकाऱ्यांना आपल्या सुटकेचा प्रयत्न शिवाजीकडे करण्याविषयीं पत्र लिहितांना शिवाजीच्या भोंवतालच्या ब्राह्मण मुत्सद्द्यांपासून सावध राहण्याचा इशारा देत म्हटलें आहे कीं, 'आपण शिवाजीकडे वकील पाठवाल त्यानें तें पत्र शिवाजीच्या स्वतःच्या हातीं द्यावें. हे ब्राह्मण त्यांना वाटेल तो मजकूर त्या पत्राकडून वदवितात' (प. सा. सं. खंड १, पृ. २०२). अर्थात् पत्रांत नसलेला मजकूर ते

पदरचा सांगतात! हें पत्र त्यांनीं १० जून १६६१ रोजीं लिहिलें आहे. त्यानंतरचें दुसरें पत्र रँडॉल्फ यानें त्यांची अटकेंतून सुटका झाल्यावर ता. ६ फेब्रुवारी सन १६६३ रोजीं राजापुराहून सुरतेस लिहिलें आहे. रेव्हिंग्टन-प्रभृतींची सुटका शिवाजीचा कोकणांतील सुभेदार रावजी पंडित यानें शिवाजीच्या हुकुमावरून केली. तो हुकूम शिवाजीच्या हातचा, शिक्क्याचा व त्याजवर त्याच्या हाताचा चंदनाचा छाप उठविलेला होता. तो त्यानें रँडॉल्फ-प्रभृतींस दाखविला. (Showing us a writing from his master with his own chop and others accustomary to it, as also the print of the Raja's hand on the top of the paper done with sandal.) प. सा. सं. खं. १, पृष्ठ २२०.

इंग्रजांनीं तिसरें पत्र ता. १० जानेवारी सन १६७७ रोजीं सुरतेहून मुंबईस लिहिलें आहे. या पूर्वीं शिवाजीनें राजापुरास केलेल्या लुटीबाबतींत इंग्रजांशीं तह करून त्यांना आपणांकडून यापुढें उपसर्ग पोंचणार नाहीं असें आश्वासन दिलें असतांहि त्याच्या सैन्यानें अथणीस इंग्रजांचें दुकान लुटलें. त्याविरुद्ध इंग्रजांनीं तक्रार केली तेव्हां शिवाजीनें इंग्रजांचें झालेलें नुकसान भरून देण्याचें व 'पुढें नीट वागण्याचें' कबूल करून तसें हुकूमहि सर्व सुभेदारांना पाठविलें. त्याजवर स्वतः राजा, पेशवा, अण्णाजी पंडित यांच्या सह्या होत्या (Signed by himself, Peshwa and Annajee), इत्यादि मजकूर या पत्रांत आहे (प. सा. सं. खं. २, पृ. ५६६). या तीनहि पत्रांवरून शिवाजीला लिहितां-वाचतां येत होतें याविषयीं शंका उरत नाहीं.

शिवाजी व जिजाबाई बेंगळुराहून पुणें प्रांतीं राहावयास आल्यावर त्यांचा मुक्काम कधीं पुण्यास व कधीं खेडेबारें येथें होत असे, या अर्थाचा मजकूर मागें लिहिला आहे. त्याला आधार खालील पत्रांत मिळतो. हें पत्र २ एप्रिल १६४६ रोजीं दादाजी कोंडदेव यांनीं विठ्ठल गिरमाजी हवालदार, शिरवळ यांस लिहिलें आहे. "रामाजी विठ्ठल देश-कुलकर्णी शिरवळ हा पुण्यास येऊन सौ. मातुःश्री जिजाऊसाहेब यांच्या समक्ष बोलला कीं, आपला व तिमाजी पुरुषोत्तम

यांच्या वतनाचा निवाडा गोत देऊन करावा. त्यावरून हें पत्र तुम्हांस लिहिलें आहे. तरी परगण्याचे देशमुख, पाटील व वतनदार यांचे माथा घालून निवाडा गोतन्यायें करणें. शिवापूरचे मुक्कामीं वाटणीचा महजर करून दिला आहे त्यावर जाऊं नये " (प. सा. सं. खं. १, पृ. १११). या पत्रांत शिवापूर म्हटलें तेंच खेडेबारें कसें, याचा उलगडा पुरंदरे दप्तर ३, पृ. १३० यावरील पत्रांत सांपडतो. हें पत्र सन १६५३ मधील म्हणजे शिवाजी पुण्यास राहावयास आल्यावर तेरा वर्षांनीं लिहिलें असल्यामुळें त्यांतील तात्पर्य तेवढेंच घेतलें पाहिजे. त्यांत म्हटलें आहे : " महाराज साहेबीं (शहाजी) मातुःश्री आऊसाहेबास व तुम्हांस (शिवाजी) खेडे-बारियास दादाजी पंतापाशीं पाठविलें. ते वेळेस कसबियामध्यें वाणियाचीं व बाजे मोहतर्फा कुळें यांचीं घरें मोडून तो जागा वाडियास केला व त्या कुळासाठीं शिवापूर पेठ वसावयाचा तह केला. " त्यावरून खेडेबारें या गांवाचें शिवापूर कसें झालें हें जसें कळून येतें तसेंच खेडेबारें येथील वाडा बांधून होईपर्यंत शिवाजीचा मुक्काम प्रथम पुण्यास होता हेंहि लक्षांत आल्याशिवाय राहत नाहीं.

दादाजी कोंडदेव

दादाजी कोंडदेव हा विजापूरकरांचा सुभेदार व शहाजीमहा-राजांचा दिवाण होता. शहाजीमहाराज विजापूरकरांचे सरदार व जहागीरदार असल्यामुळें दादाजीपंतास दोघांची सेवा एकाच वेळीं कर-ण्यांत विसंगत असें कांहींच नव्हतें. दादाजीस 'सुभेदार कोंढाणा' असा हुद्दा होता. याचा अर्थ दादाजीची कचेरी कोंढाण्यास होती. तेथून तो विजापूर-करांच्या मुलखाचा कारभार १ डिसेंबर १६३३ पासून पाहत असल्याचा दाखला सांपडतो. सुभेदार बहुतेक मुसलमान असत. तेंहि पद दादाजीपंतास मिळालें, त्या अर्थीं तो विजापूरकरांच्या पूर्ण विश्वासास व आदरास पात्र झाला होता असें म्हणावें लागतें. दादाजीचा हुद्दा 'सुभेदार किल्ले कोंढाणा' असला तरी तो कधीं कोंढाण्यावर तर कधीं खेडेबारें येथेंच राहत होता; म्हणूनच त्यानें शिवापुरास शिवाजीकरितां आपल्यापाशीं त्याचा वाडा बांधून दिला.

जिजाबाईचा कारभार

मातुःश्री जिजाबाई व शिवाजी पुणें प्रांतीं आल्यावर दादाजीपंत त्यांचें दिवाणगिरीचें काम पाहत असला तरी न्याय-इन्साफ स्वतः जिजाबाईसाहेब करीत (प. सा. सं. खं. १, पृ. १११); इतकेंच नव्हे तर १९ जुलै १६४७ त दादाजीपंत मरण पावल्यावर व शिवाजीमहाराज स्वतः मुखत्यार झाल्यावरहि त्यांच्या गैरहजेरींत त्याच कारभार पाहत व जरूर पडल्यास त्यांच्या लाडक्या शिवबानें दिलेले निकालहि फिरवीत. या प्रकारचें खुर्दखत सन १६५१–५२ चें त्यांनीं हुद्देदार व मोकदम बेहरवडे, परगणे पुणें यांजकडे पाठविलें आहे (प. सा. सं. खंड १, पृ. १३१). त्यांत म्हटलें आहे, "गणो गबाजी तबीब, कसबे पुणें यांस बेहरवडे येथील जमीन इनाम, खुद्दाचे फर्मान वजीर, महाराज व शिऊबा यांच्या खुर्द खताप्रमाणें चालू आहे. सालमजकुरी इनाम अमामत करण्याबद्दल चिरंजीव राजश्री राजे यांचें पत्र आलें. तरीहि इनाम अमानत न करितां पूर्वीप्रमाणें चालू ठेवणें. चिरंजीव राजश्री शिऊबाचे खुर्दखताचा उजूर न करणें." अशी जिजाबाई ही कारभारीण व खरमरीत बायको होती. आपल्या या परमपूज्य मातुःश्रीचा मान शिवबाहि राखीत असत. हें १३ जुलै १६५३ रोजीं शिवाजीमहाराजांनीं गुरव, पुजारी श्रीमार्तंडभैरव, जेजुरी यांजकडे पाठविलेल्या कौलनाम्यांत दिसून येतें.

"गुरवांतील मिराशीचा गरगसा होता. त्याचा निवाडा मातुःश्री (जिजाबाई) साहेबीं करून सलासा कारणे कौल दिधला असे. तेणेप्रमाणें साहेबाचाहि कौल असे" (प. सा. सं. खं. १, पृ. १३८).

जिजाबाईसाहेब परोपकारीहि असत. आपल्या जहागिरींत नडल्या-अडलेल्यांस मदत करून त्यांच्या अडचणींचें निवारण करण्यांत त्या दक्ष असत. गुंजण मावळांतील विठोजी हैबतराव देशमुख यांनीं आपली कन्या गोमाजी नाइकाच्या लेकास देण्याचें ठरविलें. पण त्याच्या घरीं अठराविश्वें दारिद्र्य. तो मुलीचें लग्न करणार कसें! त्याची ही हलाखी समजल्यावर बाईसाहेबांनीं त्यास हुजूर बोलावून त्याची हकीकत ऐकून घेतली. त्यानें सांगितलें, 'सांप्रत रोजीचें खावयास नाहीं आणि लग्नसिद्धि कैसी होईल!

तें समजल्यावर बाईसाहेबांनीं त्यास २५ होन व ५०० माणसांच्या जेवणाचें सामान दिलें (प. सा. सं. खं. १, पृ. ३४८). अशी दिलदार व कनवाळू माउली शिवरायास मातृस्थानीं लाभली होती.

साधुसंतांचा सहवास

जिजाबाईस महाराष्ट्रांत आल्यापासून देवधर्म व शिवाजीचें संगोपन यांशिवाय इतर पाश उरला नव्हता. देवधर्माकडे पुरुषांचेंहि लक्ष त्या काळीं असे, मग स्त्रियांचें असल्यास नवल काय? मातुःश्रीचें हेंच वळण शिवाजीमहाराजांस लहानपणापासूनच लागलें होतें. ते जवळपास कोठें तुकाराम-बुवांसारख्या साधुसंतांचें कथाकीर्तन असल्यास तें श्रवण करण्यास घोड्यावरून जात, अशा बखरींतून हकीकती वाचण्यांत येतात. त्यांचा खरेपणा प्रत्यक्ष पुराव्यानें सिद्ध करतां येणार आहे. भोसल्यांच्या कुळांत शिवोपासना पिढ्यानुपिढ्या चालत आली होती. बारा ज्योतिर्लिंगांपैकीं वेरूळचा घृष्णेश्वर हें तर त्यांचें कुलदैवत. त्यामुळें शिखरशिंगणापूरच्या शंभुमहादेवावर मालोजीची अतुल भक्ति. शंकरजीचें नांव नित्य मुखांतून यावें म्हणून शहाजीनें आपल्या एका मुलाचें नांव शंभु व दुसऱ्याचें नांव शिव ठेवलें. हीच परंपरा पुढें चालवून शिवरायांनीं आपल्या वडील पुत्राचें नांव संभाजी ठेवलें व धाकट्याच्या वांट्यास 'राजाराम' नांव आलें, तें समर्थ रामदासस्वामींच्या समागमाचें फळ होय.

शंकराची भक्ति घराण्यांत चालू होती तरी धोम महाबळेश्वराचे वेदमूर्ति गोपाळभट बिन श्रीधरभट हे भले थोर सूर्योपासक. त्यांस भेटल्यावर महाराजांनीं मातुःश्री जिजाबाईसह त्यांचा मंत्रोपदेश शके १५७४ फाल्गुन शु. १, ता. १८ फेब्रुवारी १६५३ रोजीं घेतला. त्यासंबंधीं महाराजांनीं गोपाळभटजींस दिलेलें दानपत्र येथें उद्धृत करण्यासारखें आहे.

"वेदमूर्ति गोपाळभट बिन श्रीधरभट, वास्तव्य महाबळेश्वर, यांस —

विद्यार्थि शिवाजीराजे दंडवत विनंति उपरी— स्वामी भले थोर अनुष्ठाते, सूर्य उपासनी, पद्महस्ती, ऐसे जाणोन आपण मातुःश्री जिजाबाई आऊसाहेब (यांसह) वेदमूर्ति प्रभाकरभट उपाध्ये यांच्या विद्यमानें स्वामीपासून मंत्रोपदेश संपादिला. स्वामी आपले गुरु. स्वामीस आपण आपले भाग्यो-

दयार्थ सूर्यप्रीत्यर्थ अनुष्टान सांगितलें. प्रतिवर्षी वर्षासन द्यावयाची मोईन केली असे. तपशील – वर्षासनपैकीं गल्ला नव शेरी. सूर्यप्रीत्यर्थ्य अनुष्टान प्रतिवर्षी करावें. त्यास नक्त होन शंभर. याप्रमाणें होन पालाई एकशें व गल्ला नव शेरी वारुळे मापे खंडी ८ वजन टकबंदी सवाआठरा मण; आरक्त वस्त्रें व पीतांबर एक, शाल एक, व आसन एक याप्रमाणें वर्षासन व पूजासामग्री मोईन दानपत्रें करून दिल्ही असे. स्वामींनीं आमचे भाग्योदयार्थ सूर्यप्रीत्यर्थ्य प्रतिवर्षी अनुष्टान उत्तरोत्तर करावें व मंत्रोपदेशहि स्वामींचे वंशपरंपरेनें आमचे वंशपरंपरेस करावा. आपण संकल्प-पूर्वक प्रतिवर्षी वर्षासन दानपत्र करून दिलें असे; हें आपले वंशपरंपरेनें उत्तरोत्तर चालवावयास अन्यथा करूं, तरी श्री महादेव साक्ष. स्वामींनीं देवापाशीं निरंतर आमचें कल्याण इच्छावें. लेखनालंकार मोर्तब " (प. सा. सं. खं. १, पृ. १३५). मुसलमानांच्या पदरीं राहून शहाजीप्रमाणें जहा-गीर मिळवावयाची असती तर महाराजांनीं देवावर इतकें संकट घातलें नसतें. पण स्वराज्यसंपादनाचें कार्य अत्यंत बिकट, तें देवाब्राह्मणांच्या आशीर्वादाशिवाय केवळ स्वतःच्या प्रयत्नांवर विसंबून सिद्धीस जावयाचें नाहीं, या उदात्त भावनेनेंच महाराज अत्यंत तेजस्वी व प्रभावशाली अशा श्रीसूर्यनारायणाची आराधना करण्यास प्रवृत्त झाले. यांत महाराज अत्यंत भक्तिमान् व श्रद्धावान् कसे होते याचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाहीं. स्वराज्याप्रीत्यर्थ राजकारण करीत असतां भलींबुरीं व क्रूर कृत्येंहि त्यांच्या हातून घडलीं असलीं तरी तीं त्यांनीं अंतःकरणानें कठोर म्हणून केलीं नसून अपरिहार्य म्हणून केलीं. त्यांच्या अंतःकरणाचा गाभा पवित्र व विशुद्ध असाच होता.

बालविवाह

महाराजांचीं एकंदर लग्नें सात (आठ ?) झालीं असें म्हणतात. त्यांचें पहिलें लग्न वयाच्या सातव्या वर्षी बेंगळुरास पवारांच्या कन्येशीं झालें. अर्थात् शिवाजीराजे पुण्यास राहावयास आले त्या वेळीं ते विवा-हित होते. तो बालविवाह होता, हल्लींसारखा प्रौढविवाह नव्हता. अशा विवाहांत मुलें वयांत येईपर्यंत त्यांना पति-पत्नीत्वाची कल्पनाहि नसे. भार्या ऋतुमती होईपर्यंत तिजकडे पतीची वांकड्या नजरेनेंहि पाहण्याची

प्राज्ञा नसे. जेथें त्यांची नजरानजर होण्याची चोरी तेथें त्यांच्या गांटी-भेटींचें नांव कशाला ? तशांत जिजाबाईसारखी शिस्तबाज व करडी सासू. या कारणानें शिवबाच्या सोळाव्या-सतराव्या वर्षापर्यंत वा सूनबाईच्या पंध-राव्या-सोळाव्या वर्षापर्यंत त्यांनीं शिवबाकडून ब्रह्मचर्याचें पालन करवून घेऊन जोर-जोडी, कुस्ती, बैठक व मलखांब यांत त्यास तरबेज केलें असेल आणि ढाल-तलवार, बाण-बरची, लाठी-बोथाटी, पट्टा व घोडदौड ही युद्धकला त्यास करतलामलकवत् झाली असेल. असा हा राजबिंडा चिमुकला सरदार घोड्यावर बसून दऱ्याखोऱ्यांतून रपेटीस निघाला असतां त्याजकडे पाहून मावळांतील त्याच्या शिणेचीं उमेदवार पोरें कौतुकानें तोंडांत बोट घालीत असतील.

स्वराज्याची मुहूर्तमेढ

बेंगळूर सोडून पुणें प्रांतीं आल्यावर महाराजांच्या मनावरील यावनी साम्राज्याचें दडपण पार उडून नैसर्गिक मनोवृत्तीला अनुसरून विचार व कृति करण्यास त्यांस पूर्ण मोकळीक मिळाली. मनुष्य हा जात्याच स्वातंत्र्यप्रिय आहे. बालवयांत व तारुण्यांत त्याची स्वातंत्र्यप्रीति अतिशय जोरदार असते. त्या वयांत त्याला सुखस्वप्नें पडत असतात व कल्पनाशक्ति प्रबळ असल्यामुळें त्याच्या मनोरथांना सीमा नसते. पायीं चालणारापेक्षां घोड्यावर स्वार झालेला नवयुवक अधिक तर्रर असतो. पर्वत, दऱ्या, खोरीं, नद्या, अरण्यें यांचें दर्शन सामान्य मनुष्यालाहि कवि बनवितें तर घोड्यावर स्वार होऊन पुण्याच्या मावळी प्रदेशांत सांज-सकाळ आपल्या संवगड्यांनिशीं दौड मारणाऱ्या प्रतिभाशाली शिवरायाला तें महाकवि बनवीत असल्यास नवल काय ! अशा उच्च तंद्रींत असतांच महाराजांना स्वराज्याची कल्पना सुचली.

पुण्याच्या पश्चिमेस पर्वतांच्या फळ्यांमागून फळ्या उभ्या आहेत. त्या फळ्यांमधून व डोंगर-कपारींतून लहान लहान नद्या वाहत असतात. त्यांचींच खोरीं बनलीं असून त्यांत लहान लहान खेडीं वसलीं आहेत. तेथें राहणारे काटक, कष्टाळू, धीट व असंतुष्ट पण स्वातंत्र्यप्रिय मावळे भात-शेती करतात व सुगी संपल्यावर पुण्यास येऊन फेरीवाल्याचा वा मोलमजुरीचा धंदा हुडकतात. हल्लीं मावळांतील झाडी पुष्कळ तुटली आहे. पण शिवकालीं

त्यांत घनदाट अरण्य असून त्यांतून वाघ, लांडगे, अस्वलें, तरस इत्यादि वन्य पशु संचार करीत. या झाडीच्या मदतीस पावसाळ्यांत भातशेती झाल्यामुळें पाऊलवाटांशिवाय सर्व प्रदेश गर्द व हिरवागार होऊन जात असे. शिवाजीसारख्या महाकवीस व वीरशिरोमणीस तो भाग स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवण्यास योग्य वाटावा यांत अस्वाभाविक असें काय आहे! पुण्याच्या पश्चिमेचें तेवढेंच मावळ काय म्हणून? तसें म्हटलें तर देशावरच्या पश्चिमेकडील सर्वच डोंगर-प्रदेशास मावळ म्हणतां येईल. अशा प्रदेशाची लांबी अडीचशें मैल भरेल. पण त्या सर्व प्रदेशास मावळ न म्हणतां पुणें जिल्ह्याच्या पश्चिम भागास मावळ ही संज्ञा आहे. त्याची पट्टी महाबळेश्वरापासून जुन्नरपर्यंत म्हणजे सरासरी शंभर मैल आहे. त्यांत बारा मावळें आहेत. प्रत्येक टापूला मावळ ही एकच संज्ञा नसून कांहींना खोरीं व नेरें अशाहि संज्ञा आहेत. अंदर, नाणें, कर्यात, गुंजण, हिरडस, पवन यांना मावळें म्हणतात, तर मोसें, पौड, मुठें, कानंद, वेळवंड, भोर, जोर यांना खोरीं म्हणतात. जुन्नराकडे शिवनेर, भीमनेर, घोडनेर इत्यादि नेरें आहेत, पण तीं थोडीं आहेत. तथापि मावळें असोत, खोरीं असोत वा नेरे असोत तीं सर्व नद्यांवरून पडलीं आहेत. ज्या वनस्थलींत सह्याद्रीच्या माथ्यावरून लहानमोठ्या नद्या वाहत येतात तीस त्या त्या नदीचें नांव देण्यांत आलें आहे. वर्षाकाळांत या प्रदेशांत साठ ते सत्तर इंच पाऊस पडून नद्यानाले भरून जातात. आकाश मेघाच्छादित झाल्यामुळें आठ-आठ दिवसांत सूर्यदर्शनहि होत नाहीं. पाऊस डोळा उघडू देत नाहीं. मावळ व देश यांचा संबंध पार तुटून जातो. पर्वत पाचूच्या खड्याप्रमाणें शोभतात आणि घरें भोंवतालच्या वनराजींत ऋषींच्या आश्रमाप्रमाणें दिसूं लागतात. पण उन्हाळ्यांत मात्र हा मावळांतला रम्य देखावा पूर्णपणें मावळून त्या हिरव्या शाली फेकून दिलेले डोंगर उघडेबोडके बाहेर पडतात, ते आपल्या उग्र रूपानें भीति दाखवितात आणि त्यांजमधून पूर्वी तुडुंब भरून वाहणाऱ्या सरितांत डोळ्यास लावावयास टिपूसभरहि पाणी मिळत नाहीं.

अशा या विलक्षण प्रदेशांत शिवाजी वयाच्या बाराव्या वर्षी राहावयास आला, त्या वेळीं इतक्या लहान वयांतहि त्याच्या डोक्यांत कोणते

विचार थैमान घालीत असतील व कोणत्या भावना त्याची वृत्ति थरारून सोडीत असतील याची कल्पना कॉस्म द गार्डा या परकीय व परधर्मीय पोर्तुगीज गृहस्थासहि यथातथ्य आली होती. तो काव्यमय पद्धतीनें वर्णितो, " शिवाजी बारा वर्षांचा झाला नाहीं तोंच त्याला त्याच्या पित्यानें तीस तोरंगिकांचें आधिपत्य दिलें व नेताजीच्या स्वाधीन केलें. नेताजी हा शिवाजीचा जवळचा आप्त होता. तो शिवाजीबरोबर नेहमीं असे. शिवाजी फार चलाख, सुंदर अंगलटीचा, गौरवर्णाचा आणि काळ्याभोर व विशाल डोळ्यांचा होता. त्याचे डोळे इतके तेजस्वी होते कीं, जणूं काय त्यांतून ठिणग्या पडत. त्याची बुद्धि तीव्र व कुशाग्र होती.

" शिवाजी पंधरा वर्षांचा होतांच त्याची आनंदी वृत्ति मावळली. तो सतत उदास व गंभीर दिसूं लागला. त्याला एकान्त आवडूं लागला. तो इतका विचारमग्न दिसे कीं, त्याची ही वृत्ति लोकांच्या नजरेस आल्यावांचून राहिली नाहीं. त्याचें गूढ-गुंजन सुरू असे. तें पाहून नेताजीस त्याजविषयीं काळजी वाटूं लागली. त्यानें त्याला विचारावें, ' बाळ तुला काय होत आहे ? तुला कशाचा त्रास तर होत नाहींना ? तुला काय पाहिजे तें मला सांग. ' त्यावर शिवाजी म्हणे, ' काका ! काय होतें तें मी काय सांगूं ? माझें दुःख मानसिक आहे ! ' तें ऐकून नेताजीनें हंसून विचारावें ' बाळ ! तुला मोठाले पराक्रम करावयाचे आहेत होय ? कीर्ति मिळवावयाची आहे होय ? तसें असेल तर ठीकच आहे. '

" शिवाजीनें नम्र भावानें उत्तर द्यावें, ' काका ! मी केवढासा ! माझें सामर्थ्य तें काय ! असें मनांत आणून तुम्ही मला हंसत असाल नाहीं ? ' हें ऐकून नेताजी पुनः हंसतांच शिवाजी म्हणाला, ' हंसा ! खुशाल हंसा ! लवकरच माझीं कारणें लक्षांत येऊन तुमची चूक तुम्हांला समजेल ! ' या उत्तरानें नेताजी चमकला च प्रेमानें त्यास कुरवाळून बोलला, ' बाळ ! तूं एखाद्या मोठ्या माणसासारखा गंभीरपणें बोलत आहेस रे ! तेव्हां तुझा बेत तरी काय आहे, मला सांग. मजवर विश्वास ठेव. मी तुझा मित्र आहें, सवंगडी आहें बरें ! '

" मग शिवाजी घोड्यावर स्वार झाला. नेताजीहि स्वार होऊन त्याजबरोबर निघाला. त्याच्यामागून तीस स्वार निघाले. त्यांना शिवाजीनें अगदीं

एकान्तांत नेलें आणि कोणी ऐकत नाहीं असें पाहून तो त्यांना मोठ्यानें म्हणाला, 'तुम्ही मजबरोबर याल का ? जर आलांत तर तुमचें खात्रीनें दैव उघडेल.' 'होय' त्यांपैकीं कांहीं उद्गारले. 'तर मग ठीक आहे. त्या योगानें तुमची कीर्ति दिगंत होईल व लोक तुमचे पोवाडे गातील.' शिवाजींचीं हीं वाक्यें ऐकून नेताजी उत्साहपूर्वक म्हणाला, 'शाबास! शिवबा, शाबास! मी तुला केव्हांहि अंतर देणार नाहीं. तुझ्यासाठीं मी प्राणहि अर्पण करीन!' त्यानंतर त्या तीस तौरंगिकांनीं तीच शपथ घेतली."

हिंदवी स्वराज्याची शिवाजीनें घेतली व घेवविली ती शपथ हीच का ? मुसलमानांची सरदारकी पत्करून स्वधर्मरक्षण तर होत नाहींच, उलट 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' या न्यायानें ज्या धर्माचे आपण त्याच धर्माचीं राज्यें बुडविण्याचें महत्पातक कसें करावें लागतें, याचें ढळढळीत चित्र शहाजीच्या रूपानें शिवाजीपुढें होतें. म्हणून स्वराज्यस्थापनेची कल्पना ज्या वेळीं शिवाजीनें दादाजीपंत व जिजामाता यांजपुढें मांडली असेल त्या वेळीं त्यांची या कल्पनेविषयीं खात्री पटवून देतांना त्यांना प्रयास पडले नसतील. पण स्वराज्य स्थापणें म्हणजे आदिलशाहीशीं लढून ती बुडविणें असा अर्थ असल्यामुळें तो लक्षांत आल्यावर जिजाबाई व दादाजी यांनीं त्यास संमति देण्यास किती विलंब लावला असेल हें सांगणें कठीण आहे. कारण या कार्यास मूर्तस्वरूप येत गेलें कीं शहाजीराजांवर व त्यांच्या जहागिरीवर गदा येणार हें ठरल्यासारखेंच होतें. दादाजी तर आदिलशहाचा नोकर. तो प्रस्तुत कार्यांत शिवाजीस सामील झाल्याचें कळल्यावर आदिलशहा त्याच्या मुसक्या आवळल्याशिवाय कसा राहील ? तथापि हा धोका पत्करूनहि त्या उभयतांनीं शिवाजीच्या कार्यास यश चिंतिलें, असें पुढें घडलेल्या हकीकतीवरून कबूल करावें लागतें.

तरुणांना आकर्षण

शिवाजीनें वयाच्या पंधराव्या वर्षीं मावळांत भोराजवळील रोहिडखोरें व वेलवंडखोरें हीं खोरीं या कार्याकरितां सन १६४५ सालीं निवडलीं. त्या खोऱ्यांचा देशपांडे व कुलकर्णी दादाजी नरसप्रभु या नांवाचा तरुण होता. त्याला व इतर कित्येक युवकांना वश करून घेऊन रोहिडेश्वराच्या डोंगरावर महाराजांनीं हिंदवी स्वराज्याचें निशाण चैत्रमासीं (शके

१५६७) फडकविलें. त्या डोंगरावर हजार-बाराशें मावळे जमवून त्यांजकडून स्वयंभू आदि कुलदेव श्रीरोहिडेश्वर याजसमोर 'हिंदवी स्वराज्य-स्थापनेस आम्ही सहभागी आहों' अशा शपथा महाराजांनीं घेवविल्या. त्यासंबंधीं दादाजी नरसप्रभु यांजवर संतापून विजापुराहून वजिरानें त्यास ३० मार्च सन १६४५ रोजीं पुढीलप्रमाणें पत्र लिहिलें –

"वजारतमाब सिवाजीराजे फरजंद शाहाजी राजे याणें शहाशी बेमानगी करून तुझे खोऱ्यांत रोहिरेश्वराचे डोंगराचे आसऱ्यानें पुंडावेयानें मावळे वगैरे लोकजमाव केला आणि तेथून जाऊन पेशजी किल्यावरील ठाणें उठवून आपण किल्यांत शिरला. हाली राजगड किल्ला नांव करून बळकावला व तोहि वेळवंड खोऱ्यालगत. त्यास लोकांचा वगैरे जमाव तूं सामील असून फिसात करून रसीद राजे मजकूर निल्हेस देतोस व ठाणें शिरवळीं आमिनासी रुजू राहत नाहींस व जमाव बितरजुमा करीत नाहींस व तनखाहि हरदू तपियाच दिवाणांत देत नाहींस; मगरूरीचे जबाब ठाणगे व नाइकवडी यासी देतोस, हें जाहिरात आलें. त्यास हें नामकुल गोष्ट तुझे जमेदारीचे इजतीस आहे. तरी ठाणें मजकुरीं आमिनासी रुजू राहणें आणि तनखा साहु करोन देणें. हें न जालियास खुदावंत शाहा तुजला विजापुरीं नेऊन गरदन मारतील व जमेदारी हककानू चालणार नाहीं. हें मनीं समजणें आणि याउपरीं दिवाणांत रुजू राहणें" (प. सा. सं. खंड १ पृ. १०८). सारांश, दादाजी नरसप्रभु हा एक प्रमुख नरपुंगव स्वराज्यस्थापनेसाठीं शिवाजीच्या निशाणाखालीं सर्वस्वावर पाणी सोडून छातीठोकपणानें प्रथम पुढें आला. त्यास त्या सत्कार्यापासून परावृत्त करण्यासाठीं आदिलशाही वजिरानें "तूं बऱ्या बोलानें हा फंद सोडून पूर्ववत् आदिलशाहीची चाकरी करीनासा झालास तर तुझें वतन जप्त करण्यांत येईल; इतकेंच नव्हे तर तुझी गर्दन छाटली जाईल" अशी तंबी दिली.

हा हुकूम विजापुराहून वजिरानें शिरवळास पाठविला व शिरवळच्या अमीनानें तो दादाजी नरसप्रभूकडे रवाना केला. दादाजीचा बाप नरसीबावा हा मागील पिढींतील म्हातारा माणूस. त्यास हें भयंकर वर्तमान कळतांच त्याची घाबरगुंडी उडाली. ही बातमी शिवाजीराजे यांस समजल्यावर त्यांनीं वैशाख शुद्ध १ शके १५६७ रोजीं (१७ एप्रिल १६४५)

दादाजीस पत्र लिहून धीर दिला. नरसीबावास साहजिकच वाटलें कीं, आपल्या लेकाचें कृत्य राजद्रोहाचें म्हणजे बेमानगिरीचें आहे. यासाठीं राजे दादाजीस लिहितात –

"त्यास शहाशी बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाहीं. श्रीरोहिडेश्वर तुमचे खोरियांतील आदि कुलदेव, तुमचा डोंगरः माथा पठारावर शेंद्रीलगत स्वयंभू आहे, त्यांणीं आम्हांस यश दिलें व पुढें तो सर्व मनोरथ 'हिंदवी स्वराज्य' करून पुरविणार आहे. त्यास बावास हवाल होऊं नये. खामखा सांगावा. आणि तुम्ही तो कागद घेऊन सिताब हुजूर येणें. राजश्री श्री. दादापंताचे वियमानें बावाचे व तुमचे व आमचे श्रीपासी इमान जालें तें कायम वज्रप्राय आहे; त्यांत अंतर आम्ही व आमचे वंशज लेकराचे लेकरीं वतन वगैरे चालविण्याविसी कमतर करणार नाहीं. हें राज्य व्हावें हें श्रीचें मनांत फार आहे. याप्रमाणें बावाचे मनाची खातरी करून तुम्ही येणें. बहुत काय लिहिणें" (प. सा. सं. खंड १, पृ. १०९). केवळ वयाच्या पंधराव्या वर्षी महाराजांचा केवढा हा आत्मविश्वास, किती अढळ ईश्वरनिष्ठा. 'हें राज्य व्हावें हें श्रीचें मनांत फार आहे' असले उद्गार पंधराव्या वर्षी अवतारी पुरुषाच्या तोंडींच शोभणारे आहेत. त्या वयांत त्यांनीं आपलें दैवी तेज प्रकट करून दादाजीपंत काय, जिजाऊ माता काय किंवा जो कोणी त्यांच्यासमोर येईल त्यास मंत्रमुग्ध केलें असेल. नाहीं तर हीं वृद्ध माणसें त्यांस वश कशीं होणार! एरवीं त्यांनीं त्यांस वेड्यांतच काढलें असतें.

या पवित्र कार्यांत त्यांनीं दादाजीपंतास गोवून घेतलें होतें हें वरील पत्र कंठरवानें सांगत आहे. 'शहासी आपण बेमानगिरी' करीत नाहीं हे शब्द दादाजी नरसप्रभूस व त्याच्या पिल्यास फक्त धीर देण्याकरितां आहेत. त्यांना येऊन जाऊन वतन जाण्याचें भय. 'पण मी असल्यावर तें जाण्याची भीति कशाला? मीच तें चालवीन' असें महाराज त्यास खामखा सांगत आहेत. आणि 'मी असल्यावर तुमच्या केसालाहि धक्का लागणार नाहीं' अशी त्यांची खातरजमा करून देत आहेत. त्या अत्यंत प्रतिकूल काळांत महाराजांच्या भजनीं लक्षावधि माणसें कशीं लागलीं याची साक्ष देण्यास हें एकच पत्र पुरेसें आहे.

भूमिगत दादाजी

आहेत हीं वतनें टिकविण्याच्या व नवीन मिळविण्याच्या आशेनें देशमुखांसारखे मोठे लोकहि शत्रूस फितूर कसे होतात, याचा अनुभव महाराजांना प्रथमच या वेळीं आला. दादाजी नरसप्रभु शिवाजीच्या स्वराज्यपक्षास मिळाल्याची व हजार-बाराशें मावळ्यांनीं रोहिडेश्वरापुढें जमून हिंदवी स्वराज्याच्या शपथा घेतल्याची खबर शिरवळास जाऊन तेथील ठाणेदारास (कृष्णाजी) बांदल, (केदारजी व खंडोजी) खोपडे व जेधे देशमुख यांनीं सांगितली. यांपैकीं जेधे हा कान्होजी जेधे हाच शहाजीनें कर्नाटकांतून शिवाजीच्या मदतीकरितां पाठवून दिलेला असेल तर विश्वास-घाताची सीमा झाली असेंच म्हटलें पाहिजे. म्हणूनच महाराज वतनदारीचे मनापासून द्वेष्टे बनले असले पाहिजेत. वरील देशमुख यांनीं ही खबर दिवाणांत सांगितल्याची कुणकुण लागतांच दादाजी फरारी झाला. तो गेल्यावर रोहिड व वेलवंड खोऱ्यांत अंदाधुंदी माजली. त्यांतील लावणी-संचणी थांबली, न्याय-इन्साफ होईनासा झाला. तेव्हां सन १६४६च्या मे महिन्यांत ठाणेदारानें पुनः त्यास हुकूम पाठवून कामावर रुजू होण्यास फर्मावलें व त्यास केलेल्या अपराधाबद्दल दिवाणांतून इजा होणार नाहीं असें आश्वासन दिलें (प. सा. सं. खं. १, पृ. १०९). त्याचा हेतु असा कीं, हा वतनदार पुनः काम पाहूं लागला म्हणजे शिवाजीची रोहिड-वळवंड खोऱ्यावरील सत्ता उडून आदिलशाही अंमल जारी होईल. त्यामुळेंच शिवाजीनें एकदां घेतलेला मुलूख परत जात असे व पुनः जाऊन जिंकावा लागत असे आणि कालाचा, वित्ताचा व मनुष्यबळाचा प्रमाणाबाहेर अपव्यय होत असे.

स्वराज्यद्रोह्यांस शासन

यास्तव अशा फितुर लोकांना जरब बसण्यासाठीं जबर व कठोर शिक्षाच करणें जरूर आहे हें महाराजांच्या लक्षांत लवकर येऊन त्यांनीं त्याच मार्गाचा तावडतोब अवलंब केला. शिवापुरापासून जवळच डोंगर-कठार्डीला रांजें नांवाचें खेडें आहे. तेथील पाटिलकी बाबाजी बिन भिकाजी गुजर याजकडे होती. तो तें काम करीत असतां त्याजकडून कांहीं बद-अंमल झाला. ही हकीकत हुजूरसाहेबांस विदित होतांच त्यांनीं त्याला

हुजूर आणून विचारपूस केली. तींत तों गुन्हेगार ठरला म्हणून त्याची वतनी मोकदमी हुजूर अमानत करून महाराजांनीं बाबाजीचे हातपाय तोडून त्याला दूर केला व त्याची मोकदमी सोनजी बिन बजाजी गुजर यास दिली (प. सा. सं. खं. १, पृष्ठ ११०).

महाराजांनीं वयाच्या १५ व्या वर्षापासूनच विजापूरकरांचा मुलूख काबीज करण्यास सुरुवात केली. वर लिहिल्याप्रमाणें सन १६४५ त त्यांनीं दादाजीपंताच्या संमतीनें रोहिडा घेतला. तो शक १५६७ त पाडव्याच्या सुमुहूर्तावर घेतला असावा व त्याच मुहूर्तावर सर्व अनुयायांकडून हिंदवी स्वराज्य-स्थापनेच्या शपथा त्यांनीं घेतल्या. तेव्हांपासूनच मराठ्यांची हर-हर महादेव ही रणघोषणा सुरू झाली असावी. त्याच्यापाठोपाठ राजगड घेऊन त्याचें नवें नामकरण त्यांनीं केलें. पुढच्या वर्षी तोरणा किल्ला पडीक स्थितींत होता तो दुरुस्त करून ताब्यांत आणला आणि सन १६४७ त म्हणजे त्याच्या पुढच्या वर्षी बापूजी मुद्गल नऱ्हेकर (खेडेबारेचा देश-पांडे) याजमार्फत कोंढाणा स्वाधीन करून घेतला. सारांश, तीन वर्षांत त्यांनीं मावळ भागांतील चार किल्ल्यांवर आपलें निशाण फडकवून प्रसंग पडल्यास आदिलशाहीपासून आपल्या जहागिरीच्या संरक्षणाची तयारी केली. हें सर्व त्यांनीं दादाजी कोंडदेव जिवंत असतांच त्याच्या देखत उरकून घेतलें. पुणें परगणा व त्याखालचा मावळी भाग यांचा कारभार शिवाजीच्या वतीनें दादाजी पाहत असे व दादाजी हा तर कोंढाण्याचा सुभेदार होता. अशा स्थितींत तो किल्ला घेण्यास शिवाजीला फितुरीचा अवलंब कां करावा लागावा? याचें कारण असें दिसतें कीं, दादाजी कोंढाण्याचा सुभेदार असला तरी तो आदिलशाहीचा ताबेदार होता व किल्ल्याचा कारभार आदिलशहानें नेमलेल्या किल्ल्यावरील अधिकाऱ्यांना सोडून दादाजीसं वागणें हें तर शक्य नसल्यामुळें शिवाजीस फितुरीचा अवलंब करावा लागला. त्याखेरीज आणखी एक गोष्ट नजरेस येते ती ही कीं, शहाजीच्या जहागिरींतील कोणतेहि किल्ले शहाजीच्या ताब्यांत नसून त्यांजवर सत्ता खास आदिल-शाहीची होती; इतकेंच नव्हे तर, जहागिरीचा सर्व मुलूख शहाजीकडे सलग असा नसून तिच्यांतील कित्येक गांवें आदिलशहाचीं होतीं. उदाहरणार्थ, रोहिडखोरें व वळवंडखोरें यांजवर शिरवळचा आदिलशाही ठाणेदार

अधिकार चालवीत होता व खुद्द शिरवळहि सर्वस्वीं शहाजीकडे नसून आदिलशाहीकडेहि होतें.

जहागिरीचा कारभार

शिवाजीस शहाजीनें पुण्यास पाठविलें तेव्हां त्याजबरोबर शामराव नीलकंठ यास पेशवा, बाळकृष्णपंत यास मुजुमदार, सोनोपंत यास डबीर व रघुनाथ बल्लाळ यास सबनीस हे हुद्दे देऊन रवाना केलें. त्यांपैकीं पेशवा हा दिवाण, मुजुमदार हा हिशेबतपासनीस, डबीर हा सुमंत (परराष्ट्र-मंत्री) व सबनीस हा पत्रव्यवहार करणारा असे. जहागिरीचें संरक्षण करण्यास सैन्याची जरूरी असून त्याजवर सेनापतीची नेमणूक करावयास पाहिजे. पण त्या कामावर स्वतंत्र अधिकारी न नेमतां पेशव्याकडेच तें काम ठेवण्यांत आलें होतें. शामराव नीलकंठ हा शिवाजीनें सन १६५७ त सिद्दीशीं लढण्यास सैन्य पाठविलें त्याचा अधिपति असल्याचें दिसून येतें. तसाच रघुनाथ बल्लाळ सबनीस हाहि एकदा ह्या मोहिमेवर गेला होता. खुद्द दादाजीपंत हे मंत्रिमंडळाबाहेर राहून शिवाजीचे पालक वा प्रतिनिधि या नात्यानें जहागिरीचा कारभार पाहत. त्यांचीं सन १६३३ ते ३९ पर्यंतचीं पत्रें उपलब्ध असून त्यांवरून हवेली, सासवड, मुळशी पेटा व शिरवळ यांचें काम त्यांनीं त्या काळांत पाहिलें होतें. ते कोणत्याहि महत्त्वाच्या दाव्याची चौकशी करीत असतां जिजाबाई साहेब उपस्थित राहत. शिवाजीनें स्वतः स्वतंत्रपणें दादाजीच्या हयातींत जहागिरीचा कारभार पाहिल्याचें आढळत नाहीं. दादाजी सन १६४७ त मरण पावला. त्यानंतर जिजाबाई व शिवबा दोघेहि सहकारितेनें काम पाहत. जिजाबाईनीं सन १६५१ ते १६६९ पर्यंत पुणें, जेजुरी, कानद खोरें व गुंजण मावळ येथील कारभार पाहिल्याचीं उदाहरणें उपलब्ध आहेत. विशेष भानगडीचीं व जबाबदारीचीं कामें शहाजीमहाराजांकडेहि जात. त्यांनीं स्वतः १६३७ ते १६५५ पर्यंत पुणें, बारामती, चऱ्होली, सुपें येथील प्रकरणें निकालांत काढलीं.

येथपर्यंतच्या विवेचनावरून पुणें परगणा एवढाच दादाजी, जिजाबाई व शिवाजी यांच्या ताब्यांत प्रारंभीं असून त्यांच्या कक्षेबाहेरचीं बारामती, सुपें इकडील प्रकरणें शहाजीकडे जात. इंदापूर व सुपे परगण्यांत विठोजी भोसल्याचे पुत्र संभाजी, मंबाजी हे देशमुखीच्या वतनावर पण

शहाजीच्या अंकित असत. दादाजी मरण पावल्यावरच म्हणजे सन १६४७ पासून पुढें शिवरायांचा कारभार नजरेसमोर येतो. त्याचा १६५९ पर्यंतचा म्हणजे बारा वर्षांचा आढावा घेतल्यास त्यांची हुकुमत पुण्यापासून सुरू होऊन क्रमाक्रमानें पालीजवळचा सरसगड (१६४७), सुपें (१६४९) किल्ले रोहिडा तपे भोर (१६४९), गुंजण मावळ (१६५०), महाडाजवळ वीरवाडी (१६५१), उन्नोळी मोसें खोरें (१६५२), महाबळेश्वर (१६५३), परगणे चाकण (१६५३), ओझर्डे – चंदनवंदन (१६५७), वाल्हें परगणे पुणें (१६५७), हिरडस मावळमधील मोहनगड (१६५९), कल्याण-भिवंडी (१६५९) येणेप्रमाणें त्याची मावळ, कोकण व देश यांत प्रगति झाल्याचें दिसून येतें. त्याच्या मूळ जहागिरीबाहेरील सुपें परगणा त्यानें सन १६४९ त व चाकण १६५० त ताब्यांत घेतला होता. तात्पर्य, शहाजीची बहुतेक सर्व जहागीर १६५० पर्यंत शिवाजीची झाली होती. स्वराज्याची मुहूर्तमेढ रोहिडा किल्ल्यावर रोवल्यानंतर अवघ्या दोन वर्षांनीं (७ मार्च १६४७) दादाजीचा काळ झाला. तेव्हांपासून शिवाजीच्या प्रगतीचा वेग विशेष वाढला. शहाजीनें पुणें परगण्याची व्यवस्था दादाजी व शिवाजी यांजकडे सोपविली होती, पण जहागिरींतील इतर परगणे आपल्या आप्तेष्टांकडे कारभारासाठीं दिले होते. शिवाजीला सबंध जहागिरींत एकमुखी सत्ता स्थापन करावयाची होती. जुन्या जमान्यांतील पदाधिष्ठित माणसें आपणांस आदिलशहाचा अंकित समजणारीं असावीं हें स्वाभाविक होय. अर्थात् स्वराज्यस्थापनेच्या मार्गांतील ती धोंड काढून टाकणें शिवाजीस इष्ट वाटलें. शहाजीच्या जहागिरीपैकीं चाकण हें फिरंगोजी नरसाळा याजकडे होतें. तो शिवाजीस वश झाल्यामुळें शिवाजीनें चाकण व तेथील किल्ला त्याजकडे राहूं दिला. शहाजीची दुसरी पत्नी तुकाबाई हिचा भाऊ संभाजी मोहिते हा सुपें परगण्याचा व्यवस्थापक (सर हवालदार) होता. तो शिवाजीचा मामा असून त्यास वश होण्याचा संभव दिसेना. शिवाजी हा गुंडांत गुंड, पुंडांत पुंड व रणपंडितांत रणपंडित असल्यामुळें त्यानें मोठ्या हिकमतीनें त्यास चकविलें. शिमग्याच्या सणांत तो सुप्यास मामाच्या भेटीस पोस्त मागण्याच्या मिषानें गेला व त्यास अचानकपणें अटक करून त्याची जहागीर, त्याच्या पागेंतील तीनशें घोडे

व सर्व मालमत्ता ताब्यांत घेऊन त्यानें त्यास सहकुटुंब बेंगळुरास शहाजी-कडे पाठवून दिलें.

शिवाजीच्या पुंडाईचें वर्तमान विजापुरास सन १६४५ तच समजलें होतें. त्यानंतर मावळांतील इतर किल्लेहि घेतल्याची बातमी तिकडे समजतांच शिवाजीच्या हेतूविषयीं आदिलशहाची बालंबाल खात्री झाली व त्याच्या बंदोबस्तासाठीं जालिम उपायच योजिले पाहिजेत हें त्यास कळून चुकलें. नाक दाबल्याशिवाय तोंड उघडणार नाहीं या न्यायानें शिवाजीचा बाप शहाजी यास कैद केलें कीं, शिवाजीचे चाळे थांबतील हें ओळखून शहानें त्यास कर्नाटकांत अटक करून विजापुरास आणविलें व इकडे शिवाजीवर फत्तेखान या सरदारास सैन्य देऊन पाठविलें.

प्रकरण पांचवें

फत्तेखानाची स्वारी

(इ. स. १६४९)

परित्राणाय साधूनाम्। विनाशाय च दुष्कृताम्।
धर्मसंस्थापनार्थाय। संभवामि युगे युगे ॥

—श्रीमद्भगवद्गीता

श्रीकृष्ण व श्रीशिवाजी यांच्या चरित्रांत पुष्कळच साम्य आहे. श्रीकृष्णाच्या अवताराचें कंसवध हें एक उद्दिष्ट होतें. श्रीशिवाजीच्या अवताराचें यावनी सत्तेचा नाश हें एक उद्दिष्ट होतें. दोघांनाहि, साधूंचें म्हणजे सज्जनांचें संरक्षण, दुरात्म्यांचा नाश व स्वधर्मरक्षण अभिप्रेत होतें. त्या महत्कार्यासाठीं सिद्ध होणाऱ्या या दोघांवर एकामागून एक संकटें ओढवूं लागलीं. श्रीकृष्णाच्या नाशार्थ कंसानें पूतनाराक्षसी, शकटासुर, अघासुर, अरिष्टासुर इत्यादि राक्षस एकामागून एक पाठविले. त्याप्रमाणेंच शिवाजीवरहि आदिलशाही व मोगली सत्तांनीं फत्तेखान, अफजलखान, रुस्तुमजमा, सिद्दी जोहार, शाइस्ताखान, दिलीरखान इत्यादि सरदार नाशार्थ रवाना केले. श्रीकृष्णानें जसा त्याजवर आलेल्या असुरांचा नाश केला, तसा शिवाजीनेंहि यावनी सरदारांचा नाश केला. शेवटीं अक्रुरास कंसानें याच निमित्तानें कृष्णाकडे पाठवून त्याजकरवीं कृष्णास मथुरेस आणलें; त्याप्रमाणेंच जयसिंगानें शिवाजीस गोड गोड वचनांनीं भुरळ घालून आग्ऱ्यास औरंगजेबाच्या भेटीस धाडलें. या दोन्ही कारस्थानांपैकीं पहिल्या कारस्थानांत श्रीकृष्णानें कंसवध करून आपलें उद्दिष्ट साधलें आणि दुसऱ्या कारस्थानांत औरंगजेबाचा जरी नाश झाला नाहीं तरी त्याचें कारस्थान फसून शिवाजी त्याच्या हातावर तुरी देऊन सुटून आला. शिवाजीच्या नाशार्थ आदिलशहानें प्रथम फत्तेखानास पाठविलें त्याची हकीकत अशी :—

शिवाजीनें हिंदवी स्वराज्याची घोषणा केली तेव्हां विजापूरच्या गादीवर महमद आदिलशहा होता. त्यानें विजापुरास इ. स. १६२६ ते

१६५६ पर्यंत राज्य केलें. त्याच्यापूर्वींचा सुलतान इब्राहिमशहा हिंदूंना प्रिय असून त्यास ते प्रेमानें जगद्गुरु म्हणून संबोधीत. तो गायनकलेचा शोकी असल्यानें गायनकला साध्य होण्यास देवी सरस्वतीची आराधना करणें जरूर आहे असें त्याच्या पदरच्या हिंदु गवयांनीं सांगितल्यावरून तो सरस्वतीचें पूजनहि करूं लागला होता. पण त्याच्यामागून गादीवर बसलेला महमदशहा त्याच्या अगदीं उलट प्रवृत्तीचा व हिंदुधर्मद्वेष्टा होता. त्याला शिवाजीची हिंदवी स्वराज्याची गर्जना ऐकूं गेल्यावर त्याच्या तळपायाची आग मस्तकास पोंचली असल्यास नवल काय! त्याच्या सबंध हयातींत त्यानें ही गर्जना प्रथमच ऐकली. ती ऐकल्यावर व शिवाजीनें आदिलशाही मुलुखाचें हळूहळू आक्रमण सुरू केल्यावर हा नवा अंकुर मुळांतच खुडून काढण्याचा निश्चय करून त्यानें फत्तेखान नामक सरदार सन १६४९ त शिवाजीवर पाठविला. तो सन १६३१ त शिरवळ व मावळ भागाचा सुभेदार असल्याचा आढळ होतो (प. सा. सं. खं. १, पृ. ७५). अर्थात् तो पुणें प्रांताचा पुरा माहितगार व पोक्त माणूस होता. त्यानें आपल्याबरोबर बजाजी नाईक निंबाळकर, बल्लाळ हैबतराव, घाटगे, मुसेखान इत्यादि सरदार घेतले होते. आदिलशाही फौजेशीं रणांगणांत उतरून दोन हात करण्याचा शिवाजीवर हा पहिलाच प्रसंग होता. त्याची उमर त्या वेळीं १९ वर्षांची होती. युद्धांतील डावपेंच त्याला आतां प्रथमच लढवावयाचे होते. म्हणून तो विशेषच सावधगिरीनें राहिला असला पाहिजे. त्यानें मावळ प्रांताचें पूर्वेकडील नाक्याचें व आघाडीवरचें ठाणें किल्ला पुरंदर येथेंच आपला मुक्काम ठेवून तेथून तो आपल्या सैनिकांना मार्गदर्शन करीत होता. या वेळीं पुरंदर किल्ल्यावर आदिलशहातर्फे सरनाईक नीलकंठ चंद्रस याचा पुत्र महादजी नीलकंठ हा मुख्य अधिकारी होता. त्याजपासून सदर किल्ला शिवाजीनें उघडपणें जिंकून न घेतां त्याचा वापर जरूर पडेल तेव्हां करण्याचा संकेत त्याजबरोबर केला असावा. त्यामुळें असो वा जबरदस्तीनें असो शिवाजी फत्तेखानाच्या मोहिमेच्या प्रसंगीं पुरंदरावर होता यांत शंका नाहीं.

फत्तेखान येत येत कऱ्हा नदीच्या कांठीं बेलसर गांवीं आला. तेथेंच पाण्याच्या आश्रयानें व पुरंदराच्या तोंडावर छावणी करून त्यानें आपल्या सैन्याची एक तुकडी शिरवळास पाठविली. त्या तुकडीचें आधिपत्य त्यानें

हैबतरावाचा पुत्र बल्लाळ यास दिलें. बल्लाळ शिरवळास येऊन तेथें बंदोबस्तानें राहिला. महाराजांनीं त्याला तेथून हुसकून लावण्याकरितां सरदार कावजी यास पाठविलें. कावजीबरोबर गोंदाजी जगताप, भिवाजी वाघ, संभाजी काटे, शिवाजी इंगळे, भिकाजी व त्याचा भाऊ भैरव चोर यांची योजना करण्यांत आली होती. बल्लाळ शिरवळ येथील कोटाच्या आश्रयानें होता. कावजीनें गुप्तपणें येऊन कोटाला वेढा दिला. तटावरून बल्लाळाचे सैनिक हाताला लागेल तें कावजीच्या सैन्यावर फेकीत होते. शेवटीं बल्लाळ या चकमकींत ठार होऊन त्याचें सैन्य पळत सुटलें. त्याचा पाठलाग शिवाजीच्या फौजेनें करून लुटींत हत्ती, घोडे, उंट, वस्त्रें व बरीच रोकड मिळविली.

बल्लाळांचा पराभव

बल्लाळाचें पराभूत झालेलें सैन्य बेलसर येथील फत्तेखानाच्या छावणींत आश्रयार्थ गेलें. शिवाजी पुरंदरावर आहे हें माहीत असल्यामुळें फत्तेखान पुरंदरावर चालून गेला. त्याच्या सैन्याच्या आघाडीस मुसेखान, पिछाडीस तो स्वतः, डाव्या अंगास फलटणचा राजा बजाजी नाईक व उजव्या अंगास घाडगे हे होते. खान गड चढून जात असतां वरून शिवाजीची फौज व खालून खानाची फौज यांची खणाखणी सुरू झाली. शिवाजीचे सैनिक तोफा, बंदुका, मोठाल्या शिळा, दारूचे बाण व गोफणगुंडे यांचा मारा करीत होते. फत्तेखानाच्या आघाडीवरील मुसेखान यास शिवाजीनें पहिल्याच हल्ल्यांत नामोहरम केलें. तरी तो पुनः तोंड करून चालून येऊं लागला. त्याच्या मदतीस फत्तेखान साऱ्या जमावानिशीं होता. शिवाजीच्या बाजूनें गोदाजी जगताप पुढें झाला. त्यानें मुसेखानाच्या छातींत भाला खुपसला. पण त्या बहाद्दरानें तो उपसून काढून तलवार घेऊन तो पुढें सरसावला. पण त्या जखमेनें हैराण झालेला मुसेखान गतप्राण होऊन खालीं पडला. मुसेखान पडल्यावर फत्तेखान मागें हटत चालला. त्याला शिवाजीच्या सैन्यानें बेलसरापर्यंत रेटीत नेलें. या युद्धांत शिवाजीचा बालमित्र बाजी पासलकर ठार झाला. फत्तेखानाबरोबर हें युद्ध शके १५७१ श्रावण शुद्ध १३ पूर्वी (१० ऑगस्ट १६४९) झालें (प. सा. खंड १, पृ. १२२) (शिवभारत).

शिवाजीपाशीं या वेळीं मनुष्यबळ फार थोडें होतें. पण थोड्या भांड-

बलावर मोठा व्यापार करण्याचें चातुर्य त्याच्यांत होतें. म्हणून जवळचें मनुष्यबळ काटकसरीनें वापरण्यासाठीं त्यानें स्वतः पुरंदर गडाचा आश्रय केला. गडावरचें थोडें सैन्यहि मैदानांतील मोठ्या सैन्याला भारी होतें. या कारणानें किल्ल्यावर बसून व शत्रूला अंगावर घेऊन महाराज लढले. त्यांच्या विरुद्ध पक्षांत बजाजी नाईक निंबाळकर हा मोठा सरदार होता. त्याशिवाय घाडगे इत्यादि हिंदु सरदार असून त्यांजहून मुसलमान सरदारांची संख्या मोठी होती. एका बाजूला हिंदु-मुसलमानांचें मोठें सैन्य व दुसऱ्या बाजूला एकट्या हिंदूंचें लहान सैन्य असा हा विषम सामना होता. पण महाराजां-वरील स्वामिभक्ति व हिंदुधर्मरक्षणाच्या नवीन ध्येयानें निर्माण झालेला आवेश यांच्या जोरावर महाराजांचे सैनिक युद्धास सज्ज झाले होते. पुरंदरचें युद्ध ऐन डोंगरांत झाल्यामुळें त्यांत मुसलमानांचा मोड महाराजांस किल्ल्याच्या आश्रयानें करतां आला. त्यापूर्वी शिरवळावर कावजीच्या फौजेनें गनिमी काव्यानेंच जाऊन तेथील कोटास शत्रूस सुगावा लागूं न देतां वेढा घातला होता. शिरवळच्या लढाईंत मुसलमानांचा सेनापति बल्लाळ हा ठार झाला व पुरंदरीं मुसेखान कामास आला. उलटपक्षीं शिवाजीचा कलिजा बाजी पासलकर याची आहुति पडली. एकूण हिशेब करतां शिवाजीपेक्षां फत्तेखानाचीच हानि फार झाली. या पहिल्या सलामींत फत्ते मिळविल्यामुळें शिवाजीच्या सैन्याचा आत्मविश्वास वाढून आदिलशाही सत्तेशीं झुंज देण्यास त्यास विशेष हुरूप चढला.

यानंतर विजापूरकरांशीं तह होऊन शहाजीची कैदेंतून सुटका कर-ण्याच्या अटीवर शिवाजीस कोंढाणा हा किल्ला सोडावा लागला. कोंढाणा जर सोडावा लागला तर पुरंदरहि सोडण्याची अट तहांत कां असूं नये ? याचें कारण शिवाजीनें पुरंदर तात्पुरता हाताखालीं घातला होता व फत्तेखानाशीं संग्राम होऊन त्याचा पराभव झाल्यावर त्यानें तो आपण होऊन सोडून दिला. कां कीं, महादजी नीलकंठ व भोसले घराणें यांचा घरोबा शहाजीपासून असून ते प्रसंगविशेषीं एकमेकांस साहाय्य करीत. तसें साहाय्य महादजीनें या वेळीं शिवाजीस केलें व शिवाजीनें आपल्या इच्छेविरुद्ध युद्धप्रसंगीं किल्ल्याचा ताबा घेतला अशी समजूत मागाहून महादजीनें विजापूर दरबाराची घातली. त्यानंतर सन १६५४ त महादजी

मृत्यु पावून त्याचे मुलगे आपसांत भांडूं लागले. ही संधि शिवाजीस बरी वाटून तो दिवाळीच्या सणांत त्यांच्या भेटीस गेला होता तेव्हां, त्यानें सर्व भावांस कैद करून किल्ला ताब्यांत घेतला व भांडणाचें मूळच उपटून टाकलें. पण त्यांचें आर्थिक नुकसान न करतां त्यांस सन्मानानें वागवून त्यानें त्यांस सासवडाजवळ चांबळी गांवीं इनाम जमीन दिली.

प्रकरण सहावें

चंद्रराव मोरे व शिवाजी

तस्य संवृतमंत्रस्य गूढाकारेङ्गितस्य च ।
फलानुमेयाः प्रारंभाः संस्काराः प्राक्तना इव ॥

– रघुवंश, प्रथमः सर्गः

जावळीचे मोरे हे एक जहागीरदार असून त्यांचें राज्य कोंकणांत रायगड ते पारघाट व देशावर मावळ ते महाबळेश्वर येथपर्यंत पसरलें होतें. म्हणजे स्वराज्याच्या बाल्यावस्थेंत शिवाजीच्या मावळमधील राज्याची पश्चिम व दक्षिण दिशा मोऱ्यांच्या जहागिरीनेंच अडविली होती. त्यामुळें मोरे व शिवाजीमहाराज यांचे वारंवार तंटे उद्भवत व मोरे हे विजापूरकरांचे मांडलिक असल्यामुळें शिवाजीच्या स्वराज्यविषयक आकांक्षेस आड येत असत. दंडाराजपुरीस, बदामीचा चालुक्य राजा प्रसिद्ध पुलकेशी दुसरा याच्या वेळीं मौर्य राजे राज्य करीत असत. त्यांचे हे वंशज असावे. त्या दृष्टीनें त्यांचा कोंकण व मावळ प्रदेशांतील अंमल एक सहस्राहून अधिक वर्षांइतका प्राचीन असला पाहिजे. त्यांना त्यांच्या कामगिरीवरून विजापूरकरांनीं वा त्यापूर्वींच्या बहामनी राजांनींच चंद्रराव हा किताब दिला होता. या कारणानें मोरे या आडनांवाप्रमाणें चंद्रराव हें त्यांचें दुसरें आडनांवच होऊन बसलें होतें. तत्कालीन कागदपत्रांत चंद्रराव या नांवाचा वारंवार मोघम उपयोग करण्यांत आल्यामुळें चंद्रराव म्हणजे कोणते मोरे हा संशय मनांत येतो. चंद्रराव मोरे यांस विजापूरकरांतर्फे मुरार जगदेव यानें पालवणीचे दळवी यांजबरोबर तळ-कोंकण जिंकावयासहि पाठविलें होतें.

चंद्ररावाचा जुन्यांत जुना उल्लेख १८ जून १६४६ च्या पत्रांत आढळतो. त्यावरून मोऱ्यांचें राज्य वाईच्या दक्षिणेकडील बावधन गांवापर्यंत पसरल्याचें दिसून येतें. तें पत्र येणेप्रमाणें :–

विनंतीपत्र

गोमाजी नरसिंह व रामाजी कृष्ण हवाले बावधन यांजकडून रा. रा. चंदरराऊ राजे गोसावी यांस –

" पिलाजी मालोजी देसाई यानें बावधनची वाडी मारली. दोन कुणबी धरले. वस्तभाव, जमान व कतबे घेतले. कुणब्यास तगादा होतो. तरी वस्तभाव, वगैरे देविली पाहिजे. व तगादा तोडिला पाहिजे."

वरील अधिकारी विजापूरकरांनीं बावधनास नेमले असून बावधनापासून पश्चिमेस थोड्या अंतरावर मोरे यांचें राज्य ठेपलेलें होतें.

खालील पत्र इ. १६५७ मधील आहे. त्या वेळीं मोऱ्यांचा ग्रंथ आटोपला असून त्यांचें राज्य शिवाजीमहाराजांनीं काबीज केलें होतें. हें पत्र विजापूरकरांचा अधिकारी दियानतराव यानें शिवाजीचा मुजुमदार निळो सोनदेव यास लिहिलें आहे. त्यावरून वाईच्या पूर्वेकडील ओझर्ड्यावरहि मोऱ्यांचा अंमल असावा, असा शिवाजीचा समज झालेला होता.

दियानत राऊ यांजकडून रा. रा. निळो गोसावी यांस ' मौजे उझरडे किले वंदन हा गांव चालत असतां सांप्रत नूरखान (सरनोबत) यास चालू झाला. यावर हुजुरून महालाचे देह (गांव) महालास मोकरर केले असे. तरी नूरखानाचें डंबेले मौजे मजकुर न करणें, विनाजी कोनेरीपंत सांगतील त्यासारखें केलें पाहिजे. त्याचे मदतीस अंतर पडो न देणें.'

नूरखान हा शिवाजीचा सरनोबत होता. त्याला ओझर्डे हा गांव जावळीखालचा समजून शिवाजीनें दिला होता. पण तो गांव मोरे यांचा नसून विजापूरकरांचा आहे, असा दियानतरावाचा दावा होता.

चंद्रराव मोरे या घराण्यापैकीं दौलतराव मोरे हा सन १६४९ त मरण पावला, असें चिं. वि. वैद्य यांनीं लिहिलेल्या शिवचरित्रांत ते म्हणतात. डॉ. बाळकृष्ण यांनीं लिहिलेल्या शिवचरित्रांत चंद्रराव दौलतराव मोरे सन १६४९ त मरण पावल्याचें नमूद आहे. याला आधार अफजलखान महमदशाही यानें कान्होजी जेधे यास जुलै १६४९ त पाठविलेल्या पत्राचा देण्यांत येतो. त्यांत म्हटलें आहे –

" चंद्रराव कदीम मयत जालियावरी गैरी लोकीं पैस करून बळकाविले आहे. याबद्दल त्यावरी नामजादी केली आहे. यैसीयासी तुम्ही दौलतखाह. तुम्ही हशम लोक मेळवून आपले तर्फेने सुरू करणें. मुलाहिजा न करणें. याच कामावरून तुमची सरफराजी आहे. कागद पावतांच सुरू करून खबर लिहिणें " (प. सा. सं. खं. १ पृ. १२०). या पत्रांत चंद्ररावाच्या मृत्यूची नक्की तारीख दिलेली नाहीं व चंद्ररावाचें दौलतराव हें नांवहि नाहीं. मात्र एवढें खरें कीं, १६४९ पूर्वी चंद्रराव केव्हां तरी मयत झाला असावा. अफजलखानाच्या पत्रावरून चंद्रराव वार्धक्यामुळें मयत झाला असावा, मारला गेला नसावा असें वाटतें. चंद्रराव मेल्यावर त्याचा योग्य वारस गादीवर न बसतां दुसऱ्या कोणा तरी मोरे घराण्यांतील इसमानें गादी बळकावल्यामुळें त्यास बाजूस सारून योग्य वारसास गादीवर स्थापण्यासाठीं विजापूरच्या बादशहानें अफजलखानाची मुद्दाम नेमणूक केली असल्याचें प्रस्तुत पत्र द्योतक आहे. त्या इसमाशीं लढल्याशिवाय तो गादी सोडणार नाहीं असें कळल्यावरूनच अफजलखानानें कान्होजी जेधे यास आपलें सैनिक घेऊन त्यावर चालून जाण्यास आज्ञा केली. पण कान्होजीनें स्वराज्य-स्थापनेच्या कामीं मदत करण्याची शपथ शिवाजीस दिली असल्यामुळें अफजलखानाच्या पत्रानें त्याला पेच पडून त्यानें शिवाजीस पत्र लिहून त्याचें मत विचारलें असतां या कामीं फार सावधगिरी बाळगून स्वतः न जातां शक्य तर पुत्रास पाठवावें असा शिवाजीनें त्यास सल्ला दिला.

अफजलखानानें पहिल्या पत्रानंतर दुसरें पत्र कान्होजीस ता. ३० जुलै १६४९ रोजीं रवाना केलें तें असें –

" तुमचे बाबे तिमाजी व त्रिंबक पंडित यांनीं लिहिलें. तरी जे जमायत असेल ते घेऊन येणें. ५० घोड्यांची सरबारगी तुम्हांसी दिधली असे. सरंजाम देऊं. पाईचे खलक आणाल त्यांस चाकर ठेऊं व आडिसरी देऊं शक अंदेशा न करणें " (प. सा. सं खंड १, पृ. १२१).

या पत्रांत अफजलखान स्वतःच जावळीच्या स्वारीवर जाणार असून आपल्या मदतीस येण्याविषयीं त्यानें कान्होजीस अनेक सवलती व बक्षिसें देऊं केलीं आहेत. कान्होजीप्रमाणें अफजलखानाचीं आज्ञापत्रें

इतरानांहि गेलीं असून त्यांपैकीं कित्येक खानाच्या मदतीसाठीं निघालेहि होते. त्यांतीलच त्रिंबक कान्हो हवालदार हा एक होता. तो २ ऑगस्ट १६४९ रोजीं कान्होजी नाईक देशमुख यास लिहितो –

" खान अजमसाहेबाचा कौल पाठविला असे. तरी जमेत घेऊन सिताब येणें. येथें खर्चाची सरंजामी होईल. आम्ही तायघाटाहून स्वार होऊन गेलों " (प. सा. खं. खंड १, पृ. १२१).

जावळीचा वृद्ध दौलतराव मेल्यावर त्याच्या गादीवर कोण बसलें हा वादग्रस्त प्रश्न आहे. मोरे यांची बखर, जेधे शकावलि व जेधे करीना यांची या बाबतींत एकवाक्यता असून त्यांनीं म्हटलें आहे –

" दौलतराव मोरे निपुत्रिक वारला, त्याच्या बायकोनें शिवथरच्या मोऱ्यांपैकीं कृष्णाजी बाजी यास शिवाजीच्या मदतीनें दत्तक घेतलें होतें. त्या वेळीं शिवाजीनें कृष्णरावांस अशी अट घातली होती कीं, तो जी खंडणी विजापूरकरांस देत होता ती त्यानें आपणांस द्यावी आणि खंडणी द्यावयाची नसल्यास पांच सहस्र सैन्यानिशीं आपणांस युद्धांत मदत करावी. ही बातमी विजापुरा[illegible] ळल्यावरूनच शिवाजीचा हा हस्तक गादीवरून काढून टाकून दुसरा आपला इसम बसवावा किंवा कृष्णराव शरण आल्यास त्यासच कायम करावें, यासाठीं बादशहानें अफजलखानाची योजना जावळी-प्रकरणीं केली होती. कान्होजीस लिहिलेल्या पत्रानंतर अफजलखानानें जावळीवर स्वारी करून कृष्णरावास शरण आणलें व त्याचे शिवाजीशीं असलेले संबंध तोडून टाकून त्यास बादशहाच्या पक्षास मिळवून घेतलें असें दिसतें. कारण गादीवर बसल्यानंतर कृष्णराव शिवाजीवर उलटला, खंडणी देईनासा झाला व त्याला स्वराज्यसाधनांत मदत करीनासा झाला. इतकेंच नव्हे तर शिवाजीच्या राज्यांतील जे गुन्हेगार लोक, त्यांनाहि आश्रय देऊं लागला. या गोष्टीचा उलगडा ता. ११ डिसेंबर १६५२ रोजीं शिवाजीनें मुसेखोऱ्याचे देशमुख व देशपांडे यांस लिहिलेल्या पत्रानें होतो. "

रंगा त्रिमल वाकडा हा सहा गांवांचा कुलकर्णी होता. त्यानें एका ब्राह्मण विधवेशीं शिंदळकी केली. ही बातमी दिवाणांत कळल्यावर रंगोबा पळून जावळीच्या हद्दींत चंद्ररावाच्या आश्रयास जाऊन राहिला व तिकडेच

मरण पावला. तो निपुत्रिक असल्यामुळें त्याचें कुलकर्णाचें वतन गांवच्या मोकदमांनीं व साबाजी यशवंतराव देशमुख व देशकुलकर्णी यांनीं शामराज नीलकंठ करंजकर राहणार हिवरें नागेश यास दिलें व त्याजपासून ५० होन शेरणी घेण्यांत आली (प. सा. सं. खं. १ पृ. १३५).

या वरील कारणामुळें शिवाजीनें कृष्णरावावर स्वारी करून त्याचा बीरवाडी जवळचा मुलूख घेतला. हा संदर्भ लक्षांत येण्यास सन १६५१–५२, शक १५७३ चा शिवाजी राजे यांनीं माल पाटील, बाजी पाटील व अधिकारी तपे बीरवाडी यांस दिलेला कौल-नामा विचारांत घ्यावयास हवा.

" 'बीरवाडीखालील देह (गांव) चंद्रराव खात होते. तेथील अधिकारपण आपलें आहे. येसीयास चंद्ररायामध्यें व आपणांमध्यें बरेपणा नाहीं म्हणून सदरहू गांवीचें अधिकारपण चंदरराऊ खात असेती. त्यासी जरी आपण कुसूर करावा तरी ते सबळ, आपण कमजोर, याकरितां आपण गय करीत आलों. हाली सदरहू गांव चंदररायें किले कांगोरी खाले दिधले आहेती. हे खबर आपण ऐकून साहेबांचे सेवेसी आलों आहों. तरी आपण मिरासदार नफर आहों. साहेबी आपणांस हातीं धरून मिरासीवरी बैसविले पाहिजे. म्हणून मालूम केले.' बराये मालुमाती खातिरेस आणौनु साहेब तुम्हावरी मेहेरबान होउनु सदरहू गांवांचे आदिकारपण तुमची मिरासी तुम्हास दिधली असे. तुम्ही आदिकारपण खाउनु आदिकारपणाची चाकरी करणें ... ... जे वक्तीं मसलतींचें काम पडेल ते वक्तीं तुम्ही दहा लोक बराबरी घेऊन साहेबापाशी येत जाणें." इत्यादि (प. सा. सं. खंड १, पृ. १३२).

वरील पत्रांत उल्लेखिलेल्या बिरवाडीपासून कांगोरी म्हणजे मंगळगड आग्नेयीस ४–५ मैल आहे.

प्रस्तुत पत्रानें शिवाजीनें पाटीलमजकूर यांची विनंती मान्य करून त्यांस प्रसंगविशेषीं आपला जमाव घेऊन मदतीस येण्याची अट घातली.

कृष्णरावाचा एक भाऊबंद हणमंतराव हा मोऱ्यांच्या जहागिरीपैकीं वाईच्या पश्चिमेकडील जोहर खोरें काबीज करून बसला होता. तेंहि त्याजपासून परत घ्यावयाचा अफजलखानाचा इरादा होता. त्या कामीं

खानास कान्होजी जेधे याची मदत हवी होती. म्हणून त्यानें सप्टेंबर १६४९ त कान्होजीस पत्र लिहिलें तें असें –

" तुमचे हेजीब जोहर खोऱ्याची मिसेली घेऊन गेले. हनोज तुम्हीं जोहर कार्बाज केलें नाहीं. आम्हीहि चांद जालियावरी वाईस येतों. तुम्ही सिताब जोहर काबीज करून हणमंतरायास उठविणें " (प. सा. सं. खंड १, पृ. १२२).

जोहर खोरें हणमंतराव यापासून घेण्याच्या बाबतींत अफजलखान व कान्होजी यांजमध्यें झालेले करारमदार खानानें कान्होजीस लिहिलेल्या खालील पत्रांत नमूद आहेत –

" तुम्हीं अरिजा पाठविला. तुमचे हेजीब आबाजीपंत येही मालुम केलें कीं, ' हणमंतराये काबीज केलें, ते आपणांस दिधलिया काबीज करून देईन व जाउलीची मसलत करीन. तेथील दोनिसे लोकांची नाइकी देविली पाहिजे. वेलंग आपले पाटिलकीचा गांव. त्या गांवींचे लोक चाकरीस ठेवीन. ' यैसियास जोहरची मिसेली पाठविली आहे. तेच जागा खासा राहणें. जाउलीची नाइकी दोशा लोकांची तुम्हांस देऊं. वेलंगचे बाबे वाईचे लोक चाकरीस ठेऊं. गुन्हा माफ आहे " (प. सा. सं. खंड १ पृ. १२३). या पत्रांतील 'गुन्हा' हा शब्द महत्त्वाचा आहे. त्यावरून कान्होजी शिवाजीस मिळाल्याची खबर अफझलखानास कळली होती म्हणून तो गुन्हा माफ करून त्यास खानानें इतर आमिष दाखविलें. कान्होजीस जोहरखोरें देण्याचें इतकें ठरून गेलें होतें कीं, त्याविषयीं खानानें ७ सप्टेंबर १६४९ रोजीं वाईच्या अधिकाऱ्यास कळवूनहि ठेवलें होतें.

' जोहरखोरें हणमंतराऊ काबीज आहेत. हाली कान्होजी जेधे यास दिधलें आहे. ते खासा काबीज करतील. त्यास मुकासा दिला आहे ' (प. सा. सं. खंड १, पृ. १२२).

सारांश, जावळीचा कृष्णराव व जोहर खोऱ्यांतला हणमंतराव या दोघांशीं अफजलखानाचा एकाच वेळीं लढा सुरू झाला होता. कान्होजी जेधे याची मदत दोनहि लढ्यांत खानास हवी होती. पण ती कान्होजी आंतून शिवाजीस सामील असल्यामुळें त्यानें केली नाहीं, तथापि खानाचा रोष आपल्यावर होऊं नये म्हणून त्यास त्यानें झुलवीत ठेवलें. खान १६४९ ते

१६५२ पर्यंत वाईसच सुभेदार होता. त्यानंतर विजापूरच्या बादशहानें त्यास कर्नाटकांत कनकगिरीकडे कामगिरीवर पाठविलें. खान जोंपर्यंत वाईस होता तोंपर्यंत शिवाजीस जावळी व जोहर खोरें प्रत्यक्ष युद्ध करून पूर्णपणें जिंकून घेणें अशक्य होतें. या प्रकरणासंबंधें जेधे शकावलि, जेधे करीना, शिव दिग्विजय, चित्रगुप्ताची बखर इत्यादि आधार आहेत. ते समकालीन नाहींत. सभासदाची बखर समकालीन नसली तरी राजारामाच्या कारकीर्दीत शिवाजीच्या वेळीं हयात असलेला कृष्णाजी अनंत सभासद यानें लिहिली आहे. ती अधिक विश्वसनीय होय. तितकेंच विश्वसनीय परमानंदकृत 'शिवभारत'. तें शिवाजीच्या सांगण्यावरून शिवाजीच्या हयातींतच परमानंदानें लिहिलें होतें. त्यांपैकीं सभासद म्हणतो, "राजानें रघुनाथ बल्लाळ सबनीस यास बोलावून आणिलें. विचार करतां चंदरराव मोरे यास मारल्या विरहित राज्य साधत नाहीं. त्यास तुम्हांवांचून हें कर्म कोणास न होय. तुम्ही त्याजकडे हेजिबीस जाणें' ऐसें सांगितलें. बराबर धारकरी शें-सवाशें माणूस निवडून दिले. ते स्वार होऊन जावलीनजीक जाऊन पुढें चंद्ररावास सांगून पाठविलें कीं, 'आपण राजियाकडून आलों आहों. कित्येक बोलणें चालणें तहरह कर्तव्य आहे.' उपरी त्यांनीं त्यांस आपणाजवळ बोलावून भेट घेतली. कित्येक बाह्यात्कारी बोलणें जहालें. बिराड दिलें, तेथें जाऊन राहिले. दुसरे दिवशीं मागती गेले. एकांतीं भेट घेतली. बोलणें जहालें. प्रसंग पाहून चंदरराव व सूर्याजीराव दोघां भावांस कटारीचे वार चालविले. जमातीनिशीं निघून चालले. खांसाच पडलियावरी लोक काय चालून येतात! असें कर्म करून परतोन राजियाकडे भेटीस आले. तेंच खासा राजा चालोन जाऊन जावली सर केली. मावळे लोकांस कौल देऊन संचणी केली" (सभासद-बखर, पृ. १०).

'शिवभारतां'त परमानंद कवि लिहितो, "बाजराज (बाजी), कृष्णराज व त्यांचा बाप चंद्रराज यांस युद्धांत मारून शिवाजीनें जावळी घेतली. चंद्रराजाचे सहायक व नातेवाईक यांस शिवाजीनें कापून काढलें. तेव्हां चंद्ररावाचा भाऊ प्रतापराव हा विजापुरास आदिलशहाकडे गेला."

सभासद व परमानंद यांचा जमेल तेथें मेळ घालून एकंदरींत अनुमान निघतें तें हें कीं, दौलतराव मोरे निपुत्रिक मेल्यावर त्याच्या गादीवर

कृष्णराव यास दत्तक म्हणून बसविण्यांत आलें. त्याचा व सूर्याजीराव याचा वध रघुनाथ बल्लाळ यानें केला.

आतां जोहर खोऱ्यांतील हणमंतराव याचा प्रश्न शिल्लक उरतो. त्याविषयीं सभासदाची माहिती प्रमाण धरावयास पाहिजे. सभासद लिहितो, "हणमंतराव म्हणून चंदररायाचा भाऊ जावळीजवळ कोयनेच्या कांठीं चतुर्बेट नांवाचें गांव आहे; तेथें बळ धरून होता. त्यास मारल्याविना जावळीचें शल्य तुटत नाहीं असें जाणून संभाजी कावजी नांवाचा राजियाचा महालदार होता, त्यास हणमंतरायाकडे राजकारणास पाठवून, सोइरिकीचें नातें लावून, एकांतीं बोलाचालीस जाऊन संभाजी कावजी यानें हणमंतरायासी कटारीचे वार चालवून जिवें मारलें. जावली काबीज केली. शिवथर खोऱ्यांत बाबाजीराव म्हणून पुंड होता. तोहि कैद करून त्याचे डोळे काढले" (सभासद, पृ. १०।११). सारांश, रघुनाथ बल्लाळ व संभाजी कावजी यांनीं प्रत्यक्ष युद्ध न करतां अन्य रीतीनें मोरे घराण्यांतील जेवढे पुढारी होते तेवढ्यांची वाट लावून शिवाजीस जावलीचें राज्य मिळवून दिलें. मात्र जे पुरुष मारले त्यांचें परस्परांशीं नातें कोणतें होतें याविषयीं निःसंशय असें कांहींच विधान करतां येत नाहीं. तथापि एवढें मात्र स्पष्ट दिसतें कीं, जावळीचें राज्य मोऱ्यांच्या भाऊबंदांत वांटलें गेलें असून त्यांपैकीं पुढाऱ्यांचा निःपात करून शिवाजीनें जावळी प्रांत काबीज केला. त्यांचे वाडे जावळी प्रांतांत ठिकठिकाणीं होते. त्यांपैकीं शिवथर येथें एका मोरे घराण्याचा वाडा होता. त्याशेजारीं रामदासस्वामी सन १६५४ त जाऊन राहिले होते.

शिवाजीनें, अफजलखान वाईस सुभेदारीवर असतांना, जावळी निष्कंटक केली असली तरी मोऱ्यांचा सगळा मुलूख घेऊन त्याची व्यवस्था लावण्याचें काम या मुदतींत म्हणजे सन १६४९ ते १६५३ यांच्या दरम्यान पार पडलें नसावें. सन १६५५ त अफजलखानास बादशहानें कर्नाटकांतील कामगिरीवर पाठविल्यामुळें खानाचा दाब नाहींसा होतांच शिवाजीनें जावळी प्रांताची आपणांस हवी तशी व्यवस्था लावली व ती सन १६५७ पर्यंत पुरी केली.

अफजलखानाबरोबर प्रतापराव वाईस आला व त्यानंतर सन १६५९ त

अफजलखानाचा वध झाल्यावर प्रतापरावाचें काय झालें हें समजत नाहीं. पण सन १६६५त जयसिंग महाराष्ट्रांत आला असतां त्यानें औरंगजेबास पत्र लिहून आपण शिवाजीचे शत्रु व त्याच्या पक्षांतील मातबर लोक यांना फोडण्याचा प्रयत्न करीत असून त्यांत यश आल्यास त्यांना मनसबा व जहागिरी द्याव्या लागतील त्याबद्दल त्याचें मत विचारलें होतें. त्यांत तो लिहितो, " जावळीचा जुना जमीनदार चंद्रराय व त्याचा भाऊ यांना मीं बोलावणें पाठवून पुष्कळ अभिवचनें दिलीं आहेत " (प. सा. सं. खं. १, पृ. २८६). यावरून जावळींत मयत चंद्ररावाचे बरेच भाऊबंद शिल्लक होते. त्यांतील हा चंद्रराव म्हणजे अफजलखानाकडे गेलेला प्रतापरावच असावा. शत्रूशीं युद्ध करून त्यास जिंकणें शिवाजीस जेव्हां अशक्य वाटे, तेव्हां तो घातपाताचा अवलंब करीत असे. त्याच पद्धतीचा अवलंब त्यानें मोरे-प्रकरणीं केला, असें म्हणावें लागतें.

प्रकरण सातवें

अफजलखानाची स्वारी

(सन १६५९)

साहसे श्रीः प्रतिवसति।

फत्तेखान पराभूत होऊन परत गेल्यावर त्याच्यामागून अफजलखान शिवाजीविरुद्ध चालून येईपर्यंत मध्यंतरीं दहा वर्षें गेलीं. त्या काळांत त्यानें चंद्रराव मोऱ्यास बुडवून जावळी प्रांत घेतला व तेथून खालीं उतरून कल्याण-भिवंडीपर्यंतचा मुलूख काबीज केला (ऑक्टोबर १६५७). हें सर्व घडवून आणण्यास सैन्यबळ मोठें पाहिजे. त्याच्या खर्चाचा भार सहन होण्याइतका विस्तीर्ण व संपन्न मुलूख शिवाजीपाशीं नसल्यामुळें पैसा उभा करण्याकरितां त्यास जुन्नरची लूट करावी लागली. याच मध्यंतरांत विजापूरचा समर्थ सुलतान महंमदशहा ४ नोव्हेंबर १६५६ त मरून त्याच्या गादीवर त्याचा अल्पवयी पुत्र अल्लीशहा बसला व बडीसाहेबीण राज्यकारभार पाहूं लागली. या बदलामुळें विजापूरची राज्यसत्ता दुर्बल झाली. या दौर्बल्यांत औरंगजेबाच्या आक्रमणाची भर पडून विजापूरची सत्ता अधिकच खालावली. सरदारांवरचा महंमदशहाच्या वेळचा दाब उडाल्यामुळें सरदारा-सरदारांत वितुष्ट माजलें. अशा स्थितींत मोगली आक्रमणापासून राज्याचा बचाव करण्याकरितां २४ ऑगस्ट १६५७ मध्यें विजापूरकरांना औरंगजेबामार्फत दिल्लीचा बादशहा शहाजहान याजबरोबर मानहानिकारक व नुकसानकारक तह करावा लागला. त्या तहांत मागें लिहिल्याप्रमाणें (१) आदिलशहानें मोगलांस एक कोटि रुपये खंडणी द्यावी व (२) बेदर, कल्याणी, परिंडा हे किल्ले, त्याखालचा मुलूख व निजामशाही कोंकणांतील सर्व किल्ले व वांगणी परगणा मोगलांस द्यावा असें ठरलें.

वरील तहामुळें देशावरील विजापुराचें राज्य बरेंच खचीं झालें. त्याशिवाय शिवाजीनें कोंकणांतहि आदिलशाहीस चांगलाच टोला हाणला. त्यानें विजापुराहूनहि श्रेष्ठ व सार्वभौम अशी जी मोगली सत्ता तिचा

औरंगजेबामार्फत स्नेह संपादून विजापूरकरांपासून हिसकावून घेतलेल्या मुलुखावर ता. ३ एप्रिल १६५७ मध्यें शिक्कामोर्तब मिळविलें. शिवाजीकडून औरंगजेबाकडे आलेला वकील सोनाजीपंत याजपाशीं त्यानें 'सांप्रत जे किल्ले व मुलूख विजापूरकरांकडील तुमचे हातीं होते, ते पेशजीप्रमाणें होऊन तुमचे मनोगताअन्वयें बंदर दाभोळ व त्याजखालील मुलूख तुम्हांस दिल्हा असे' हें फर्मान दिलें. ५ जून १६५९ रोजीं औरंगजेब शहाजहानास पदच्युत करून दिल्लीच्या तख्तावर बसल्यानंतर त्यानें सलोखा दर्शविणारा पोशाखहि शिवाजीकडे पाठवून दिला. अशा रीतीनें शिवाजी आदिलशहाच्या बरोबरीचा होत चालला. त्याला असाच प्रबळ होऊं दिला तर तो सबंध आदिलशाही घशांत घातल्याशिवाय राहणार नाहीं अशी विजापूरदरबारास भीति पडून त्यानें शिवाजीशीं लढण्याच्या महत्त्वपूर्ण कामगिरीवर अफजलखानाची योजना केली.

खानाचा पूर्वपरिचय

अफजलखान हा विजापूर-दरबारांतील प्रथमश्रेणीचा सेनापति होता. त्याची कर्नाटकांत शहाजीशीं चांगलीच जान-पछान झाली असून त्या दोघांनीं तिकडील अनेक मोहिमांत सहकार्यहि केलें होतें. शहाजीस विजापुरास पकडून आणण्याच्या कामगिरीवर अफजलखानाचीच योजना झाली असून त्यानें शिवाजीस लहान बच्चा असतांना पाहिलें होतें. शिवाजीचा वडील भाऊ संभाजी व अफजलखान कनकगिरीच्या मोहिमेवर असतां अफजलखानानें संभाजीची उपेक्षा केल्यामुळें तो प्राणांस मुकला अशी शहाजीची समजूत होऊन त्याचा त्याजवर रागहि झाला होता. शिऱ्याचा किल्लेदार कस्तुरी रंगा यास मुलाखतीस बोलावून अफजलखानानें दगाबाजीनें ठार मारलें होतें, याची दुष्कीर्ति स. १६३८ पासूनच सर्वत्र झाली होती. असलें याचें पूर्वचरित्र भयानक व कांहींसें हीन होतें.

या प्रांतावर त्याची आतां मोहिमेकरितां योजना झाली होती, त्याची त्याला वाई व शिरवळ परगण्याचा सुभेदार या नात्यानें इ. स. १६४९ पासून खडान् खडा माहिती होती. जावळी, वाई, शिरवळ, मावळ यांतील देशमुख त्याच्या दाट परिचयाचे होते. सन १६४९ त फत्तेखान शिवाजीशीं

लढावयास आला होता; तेव्हां अफजलखान वाई परगण्यावर असल्यानें शिवाजीचें धोरण, धूर्तपणा व हालचाली यांची ओळख त्यास चांगली झाली होती. मरहूम महंमदशहा हा कट्टा हिंदुद्वेष्टा असून त्यानें आपल्या कारकीर्दींत हिंदूंचा छळ आरंभला होता. त्यानें फर्मान काढून हिंदूंना दिवाळी, दसरा इत्यादि सण उघडपणें करण्यास बंदी केली होती. तसेंच कुरानशरीफाच्या हुकुमावरून व ईश्वराच्या आज्ञेवरून एकंदर सुखवस्तु लोकांपासून व मूर्तिपूजकांपासून कर घ्यावा असें त्यानें ठरविलें होतें. अशा महंमदशहाचा अफजलखान आपणांस अभिमानी वा मानसपुत्र म्हणवीत असे. या दृष्टीनें अफजलखान हिंदूंचा शत्रु असला तरी आदिलशाही राज्यांतील प्रजा हिंदु असल्यामुळें व राज्यकारभारहि हिंदूंच्या मदतीनें करावयाचा असल्यामुळें इतर मुसलमान अधिकाऱ्यांप्रमाणें त्यानेंहि आपलें धोरण सहिष्णुतेचें ठेवलें असल्याचें त्याच्या कित्येक आज्ञापत्रांवरून दिसून येतें. त्यासंबंधीं दोन उदाहरणें येथें देणें इष्ट होईल.

अफजलखान हा वाई परगण्यावर सुभेदार असतां त्यानें ता. २२ नोव्हेंबर १६५८ रोजीं वाईच्या देशमुखांना एका खुर्दखतानें कळविलें, "हालीं कुल इनामें अमानत करण्याविषयीं फर्मावलें आहे. तरी नरसिंहभट बिन रंगभट व एकनाथभट बिन रामेश्वरभट यांची बोरखळ व किण्ही (किन्हई) येथें एकंदर १॥ चावर जमीन चालविणें" (प. सा. स. खं. १, पृ. १६७). एखादा नवीन सुभेदार नेमून आला किंवा एक सुलतान मरून त्याच्या जागीं दुसरा सुलतान गादीवर बसला तर पूर्वीं दिलेलीं इनामें नाममात्र एकदां जप्त करून पुनः चालू करण्याची पद्धत असे. तिला धरून अफजलखानाचें हें इनाम पुनः चालू करण्याविषयीं खुर्द-खत आहे.

विजापूरचा नवीन सुलतान अल्ली आदिलशहा यानें मुजफराबाद (कोंकण) येथील हाच सरहवालदार अफजलखान यास ता. ९ ऑक्टोबर सन १६५९ रोजीं एका फर्मानानें कळविलें. 'केसो व रंगो सरदेसाई यांचा वंशपरंपरेचा इनाम अबदुल नबी फकुद्दिन पटीदार यास दिला आहे तो परत त्यांचा त्यांस द्यावा' (प. सा. सं. खंड १, पृ. १७४) म्हणजे (संगमेश्वराजवळील) ब्राह्मणांचें इनाम महमदशहाच्या कारकीर्दींत काढून वरील मुसलमानास देण्यांत जो अन्याय झाला होता तो नवा सुलतान अल्लीशहा

याच्या कारकीर्दींत दूर करण्यांत आला. हें फर्मान अर्थात् खानाच्या शिफारशीवरूनच निघालें असलें पाहिजे.

अशा रीतीनें शहापासून खानापर्यंत सर्वांची सर्वसामान्य वागणूक सहिष्णुतेची किंबहुना न्यायाची असली तरी प्रसंगविशेषीं त्यांच्या धर्मवेडास उसळी येऊन ते हिंदुधर्माचा उच्छेद करण्यासहि प्रवृत्त होत. तसाच प्रसंग आतां शिवाजीनें हिंदूंचें स्वतंत्र राज्य स्थापण्यासाठीं संग्राम सुरू करतांच आला. अफजलखान शिवाजीवर यावयास निघाला तेव्हां त्यानें वाटेंत तुळजापूर, पंढरपूर इत्यादि क्षेत्रांना उपद्रव दिला, त्याला जुन्या कागदपत्रांचाहि दुजोरा मिळतो, तो असा.

शके १५८१, सन १६५९

'पंढरपूर, तुळापूर (तुळजापूर), कोलापूर, रवळनाथ येथील मूर्ति कांडिली. विजापुरांत आलि पातशाय असतां अफजलखान वजिरानें हें केलें. मार्गशीर पंचमीस शिवाजी भोसला यानें महापापी अफजलखान मारिला. मार्गशीर वदि ७ शनिवारीं पनाळे घेतले. सिंहस्त बृहस्पति आला होता. पौष शु. १४ वाळव्यास शिवाजीच्या लोकांनीं तोरण बांधलें!' (प. सा. सं. खं. १, पृ. १७८).

वरील पत्रांतील मजकूर कांहींसा चुकीचा व अशुद्ध आहे. त्यापेक्षां ता. ८ ऑक्टोबर सन १६६३ चें पोटपत्र कोनेरी विश्वनाथ ताटे व बहिरो रत्नाकर थिटे क्षेत्र पंढरपूर यांनीं अहमदनगर येथील सभ्य स्मार्त, महाजन महाप्रश्नीक या विद्यमानें तक्रार केली, त्यासंबंधीं असून त्यांत पुढील मजकूर आहे: 'जसवंतराऊ यांनीं आंबेजोगाई हें स्थळ निवाड्यास नेमलें. पण आराध्ये आले नाहींत. त्यांनीं निवाडा करावा तंव अफजलखानाची तसवीस क्षेत्रास लागली' (प. सा. सं. खं. १, पृ. २५७). नंतर या भांडणाचा निकाल ता. २० जानेवारी सन १६६८ रोजीं लागला. त्या वेळेच्या पत्रांत 'पंढरीपंत तबीब मोकाशी पंढरपूर व क्षेत्रास अफजलखानाची तसवीस लागली' असा उल्लेख आहे (प. सा. सं. खंड १, पृ. ३३२). या शेवटच्या दोन पत्रांत एकट्या पंढरपुराचा निर्देश आहे व तोहि क्षेत्रास तसवीस लागली एवढ्यापुरताच आहे. त्यावरून मूर्ति फोडल्याचें स्पष्ट होत नाहीं. इतकें खरें कीं, त्यानें पंढरपुरास येऊन विध्वंस केला. कदाचित्

तो देवालयाचाहि असूं शकेल. अशा प्रसंगीं प्रसिद्ध देवस्थानांतील मूर्ति काढून लपवून ठेवण्याचा प्रघात होता. त्याप्रमाणें चलमूर्ति देवळांत ठेवून अचलमूर्ति बडव्यांनीं लपवून ठेवली असावी. 'शिवभारतां'त परमानंदानें अफजलखानाच्या स्वारीचें सविस्तर वृत्त दिलें आहे. त्यानें पंढरपुराचा नसला तरी तुळजापुराचा उल्लेख केला आहे. शिवाजीच्या तोंडीं तो अफजलखानास उद्देशून पुढील शब्द घालतो, 'या अफजलखानानें तुळजापूरच्या भवानीचा अपमान केला आहे (अवज्ञायत वै देवीं तुळजापुरवासिनीम्) म्हणून त्याचा वध केलाच पाहिजे.' मिळून पंढरपूर व तुळजापूर येथील मूर्तींचा अफजलखानानें नाश केला नसावा. अचलमूर्ति पुजाऱ्यांनीं काढून ठेवल्या असाव्या असें वाटतें.

अफजलखान जून १६५९ त विजापुराहून वाईकडे यावयास निघाला. त्या वेळीं अली आदिलशहानें कान्होजीप्रभृति मावळांतील देशमुखांना खानास मदत करण्याविषयीं पत्र लिहिलें. त्यांत तो म्हणतो, "शिवाजीनें अविचारानें व अज्ञानानें निजामशाही कोंकणांतील मुसलमानांना त्रास देऊन लूट करून पातशाही मुलुखांतील कित्येक किल्ले हस्तगत केले आहेत. यास्तव त्याचे पराभवार्थ अफजलखान महमदशाही यास तिकडील सुभेदारी देऊन नेमून पाठविलें आहे. तरी खान मजकुराचे रजामंदींत व ताबेदारींत राहून शिवाजीचा पराभव करून निर्मूळ फडशा करावा. शिवाजीचे निसबतीचे लोकांस आश्रय न देतां ठार मारून या दौलतीचें कल्याण इच्छिणें. खानाच्या सांगण्यावरून तुमची योग्यता वाढविली जाईल. त्याचे सांगण्याप्रमाणें वागावें. तसें न केल्यास परिणाम चांगला होणार नाहीं." ता. १६ जून १६५९ (प. सा. सं. खंड १, पृ. १७१).

वाईस आगमन

अफजलखान जून १६५९ त विजापुराहून निघून ३० सप्टेंबर १६५९ पूर्वीं वाईस येऊन पोंचला. तेथें आल्यावर त्यानें कान्होजी जेध्याचा पुत्र शिवाजी यास पुढीलप्रमाणें कौलनामा पाठविला: "शिवाजी फर्जंद कान्होजी जेधा देसाई तर्फ भोर यांस — कृष्णाजी पंडित हवालदार व अमाजी आनंदराऊ किल्ले रोहिडा येहि तुमचे जाबे मालूम केले. तुमचा बाप व बिरादर दहावीस वरिसे शिवाजी भोसलेचे चाकरी करितात. तुम्ही

त्या बातेचा उजूर व शक अंदेशा न करितां येणें. आलेवरी सरफराजी होईल" (प. सा. सं. खंड १, पृ. १७४).

कान्होजी जेधे आरंभींचा कांहीं काळ शिवाजीस मिळावें न मिळावें अशा डळमळीत मनःस्थितींत असला तरी अफजलखान वाईस आल्यावर तो आदिलशाहीस कायमचा सोडून गेला अशी त्याची खात्री होऊन त्यानें कान्होजीचा मुलगा शिवाजी यास आपल्याकडे ओढण्याकरितां वरीलप्रमाणें आमिष दाखविलें. अफजलखान वास्तविक शिवाजीचें राहण्याचें गांव जें खेडेबारें व राजगड त्या रोखानें यावयास पाहिजे. पण तसें न करतां तो वाईस गेला; याचें कारण वाई हाच त्याच्या सुभ्याचा गांव, तेथें त्याचें वास्तव्य पुष्कळ वर्षें झालेलें, तेव्हां स्थानिक कुमक व सहकार्य तेथेंच मिळण्याचा संभव अधिक म्हणून त्यानें प्रथम वाईसच मुक्काम करण्याचें योजिलें. या योजनेस शिवभारतकारानें आणखी एक कारण दिलें आहे तें असें— "चंद्रराव मोऱ्याचें राज्य आपणांस मिळावें म्हणून चंद्ररावाचा भाऊ प्रतापराव यानें विजापुरास जाऊन व आदिलशहाची सेवा करून त्यास संतुष्ट केलें. या प्रतापरावानेंच भेद सांगून अफजलखानास वाईस आणलें. ज्याच्या ताब्यांत जावळी त्याच्या ताब्यांत वाई प्रांत, सह्याद्रि व समुद्रकिनारा असें समजून अफजल वाईस आला व त्यास प्रतिकार करण्यासाठीं शिवाजी पायदळासह जावळीस आला. त्यापूर्वी त्यानें आपला सेनापति नेताजी पालकर यास आदिलशाहीच्या मुलुखांत शिरून त्याचा विध्वंस करण्यास सांगितलें व आपल्या गैरहजेरींत आपलें राज्य व दुर्ग यांच्या रक्षणाचीहि तजवीज करून ठेवली."

अफजलखानाची तयारी

विजापूरचा कारभार अल्लीशहाची आई बडीसाहेबीण हीच पाहत असून तिनें अफजलखानाबरोबर दहा सहस्र घोडेस्वार व पायदळ दिलें होतें. त्यांत अंबरखान, याकुतखान, हसन पठाण, रणदुल्लाखानाचा पुत्र (रुस्तुमजमाचा भाऊ) अंकुशखान, हिलालप्रभृति मुसलमान आणि घोरपडे, पांढरे, खराटे, कल्याण यादव, मंबाजी भोसले (शिवाजीचा चुलत चुलता) अंबाजीराव घाटगे व काटे हे मराठे सरदार होते. अफजलखानाचा बेत प्रथम जावळी जिंकून ती प्रतापराव मोरे याच्या हवालीं करण्याचा होता

शिवाजीस खानाचा हा बेत पथ्यावर पडला. कारण खान पुरंदर व सिंहगड या मैदानी मुलुखांत आला असता तर त्याच्याशीं यशस्वी रीतीनें झुंज देणें महाराजांना कठीण गेलें असतें. त्यापेक्षां जावळीसारख्या पहाडी व निबिड अरण्यांत झगडण्यांतच त्यांना यशाची आशा होती. या दृष्टीनें आपणांस इष्ट अशा क्षेत्रांतच अफजलखान शिरणार हें कळतांच महाराज जावळीच्या रक्षणार्थ तेथेंच आधीं येऊन बसले. प्रथम उभय पक्षांतर्फे सामदामाची वकिलांमार्फत बोलणीं सुरू झालीं. खानातर्फे कृष्णाजी भास्कर व महाराजांतर्फे पंताजी गोपीनाथ हे विचार-विनिमय करण्यास उभयतांकडे जाऊं-येऊं लागले. कृष्णाजी भास्कर हा रोहिडा किल्ल्यावरील पूर्वीचा हवालदार व महाराजांच्या परिचयाचा होता. त्याजबरोबर खानानें महाराजांस पाठविलेलें पत्र चढेलपणाचें होतें. तें असें –

"तुमचा उद्धटपणा शहाच्या मनास झोंबत आहे. निजामशाही बुडाल्यावर स्वतः हस्तगत केलेला मुलूख आदिलशहानें तहांत मोगलांस दिला होता. तो डोंगरी किल्ल्यांनीं भरलेला मुलूख तुम्हीं घेतला आहे. दंडाराजपुरीचा मुलूख तुम्हीं काबीज केल्यामुळें तेथील राजा जळफळत आहे. चंद्ररावाचें विस्तीर्ण राज्य तुम्हीं हरण केलें आहे. कल्याण-भिवंडी घेऊन तुम्हीं यवनांच्या मशिदी जमीनदोस्त केल्या आहेत, काजी-मुल्ला यांना कैद केलें. यासाठीं राजा ! माझ्या आज्ञेप्रमाणें तूं संधि कर आणि सर्व किल्ले व मुलूख देऊन टाक. सिंहगड, लोहगड, पुरंदर, चाकण, नीरा व भीमा यांजमधील प्रदेश सोडून दे" (श्रीशिवभारत).

वरील पत्रांत खानानें महाराजांच्या अपराधांची नामावळी वाचून त्यांना, घेतलेला मुलूख सोडण्याचा सल्ला दिला आहे. महाराजांचा समूळ नाश करण्याच्या उद्देशानें अलीशहा व बडीसाहेबीण यांनीं खानास पाठविलें होतें. फत्तेखानापेक्षां अफजलखानाची तयारीहि मोठी होती. तो शिवाजीचा मोड करून त्यास विजापुरास कैद करून नेण्याच्या वा जमल्यास त्याच्या जिवाचा घात करण्याच्या इराद्यानेंच आला होता. खान विश्वासघातानें जीव घेण्यास कमी करणार नाहीं, अशी त्याच्या पूर्व चरित्रावरून महाराजांस व जिजाबाईसहि भीति वाटत असल्यास नवल नाहीं. जिजाबाईहि त्यास कर्नाटकापासून पूर्णपणें ओळखून होत्या. कदा-

चित् त्यांचा तिकडे असतांना त्याजबरोबर मामुली परिचयहि झाला असेल; शिवाय ती शहाजीची भार्या या नात्यानें खान त्यांना मानहि देत असेल. या दृष्टीनें डचांनीं एप्रिल १६६० मध्यें केलेल्या पत्रव्यवहारांत म्हटल्याप्रमाणें जिजाबाई खानाशीं आपल्या पुत्राच्या वर्तानें रदबदली करण्यास गेल्या नसतील असेंहि म्हणवत नाहीं ! " या शिवाजीला शस्त्राच्या जोरावर तरी नाहींसा करा किंवा गोड शब्द व सलोख्याचीं अघळपघळ अभिवचनें देऊन तरी त्याचा जीव घ्या, असा स्पष्ट हुकूम बादशहानें दिला व तो खानाला दरबारांतील एका अत्यंत वजनदार गृहस्थामार्फत कळविला " असें याच पत्रव्यवहारांत डचांनीं म्हटलें आहे. तेंहि जिजाबाईस कळल्यावर एरवीं पडदानशीन असणाऱ्या जिजाबाईसाहेबांनीं आपल्या लाडक्या शिवबाच्या रक्षणार्थ त्याची गांठ घेतली, या डचांच्या विधानावर अधिक विश्वास ठेवावासा वाटतो ! (प. सा. सं. खंड १, पृ. १८५).

जिजाबाईंची रदबदली

वरील भेटींत जिजाबाई खानास म्हणाल्या, " आमच्या मुलास तुम्हीं वाईट रीतीनें वागवूं नये किंवा भीति दाखवूं नये. कारण तो घाबरून गोंधळला म्हणजे काय करावें व काय न करावें असें त्याला होऊन जाईल. त्याजवर तुम्ही मेहेरनजर करा. म्हणजे विजापूरकरांचे जे २३ किल्ले त्यानें घेतले आहेत ते तो तुम्हांस देऊन टाकील. तो आपल्याकडे फक्त ४ किल्ले ठेवील आणि आपलें उत्पन्न आहे त्यावर सुखासमाधानानें राहील." हें ऐकून अफजलखानानें शपथपूर्वक सांगितलें कीं, 'मी शिवाजीस यत्किंचितहि इजा पोंचविणार नाहीं. उलट बादशहाची त्याजवर मर्जी होईल असें मी करीन !' हें वर्तमान समजल्यावर शिवाजीनें ताबडतोब पत्र पाठवून कळविलें कीं, " माझ्या मनाचें पूर्ण समाधान झालें. आतां माझी विनंती अशी आहे कीं, आपण जावळीस यावें. म्हणजे चार लोकांनिशीं मी भेटीस येऊन नम्रपणें किल्ल्या अर्पण करीन " (प. सा. सं. खंड १, पृ. १८५). जिजाबाई खानाच्या भेटीस गेल्या होत्या, असें राजापुराहून हेन्री रेव्हिंग्टन व रँडाल्फ टेलर यांनीं इंग्लंडांत कंपनीकडे ता. १० डिसेंबर १६५९ रोजीं लिहिलेल्या पत्रांतहि म्हटलें असल्यानें, या घटनेच्या सत्यतेविषयीं शंका उरत नाहीं. जिजाबाईंनीं खानाच्या भेटींत ज्या अटी कबूल केल्या त्याच जरी नसल्या

तरी तसल्याच अटी घालून खानास आपला वकील पंताजी गोपीनाथ याजबरोबर शिवाजीनें पत्र पाठविलें. परमानंदानें त्या अटींचा खालीलप्रमाणें निर्देश केला आहे –

" जर हें वन-वैभव पाहण्याची आपली इच्छा असेल तर तें या जावळींत येऊन पाहावें. आपण इकडे आलांत हें योग्य झालें. त्यामुळें मला निर्भयता उत्पन्न होऊन माझें वैभव वाढेल. आपण मार्गानें दक्षतापूर्वक यावें. आपण मागत आहां ते किल्ले व जावळी मी देतों. ज्यांच्याकडे दृष्टि फेंकणेंहि कठीण अशा आपणांस येथें निःशंक मनानें पाहून ही माझ्या हातांतली कट्यार मी आपणांपुढें ठेवीन. "

महाराजांनीं पडखाऊपणाचें धोरण बुद्ध्या स्वीकारलें. त्यांचा नेहमींचा क्रम शक्य तितका कमी प्रतिरोधाचा असे. त्यांनीं इतकी शरणागति पत्करल्यावर खानाला त्यांजबरोबर लढण्याचें कारणच उरलें नाहीं. फक्त दोघांनीं एकदां शेवटची भेट घेऊन दोन सत्तांच्या वितुष्टावर पडदा पाडावयाचा. त्यासाठीं जावळीच्या किल्ल्यापाशीं शिवाजीस भेटावयास येण्याचें खानानें कबूल केलें. त्याच्या बरोबरच्या सहकाऱ्यांनीं त्याच्या कार्यास मोडता घातला. पण खानानें तो जुमानला नाहीं. कारण त्याला स्वतःच्या सामर्थ्याविषयीं खात्री होती. शिवाय त्याचें सैन्य त्याजपाशीं होतेंच. महाराजांनींहि आपल्याकडून जय्यत तयारी केली. अफजलखानास व त्याच्या सैनिकांस खुष ठेवण्यांत त्यांनीं बिलकुल कसूर राहूं दिली नाहीं.

अफजलखानाचें स्वागत

अफजलखानानें महाबळेश्वराचा डोंगर उतरून आपल्या सैन्याचा कोयनेच्या कांठीं कळकीच्या बेटांत तळ दिला व तेथेंच डेरे-राहुट्या ठोकण्यांत आल्या. अफजलखानाबरोबर त्याचे बाजारबुणगे लोक होतेच. त्यांनीं आपलीं दुकानें व बाजार छावणीपाशीं थाटला. त्यांत हरजिन्नस भरला होता. त्यांतील कांहीं मूल्यवान् जिन्नस खरेदी करून, त्यांचा आहेर खानाबरोबरच्या मानकऱ्यांना करण्याची अफवा महाराजांनीं पसरवून, खानाच्या आज्ञेनें त्याचे व्यापारी आपणांकडे बोलावून घेतले. त्यांनीं आपल्याजवळचें जवाहीर महाराजांस दाखविलें. तें घेऊन त्यांनीं व्यापाऱ्यांस आपल्यापाशींच ठेवलें. हा आहेर अफझलखानाबरोबरचे याकुतखान, अंबरखान, हसन-

खान व आपला चुलता मंबाजीराजे यांस देण्याचा त्यांनीं बहाणा केला. (शिवभारत).

खुद्द खानासाठीं भेटीकरितां एक सुंदर शृंगारलेली सदर महाराजांनीं किल्ल्याच्या पायथ्याशीं तात्पुरती उभारली व दुसरी सदर समोरच आपणांकरितां तयार ठेवली. ही खासे व त्यांचे मानकरी यांची व्यवस्था झाली. पण बरोबरच्या सैनिकांकडेहि पाहावयास नको काय ? त्यांना भेटीच्या दिवशीं व वेळीं थाटाची मेजवानीहि देण्याचा बेत करण्यांत आला (डचांचें पत्र, प. सा. सं. खं. १, पृ. १८६). या सर्व तयारीनें खानाच्या गोटांत सर्वत्र आनंदी-आनंद होऊन विश्वास उत्पन्न झाला व जो तो महाराजांची वाहवा करूं लागला.

तुळजादेवीचें दर्शन

महाराजांची देवीवर पूर्ण श्रद्धा होती. ते अवतारी पुरुष आहेत व देवी त्यांस संकटसमयीं दर्शन देऊन मार्गदर्शन करते, अशी समजूत तत्कालीन लोकांत सर्वत्र पसरली असल्याचें परमानंदाच्या वृत्तान्तावरून सिद्ध होतें. त्यानें म्हटलें आहे : " भक्तवत्सल तुळजादेवीनें शिवाजीला दर्शन दिलें. तिला शिवाजीनें पुनः पुनः नमस्कार केला. देवी आपणांपुढें उभ्या राहिलेल्या शिवाजीस म्हणाली, ' हा अफजलखान कपटी असून तुजशीं युद्ध करूं पाहत आहे. तुझ्या हातानें त्याला मृत्यु यावा अशी ब्रह्मदेवानें योजना केली आहे. म्हणून मी तुझी तरवार होऊन राहिलें आहें. ' याप्रमाणें बोलून भवानी त्याच्या तरवारींत शिरली व तो जागृतावस्थेंत असूनहि त्यानें तें स्वप्न आहे असें मानलें. मग मनांत तुळजादेवीचें ध्यान करून सगळा पृथ्वीचा भार आपण नाहींसा केला असें तो मानता झाला ! "

प्रतापगड हें, महाराजांनीं अफजलखानाचा वध केल्यावर त्या किल्ल्यास नांव दिलेलें दिसतें. त्यापूर्वीं जावळी गांवाजवळचा तो किल्ला म्हणून त्याचेंहि नांव जावळी हेंच होतें. त्यांनीं किल्ल्यांत बसून आत्मरक्षणासाठीं आपल्या सेनापतीबरोबर वाटाघाट केली. तींत असें ठरलें होतें कीं, खानाच्या सैन्यास जावळी खोऱ्यांत बिनहरकत येऊं द्यावें. खानाला शंका येऊं नये अशा रीतीनें महाराजांच्या सैनिकांनीं लपून बसावें व संधीचा बेत फिसकटला तर गडावरून दुंदुभीचा ध्वनि होतांच त्यांनीं खानाच्या

सैन्याची कापाकापी करावी. या सैन्यांत संभाजी कावजी, कोंडाजी व येसाजी कंक, जिवा महाला, इब्राहिम बर्बर (सिद्दी इत्यादि) अधिकारी होते.

" खान व महाराज यांच्या भेटीचा कार्यक्रम उभय पक्षांच्या वकिलांमार्फत ठरला तो असा : आपलें सैन्य आहे तेथें ठेवून अफजलखानानें स्वतः सशस्त्र होऊन पालखींत बसून यावें. त्याजबरोबर दोनतीन सेवक असावे. त्यानें प्रतापगडाच्या पायथ्याजवळ उभारलेल्या सभामंडपांत वाट पाहत राहावें. शिवाजीनें सशस्त्र होऊन त्या पाहुण्याचा गौरवपूर्वक सत्कार करावा. दोघांच्याहि रक्षणासाठीं दहादहा स्वामिनिष्ठ सैनिकांनीं बाणाच्या टप्प्यावर येऊन मागें उभें राहावें व दोघांनीं गुप्त बोलणें करावें.

" याप्रमाणें करार करून व आंतून कपट योजून एकमेकांस ते भेटूं इच्छीत होते. महाराजांनीं भेटीस निघण्यापूर्वी नित्याप्रमाणें पूजा, दान करून थोडेंसें जेवून व तीर्थ घेऊन आणि तुळजादेवीचें मनांत चिंतन करून पोशाख चढविला, पुरोहितास व इतर ब्राह्मणांस नमस्कार केला, अंगांत चिलखत घातलें, शुभ्र पगडींत तुरा खोवला व अंगरख्यावर केशराचा शिडकाव केला. पायांत चोळणा घातला. एका हातांत तरवार व दुसऱ्या हातांत पट्टा घेतला. त्यांची दाढी, सुंदर, भव्य व लांब होती. अशा रीतीनें झपझप पावलें टाकीत ते मंडपाकडे खानास भेटावयास गेले.

अफजलखानाचा वध

" शिवाजी येऊं लागलेला पाहून खानानें आपणांवर त्याचा विश्वास बसण्याकरितां आपली तरवार सेवकापाशीं दिली. खान शिवाजीस म्हणाला, ' तूं अल्लीशहास शरण ये, म्हणजे मी तुला महत्पद प्राप्त करून देईन. अरे शहाजीच्या पोरा ! आपली शहाणपणाची घमेंड सोडून आपला हात माझ्या हातांत दे ' असें म्हणून त्यानें शिवाजीची मान डाव्या हातानें धरून उजव्या हातानें त्याच्या कुशींत कटधार खुपसली. बाहुयुद्धांत निपुण अशा शिवाजीनें त्याच्या हातांतून लागलीच मान सोडवून व अंग चोरून कुशींत घुसणारी कटधार चुकविली. आणि नागवी तरवार फिरवीत तिचें टोक खानाच्या पोटांत खुपसून, सर्व आंतडीं तोडून तीं बाहेर काढलीं आणि पट्ट्यानें खानाच्या डोक्याचे दोन तुकडे केले.

"धन्यास ठार मारलेला पाहून अब्दुल सयद, बंडा सयद (सैदबंडा), अफजलखानाचा पुतण्या रहिमखान, पिलाजी व शंकराजी मोहिते हे शिवाजीस मारण्यासाठी त्याजवर चालून गेले. त्यांनीं त्याजवर प्रहार केले, ते कधीं पट्ट्यानें व कधीं तरवारीनें त्यानें अडविले. त्याच्या मदतीस संभाजी कावजी, कोंडाजी व येसाजी कंक, जिवा महाला, इब्राहिम सिद्दी इत्यादि दहा शिवराजरक्षक असून त्यांनीं तरवारी उपसून शिवाजीवर आलेल्या शत्रुपक्षीय वीरांचा प्रतिकार केला.

"अशा रीतीनें शके १५८१ मार्गशीर्ष शुक्ल सप्तमीस गुरुवारीं माध्यान्हीं देवद्वेष्टा अफजलखान शिवाजीनें ठार मारला. नंतर गडावरून खुणेचा भांड्याचा आवाज होतांच कमळोजी सोळंखे, येसाजी कंक, तानाजी मालुसरे व नारायण ब्राह्मण यांनीं शत्रुसेनेस चोहोंकडून वेढलें. त्यांस तोंड देण्यास शिबिरांतून मुसलमान व इतर सरदार बाहेर पडले. त्यांजबरोबर ज्या चकमकी उडाल्या त्यांत शहाजी राजाचा चुलत भाऊ मंबाजी मारला गेला, अंबरखानाचा पुत्र कैद झाला आणि फाजलखानाशिवाय अफजलखानाचे इतर पुत्र कैद करण्यांत आले" (शिवभारत).

अफजलखानाच्या वधासंबंधाचा डचांचा वृत्तान्त वरील वर्णनाशीं विसंगत नाहीं. त्यांत म्हटलें आहे :—

"इकडे थकल्या-भागलेल्या घोडेस्वारांकडे शिवाजीनें पुष्कळसें शिजविलेलें अन्न पाठवून दिलें. तेव्हां खालीं उतरून घोडेस्वारांनीं जेवण्यास प्रारंभ केला. शिवाजीनें अंगांत चिलखत घातलें होतें. आपला हेतु तडीस नेण्याच्या उद्योगास तो ताबडतोब लागला. त्यानें अशी विनंती केली कीं, मी सेनापतीला किल्ले अर्पण करणार आणि आजपर्यंत केलेल्या अपराधाची माफी मागण्याकरितां मी त्याच्या पायां पडणार. नाहीं-होय करीत खानानें या गोष्टीस परवानगी दिली. तेव्हां त्या बंडखोरानें एका गुप्त हत्याराच्या योगानें खानाच्या पोटावर असा मारा केला कीं, त्याचा कोथळा बाहेर पडला. यानंतर ताबडतोब तो (शिवाजी) पळून गेला. त्याचा पाठलाग करण्यांत आला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. जावळीच्या किल्ल्यांत जाऊन त्यानें आपला बचाव केला. इकडे खानाच्या लोकांनीं त्याला पालखींत घातला; पण शिवाजीच्या एका सैनिकानें त्याजवर असा प्रहार केला कीं, खान गतप्राण झाला. विजयदर्शक

तोफेची इशारत देतांच शिवाजीच्या सहा हजार पायदळानें व दोन हजार घोडदळानें झाडींतून बाहेर पडून खानाचें बरेंच सैन्य कापून काढलें; त्या वेळीं जे पळून गेले तेच वांचले. या पळून जाणारांत खानाचा वडील मुलगा (फाजलखान) हा होता. पण त्याचे दोन भाऊ व रुस्तुमजमाचा एक भाऊ यांशिवाय आणखी कांहीं प्रतिष्ठित लोक पाडाव झाले, त्यांना कैद करण्यांत आले. या लोकांची प्रथम अप्रतिष्ठा झाली. पण आतां त्यांना योग्य रीतीनें वागविण्यांत येत आहे. यानंतर विजापूरच्या सैन्याचा नाश करावा आणि इशारा देऊन देखील जे पळून जाणार नाहींत त्यांजवर गोळी-बार करावा असा शिवाजीनें हुकूम सोडला. त्या वेळीं बरेच लोक कापून काढण्यांत आले" (प. सा. सं. खं १, पृ. १८६).

शिवाजीचा वध करण्याच्या निश्चयानेंच अफजलखान विजापुराहून निघाला होता हें डचांच्या पत्रांत स्पष्ट म्हटलें आहे. शिवाजीलाहि खानाचा वध अभिप्रेत होता. एक तर त्यानें विजापुराहून वाईकडे येतांना तीर्थक्षेत्रें व देवस्थानें हीं भ्रष्टविलीं होतीं. त्याविषयीं परमानंदानें पुढील शब्द खानाच्या तोंडीं घातले आहेत : "ज्यानें सर्व स्थानें फोडून टाकून सांप्रत सर्व देवांना भ्रष्टविलें त्या सर्वश्रेष्ठ व क्रोधाग्नीनें संतप्त अशा मला जवळ आलेला पाहून प्रत्यक्ष यम सुद्धां भीतीनें माझ्याशीं तह करील!" अशा हिंदुधर्म-द्वेष्ट्या नराधमाचा वध करणेंच शिवाजीला केव्हांहि इष्ट असेंच वाटणार. दुसरें असें कीं, अफजलखानाची तयारी मोठी असल्यामुळें त्याजबरोबर लढून त्याचा निःपात करण्याची शक्यता शिवाजीस वाटत नव्हती. या स्थितींत युद्धांत पकडला जाऊन सर्व मनोरथांस मुकण्याचीहि त्याला पाळी आली असती. त्यापेक्षां भेटींत त्याचा वध करण्याचें साधल्यास त्याच्या जिवावरचें व स्वराज्यावरचें घोर संकटच टळणार होतें. आणि त्यामुळें त्याचा दरारा व वचक सर्वत्र बसून त्याच्या स्वराज्याचा सोपान सोपा झाला असता. सारांश, दोघेहि एकमेकांचा प्राण घेण्याच्या तयारीनेंच होते. त्यांपैकीं शिवाजीचा डाव साधला व खानाचा फसला, इतकेंच काय तें.

असो. अफजलखानाच्या वधानंतर सायंकाळीं चार घटका दिवस राहिला होता. इशारा मिळतांच चोहोंकडून मावळे लोकांनीं बाहेर पडून मुसलमानी फौजेस घेरलें. त्यास हत्यारें घेण्यास व घोड्यावर बसण्यासहि

पुरेशी फुरसत मिळाली नाहीं. पुढें लवकरच दिवस मावळून अंधार पड-ल्यानें त्या भयाण अरण्यांत विजापुरी सैन्यास पळून जाण्याचा मार्गहि दिसेना. खानाबरोबर आलेले लोक प्रतापगडाच्या पायथ्याशीं होते. त्यांज-वर मोरोपंत पिंगळे तुटून पडला. 'शरण येतील त्यांस जिवदान द्यावें, विनाकारण रक्तपात करूं नये' अशी शिवाजीची मोरोपंतास ताकीद होती. त्याप्रमाणें तो वागला. अफजलखानाबरोबर विजापुराहून आलेला प्रतापराव मोरे यानें कांहीं सैनिकांना वाट दाखवून वाईस आणून सोडलें. येणेंप्रमाणें अफजलखानाच्या सैन्याची दाणादाण उडून शिवाजीस पुष्कळ द्रव्य व सामान मिळालें. त्यास खानाचें निशाण, नगारा, ९५ हत्ती, चार सहस्र घोडे, कित्येक उंट, ७८ तोफा व जडजवाहीर मिळून दहा लाखांचा विषय साध्य झाला. रुस्तुमजमाचा भाऊ, अंबरखान, झुंजारराव घाटगे व अफजलखानाचे दोन धाकटे मुलगे पाडाव झाले. झुंजारराव हा विजापूरचा मोठा सरदार व शहाजीचा स्नेही असल्यामुळें शिवाजीनें त्यास सन्मान-पूर्वक सोडून दिलें. ज्यांनीं खुषीनें शिवाजीची नोकरी पत्करली त्यांस त्यानें नोकरींत घेतलें. खंडूजी खोपडे नामक एका मावळे सरदारानें द्रव्यलोभानें शत्रूस मिळून अफजलखानाचा वडील पुत्र फाजलखान व बायकामाणसें यांस आडवाटेनें नेऊन कऱ्हाडास पोंचविलें. हें वर्तमान पुढें शिवाजीस कळतांच त्याचा त्यानें शिरच्छेद केला. बाबाजी भोसले, शामराव पद्मनाभी इत्यादि शिवाजीचे कांहीं सरदार युद्धांत प्राणांस मुकले (शककर्ता शिवाजी, पृ. ७०।७१).

खानाच्या वधानंतर गंडकी पाषाण आणवून महाराजांनीं भवानीची नवीन मूर्ति सिद्ध केली व खानाच्या वधास उचित असें जावळीच्या किल्ल्यास 'प्रतापगड' हें नांव देऊन त्यावर तिची स्थापना केली. त्यासंबंधीं सभासद म्हणतो, 'तुळजापूरची भवानी राजांच्या स्वप्नांत येऊन तिनेंच त्यांस आज्ञा केल्यामुळें तिची त्यांनीं प्रतापगडीं स्थापना केली. धर्मादाय उदंड केला, देवीस अलंकार-भूषणें नानाप्रकारें करून दिलीं. नवस-यात्रा तुळजापुराप्रमाणेंच तेथें चालती केली.'

प्रकरण आठवें

रुस्तुमजमा व सिद्दी जोहार

युध्यस्व विगतज्वरः।   – गीता

अफजलखानाचा वध शिवाजीनें १० नोव्हेंबर १६५९ रोजीं केला. त्यापूर्वी शिवाजी जावळीस असतांना खानानें आपलें कांहीं सैन्य आपल्या निरनिराळ्या सरदारांच्या हाताखालीं देऊन त्यांस शिवाजीनें व्यापलेला मुलुख परत घेण्यास पाठविलें होतें. त्याप्रमाणें जाधवानें सुपें परगणा पांढऱ्यानें शिरवळ भाग, हिलालानें पुणें परगणा व हबशी सैफखानानें तळकोंकण यांत शिरून तो तो प्रदेश हस्तगत केला होता. त्यांतील जो मुलुख मिळेल तो घेण्यास शिवाजीनें नेताजीस आज्ञा केली होती. पण त्याला त्या कामांत यश न आल्यामुळें अफजलखानाचा वध झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं तो वाईस माघारा आला. महाराजहि दुसऱ्याच दिवशीं वाईस येऊन खानाच्या सैन्याची जी दाणादाण उडाली होती तिचा फायदा घेण्यास बाहेर पडले. बरोबर त्यांनीं नेताजीसहि घेतलें. महाराजांचा रोख एकदम पन्हाळगड घेण्याचा होता. पन्हाळा ही नाक्याची जागा, कोंकणचें महाद्वार व आदिलशहाचें आश्रयस्थान होतें. तें घेतल्यानें कोल्हापूर व त्याभोंवतालचा सुपीक प्रदेश महाराजांच्या ताब्यांत राहणें सुकर झालें असतें व कोंकणांत उतरण्याचा विजापूरकरांचा एक मार्ग बंद पडणार होता.

महाराजांनीं वाटेंत चंदनवंदन किल्ल्यास वेढा देऊन तो घेतला; तेथून खटाव, मायणी, पाली, कऱ्हाड, रामापूर, कलेढोण, अष्टें, वाळवें व कोल्हापूर या गांवांवर हल्ला करून पुष्कळ खंडणी गोळा केली, तीं सर्व स्थळें आपल्या सत्तेखालीं आणून त्यांचा बंदोबस्त केला व मग कोल्हापूरच्या वायव्येस दहा मैलांवरील पन्हाळगडास वेढा घालून तोहि घेतला (शिवभारत). खानाच्या वधापासून अठरा दिवसांत वाई ते कोल्हापुरापर्यंतचा सुमारें शंभर मैलांचा मुलूख त्यांनीं पादाक्रांत केला. ही त्यांची मोहीम विद्युद्वेगानें झाली. त्यांना वाटेंतील गांवें घेतांना म्हणण्यासारखा

प्रतिकार असा कोठेंच झाला नाहीं. सीझरच्या स्पेनमधील मोहिमेविषयीं सांगतात त्याप्रमाणें ' गेले, देखलें व जिंकलें ' (Veni, Vidi, Vici) असाच प्रकार या बाबतींत घडून आला. पन्हाळा २८ नोव्हेंबर रोजीं काबीज केल्यावर तेथें त्याच्या संरक्षणाकरितां कांहीं शिबंदी ठेवून विजापूरकरांचा जितका मुलूख हाताखालीं घालतां येईल तितका घालण्याकरितां ते टाकोटाक निघाले. कारण खानाच्या वधानें आदिलशाहींत उडालेल्या गोंधळाचा फायदा घेण्याची हीच वेळ होती.

रुस्तुमजमाचा पराभव

खानाच्या सैन्याची जावळीस धुळधाण उडाल्यावर त्याचे उरलेले सेनापति व सैनिक जे पळत सुटले ते विजापुरास निरनिराळ्या मार्गांनीं जाऊन थांबले. तेथें गेलेल्या सेनापतींत फाजल, याकुब, अंकुश व हसन हे प्रमुख होते. फाजलखान अफझलखानाचा पुत्र असल्यामुळें त्याला आपल्या बापाच्या वधाचा सूड घेण्याची साहजिक खुमखुमी उत्पन्न झाली होती. यापूर्वीच शिवाजीनें पन्हाळा घेतला होता. ही गोष्ट सर्वांच्या मनाला विशेष लागून राहिली होती. म्हणून त्या सर्वांनीं बादशहा व बडीसाहेबीण यांजबरोबर खलबत करून पुढील कार्यक्रम आंखला. त्या खलबतांत रुस्तुमजमाहि होता. सर्व सेनेचें आधिपत्य रुस्तुमजमा व फाजलखान यांस देण्यांत आलें व त्याच वेळीं मदतीची याचना औरंगजेबाकडे करण्यांत आली. पन्हाळा सोडल्यावर शिवाजी व त्याचा सेनापति नेताजी हे दोघे विजापूरच्या रोखानें निघालेच होते. दोन्ही सैन्यांची रायबागेजवळ गांठ पडली. रुस्तुमजमानें आपल्या सैन्याचा शिवाजीकडील योद्धे लक्षांत घेऊन व्यूह रचला. आपल्या सैन्याच्या मध्य भागाचें आधिपत्य रुस्तुमनें आपल्याकडे घेतलें, डाव्या अंगाला फाजलला उभें केलें, पिछाडीवर अजीझखानाचा पुत्र फत्तेखान व मुल्ला हय यांस ठेवलें आणि हिलाल व जाधव यांनीं उजवी बाजू सांभाळली. त्याशिवाय संताजी घोरपडे, सर्जेराव घाटगे इत्यादिकांवर सैन्याच्या सर्वसाधारण संरक्षणाची कामगिरी सोंपविण्यांत आली. अशी रचना झाल्यावर फाजलानें नेताजीशीं गांठ घातली. अशा रीतीनें युद्धास तोंड लागल्यावर शिवाजीनें अनेक पथकांसह शत्रुपक्षाचा मुख्य सेनापति जो रुस्तुमजमा त्याजवर त्वेषानें हल्ला चढविला. नेताजी व फाजल-

खान यांच्या झोंबाझोंबींत फाजलची मात्रा न चालून त्यानें रणांगणांतून प्रारंभींच पळ काढला. आदिलशाही सैन्याची डावी बाजू लुळी पडतांच सैन्यांत एकच गोंधळ माजून राहिला. स्वतः महाराज रुस्तुमवर चालून गेल्यावर त्याचा त्यांजपुढें काय निभाव लागणार! त्यांतच फाजलखानानें पळ काढल्यामुळें सर्वांची हिंमत खचलेली व शिवाजीच्या स्वातंत्र्यसेनेंत हुरूप चढलेला. त्याचा परिणाम असा झाला कीं, रुस्तुमखानालाहि पांचसहा स्वारांनिशीं रणांगण सोडून धूम ठोकावी लागली व उरलेलें सैन्य दहाहि दिशांस पळालें. रुस्तुमखानासारख्या कसलेल्या व प्रथम श्रेणींतील सेनापतीशीं मैदानांत सामना देऊन महाराजांनीं मिळविलेला हा प्रचंड विजय त्यांच्या कारकीर्दींतील पहिलाच विजय होय.

रुस्तुमजमा पळाला तो बादशहास तोंड न दाखवितां आपल्या जहागिरीची राजधानी हुकेरी तेथें जाऊन राहिला. महाराजांशीं लढण्यास आतां त्यांजपुढें शत्रुच न उरल्यामुळें त्यांनीं आदिलशहाचा आणखी मुलूख जिंकण्याची कामगिरी महाप्रतापी नेताजी याजवर सोंपविली. नेताजीनें रायबागेहून निघून कवठें, मालगांव, कुंडल, मिरज, सांगली, कुरुंदवाड, कागल, अथणी, तिकोटें या मुलखांत दंगल माजवून दिली (शिवभारत). खुद्द महाराजांनीं मिरज हें आदिलशहाचें महत्त्वाचें ठिकाण व मर्मस्थान घेण्याकरितां त्याजवर जोराचा हल्ला केला; पण मिरजेंतील आदिलशाही फौज शौर्यानें लढल्यामुळें महाराजांना तें स्थळ ताबडतोब जिंकतां आलें नाहीं. म्हणून ते मिरजेस वेढा देऊन बसले.

रुस्तुमजमाचें महाराजांबरोबर रायबागेजवळ जें युद्ध झालें, तें ४ फेब्रुवारी १६६० च्या सुमारास झालें. त्यांत रुस्तुमजमाचे १५ हत्ती, एक सहस्र घोडे व पायदळ खर्ची पडले. रुस्तुमजमा व फाजलखान पळून गेले व मुलूखहि पादाक्रांत झाला. ही वार्ता विजापुरास अलीशहास कळल्यावर त्याला आपलें सारें राज्य शिवाजी गिळंकृत करणार अशी धास्ती वाटूं लागली. म्हणून त्यानें राज्यरक्षणार्थ पराकाष्ठेचे प्रयत्न करण्यासाठीं कंबर बांधली. त्याचा सिद्दी जोहार हा मोठा सरदार कर्नूल प्रांतांत होता. तो मूळचा मलीक रहयान नामक सरदाराचा नोकर असून रहमान याच्या मरणानंतर त्याच्या पुत्रास बाजूस सारून आपण त्याचा अधिकार

बळकावून बसला असल्यामुळें आदिलशहाची याजवर इतराजी झाली होती. त्याशिवाय दुसरेंहि एक कारण होतें व तें चमत्कारिक होतें. विजापूरचा सुलतान महमद आदिलशहा मेल्यानंतर त्याच्या जागीं अली नांवाचा जो मुलगा बडीसाहेबिणीनें गादीवर बसविला तो महमदशहाचा औरस पुत्र नसून एका माहुताचा मुलगा असल्याचा बोभाटा सर्वत्र झाला होता. त्यामुळें विजापूर दरबारांतील उमरावांना बडीसाहेबिणीची ही कारवाई नापसंत होऊन ते अशा हीन कुळांतील पोरापुढें मान वांकविण्यास तयार नव्हते. कांहींनीं दरबारावर बहिष्कार घातला होता. त्यांपैकींच सिद्दी-जोहार असून तो नाखुष होऊन आपल्या कर्नूलच्या जहागिरींत जाऊन बसला होता; परंतु आतां विजापूरच्या राज्यावरच असा बिकट प्रसंग ओढवतांच बडीसाहेबिणीनें त्याचें आर्जव केलें व सिद्दी जोहारालाहि स्वस्थ बसणें धोक्याचें वाटलें म्हणून शहाची आज्ञा होतांच शिवाजीवर जाण्यास तो कबूल झाला.

जोहार दहा सहस्र स्वार व चौदा सहस्र पायदळ घेऊन मिरजेच्या रोखानें निघाला. त्याला बाजी घोरपडे, रुस्तुमजमा व फाजलखान हेहि येऊन मिळाले. इतकें मोठें सैन्य शिवाजीवर चालून आलें असतां त्याजपुढें शिवाजीचा निभाव काय लागणार? विजापुरी सैन्यानें त्याचा पराभव करून मिरजेचा वेढा उठवून पळावयास लावलें. तो पन्हाळगडाच्या बाजूस पळत सुटला (तारीख २–३–१६६०) व गडांत जाऊन बसला. तथापि त्याच वेळीं त्यानें नेताजीच्या हाताखालीं ४।५ सहस्र घोडदळ देऊन विजापुरावर रवाना केलें. हेतु हा कीं, जोहाराला पायबंद बसून त्यानें विजापूरच्या रक्षणासाठीं माघारें जावें. नेताजीनें अकस्मात् विजापुराचें उपनगर शहापूर यावर रात्रीचा हल्ला करून तें लुटलें. त्यामुळें विजापुरांत घबराट उत्पन्न झाली. तेव्हां वेंगुर्ल्याचा जहागीरदार खवासखान विजापुरांत होता, त्याजपाशीं शहानें शिल्लक असलेलें पांच सहस्र स्वारांचें पथक देऊन नेताजीवर पाठविलें. त्यानें नेताजीस शहापुराहून हाकून लावलें व तो शहाच्या रक्षणार्थ परत विजापुरास आला.

पन्हाळगडचा वेढा

शिवाजी पन्हाळ्यांत शिरल्यावर सिद्दी जोहारानें गडास वेढा घातला.

आदिलशहाचें बहुतेक सर्व सामर्थ्य आतां पन्हाळगडासमोर एकवटलें. जोहारानें आपल्याकडून कशाचीहि न्यूनता राहूं न देण्याचें ठरविलें असल्यानें त्यानें राजापुरास इंग्रजांकडे चारशें पायदळ, कांहीं घोडेस्वार व पांच पालख्या पाठवून एक तोफ व स्फोटक द्रव्य मिळविलें. तें घेऊन रेव्हिंग्टन, मिंघम व गिफर्ड पालख्यांत बसून २ एप्रिल १६६० रोजीं रायपाटणावरून अणस्कुरा घाटांतून कोल्हापुरास यावयास राजापुराहून निघाले. ते १६ एप्रिलच्या सुमारास कोल्हापुरास पोंचले व कोल्हापुराहून त्यांस पन्हाळगडच्या पायथ्याशीं मोठ्या सन्मानानें नेण्यांत आलें. पन्हाळगडांत महाराज आठ हजार सैनिक व साठ घोडेस्वार यांनिशीं अडकून पडले. तो एप्रिल महिना होता. पावसाळ्यापर्यंत आपण गडांत दम धरूं शकूं व पावसाळा सुरू झाला म्हणजे आदिलशाही सैन्य वेढा उठवून निघून जाईल, असा महाराजांचा अंदाज होता. पण तो खोटा ठरला. जोहारानें पावसाळ्यांतहि वेढा चालू ठेवण्याचें योजून छावणीकरितां निवाऱ्याचीं छपरेंहि बांधलीं. वेढ्यांत जों जों जास्त दिवस जाऊं लागले तों तों किल्ल्यांत तंबाखु, मीठ वगैरे जिनसांचा तोटा भासूं लागला.

जोहारानें गडास वेढाहि आपल्याकडून पक्का घातला होता. जोहार, फाजल व रुस्तुम गडाच्या पूर्वांगास होते, सादत, मसूद व बाजी घोरपडे यांनीं पश्चिम बाजू दाबून धरली होती व बाकीच्यांनीं दक्षिण व उत्तर या दिशा धरल्या होत्या. महाराज भेदनीतींत पटाईत होते. त्यांनीं सरदारांच्या मुठीहि दाबल्या. त्याचा एवढाच उपयोग झाला कीं, वेढ्यांत कांहींसा ढिलेपणा आला. तरी बाहेरून नेताजीशीं महाराजांस नीटसे संबंध ठेवतां येईनात. म्हणून नेताजी राजगडावर जिजाबाई होत्या, त्यांना जाऊन भेटला. त्यांनीं त्यास चेव आणून शिवाजीची सुटका हरतऱ्हेनें करण्याविषयीं सांगितलें. त्या म्हणाल्या, 'तो माझा प्राण पन्हाळगडावर चोहोंकडून वेढला गेला आहे, त्याची सुटका करावयास नको काय?' मातेचें हे हृदयाला घरें पाडणारे शब्द ऐकून नेताजी जोहारावर बाहेरून दडपण आणण्याकरितां निघाला. तो येत आहे असें पाहून जोहारानें भालेकरी व पट्टेकरी पुष्कळ योद्धे नेताजीवर पाठविले. त्या उभयतांच्या रोज चकमकी झडूं लागल्या. त्यांजपुढें कांहीं न चालल्यामुळें नेताजीस तो प्रयत्न सोडावा लागला.

महाराज १३ जुलैपर्यंत चार महिने अडकून पडले. त्यामुळें चिंताग्रस्त असतां तुळजादेवी एके रात्रीं त्यांच्या स्वप्नांत येऊन म्हणाली, " मोगलांनीं येऊन पुण्याकडील चाकणचा किल्ला घेतला असल्यानें आतां या किल्ल्यावर अधिक काळ अडकून राहिल्यास सर्व राज्य बुडण्याचा प्रसंग येईल. तेव्हां बाळ, त्या पन्हाळगडावर राहूं नये. सर्वथा येथून निघावें. राजगडावर जा नि आपलें राज्य राख. तुझी वृद्ध माता तुजवांचून तेथें तळमळत आहे. यास्तव तूं थोड्या सैनिकांनिशीं येथून निघून जा. तुझ्या पश्चात् गडावरील तुझे योद्धे शत्रूशीं लढतील ! " (शिवभारत).

देवीचा असा दृष्टान्त झाल्यावर एकंदर परिस्थितीचा विचार करून महाराजांनीं त्यांच्या हिकमती स्वभावास अनुसरून सिद्दी जोहार ऊर्फ सलाबतखान (नवा किताब) याजबरोबर शरणागतीची भाषा बोलण्याचा विचार ठरविला व त्याप्रमाणें गंगाधर नांवाच्या आपल्या वकिलास खानाकडे पाठविलें. त्यांनीं खानास कळविलें, ' आपण मला वडिलांच्या जागीं आहां. माझे सर्व गुन्हे आपण माफ करावे. मीं घेतलेलें राज्य बादशहास परत देण्यास तयार आहें. आपण मला अभय द्याल तर मी आपणांस जातीनें भेटण्यास येऊं इच्छितों. ' असा निरोप गंगाधरपंताबरोबर महाराजांनीं खानास कळविला व इकडे ते सुटून जाण्याच्या उद्योगास लागले. त्यांनीं निघण्यापूर्वी गड लढविण्याचें काम त्र्यंबक भास्कर नांवाच्या धैर्यवान् ब्राह्मणावर सोंपविलें. त्या वेळीं आषाढमास असून पाऊस पडत होता. आकाश ढगांनीं व्यापलें होतें. गडावरून पाण्याचे ओहोळ धो धो वाहत होते. महाराज पालखींत बसून रात्रीच्या पहिल्या प्रहरांत निघाले. त्यांच्यामागून सातशें पदाती चालू लागले. भवानीनें मूढ केलेल्या शत्रूस महाराज जवळून जात असतांहि दिसले नाहींत. त्यांनीं केवळ सात प्रहरांत वीस कोस जमीन चालून विशाळगड (खेळणा) गांठला. खेळणा प्रभानवल्लीचा राजा सूर्याजीराव याच्या ताब्यांत होता. सूर्याजीचें राज्य संगमेश्वर तालुक्यांत असून संगमेश्वराच्या ईशान्येस शृंगारपूर १२ मैल आहे. सूर्याजीची ती एक राजधानी होती व दुसरी राजधानी त्याच तालुक्याच्या दक्षिणेकडील टोकास प्रभानवल्ली होती (ती शृंगारपुरापासून ५३ मैल आहे). शृंगारपुरापाशीं आश्रय घेण्यास प्र ीतगड सह्याद्रींत अतिशय उंच व बिकट जागीं आहे.

प्रभानवल्लीच्या उत्तरेस विशाळगड संगमेश्वर तालुक्याच्या हद्दीबाहेर पण प्रभानवल्लीपाशीं आहे. तो सूर्याजीरावाच्याच ताब्यांत असल्यामुळें शिवाजीनें पन्हाळा घेतल्यावर व पुढें त्यांत तो अडकून पडल्यावर त्याचें रक्षण सूर्याजीरावानें करणें स्वाभाविक होय. म्हणून तो या वेळीं सिद्दी जोहाराच्या आज्ञेवरून वा स्वेच्छेनें खेळण्यावर होता व त्याच्या मदतीस पालवणीचा राजा यशवंतराव दळवी आला होता (पालवणीपासून विशाळगड ७५ मैल आहे). अशा रीतीनें शिवाजी पन्हाळ्यावरून पळून खेळण्याकडे येत असतां पुढून सूर्याजीराव व यशवंतराव आणि मागून मसाऊद यांच्या कचाट्यांत तो सांपडला. "सूर्याजीराव व यशवंतराव वारंवार लढत असतांहि पदोपदीं पराभूत झाल्यामुळें गड चढणाऱ्या शिवाजीस अडवूं शकले नाहींत. मसाऊद खेळण्यापाशीं आल्यावर शिवाजीच्या सैन्यानें त्याचा निःपात केला" (शिवभारत).

प्रभानवल्ली व शृंगारपूर याविषयीं शृंगारपुरापाशीं असलेल्या नायरी या गांवचे रा. वसंत श्रीनिवास मुळे हे ता. २०–१–५५ रोजीं लिहितात, "सध्यां प्रभानवल्ली हें गांव राजापूर तालुक्यांत आहे. पूर्वी तें संगमेश्वर तालुक्यांतील शेवटचें गांव होतें. तें विशाळगडाच्या (खेळणा) पायथ्याशीं आहे. शृंगारपूर येथें सुर्वे आहेत, पण तेथें त्यांचा एकहि वाडा नाहीं. पूर्वी वाडा असलेल्या जागीं हल्लीं कांहीं लोक शेती करतात. ते वाडे सुर्वे यांचेच होते काय, इत्यादि माहिती सांगणारा गांवांत कोणी नाहीं. शृंगारपूरचे सुर्वे तुळसणी या खेडेगांवीं गेले आहेत. ते तेथें अनेक वर्षांपूर्वी गेल्याचें कळतें. शृंगारपूर हें प्राचीतगडाच्या पायथ्याशीं आहे." पालवणी दापोली तालुक्यांत बाणकोटच्या दक्षिणेस आठ मैलांवर आहे.

डचांनीं वेंगुर्ल्याहून शिवाजीच्या सुटकेचें वृत्त ५ सप्टेंबर १६६० रोजीं पाठविलें तें अधिक विस्तृत व खुलासेवार आहे. त्यांत पन्हाळा व विशाळगड या दोनहि ठिकाणीं घडलेली हकीकत आहे. ती अशी – "गंगाधर वकिलास सलाबतखानाकडे भेटीस पाठविल्यानंतर दुसऱ्या दिवशीं रात्रीं चंद्र ढगांत लपून गेला असतां आणि मुसळधार पाऊस व सोसाट्याचा वारा वाहत असतां बंडखोर (शिवाजी) आपल्याबरोबर एक सहस्र शिपाई, १५ उमदे घोडे, दोन पालख्या व कांहीं खजिना घेऊन पळाला. ही बातमी

थोड्याच दिवसांत विजापूरकरांच्या सैन्यांत पसरली. त्याबरोबर सलाबतखानानें उद्विग्न होऊन दोन सहस्र स्वार व एक सहस्र पायदळ त्याला गांठण्यासाठीं पाठविलें. हेरांकडून ही बातमी शिवाजीस समजली तेव्हां तो एकदम खेळणा (विशाळगड) नांवाच्या किल्ल्यांत गेला. त्यानें जवळचे लोक रस्त्यावरील दाट झाडींत ठेवले व पाठलाग करणाऱ्या शत्रूस त्या रस्त्यानें येऊं न देण्याविषयीं आज्ञा केली; एवढेंच नव्हे तर, शक्य असल्यास तोंड देऊन पराभूत करण्यासहि सांगितलें. त्यांनीं शिवाजीच्या हुकुमाप्रमाणें शत्रूवर शौर्यानें जोराचा हल्ला चढविला. आपली विशेष हानि होऊं न देतां त्यांनीं शत्रुसैन्याच्या बऱ्याच मोठ्या भागाचा निःपात केला, कांहींस कैद केलें, बाकीच्यांस पळावयास लावलें आणि धैर्यानें त्यांचाहि पाठलाग केला. नंतर सलाबतखानाच्या लोकांनीं आपल्या ताब्यांतील दुसऱ्या एका मार्गानें जाऊन लढाई केली, जय मिळविला व कांहीं लूटहि मिळविली. त्यामुळें बंडखोरानें पळ काढला " (प. सा. सं. खं. १, पृ. १९४).

नरवीर बाजीप्रभु

शिवभारत व डच लेखक या उभयतांनीं दिलेलें वृत्त परस्परांस पूरक आहे. त्याचा थोडक्यांत निष्कर्ष असाः महाराज पन्हाळगड उतरून निघून गेल्यावर ती बातमी शत्रूस कळण्यास साहजिकच कांहीं विलंब लागला. नंतर महाराजांच्या पाठलागास सुरुवात झाली. शत्रु आपल्या पाठीवर येणार अशी महाराजांची खात्री असल्यामुळें त्यांनीं मध्यंतरीं घोडखिंडींत शत्रूस अडवून धरण्याकरितां बाजीप्रभु देशपांडे यास त्याच्या हाताखालीं कांहीं फौज देऊन ठेवलें.महाराजांच्या अटकळीप्रमाणें मसाऊद पाठलाग करीत खिंडीपाशीं आला. त्याजबरोबर नरवीर बाजी प्रभु याचें पांच तास तुंबळ युद्ध होऊन त्यांत तो पतन पावला. या घोडखिंडींतील (पावनखिंड) अत्यंत यशस्वी प्रसंगाची तुलना ग्रीसमधील थर्मापिलींतील प्रसंगाशीं करण्यांत येते. त्या खिंडींत लिआनिडास या स्पार्टन वीरानें हजारों पारसिकांना अडवून धरलें होतें. पण शेवटीं फार्सी सैनिक खिंडीस वळसा घालून मागून आल्यानें लिआनिडास पुढून-मागून घेरला गेला व ठार झाला. हा प्रसंग ग्रीक इतिहासांत स्फूर्तिदायक रीतीनें वर्णिलेला आहे. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धांत बाजी प्रभूची कामगिरी लिआनिडाससारखीच असून या दोघां वीरांनीं

आपल्या देशांच्या इतिहासांत अजरामर कीर्ति मिळविली आहे. तेव्हांपासून या खिंडीला पावनखिंड हें नांव मिळालें. घोडखिंड ही पन्हाळा व विशाळगड (खेळणा) यांच्या दरम्यान विशाळगडापासून अलीकडे ८ मैल आहे. बाजी देशपांडे यानें केलेल्या अडथळयामुळें महाराजांस जी फुरसत मिळाली तेवढ्यांत ते विशाळगडापाशीं गेले. तेथें त्यांस यशवंतराव दळवी पालवणीकर व सूर्याजीराव शृंगारपूरकर आडवे आले. पण त्यांस पराभूत करून महाराज गडावर चढले. महाराज किल्ल्यांत गेल्यावर मसाऊदनें याहि किल्ल्यास वेढा घातला. वेढ्यांत सांपडल्यावर महाराज विशाळगडावरूनहि शत्रूच्या हातावर तुरी देऊन कसे निसटले याची हृदयंगम हकीकत त्याच डच लेखकानें कथिली आहे व ती विश्वसनीय मानण्यास मुळींच हरकत नाहीं. ती येथें थोडी फोड करून सांगावयास पाहिजे.

शिवाजी न्हावी

महाराज विशाळगडावरून रात्रीं बाहेर पडले. ती रात्र चांदणी होती. म्हणजे पन्हाळगड सोडल्यावर थोड्याच दिवसांच्या आंत त्यांनीं विशाळगड सोडला. तो सोडतांना त्यांनीं सैन्याचे दोन भाग केले, एका तुकडीबरोबर एक पालखी दिली व दुसऱ्या तुकडीबरोबरच्या पालखींत ते स्वतः बसले. पहिल्या तुकडीबरोबरच्या पालखींत एक शिवाजी या नांवाचा न्हावी बसविला व ती पालखी लवाजम्यासुद्धां नेहमींच्या रस्त्यानें पाठविली व आपण स्वतः आड-बाजूच्या अवघड रस्त्यानें दुसऱ्या पालखींत बसून चालते झाले. पालखी व तिच्यांत शिवाजी अशी बातमी सलाबतखानाच्या छावणींत पसरतांच त्याच्या लोकांनीं ती धरली व तींत शिवाजी असल्याचें समजून त्यांना अत्यानंद झाला. पण कांहीं वेळानें तपास करतात तों तो शिवाजी राजा नसून शिवाजी न्हावी आहे असें त्यांस कळून चुकलें व सर्व निराश झाले. एवढ्या वेळांत महाराज रात्रीच्या पोटीं सपाट्यानें जे सटकले ते मध्यंतरीं ५।६ ठिकाणीं मुक्काम करीत राजगडावर जिजाबाईच्या चरणापाशीं पोंचले, तेव्हां त्या माउलीचा जीव भांड्यांत पडला.


राजगडीं गेल्यावर महाराजांस शाइस्ताखानाच्या आगमनाची साद्यंत हकीकत समजली. ती ऐकल्यावर आतां यापुढें पन्हाळगड लढविण्यांत अर्थ नाहीं असें वाटून त्यांनीं त्याप्रमाणें पन्हाळयावर त्रिंबक भास्करास गड

सलाबतखानाच्या ताब्यांत देण्यास व तेथून निघून येण्यास आज्ञा केली. त्रिंबकपंतानें गड खानाच्या स्वाधीन केला (२२ सप्टेंबर १६६०). पण शिवाजी हातचा सुटला हें ऐकून बादशहानें रागारागानें मनगटें चावलीं व त्यानें जोहारास तसें पत्र पाठविलें. तें वाचून सलाबतखान (जोहार) वैतागानें आपल्या मूळ ठिकाणीं म्हणजे कर्नूलास गेला. शिवाजीची शिकार हातची सुटली, याचा विजापूर-दरबारावर फार अनिष्ट परिणाम झाला. बादशहा व सरदार विफलतेच्या भावनेनें पछाडले गेले. मुख्य सेनापति सिद्दी जोहार याजवर बादशहाची इतराजी झाल्यामुळें त्यानें दरबारी राजकारणांतून मन काढून घेतलें. उरला मोठा सेनापति रुस्तुमजमा. त्याची महाराजांनीं वारंवार मूठ दाबल्यानें तो महाराजांना फितुर. महाराज पन्हाळा व विशाळगड सोडून गेल्यावर व पन्हाळा त्रिंबक भास्करानें विजापुरी सेनेच्या स्वाधीन केल्यावर रुस्तुमजमा यानें पुढें होऊन शिवाजीशीं बादशहाचा तह घडवून आणण्याचा डाव टाकला. त्याच्या विनंतीवरून बादशहा अल्ली आदिलशहा व बडीसाहेबीण विजापुराहून मुद्दाम मिरजेस आलीं. बादशहाचा वकील शहासाहेब हुकेरीस रुस्तुमजमाकडे तहाची वाटाघाट करण्यास गेला होता. तो व रुस्तुम हुकेरीहून बादशहाच्या भेटीस मिरजेस आले. बादशहानें रुस्तुमजमास सेनापति (वजीर) ही पदवीहि अर्पण केली. बैठकींत शिवाजीचा वकील त्रिंबक भास्करहि असला पाहिजे. हा तह ५ सप्टेंबर १६६० पूर्वी झालेला दिसतो (प. सा. सं. खंड १, पृ. १९५). या तहांतील अटी प्रसिद्ध झाल्या नसल्या तरी तो घडून आल्यानंतर शिवाजी व विजापूरकर यांजमधील युद्धप्रसंग कांहीं काल थांबले व महाराजांना नवीन व फार बलवान् शत्रु औरंगजेब यानें त्यांजविरुद्ध याच वेळीं सुरू केलेल्या वितुष्टाकडे पूर्णपणें लक्ष देण्यास फुरसत सांपडली.

शिवाजीवरून विजापूरकरांची नजर ढळण्यास आणखी एक जबरदस्त कारण असें घडलें कीं, सिद्दी जोहार ऊर्फ सलाबतखान रुसून घरीं स्वस्थ न बसतां विजापूरकरांविरुद्ध मसलती करूं लागला. त्याचा रुसवा काढून आपल्या लगामीं लावण्याकरितां अल्लीशहानें त्याला पुष्कळच लालूच दाखविली. त्याला विजापूरच्या राज्यांतील वेंगुर्लें आदिकरून सधन मुलूख बहाल

करून व मोठें सैन्य देऊन कानडाच्या वेंकटप्पा नायकाशीं युद्ध करण्यासाठीं किंवा जमल्यास मोठी खंडणी वसूल करण्यासाठीं पाठविलें होतें. परंतु तो कर्नाटकांतून परत येऊन विजापुरापासून १४ मैलांवर रकसी-तगडीस पोंचला. तेथें विजापूरकरांविरुद्ध बंड करून त्यानें त्यांचे झेंडे व निशाणें फाडून टाकलीं व मोगलांकडे जाण्याची तयारी दर्शविली. अशा रीतीनें राज्यांत बजबजपुरी व बेदिली माजल्यामुळेंहि शिवाजीच्या वाटेस विजापूरकर कांहीं काळ गेले नाहींत (प. सा. सं. खं. १, पृष्ठ १९८).

सारांश, विजापुरीं मुसलमान सरदारांत निष्ठा अशी कोणतीच नव्हती. त्यांना राजनिष्ठा नव्हती व स्वधर्म-प्रसाराचीहि तळमळ नव्हती. हिंदुस्थानाविषयीं देशभक्तीहि त्यांच्या ठिकाणीं असणें शक्य नव्हतें. फक्त स्वार्थपरायणता असल्यामुळें, याच वेळीं शाइस्ताखान आदिलशहासाठीं शिवाजीवर आला असतांहि, एकहि विजापुरी सरदार त्यास मिळाला नाहीं व अशा रीतीनें शिवाजीच्या नाशाची आलेली संधि त्यांनीं दवडली.


पुणे व सातारा जिल्हा
प्रमाण — १ इंच = ३६ मैल
टीप किल्ला
अहमदनगरास
अहमदनगराकडे
सोलापुरास
पंढरपुराकडे
विजापुराकडे
अहमदनगर जिल्हा
सोलापूर जिल्हा
बेळगांव जिल्हा
कोल्हापूर जिल्हा
कुलाबा जिल्हा
रत्नागिरी जिल्हा
भीमा नदी
मुळा नदी
मुठा नदी
नीरा नदी
कऱ्हा नदी
कुकडी नदी
घोडनदी
कृष्णा नदी
कोयना नदी
माण न.
येरळा न.
वारणा न.
पुणे
सातारा
जुन्नर
शिरूर
दौंड
इंदापूर
जेजुरी
सासवड
बारामती
फलटण
वाई
महाबळेश्वर
कराड
मिरज
सांगली
कोल्हापूर
चिपळूण
तिवरा घाट
कुंभारली घाट
शिवनेरी
राजगड
तोरणा
सिंहगड
पुरंदर
रोहिडा
प्रतापगड
वासोटा
अजिंक्यतारा
वैराटगड
पन्हाळा
मलकापूर
दहिवडी
म्हसवड
रहिमतपूर
उस्मानपूर
भोर
शिरवळ
मसूर
औंध
पाटण
कोरेगाव
नारायणगाव
भीमाशंकर
मंचर
खेड
लोणावळा
तळेगाव
चाकण
शिवथर घाट

प्रकरण नववें

शाइस्ताखान व शिवाजी

(इ. स. १६६०)

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम्। जित्वा वा भोक्ष्यसे महीम्॥

विजापूरकर व शहाजहान यांचा तह औरंगजेबाच्या करवीं स. १६५७ त झाला होता. त्या तहान्वयें विजापूरच्या आदिलशहापासून मोगलांना बराच मुलूख व खंडणीहि मिळाली होती. अर्थात् आदिलशहा मोगल बादशहाचा मांडलिक असल्यामुळें संकटकाळीं त्यानें धांवा केला असतां त्याच्या रक्षणार्थ धांवून जाणें मोगलांचें कर्तव्य होतें. शिवाजीनें १६५९ त अफझलखानास ठार मारून विजापूरकरांचा मुलूख जिंकण्यास व उद्ध्वस्त करण्यास जोरानें सुरुवात केली, तेव्हां अली आदिलशहा यानें मोगलांकडे मदतीची याचना केली. या वेळीं शहाजहानास अटकेंत ठेवून औरंगजेब दिल्लीचा बादशहा झाला होता. त्याला दक्षिणेंतील सर्वच राज्यें बुडवावयाचीं होतीं. त्या दृष्टीनें त्याला आदिलशहा काय किंवा शिवाजी काय दोघेहि सारखेच. त्यांतल्या त्यांत आदिलशहा मुसलमान असल्यामुळें औरंगजेबास जवळचा. त्यालाच बुडविण्याच्या विचारांत असतां त्याच्या जोडीला नवा हिंदु प्रतिस्पर्धी शिवाजी उभा ठाकल्यावर त्याचा निःपात करण्यास औरंगजेबानें आदिलशहास मदतीचा हात आनंदानें पुढें करावा यांत आश्चर्य काय?

औरंगजेबापाशीं आदिलशहानें कुमक मागतांच औरंगजेबानें त्याचा दक्षिणेंतील सुभेदार शाइस्ताखान यास शिवाजीवर स्वारी करण्यास फर्माविलें. शाइस्ताखान हें मोगल दरबारांतील एक बडें धेंड होतें. तो जहांगीर व शहाजहान यांचा वजीर असफखान याचा पुत्र व नूरजहानचा नातू होता. शहाजहानानें दक्षिणेंत सन १६३० त स्वारी केली, तींत शाइस्ताखान हा असून निजामशाही बुडविण्यास आलेल्या मोगल सेनापतींपैकीं तो एक असल्यानें त्याला महाराष्ट्राची पुष्कळ माहिती होती. नात्यानें तो

औरंगजेबाचा मामा होता. म्हणून औरंगजेब दिल्लीचा बादशहा झाल्यावर त्यानें १६५९ त त्यास दक्षिणेचा सुभेदार नेमलें होतें. दक्षिणेचा सुभेदार होण्यापूर्वी तो माळव्याचा सुभेदार असून मोअज्झिमास दक्षिणेच्या सुभेदारीवरून काढून ही महत्त्वाची व फार जबाबदारीची जागा या अनुभवी व पोक्त सेनापतीस देण्यांत आली होती.

शिवाजी पन्हाळ्यावर अडकला असतांच शाइस्ताखानावर ही कामगिरी सोंपविण्यांत आली होती. या दृष्टीनें मोगलांना ही सुवर्णसंधिच होती. कारण एकटा नेताजी काय तो शिवाजीच्या राज्याचें रक्षण करण्यास बाहेर मोकळा होता. त्यानें स्वराज्याचें रक्षण करावें, कीं शिवाजीच्या सुटकेसाठीं विजापुरी सैन्यास पायबंद देण्याकरितां विजापूरच्या राज्यांत लूटमार व धामधूम करीत हिंडावें, हा त्याजपुढें पेंच होता. शिवाजीची सुटका हीच स्वराज्यरक्षणापेक्षां नेताजीस अभिप्रेत असल्यानें त्याजकडून स्वराज्याची म्हणजे शिवाजीच्या मुलुखाची कांहींशी उपेक्षा व्हावी, त्यानें पुण्याभोंवतीं शाइस्ताखानाची रसद मारण्यापुरतें तुरळक सैन्य ठेवावें, त्यायोगें शाइस्ताखानास शिवाजीचें भय न उरावें आणि ठिकठिकाणच्या गडांवरील शिवसेनेला गड तेवढेच लढविणें शक्य व्हावें हें स्वाभाविक होय.

शाइस्ताखानानें शिवाजीवर उत्तरेकडून मोहीम सुरू केली. तो अहमदनगराहून २५ फेब्रुवारी १६६० रोजीं दक्षिणेच्या दिशेनें यावयास निघाला. सोनवडी व सुपें या गांवांवरून तो ५ एप्रिल रोजीं बारामतीस पोंचला. बारामतीहून नीरेच्या कांठानें होळ गांवाशेजारून ता. १८ रोजीं शिरवळास आला. शिरवळास येईपर्यंत वाटेंत जीं गांवें लागलीं त्या गांवीं तो आपल्या सैन्याच्या लहान लहान तुकड्या ठेवीत गेला. शिरवळास आल्यावर त्यानें सैन्याची एक तुकडी पाठवून शिवाजीची राजधानी राजगड, तिच्याजवळचा प्रदेश लुटला. तो शिरवळाहून निघून शिवापुरास व शिवापुराहून गराड्याच्या खिंडींतून ता. १ मे रोजीं सासवडास दाखल झाला. शाइस्ताखान शिवापुरास येईपर्यंत मराठ्यांनीं त्यास कोठेंहि प्रतिकार केला नाहीं. ते फक्त आसपास टेहळणी करीत व घिरट्या घालीत हिंडत होते. पण शिवापुराहून तो गराड्याकडे निघाला तेव्हां वाटेंतल्या खिंडींत त्यांनीं त्यास लढाई दिली. मोगल सैन्याच्या पिछाडीचें रक्षण राव

भावसिंग हा करीत होता. त्याजवर ता. ३० एप्रिल रोजीं तीन हजार मराठे स्वारांनीं हल्ला केला. पण त्यांस बराच वेळ लढल्यानंतर मोगलांनीं उधळून लावलें.

मोगल सासवडास मुक्काम करून राहिल्यावर त्यांनीं पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याचीं गांवें लुटलीं व पुरंदरास वेढा दिला. त्यांत शाइस्ताखानाचेंच इतकें नुकसान झालें कीं, त्यास वेढा उठवून जावें लागलें. तो सासवडाहून ता. ९ मे रोजीं पुण्यास आला.

पुण्यास आल्यावर पावसाळा जवळ आला होता. तो सैन्यासह पुण्यांत घालवावा असा शाइस्ताखानाचा विचार होता. पण पुण्याभोंवतालचा प्रदेश शिवसेनेनें उजाड करून खानास दाणागोटा व वैरणकाडी न मिळेल अशी व्यवस्था केली होती. शिवाय पाऊसकाळ सुरू झाल्यावर नद्यांना पूर आल्यामुळें मोगली मुलुखांतूनहि त्यास दाणा-वैरण आणणें अशक्य होऊन त्याच्या सैन्याची उपासमार सुरू झाली. म्हणून पुण्यापासून १८ मैलांवरील चाकणास आपली छावणी नेण्याचें शाइस्ताखानानें ठरविलें. चाकणापासून अहमदनगर व मोगली मुलूख पुण्यापेक्षां जवळ असल्यानें तिकडून रसद मिळण्याचा संभव अधिक होता.

खान पुण्याहून ता. १९ जून रोजीं निघून चाकणाच्या आसपास ता. २१ रोजीं पोंचला. चाकणाचा किल्ला चौकोनी असून त्यांत शिरावयाचा दरवाजा एकच आहे. त्यांतून थेट किल्ल्यांत पोंचण्यास एकांत एक असे ५-६ दरवाजे आहेत व किल्ल्याच्या तटाभोंवतीं खंदक आहे. खानानें आपल्या सैन्याच्या चार तुकड्या करून किल्ला चोहों बाजूंनीं वेढला व मातीचे उंच धमधमे बांधून किल्ल्यावर मारा करण्याकरितां तोफा चढविल्या. त्या वेळीं पाऊस धो धो पडत होता, तरी तशा पावसांत मोगली सैन्यानें किल्ला घेण्याची तयारी जोरानें चालविली. ५४ दिवस दीर्घ परिश्रम केल्यावर उत्तरेकडील बुरुजाखालीं सुरुंग लावून ता. १४ ऑगस्ट १६६० रोजीं दुपारीं ३ वाजतां त्यानें बुरूज उडवून दिला. त्याबरोबर बुरुजावरून लढणारे शिवसैनिकहि उडाले. मोगल बुरुजाच्या खिंडारांतून किल्ल्यांत घुसण्यास निघाले तों त्यांना आंतल्या बाजूनें मातीची उंच भिंत उभारल्याचें दिसून आलें. त्या भिंतीच्या आश्रयानें शिवसेनेनें गोळ्यांचा, बाणांचा व

दगडांचा शत्रूवर वर्षाव केला. त्या दिवशीं सारी रात्र घनघोर लढाई सुरू राहून मोगलांची फार हानि झाली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं लढाई तशीच जोरांत चालली होती. मोगल किल्ल्याची भिंत चढून गेले, बरेचसे शिवसैनिक त्यांनीं कापून काढले व अखेरीस किल्ला सर झाला. या लढाईत मोगलांकडील २६८ सैनिक ठार व ६०० जखमी झाले. चाकणचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा हा होता. तो शहाजीच्या वेळेपासून या किल्ल्यावरचा अंमलदार होता. त्यानें दोन महिनेपर्यंत मोगलांशीं झुंज दिली. पण अखेरीस नाइलाज होऊन त्यास शत्रूला शरण जावें लागलें. शाइस्ताखानानें फिरंगोजीच्या मर्दुमकीची वाहवा करून त्यास जास्त पगारावर बादशहाची नोकरी पत्करण्यास सांगितलें. पण फिरंगोजीनें ही बेइमानगिरी नाकारली. तथापि त्यास पकडून न ठेवतां शाइस्ताखानानें त्यास आपल्या धन्याकडे जाण्यास परवानगी दिली.

चाकण घेतल्यावर शाइस्ताखान २६ ऑगस्ट १६६० त पुण्यास परत आला व उरलेला पावसाळा त्यानें तेथेंच घालविला. सन १६६१ च्या प्रारंभीं शाइस्ताखानानें शिवाजीपासून उत्तर कोंकण जिंकून घेण्याचें योजिलें. त्या बाजूस इस्माइल नांवाचा एक मुसलमान अधिकारी तीन सहस्र फौजेनिशीं गेल्या एप्रिलपासून कल्याणजवळचा प्रदेश शिवाजीकडून जिंकून घेण्याच्या प्रयत्नांत होता. त्यानें जो थोडासा मुलूख घेतला होता तो सलाबतखान दक्षिणी याच्या ताब्यांत असून त्याच्या मदतीस बाबाजी भोसले, रघूजी व बाबाजी राम होनप (पुण्याचा पूर्वीचा देशपांडे) हे होते. पण सबंध उत्तर कोंकण शिवाजीपासून जिंकून घेण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत नव्हतें. यासाठीं त्या कामगिरीवर शाइस्ताखानानें कारतलबखान याची योजना केली. कारतलब हा चार हजारी सरदार व जातीनें उझबेक असून त्यानें परिंड्याचा किल्ला विजापूरकरांपासून जिंकून घेण्यांत महत्त्वाची कामगिरी बजावली होती (सरकार).

सन १६६० त शिवाजीमहाराज पन्हाळगडावर अडकून पडले असतां वर सांगितल्याप्रमाणें शाइस्ताखानानें औरंगाबादेहून पुण्यावर स्वारी केली. त्याजबरोबर पाऊण लाख घोडदळ असून त्यांत कारतलबखान हा प्रमुख व त्याशिवाय सर्जेराव घाडगे, राय बागीण, चव्हाण, अमरसिंह, जसवंत

कोकाटे, जाधव इत्यादि लहानमोठे अधिकारी होते. त्यानें पुणें प्रांतीं आल्यावर शिवाजीचा मुलूख जिंकण्यास सुरुवात केली. महाराज राजगडावर येण्यापूर्वीच हें नवें संकट त्यांजपुढें वाढून ठेवलें होतें. बोरघाटांतून जाणारी आगगाडी एका बोगद्यामधून बाहेर पडून थोडा वेळ जातो न जातो तोंच दुसऱ्या बोगद्यांत शिरावी त्यासारखाच महाराजांवर हा प्रसंग होता. महाराज या वेळीं तिशीच्या अमलांत होते. त्यांच्या तारुण्याला ऐन बहर आला होता. लाथ मारीन तेथें पाणी काढीन अशी त्यांच्यांत धमक होती. संकट म्हटलें कीं त्यांचे बाहु स्फुरण पावत व पूर्वसंकटांत आलेला शीण पार नाहींसा होऊन नव्या उमेदीनें ते कामास लागत. त्यांचा देशावरील मुलूख शाइस्ताखानानें बहुतेक जिंकला होता. उत्तर कोंकणांत मोगल शिरले असून तें जिंकण्याचें त्यांचें काम चालू होतें; मात्र दक्षिण कोंकण काय तें शिल्लक राहिलें होतें. अशा वेळीं महाराजांनीं दक्षिण कोंकणांतील आपलें राज्य कायम ठेवण्याचा निश्चय केला आणि देशावर व उत्तर कोंकणांत मोंगलांना सतावण्याची कामगिरी महाप्रतापी नेताजी याजवर सोंपविली.

महाराज शत्रूकडील बित्तंबातमी शत्रूच्या हालचाली सुरू होण्यापूर्वीं काढण्यांत फार दक्ष असत. त्यासाठीं शत्रुसैन्यांत हेरांचें जाळें पसरून ठेवून त्याजवर ते पाण्यासारखा पैसा खर्च करीत. कारण त्यांच्या मोहिमांचें यश त्या बातम्या आगाऊ कळण्यावरच बहुतांशीं अवलंबून असे. शाइस्ताखानाच्या सैन्यांत शिवाजीचे असंख्य हेर होते. त्यांजमार्फत खान कोंकणांत सैन्य पाठविणार असल्याची खबर लागतांच महाराज नेताजीसह कोंकणांत जावयास निघून पालीजवळील उंबर खिंडीच्या अरण्यांत शाइस्ताखानाचा सरदार कारतलबखान याची वाट पाहत दबा धरून बसले. त्यांनीं उंबरखिंडींत कारतलबास आडवून त्याचें पाणी तोडलें, त्याच्या सैन्याची धुळधाण उडवून दिली, त्यापासून खंडणी घेतली व आपण त्वरेनें दक्षिण कोंकणांत जावयास निघून मोगलांपासून स्वराज्याचें संरक्षण करण्याची महत्त्वाची कामगिरी त्यांनीं नेताजीवर सोंपविली. अशा रीतीनें महाराज कोंकणांत व नेताजी मोगलांच्या पाठीवर अशी कामाची वांटणी करण्यांत आली. नेताजी गनिमी काव्याच्या लढाईंत आतांपर्यंत तरबेज

झाला होता. त्याचें सैन्य थोडें व शाइस्ताखानाचें अपार, या कारणानें त्यास गनिमी कावाच स्वीकारावा लागला. या पद्धतीनें लढून व झुकांड्या दाखवून खानाच्या सैन्यापासून त्यानें खूप लूट मिळविली व खानाला अगदीं रडकुंडीस आणलें.

मोगलांची मिजास

नेताजीच्या युद्धपद्धतीचें वर्णन तत्कालीन लेखक कॉस्म द गार्डा (Cosme da Guarda) यानें लिहून ठेवलें आहे. तें वाचलें असतां शाइस्ताखान कसा टेकीस आला असेल याची कल्पना येते. शाइस्ताखान बडा उमराव, मोगल बादशहाचा जवळचा आप्त, त्याला मोहिमेंतील कष्ट व हालअपेष्टा माहीत नसत. त्यानें या वेळेपर्यंत ज्यांच्याशीं युद्ध केलें ते शत्रु वेगळे व शिवाजी हा हरदय शत्रु वेगळा. त्याचे सैनिक भीमथडी, गंगथडी वा नीरथडी तट्टावर बसणारे, घोंगड्या पांघरणारे, चटणी-भाकर खाऊन राहणारे व विसांव्याकरितां कोठेंहि झाडाखालीं पडणारे, फार चलाख, कष्टाळू, उन्हातान्हांत हिंडणारे, पाठीवर ओझें घेऊन नित्य डोंगर चढणारे व उतरणारे. जी सैनिकांची स्थिति तीच सेनापतींची. उलटपक्षीं मोगली सैन्याची मिजास काय विचारावी ! मोगली सैन्याबरोबर डेरे, राहुट्या, तंबू, हत्ती, उंट, बाजार-बुणगे असा लवाजमा असून जेथें त्याचा तळ पडे तेथें एक लहानसें शहरच वसलेलें दिसे. अशा सैन्याच्या हालचाली अगदीं गजगतीनें होत. त्यांना एका ठिकाणचा तळ हालवून दुसऱ्या ठिकाणीं जाण्यास किती तरी वेळ लागे. त्यांचीं युद्धें बहुधा मैदानांत होत. पण आतां त्यांना डोंगराळ मुलुखांतील शत्रूशीं झुंजण्याची पाळी आली. मुलुख जसा डोंगराळ तसा जंगली. त्या योगानें शत्रूचें सैन्य कोठें आहे व कोठून येत आहे व तें किती आहे याचा पत्ताहि मोगलांना नसे. मोगली सैन्याची छावणी पडली किंवा ती हालली म्हणजे मराठ्यांच्या टोळ्या आसपासच्या दऱ्या-खोऱ्यांतून अकस्मात् येत. रात्रींबेरात्रीं शत्रु बेसावध पाहून त्याजवर अचानक हल्ला करून सैन्याचा संहार करीत व लूट घेऊन शत्रु बचावाच्या तयारीस लागणार तोंच पळून झाडींत वा डोंगरांत दिसेनाशा होत. समोरासमोर असा सामना क्वचितच होत असे व तो झाला तरी शिवसैन्य तुकड्या-तुकड्यांनीं येत असल्यामुळें त्याचें नुकसानहि फारसें होत नसे.

कृष्णाजी अनंत सभासद हा शिवकालीन लेखक होय. त्याला मोगली सैन्य काय धर्तीचें व तोलाचें असे याचें ‘ चक्षुर्वै सत्यम् ’ ज्ञान असल्यामुळें त्यानें शाइस्ताखानाचें केलेलें वर्णन बरेंच विश्वसनीय मानण्यास हरकत नाहीं. तो म्हणतो, ‘ बराबरी पाऊण लाख घोडा व हत्ती, याखेरीज कित्येक मुत्सद्दी वगैरे, तिरंदाज, बरखंदाज, रजपूत, तसेंच हत्तीचा तोफखाना, उंटाचा तोफखाना, घोडियावरील तोफखाना, बरचीवाले, आडहत्यारी, पाईच्यांची गणतीच नाहीं. बराबरी फरासखाना, त्यासी शंभर हत्ती, तसेंच भांडते हत्ती चारशें असे पांचसहाशें हत्ती. तसेंच अगणित उंट, यांखेरीज बाजारबुणगे, दारूगोळी, बाणांच्या भांडत्या गाड्या. असें अमर्याद सैन्य. स्वारी म्हणजे कलयुगीचा रावणच. जैशी रावणाचे संपत्तीची गणना न करवे, तैसाच बराबरी खजीना बेमोहिन, हत्ती, उंट खेचरें, गाडियावर भरून तख्त व सोनें, रुपें, मोहरा, होन, रुपये बत्तीस कोटि द्रव्य घेऊन निघाला. नबाब शाइस्ताखान म्हणजे पादशाहाची प्रतिमाच दुसरी. ऐसा सेनासमुद्र सर्व संपत्तीनिशीं राजियावर चाल करून आला. लष्कर मुक्काम करीत तेव्हां दोन गांवें लांब व गांव-दीड-गांव रुंद लष्कर राहत असे. मजल दरमजल चालून येऊन पुणियास आला.” याचा अर्थ शाइस्ताखानास मनुष्यबळ, द्रव्यबळ व इतर साधनसंपत्ति यांपैकीं कशाचीच न्यूनता नव्हती. उलटपक्षीं महाराजांकडे पाहावें तर या सर्वांचीच जवळ जवळ नकारघंटा. अशा स्थितींस गनिमी काव्याच्या पद्धतीनें त्यांनीं लढूं नये तर काय करावें ?

शाइस्ताखान ता. ९ मे १६६० रोजीं पुण्यास आला व त्याजवर शिवाजीनें छापा घातल्यानंतर तो मोठ्या नामुष्कीनें पुणें सोडून जून १६६३ त औरंगाबादेकडे चालता झाला. त्यानंतर १५ जानेवारी १६६४ मध्यें सुभेदारीच्या जागेवर मोअझ्झिम औरंगाबादेस फिरून आल्यावर शाइस्ताखान दिल्लीकडे गेला. अशा रीतीनें पुणें प्रांतांत त्याचा तीन वर्षें मुक्काम होता.

शाइस्ताखानास पुण्यांत येऊन एक वर्ष झाल्यावर त्याजकडून शिवाजीचा बंदोबस्त नीट होत नाहीं असें पाहून औरंगजेबानें महाराज जसवंतसिंग या मोठ्या रजपूत सेनापतीस दिल्लीहून पाठविलें. तो आल्यावर मोहिमेचें दगदगीचें काम जसवंतसिंग करूं लागला व शाइस्ताखान शक्य तितका पुण्यासच राहूं लागला. तेथें बसून तो सेनापतींकडून

वेगवेगळ्या दिशांनीं जाऊन शिवाजीचा मुलुख जिंकण्याचें काम करवून घेई. त्याप्रमाणें त्यानें कारतलबखान व नामदारखान यांस कोंकणांत पाठविलें. त्यांनीं १० जून १६६१ ते ३० मार्च १६६३ पर्यंत उत्तर कोंकण जिंकून बारा सहस्र घोडदळाची छावणी चौलास ठेवली. तिजजवळचा सेनापति नामदारखान याचा १६६२ त मार्च अखेर शिवाजीनें पराभव केला. पण त्याचा विशेष परिणाम मोगलांवर झाला नाहीं. सारांश, महाराजांच्या हातून उत्तर कोंकण, वरील दोन वर्षांच्या मुदतींत गेलें. म्हणून दक्षिण कोंकणावरच आपलें सामर्थ्य एकवटून त्याच्या रक्षणाचा त्यांनीं शिकस्तीचा प्रयत्न चालविला.

फितुरीचा प्रयत्न

महाराज मधून मधून कोंकणांत जात व मातुःश्री जिजाबाई व मंत्रि-मंडळ यांच्याशीं विचारविनिमय करून पुढील धोरण ठरविण्याकरितां राजगडावर येत. मोगल, आपल्या सेनाबळानें महाराजांचे किल्ले लढून घेतां येत नसल्यामुळें फंदफितुरीनें घेण्याच्याहि उद्योगांत असत. कोंडाणा ऊर्फ सिंहगड हा किल्ला महत्त्वाचा पण अजिंक्य असलेला पाहून मोगलांनीं त्या-वर फितुरीचा मंत्र टाकला. त्या बाबतींत महाराजांनीं ३ एप्रिल १६६३ रोजीं मोरो त्रिमल पेशवे व निळो सोनदेव मुजुमदार यांस पत्र लिहून कळ-विलें, "साहेबीं कोंकणांत नामदारखानावरी जाण्याचा तह केला होता. ऐसियासी हाली किले सिंहगडाहून समाचार आला आहे कीं, गडावरी कांहीं फितवा जाला आहे. याबद्दल तूर्त कोंकणांत जाण्याचा तह राहिला तरी तुम्ही लष्करी लोकानसी व खासखेली हशमानसी कागद देखतांच स्वार होऊन किल्ले सिंहगडीं जाणें. आणि किल्लीयावरच हुषार खबरदार असणें. फितवा कोण कोण लोकीं केला होता, हें खबर घेऊन हुजूर लेहून पाठविणें. तान्हाजी नाईक व कोंडाजी व कमळोजी नाईक व दरेकर व रुमाजी अहिरा व गोंदजी पांढरा हे बरोबरी घेऊन सिंहगडास जाऊन सिंहगडीं अलगो अलगानी बहुत खबरदार असणें. जे लोक किल्लियावरी भेदांत अस-तील ते व हे आपल्या बरोबरील लोक अलगेस ठेवणें" (प. सा. सं. खं १ पृ. २२४). ही फितुरीची भानगड मिटविण्याकरितां त्यांना कोंकणांत नामदारखानावर जाण्याचा विचार रहित करावा लागला.

नेताजीची दौड

कोंकणांत महाराजांकरितां शाइस्ताखानानें बारा हजार घोडदळ ठेवलें होतें. तसें देशावर नेताजी धामधूम करीत होता त्याच्यामागें सात हजार घोडदळ लावलें होतें. नेताजी मोगलांच्या मुलुखाची लुटालूट करीत व झुकांड्या देत आदिलशाही मुलुखांत शिरून विजापुरापर्यंत पोंचला होता. त्याच्या भीतीनें विजापूरची राजाराणी विजापूर सोडून ३० मार्च १६६३ च्या सुमारास बंकापुरास पळून गेलीं. मोगली सैन्यानें नेताजीचा पाठलाग इतक्या जोरानें केला कीं, नेताजीला दररोज ४५ ते ५० मैलांपर्यंत दौड करावी लागली. नेताजी शत्रूच्या हातीं लागला नाहींच पण त्याला त्रास फार पडून त्या मानानें लूट मात्र थोडी मिळाली. नेताजीस वांचविण्याच्या कामीं रुस्तुमजमा शिवाजीचा मिंधा असल्यामुळें त्यानें मोगलांकडे रदबदली करून ‘ पुढील प्रदेश अपरिचित सैन्यास धोक्याचा असल्याच्या सबबीवर त्यांना पुढें जाण्यापासून परावृत्त केलें ’ (प. सा. सं. खं. १, पृ. २२५). त्यानंतर नेताजीचा पाठलाग सोडून मोगल सैन्य परत रहिमतपुरास येऊन राहिलें. नेताजीची मोगलांबरोबर जी शेवटची चकमक झाली तींत त्याचे तीनशें घोडे पडले व त्याला स्वतःलाहि जखमा झाल्या. त्याच प्रसंगीं रुस्तुमजमा यानें त्यास वांचविलें. या मोहिमेचीं सूत्रें जसवंतसिंगाच्या हातीं असलीं पाहिजेत.

अफजलखानाचा वध १६५९ त झाला. तेव्हांपासून चार वर्षे सतत युद्धांतून युद्धें सारखीं निघतच होतीं. तीं झुंजण्यास पंचवीस-तीस हजार सैन्य तर खरें ? तें रात्रंदिवस धांवतें ठेवण्यास द्रव्य काय थोडें लागणार ? व मनुष्यहानिहि काय कमी होणार ! राजापुराची लूट केली व इतर मुलुखहि जातां येतां लुटला. त्यांत पैसा असा कितीसा मिळणार ! व तो किती दिवस पुरणार ! मोगलांकडे पाहिलें तर त्यांना पळता जीव थोडा झाला असला तरी मनुष्यबळाची वाण नव्हती व द्रव्यबळाला गणतीच नव्हती. कारण दिल्लीचा बडा मोगल औरंगजेब पाठीशीं उभा. अशा स्थितींत जो प्रयोग चार वर्षांपूर्वी अफजलखानावर केला तोच शाइस्ताखानावर करून मोकळें व्हावें, असा विचार महाराजांच्या मनांत येणें स्वाभाविक होय. म्हणून महाराज कोंकणांतून राजगडास आले. तेथें “ कुल सरकारकून व मोटमोटे

लोक सरनोबत बोलावून विचार केला. महाराज त्यांस म्हणाले, ‘ शास्ताखान म्हणजे मुसलमान, पातशहाचा नातलग, येथें लांचलुचपत चालेना. अगर आपणांस रक्षीना. सल्ल्यानें भेटल्यानें नाश करील. आपणांस अपायच आहे. तेव्हां निदानीं मारतां जें होईल तें करावें, अशी हिंमत राजियानें धरली. तों ते दिवशीं रात्रीं श्रीभवानी राजियाचे अंगांत बोलूं लागली, “ लेकरास म्हणावें कीं, शास्ताखान येतो त्याची फिकीर न करणें. जैसा अफजलखान मारिला तैसा यासी मारून घालवितयें. तूं चिंता न करणें. जैसा अफजलखान मारिला तैसा शास्ताखान येऊन उतरल्यावरी त्याचें गोटांत शिरून मारामारी करणें. पराभवातें पाववितयें. ’ असें श्रीनें सांगोन मागती राजे सावध झाले. जवळ कारकून होते, त्यांनीं श्रीचीं वाक्यें लिहून ठेविलीं होतीं तीं राजियास सांगितलीं ” (सभासद पृ. ३५).

शाइस्ताखानावर छापा

खानास मारावें असा निश्चय महाराजांनीं केलाच होता. पण ‘ पडता जडभारी । दासें आठवावा हरि ’ या संतवचनाप्रमाणें महाराज संकटकाळीं देवी भवानीस शरण जात व तिचा आशीर्वाद मागत. तो मिळतांच ते पुढील तयारीस लागले. “ त्यांनीं चखोट धारकरी माणूस निवडले. निवडक हजार माणूस काढले. राजगडावरून सडे होऊन खालीं उतरून निवडक लोक व लष्कर घेऊन चालले. बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी देशकुलकर्णी तर्फ खेडेबारें. हे बहुत शहाणे व शूर, राजियाचे प्रीतिपात्र. हे दोघे बंधु बरोबर घेतले. नेताजी पालकर व मोरोपंत पेशवे यांच्या दोन फौजा केल्या. नेताजी पालकर पागादेखील एक फौज केली. आणि शिलेदार व हशम मावळे मिळोन एक फौज अशा दोन फौजा शाइस्ताखानाच्या गोटाबाहेर अर्ध कोशावर दोन तर्फा उभ्या केल्या आणि खासा राजियांनीं ढाल तलवार हातीं घेऊन, तयार होऊन हजार माणूस पायउतारा बरोबर घेतले. आणि नबाबाच्या गोटांत चालले. बाबाजी व चिमणाजी बापूजी खेडकर पुढें चालले. त्यांच्या पाठीवर कुल लोक व राजे चालले. तांब्यांचें दळ थोर, जागा जागा लष्करांत राजियासी कोणाचे लोक ? कोण ? कोठे गेले होते ? म्हणून पुसतात. “ कटकांतील लोक, चौकी पहाऱ्यास गेलों होतों ” असें भाषण बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी बोलत चालले.

"इतक्यांत मध्यान्ह रात्र झाली. नबाबाच्या डेऱ्याजवळ गेले. हजार माणसांच्या फौजा केल्या. डेऱ्यास जाऊन दोन तर्फेनें उभे राहिले. दोनशें माणूस त्यांत निवडून खासा राजियानें आंगेच चिमणाजी बापूजीस सांगून बाड (कनाथ) कटारीनें चिरून आंत शिरले, तों डेरियांत डेरे सात, बाडांचे फेरे, तितकेहि फोडून आंत गेले. लोक चौकीचे निजले होते, त्यांस कळों दिलें नाहीं. तेव्हां राजा खासा नबाबाचे डेरियासि पावले. डेरियांत डेरे सात व दाया (दासी) असा समुदाय बायका होत्या, त्यांस कळलें कीं, गनीम डेरियांत आला. हें कळोन नबाब शास्ताखान घाबिरा होऊन, मेणबत्त्या, समया विझवून बायकांत लपून राहिला. राजा बायकांवर हात न करी. असे दोन घटका होते. इतक्यांत सवड पाहून नबाब बायकांतून एकीकडे होऊन तरवारीस हात घालावयासि गेला. ती नदर राजियानें धरून वार केला. खानाचीं बोटें तीन उडालीं. तेव्हां गलबा थोर जहाला. गनीम आला असें कळून चौतर्फांनीं लष्कर तयार झालें. मग राजे बाहेर निघाले आणि आपली फौज सरनौबत व पेशवे होते त्यांत मिळून चालिले. गनिमाची फौज कुल तयार होऊन आपले गोटांतच शोध करूं लागले. यांचा माग लागत नाहीं म्हणून नीट वाटेनें निघोन (मोगलांची फौज) ठिकाणीं पावली.

"दिवस उगविल्यावर उपरांत नबाबाच्या परामृषास कुल वजीर आले. पाहतात तों नबाबाचीं तीन बोटें तुटून गेलीं. वरकड कित्येक लोकांचा नाश व बायकांस व खोजियास जखमा जाहल्या. कित्येक लोक मेले. असें कळून नबाब बोलिला जे गनीम इतका खाशा डेऱ्यांपर्यंत येईतों कोणी वजीर हुशार जाले नाहींत, खबरदार कोणी नाहीं. अवघे फितव्यांत मिळाले. आज राजा येऊन आपलीं बोटें तोडिलीं, उद्या मागती येऊन आपलें शीर कापून नेईल. शिवाजी मोठा दगेखोर आहे. दगा दिधला. आणखी दगा देईल. आमच्या लष्करचा इतबार येत नाहीं. आतां येथून कूच करून माघारा दिल्लीस जावें. या लोकांबरोबरी आपणांस रहावत नाहीं. असा विचार करून तिसरे दिवशीं कूच करून माघारा दिल्लीस चालला.

'शास्ताखानास शास्त'

"राजे (परत) राजगडास आले होते. बातमी खबर शत्रूच्या सैन्यां-

तून आणली कीं, ‘ शास्ताखानाचीं बोटें तुटोन गेलीं. उजवा :हात थोटा जहाला. नबाब दहशत खाऊन पळोन दिल्लीस चालला ! त्याजवरून राजे बहुत खुशाल जाले कीं ‘ फत्ते होऊन आलों. शास्ताखानास शास्त केली. पातशहानें नांव ठेविलें. परंतु तें व्यर्थ ठेवलें. तें नांव आपण शास्त करून रुजू केलें ’ अशी खुशाली करून साखरा वांटल्या. भांडीं (तोफा) मारलीं ” (सभासद).

सभासदानें वरील हकीकत ती घडल्यापासून सुमारें सोळा वर्षांनीं मागाहून लिहिली आहे. ती घडली तेव्हां त्यानें इतरांच्या तोंडून ऐकली असली तरी स्मरणानें लिहिली असल्यामुळें ती तितकी विश्वसनीय नाहीं, असें कोणास वाटण्याचा संभव आहे. परंतु ज्यांनीं ती हकीकत सभासदास सांगितली त्यांपैकीं कित्येक जण महाराजांबरोबर खानाच्या गोटांत गेलेले असतील व त्यांनीं तें समक्ष पाहिलेलें दृश्य सभासदास रसभरीत वर्णन करून त्याजसमोर उभें केलें असेल. त्याचा ठसा सभासदाच्या मनावर इतका उमटला असला पाहिजे कीं, त्याची हकीकत लिहितांना तें चित्र त्याच्या डोळ्यांसमोर जसेंच्या तसें उभें राहून, त्यानें तें कागदावर वठविलें असेल. तथापि तोच प्रसंग ता. १२ एप्रिल १६६३ रोजीं राजापूरचा इंग्रज अधिकारी गिफर्ड यानें सुरतेस कळविला. त्याची माहिती शिवाजीचा कुडाळ प्रांतांतील सुभेदार रावजी पंडित यास समजली व रावजीनें ती गिफर्ड यास आदल्या दिवशीं खुद्द शिवाजीकडून आलेल्या पत्राच्या आधारें सांगितली ती अशी –

खानाची हानि

“ शिवाजी चारशें निवडक लोकांसह जातीनें शाइस्ताखानाच्या तळावर गेला. कांहीं बहाणा करून तो सलाम करण्यासाठीं म्हणून शाइस्ताखानाच्या तंबूंत गेला. आणि लगेच पहारा साफ मारून शाइस्ताखानाचा वडील मुलगा, त्याचा जावई, त्याच्या बारा बिब्या, चाळीस मोठे दरकदार, मोगलांचा सेनापति इतक्यांचे प्राण हरण करून खुद्द शाइस्ताखानाला आपल्या स्वतःच्या हातानें जखम करून (त्याला तो मेला असें वाटलें होतें. परंतु नंतर तो जिवंत आहे असें त्यानें ऐकलें) त्याच्या आणखी सहा बायका आणि दोन मुलगे शिवाजीनें ठार केले. (त्यांपैकीं

एक अबुलफत्ते हा होता.) या सगळ्या भानगडींत त्याचे फक्त सहा सैनिक मेले व चाळीस जखमी झाले. दहा हजार घोडेस्वारांचा अधिपति राजा जसवंतसिंग समीप असून पाठलाग न करतां स्तब्ध राहिला. यावरून त्याचें त्यांत अंग होतें असें सगळ्यांना वाटतें. शिवाजी मात्र आपल्याला परमेश्वरानें हें कृत्य करण्याचा संदेश दिला असें आपल्या लोकांना सांगतो." (प. सा. सं. खंड १, पृ. २२६).

वरील पत्रानंतर ता. २४ मे १६६३ रोजीं त्याच गिफर्डनें कोल्हापुराहून सुरतेस दुसरें पत्र पाठविलें. तें पहिल्या पत्रानंतर दीड महिन्यानें पाठविलें असल्यामुळें खरी माहिती समजल्यानंतरच तें लिहिलें होतें यांत शंका नाहीं. त्यांत गिफर्ड लिहितो, "शाइस्ताखान-प्रकरणीं मृत्यूची संख्या एक मुलगा मेला, दोन जखमी झाले, सहा बायका मरण पावल्या, आठांना जखमी झाल्या आणि शाइस्ताखानाच्या परिवारापैकीं आणखी ४० लोक मृत्यू पावले. या प्रसंगीं मुख्य कामगिरी शिवाजीनेंच केली. चारशें लोकांनिशीं तंबूंत शिरून मारतां आले तेवढ्या लोकांना मारून तो जसवंतसिंगाच्या अंगावरून बाहेर पडला. जसवंतसिंगानें त्याला विरोध मुळींच केला नाहीं. त्यावरून जसवंतसिंगाच्या सांगण्यावरूनच त्यानें हें केलें असें लोक बोलतात" (प. सा. सं. खंड १, पृ. २२८).

महाराजांनीं शाइस्ताखानाच्या गोटावर छापा रात्रीं घातला कीं दिवसां घातला याचा निर्देश त्यांत नाहीं. पण सभासदानें म्हटल्याप्रमाणें तें कृत्य रात्रींच झालें असलें पाहिजे यांत शंका नाहीं. कारण दिवसां सर्वच लोक हिंडते-फिरते व सावध असल्यामुळें त्या वेळीं तें होणें शक्य नाहीं. शिवाय खान काय किंवा दुसरा कोणी काय हुकमी रात्रीचाच ठराविक ठिकाणीं सांपडावयाचा. हें कृत्य ५ एप्रिल रोजीं झालें. ता. ३ एप्रिल रोजीं महाराज राजगडावर असून त्या दिवशीं त्यांनीं सिंहगडावरील फितव्यासंबंधाचें पत्र मोरोपंत पेशव्यास पाठविलें होतें. त्यानंतर लागलीच खानाचा सोक्षमोक्ष लावण्याचा त्यांनीं निश्चय केला. अफजलखान-वध-प्रसंगीं त्यास भेटण्याकरितां म्हणून महाराज गेले होते. त्या भेटींतच त्यांनीं खानास ठार केल्यामुळें शाइस्ताखानापाशीं भेटीची गोष्ट काढण्याची सोयच राहिली नव्हती. शाइस्तास ठार मारल्याशिवाय या आपणांवरील मोहिमेचा शेवट होणार

नाहीं अशी महाराजांची आता बालंबाल खात्री झाली होती. त्या मसलतीची योजना त्यांनीं ४।५ दिवसांतच आंखली. जसवंतसिंग हिंदु असल्यामुळें त्याजबरोबर हिंदु या नात्यानें मोकळेपणानें विचार-विनिमय करण्यास हरकत नव्हती. आपण हिंदुधर्मरक्षणार्थ स्वराज्य स्थापन करीत आहों, तुम्हीहि हिंदु व रजपूत आहां, तेव्हां माझ्या कार्यास तुमची प्रत्यक्ष मदत नसली तरी सहानुभूति असावी, असें महाराजांनीं त्याची गुप्त भेट घेऊन आपल्या मोहक वाणीनें सांगून त्याजपासून अनुकूलता मिळविली असेल व ज्यांना द्रव्यानें वश करतां आलें त्यांस तसेंहि वश करून घेतलें असेल. खान कोणत्या डेऱ्यांत निजतो हें स्वतः महाराजांनीं गुप्तपणें जाऊन पाहिलें असेल व तेथील खडान् खडा ज्ञान करून घेतलें असेल. इतकेंच नव्हे तर महाराज ज्या लोकांना बरोबर घेऊन खानाच्या शिबिरांत गेले त्यांपैकीं पुष्कळ जण गुप्त रूपानें आगाऊ अनेक वेळां तें स्थळ पाहून आले असतील व आंतील बंदोबस्त कसा असतो, याविषयीं त्यांनीं खात्री करून घेऊन आत गेल्यावर कोणतें मिष करावें हेंहि त्यांनीं आगाऊ ठरविलें असेल.

खानानें गाशा गुंडाळला

जसवंतसिंग शिवाजीस फितुर असल्याचा बोभाटा छाप्यानंतर सर्व महाराष्ट्रभर झाला होता. त्यांत पुष्कळच तथ्य असलें पाहिजे. खुद्द जसवंतसिंग व त्याच्या सैन्यांतील हिंदु अधिकारी महाराजांनीं वश करून घेतले असतील, म्हणूनच महाराजांच्या सैनिकांना त्यांनीं अडविलें नाहीं किंवा उपद्रव दिला नाहीं. या छाप्याचा जों जों अधिक विचार करावा तों तों महाराजांचें बुद्धिवैभव व संघटनाचातुर्य अधिकच प्रतीत होऊन मति कुंठित होते. त्यांनीं केलें तें केवढें मोठें धाडस! तें फसलें असतें तर त्यांच्या शरीराचा एक कणहि हातीं लागला नसता; आणि त्यांनीं बरोबर घेतलेले दोस्तहि केवढ्या छातीचे व निस्सीम स्वामिनिष्ठेचे! तेहि महाराजां-प्रमाणेंच मरणाला उधार नव्हते. महाराज खानाला ठार मारण्यासाठींच गेले होते, पण सर्वच गोष्टी पूर्णपणें आपल्या मनाजोगत्या घडतात असें नाहीं. खानावरील संकट 'जिवावर आलेलें शेपटावर गेलें' असें असलें तरी त्याची हानि कांहीं थोडी झाली नाहीं. तो स्वतः थोटा झाला. एक मुलगा प्राणास मुकला. कित्येक बायका तो त्यांत घुसल्यामुळें नाहक शत्रूच्या तर-

वारीस बळी पडल्या. इतर लोकहि थोडे मेले नाहींत. चांगले चाळिसां-पर्यंत मेले. ही खणाखणी खानाच्या शामियान्यांत कमींत कमी घंटा-दीड घंटा तरी झडली असली पाहिजे. खान जरी न मेला तरी या प्राणहानीनें जो परिणाम व्हावयाचा तोच झाला. खान गाशा गुंडाळून वरील प्रसंगानंतर तीन महिन्यांनीं औरंगाबादेकडे पोबारा करता झाला.

शाइस्ताखान पुण्यास असतां शिवाजीच्या लाल महालांत राहत होता, असा एक सार्वत्रिक समज आहे व तो अंशतः खरा आहे. खानाचा मुक्काम पुण्यास तीन वर्षें असल्यानें केवळ तंबूंत इतका काल राहणें गैर-सोयीचें होतें. म्हणून कायम इमारत लाल महाल, तिचाहि वापर तो करी. पण ती इमारत त्याच्या मोठ्या परिवारास अपुरी असल्यामुळें तिच्या शेजारींच डेरे देऊन खानासुद्धां बहुतेक सर्व लोक त्यांत वास्तव्य करीत. खाशा खानास लाल महालांत राहण्यास हरकत नव्हती. पण ते दिवस उन्हाळ्याचे असल्यामुळें खान रात्रीच्या उकाड्यांत तंबूंतच निजत असला पाहिजे. म्हणून महाराजांना लाल महालांत न जातां बाहेरच्या बाहेर शत्रूचें कंदन करतां आलें.

खान प्रथम सुरक्षिततेसाठीं औरंगाबादेस जाऊन राहिला व नंतर १५ जानेवारी १६६४ च्या सुमारास दिल्लीकडे गेला. औरंगजेबानें त्याच्या सुभेदारीच्या जागेवर आपला पुत्र मोअज्झीम यास पाठविलें. जसवंतसिंग व मोअज्झीम यांनीं पुढें दोन वर्षें टुरटुर चालविली. जसवंतसिंगानें नोव्हेंबर १६६३ मध्यें कोंढाण्यास वेढा घातला होता, पण तो त्यास १४ एप्रिल १६६४ रोजीं उठवावा लागला. जसवंतसिंगानें कोंढाण्यापुढें अशी कच खाल्ली आणि तो व मोअज्झीम इकडे असतां शिवाजीनें ६ डिसेंबर १६६३ रोजीं सुरतेवर स्वारी करून ती लुटली. त्यायोगें बादशहा औरंगजेब इतका संतापला कीं, त्यानें जसवंतासहि नादान ठरवून त्यास परत बोलावलें व त्याच्या जागीं नव्या दमाचा मिर्झा राजा जयसिंग याची नेमणूक केली. मिर्झा राजा ३ मार्च १६६५ रोजीं पुण्यास दाखल झाला.

प्रकरण दहावें

जयसिंग व शिवाजी

नात्मानमवसादयेत् । – गीता

शाइस्ताखानाचा नक्षा शिवाजीनें उतरविल्यावर खान दिल्लीस परत गेला. पण औरंगजेब हा त्याच्या पराभवानें व फजितीनें इतका संतापला होता कीं, त्यानें प्रथम त्याचें मुखावलोकन सुद्धां केलें नाहीं. पण कांहीं म्हटलें तरी तो त्याचा मामा. तेव्हां त्यास त्यानें एक वर्षभर दिल्लीस ठेवून निरुपद्रवी अशा बंगाल प्रांताचा सुभेदार नेमलें व तिकडे तो ऐषआरामी नबाब चैनींत राहावयास गेला. औरंगजेब हा मानी व हट्टी होता. शाइस्ताखानाच्या मानखंडनेनें आपली स्वतःची मानखंडना होऊन दक्षिणेंतच काय पण साऱ्या हिंदुस्थानभर आपली अपकीर्ति झाली, याचें त्याला अत्यंत दुःख वाटलें. त्यांतच शिवाजीनें सुरत लुटल्यामुळें तर आगींत तेल ओतल्यासारखें झालें. अशा मनःस्थितींत व विचारांत कांहीं दिवस गेल्यावर औरंगजेबानें मिर्झा राजा जयसिंग या नामांकित रजपूत सरदाराची शिवाजीवर योजना करण्याचें ठरविलें. जयसिंग या वेळीं ५६ वर्षांचा वयोवृद्ध गृहस्थ होता. ‘ शिवाजी अदमी नव्हे, बडा सैतान होय ’ असें औरंगजेब शिवाजीविषयीं म्हणत असे. म्हणून त्याला गाडण्यास त्यानें मिर्झा राजा जयसिंग या हिंदु सरदाराची योजना करावी हें चमत्कारिक व गैरमुत्सद्देगिरीचें दिसतें. जयसिंग हा आपला इमानी नोकर आहे याविषयीं औरंगजेबाची खात्री होती व आपल्या खालोखाल आपल्या राज्यांत जर कोणी तोलदार उमराव असेल तर तो जयसिंगच आहे, असें तो समजत असे. औरंगजेब तसा संशयखोरहि होता. जयसिंग हिंदु व शिवाजीहि हिंदु, हे दोघे एक झाले तर सगळेंच मुसळ केरांत! म्हणून त्यानें मोठ्या धूर्तपणानें व अक्कलहुशारीनें जयसिंगाच्या जोडीस दिलीरखान या पठाण उमरावास दिलें. दिलीरखानाबरोबर पांच हजार पठाण व जयसिंगाबरोबर ऐशीं हजार स्वार अशी एकंदर फौज लाखाजवळ होती.

यशःसिद्धीसाठीं अनुष्ठान

जयसिंग हा मोगलांचा एकनिष्ठ सेवक व पक्का स्वधर्मनिष्ठ होता. असे अनेक रजपूत व इतर हिंदु सरदार हिंदुधर्म सांभाळून मोगलांची वा इतर मुसलमान बादशहांची सेवा करीत असत. बादशहानें फार मोठी जोखमीची कामगिरी आपणांवर सोंपविली आहे व ती यशस्वी केल्यावांचून बादशहास तोंड दाखविण्याची सोय नाहीं, याची जाणीव जयसिंगास होती. शिवाजीस नाना उपायांनीं वळवून बादशहाचा आपल्यासारखा सरदार बनविला म्हणजे दक्षिण शांत होईल या समजुतीनें त्यानें तेंच ध्येय आपल्या डोळ्यापुढें ठेवलें. जयसिंगाचा त्या काळांतील सर्व लोकांप्रमाणें अनुष्ठानें व फलज्योतिष यांवर विश्वास होता. मुहूर्त व ग्रहबल सांगण्याकरितां त्यानें आपल्या स्वारींत आपणांबरोबर ज्योतिषी व विद्वान् ब्राह्मणहि घेतलेले होते. त्यानें मोहिमेवर निघण्यापूर्वीं "कोटचंडी व अकरा कोटिलिंगें केलीं. बगळामुखी कालरात्रीप्रीत्यर्थ जप केला. चारशें ब्राह्मण अनुष्ठानास घातले. प्रत्यहीं अनुष्ठान चालविलें. अनुष्ठानास दोन कोट रुपये अलाहिदा काढून ठेवले. तीन मास अनुष्ठान चालून सिद्ध केलें. अनुष्ठानाची पूर्णाहुति, ब्राह्मणांस दान, दक्षिणा देऊन संतर्पण केलें. मग मजल दरमजल चालले." (सभासद).

निकोलाय मनुची

जयसिंगानें आपल्या स्वारींत निकोलाय मनुची या सुप्रसिद्ध इटालियन प्रवाशासहि घेतलें. त्याच्या मदतीनें ज्यांत युरोपियन आहेत असा तोफखाना त्यास तयार करावयाचा होता. मनुचीस दहा रुपये रोज ठरला. त्यानें त्याला उंची पोशाख, एक चांगला घोडा व तयारीसाठीं भरपूर द्रव्यहि दिलें. दिल्लीहून पुण्याकडे येत असतां जयसिंग वाटेंत माळव्यांतून हंडा घाट उतरून ता. १३ फेब्रुवारीस औरंगाबादेस येऊन पोंचला. तेथें शहाजादा मोअज्झीम ऊर्फ शहाअलम यास औरंगजेबानें दक्षिणेचा सुभेदार नेमलें होतें. त्याची गांठ जयसिंगानें घेतली. शिवाजीच्या बंदोबस्ताची कामगिरी शहाअलमास रेटेना म्हणूनच औरंगजेबानें जयसिंगाची दक्षिणेंत मुद्दाम रवानगी केली हें उघड आहे. औरंगाबादेस आल्यापासून जयसिंग शिवाजीभोंवतालचे राजे व राजसत्ता यांचे शिवाजीबरोबर असलेले मित्रत्वाचे संबंध

तोडण्याच्या उद्योगास लागला. शिवाजीनें कोंकणांतून ठाणें जिल्ह्यामधून रामनगरच्या मार्गानें सुरतेवर स्वारी केली होती. त्या टापूंत रामनगर, पेठ व चिऊतिया हीं कोळी राज्यें सह्याद्रीच्या आसमंतात् होतीं. तेथील राजांनीं शिवाजीस मदत करूं नये, त्याजबरोबर मित्रत्वाचे संबंध ठेवूं नयेत, आपल्या मदतीस यावें व स्वतः येणें शक्य नसल्यास आपल्यातर्फे आपल्या पुत्रांना ओलीस म्हणून पाठवावें, असा तह करण्याकरितां जयसिंगानें औरंगाबादेहूनच मनुचीला रवाना केलें. त्याजबरोबर तीस स्वार (Troops), कांहीं पायदळ व खर्चास बरीचशी रोकड दिली. त्याप्रमाणें तो तिन्ही कोळी राजांना भेटला. रामनगरच्या राजानें आपला मुलगा ओलीस दिला. दुसऱ्यानेंहि आपला मुलगा दिला व तिसऱ्यानें त्यास पुत्र नसल्यामुळें भाऊ दिला. त्यांपैकीं प्रत्येकानें त्यास एक घोडा व तरवार नजर करून त्याचा सन्मान केला. या उपायानें शिवाजीचा उत्तरेकडे जाण्याचा मार्ग बंद पाडण्यांत आला. पोर्तुगीजहि शिवाजीशीं हल्लीं बरे वागत होते. त्यांचें राज्य कोंकणाच्या उत्तरेस व दक्षिणेसहि होतें. त्यांनाहि शिवाजीशीं स्नेह-संबंध न ठेवण्यास जयसिंगानें २० मार्च १६६५ पूर्वीच फर्माविलें. त्यास अनुसरून गोव्याच्या पोर्तुगीज व्हाइसरायनें वसईच्या कप्तानास आज्ञा केली व आपणांकडून शिवाजीस केव्हांहि मदत वा सवलत देण्यांत आली नाहीं, शिवाजीच्या नोकरींत कांहीं पोर्तुगीज लोक असले तरी ते आमच्या संमतीनें गेले नसून स्वतंत्रपणें गेले आहेत, तसे ते मोगल, गोंवळकोंडें, विजापूर यांच्याहि नोकरींत आहेत, असें ता. २१ मार्च रोजीं जयसिंगास पत्र लिहून व्हाइसराय अंग झाडून मोकळा झाला.

जयसिंगाचे डावपेंच

जयसिंग पुण्यास ३ मार्च १६६५ रोजीं आल्यावर शाइस्ताखाना-प्रमाणें कायमचा मुक्काम पुणें येथें न करतां पुरंदर व कोंढाणा या दोन किल्ल्यांच्या मधील प्रदेशांत त्यानें आपली फौज सर्वत्र पसरून छावणी केली. शिवाजीनें ज्यांच्या लहान-मोठ्या जहागिरी घेतल्या होत्या असे असंतुष्ट व इतर लोक पुणें प्रांतीं होतेच. त्यांचा शोध काढून व त्यांना बक्षिशीची लालूच दाखवून त्यानें आपल्या पक्षास वळवून घेतलें. त्यांपैकीं चंद्रराव मोऱ्याचा भाऊबंद बाजी चंद्रराव, अंबाजी गोविंदराव मोरे व

माणकोजी धनगर हे असून त्यांस जयसिंगानें आपल्या सैन्यांत दाखल करून घेतलें. त्यांना सय्यद अब्दुल अजीज याजबरोबर देऊन शिरवळचें ठाणें घेण्यास पाठविण्यांत आलें.

जयसिंगानें पुणें प्रांतीं आल्यावर दुसरी महत्त्वाची गोष्ट ही केली कीं, त्यानें शिवाजीची चोहोंकडून नाकेबंदी करण्याचें ठरविलें. त्यानें कुतुबुद्दीनखानास सात सहस्र तौरंगिक देऊन जुन्नरपासून लोहगडापर्यंतच्या प्रदेशाचें रक्षण करण्यास पाठविलें. शिवाजी कित्येकदां बार्शीच्या बाजूनें मोगलाई मुलुखांत शिरत असे. तो रस्ता रोखून धरण्याकरितां नळदुर्गच्या किल्ल्यांत कांहीं सैन्याची योजना त्यानें केली. इतिशामखानास चार हजार स्वारांनिशीं पुणें व त्याच्याजवळचा प्रदेश यांच्या संरक्षणाची कामगिरी सांगण्यांत आली. पुणें ते लोहगड हा टापू डोंगराळ असून त्यांतून उत्तर कोंकणांत उतरण्यास घाट आहेत. त्या २८ मैलांच्या टापूवर दोन हजार स्वारांची योजना करण्यांत आली. सुपें येथें सय्यद मनवरखान व इतर मुसलमान व हिंदु अधिकारी आधींपासून होतेच (सरकार).

जे लोक जयसिंगानें महाराष्ट्रांत आल्यावर आपल्या लगामीं लावून घेतले होते त्यांस कांहीं मलिदा देणें जरूर होतें; यासाठीं त्यानें औरंगजेबास पुढीलप्रमाणें पत्र पाठविलें —

"जावळीचा जुना जमीनदार चंद्रराय व त्याचा भाऊ यांना मीं बोलावणें पाठविलें आहे. त्यांना पुष्कळ अभिवचनें देऊन खर्चाची तजवीजहि केली आहे. अंबाजी, खारकुली व त्यांचे दोन भाऊ हे सर्व पुरंदरावर शिवाजीनें तोफा ओतण्याकरितां ठेविले असून त्यांना तीन हजारांची मनसबदारी आहे. त्यांच्याकडेहि माझे दूत गेले आहेत. अफजलखानाच्या मुलाला 'बापाचा सूड उगविण्याकरितां मोगली नोकरींत ये' असें कळविलें आहे. कदाचित् शिवाजीचे कांहीं जोडीदारहि आमच्याकडे फुटून येतील. या लोकांना मनसबा व जहागिरी द्याव्या लागतील, त्याबद्दल तुमचें काय मत आहे ?" (प. सा. सं. खंड १, पृ. २८६).

याशिवाय जयसिंगानें आपले अधिकारहि वाढवून मागितले. त्याचें म्हणणें असें कीं, सैन्यांतील लोकांचें बरेंवाईट करणें सेनापतीच्या (माझ्या) हातीं पाहिजे. शाइस्ताखान सुभेदार झाल्यापासून सैन्याचे पगार, नेमणुका व

बदल्या कारकुनांच्या हातीं गेल्यामुळें शिपायांना युद्धभूमि सोडून त्यांच्याकडे (औरंगाबादेस सुभेदाराकडे) जावें लागतें. शिपायांची हजेरी व काम सेनापतीकडे, पण बक्षिसी व शिक्षा करणें मात्र त्याकडे नाहीं. तरी हे सर्व अधिकार व जहागिरी बहाल करणें सुद्धां मजकडे असावें. त्याकरितां मला औरंगाबादेस सुभेदार शहाजादा शहाआलम यांजकडे जावें लागूं नये. तसें झालें म्हणजे सर्वांची शेंडी माझ्या हातीं आहे याची जाणीव त्यांना होईल आणि सर्व जण माझ्या मर्जीप्रमाणें कामें करूं लागतील. हें करणें तुम्हांला मान्य नसेल तर हें पत्र गुप्त ठेवावें. नाहीं तर माझा आब जाईल (प. सा. सं. खंड १, पृ. २८६).

अशा रीतीनें शिवाजीला बाहेरून कोंडणें व आंतून त्याचें सामर्थ्य पोखरणें यांपैकीं जे सूक्ष्मासूक्ष्म मार्ग जयसिंगास सुचले त्या सर्वांचा अवलंब करण्यासाठीं त्यानें बादशहाकडे एकमुखी सत्तेची मागणी केली.

तुम्ही-आम्ही एक

एकीकडून शिवाजीची गठडी वळण्याची तजवीज जयसिंग करीत होता व दुसरीकडून शिवाजीशीं सामोपचाराच्या गोष्टी बोलून त्याचें मन वळविण्याच्याहि प्रयत्नांत तो होता. त्या उद्देशानें त्यानें जासुदाबरोबर शिवाजीराजाकडे पत्रें पाठविलीं कीं, " तुम्ही शिसोदे रजपूत. आम्ही तुम्ही एकाचे एकच आहों. तुम्ही भेटीस येणें. तुमचें सर्व प्रकारें बरें करूं " (सभासद). हीं पत्रें राजगडास आल्यावर महाराजांनीं रघुनाथ पंडित यांस पंडितराव किताब देऊन हेजीब म्हणून जयसिंगाकडे पाठविण्याचें योजिलें. ' रजपुतांजवळ प्रसंग पडला तर हे थोर शास्त्रज्ञ आहेत. रजपूतहि शास्त्र जाणतो. त्याशीं व याशीं गांठ बरी पडेल. त्याजबरोबर वस्त्रें, अलंकार देऊन मिरजा राजियापाशीं पाठविलें. ते शत्रुसैन्यांत गेले ' (सभासद).

" राजियाचा हेजीब आला हें वर्तमान कळून मिरजा राजियांनीं बहुत सन्मानपूर्वक भेट घेतली. बोलणें जालें. जयसिंग बोलिला जे ' दिल्लीचा पातशहाबहुत जोरावर, याशीं शत्रुत्व लावलियानें शेवट लागणार नाहीं. राजियानें आपल्या भेटीस यावें. आपण बराबर घेऊन जाऊन पातशहाची भेट करवून देऊं. जैसा रामसिंग आपला पुत्र तैसे तुम्ही आपले आहां.

आपण तुमचें वाईट करणार नाहीं.' येविशीं श्रीकर्पूरगौराची पूजा करून बेल तुळशी दिल्या. पंडित रायासीं वस्त्रें दिलीं व राजियासि वस्त्रालंकार पाठविलें. आणि सांगोन पाठविलें कीं भेटीस येणें. सहाचार महिने कोट भांडवणें, तोलदारी दाखविणें, मग भेटीस येणें, असें सांगून रघुनाथ पंडित-राऊ यांस गुप्तपणें निरोप दिला. त्याजवरून राजे संतुष्ट जहाले. जागा जागा गडकोट यांसि ताकीद करून तमाम मजबुदी करविली. आणि गड भांडवणें म्हणून स्थळा-स्थळास सांगोन पाठविलें" (सभासद).

जयसिंगानें महाराजांस हा योग्य असाच सल्ला दिला व तो देतांना आपण शिवाजीस अनुकूल असल्याचें दिसूं न देण्याची खबरदारी घेतली. महाराजांनीं आपण एकट्या जयसिंगास तेवढेंच मानतों व दिलीरखानास मानीत नाहीं असें कळूं न देण्याकरितां तहाचें बोलणें करण्यास त्याजकडे महालदाराबरोबर पत्र पाठविलें. त्यास उत्तर दिलीरखानानें येणेंप्रमाणें लिहिलें.

शिवाजीस आव्हान

"महालदाराबरोबर तुमचें पत्र आलें तें पावलें. मजकूर कळला. तह करण्याची तुमची इच्छाहि कळून आली. लढण्याच्या पूर्वींच तुम्ही तहाचें बोलणें करतां हें आश्चर्य आहे. अशा बोलण्याकडे लक्ष देणें हें आमच्या-सारख्या बादशाही अधिकाऱ्यास शोभत नाहीं. तुमच्या या डोंगराळ प्रदे-शांत शिकार व नाच करण्यासाठीं आम्ही हिंदुस्थानांतून इतकें दूर आलों नाहीं. आमच्याशीं सामना करावा. तुमच्या मुलुखांत आम्ही पाहुणे आलों असतां पुढें येऊन आमचा समाचार घेण्याऐवजीं तुम्ही दूर राहतां हें योग्य नाहीं. तुमचे ते मजबूत किल्ले, गगनचुंबी पर्वत, आणि पाताळास पोचणारीं खोरीं प्रत्यक्ष पाहण्याची आमची इच्छा असतां तुम्ही तर कोठें दिसत नाहीं आणि वर तहाचें बोलणें लावतां! हा विचार तुम्ही प्रथमच केला असतां तर बरें झालें असतें; आतां तरी हा विचार सुचला हें चांगलें झालें" (प. सा. सं. खंड १, पृ. २९०).

सभासदाच्या बखरींत जयसिंगानें शिवाजीस जें उत्तर दिल्याचें प्रसिद्ध झालें आहे त्यास धरूनच दिलीरखानाचा हा जबाब असल्यानें तो त्यानें जयसिंगाच्या विचारानेंच पाठविला असल्याचें स्पष्ट दिसतें. सल्ला

देतांना शिवाजीचा व आपला कांहीं संबंध नाहीं असा बहाणा करून जयसिंगानें दिलीरखानामार्फत शिवाजीस युद्धाचें स्पष्ट आव्हान केलें आहे व आपण दिलीरखानाइतकेच शिवाजीचे कट्टे शत्रु आहों असें त्यानें खानास भासविलें आहे.

पुरंदर व कोंढाणा यांच्या दरम्यान आपल्या सैन्याचा तळ देण्यांत जयसिंगाचा विशिष्ट हेतु होता. पोर्तुगीज व कोळी राजे यांजकडून शिवाजीला कसलीहि मदत मिळूं नये याविषयीं जयसिंगानें आपल्याकडून तजवीज केलीच होती. शिवाजीचें आतां विजापूरकरांशींहि सख्य झालें असल्याचें जयसिंग महाराष्ट्रांत येत असतां त्याला समजलें. तेव्हां शिवाजीशीं आपण युद्ध सुरू केलें तर शिवाजीचा पाठपुरावा विजापूरकर करतील व शिवाजीमागून मोगलांची धाड आपणांवर येणार असल्याची जाणीव विजापूरकरांस असल्यामुळें, तद्वामुळें नसलें तरी आत्मरक्षणाकरितां विजापूरकर शिवाजीच्या मदतीस येतील अशी जयसिंगानें अटकळ बांधून शिवाजीला अगदीं सन्निध व विजापुराहून शिवाजीस मदत न मिळेल अशा धोरणानें सासवडापाशीं तळ ठोकण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें त्यानें औरंगजेबास कळविलेंहि. खेरीज चौल येथें शाइस्ताखानाच्या वेळच्या सैन्यापैकीं सहा हजार सैन्य शिवाजीच्या छातीवर होतेंच.

शिवाजीनें जबरदस्ताशीं युद्ध नको अशा बुद्धीनें तें टाळण्याचा डाव टाकला असतांहि जयसिंगाचा सल्ला व दिलीरखानाचें आव्हान यांचा स्वीकार करून तोहि तयारीस लागला.

जवानमर्द मुरारबाजी

महाराज कांहीं कच्च्या गुरूचे चेले नव्हते. युद्ध म्हणजे त्यांच्या हातचा मळ होता. त्यांचें लष्करी सामर्थ्य होतें त्याहून मोठें असतें व द्रव्य बळहि पुरेसें असतें तर जयसिंग व दिलीरखान ह्या दोघांनाहि त्यांनीं धूळ चारली असती. पण त्या अभावीं त्यांनीं पड खाऊन पाहिली. तिचा उपयोग न होऊन दिलीरखानानें ३० मार्च १६६५ रोजीं पुरंदरास वेढा घातला. तो पूर्ण होण्यापूर्वी दुसऱ्या दिवशींच महाराजांनीं गडावर जाऊन किल्ला लढविण्याचा व्यूह रचला. सभासदानें वर्णिलें आहे त्याप्रमाणें ‘ दिलीरखानानें नगारा करून, ढाल-फिरंगे घेऊन, पुरंदराखाले येऊन मुकाम करून गडावर

येलगार केला. त्याजपाशीं पांच हजार पठाण, तोफखाना, आडहत्यारी व खलाशी लोक मिळून वीस हजार फौज होती.' या मानानें गडावरील महाराजांची फौज संख्येनें थोडी असली तरी शौर्यानें अचाट होती. तिचा प्रमुख मुरारबाजी प्रभु हा जवानमर्द गडी होता. त्याजपाशीं एकंदर फौज दोन हजार होती. या लढाईंत शिवसेनेस जयाची आशा नव्हती. फक्त मराठ्यांची मर्दुमकी दिलीरखानाच्या प्रत्ययास आणावयाची होती. म्हणून बाजी प्रभु व त्याचे सैनिक महाराजांचा नांवलौकिक कायम ठेवण्याच्या निर्धारानें मोगलांशीं जिवावर उदार होऊन लढले.

"मुरारबाजी निवडक सातशें माणूस घेऊन गडाखालीं दिलेलखानावर आले. दिलेरखान तोलदार, त्याजबरोबर पांच हजार जोरदार पठाण, याखेरीज बहिले (बुंदेले) वगैरे लोक ऐशी मोगली फौज गडावर चौतर्फा चढत होती. तींत बाजीचे सैनिक घुसले. मोठें घोरांदर युद्ध झालें. मावळे लोकांनीं व खासा मुरारबाजी यांनीं निकरावर येऊन भांडण केलें. पांचशें पठाण लष्कर ठार झालें. तसेंच बहिले मारले. खासा मुरारबाजी प्रभु दिलेरखानाच्या देवडीपावेतों साठ माणसांनिशीं मारीत शिरला. दिलेलखान देवडीवरून माघारा झाला. आणि लोकांस सांगून तोफखाना, तिरंदाज, बरच्या व आडहत्यारी एक हजार लोक यांजकडून त्यानें मारा करविला. त्यांत मुराररावाचे साठ लोक पडले. मग मुरारराव ढाल व फिरंगी घेऊन दिलेलखानावर चालून गेला. महाराजांचे नांवाजलेले लोक खर्च झाले असतां, आतां जिवंत राहून महाराजांस तोंड दाखविण्यांत हंशील काय, असा विचार करून त्यानें खानाशीं गांठ घातली. तेव्हां दिलेलखान बोलला जे 'अरे, तूं कौल घे. मोठा मर्दाना शिपाई, तुज नावाजतो.' त्यावर मुराररावानें उत्तर दिलें 'तुझा कौल म्हणजे काय! मी शिवाजीराजाचा शिपाई, तुझा कौल घेतों कीं काय!' असें म्हणून तो खानावर नीट चालला. खानावर वार करणार तों खानानें आपल्या अंगाची कमान करून तो चुकविला व तीर मारून मुराररावाला खालीं पाडला. त्यास त्या स्थितींत पाहून खानानें तोंडांत अंगोळी घालून म्हटलें, 'असा शिपाई खुदानें पैदा केला.' ऐसें आश्चर्य केलें. मुरारबाजीबरोबर तीनशें माणूस ठार झाले. वरकड चारशें माणूस गडावर गेलें. दिलेलखानानें शिरची पगडी उतरली

आणि गडावर चालून घेतलें कीं, 'गड घेईन तेव्हां पगडी बांधीन' असा नेम करून चालला तों दरवाजाखालीं येऊन ढालेचा कोट करून बसला. किल्ल्यावरचे लोक मुरार बाजी पडला याची गणना न करतां शर्तीनें भांडूं लागले. ते म्हणाले, 'एक मुरार बाजी पडला म्हणून काय झालें! आम्ही तसेंच शूर आहों. ऐशी हिंमत धरून भांडतों'" (सभासद).

सर जदुनाथ यांनीं पुरंदरच्या लढाईची दिलेली हकीकत कांहींशी निराळी व बरीच विस्तृत आहे. सत्यान्वेषणास त्याचीहि जरूरी लक्षांत घेऊन तें वर्णन येथें देत आहे :—

"जयसिंग ता. १४ मार्च १६६५ रोजीं पुण्याहून पुरंदर घेण्यासाठीं सासवडास जावयास निघणार होता. इतक्यांत त्याला बातमी लागली कीं, लोहगड ते जुन्नर या टापूचें रक्षण करण्याकरितां ठेवलेला कुतुबुद्दिन जुन्नरास खजिना आणावयास गेला असून त्या संधीचा फायदा घेण्याच्या उद्देशानें शिवाजी मोगली मुलुखांत धामधूम उडविण्याचें योजून लोहगडावर आला आहे. म्हणून जयसिंगानें कुतुबुद्दिनास प्रथम लोहगडाच्या तोंडावर आणून ठेवलें व मग त्यानें ता. २३ रोजीं सासवडाकडे कूच केलें. पहिला मुक्काम त्यानें पुण्यापासून पूर्वेस १२ मैलांवर लोणी काळभोर येथें केला. तेथें रामा व हनुमंत यांच्या हातीं तीनशें स्वार व तीनशें बरकंदाज (foot-musketeers) देऊन त्यानें शिवाजीची फौज त्या दिशेनें मोगली मुलुखांत शिरणार नाहीं असा बंदोबस्त केला. ता. २९ रोजीं तो सासवडापासून एक मुक्काम अलीकडे येऊन थांबला व तेथून त्यानें दिलीरखानास दिवेघाट चढून सासवडाकडे आघाडीवर रवाना केलें. दुसऱ्या दिवशीं स्वतः जयसिंग घाट चढून गेला व पिछाडीच्या रक्षणार्थ घाटाखालीं दाऊदखानास ठेवलें. ता. ३० मार्च रोजीं सकाळीं दिलीरखान छावणीसाठीं सोयीची जागा पाहण्यास गेला व पुरंदर किल्ल्याची त्याच वेळीं त्यानें पाहणी केली. त्या वेळीं पुरंदराच्या माचीवर बरेच मराठे बरकंदाज जमा झाले होते. त्यांनीं खालीं उतरून दिलीरखानावर हल्ला चढविला; पण तो खानाच्या फौजेनें मोडून काढून माची सर केली. त्यांनीं तेथील घरें जाळलीं व गडावरील तोफेच्या टप्प्याबाहेर ठाणें दिलें.

पुरंदरचें युद्ध

ही वार्ता समजतांच जयसिंगानें रायसिंग, किरतसिंग, कुबादखान, मित्रसेन, इंद्रमान बुंदेला इत्यादि सरदारांच्या हाताखालीं तीन हजार सैन्य देऊन त्यांस दिलीरखानाच्या मदतीस धाडलें. त्याप्रमाणें आपणहि त्यास जाऊन मिळावें असा जयसिंगाचा विचार होता. यास्तव त्यानें दाऊदखानास आपल्या छावणीच्या रक्षणार्थ येण्यास हुकूम पाठविला. पण दाऊदखान दिवे घाटाच्या पायथ्यापासून जयसिंगाच्या छावणीवर न येतां तसाच दिलीरखानास जाऊन मिळाला. म्हणून जयसिंगास छावणींतच थांबावें लागलें. ता. ३१ मार्च रोजीं जयसिंगानें आपल्या सैन्याचा तळ सासवड व पुरंदर यांच्या दरम्यान नेऊन तेथेंच कायमची छावणी ठोकली. तेथून त्यानें पुरंदराकडे नजर टाकली तेव्हां तो एकच किल्ला नसून बऱ्याच टेकड्यांभोंवतीं बांधलेला तट आहे असें त्यास आढळून आलें (पॅरिस हस्तलिखित १२५ ब).

" पुरंदर किल्ल्याची उंची समुद्रसपाटीपासून ४५५४ फूट आहे. तो एक किल्ला नसून वज्रगड व पुरंदर असे दोन किल्ले आहेत. वज्रगडावरून पुरंदराची माची गोळ्याच्या टप्प्यांत येते. म्हणून जयसिंगानें प्रथम वज्रगड घेण्याचें ठरविलें. दिलीरखानानें आपले पुतणे, अफगाण फौज व हरिभान नि उदयभान गौर यांच्यासह पुरंदर व वज्रगड यांच्या दरम्यान ठाण मांडलें आणि जयसिंगाची तीन हजार फौज घेऊन कांहीं मनसबदारांसह पुरंदराच्या उत्तर दरवाजावर रोख धरला. पुरंदराच्या पलीकडे दाऊदखान, राजा रायसिंग, महमद साले तारखान, रामसिंग (हाडा ?), शेरसिंग राठोड इत्यादिकांनीं तळ दिला. त्यांच्या उजव्या हातास रसूलबेग रोझभानी व त्याचे सैनिक उभे राहिले. रुद्रमाळाच्यासमोर चतुर्भुज चव्हाण हा दिलीरखानाच्या सैनिकांसह राहिला आणि त्यांच्यामागें मित्रसेन, इंद्रमान बुंदेला व इतर अधिकारी होते.

" पुरंदरास असा वेढा दिल्यावर जयसिंग आपल्या छावणींतून निघून किल्ल्याच्या अगदीं पायथ्याशीं येऊन राहिला व सैनिकांनीं डोंगराच्या कडेनें आपले तंबू ठोकले. जयसिंग रोज वेढ्याच्या जागीं जाऊन व त्याची पाहणी करून सैनिकांना मार्गदर्शन करीत होता व उत्तेजन देत होता.

त्याचा पहिला प्रयत्न आपल्या तोफा उंच टेकड्यांवर नेऊन स्थापण्याचा होता. अब्दुल्लाखान नांवाची तोफ टेकडीवर पोंचविण्यास तीन दिवस लागले व ती रुद्रमाळासमोर रोखण्यांत आली. त्यानंतर ३॥ दिवसांत फत्ते लष्कर ही तोफ चढली व शेवटीं दहेली नांवाची तोफ मोठ्या कष्टानें शिखरावर पोंचविली गेली. या तीन तोफांनीं गोळयांचा भडिमार करून समोरच्या बुरुजाचा पाया उखडला व त्याच्याखालीं सुरुंगाकरितां भोक पाडण्यास कांहीं सैनिक गेले.

" दिलीरखानाच्या तुकडीनें ता. १३ एप्रिल रोजीं दुपारीं बुरुजावर हल्ला करून शत्रूस मागें हटविलें. या हल्ल्यांत शत्रूचे सात पडले व चार जखमी झाले. दिलीरखानाच्या मदतीस जयसिंगानें आपले रजपूत सैनिक धाडले. दुसऱ्या दिवशीं मोगल वज्रगडाच्या आंतल्या भागांत शिरले. ता. १४ एप्रिल रोजीं आंतली शिबंदी तोफांच्या माऱ्यानें हैराण होऊन तिनें सायंकाळीं शरण येऊन किल्ला मोगलांच्या ताब्यांत दिला. पण जयसिंगानें शिवसैनिकांना न पकडतां सोडून दिलें व त्यांजवर दया करून पुरंदर लढविणाऱ्या इतर शिवसैनिकांना न लढतां शरण येण्यास आमिष दाखविलें. शिवाजीच्या इतर या शूर मर्दांना दिलीरखान व जयसिंग या दोघांनींहि पोशाख देऊन त्यांचा बहुमान केला. या युद्धांत मोगलांचे ८० सैनिक मेले व १०९ जखमी झाले (पॅरिस हस्तलिखित, पृ. १२६६).

" वज्रगड पडल्यावर पुरंदर घेणें सोपें झालें. जयसिंग म्हणाला कीं, पुरंदराची किल्लीच आपल्या हातीं आली. दिलीरखान आतां पुरंदराकडे वळला व जयसिंग शिवाजीचा मुलूख लुटण्यास निघाला. जयसिंगाच्या सैन्यांत शिवाजीनें भेद केला होता. पुरंदराच्या खिडकीपाशीं (दक्षिणेची काळदरीकडील दिंडी) दाऊदखान कुरेशी यास ठेवण्यांत आलें होतें. पण त्या बाजूनें मराठ्यांची एक तुकडी त्यानें किल्ल्यांत जाऊं दिली, त्यामुळें दिलीरखानानें दाऊदखानाची चांगलीच खरड काढली व दोघांची खडाजंगी उडाली. तेव्हां जयसिंगानें दाऊदखानास आपल्याकडे घेऊन त्याच्या जागीं पुरदिलखान व शुभकर्ण बुंदेला यांस पाठविलें. पण शुभकर्णहि फितूर होऊन शिवाजीस शक्य त्या सवलती देऊं लागला. दाऊदखान तर नेहमीं म्हणे कीं, पुरंदर पडणें शक्य नाहीं; तो घेण्यासाठीं लढणें

म्हणजे विनाकारण प्राणहानि व द्रव्यनाश करणें होय. ही फितुरी थांबविण्याकरितां जयसिंगानें दाऊदखानास दररोज शिवाजीच्या मुलुखांत लूटमार करण्यास पाठविण्याचा क्रम चालविला.

"दाऊदखान हा ता. २५ एप्रिल रोजीं राजगड, सिंहगड व रोहिडा हा भाग बेचिराख करण्यास निघाला. त्याजबरोबर राजा रायसिंग, सरजाखान (विजापुरी सेनापति), अमरसिंग चंदावत, अचलसिंग कछवा, हे गेले. त्याच वेळीं कुतुबुद्दिनखान व लुदीखान यांस शिवाजीला दमविण्यासाठीं उत्तरेस पाठविण्यांत आलें. दाऊदखानानें ता. २७ रोजीं रोहिड्याजवळ जाऊन तिकडील ५० खेडीं लुटलीं व जाळलीं. मोगलांच्या आणखी एका तुकडीनें डोंगरापलीकडील दुर्भेद्य भागांत जाऊन मोठ्या वस्तीचीं चार गांवें जमीनदोस्त केलीं व तेथील कुणबी, जनावरें व जंगम माल ती घेऊन गेली. ता. ३० रोजीं या तुकडीनें थेट राजगडापर्यंत जाऊन वाटेवरील खेडीं जाळलीं. राजगडावरून शिवाजीचे लोक हा प्रकार पाहत होते, पण प्रतिकाराचें त्यांस धैर्य झालें नाहीं.

"या डोंगराळ भागांतील भूमि उंच-सखल असल्यामुळें हें गेलेलें सैन्य रात्रीं गुंजणखोऱ्याच्या खिंडीपाशीं येऊन सपाटीवर उतरलें व व दुसऱ्या दिवशीं (१ मे) शिवापुरास आलें. तेथून दाऊदखान सिंहगडाकडे चाल करून गेला व तिकडील प्रदेशाची नासधूस करून जयसिंगाच्या हुकुमावरून पुण्यास परत आला.

"दरम्यान कुतुबुद्दिनखान हा पूर-खोरें व ताशी-खोरें (Tashi Khora) यांतील घाटांत लुटालूट करीत होता, त्यास जयसिंगानें पुण्यास ताबडतोब बोलावलें आणि तो व दाऊदखान, शिवाजी लोहगडावर सैन्य जमवीत होता, त्याचें बळ मोडण्याकरितां तिकडे रवाना झाले. ते पुण्याहून चिंचवडास ता. ४ मे रोजीं पोंचले व दुसऱ्या दिवशीं त्यांनीं लोहगड गांठला. मोगल जवळ आलेले पाहतांच ५०० मराठे स्वार व १००० पायदळ त्यांजवर चालून आले. पण मोगलांना नवीन कुमक मिळून त्यांनीं तुंबळ युद्ध करून शत्रूस पळवून लावलें. त्यांनीं लोहगड, विसापूर, तिकोना या किल्ल्यांच्या घेऱ्यांतील खेड्यांतून पुष्कळ लोक व गुरें धरून नेलीं. असा

पराक्रम करून कुतुबुद्दिनखान व दाऊदखान पुण्यास आले. कुतुबुद्दिन पुण्यास राहिला व दाऊदखान पुरंदराजवळील सैन्यास मिळाला (१९ मे).

शिवाजीची प्रतिक्रिया

" मोगल सर्व बाजूंनीं चढाई करीत असतां शिवाजी कांहीं स्वस्थ बसला नव्हता. तो मोगलांनीं वेढा उठवावा यासाठीं शिकस्त करीत होता. एप्रिल महिन्यांत नेताजी पालकर मोगलांनीं नुकत्याच घेतलेल्या परिंडा किल्ल्यावर चालून गेला. पण त्याचा पाठलाग मोगल सेनेनें सुप्याहून करतांच नेताजी पळून गेला. मे महिन्यांत उरवडें येथें शिवाजी आपलें सैन्य जमवीत होता. ही बातमी कळतांच कुतुबुद्दिनखान उरवड्यावर चालून गेला. वाटेनें जातांना त्यानें कांहीं खेडीं लुटलीं आणि वाटेंत मराठे ज्या ज्या किल्ल्यावर होते तेथून त्यांना त्यानें हांकून दिलें. मोगल लोहगड चढून गेले, त्यांनीं त्यावरील मराठ्यांना ठार मारलें व बाकीच्यांना पळवून लावलें. तेथून परत येतांना दाऊदखानानें ३०० सैनिक कैद केले व ३००० गुरें पळविलीं. पण सर्व ठिकाणीं मराठे हरले असें झालें नाहीं. खुद्द जयसिंगच कबूल करतो कीं, आपणांस न जुमानतां शिवाजीनें आपले कित्येक बेत तडीस नेले. काफीखान यापेक्षां स्पष्ट लिहितो, ' मराठ्यांचे अचानक हल्ले त्यांचें मर्दुमकीचें यश, काळोख्या रात्रीचे छापे, रस्ते व खिंडी बंद करणें व जंगलें जाळणें या योगानें बादशाही सैन्याला इकडे तिकडे हालचाल करणें फार कठीण झालें. मोगलांचीं पुष्कळ माणसें ठार झालीं. '

" एप्रिल महिन्याच्या मध्यांत वज्रगड काबीज केल्यावर दिलीरखान त्या डोंगराच्या कड्यावरून पुढें सरकला व पुरंदराच्या माचीला त्यानें वेढा दिला. त्यानें खणलेले चर किल्ल्याच्या ईशान्येस खडकाळ्याच्या बुरुजाला लागले. आंतील शिबंदीनें प्रथम वेढा घालणाऱ्या शत्रूवर हल्ले केले. एका रात्रीं किरतसिंगावर त्यांनीं हल्ला केला. पण तो सावध असल्यामुळें त्यानें मराठ्यांचा हल्ला, त्यांची कत्तल करून, परतविला. दुसरा हल्ला एका काळोख्या रात्रीं रसूलबेग रोझमानी याच्या चरावर त्यांनीं केला. तो त्या वेळीं झोपीं गेला होता. शत्रूनें त्याच्या चरांतील बंदुका (Guns) काबीज केल्या व पंधरा सैनिक जखमी केले. या चकमकीच्या गडबडीनें सावध होऊन शेजारच्या खंदकांतून मोगल फौज बाहेर पडली व तिनें

शत्रूचा नाश करून त्यास मागें हटविलें. दुसऱ्या दिवशीं लढाईंत मेलेल्या लोकांचीं प्रेतें हलविण्याच्या वेळीं उभय पक्षांची चकमक उडाली. तींत मोगलांचे आठ लोक ठार झाले. दिलीरखान हा पुरंदरासमोर घोर मृत्यूप्रमाणें ठाण मांडून बसला होता. त्यामुळें एका महिन्यांत जें काम व्हावयाचें नाहीं तें त्याचे सैनिक एका दिवसांत करीत होते.

" मे महिन्यांत मोगलांचे चर दोन पांढऱ्या बुरजांच्या पायथ्यापर्यंत पोहोंचले. तोफांच्या भडिमारापुढें ते बुरूज सोडून मराठे निघून गेले होते. तरी आंतली शिबंदी, पेटलेलें तेल, दारू भरलेल्या कातड्याच्या थैल्या, तोफेचे गोळे व मोठमोठे दगड खालीं फेकीत होती. त्यामुळें त्यापुढें मोगलांची गति खुंटली. तेव्हां जयसिंगानें लांकडाचे धमधमे बांधून त्यांवर तोफा चढवाव्या व त्याशेजारीं गोलंदाज व बरकंदाज यांस बसण्याची सोय करावी असें योजलें. त्या योगानें किल्ल्यांतील शत्रूवर मारा करणें सोपें होणार होतें. त्याचा हा पहिला प्रयत्न फसला. कारण मराठ्यांनीं तो धमधमा जाळून टाकला. दुसऱ्याचीहि तीच अवस्था झाली. शेवटीं पिछाडीच्या बाजूस तिसरा धमधमा जोडून तो ३० मे रोजीं पुढें आणून उभा करण्यांत आला. त्याजवर रूपसिंग राठोड आणि गिरिधर पुरोहित यांची योजना करण्यांत आली होती. त्यांना प्रथम या धमधम्याच्या पुढें भिंत घालण्यास व मागच्या बाजूस धमधमा उभा करण्यास सांगण्यांत आलें. हें काम चालू असतां धमधम्यावर उभे राहून रजपूत लोक शत्रूच्या बाणांपासून व बंदुकांपासून त्याचें रक्षण करीत होते. हें काम संध्याकाळपूर्वीं दोन तास पुरें झालें.

" या वेळीं दिलीरखानाचे सैनिक शत्रूवर हल्ला करण्यास अधीर झाले होते. धमधम्यावर तोफखाना चढविण्यापूर्वीं दिवस दोन तास राहिला होता. तेवढ्यांत दिलीरखानास न सांगतां कांहीं रोहिला सैनिकांनीं पांढऱ्या बुरुजावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. शिवाजीचे सैनिक मोठ्या संख्येनें तटावर उभे राहिले व त्यांनीं तो हल्ला मोडून काढला. पण इतक्यांत मोगलांस मदत येऊन पोहोंचली. त्यांचे चरांतील लोक शिड्या लावून भिंती चढले व शत्रूवर धांवून गेले. जयसिंगाचा सरदार भूपतसिंग पौर हा पांचशें सैनिकांचा मनसबदार होता. तो व त्याचे कित्येक रजपूत सैनिक धाकट्या पांढऱ्या

बुरुजाच्या उजव्या बाजूस ठार झाले. तेव्हां डाव्या बाजूनें दिलीरखानाच्या कांहीं अफगाणांनीं चढाई चालविली. इतक्यांत धमधम्याच्या पाठीमागून अचलसिंग व किरतसिंग हे पुढें आले. या वेळीं घनघोर युद्ध झालें. त्यांत मराठ्यांचें फार नुकसान होऊन त्यांनीं पांढरा बुरूज सोडून दिला. तेथून ते काळ्या बुरुजाकडे हटले व तेथून ते मोगलांवर बाण, दगड, दारूचे गोळे, बंदुकीच्या दारूनें भरलेल्या कढया यांचा मारा करूं लागले. यामुळें प्रगति खुंटून जयसिंगाला त्या दिवसापुरती लढाई बंद ठेवणें भाग पडलें.

"पुढच्या दोन दिवसांत धमधमा चांगला तयार होऊन त्यावर दोन लहान तोफा चढविण्यांत आल्या. त्या उंच ठिकाणावरून होणारा मारा मराठ्यांना सहन न होऊन त्यांनीं काळा बुरूजहि सोडून दिला व एका लहानशा भिंतीच्या आड ते लपले; पण तेथेंहि त्यांचा निभाव न लागल्या-मुळें ते तिच्या मागच्या चरांत जाऊन बसले. अशा रीतीनें किल्ल्याचे पांचहि बुरूज मोगलांच्या हातीं पडले. पुरंदराची घटका आतां भरली. व त्याचा पुरता नाश करण्याकरितां जयसिंगाच्या विनंतीवरून बादशहानें पाठवून दिलेला फार प्रभावशाली तोफखाना किल्ल्याची वाट चालूं लागला. या दोन महिन्यांच्या युद्धांत किल्ल्यांतील शिबंदीचें फार नुकसान झालें होतें. या वेळ्यांत मुरारबाजी प्रभु हा शिवाजीचा शूर सेनापति पतन पावला.

"बरोबर सातशें निवडक लोक घेऊन मुरारबाजी दिलीरखानावर चालून गेला. दिलीरखान पांच हजार अफगाण व इतर जातींचे आणखी कांहीं सैनिक बरोबर घेऊन किल्ला चढत होता. मराठे त्यावर जाऊन पडले. शत्रूनें त्यांना चोहोंकडून वेढलें. दोघांचें हातघाईचें युद्ध झालें. मुरारबाजीनें आपल्या मावळ्यांच्या मदतीनें पांचशें पठाण, पुष्कळ बहलिया, पायदळां-तील लोक कापून काढले आणि साठ जिवावर उदार झालेल्या अनुयायांस घेऊन दिलीरखानाच्या छावणींत तो शिरला. मोगलांच्या भारी सैन्यानें त्याचे सर्व अनुयायी ठार केले. तरी मुरारबाजी तसाच सरळ दिलीरखानावर चालून गेला व धारातीर्थी पडला, तेव्हां शिवाजी पुरंदर पूर्णपणें मोगलांनीं घेण्यापूर्वीच पुढील हानि टाळण्याकरितां धूर्तपणानें व दूर दृष्टीनें शरण आला" (सरकार).

मराठ्यांचें पाणी

पुरंदराचा वेढा जयसिंग व दिलीरखान या दोघांनीं मिळून चालविला. त्यांना शिवाजीच्या मराठ्यांचें पाणी पाहावयाचें होतें तें त्यांनीं पाहिलें. शिवाजी व जयसिंग यांच्या युद्धांतील पुरंदराचा प्रसंग हा मराठ्यांच्या दृष्टीनें अत्यंत धीरोदात्त प्रसंग होय. त्या प्रसंगानें मुरारबाजीचें नांव मराठ्यांच्या इतिहासांत अजरामर झालें आहे. पुरंदर व सिंहगड हे महाराजांचे आधारस्तंभ होत. त्यांपैकीं पुरंदर किल्ला तर शत्रु घेण्याच्या बेतांत आला. जयसिंगास व दिलीरखानास युद्धाचा चमत्कार दिसावयास पाहिजे होता तो दिसला. बिनमोल योद्धे प्राणास मुकले, चोहोंकडून कोंडमारा झाला. तेव्हां पूर्वी ठरल्याप्रमाणें जयसिंगाच्या भेटीस जाण्याशिवाय परिणाम नाहीं असा विचार करून महाराजांनीं रघुनाथभट पंडितराव यांस जयसिंगाकडे (२० मे १६६५ रोजीं) पुनः पाठविलें. त्यानेंहि सल्ल्यास रुकार देऊन पूर्वीची शपथक्रिया बळकट केली. पंडितराव राजगडास परत आले. " येतांच खासा राजा एक हजार निवडक माणूस बरोबर घेऊन मिर्झा राजाच्या भेटीस निघाले. निघण्यापूर्वी श्रीशंभूस व भवानीस नमस्कार केला. मातुःश्रीस नमस्कार केला व भेटले. शिष्ट व तपस्वी ब्राह्मणांस नमस्कार केला. सर्वांचा आशीर्वाद घेऊन गडाखालीं उतरोन चालले. ते एकाएकीं (११ जून १६६५) मिर्झा राजाच्या गोटांत गेले. पुढे पंडितरावांनीं जाऊन सांगितलें कीं राजे आले. ही खबर कळतांच जयसिंग देवडीबाहेर पायउतारा खासा आला. राजे पालखींतून उतरून भेटले. उभयता जाऊन एकासनीं बैसले. आणि राजे मिरजा राजियासी बोलूं लागले कीं, आपण जैसा रामसिंग तैसेच तुम्हांस; त्याचें रक्षण कराल तैसे आपलें करणें, ऐसे बोलून बैसले. मग जयसिंग बोलला जे ' हीच गोष्ट खरी. आपण रजपूत, तुम्ही व आम्ही एकजाती आहों. अगोदर आपलें शीर जाईल, मग तुम्हांस काय होणें तें होईल " (सभासद).

" इतकें झाल्यावर महाराजांनीं तहाची गोष्ट काढली व दिलीरखानास तेथें बोलावण्यास सांगितलें. परंतु जयसिंगानें ही गोष्ट खानास अपमानास्पद वाटेल असें सांगून महाराजांनाच त्याच्या भेटीस जाण्यास सुचविलें. तें महाराजांनीं कबूल केलें. त्यांजबरोबर जयसिंगानें आपला मामा सुभानसिंग व ५०

रजपूत दिले. दोघांची भेट झाली. खानानें राजियास जोरानें आवळून धरलें. परंतु सरदार (शिवाजी) जोरावर बळकट तैसाच. त्यानें खातरेस आणिलें नाहीं. मग भेटीची मिठी सुटून एकीकडे लोडाजवळ उभयतां बैसले. दुसरे बाजूस लोडाशीं सुभानसिंग बैसले. दिलेलखान कटारी जवळ करून वर हात ठेवून बैसला " (सभासद). यानंतर तहासंबंधीं औपचारिक बोलणें होऊन खानानें महाराजांस पानविडे देऊन जयसिंगाकडे रवाना केलें. त्या दिवशीं जयसिंग व राजे यांचें एका पंक्तीस भोजन झालें. रात्रीं राजांचा मुक्काम तेथेंच झाला. त्यास राहावयास डेरा देण्यांत आला. रात्रीं उभयतांचें बोलणें झालें.

शिवाजी व मनुची

जयसिंगाकडे ज्या रात्रीं महाराज मुक्कामास होते त्या रात्रीं प्रवासी मनुचीहि जयसिंगाच्या शिबिरांत होता. तो लिहितो, " मी आल्यावर थोड्या दिवसांनीं शिवाजी नामोहरम झाला व आमच्या शिबिरांत आला. मी राजाबरोबर (जयसिंग) रात्रीं गप्पागोष्टी करण्यांस व पत्ते खेळावयास जात असे. एका रात्रीं राजा, त्याचा ब्राह्मण व मी खेळत बसलों असतां शिवाजी आंत आला. त्यास पाहून आम्ही सर्व उभे राहिलों. शिवाजीनें मजकडे पाहून मी कोण म्हणून विचारलें. तेव्हां मी फिरंगी राजा आहे असें राजानें सांगितलें. यानंतर शिवाजीशीं अनेकवार बोलण्याची मला संधि मिळाली. कारण शिबिरांतील कोणाहि माणसाइतकें मला फार्सी व हिंदुस्थानी या भाषांत बोलतां येत असे. मीं त्याला युरोपांतील राजांचा मोठेपणा सांगितला व आमच्या धर्माचीहि माहिती दिली." शिवाजी म्हणाला, 'युरोपांत पोर्तुगॉलचा हा एकटाच काय तो राजा आहे. बाकी कोणी नाहींत.'

यावरून, जयसिंग सासवडास राहावयास आल्यावर दोन महिन्यांच्या आंत युद्ध संपून तहाचें बोलणें जून महिन्यांत सुरू झालें, हें जें इतर प्रमाणांवरून दिसून येतें, त्यास पुष्टि मिळते. तहाच्या वाटाघाटी शिवाजी, जयसिंग व दिलीरखान यांजमध्यें बरेच दिवस चालल्या होत्या व शिवाजी त्या दोघांच्या भेटीस वारंवार येत होता. या त्रिवर्गांची चर्चा होऊन ज्या अटी निश्चित झाल्या त्या जयसिंगानें औरंगजेबास ऑगस्ट १६६५ च्या प्रारंभीं कळविल्या. त्या येणेंप्रमाणें —

(१) बादशाही कृपेचें द्योतक म्हणून मीं त्याला दिलेले १२ लहान-मोठे किल्ले आणि एक लाख होन (५ लाख रुपये) उत्पन्नाचा मुलूख एवढ्यावर शिवाजीनें संतुष्ट राहून बादशहाची अवज्ञा वा बादशाही मुलुखाची लूट करूं नये. (२) दख्खनच्या सुभ्याच्या अमलांत हुकूम होईल तेव्हां कामगिरीवर हजर व्हावें. (३) पांच हजार स्वारांची मनसब घेऊन संभाजी आणि दुसरा शिवाजी म्हणून प्रख्यात असलेला नेताजी या उभयतांनीं दख्खनच्या सुभेदाराबरोबर असावें. (४) तळकोंकणांतील चार लाख होन उत्पन्नाचा व विजापुरी बालाघाटांतील पांच लाखांचा मुलूख जर बादशहानें शिवाजीला दिला आणि विजापूरकरांचा मुलूख जिंकल्यावर ह्या मुलुखाचा ताबा बादशाही फर्मानानें शिवाजीकडे कायम करून दिला तर मग दरसाल तीन लाखांच्या हप्त्यानें शिवाजीनें बादशहाला चाळीस लाखांची खंडणी द्यावी. (५) शिवाजीचे २३ किल्ले व बालाघाट आणि निजामशाही तळकोंकण मिळून चार लाख होनांचा मुलूख शिवाजीकडून घेऊन मोगल साम्राज्याला जोडण्यांत यावा." (प. सा. सं. खंड १, पृ. २९५)

घेतलेल्या सोंगाची बेमालूम बतावणी करण्यांत महाराज तरबेज होते. जयसिंगानें संमतीकरितां बादशहाकडे तहाच्या अटी कळविल्यानंतर व त्यास बादशहाकडून मंजुरी मिळाल्यावर महाराजांनाहि शिरस्त्याप्रमाणें बादशहास आपलें मनोगत निवेदन करणें जरूर होतें. त्यासाठीं त्यांनीं जें पत्र लिहिलें त्यांत नम्रतेची व शरणागतीच्या बतावणीची कमाल केली. त्यांनीं लिहिलें —

शिवाजीची शरणागति

"मी आपला गुन्हेगार व अपराधी आहें. आपणांस शरण येऊन जीव व धनदौलत रक्षण करण्याची इच्छा धारण करीत आहें. इतःपर आपली नोकरी इमानानें बजावण्यास मी सदैव तत्पर राहीन आणि आपला हुकूम पाळण्यांत भूषण मानीन. बंडाळी करून मी आपल्या सर्वस्वाचा घात कधीं करून घेणार नाहीं. मिर्झा राजा जयसिंग यांनीं सर्व वर्तमान आपणांस तपशीलवार कळविलेंच आहे. मला सर्व अपराधांची क्षमा करून जीवदान द्यावें, एवढेंच या दासाचें आपल्या चरणापाशीं मागणें आहे. बादशाही शिक्का

व पंजा यांनी अलंकृत झालेलें आपलें कृपापूर्ण फर्मान येऊन दाखल झालें, ही आनंदाची बातमी मिर्झा राजा जयसिंग यांनीं आम्हांस कळविली. या- योगें बादशहांनीं मला जीवदान दिलें आहे. बादशहाकडून पोषाख आला, हें मला अत्यंत मोठें भूषण वाटत आहे. या पापी दासाचे अपराध क्षमेस पात्र नसतांहि बादशहांनीं केवळ उदार अंतःकरणानें ही कृपा मजवर केली हें त्यांस मोठें भूषण आहे. फर्मान आल्याप्रमाणें मी आपले हुकूम पाळण्यास सदैव तत्पर राहीन. आतां मिर्झा राजाची रजा घेऊन घरीं जातों आणि लढाईची तयारी करून विजापुरावर जाण्यासाठीं त्यांच्या मदतीस येतों. या युद्धांत विशेष पराक्रम दाखवून पूर्वीचा काळिमा धुऊन काढावा, अशी आशा बाळगीत आहें आणि येणेंकरून आपल्या अनंत उपकारांची अल्प तरी फेड माझ्या हातून होईल अशी उमेद आहे " (रियासत, पृ. ३०८, प. सा. सं. खंड १, पृ. २९०).

बादशहानें त्यांस उलट ता. ५ सप्टेंबर १६६५ रोजीं उत्तर पाठविलें. त्यांत म्हटलें आहे –

" शिवाजीराजे यांणी बादशाही कृपेचे उमेदवार होऊन जाणावें कीं, सांप्रत तुमचें पत्र बहुत नरमाईचें राजे जैसिंग यांचे भेटीबद्दल कळलें. कृत्य माफ व्हावें म्हणून म्हटलें हें पाहून गोड (हेतु) ध्यानास आला. यापूर्वीं तुमचे मनांतील हशील सरकार कामगारांनीं समजाविलें होतें कीं, तुम्ही आपले कृत्यांचा पश्चात्ताप करून या दौलतीचे आश्रयास येऊन तीस किल्ले आपणांकडील इकडील कामगारांचे स्वाधीन करून बारा किल्ले व त्यांजखालील मुलूख एक लक्ष होनांचा, निजामशाहीचे किल्ले व मुलूख पैकीं, त्याच प्रकारें आणखी चार लक्ष होनांचा मुलूख तळकोंकणांतील विजापूरकरांचे इलाख्याचा जो हाली तुम्हांकडे चालू आहे व पांच लक्ष होनांचा मुलूख बालेघाटापैकीं, विजापूरचे इलाख्यापैकीं, येणेप्रमाणें एकंदराचा फर्मान बादशाही मागतां व चाळीस लक्ष होन दरसाल तीन लक्षांप्रमाणें पेशकसीबद्दल देऊं म्हणतां. ऐशियास, तुमच्या गोष्टी ज्या तुम्ही तूट, आंदेशा न पाहतां केल्या त्या माफीजोग्या नाहींत. तथापि राजे जैसिंग यांनीं लिहिल्यावरून तें सर्व माफ करून तुमच्या मनोरथाप्रमाणें बारा किल्ले (देतों). त्यांचा तपशील खालीं लिहिला आहे

व त्यांच्याखालचा मुलूख देऊन आणखी हुकूम केला आहे कीं, जो मुलूख नऊ लक्ष होनांचा तळकोंकणापैकीं विजापूरकरांचे इलाख्यापैकीं हाली तुम्हांकडे चालत आहे तो बंदोबस्ताकरितां इकडील सरकारांत आला. सबब बालेघाटी पांच लक्षांचा मुलूख, विजापूर आमचे हातीं येईल त्याआधीं तुम्ही त्यांजकडून घेतल्यास व चांगले फौजेसुद्धां राजे जैसिंग यास मिळून बादशाही कामांत यांच्या मर्जीप्रमाणें कोशीस केल्यास, विजापूर फत्ते झाल्यानंतर तुम्ही पेशकसीचे ऐवजाचा भरणा केल्यास तुम्हांकडे बहाल ठेवूं. हाली आपले चिरंजीवास पांच हजार मनसबी व पांच हजार स्वार-कीं एक एकाची दोन-तीन घोडीं असावीं—याप्रमाणें देऊन तुम्हांकरितां पोशाख पाठवून हा फर्मान आपले पंजाच्या चिन्हासुद्धां पाठविला आहे. तरी तुम्ही इकडील लक्षांत वागोन बादशाही काम लहानमोठें सुद्धां करून हे सर्व आपले ऊर्जिताचीच गोष्ट समजावें.

किल्ल्यांचा तपशील राजे जयसिंग यांच्या लिहिण्याप्रमाणें – राजगड, तोरणा, लिंगमगड, घोरप, अलवारी, महागड, घोसाळा, तळेगड, पाल (गड), उधेगड, रायरी कुवारी (कवडी)" (प.सा.सं. खंड १, पृ. २९७).

बादशहाचा जो फर्मान जयसिंगाकडे शिवाजीच्या मागण्यांस मान्यता देणारा आला त्याचें स्वागत करण्याकरितां शिवाजी ता. २७ सप्टेंबर १६६५ रोजीं जयसिंगाच्या छावणींत गेला. त्याच वेळीं त्यानें विजापूरच्या स्वारीवर संभाजीच्या मनसबीचें सैन्य व अधिक सात हजार निवडक पायदळ घेऊन जयसिंगाबरोबर जाण्याचें वचन दिलें.

दिलीरखान जयसिंगाचा दुय्यम होता. शिवाजीला युद्धाचें आव्हान देणारा तोच होता. पुरंदर किल्ला मुरारबाजीपासून जिंकून घेणाराहि तोच. त्यानेंहि शिवाजीस पत्र लिहून त्याजबरोबर बादशहानें तह केल्याबद्दल संतोष दर्शविला. तो लिहितो, 'तुम्हांस कळविण्यास संतोष वाटतो कीं, आम्हीं विनंती केल्याप्रमाणें तुमच्या राजनिष्ठेचा बादशहांनीं स्वीकार केला आहे. इतकेंच नव्हे तर सहा हजारांची मनसब, दोन लाख रुपये बक्षीस आणि निशाण व नौबत घेण्याची परवानगी तुमच्या पुत्रास देण्याचा हुकूम सोडला आहे. सबब हें पत्र पावतांच संभाजीला इकडे ताबडतोब पाठवून द्यावें म्हणजे हुकमाप्रमाणें त्याला या वस्तु देण्यांत येतील. यासंबंधानें

तुमच्या वकिलास बादशहाचें परभारें पत्र गेलेंच आहे. हा आपला स्नेह व ऐक्यभाव परस्परांनीं कबूल केल्याप्रमाणें जगाच्या निदर्शनास यावा एवढीच इच्छा आहे" (प. सा. सं. खं. १, पृ. २९१).

जदुनाथांच्या चष्म्यांतून

शिवाजी व जयसिंग यांच्या दरम्यान जो तह झाला त्याची पार्श्वभूमि ज़दुनाथ सरकार यांच्या चष्म्यांतून पाहिल्यानें दुसरी बाजू वाचकांस कळणार असल्यामुळें तिचेंहि दिग्दर्शन येथें करणें गैरवाजवी होणार नाहीं.

"पुरंदर किल्ला आतां मोगल घेणार याविषयीं ता. २ ज़ून रोजीं शंका राहिली नाहीं. म्हणून शिवाजीनें जयसिंगाशीं तह घडवून आणण्याचें मनांत आणलें. या वेळीं जयसिंगास तहाच्या अटी कबूल न झाल्यास विजापूरकरांस कोंकणपट्टी देऊन त्यांची मदत घ्यावी व तिच्या जोरावर मोगलांशीं युद्ध चालू ठेवावें असा शिवाजीचा बेत होता. यापूर्वी ता. २० मे रोजीं शिवाजीनें रघुनाथ बल्लाळ अत्रे (अत्रे नव्हे, रघुनाथपंत पंडितराव) यास जयसिंगाच्या अटीचा ठाव घेण्याकरितां गुप्तपणें पाठविलें होतें. त्या वेळीं शिवाजीनें आपल्या भेटीस स्वतः आलें पाहिजे,त्याची शरणागति बिनशर्त पाहिजे; असें झालें तरच बादशहा त्याजवर कृपा करील,असें जयसिंग म्हणाला. जयसिंगाचा हा निर्धार समजल्यावर शिवाजीनें जयसिंगास कळविलें कीं, मी आपल्या भेटीस येण्यास कबूल आहें; भेटींत अटींविषयीं एकवाक्यता न झाली तरी मला सुरक्षितपणें परत जाऊं देण्यांत यावें. यास जयसिंगानें मान्यता दिल्यावर रघुनाथ बल्लाळ ता. ९ ज़ून रोजीं शिवाजीकडे परत आला. ता. १० रोजीं शिवाजी दुसऱ्या दिवशीं भेटीस येणार असल्याचा निरोप रघुनाथ बल्लाळानें जयसिंगास पाठविला. ही भेट अगदीं गुप्तपणें व्हावयाची होती; कारण औरंगजेबानें जयसिंगास शिवाजीशीं कसलेंहि बोलणें न करण्याची ताकीद दिली होती.

"जयसिंगाचा तंबू पुरंदराच्या पायथ्याशीं होता. तेथें ता. ११ ज़ून रोजीं सकाळीं ९ वाजतां शिवाजी पालखींत बसून सहा ब्राह्मण घेऊन आला. तो आल्याची वर्दी रघुनाथ पंडितानें जयसिंगास दिली. ती ऐकतांच जयसिंगानें आपला चिटणीस उदयराज व उग्रसेन कच्छवा यांस शिवाजीस घेऊन येण्यास पाठविलें आणि त्यांजबरोबर निरोप धाडला कीं, शिवाजी सर्व

किल्ले सोडून देण्यास कबूल असेल तरच त्यानें भेटीस यावें, नाहीं तर आल्या वाटेनें चालतें व्हावें. शिवाजी त्यास कबूल झाला व त्या दोन अधिकाऱ्यां-बरोबर तंबूशीं आला. त्याला जयसिंगाचा मुजुमदार (Paymaster) सामोरा गेला. जयसिंगानें कांहीं पावलें पुढें येऊन शिवाजीस आलिंगन दिलें व त्याला आपल्या शेजारीं बसवून घेतलें. आणि कांहीं दगा-फटका आपणांस न व्हावा यासाठीं त्यानें भोंवतालीं सशस्त्र रजपुतांना उभें केलें.

"आपलें सामर्थ्य केवढें मोठें आहे याविषयीं शिवाजीची खात्री पटवून देण्याकरितां जयसिंगानें दिलीरखान व किरतसिंग यांस निरोप पाठवून पुरंदरावर हल्ला चढविण्यास फर्मावलें. शिवाजी तंबूंत येतांच जयसिंगानें इशारा दिला व त्याबरोबर मोगलांनीं हल्ला करून खडकाळ्याचा उरलेला भाग जिंकून घेतला. शिवाजीच्या गडावरील शिबंदीनें मोगलांवर चालून घेतलें; पण मोगलांनीं त्याचीं ८० माणसें ठार व कित्येक जखमी करून त्यास परतविलें. ही लढाई जयसिंगाच्या तंबूतून शिवाजीस स्पष्ट दिसत होती. तेव्हां आपली मनुष्यहानि निरर्थक होऊं नये म्हणून किल्ला ताब्यांत देण्यास तो कबूल झाला. तेव्हां जयसिंगानें दिलीरखान व किरतसिंग यांजकडे मीर तुरूक व गाझीबेग यांस पाठवून युद्ध थांबविण्यास व शिवाजीच्या शिबंदीस उपसर्ग न देण्यास सांगितलें. शिवाजीनेंहि आपला एक अधिकारी गाझी बेग याजबरोबर देऊन आपल्या सैनिकांस शरण जाण्याची आज्ञा केली. त्यांनीं रात्रभर किल्ल्यांत राहण्याची परवानगी घेतली.

"शिवाजी कांहीं सामान व लवाजमा न घेतां जयसिंगाच्या भेटीस सडा आला होता, म्हणून तो त्या रात्रीं जयसिंगाच्या कचेरीच्या तंबूतच राहिला. मध्यरात्रीपर्यंत दोन्ही पक्ष तहाच्या अटींविषयीं हुज्जत घालीत होते. अखेर अटी ठरल्या; पण शिवाजीनें स्वतः बादशहाच्या भेटीस जाण्याची अट कृपा करून घालूं नये, माझ्याऐवजीं माझा मुलगा संभाजी पांच हजार स्वार घेऊन बादशहाच्या दक्षिणेंतील सुभेदारापाशीं चाकरी करील,' अशी जयसिंगास विनंती केली. त्यास त्यानें अशी सबब सांगितली कीं, 'मीं जीं नुकतींच गैरशहाणपणाचीं व अराजनिष्ठेचीं कृत्यें केलीं त्यांमुळें मला बादशहास तोंड दाखविण्याची सोय राहिली नाहीं. मी

आपल्या मुलास बादशहाच्या सेवेस पाठवीन. त्याला पांच हजारांची मनसब व योग्य ती जहागीर देण्यांत यावी. मला पातक्यास मनसब देऊं नये व मोगल सैन्यांत नोकरीसहि ठेवूं नये. पण दक्षिणेंत मोगलांचीं युद्धें होतील तेव्हां मला लष्करी कामगिरी सांगितल्यास ती मी ताबडतोब बजावीन."

दिलीरखानाचा घुस्सा

"युद्धाचा शेवट असा सामोपचारानें झाला याचा दिलीरखानाला घुस्सा आला. त्यामुळें आपलें सुयश जयसिंगानें हिरावून घेतलें असें त्यास वाटलें; म्हणून तो चरांतून (Ditch) उठेना व युद्धतहकुबीस मान्यता देईना. जयसिंगानें मुत्सद्देगिरीनें त्याचा राग शमविला. त्यानें शिवाजी आल्याचें जगास कळण्यापूर्वीच ता. १२ जून रोजीं शिवाजीला हत्तीवर बसवून व त्याजबरोबर राजा रायसिंग यास देऊन दिलीरखानाच्या भेटीस पाठविलें. त्या योगानें दिलीरखानाचा राग शांत झाला. त्यानें शिवाजीस दोन घोडे, एक तरवार, एक रत्नखचित खंजीर व दोन मूल्यवान् कापडाचे तुकडे नजर केले. त्याजबरोबर तो स्वतः जयसिंगाच्या छावणीस गेला. त्याचा हात आपल्या हातांत घेऊन त्यानें त्यास जयसिंगाच्या स्वाधीन केलें. जयसिंगानेंहि शिवाजीस पोशाख, एक घोडा, एक हत्ती व पागोटें देऊन त्याचा सन्मान केला. शिवाजी जयसिंगाच्या भेटीस मुद्दाम शस्त्र न घेतां आला होता. तो म्हणाला, 'मी बादशहाची सेवा भक्तीनें पण शस्त्र न घेतां करीन.'

"तहांत ठरल्याप्रमाणें शिवाजीचे सात सहस्र पुरुष व स्त्रिया यांनीं पुरंदर किल्ला खालीं केला (या पुरुषांत चार सहस्र सैनिक होते). मोगलांनीं त्याचा कबजा घेतला. आंत धान्याचीं कोठारें, हत्यारें, तोफखाना व इतर मालमत्ता मिळाली ती मोगल अधिकाऱ्यांनीं जप्त केली. शिवाजीनें जे किल्ले सोडण्याचें कबूल केलें होतें, ते घेण्यास शिवाजीच्या लोकांबरोबर मोगल अधिकारी गेले. ता. १४ जून रोजीं जयसिंगानें शिवाजीस एक हत्ती व दोन घोडे नजर करून व त्याची दाऊदखानाशीं भेट करवून आणि किरतसिंगास बरोबर देऊन त्याची राजगडाकडे रवानगी केली. ता. १४ जून रोजीं दुपारीं शिवाजीनें कोंढाणा किल्ला किरतसिंगाच्या स्वाधीन केला

व आपण ता. १५ जून रोजीं राजगडास पोंचला. ता. १७ जून रोजीं उग्रसेन कच्छवा याजबरोबर संभाजीस देऊन त्यानें जयसिंगाच्या शिबिरांत पाठविलें. संभाजी ता. १८ जून रोजीं जयसिंगाच्या छावणींत दाखल झाला (Ben. M. S. 57 a).

" तहांत ठरल्याप्रमाणें जयसिंग शिवाजीस घेऊन पुरंदराहून विजापूरच्या स्वारीवर ता. २० नोव्हेंबर १६६५ रोजीं निघाला. शिवाजीची फौज ९ हजार होती. शिवाजीनें बरोबर नेताजीस घेतलें होतें. त्यास मराठे लोक प्रतिशिवाजी समजत. पुरंदराहून मंगळवेढें विजापुराच्या उत्तरेस ५२ मैल आहे. तिकडे जातांना वाटेंत त्यांना विजापुरी सैन्यानें कोठेंहि प्रतिकार केला नाहीं. जयसिंग शिवाजीसह ता. ७ डिसेंबर रोजीं फलटणास पोंचला. फलटणाजवळचा ताथवडा किल्ला (१४ मैल) ता. ८ रोजीं त्यानें घेतला. तेथून खटाव घेऊन हें सैन्य मंगळवेढ्यास ता. १८ डिसेंबर सन १६६५ रोजीं पोंचलें. या प्रदेशांतील कामगिरीबद्दल बादशहाकडून शिवाजीस एक गौरवपर पत्र, पोशाख व रत्नखचित खंजीर आला. ता. २४ डिसेंबर रोजीं जयसिंगाची विजापुरी सेनेशीं गांठ पडली.

" दुसऱ्या दिवशीं मोगलांच्या छावणीपासून १० मैलांवर दिलीरखान व शिवाजी यांचें १२ हजार विजापुरी सैन्याशीं युद्ध झालें. विजापुरी सेनेंत सरजाखान, खवासखान, कल्याणीचा जाधवराव व शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकोजी हे होते. आदिलशाही सैन्यानें मोगलांशीं तोंड न देतां गनिमी कावा सुरू केला; पण शेवटीं दिलीरखानानें त्यांस दमवून त्यांचे पांच सेनापति ठार केले व पुष्कळ निशाणें, घोडे व शस्त्रें हिरावून घेतलीं. हा विजय संपादून मोगल परत जात असतां त्यांजवर विजापूरकरांनीं दोनहि बाजूंनीं बाणांचा वर्षाव केला. मोगली सैन्याच्या आघाडीस नेताजी होता. त्यानें तो हल्ला आपणांवर घेऊन धैर्यानें तोंड दिलें. त्याला विजापूरकरांनीं चोहोंकडून वेढलें असतां किरतसिंग व फत्तेजंगखान हे त्याच्या मदतीस आले व त्या सर्वांनीं मिळून विजापुरी सैन्याचा हल्ला परतविला. या लढाईंत कल्याणीचा जाधवराव गोळी लागून ठार झाला. या प्रसंगीं शिवाजी आणि व्यंकोजी हे एकमेकांविरुद्ध लढत होते ! हा एक विशेष होय. दोन दिवस मुक्काम करून जयसिंग ता. २७ रोजीं पुढें

निघाला व नवीन तळावर पोहोंचल्यावर त्यानें आपल्या सैन्याची एक तुकडी विजापुरी सैन्यास हाकून देण्यास पाठविली. या वेळीं मोठें युद्ध झालें. त्यांत जयसिंगास स्वतः लढावें लागलें. शिवाजी व कुमार किरतसिंग हे एकाच हत्तीवर बसून आघाडीला होते. ते विजापुरी सैन्याच्या रांगेंत घुसले. घनघोर युद्ध होऊन शेवटीं शत्रूस पळून जावें लागलें. त्यांत शत्रूचे १०० लोक ठार व पुष्कळ जखमी झाले.

"ता. २९ डिसेंबर १६६५ रोजीं जयसिंग विजापूरच्या उत्तरेस दहा मैलांवर मखनापूर येथें आला व तेथें एक आठवडा थांबल्यावर ५ जानेवारी १६६६ रोजीं त्याला परत हटावें लागलें; कारण विजापूरकरांची तयारी जयसिंगाच्या अपेक्षेबाहेर होती. त्यास वाटलें होतें कीं, विजापुरी सरदारांत भांडणें लागून राहिलीं असल्यानें आपण विजापूर सहज जिंकून घेऊं; परंतु त्याचा तो अंदाज चुकला. आदिलशहानें तट दुरुस्त करुन भरपूर साहित्य जमविलें होतें. त्याच्या सैन्यांत ३० हजार कर्नाटकी पायदळाची भरती झाली होती. भोंवतालचा ७ मैलांचा टापू त्यानें बेचिराख केला होता, पाणी मिळेनासें केलें होतें व झाडें तोडून टाकलीं होतीं, त्याशिवाय सर्जाखान व सिद्दी मसाऊद यांच्या हाताखालीं निवडक सैन्य देऊन जयसिंगाच्या पिछाडीस मोगली मुलुखावर स्वारी करण्यास त्यानें त्यांस पाठविलें होतें. म्हणून आपल्या मुलुखाचें रक्षण करण्यासाठीं जयसिंग २७ जानेवारी रोजीं परिंड्यापासून १६ मैलांवर आला. तेथें त्यानें २४ दिवस मुक्काम केला. या मुक्कामापूर्वी बरेच दिवस त्यानें शिवाजीस त्याच्या इच्छेप्रमाणें पन्हाळ्यावर स्वारी करण्यास पाठविलें होतें. असें करण्यास दुसरेंहि कारण हें होतें कीं, विजापुरास अपयश आल्यामुळें मोगलांच्या सैन्यांत फूट पडली होती. जयसिंगाच्या विरुद्ध पक्षाचें पुढारीपण दिलीरखानाकडे होतें. शिवाजीच्या विश्वासघातामुळें आपणांस अपयश आलें व त्यास कैद केलें पाहिजे, असें ते त्यास म्हणूं लागले. म्हणून शिवाजीवरील हें संकट टाळण्याकरितां जयसिंगानें त्यास पन्हाळ्यावर जाण्यास परवानगी दिली. शिवाजी ता. ११ जानेवारी १६६६ रोजीं जयसिंगास सोडून पन्हाळ्याकडे निघाला. पांच दिवसांनीं तो पन्हाळ्यापाशीं पोहोंचला व सूर्योदयापूर्वी ३ तास त्यानें पन्हाळ्यावर हल्ला चढविला. पण आंतील

सैन्य सावध असून त्यानें निकरानें बचाव केला. या लढाईत शिवाजीचे १०० सैनिक मेले व जखमी झाले. दिवस उगवल्यावर हा झगडा पुढें चालू ठेवणें वेडेपणाचें आहे असें वाटून तो पश्चिमेस खेळणा किल्ल्यावर गेला. त्याच्या सैन्यानें त्या बाजूस इतका धुमाकूळ घातला कीं, तिकडील प्रदेशाचें रक्षण करण्याकरितां सिद्दी मसाऊद व रणदुल्लाखान यांस ६ हजार सैन्य घेऊन जावें लागलें. शिवाजीच्या अपयशाची बातमी जयसिंगास २० जानेवारी रोजीं समजली. याच वेळीं नेताजी हा शिवाजीस सोडून विजापूरकरांस जाऊन मिळाला. त्यांनीं त्यास ४ लक्ष होन दिले. जयसिंगास एवढा मोहरा आपणांकडे असावा असें वाटून त्यास त्यानें, पंचहजारी मनसब, मोगलाईत चांगली जहागीर व रोख ५० हजार रुपये देऊन, आपल्या बाजूस वळवून घेतलें."

जयसिंगाचें पुण्यास आगमन, त्यानें शिवाजीची केलेली कोंडी, पुरंदराचा पाडाव, शिवाजीची शरणागति, त्याच्याशीं त्याचा झालेला तह, जयसिंगाच्या विजापुरावरील स्वारींत शिवाजीनें केलेली मदत, जयसिंगाच्या अनुमतीनें शिवाजीच्या पन्हाळ्यावरील स्वारीचें सविस्तर कथन हें सर्व सर जदुनाथ यांच्या ग्रंथाधारें केलें. आतां जयसिंग व शिवाजी यांच्या दरम्यान झालेल्या तहाचा निष्कर्ष आणि वरील कथनास पूरक अशी इतर पुराव्याच्या आधारें मिळणारी माहिती पुढें सांगावयाची आहे.

शिवाजीचें नुकसान

औरंगजेब व शिवाजी यांच्या दरम्यान जो तह झाला त्याचा निष्कर्ष बोधप्रद आहे; शिवाजीचे तेवीस किंवा तीस किल्ले जाऊन त्याजकडे फक्त बारा किल्ले राहिले. राहिलेल्या किल्ल्यांतहि राजगड, रायगड व तोरणा हेच काय ते मुख्य. बाकीचे किरकोळ. गेलेल्या किल्ल्यांत पुरंदर कोंडाणा, रोहिडा, लोहगड, विसापूर, माहुली, रुद्रमाळ, तुंग, तिकोना, प्रतापगड, इत्यादि किती तरी मोठे व महत्त्वाचे किल्ले होते. मुलूख म्हणावा तर पांच लाख होन उत्पन्नाच्या मुलुखापैकीं फक्त एक लाख उत्पन्नाचा तेवढा शिल्लक राहिला. या मुलुखाचें क्षेत्रफळ लक्षांत घेतां भोर संस्थानाचा उत्तर भाग राजगड ते सुधागड व त्याला लागून तळ कोंकणापैकीं वरंधा घाटापासून नागोठण्यापर्यंतचा प्रदेश येतो. म्हणजे तीस-

पसतीस मैल लांब व १०–१२ मैल रुंद इतकीच सह्याद्रीच्या दोन्ही बगलांमधील चिरटोळी डोळ्यासमोर येते. सारांश, सध्यांच्या भाषेंत बोलावयाचें तर हा एकंदर ऐवज दोन-एक तालुक्यांचा भरतो. म्हणजे या क्षणापुरता तरी शिवाजी हा औरंगजेबाचा एक लहानसा जहागीरदार म्हणून राहिला. शहाजीनें मिळविलेली पुण्याकडील बहुतेक जहागीरहि नाहींशी झाली. आणि सगळें दक्षिण कोंकण, बरेंचसें उत्तर कोंकण व देशावरचा पुणें ते कोल्हापुरापर्यंतचा पश्चिम बाजूचा पट्टा, याला शिवाजी मुकला. मुलुखाच्या दृष्टीनें ही मोठी हानि. शिवाय ज्या स्वातंत्र्यासाठीं आणि हिंदु धर्मासाठीं व हिंदवी स्वराज्यासाठीं गेलीं सोळा वर्षें त्यानें रक्ताचें पाणी केलें व हाडांचीं काडें केलीं तें सर्व रसातळास गेलें, बादशहाची नोकरी पत्करावी लागली, पुत्र व उजवा हात असा नेताजी ओलीस द्यावे लागले. आणि उलटपक्षीं आशा काय तर म्हणे विजापूरकरांचा पांच लाख होनांचा बालेघाटी मुलूख (सह्याद्रीलगत्याचा) त्यांजपासून जिंकून घेतल्यास तो शिवाजीस बहाल करण्यांत यावयाचा आणि तोहि दरसाल तीन लक्ष होनांप्रमाणें चाळीस लक्ष होनांची रकम शिवाजीकडून बादशहास मिळेल तर. एकंदरींत महाराजांना हा तह अत्यंत नुकसानकारक व मानहानिकारक ठरला यांत शंका नाहीं.

शिवाजीस जिंकून त्याचा बहुतेक मुलूख व किल्ले छिनावून घेऊन व त्याचे हात-पाय तहाच्या अटींनीं बांधून टाकून जयसिंगानें जें, विजापूरकरांस व शाइस्ताखानासहि मिळवितां आलें नाहीं असें, अल्पावधींत व अल्प खर्चांत अपूर्व यश मिळविलें, यांत त्याचें चातुर्य, धूर्तता व मुत्सद्दीपणाच प्रकट झाला हें निर्विवाद होय. यानंतर जयसिंग विजापुरावर स्वारी करण्यास निघाला, तेव्हांहि शिवाजीस मोकळा सोडल्यास तो काय करील याचा भरंवसा जयसिंगास नव्हता व त्यास आदिलशहाशीं कराव्या लागणाऱ्या युद्धांत शिवाजी या अलौकिक योद्ध्याची मदत मिळाल्यास पाहिजेच होती. म्हणून तहाच्या अटींतच तसें एक कलम घालून त्यानें शिवाजीस आपल्या स्वारीबरोबर घेतलें. विजापूरकरांवर स्वारी करण्यास जयसिंगास कांहीं निमित्त पाहिजे होतें, तें आयतें मिळालेंच होतें. सन १६५७ मध्यें आदिलशहा व शहाजहान यांचा तह झाला

होता. त्यांत आदिलशहानें एक कोटि रुपये खंडणी द्यावी अशी एक अट होती. ती एकदम देतां येणें शक्य नसल्यामुळें हप्त्यांनीं द्यावयाची होती. तिची बरीच बाकी यावयाची तुंबली होती. शिवाजीच्या दंग्यामुळें आपण ती देण्यास असमर्थ आहों अशी सबब आदिलशहाकडून पुढें करण्यांत येत असे. या स्वारींत ती वसूल करण्याचें एक कारण असलें तरी आदिलशाही अजिबात बुडविण्याचें मोगलांचें आधींपासून धोरण होतें तेंच मुख्य होय.

शिवाजीचा अपमान

या स्वारीवर जयसिंग शिवाजीस घेऊन नोव्हेंबर १६६५ त निघाला. पुरंदराहून निघाल्यावर वाटेंतच नाईक निंबाळकरांची जहागीर होती. निंबाळकर आदिलशाहीचे सरदार म्हणून त्यांच्या जहागिरींत शिरून शिवाजीनें त्यांचा ताथवडा हा डोंगरी किल्ला व फलटणचा भुईकोट सर केला. ही वार्ता औरंगजेबास कळविण्यांत आल्यावर त्यानें त्याजवर खुष होऊन उत्तम पोषाख व जडावाची कट्यार पाठविली व जसजसे अधिक पराक्रम करून दाखवाल तसतसे अधिक लाभ होतील असें त्यास आश्वासन दिलें. औरंगजेबाची ही कृपा शिवाजीला तरी हवी होती कोठें? त्याचा तो जुलमाचाच रामराम होता. त्याला ती कृपा विषतुल्यच वाटली असेल. शिवाय दुसऱ्याच्या हाताखालीं काम करणें त्याला जन्मांत माहीत नव्हतें. तो स्वतंत्र सेनानी म्हणून तलवार गाजविणारा होता व त्या स्वातंत्र्याची तो वाट पाहत होता. जयसिंग सातारा जिल्ह्यांतून सोलापूर जिल्ह्यांतील मंगळवेढ्यावरून विजापुराकडे निघाला. मंगळवेढ्याहून जयसिंग व शिवाजी विजापुरास जात असतां, वाटेंत ता. २५ डिसेंबर १६६५ रोजीं दिलीरखान व शिवाजी यांचें, आदिलशहाचे सर्जाखान, खव्वासखान, मालोजी घोरपडे व व्यंकोजीराजे इत्यादिकांशीं युद्ध जुंपलें. त्यांत सर्जाखान हा जुना व खंदा योद्धा पडल्यामुळें विजापूरकरांचें फार नुकसान झालें. त्याशिवाय त्यांचे पुष्कळ मोठे अंमलदार ठार व सातशें लोक जखमी झाले. प्रस्तुत सामन्यांत दिलीरखान व शिवाजी हे विजापूरकरांशीं खांद्यास खांदा लावून लढत होते, हा प्रकार अद्भुत होय.

अशा रीतीनें पराभव झाल्यावर आदिलशहा खंडणी देऊन तह करण्याच्या प्रयत्नांत होता. जयसिंगहि त्यास तयार झाला असता; पण

दिलीरखान फार हट्टी. त्यानें प्रतिज्ञा केली होती कीं, विजापूर जिंकल्याशिवाय व तेथील पाणी चाखल्याशिवाय परत म्हणून फिरावयाचें नाहीं; म्हणून त्याजपुढें जयसिंगाचा नाइलाज झाला (प. सा. सं. खंड १, पृ. ३०२). तहाचा हा प्रयत्न फसल्यावर विजापुरी सैन्यानें निकराचा प्रतिकार सुरू केला. या वेळीं शिवाजीनें जयसिंगास अशी थाप मारली कीं, आपणांस पन्हाळ्याकडची खडान् खडा माहिती असल्यामुळें तिकडे पाठविल्यास मी विजापुरी मुलुखांत इतका धुमाकूळ घालीन कीं, त्यास तिकडील बंदोबस्ताकरितां आपणांवर विजापूरकरांना सैन्य पाठवावें लागेल (प. सा. सं. खंड १, पृ. ३०५). ही थाप मारून शिवाजीनें जयसिंगास खासें फसविलें. त्यालाहि वाटलें कीं, शत्रुसेना दोन ठिकाणीं वांटली गेल्यास विजापूरकरांस जिंकणें स्वस्तांत पडेल. उलट शिवाजीच्या पोटांतला डाव असा होता कीं, तहांतील अटींप्रमाणें जो मुलूख आपण स्वतंत्रपणें जिंकूं तो आपल्या ताबडतोब पदरांत पडेल.

पडत्या फळाची आज्ञा

जयसिंगापासून पडत्या फळाची आज्ञा घेऊन शिवाजी निघाल्यावर त्यानें वाटेंतील पुष्कळ आदिलशाही गांवांत जाळपोळ केली. अखेर तो १६ जानेवारीस पन्हाळ्यापाशीं आला व त्यानें रात्रीं गडकऱ्यास निरोप पाठविला कीं, आदिलशहा खासा स्वतः येत आहेत; तरी गडाचे दरवाजे उघडा; परंतु महाराजांचा हा कावा फसला व लढाईवांचून गड हातीं न येतां त्यांस दुसऱ्या दिवशीं गडावर हल्लाच करावा लागला. पण पन्हाळगडासारखा गड एखाद्या हल्ल्यानें थोडाच हातीं लागणार आहे? त्या हल्ल्यांत महाराजांचे ५०० लोक मृत्युमुखीं पडले; तरीहि गड मिळेना; तेव्हां महाराज तेथून खेळण्याकडे गेले. तेथें नेताजीचें व त्यांचें भांडण होऊन नेताजी आदिलशहाकडे नोकरीकरितां गेला व त्यानें त्याला तीन लक्ष होनांची नेमणूक देऊन आपणांतर्फे मोगलांशीं लढण्याकरितां पाठविलें.

शिवाजीचा पन्हाळ्याकडे येण्यांत आणखी एक हेतु असा होता कीं, शाइस्ताखान व जयसिंग यांच्या कचाट्यांत सांपडल्यापासून आदिलशहानें दक्षिण कोंकणांतील दाभोळ ते कुडाळपर्यंतचा जो मुलूख घेतला होता तो परत मिळवावा. या हेतूनें खेळण्याहून कुडाळच्या बाजूस उतरून त्यानें

गोव्याजवळील फोंडा किल्ल्यास वेढा घातला. शिवाजी कोंकणांत उतरल्याची खबर आदिलशहास लागतांच त्यानें सिद्दी जोहाराचा जांवई सिद्दी मसाऊद, सिद्दी जोहाराचा मुलगा व रुस्तुमजमा यांस पांच हजार स्वार व एक हजार पायदळ देऊन त्याजवर पाठविलें. रुस्तुमजमा शिवाजीस आंतून सामील. त्यानें शिवाजीस सावध करण्याकरितां दुरून नगारे व तुताऱ्या वाजविल्या. तरी-देखील मसाऊदनें ६०० स्वारांनिशीं शिवाजीचा इतक्या शिताफीनें पाठ-लाग केला कीं, त्यांत शिवाजीचे ५०० स्वार व १०० शिपाई पडले. शेवटीं शिवाजीस फोंड्याचा वेढा उठवून निघून जावें लागलें. इकडे विजापुरास आदिलशहाला रुस्तुमजमाची फितुरी समजल्यावरून त्याची त्यानें चांग-लीच कानउघाडणी केली. तेव्हां त्यानें शिवाजीशीं मनापासून लढण्याचें ठरवून पुढील युद्धप्रसंगांत शिवाजीपासून फोंडा, कुडाळ, बांदा, डिचोली इत्यादि ठाणीं घेतलीं (प. सा. सं. खंड १ पृ. ३११).

दिलीरखानाची प्रतिज्ञा

शिवाजी मोगलांस सोडून पन्हाळ्याकडे गेला व तेथून कोंकणांत उतरून विजापूरकरांपासून मुलूख काबीज करूं लागला, त्यामुळें रुस्तुम-जमा, मसाऊद यांसारखे मोठे सरदार व त्यांजबरोबर एक हजार पायदळ व पांच हजार स्वार आदिलशहास त्या बाजूस पाठवावे लागले. याचा फायदा जयसिंग व दिलीरखान यांस मिळाल्यावांचून राहिला नाहीं. त्या योगानें आदिलशहास दोन आघाड्यांवर लढावें लागल्यामुळें मोगलांस तोंड देणारें आदिलशहाचें सैन्य कमी पडून मोगलांची प्रगति झपाट्यानें होत चालली.

जयसिंग व दिलीरखान येत येत ता. १५ जानेवारी १६६६ च्या पूर्वी विजापुरापासून तीन कोसांवर आले. ते इतकें जवळ येतांच विजापुरांतील सर्व व्यापारी शहर सोडून पळाले. विजापुराची एकच वेस शिल्लक ठेवून बाकीच्या सर्व वेशी आदिलशहानें दगडविटांनीं बुजवून टाकल्या आणि शहराभोंवतालचीं गांवें उद्ध्वस्त केलीं, पाण्यांत डुकराचें व गाईचें मांस टाकून त्यायोगें तें हिंदु-मुसलमानांना पिण्यास नालायक केलें. चांगलें पाणी इतकें दुर्मिळ झालें कीं, एक भांडेंभर पाण्यास पाव होन पडूं लागला. आदिलशहा शहराबाहेर छावणींत राहावयास गेला व त्यानें आपल्यापाशीं

२५ हजार स्वार व ५ हजार पायदळ इतकें सैन्य ठेवलें. सुलतानाच्या मनांत आपला जनाना दूर ठिकाणीं पाठवावयाचें होतें; परंतु इतरांस ही कल्पना मान्य झाली नाहीं (प. सा. सं. खंड १, पृ. ३०६).

शिवाजी ५ मार्च १६६६ रोजीं आग्र्यास औरंगजेबाला भेटावयास जाण्याकरितां निघाला; तोंपर्यंत विजापूर शहर जयसिंगास जिंकतां आलें नव्हतें. याचें कारण आदिलशहाच्या मदतीस कुतुबशहा आला हें होय. मोगलांचा पक्ष सोडून शिवाजी त्या दोघांस जाऊन मिळाला तर सारीच मसलत फसेल अशी भीति जयसिंगास पडून त्यानें शिवाजीस बादशहाच्या भेटीस पाठविण्याचें ठरविलें (प. सा. सं. खंड १, पृ. ३०७). अर्थात् या बनावास शिवाजी सहसा कबूल होणें शक्य नव्हतें; कारण त्यास औरंगजेबाचा कपटी स्वभाव माहीत होता. तो आपल्या जिवास अपाय करील असें त्यास भय होतें; शिवाय औरंगजेबाच्या भेटीस जाऊन आपणांकडे कमीपणा घेण्याची व बादशहास मोठेपणा देण्याची कल्पना शिवाजीसारख्या मानी व स्वातंत्र्यप्रिय वीरास केव्हांहि पसंत पडणारी नव्हती. म्हणूनच त्यानें पूर्वी जयसिंगास कांहीं तरी सबब सांगून बादशहाच्या भेटीस जाण्याचें नाकारलें होतें; तथापि अशा धूर्त व सावध पुरुषाचेंहि मन ‘ हजारों युक्त्या करून ’ जयसिंगानें वळविलें, ही त्याची अजब शहामत होय यांत शंका नाहीं.

शिवाजी आग्र्यास कां गेला ?

शिवाजी आग्र्यास औरंगजेबाच्या भेटीस जाण्यास कबूल झाला, याची तत्कालीन इंग्रज लेखकांनीं केलेली मीमांसा विचारांत घ्यावयास पाहिजे. त्यांच्या मतें “ बादशहानें वारंवार आमंत्रण केल्यामुळें भाळून गेलेला शिवाजी स्वतःला सुरक्षित समजून बादशहाला कुर्निसात करून राजनिष्ठा व्यक्त करण्याकरितां म्हणून गेला ! ” (प. सा. सं. खंड १, पृ. ३१७). तसेंच ‘ आपलें जीवित सुरक्षित राखण्याच्या अटीवर शिवाजी, राजा जयसिंगाच्या सांगण्यास कबूल झाला.’ (प. सा. सं. खंड १, पृ. ३१८). ही मीमांसा साररूपानें खरी वाटते. एक तर ज्याच्यावर औरंगजेबाचा पूर्ण विश्वास असा फार मोठा रजपूत सेनापति जयसिंग यानें शिवाजीच्या जीवितास अपाय होणार नाहीं अशी हमी दिली, तिजवर विश्वास ठेवण्यांत महाराजांनीं चूक केली नाहीं. शिवाय औरंगजेब आपणांस भेटीचें आमंत्रण

वारंवार करीत असतां त्याचा अव्हेर करणें महाराजांस शिष्टसंप्रदायास सोडून आहे असें वाटावें व आपल्या योग्यतेस साजेल असा आपला मान बादशहाच्या दरबारांत राखला जाईल अशी त्यांची त्या वेळीं समजूत व्हावी, हें मनुष्यस्वभावास अनुसरूनच होय. शिवाय आपण औरंगजेबाच्या भेटीस जाण्याचें नाकारलें, तर त्याजबरोबर झालेला तह मोडेल व पुनः युद्धासाठीं कंबर बांधावी लागून सर्वच राज्य गमावून बसण्याची पाळी येईल, अशी शिवाजीस भीति वाटत असावी व ती वाजवी होती.

पोर्तुगीज लेखक कॉस्मा ड गार्डा यानें वरीलशिवाय आणखी एक कारण दिलें आहे. तें असें : "जयसिंग विजापुराहून परत येत असतां त्याचा मुक्काम सोलापुरास पडला होता. तेथून त्यानें औरंगजेबास शिवाजीनें आपल्या स्वारींत केलेल्या बहादुरीचें यथार्थ वर्णन कळविलें. तें ऐकून असा धाडसी, शूर व पराक्रमी योद्धा आपण डोळ्यांनीं पाहावा, अशी प्रबळ इच्छा त्यास झाली. ती त्यानें जयसिंगास लिहून, कसेंहि करून शिवाजीस आपणांकडे पाठविण्याचा आग्रह केला. जयसिंगास पेंच पडला. त्याला शिवाजी या गोष्टीस कबूल होईल असें वाटेना. तथापि बादशहाच्या आग्रहास्तव त्यानें त्यास आर्जवपूर्वक पत्र लिहिलें. पण शिवाजीनें आपण आपल्या राज्यांत बरेच दिवस नसल्यामुळें अनेक बखेडे उत्पन्न झाले असून ते मोडण्यास आपणांस आपल्या राज्यांत असणें आवश्यक आहे अशी सबब सांगितली व ती जयसिंगानें खरी मानून तसें बादशहास कळविलें. तरी बादशहा आपला झिंगा सोडीना व शिवाजीहि ऐकेना. तेव्हां बादशहानें दिल्लीहून जयसिंगाकडे बांगड्या पाठवून 'जर शिवाजी तुला बधत नसेल तर बांगड्या भर' अशी त्याची हेटाळणी केली! ती जयसिंगाच्या जिव्हारीं लागून तो अतिशय आजारी पडला. म्हणून त्यानें 'तूं मला बापाच्या ठिकाणीं समजतोस तर मला माझ्या मरणोन्मुख स्थितींत एकदां भेटून तरी जा', असा प्रेमाचा निरोप शिवाजीस पाठविला. तो येतांच शिवाजी सोलापुरास जयसिंगाच्या भेटीस टाकोटाक गेला. त्या वेळीं जयसिंग दुखण्यानें इतका खंगला होता कीं, त्याला पाहून शिवाजीचें हृदय द्रवलें. जयसिंग म्हणाला, 'तूं आलास. तुला रामानें येण्याची बुद्धि दिली हें फार चांगलें झालें. आतां माझी प्रकृति सुधारेल.' जयसिंगानें त्यानंतर शिवाजीस

कांहीं दिवस ठेवून घेऊन त्यानें दिल्लीस बादशहाच्या भेटीस जाण्यापासून होणारे लाभ व न जाण्यापासून होणारी हानि त्याच्या मनावर बिंबवून त्याला दिल्लीस जाण्यास प्रवृत्त केलें. तसें त्यानें बादशहास लिहितांच बादशहाचा आनंद गगनांत मावेनासा होऊन त्यानें जयसिंगाची जहागीर वाढविली. मात्र शिवाजीनें आग्र्यास जातांना जिवाला आधार म्हणून रामनामाचा जप करणाऱ्या एका ब्राह्मणास (रामदासी ?) बरोबर घेतलें. याच रामदाशानें शिवाजीला त्यानें बादशहाच्या भेटीस जावें अशी रामाची इच्छा असल्याचें सांगितलें होतें " (Foreign Biographies of Shivaji, pages 115–127).

राज्याची व्यवस्था

असो. महाराजांचा मोगलांशीं तह झाला असल्यामुळें आणि आदिलशहा तर मोगलांबरोबर जीवनमरणाच्या झगड्यांत गुंतला असल्यामुळें, त्याच्या उरलेल्या राज्यास मोगल वा विजापूरकर यांच्याकडून अपाय होण्याची धास्ती नव्हती. म्हणूनहि त्यांनीं उत्तरेंत जाण्याचा हिय्या केला. तथापि आपल्या अनुपस्थितींत राज्यकारभार सुयंत्रपणें चालविण्यासाठीं कांहीं व्यवस्था करणें त्यांस भाग होतेंच. म्हणून त्यांनीं जिजाबाईकडे राज्याची कुलमुखत्यारी देऊन राज्यकारभार त्यांच्या सल्ल्यानें मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो व आबाजी सोनदेव यांनीं पाहावा अशी व्यवस्था केली. शिवाजीचा मुख्य सेनापति नेताजी पालकर हा होता. पण तो शिवाजीशीं भांडून मोगलांकडे गेल्यानें त्याच्या जागीं दुसऱ्या कोणाची नेमणूक करावयास पाहिजे होती. अर्थात् त्या कामासाठीं कडतोजी ऊर्फ प्रतापराव गुजर याची त्यांनीं निवड केली.

महाराज दक्षिणेंतून निघण्यापूर्वी ते येत असल्याची वर्दी औरंगजेबास देणें आवश्यक होतें. म्हणून " शिवाजी जाण्यास निघण्यापूर्वी जयसिंगानें आपला वकील, महाराज येत असल्याची वर्दी बादशहास देण्यास, पुढें पाठविला व त्याजबरोबर महाराजांनीं सोनाजीपंत डबीर यांचा मेहुणा रघुनाथपंत कोरडे यांस आपल्यातर्फें दिलें. आपला पुत्र रामसिंग हुजूर आहे, तोहि तोलदार व भिडेचा आहे, त्यास सांगून पाठवितों, त्याचे हातीं भेट घेणें, असें जयसिंगानें महाराजांस सांगितलें. राजियांनीं निराजी राऊजी, त्रिंबकजी

सोनदेव, माणको हरि सबनीस, दत्ताजी त्रिंबक, हिरोजी फर्जंद, राघोजी मित्रा व दावलजी गाडगे हे कारकून व हुजुरे आपणाबरोबर घेतले. त्याशिवाय एक हजार मावळे व तीन हजार स्वार त्यांजबरोबर होते. राजांनीं राजगड व कोट आणि मोरोपंत पेशवे व निळोपंत मुजुमदार असे मातु:श्रीच्या हवालीं केलें व आपण राजगडाहून सर्वांचा निरोप घेऊन पुत्रासह मजल दरमजल निघाले. वाटेनें त्यांच्या सरबराईची व्यवस्था ठेवण्यास ठिकठिकाणच्या फौजदारांस जयसिंगानें ताकीदपत्रें पाठविलीं. ‘शिवाजीराजे मुलाजमतीस येतात, ते जागा जागा मुक्कामास राहतील; तेथील फौजदारांनीं त्यांस येऊन भेटावें, दाणापाणी जो लागेल तो द्यावा, शहाजादे यांजप्रमाणें आदब चालवावी, ऐसे रोखे पाठविले ” (सभासद).

औरंगजेबानेंहि शिवाजीस ता. ७ एप्रिल १६६६ रोजीं पत्र लिहिलें—

“ तुमचें पत्र मिर्जा राजे जयसिंग याणीं ठरविल्याप्रमाणें इकडील प्रांतीं रवाना जालें तें पाहून बहुत संतोष जाला. ऐशियास इकडील लोभ तुम्हांवर पूर्ण आहे. म्हणोन अदकार न करितां खातरजमेनें मजल दरमजल निघोन यावें. म्हणजे भेटीअंतीं बहुत सत्कार पावून माघारे जाण्याविषयींचा निरोप दिला जाईल. सांप्रत तुम्हाकारितां पोशाख पाठविला आहे तो घ्यावा ” (प. सा. सं. खंड १, पृ. ३१०). यानंतर महाराज एक महिन्यानें आग्र्यास जाऊन पोंचले.

प्रकरण अकरावें

औरंगजेबाचा दरबार

धीरस्तत्र न मुह्यति। – गीता

इ. स. १६६६

शिवाजी मे महिन्यांत आग्ऱ्यास पोंचला. अकबर बादशहाच्या वेळे-पासून मोगलांच्या दोन राजधान्या झाल्या होत्या. एक दिल्ली – जुनी राज-धानी व दुसरीं आग्रा – नवीन राजधानी. औरंगजेबानें इ. १६५८ त शहा-जहानास पदच्युत करून अटकेंत ठेवलें व आपणांस राज्याभिषेक करून घेतला. जोंपर्यंत शहाजहान जिवंत होता तोंपर्यंत औरंगजेबानें बादशहा या नात्यानें आग्ऱ्यांत प्रवेश केला नव्हता. आतांपर्यंत तो राज्याभिषेकादिन व वाढदिवस दिल्लीसच साजरा करीत असे. शहाजहान २२ जानेवारी १६६६ रोजीं मरण पावला. त्यानंतरच औरंगजेबानें आपला पहिला दरबार आग्ऱ्यांतील राजवाड्यांत भरविला. त्याचा वाढदिवस १२ मे १६६६ या दिवशीं पडत होता; तो त्यानें आग्ऱ्यास साजरा करण्याचें ठरवून आपला खजिना व लवाजमा दिल्लीहून आग्ऱ्यास आणविला.

शिवाजीचा लवाजमा

शिवाजीच्या भेटीचा १२ मे हा दिवस औरंगजेबानें ठरविला, त्याचें कारण त्यास त्याला आपलें वैभव या निमित्तानें दाखवून त्याचे डोळे दिप-वून सोडावयाचे होते. पण शिवाजीला आग्ऱ्यास पोंचावयास थोडा उशीर झाला. तो आदल्या दिवशीं पोंचावयास पाहिजे होता त्याऐवजीं नेमका १२ तारखेस पोंचला. त्याला घाईघाईनें दरबारास जावें लागल्यामुळें दरबारी रीतरिवाजांची माहिती करून घेण्यास फुरसत सांपडली नाहीं; म्हणून पुढचा अनिष्ट प्रसंग ओढवला असें जदुनाथ सरकार म्हणतात.

सभासद व सरकार यांनीं शिवाजीबरोबर असलेल्या फौजेचा आंकडा दिला आहे, त्यांत तफावत आहे. सभासदाचा आंकडा सरकारांपेक्षां मोठा आहे पण हा फरक तितका महत्त्वाचा नाहीं. सरकार म्हणतात, "शिवाजीबरो-

वर तैनातींतील माणसें (retainers) शंभर व अडीचशेंपर्यंत फौज असून तींत शंभर शिलेदार व बाकीची पागा होती. शिवाजी पालखींतून प्रवास करीत असला म्हणजे त्याजपुढें पुष्कळ प्यादे चालत. त्याचें निशाण भगवें (Orange & Vermillion in colour) व त्याजवर सोनेरी वेलबुट्टी होती. त्याजबरोबर प्रत्येकापाशीं दोन बैल असे शंभर वंजारी होते. त्याच्या सर्व अधिकाऱ्यांना बसावयास पालख्या होत्या. असा शिवाजीचा एकंदर लवाजमा जरी थोडा असला तरी श्रीमंती थाटाचा होता. त्याच्या अग्रभागीं निशाणाचा हत्ती चालत असे. पुढच्या मुक्कामावर अगाऊ जाऊन पूर्वतयारी करण्याकरितां त्याचें थोडेंसें बिनीचें सैन्य होतें. घोड्यावरील सामान सोन्या-रुप्याच्या अलंकारांनीं सजविलेलें होतें. त्याच्या स्वारीच्या मागून दोन हत्तिणी वर हौदा चढविलेल्या चालत होत्या व पुढच्या बाजूस मावळी पायदळ चालत होतें. त्याची पालखी रुप्याच्या पत्र्यांनीं मढविलेली होती व पालखीच्या दांड्या सोन्याच्या पत्र्यांनीं मढविलेल्या होत्या. आग्र्यास जाण्याचा शिवाजीचा मार्ग साहजिकच औरंगाबादेवरून होता. त्याप्रमाणें तो औरंगाबादेस पोंचला, तेव्हां त्यास पाहण्यास नागरिकांचे थवेच्या थवे लोटले. तेथील सुभेदार सफशिखनखान हा कांहीं सामोरा आला नाहीं. तो शिवाजीस यःकश्चित् देशमुख व क्षुल्लक मराठा मानून त्याची वाट पाहत आपल्या अधिकाऱ्यांसह दरबारगृहामध्यें थांबला व आपल्या पुतण्यास त्यास सामोरें जावयास व घेऊन यावयास पाठविलें. शिवाजीला हा अपमान सहन न होऊन तो दरबारगृहामध्यें सुभेदाराकडे न जातां थेट शहरांतील आपल्या मुक्कामाच्या जागीं गेला. तेव्हां सफशिखनखान यास, शरमिंदा होऊन आपल्या अधिकाऱ्यांसह नाक मुठींत धरून, शिवाजीच्या मुक्कामावर जाऊन त्यास भेटणें भाग पडलें. दुसऱ्या दिवशीं शिवाजीनें सुभेदारास परत भेट देऊन मनाचा उमदेपणा दर्शविला. त्यानंतर कांहीं दिवस औरंगाबादेस राहिल्यावर तो मार्गस्थ झाला."

त्याचा पुढील रस्ता बऱ्हाणपुरावरून होता. हा रस्ता उत्तम असून त्याजवर घनदाट वृक्षांची छाया होती. मधून मधून १०–१२ मैलांवर बादशहाकरितां बांधलेल्या आरामशीर सराया असत. त्यांत उतरण्यासाठीं भव्य खोल्या व घोडे बांधण्यासाठीं पागा व घासदाणा यांची व्यवस्था

असे. महाराजांनीं रात्रीं या सरायांतून मुक्काम करीत करीत आग्रा शहर गांठलें. आग्रा त्या वेळीं ग्रामीण नगर होतें. रस्ते अरुंद व दोन्ही बाजूंस सावकार व उमराव यांचे वाडे आणि मधून बागबगीचे. त्यांतील कांहीं फळबागा व कांहीं पुष्प-वाटिका होत्या. फळबागांतून आंबा, अंजीर, नारिंग, केळीं व नारळी यांचे वृक्ष आणि पुष्पोद्यानांतून गुलाब, मोगरा, जाईजुई ऋतुपरत्वें फुललेल्या असत. त्यांना पाणी देण्याकरितां कारंजीं व हौद बांधलेले होते. रस्त्यानें इतकी दाटी कीं, माणसांना सुरक्षित चालणें मुष्किलीचें असे.

इतकें होतें तरी बादशहा दिल्लीहून आग्र्यास निवासासाठीं आला म्हणजे त्याजबरोबर येणाऱ्या पुष्कळ उमरावांना व अंमलदारांना राहावयास स्वतःचीं घरें नसल्यामुळें मित्रांच्या वा व्यापाऱ्यांच्या हवेल्या हुडकाव्या लागत. या वेळीं शहाजहानानें व्यापारधंद्यांस दिलेल्या उत्तेजनानें आग्रा नगर चांगलें भरभराटीच्या स्थितींत होतें. त्याचें बरेंचसें श्रेय डच व आर्मीनियन व्यापाऱ्यांना देणें भाग आहे. त्यांचीं तेथें उंची वस्त्रें, आरसे, सोनें, रुपें, जरतार व लोखंडी माल यांचीं मोठमोठीं दुकानें होतीं. डचांनीं अंमलदारांशीं सलोख्याचें संबंध ठेवून त्यांचा विश्वास संपादन केला होता. या कारणानें स्थानिक अधिकारी त्यांस हरएक कामांत मदत करण्यास दक्ष असत. अकबराची वर्तणूक धार्मिक बाबतींत सहिष्णुतेची व उदार असल्यामुळें आग्र्यास जेसुइटांनीं एक प्रार्थनामंदिरहि बांधलें होतें आणि ख्रिस्ती लोकांचे धार्मिक उत्सव बिनतक्रार होत व मिरवणुकी रस्त्यानें थाटानें निघत. पण औरंगजेबाच्या धर्मवेडानें तें सर्व आतां स्थगित झालें होतें.

लाल किल्ल्याची प्रतिमा

यमुनेच्या कांठींच बादशहाचा प्रचंड व भव्य राजवाडा होता. ती दिल्लीच्या लाल किल्ल्याची प्रतिमाच होती. नदीतीरानें राजवाडा अर्धा मैल क्षेत्रावर विस्तारला होता. त्याच्या आसपास नदीतीरीं ताजमहालाकडे तोंड असलेल्या बड्या उमरावांच्या हवेल्या असून त्यांतच जयपूरच्या महाराजांची म्हणजे मिर्झा राजा जयसिंग याची हवेली होती. तिला जयपूरप्रासाद म्हणत. याच प्रासादांत शिवाजीनें राहावें असें जयसिंगाचा पुत्र

रामसिंग यानें ठरविलें होतें. हा प्रासाद सुंदर व प्रेक्षणीय होता. त्यांतील भिंतींवर सुरेख मेहेरपी व सोनेरी रंगांत वेलपत्ती व फुलपत्ती काढल्या होत्या. वरील छतावरहि उत्कृष्ट नक्षीकाम केलें होतें. भिंतींतील कोनाड्यांत चिनीमातीचीं नक्षीदार पात्रें व पुष्पपात्रें ठेवलीं होतीं. खालीं भूमीवर गालिचे व रुजामे आंथरले असल्यानें त्यांजवरून पदन्यास करणें सुखद वाटे. समोरच्या खोल्यांतून भिंतींच्या कडेनें गाद्या व मागें टेकावयास लोड व तक्के होते व ते साटीण, ताता यांच्या व भरजरीच्या अभ्र्यांनीं झांकलेले होते.

मागें सांगितलेल्या सरकारच्या हकीकतीप्रमाणें "शिवाजी आग्र्यास उशिरा म्हणजे ऐन बारा तारखेस दुपारीं पोंचला. त्याचें तेथें स्वागत करण्यांतहि हेळसांड दिसून आली! कोणीहि बडा माणूस परगांवाहून बादशहाच्या भेटीस यावयाचा असतां त्याच्या योग्यतेस साजेल अशा दरबारी मानकऱ्यास त्यास सामोरा पाठवावयाचा रिवाज होता. पाहुण्यानें आदल्या दिवशीं राजधानीबाहेर मुक्काम करावा, त्यास भेटावयास बादशहाच्या प्रतिनिधीनें जाऊन आहेर करावा, दुसऱ्या दिवशीं प्रतिनिधीनें त्यास मोठ्या समारंभानें राजपथांतून मिरवीत आणावें व ज्योतिष्यानें भेटीसाठीं जो मुहूर्त काढून दिला असेल त्या मुहूर्तावर त्यानें पाहुण्यास बादशहापाशीं नेऊन भेटवावें, अशी चाल होती.

"शिवाजी आग्र्याच्या बाहेर कांहीं मैलांवर ता. ११ मे रोजीं तिसऱ्या प्रहरीं माणिकचंदाच्या सराईत दाखल झाला. त्याच वेळीं रामसिंगास शिवाजी इतका जवळ आल्याचें प्रथम कळलें. त्यानें मुनशी गिरिधरलाल यास दुसऱ्या दिवशीं शिवाजीस राजधानींत घेऊन येण्यास पाठविलें. हाहि शिवाजीचा अपमानच झाला. कारण मुनशी गिरिधरलाल हा रामसिंगाचा केवळ कारकून होता. खरें म्हटलें तर शिवाजीस आणावयास एखाद्या उमरावानेंच जावयास पाहिजे होतें.

रामसिंगाची चूक

"रामसिंगानें ही जशी एक चूक केली, तशी दुसऱ्या दिवशीं दुसरी चूक त्याच्या हातून घडली. ता. १२ मे रोजीं शिवाजीस आग्र्यांत समारंभानें आणावयास रामसिंगानेंच जावयास पाहिजे होतें. पण तो

दिवस रामसिंगाचा राजवाड्याभोंवतीं गस्त घालण्याचा होता. भरींत भर म्हणून रामसिंगाच्या अधिकाऱ्यांनीं आणखी एक घोटाळा करून ठेवला. रामसिंग शिवाजीस भेटण्यास एका रस्त्यानें गेला, तर मुनशीनें शिवाजीस दुसऱ्याच रस्त्यानें नगरांत आणलें. त्यामुळें यजमान व पाहुणे यांची चुकामूक होऊन मिरवणूक संपल्यावर दोघांची गांठ नगराच्या मध्य-भागीं पडली. मुनशी गिरिधरलाल शिवाजीस दहरआरा (Dahar-ar-a) बागेच्या रस्त्यानें आणीत होता. औरंगजेबानें नियोजित केलेले उमराव, रामसिंग व मुखलिसखान हे खोजा फिरोज बागेच्या रस्त्यानें स्वागतार्थ गेले. ही गफलत रामसिंगास वाटेंत कळल्यावर त्यानें शिवाजीचा रस्ता बदलून आपल्या ठिकाणाकडे त्यास वळवून घेतलें व अशा रीतीनें उभय-तांची गांठ मध्यवर्ती मंडईजवळील नूरगंज बागेपाशीं पडली.

"शिवाजीच्या दिमतीस जयसिंगानें दक्षिणेंतून तेजसिंग कछवा यास दिलें होतें. त्यानें शिवाजी व रामसिंग यांची ओळख करून दिल्यावर शिवाजी थांबला आणि रामसिंगानें पुढें येऊन शिवाजीस घोड्यावरून आलिंगन दिलें. नंतर शिवाजीशीं मुखलिसखानाचा परिचय करून देण्यांत आला. कुमार रामसिंगानें आपल्या वाड्याबाहेर शिवाजीकरितां डेरे दिले होते. तेथें शिवाजीस वाद्यांच्या निनादांत नेण्यांत आलें. शिवाजीस दरबारास जावयास उशीर झाला होता तरी दरबाराचें काम शिरस्त्याप्रमाणें ठरल्या वेळीं सुरू झालें होतें. ज्यांत दरबार भरावयाचा तो दिवाण-ई-आम हा दिवाणखाना तिन्ही बाजूंनीं उघडा असून त्याच्या बाहेर उद्यान होतें. त्यांतील हिरवळीवर एक पाळीव हरीण रत्न-खचित खोगीर घातलेलें इतस्ततः बागडत होतें. दिवाणखान्यांत सुरूचे खांब असून दिवाणखान्याभोंवतालीं गजनीचे पडदे सोडले होते आणि आंत उंची पोशाख करून दरबारी लोक आपआपल्या योग्यतेप्रमाणें व योग्य त्या ठिकाणीं बसले होते. दिवाणखान्यांतील भिंती, छत व खांब यांजवर सुंदर वेलपत्तीचें सोनेरी काम केलें होतें. तो दिवाणखाना व बादशहानें रहावयाचे महाल यांजमध्यें मोठी लाल भिंत होती. या भिंतींतच कांहीं उंचीवर झरोका (Balcony) असून त्यांत बादशहाचें जगद्विख्यात मयूरासन ठेवण्यांत आलें होतें. त्यावर विराजमान होण्याकरितां

बादशहा आपल्या मागील महालांतून येऊं लागला, त्याबरोबर वाद्यांचा गजर झाला. झरोक्यापुढचा पडदा दूर सरला व बादशहा येऊन मयूरासनावर बसला. त्याच्या मस्तकावर लाल रंगाचीं रत्नजडित छत्रें झळकत होतीं. बादशहाचा झगा शुभ्र रेशमाचा होता. त्याच्या डोक्याला भरजरीचें पागोटें हिरेजडित असें होतें. बादशहाभोंवतीं खोजांचें कडें असून ते त्याजवर चवऱ्या व मोर्चेलें ढाळीत होते."

हत्तींची सलामी

झरोक्याच्या खालीं राजघराण्यांतील पुरुष, मांडलिक राजे व परराष्ट्रीय वकील यांनीं बसावयाची जागा होती. त्यांजपाशीं हुजरे, पंखे व रुप्याच्या पिकदाण्या घेऊन उभे होते. या गजांनीं वेष्टिलेल्या दालनांत कोणास प्रवेश द्यावा ही दरबारी रिवाजांतील अवघड समस्या होती. तें दालन इतर दालनांपेक्षां तीन पायऱ्या उंच होतें. त्यांत बसावयाचा मान फार उच्च समजला जाई. बादशहानें प्रवेश करतांच सर्व मानकऱ्यांनीं आपलीं शिरें नमविलीं व हात जोडले. नंतर दरबाराच्या रिवाजास रीतसर सुरुवात झाली. मंजुळ वाद्यें वाजूं लागलीं. त्या ध्वनींत शृंगारलेले हत्ती बादशहास सलाम करण्याकरितां एकामागून एक येऊं लागले. अशा प्रसंगीं त्या प्रत्येक मोठ्या हत्तीबरोबर दोन लहान हत्ती त्याच्या दिमतीस होते. हत्ती झरोक्यापाशीं आला कीं, एक पाय उचलून धरी, सोंड वर करी व सलामीदाखल चीत्कार करी. असे तीनशें हत्ती राजदर्शनास आले व त्या प्रत्येकाबरोबर पंचवीस-तीस सेवेकरी होते. या हत्तींना प्रत्येकीं साखर, लोणी, हरभरा व ऊंस यांचा रोजीं दहा रुपयांचा खुराक असे. हत्तीमागून काळवीट व टोणगे, चांगले सजविलेले सलामीस आले! इतकें झाल्यावर बादशहानें शिबंदीची व रिसाल्याची पाहणी केल्यानंतर दरबारांतील गंभीर कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रथम मुख्य वजीर उमदत उल्मुल्क, इतर वजीर व उमराव सलाम करण्यास झरोक्यापुढें आले. प्रत्येकानें जमिनीवर उजवा पंजा उताणा टेकावा, तो हळूहळू वर करीत उभें राहावें व शेवटीं तो पंजा कपाळास लावावा. असें तीनदां केल्यावर बादशहाला सोन्याच्या तबकांत घालून, रत्नें, मोहरा वा मूल्यवान् पदार्थ नजर करावा. त्यास बादशहानें स्पर्श केल्यावर तें तबक खोजानें घेऊन जावें. हा दरबार विशेष

स्वरूपाचा व बादशहाची सुवर्णतुला करण्याचा असल्यामुळें इतका बडेजाव करण्यांत आला. शिवाजी बादशहाच्या भेटीसाठीं गेला तेव्हां त्याजबरोबर संभाजी, रामसिंग, कारकून व हुजरे मिळून नऊ आसामी होते. ते घोड्यावर बसून किल्ल्यापाशीं आले. किल्ल्याच्या आंत फक्त बादशहा व शहाजादे यांनींच घोड्यांवर बसून जाण्याचा शिरस्ता असल्यामुळें ते सर्व दरवाजापाशीं घोड्यावरून उतरले. दरवाजावरच्या नगारखान्यांतून वाद्यें वाजवून ते आल्याचें जाहीर करण्यांत आलें. त्यांजपुढें हलगे व झांजा वाजवीत बारा लष्करी जवान चालूं लागले. ते येत येत दिवाण-ई-आमपाशीं आले. पण आतां उशीर झाला होता. दरबारांतील उमरावांची दिवाण-ई-आममध्यें बादशहानें भेट घेण्याचा सोहळा संपला असून बादशहा दिवाण-ई-खासमध्यें जाऊन बसला होता. तेथें असिस्टंट पे-मास्टर आसदखान यानें शिवाजीची बादशहाशीं भेट करविली. शिवाजीनें बादशहास एक सहस्र मोहरा, दोन सहस्र रुपये नजर व त्याशिवाय पांच सहस्र रुपये निसार (propitiatory alms) असा नजराणा केला. त्यानंतर संभाजीकडूनहि नजराणा देवविण्यांत आला.

शिवाजीनें इतकें सगळें यथास्थित केलें तरी, उलट बादशहानें त्याच्या स्वागताचा एक शब्दहि उच्चारला नाहीं किंवा नजराणा स्वीकारल्याचें दर्शविलेंहि नाहीं. मग शिवाजीला बादशहाच्या सिंहासनापासून माघारें नेऊन पंचहजारी मनसबदारांत उभें करण्यांत आलें. ही तिसऱ्या प्रतीच्या उमरावांची रांग होती. इकडे दरबारांतील मामुली काम चालू राहून शिवाजीकडे कोणीं लक्षहि दिलें नाहीं. अशी ही अपमानाची व उपेक्षेची परंपरा शिवाजीनें आग्रा शहरांत प्रवेश केल्यापासून चालू असलेली पाहून शिवाजी रागानें लाल झाला. शिवाजीनें विचारलें तेव्हां रामसिंगानें त्यास सांगितलें कीं, पंचहजारी मनसबदारांत त्याची गणना करण्यांत आली आहे. त्यावर शिवाजी आश्चर्यानें उद्गारला, 'काय, म्हणतां तरी काय ! अहो, हा माझा एवढासा नऊ वर्षांचा मुलगा—याला सुद्धां तो हजर नसतांनाहि बादशहाकडून पंचहजारी मनसब देण्यांत आली होती. माझा नोकर नेताजी हाहि पंचहजारी मनसबदार. बादशहाची मीं इतकी सेवा केल्यानंतर आणि इतक्या शेंकडों कोस अंतरावर

आल्यानंतर बादशहानें मला इतकें हलकें लेखावें काय? हा माझ्यासमोर उभा असलेला उमराव कोण?'

'अहो! ते महाराज जसवंतसिंग!'

'काय जसवंतसिंग! यानें तर माझ्या सैन्याला पाठ दाखविली होती. त्याच्यामागें मीं उभें राहावें याचा अर्थ काय!'

हा इतका अपमान झाला तरी शिवाजीचें नष्टचर्य अजून संपलें नव्हतें. बादशहानें बडा वजीर जाफरखान व जसवंतसिंग यांस पोशाख दिला. पण शिवाजीच्या वांट्यास तोहि आला नाहीं. तेव्हां शिवाजीच्या तळव्याची आग मस्तकास जाऊन त्याचे डोळे इंगळासारखे लाल झाले. बादशहानें शिवाजीची ही मनःस्थिति ओळखून रामसिंगास विचारलें, 'शिवाजीला काय होत आहे तें विचार.' कुमार रामसिंग अडीच हजारी मनसबदाराच्या रांगेंत उभा होता. तो शिवाजीपाशीं विचारण्यास येतांच शिवाजी उस्मारला, 'मी कसा आहें हें तूं, तुझ्या बापानें व प्रत्यक्ष बादशहानें पाहिलें आहे; असें असतां इतका वेळपर्यंत मला तुम्हीं मुद्दाम उभें केलें आहे. मी तुमची ही मनसब फेकून देतों!'

असें म्हणून त्यानें आपली पाठ ताबडतोब सिंहासनाकडे फिरविली व तो दाणदाण पाय आपटीत चालता झाला. रामसिंगानें त्याचा हात धरला पण शिवाजीनें तो झिडकारला व तो दिवाण-ई-खासधील खांबांच्या मागें जाऊन बसला. रामसिंग त्याच्यामागोमाग गेला व त्याची समजूत घालूं लागला. तेव्हां शिवाजी त्यास म्हणाला, 'माझ्या मरणाची घटका आतां भरली आहे. तेव्हां तूं तरी मला मारून टाक, नाहीं तर मी तरी स्वतःची गर्दन उडवितों. तूं आतां माझें डोकें उडवीन म्हटलेंस तरी मी बादशहाचें यापुढें तोंडहि पाहणार नाहीं.'

रामसिंगानें घडलेली हकीकत बादशहास सांगितल्यावर बादशहानें त्याचें शांतवन करण्याकरितां, त्याच्या अंगांत पोशाख (खिलात) घालण्याकरितां व त्याला आपल्याकडे घेऊन येण्याकरितां, रामसिंगास पाठविलें. पण आपणांस जसवंतसिंगाच्या मागें उभें केल्यामुळें व इतका वेळ ताटकळत ठेवल्यामुळें रागानें जळत असल्याकारणानें शिवाजीनें ती खिलात स्वीकारण्याचें नाकारलें. हा सारा प्रकार रामसिंगानें बादशहाचा रोष न

होईल अशा खुबीनें त्यास सांगितला. तो म्हणाला, 'शिवाजी हा आडदांड मराठा राजा आहे. हे उन्हाळ्याचे दिवस आणि दिवाण-ई-खासमध्यें उष्मा फार, या कारणानें त्याची प्रकृति एकाएकीं बिघडली आहे.' तें ऐकून औरंगजेबानें रामसिंगास शिवाजीला दरबार आटोपण्याची वाट न पाहतां, आपल्या घरीं घेऊन जाण्यास व त्याचें समाधान करण्यास सांगितलें.

रामसिंग शिवाजीस घरीं घेऊन गेला व त्यानें त्याचें समाधान करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण त्याचा कांहींहि उपयोग झाला नाहीं. शेवटीं इतक्यावर हें प्रकरण मिटलें कीं, शिवाजी बादशहाच्या भेटीस जात नसेल तर संभाजीनें जावें. त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं रामसिंग संभाजीस घेऊन दरबारांत गेला. बादशहानें त्यास विचारलें, 'शिवाजी येणार आहे ना?' कुमार रामसिंगानें उत्तर दिलें, 'शिवाजीला ताप आला आहे, तेव्हां तो आज येऊं शकत नाहीं.' हें ऐकल्यावर बादशहानें संभाजीला पूर्ण खिलात (सर ओपा) देऊन त्याचा गौरव केला. पण शिवाजी कांहीं पुनः औरंगजेबाच्या भेटीस आला नाहीं.

आवो शिवाजी राजे

या दरबाराचें वर्णन सभासदानें पुढीलप्रमाणें केलें आहे — "पादशहा बोलला जे 'आवो शिवाजी राजे.' असें बोलतांच राजियांनीं तीन सलाम केले. मनांत भाव धरिला कीं, श्रीशंभुमहादेव एक, दुसरा श्रीभवानी, तिसरा महाराज पितियास, ऐसे तीन सलाम केले. पादशहानें उजवे बाजूस जसवंतसिंग महाराज, नवकोट मारवाडचा राजा, त्याचे शेजारीं खालते उभे रहावयासाठीं हुकूम केला. राजे व पुत्र उभे राहिले. रामसिंग यास पुसलें कीं, 'आपणावर ते शेजारी कोण?' असें पुसिलें. त्यास रामसिंग बोलले जे 'महाराज जसवंतसिंग.' ऐसें ऐकतांच राजा क्रोधयुक्त होऊन बोलला कीं 'जसवंतसिंगासारखा उमराव! याच्या पाठी माझ्या लष्करांनीं पाहिल्या असतील. याचे खाले आपण उभे राहावें म्हणजे काय!' असें क्रोधें बोलून, रामसिंगाची माजेची (कमरेची) कटार घेऊन, महाराज 'यास (औरंगजेबास) मारितों' म्हणवून कटार मागूं लागले. मग रामसिंग 'धीर धरणें' म्हणून बोलूं लागले. शद्बाशद्बी होतांच बादशहास कळलें. बादशहा म्हणूं लागले कीं, 'काय जहालें?' रामसिंग

बोलला कीं 'जंगली वाघ हयवान, त्यास गर्मा जाहला. कांहीं करीणा जहाला!' असें बोलतांच पादशहाचे मनांत शंका उत्पन्न जाहली. काय होईल तें न कळे. म्हणून रामसिंगास पादशहा बोलले कीं, 'राजियास घेऊन डेरियास जाणें. उद्यां सद्यां सावकाश मुलाखत होईल!' असें बोलतांच राजे व राजपुत्र व रामसिंग राजियाचे लोक देखील हवेलीस गेले. राजा बाहेर गेल्यावरि पादशहा संतोष जहाला. आणि 'मोठा अनर्थ चुकला. शिवाजीची व आमची नजर जाहली' ऐसे बोलूं लागले."

निधड्या छातीचा वीर

तत्कालीन इंग्रज लेखकांनीं या प्रसंगाविषयीं काय लिहून ठेवलें आहे तेंहि पाहणें अवश्य आहे. ता. २५ सप्टेंबर सन १६६६ रोजीं सुरतेहून इंग्रज वखारवाल्यांनीं इंग्लंडांत कंपनीस लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे, "दरबारांत गेल्यावर आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या उमरावांच्याखालीं उभें केल्यामुळें बादशहाची पर्वा न करतां तो निधड्या छातीचा वीर संतापून तिरस्कारानें दरबाराचा त्याग करून निघून गेला. बादशहानें त्याच्या समाधानाकरितां अनेक सरदार पाठविले. तरी देखील तो परत येईना, कीं दरबारची निर्भर्त्सना करण्याचें थांबवीना. 'आपण युद्धांत जिंकलेले कैदी नाहीं; तह होऊन भेटीस आलों आहों!' असें तो म्हणाला व बादशहापुढें येण्यास पुनः कधींच तयार झाला नाहीं" (प. सा. खंड १, पृ. ३१७).

राजे हवेलीस परत आल्यावर रामसिंगाशीं त्यांनीं त्याच विषयावर बोलणें काढलें. ते त्यास रागानें म्हणाले, "हा बादशहा असा कोण लागून गेला आहे कीं, त्यानें मला जसवंताखालीं उभें करावें? त्याला काय व्यवहार (करीणा) समजत नाहीं?' रामसिंग तरी काय सांगणार! त्यालाहि वाईट वाटलें व राजाच्या सुरक्षितपणाविषयीं धास्ती पडली. तथापि स्वतः राजांनीं पुनः भेटीस जाऊं नये, असें ठरून रामसिंग आपल्या हवेलीस गेला. त्यानंतर राजांचा आपणांबरोबरच्या मुत्सद्द्यांशीं विचारविनिमय झाला. त्यांत असें निष्पन्न झालें कीं, कांहींतरी बाहेर जाऊन मोठी कामगिरी करण्याचें मिष दाखविल्यावांचून बादशहा राजांना परत जाण्यास निरोप देणार नाहीं. म्हणून रघुनाथपंत कोरडे यांस राजांनीं मसलत सांगून बादशहाच्या भेटीस पाठविलें. त्यांनीं बादशहाची घुसलखान्यांत भेट

घेऊन राजे दक्षिणेंत जाऊन आदिलशाही व कुतुबशाही या दोन्ही पातशाह्या आपणांकरितां जिंकून देण्यास कबूल असल्यानें त्यांस दक्षिणेंत जाण्यास निरोप द्यावा अशी बादशहास विनंती केली. पातशहानें ‘सबुरी करणें, तुमच्या मुद्यामाफक करूं’ असा लेखी जबाब दिला. हा जबाब वाचून राजांनीं ओळखलें कीं, बादशहाच्या मनांत दगा करण्याचें आहे.

यानंतर जाफरखान या मुख्य वजीरानें बादशहाकडे जाऊन शिवाजी-विरुद्ध बादशहाचे कान भरले. जाफरखानाची बायको ती शाइस्ताखानाची बहीण. त्यामुळें जाफरखान हा शिवाजीचा शत्रु बनला होता. त्यानें केलेली कारवाई समजल्यावर महाराजांनीं रघुनाथपंत कोरडे यांस जाफर-खानाची गांठ घेऊन त्याची समजूत घालण्यास धाडलें. परंतु तोहि बधेना किंवा दिलखुलाशानें बोलेना.

दुसऱ्या दिवशीं बादशहानें पांच हजार स्वार व पायदळ पोलादखान कोतवाल यास देऊन महाराजांच्या हवेलीभोंवतीं चौक्या बसविण्यास पाठविलें. त्यावरून कोतवाल येऊन डेरा ठोकून राहिला.

राजे कैदी झाले

“कोतवाल तंबू ठोकून बसल्यावर ‘आपण आतां कैदी झालों’ या-विषयीं राजांची खात्री झाली. राजे घाबरले, कष्टी होऊं लागले. संभाजी राजे यांस पोटाशीं धरून बहुत खेद केला. निराजीपंत, दत्ताजीपंत व त्रिंबकपंत यांनीं बहुता प्रकारें समाधान केलें. तेव्हां राजे बोलले जे, ‘आतां काय हुन्नर करावा.’ असा विचार करतां रात्र झाली. मग श्रीभवानी स्वप्नांत येऊन साक्षात्कार झाला कीं, ‘कांहीं चिंता न करणें, येथून तुजला सर्व शत्रूंस भूल घालून, मोहनास्त्र घालून, पुत्रासहवर्तमान घेऊन जातें. चिंता न करणें’ म्हणून अभय झालें. मग जागृत होऊन आप्तविषयीं लोकांस सांगितलें आणि समाधान मानलें” (सभासद).

शिवाजी जरी असा कैदी होऊन पडला तरी औरंगजेब पक्का ठक, त्याजकडे निरोप व फळफळावळहि पाठवून त्याच्या मानसिक जखमेवर वारंवार डागण्या देण्यास कमी करीत नसे. शिवाजीनें बादशहाचा मुख्य वजीर उमदत उल्मुल्क (जाफरखान) यास निरोप पाठवून आपणांस बादशहानें दक्षिणेंतून निघतांना परत सुखरूप जाऊं देण्याचें कबूल केलें

होतें याचीहि आठवण दिली. पण मुख्य वजीर शाइस्ताखानाचा पक्षपाती असल्यामुळें त्यानें या निरोपाचा विचार केला नाहीं. रामसिंग हाहि बादशहापाशीं शिवाजीविषयीं वारंवार विनंती करी. शेवटीं तर बादशहा त्यास म्हणाला, 'तुम्ही सारे हिंदु एक आहां. पुनः शिवाजीविषयीं गोष्ट काढशील तर तुला व शिवाजीला अशा दोघांनाहि अफगाणिस्तानाच्या किल्ल्यांत पाठवून देईन' (दि ग्रँड रेबल).

जयसिंगाची मनःस्थिति

शिवाजीस बादशहानें अटक केल्याचें वर्तमान दक्षिणेंत जयसिंगास कळल्यावर त्यालाहि तो जबरदस्त धक्का बसला. त्या अटकेची जबाबदारी एक प्रकारें त्याजवर पडत असल्यामुळें तो शरमिंदा झाला. त्या वेळीं त्यानें व इंग्रजांनींहि लिहिलेलीं पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत. तीं वाचलीं असतां त्याच्या मनाची कालवाकालव कशी चालली होती याची कल्पना येते. त्यानें बादशहास कळविलें कीं, शिवाजी अटकेंत मेला तर बादशहाच्या समक्ष मी प्राण देईन. शिवाजीकडून शिष्टाचाराचें उल्लंघन झाल्यामुळें, प्रथम बादशहानें थोडे दिवसपर्यंत दरबारांत येण्याची त्यास बंदी केली होती, तरी नंतर त्याचा सन्मान करून व कृपा दाखवून त्याला परत दक्षिणेंत पाठवावा, असा बादशहाचा इरादा असल्याचेंहि त्यास समजलें. रामसिंगाचेंहि त्यास पत्र आलें. त्यास उत्तर देतांना त्यानें लिहिलें, "प्रथम बादशहानें तुझ्याकडून शिवाजीबद्दलची जामिनकी व जबाबदारी काढून घेतली' असें कळलें. त्यावरून 'तुझा त्यांत संबंध नाहीं!' असें जें मीं बादशहास पत्र पाठविलें होतें, त्याचा उपयोग झाला व तुजवरील जबाबदारी संपली, असें मी समजत होतों. परंतु आतांच बादशहाचें पत्र मिळालें त्यावरून, शिवाजीला तुझ्याच ताब्यांत देण्याचा त्याचा इरादा दिसतो. तुला आग्र्याचा फौजदार नेमून तुझ्या ताब्यांत शिवाजीला देण्याचा बादशहाचा विचार आहे, असें तूं लिहितोस. त्यावर तूं बादशहास असें सांग कीं, बादशहास सोडून मला कधींच राहावें न लागल्यामुळें बादशहानें मला बरोबर दौऱ्यांत घ्यावें."

कोणाहि मोठ्या माणसाचा हेवा करणारे प्रतिस्पर्धी असतातच, तसें जयसिंगाचे प्रतिस्पर्धी औरंगजेबाच्या दरबारांत होतेच. झाला हा खेदजनक प्रकार त्यांच्या पथ्यावर पडला. त्यांनीं जयसिंगाविरुद्ध बादशहाचे

कान भरण्यास सुरुवात केली. ते त्याजपाशीं म्हणाले, ‘ हा तुमच्याशीं उर्मटपणानें वागणारा शिवाजी कोण! त्यास जर त्याच्या अपराधाबद्दल योग्य शासन मिळालें नाहीं, तर कोणीहि क्षुल्लक जमीनदार (bhumia) तुमच्यापुढें येऊन असाच वागेल. ’ या मंडळींत जसवंतसिंग मुख्य होता. कारण शिवाजीनें त्याच्यासमोर त्याची नालस्ती केली होती. या कटांत बादशहाच्या जनानखान्यांतील स्त्रियाहि सामील झाल्या. बडा वजीर जाफरखान याच्या बायकोनें शाइस्ताखानावर शिवाजीनें प्राणघातक हल्ला केला होता त्याचा सूड घेण्याची ही संधि साधली. जहानारा म्हणून औरंगजेबाची मानलेली बहीण होती. तिला तिच्या बापापासून सुरतेच्या जकातीचें उत्पन्न तैनात या नात्यानें मिळत असे. शिवाजीनें सुरत लुटली होती त्याबद्दल त्याजवर तिचाहि राग होताच.

या सर्वांनीं मिळून शिवाजीविरुद्ध बादशहापाशीं काहूर उठविल्यावर त्याचा विपरीत परिणाम बादशहाच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. त्याच्या सल्लागारांची गुप्त बैठक भरून तिच्यांत ठरलें कीं, शिवाजीला ठार मारावा तरी, किंवा त्याला एखाद्या किल्ल्यांत कैदेंत ठेवावें तरी. इतकें ठरल्यावर फुलाद नांवाचा एक क्रूर सिद्दी आग्र्याचा फौजदार होता, त्याला शिवाजीराजास रदहान्दाझ (Radandaz) खानाच्या घरीं नेऊन ठेवण्याची बादशहानें आज्ञा केली. रदहान्दाझ हा माणूस हलक्या कुळांतला व अतिशय क्रूर असून अलवारच्या सतनामी पंथांतील लोकांना कंठस्नान घातल्यामुळें बादशहाच्या नाकचा बाल झाला होता. सांप्रत आग्र्याचा किल्ला त्याच्या ताब्यांत असून तेथील अंधारकोठडींत राजकीय कैद्यांना टाकण्यांत येत असे.

रामसिंगास ही वार्ता कळतांच तो महमद अमीनखान (The First Pay-master) यास जाऊन भेटला व त्यास त्यानें बादशहाचा बेत सांगितला. रामसिंग म्हणाला, ‘ शिवाजी माझ्या संरक्षणाखालीं आहे. माझ्या बापानें शिवाजीस त्याच्या रक्षणाचें वचन दिलें आहे. शिवाजीस मारण्याचा बादशहाचा विचार त्या वचनास हरताळ फांसणारा आहे. यासाठीं बादशहानें प्रथम मला ठार करावें व मग शिवाजीच्या अंगाला हात लावावा.’ महमद अमीनखानानें रामसिंगाचे हे विचार बादशहास सांगितले.

तेव्हां बादशहानें, रामसिंगानें शिवाजी आग्र्यांत असेपर्यंत त्याच्याकरितां जामीन राहावें व तो आग्र्याहून पळून जाणार नाहीं किंवा कांहीं खोडसाळपणा करणार नाहीं, यास जपावें असें ठरविलें. ही गोष्ट औरंगजेबानें ताबडतोब अमलांत आणली व नंतर तो आपल्या हृदयांतील कालकूट प्रकट करूं लागला. रामसिंगानें शिवाजीस घेऊन अफगाणिस्तानांत जावें व तेथें युसुफझाई व आफ्रिडी बंडखोरांशीं लढावें, असा हुकूम त्यानें सोडला व रामसिंगाच्या स्वारींत रदहान्दाझखान याच्या ताब्यांत त्याच्या सैन्याची बिनी दिली. याचा अर्थ असा कीं, रदहान्दाझखानानें वाटेंत शिवाजीस ठार मारावें व तो शत्रूंशीं लढतांना अपघातानें मेला असा पुकारा करावा.

औरंगजेबास हा बेत लागलीच अमलांत आणतां आला नाहीं. कारण जयसिंगानें शिवाजीला सुरक्षितपणाचें अभिवचन दिलें होतें आणि तें औरंगजेबास मोडणें कठीण होतें. म्हणून त्यानें जयसिंगास एक फर्मान पाठवून विचारलें कीं, " शिवाजी दक्षिणेंत असतां त्याजपाशीं तुम्हीं काय गोष्टी कबूल केल्या होत्या, त्या नेमक्या मला कळवाव्या. कारण शिवाजी हा बादशहानें वचनभंग केला आहे असें येथें सांगत असतो. " या पत्राचें उत्तर जयसिंगाकडून येईपर्यंत औरंगजेबानें शिवाजीस काबुलाकडे हद्दपार करण्याचें तहकूब ठेवलें. हा दरम्यानचा काळ शिवाजीनें फुकट दवडला नाहीं. तो आपल्या सुटकेकरितां वजिरांना लांच देऊं लागला. त्याचा परिणाम असा झाला कीं, तारीख २० मे रोजीं जाफरखानानें शिवाजीच्या वतीनें औरंगजेबास एक दयेचा अर्ज सादर केला, त्यांत त्यानें मागील अपराधाची क्षमा करून आपले प्राण वांचवावे, अशी याचना केली होती. तो अर्ज येतांच शिवाजीला काबुलाकडे पाठविण्याचा औरंगजेबानें काढलेला हुकूम परत घेतला. त्यानंतर शिवाजीनें ता. २९ मे १६६६ रोजीं दुसरा अर्ज सादर केला. त्या कामांत त्यानें बादशहाचा मुख्य बक्षी यास मध्यस्थ नेमलें होतें. त्या अर्जांत बादशहा जर आपणांस आपले घेतलेले किल्ले परत देईल व स्वदेशीं जाण्यास परवानगी देईल तर आपण त्यास दोन कोट रुपये देऊं, असें कबूल केलें होतें. तसेंच विजापूरच्या बादशहाशीं आपण मरेपर्यंत लढूं, असें आश्वासन त्यास दिलें होतें; याचा उलटा परिणाम असा

झाला कीं, औरंगजेबानें शिवाजीभोंवतीं पसरलेलें जाळें अधिकच आवळलें व त्याला आपल्या छावणीबाहेर जाण्यास किंवा कोणासहि भेटण्यास मनाई केली आणि त्याच्या छावणीभोंवतालीं कडक पहारा ठेवला.

शिवाजीच्या छावणीबाहेर औरंगजेबाच्या हुकुमावरून आग्र्याचा फौजदार सिद्दी फुलाद (पोलादखान) हा मोठी फौज व तोफखाना यांसह ठेवण्यांत आला होता. आंतल्या बाजूस रात्रीच्या वेळीं रामसिंगाचे लोक शिवाजीच्या निजावयाच्या जागेभोंवतीं पहारा करीत व त्याच्या तंबूभोंवतीं गस्त घालीत. ही योजना शिवाजीचा कोणीं खून करूं नये म्हणून रामसिंगानें मुद्दाम केली होती. अशा रीतीनें शिवाजी हा अक्षरशः कैदी होऊन बसला. पण शिवाजी निराश होणारा नव्हता. इतर सर्व उपाय हरल्यावर तो स्वतंत्रपणें आपल्या कल्पनेप्रमाणें सुटकेच्या विचारास लागला. रामसिंग शिवाजीसाठीं जामीन राहिला होता. ती जामिनकी रद्द करण्यास त्यानें रामसिंगास प्रथम सांगितलें. नंतर बरोबर आणलेला लवाजमा व फौज त्यानें ता. ७ जून रोजीं आग्र्याहून परत देशीं रवाना केली. त्यास औरंगजेबानें हरकत घेतली नाहीं. कारण त्या योगानें शिवाजी अगदींच निराश्रित राहील असें औरंगजेबास वाटलें.

इतकें केल्यावर मला या संसाराचा त्याग करावयाचा असून काशीस भिक्षा मागून राहावयाचें असल्यामुळें तशी मला परवानगी द्या, असा त्यानें बादशहाकडे अर्ज केला. त्यास औरंगजेबानें विनोदानें पण कठोरपणानें उत्तर दिलें, 'त्यानें फकीर व्हावें व अलाहाबादेच्या किल्ल्यांत खुशाल राहावें. माझा सुभेदार तेथें आहे, तो त्याची चांगली काळजी घेईल.' या किल्ल्यांत राजकीय कैद्यांना त्या काळीं ठेवण्यांत येत असे. अशा स्थितींत तीन महिने गेले.

यापुढची हकीकत जदुनाथ सरकार यांनीं दिली आहे, तींत नवीन असें कांहीं नसल्यामुळें त्यांच्या मजकुरांतील पुढील महत्त्वाचा भाग येथें उद्धृत करणें उपयुक्त वाटतें. ते लिहितात, "शिवाजीनें ता. १९ ऑगस्ट रोजीं पहारेकऱ्यांस आपण आजारी असल्याचें कळविलें. पेटाऱ्यांतून बसून छावणींतून बाहेर पडल्यावर माळवा, खानदेश व गुजराथ असा प्रवास न करतां, शिवाजी उत्तरेस मथुरेकडे वळला. तेथून पूर्वेस प्रयागास गेला

आणि शेवटीं बुंदेलखंड, गोंडवन व गोवळकोंडा या भागांतून राजगडास आला. आग्र्याहून मथुरेस आल्यावर संभाजी प्रवासांतील दगदगीनें दमलेला पाहून त्यास त्यानें मथुरेस ठेवलें. मथुरेस आग्र्याहून तो सहा तासांत आला. तेथें आल्यावर त्यानें दाढी-मिशा काढल्या, अंगाला राख फांसली, संन्याशाचें सोंग घेतलें, हातांत दंड घेतला व त्यांत कांहीं रत्नें व सोन्याचीं नाणीं भरलीं. बरेंचसें द्रव्य जोड्यांत लपविलें. एक मोठा हिरा व माणकें (rubies) आपल्या नोकरांच्या कपड्यांत मेणांत बुचकळून शिवून टाकलीं " (सरकार).

सर जदुनाथ सरकार यांनीं शिवाजीच्या आग्र्यांतील मुक्कामाचें केलेलें वर्णन जयपुरास रामसिंगाच्या अधिकाऱ्यांनीं त्याच वेळीं जीं पत्रें लिहिलीं होतीं, त्यांच्यावर आधारलेलें असल्यामुळें, अधिक स्पष्ट, खुलासेवार विस्तृत व विश्वसनीय आहे. त्याशिवाय डेनिस किंकेड, आय्. सी. एस्., यांनीं आपल्या 'दि ग्रँड रेबल' या पुस्तकांत हिंदुस्थानांतील फ्रेंच प्रवासी बर्नियर याच्या ग्रंथाधारें वरील विषयांवर एक प्रकरणच (प्रकरण २५ वें) लिहिलें असून तेंहि वाचनीय वाटल्यावरून त्यांतील कांहीं महत्त्वाचा आशय येथें देत आहें.

शिवाजीचा नवा हुन्नर

" शिवाजी आग्र्यास अडकून पडला व आपली सुटका सीध्या मार्गानें होईल अशी आशा त्याला वाटेना, तेव्हां त्यानें एकदम आपला पवित्रा बदलला. तो आनंदी दिसूं लागला. पहाऱ्यावरील अधिकारी व शिपाई यांजबरोबर गप्पागोष्टी व थट्टामस्करी करूं लागला. आग्र्याची हवा किती छान, आपली दक्षिणेंतील किल्ल्यावरची हवा किती दमट, असें तो म्हणूं लागला व बादशहाकडून येणाऱ्या फळावळीची व मेवामिठाईची तारीफ करूं लागला. बरा मी या राजकारणाच्या व स्वाऱ्याशिकारींच्या दगदगींतून मोकळा झालों, असें म्हणून तो स्वतःचें अभिनंदनहि करूं लागला. तरी बादशहाच्या मनांतील त्याजविषयींचा संशय जाईना. त्याला हें सारें कपटनाटक वाटलें. म्हणून शिवाजीनें एक नवीनच हुन्नर लढविला. त्यानें बादशहास कळविलें, 'मी आपला आतां आग्र्यासच राहणार, तर माझी

बायकामुलें व आई यांना दक्षिणेंत ठेवून करावयाचें काय ? त्यांनाहि इकडे आणण्यास बादशहानें परवानगी द्यावी. बादशहानें तीहि परवानगी दिली. त्याची खात्री होत चालली कीं, शिवाजीला आतां परत स्वदेशीं जावयाची इच्छा नसून आग्र्यास राहणेंच बरें वाटत आहे. ही परवानगी दिली तरी महाराज त्यांना आणतात कशाला ! असे दोन एक महिने गेले तरी बायका-मुलें आलीं नाहींत. तेव्हां आषाढ-श्रावण महिन्यांत महाराष्ट्रांत पाऊस फार म्हणून त्यांना यावयास उशीर झाला असेल असें भासविण्यांत आलें.

वरील भुमका उठवून देऊन बादशहास, शिवाजींत कांहीं अर्थ नाहीं, असें वाटावयास लागल्यावर, महाराजांनीं आणखी एक पाऊल पुढें टाकलें. त्यांनीं बादशहास कळविलें कीं, इतका माझा फौज-फांटा आग्र्यास ठेवून करावयाचा काय ? त्या सर्वांना दक्षिणेंत परत पाठवून मजपाशीं थोडे सेवक राहिले म्हणजे बस्स आहे. बादशहास त्यामुळें औषधावांचून खोकला जाईल असें वाटून त्यानें फौजेची दक्षिणेंत रवानगी करण्यास परवानगी दिली. फौज गेल्यानंतर शिवाजीविषयीं बादशहास वाटणारी धाकधुक संपूर्ण नाहींशी झाली. त्याच्या दृष्टीनें शिवाजी अगदीं क्षुद्र व उपेक्षणीय ठरला. आतां तो आपल्या कैदेंत पक्का सांपडला अशी त्याची खात्री झाली. शिवाजी हा विषय मागें पडला. महाराज फार्सी शिष्टाचाराच्या पद्धतींत रुळत चाललेले सर्वांना दिसले. त्यांनीं आग्र्यांतील मोठमोठ्या उमरावांना मेवामिठाई व फळफळावळ पाठविण्याचा प्रघात ठेवला. त्यांजकडून महाराजांकडे खाद्य पदार्थ व महाराजांकडून त्यांजकडे खाद्य पदार्थ जात."

सभासद लिहितो, "दुसरे दिवशीं नाना जिन्नस मेवा खरेदी करून आणविला. आणि वेळूचे पेटारे आणवून दहा पेटारे मेवा भरला. एक एका पेटाऱ्यास दोघे दोघे नोकर लावून, मध्यें लाकूड घालून मेवा वजिरास पाठविला. चौकीच्या लोकांनीं पुसलें कीं, पेटारे कोणाचे ? कोठें जातात ? मजुरांनीं उत्तर दिलें कीं, राजे यांणीं चौघां वजिरांस मेवा पाठविला आहे. यांनीं एक दोन उघडून पाहिले तों मेवा खरा. मग जाऊं दिलें. असा राबता रोज लाविला. मग आठ चहू रोजांनीं आपले स्वार व कित्येक कारकून लोक यांसहि पळणें म्हणून सांगून पाठविलें. मग ते कुल पळाले.

फकिराचें सोंग

" मग एके दिवशीं राजे व राजपुत्र एकाच पेटाऱ्यांत (दोघे) बसले. पुढें मागें पेटारे करून मध्यें पेटियांत बसून चालले. ते वेळीं आपला साज सर्व उतरून हिरोजी फर्जंद यास घालून आपले पलंगावरी निजविला. हात मात्र त्याचा उघडा बाहेर दिसूं दिला. आणि शेला पांघरून निजविला. आणि एक पोरगा रगडावयास ठेविला. जवळील कारकून होते. त्यांस अगोदर दिल्लीपलीकडे (आग्रा) तीन कोसांवर एक गांव होता तेथें ठिकाण करून पुढें रवाना केले होते. आणि आपण उभयतां पेटारियांत बसून निघोन चालिले. चौकीचे लोक होते त्यांनीं एक दोन पुढील पेटारे उघडून पाहोन वरकड पेटारे न उघडतां जाऊं दिले. शहराबाहेर दोन कोसांवरी जाऊन पेटारे टाकून, पाय उतारा होऊन कारकून, ज्या गांवीं होते त्या गांवीं गेले. कारकून बराबरी घेतले. अवघियांनीं रानांत बसून विचार केला कीं, आतां जरी नीट आपले देशास जातों तरी तिकडे लाग करून फौजा धावतील. तिकडे जाऊं नये. वाराणशीकडे जावें. असें करून राजे संभाजीराजे व निराजी राऊजी व दत्ताजी त्रिंबक व राघो मित्रा मराठा ऐसे निघोन चालले. वरकडास मनास मानेल तिकडे जाणें म्हणून सांगितलें. आपण राजपुत्र व इतर कारकून लोक वाराणशीकडे जातों, असें सांगून आंगास राखा लावून फकिराचें सोंग घेऊन मथुरेस गेले.

" मागें दिल्लीमध्यें (आग्रा) हिरोजी फरजंद पलंगावर निजला होता. तो चार प्रहर रात्र व तीन प्रहर दिवस तैसाच निजला. चौकीचे पोलादखानाचे लोक कोठडींत येऊन पाहतात (तों) राजे शेला पांघरून निजले. पोर पाय रगडीत होता. पोरास लोक पुसतात कीं, राजे आज फार वेळ निजले. पोर म्हणतो कीं, शीर दुखतें. ऐसे पाहून लोक जातात. तैसाच तीन प्रहर दिवस हिरोजी निजला होता. तों प्रहर दिवस असतां हिरोजी उठोन आपलीं पांघरुणें, चोळणा, मुंडासें घालून पोर बरोबरी घेऊन बाहेर आला. चौकीदारांनीं पुसलें, त्यास सांगितलें कीं, शीर दुखतें, कोणी कोठडींत जाऊं लागलें तर त्यास मना करणें. आपण औषध घेऊन येतों. म्हणून सांगून दोघे बाहेर गेले. रामसिंगाचे गोटास जाऊन, त्यास एकांतीं वर्तमान सांगोन आपण तेथून निघोन देशाचा मार्ग धरिला. "

‘ राजा गइब झाला ’

महाराज निघून गेले तरी ती बातमी पहारेकऱ्यांना लागण्यास पुष्कळ वेळ लागला. त्याविषयीं सभासदानें लिहिलें आहे, “ नऊ तास दिवस आला. नववे तासा चौकीचे लोक म्हणत होते कीं, ‘ आज माणसाचा राबता नाहीं. राजा श्रमी जहाला आहे म्हणून चाकर सांगतात. त्याजवर कोणी जात येत नाहीं, काय वर्तमान ? ’ म्हणून कोठडींत पाहावयास गेला तों पलंगावर कोणी नाहीं. राजा पळाला ऐसें जहालें. हें देखोन पोलादखानानें पादशहाजवळ वर्तमान सांगितलें कीं, ‘ राजा कोठडींत होता. वरचेवर जाऊन पाहत असतां एकाएकीं गइब झाला. पळाला किंवा जमिनीमध्यें घुसला कीं अस्मानामध्यें गेला हें न कळे. आम्ही जवळच आहों. देखत देखत नाहींसा झाला. काय हुन्नर जहाला न कळे. ’ ऐसे जाऊन सांगतांच पातशहास आश्चर्य वाटून बहुत तजविजींत पडला आणि कुल फौजांत ताकीद करून चौतर्फा अष्ट दिशेस दोन लाख साठ हजार स्वार शोधावयास रवाना केले ! त्यांस सांगितलें कीं, ‘ शिवाजी हुन्नरवंत आहे. एकादा वेष धरून जात असेल. तरी तुम्ही जंगम, जोगी, संन्यासी, तापसी, बैरागी, नानकपंथी, गोरखपंथी, फकीर, ब्राह्मण, कंगाल, ब्रह्मचारी, परमहंसी, वेडी, नाना प्रकारचीं सोंगें शोध करून राजा ओळखून, कैद करून आणणें. ’ फौजा चोहोंकडे रवाना जहाल्या आणि पादशहांनीं मनांत शंका धरली कीं, राजा शहरांत कोठें दडून राहिला असेल आणि रात्रीं आपणांस दगा करील म्हणून तजवीज करून बहुत सावध चौकी पहारा ठेवून जागेच पलंगावर राहून बैसले. लोक कंबरबस्ती करून रात्रंदिवस जवळ ठेवले. ये जातीनें राहूं लागले ! ”

रामसिंगास बादशहापर्यंत शिवाजीच्या सुटकेचें वर्तमान गेल्याचें कळल्यावर तोहि बादशहास भेटला व त्यानें या घटनेशीं आपला संबंध नसल्याचा निर्वाळा दिला. पण त्यानें त्याचें समाधान झालें नाहीं. रामसिंगाचें अंग असल्यावांचून शिवाजीची युक्ति साधणें शक्य नाहीं, असें त्याच्या डोक्यानें घेतलें. जयसिंगास ही बातमी दक्षिणेंत कळली. तेव्हां तो घाबरला. आपल्यावर व आपला मुलगा रामसिंग याजवर हें प्रकरण शेकणार, अशी त्यास काळजी पडली. रामसिंगाच्या सांगण्यावरून आणि रामसिंगाच्या पहाऱ्यांतील ढिलाईमुळें शिवाजीस जातां आलें अशा समजुतीनें बादशहा

रामसिंगाची मनसब व जहागीर काढून घेण्याच्या विचारांत असल्याचें कळल्यावर, या प्रकरणाच्या मुळाशीं मीच आहें, अशी शंका बादशहास आली नसेल ना, असें वाटून जयसिंग लिहितो, 'माझ्या मनांत असे बेमानीचे विचार आले असतील तर मला मरण येवो! मीं शिवाजीला जेरीस आणिलें. त्या माझ्या शब्दावर बादशहानें कां विश्वास ठेवूं नये?' (ऑगस्ट १६६६, प. सा. सं. खंड १, पृ. ३१६).

या बाबतींत सुरतेच्या इंग्रजांनीं नोव्हेंबर १६६६ मध्यें इंग्लंडांत पत्र पाठविलें. त्यावरून तत्कालीन लोकमतावर बराच प्रकाश पडतो.

औरंगजेबाचा वचनभंग

"दहा महिन्यांपूर्वीं आपलें जीवित सुरक्षित राखण्याच्या अटीवर शिवाजी राजा जयसिंगाच्या हवालीं झाला. पण बादशहापुढें जातांच बादशहानें त्याचा घात करण्याचें ठरविल्याबरोबर राजा जयसिंगानें, शिवाजी मेला तर बादशहाच्या समक्ष आपण स्वतःचा प्राणघात करूं, असें शपथेवर सांगितल्यामुळें बादशहानें त्याचा जीव न घेतां, जयसिंगाच्या मुलाच्या (रामसिंग) ताब्यांत कैदी म्हणून दिलें. शिवाजीला बादशहापुढें नम्र होण्यास भाग पाडणें शक्य नसल्यामुळें रामसिंग व त्याचा बाप यांनीं त्याला मित्रत्वानें वागविण्याचें वचन देऊन औरंगजेबाकडे पाठविलें होतें. परंतु जेव्हां बादशहा स्वतःचा शब्द मोडून, त्यांच्या वचनाला हरताळ फासूं लागला, तेव्हां ह्या त्याच्या नीचपणामुळें मुलगा व बाप (किंवा बापाच्या साहाय्यानें मुलगा) शिवाजीला पळून जाण्याची संधि देण्यास तयार झाले. बादशहाच्या कानावर ही गोष्ट आल्यावर रामसिंगाला (सहा हजारांचा मनसबदार) कामावरून दूर करून व त्याच्या बापाला पुष्कळ सैन्य देऊन शिवाजीला परत घेऊन येण्याकरितां पाठविलें. इतक्यांत इराणच्या शहानें बादशहाच्या मुलुखांत स्वारी केल्यामुळें बादशहानें जयसिंगास परत बोलावलें (नोव्हेंबर १६६६, प. सा. सं. खंड १, पृ. ३१९).

अजब कौशल्य

रामसिंग हा आग्र्याचा फौजदार व शिवाजीवर पहारा करण्यास ठेवलेला पोलादखान हा त्याच्या हाताखालचा कोतवाल आणि रामसिंगावर औरंगजेबानें टाकलेली शिवाजीची जबाबदारी, हें लक्षांत घेतलें

असतां, शिवाजीच्या पलायनांत रामसिंगाचें अंग असलें पाहिजे, असा संशय औरंगजेबास आला असल्यास व त्याला त्यासाठीं त्यानें कामावरून काढून टाकला असल्यास त्याविषयीं आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. पण या विधानास इतरत्र दुजोरा मिळत नाहीं, त्यावरून तें खरें नसावें. सभासदानें आपल्या बखरींत या बाबतींत एक ब्रहि काढला नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. मात्र हिरोजीनें, महाराज पळून गेल्यावर 'रामसिंगाचे गोटांत जाऊन त्यास एकांतीं वर्तमान सांगोन आपण तेथून निघोन देशाचा मार्ग धरिला, असें एक सूचक वाक्य सभासदानें लिहिलें आहे (शिवछत्रपतींचें चरित्र, पृ. ५३). त्यावरून शिवाजीच्या सुटकेच्या कामीं रामसिंगाची त्यास बाहेरून बरीच मदत झाली असेल, असें वाटल्याशिवाय राहत नाहीं. तथापि तें कांहींहि असलें तरी, शिवाजीची आग्र्याहून सुटका हा एखाद्या कल्पित कथेंत वा नाटकांत शोभण्यासारखाच रोमहर्षणीय प्रसंग आहे, यांत शंका नाहीं. त्यांत महाराजांनीं जी अक्कल लढविली व दूरदृष्टि दर्शविली ती असाधारण होय. एखादा कुशल व प्रतिभासंपन्न नाटककार आपल्या कृतींत क्रमाक्रमानें रंग भरीत अखेर त्यावर कळस चढवून सर्वांकडून वाहवा मिळवून घेतो, त्याप्रमाणें महाराजांनीं हें गुप्त कारस्थान बेमालूम रीतीनें व अजब कौशल्यानें सिद्धीस नेलें, याबद्दल जग अजूनहि त्यांचे मुक्तकंठानें पोवाडे गात आहे. या कारस्थानांत रतिमात्र चूक होऊन तें उघडकीस आलें असतें, तर महाराजांचें एक नखहि जगाच्या दृष्टीस पडलें नसतें. त्याशिवाय विशेष हा कीं, महाराजांच्या लवाजम्यांतील क्षुल्लक हुजऱ्याहि औरंगजेबाच्या हातास न लागतां, दोघांशिवाय बाकीचे सर्व लोक शिरसलामत आग्र्याहून निसटले.

दिल्ली कीं आग्रा

शिवाजी अटकेंत दिल्लीस होता कीं आग्र्यास होता, या प्रश्नाचा निर्णय अलीकडे अनेक ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारें 'तो आग्र्यास होता' असा लागला आहे हें खरें. पण कांहीं वर्षांपूर्वी तो दिल्लीस अटकेंत होता हा सर्वमान्य समज होता. सभासदानें आपल्या शिवछत्रपतीच्या चरित्रांत तो दिल्लीस असल्याचेंच लिहिलें आहे. सभासद हा शिवकालीन असल्यामुळें त्याचें हें विधान साहजिकच विश्वसनीय मानलें गेलें. पण

शिवाजीच्या अटकेनंतर जयसिंगानें रामसिंगास एक पत्र लिहिलें त्यांत आग्र्याचाच उल्लेख आहे. 'तुला आग्र्याचा फौजदार नेमून पुनः शिवाजीला तुझ्याच ताब्यांत ठेवण्याचा बादशहाचा विचार आहे, असें तूं लिहितोस ... जर बादशहा स्वारीवर निघत असतील तर शिवाजीला आग्र्यालाच ठेवणें सोयीचें पडेल' अशीं त्या पत्रांत वाक्यें आहेत (प. सा. सं. खंड १, पृ. ३१४–३१५). जयसिंगानें दुसरें एक पत्र भोजराज कछवा यास पाठविलें. त्यांत तो लिहितो, "शिवाजी आग्र्यास आहे त्या बाबतींत (कुमार रामसिंगाला असें कळवा कीं,) बादशाही सत्तेला कोणत्याहि प्रकारचा अपाय न होतां माझ्या व तुझ्या शब्दाची किंमत राहील असें वर्तन ठेवावें" (प. सा. सं. खंड १, पृ. ३१५). दिल्ली व आग्रा या दोन राजधान्यांपैकीं शिवाजीस बादशहानें आग्र्यासच बोलावण्याचें कारण असें कीं, तेथें १२ मे १६६६ रोजीं बादशहाचा ५० वा वाढदिवस दिवाण-ई-आममध्यें विशेष थाटामाटानें साजरा व्हावयाचा असून त्याची सुवर्णतुलाहि करण्यांत यावयाची होती, हें मागें दिलेंच आहे.

महाराज दिल्लीहून काशीकडे गेले असते तर वाटेंत त्यांस मथुरा लागावी हें ठीक आहे; परंतु मथुरा आग्र्याच्या पश्चिमेस असतांना महाराज काशीस म्हणजे पूर्वेस जाते वेळीं त्यांस मथुरा वाटेंत कशी लागावी असा प्रश्न उद्भवतो. पण त्याचें कारण असें कीं, महाराजांस शत्रूचा माग चुकवावयाचा होता, संभाजीसहि गुप्तपणें कोठें तरी ठेवून त्या लहान लेकराचे हाल वांचवावयाचे होते व पुढील प्रवास कोणास संशय येऊं न देतां सडा व सुटसुटीत करावयाचा होता. त्या दृष्टीनें महाराजांनीं आग्र्याहून निघण्यापूर्वीच पुढचा आराखडा बरोबरच्या मंडळींच्या विचारानें तयार केला असला पाहिजे. म्हणून ते आग्र्याहून प्रथम मथुरेस गेले व तेथें संभाजीस ठेवून ते आग्र्याला बगल देऊन आडवाटेनें काशीकडे जावयास निघाले. "मथुरेस गेल्यावर कृष्णाजीपंत, काशीराव व विसाजीपंत हे त्रिवर्गबंधु ब्राह्मण मोरोपंत पेशवे यांचे मेहुणे असून त्यांस निराजीपंत ओळखत होते. त्यांणीं जाऊन त्यांची भेट घेऊन वर्तमान सांगितलें. त्यांणीं धैर्य धरून कबूल केलें. त्याजवर त्यांचे घरीं संभाजी राजे पुत्र ठेविलें कीं, "आपण देशास आपल्या राज्यांत जाऊन पावलों म्हणजे

तुम्हांस पत्र व जासूद पाठवितों. तुम्ही राजपुत्रास घेऊन देशास सर्व बंधु आपल्या कुटुंबानिशीं येणें. तुमचें सर्व प्रकारें चालवूं. ऊर्जित करून बक्षिस देऊं" असें सांगोन राजपुत्रास ठेविलें आणि त्यांचा एक बंधु कृष्णाजी-पंत समागमें येऊन वाराणशीस गेले" (सभासद).

वरील मजकूर वाचतांना मोरोपंत पिंगळ्यांचे मेहुणे हे तिघे बंधु मथुरेस इतक्या दूर अंतरावर स्थायिक होऊन राहिले होते, हें विधान असंभाव्य वाटतें. पण तें इतर पुराव्यानेंहि सिद्ध झालें आहे. शक १५९३ (इ. १६७१–७२) मध्यें शिवाजीराजे यांनीं वरील गृहस्थांना बक्षीसपत्र करून दिलें तें असें –

"साहेब अगराहून निघाले. याउपरीं चिरं. रा. संभाजी राजे यांस राजश्री कृष्णाजी विश्वासराऊ यांचे सांभाळीं केलें. मशार निल्हे चिरंजीवास सुखरूप किल्ले राजगडास घेऊन आले. मशारनिल्हेची मातुःश्री आईजी वंदिली. काशी त्रिमळ हेहि बरोबर आलियाबद्दल मेहेरबानीनें बक्षिस द्यावयाचा तह मो पन्नास हजार रुपये रास मा काशी त्रिमळ पंचवीस हजार व मातुःश्री आईजी पंचवीस हजार येणेंप्रमाणें पावावें" (प. सा. सं. खंड २ रा, पृ. ४१३). यावरून सभासदानें दिलेली माहिती विश्वसनीय असून त्या त्रिवर्गापैकीं कृष्णाजीपंत व काशीराव यांचीं नांवें वरील पत्रांत आहेत. त्याशिवाय कृष्णाजीपंतांची आई आहे व तिला 'आई जी' म्हटलें आहे त्या अर्थीं हें कुटुंब मथुरेस वा उत्तरेंत आधींपासून बरींच वर्षं स्थायिक झालेलें दिसतें.

श्रीविश्वेश्वर-दर्शन

सभासद आणखी पुढें सांगतो, "त्यांचा एक बंधु समागमें घेऊन राजे वाराणशीस गेले, तेथें गुप्तरूपें स्नान करून श्रीविश्वेश्वर-दर्शन करून प्रयागास गेले. तेथून गयेस जाऊन त्यांनीं गयावर्जन केलें. तेथें कर्जहि उदंड घेऊन धर्महि केला. पुढें देशांस आपले राज्यांत यावें असें केलें. नीट वाटें यावें तरी बादशहाच्या फौजा गेल्या, त्या मार्गें जातां नये, म्हणून विचार करून गोंडवणांतून भागानगर, विजापुरावरून राजगडास आले. मार्गीं कित्येक जागा उदंड शोध पडला होता. अपाय होतांच दगाच व्हावा असें

झालें होतें. परंतु श्रीभवानीनें संरक्षून स्वस्तिक्षेम आणिलें. निराजीपंत, दत्ताजीपंत व राघोजी मराठा असे चौघे आले. राजगडास आलियावर थोर धर्म, मोठा महोच्छाव केला. साखरा वांटल्या. तोफांचे आवाज केले. मातुःश्रीनें व कारकुनांनीं व लष्कर, गड, कोट, हशम सर्वांनीं संतोष करून खुशाली केली. ”

महाराजांनीं मोगलांचा माग चुकविण्याकरितां केवढें थोरलें वळण मारलें ! सहज दीड-दोन हजार मैलांचा प्रवास झाला असेल. त्या प्रवासांत त्यांनीं महायात्राहि साधून घेतली व गंगास्नानानें आपला पुण्यवान् देह अधिकच पावन करून घेतला. विश्वेश्वराचें मंदिर त्या वेळीं पापी औरंग्यानें फोडलें नसल्यामुळें त्याचें महाराजांना मूळ स्वरूपांत दर्शन घडलें, हें महद्भाग्य समजलें पाहिजे. महाराज मथुरेपर्यंत घोड्यावरून आले असले तरी त्यांना सत्यस्वरूप झांकून ठेवण्याकरितां मथुरेपासून पुढचा प्रवास गोसाव्याप्रमाणें पायींच करावा लागला असेल व त्यांत त्यांना अनंत हाल सोसावे लागले असतील. ते सर्व लक्षांत आणले म्हणजे वाचकांना कुरुक्षेत्रावरून पळ काढतांना नाना फडणविसांच्या वांट्याला जे हाल आले व ज्यांचें वर्णन त्यांनीं स्वतःच्या लेखणीनें केलें आहे त्याचें स्मरण झाल्याशिवाय राहणार नाहीं.

संभाजी मथुरेस कृष्णाजीपंतादिपाशीं राहिला खरा. पण तो मराठा व कृष्णाजीपंत आदिकरून त्रिवर्ग बंधु ब्राह्मण असें असतां हा भेद लक्षांत येऊं न देतां त्याचा गुप्तपणा तेथें राहिला कसा, अशी शंका येते व तिचें समाधान त्यास आपल्या कुटुंबांत कृष्णाजीपंतांनीं सामील करून घेतलें या उत्तरानें करण्यांत येतें. त्यास आधार अर्थात् सभासदाच्या शिवछत्रपति चरित्राचाच आहे. “ शिवाजीमहाराज हिंडत हिंडत राजगडास सुखरूप पोंचल्यावर त्यांनीं मथुरेस संभाजीस आणण्याकरितां माणसें व पत्रें पाठविलीं. त्याजवरून कृष्णाजीपंत, काशीराऊ व विसाजीपंत या त्रिवर्गांनीं आपले कुटुंबासहित संभाजी राजियास जानवें धोत्रें नेसवून आपला भाचा म्हणवून राजगडास आले आणि राजियास भेटले. मग राजे पुत्रास भेटले. आनंद थोर झाला. मोठा दानधर्म केला. कृष्णाजीपंत त्रिवर्ग बंधूंस ‘विश्वासराव’ हा किताब दिला. लक्ष होन बक्षिस दिले. तिघां बंधूंस दहा हजार

होन तैनात केली. मातबर लोकांत असामी घातली. मोकाशे महाल दिधले. नांवाजिले. " यांतील अतिशयोक्तीचा भाग वगळून तात्पर्य तेवढेंच घ्यावयाचें आहे. वरील त्रिवर्ग बंधु मथुरेहून दक्षिणेंत या वेळीं कायमचेच राहावयास आले हें उघड दिसतें. तरी वरील पत्रामुळें त्रिवर्गबंधु दक्षिणेंत आले कीं कृष्णाजीपंत व काशीराव हे दोघेच बंधु आले अशी शंका उरतेच.

प्रकरण बारावें

कुडाळचे सावंत व शिवाजी

धटासि आणावा धट। उद्धटासि पाहिजे उद्धट॥
खटनटासि खटनट। अगत्य करी॥ — रामदास

इ. स. १६५९-६८

शिवाजीचा व्याप फार विस्तीर्ण होता. त्याच्या अनेक मोहिमा एकाच वेळीं सुरू असत. त्यांपैकीं कोंकणांतील कुडाळ प्रांतावरील मोहीम होय. विजापूरकर व मोगल यांजबरोबर वर्षानुवर्षे चालू असलेल्या युद्धापेक्षां किरकोळ स्वरूपाची असली तरी ती सन १६५९ पासून १६६८ पर्यंत नऊ वर्षेंपर्यंत टिकून होती व तिचा शिवाजीच्या कारकीर्दीत शेवट लागला नाहीं तो नाहींच. कुडाळचे सावंत हे फार शूर व चिकाटीचे असून त्यांचा ओढा विजापूरच्या आदिलशाहीकडे होता व तिकडून त्यांस वारंवार प्रोत्साहन व मदत मिळत असे. या कारणानें ते शेवटपर्यंत आदिलशाहीचे मांडलिकच राहिले. ते शिवाजीस शरण आले नाहींत व त्यांजबरोबर शिवाजीचा कायमचा असा तहहि झाला नाहीं. तथापि सन १६६८ नंतर दोघांत युद्धप्रसंगहि घडून आला नाहीं. शिवराज्याभिषेकापूर्वी हें युद्ध थांबलें असल्यामुळें कुडाळ-प्रकरणाची इत्थंभूत हकीकत येथेंच एकत्र देणें औचित्याच्या दृष्टीनें इष्ट होय.

पूर्ववृत्त

कुडाळ प्रांताचा सावंतवाडी हा अलीकडील अवशेष होय. त्यावर सावंतवाडी संस्थान नुकतेंच विलीन होईपर्यंत सावंतांचा अंमल होता. सावंतवाडीला प्रारंभीं सुंदरवाडी म्हणत असत. पण ती सावंतांनीं आपल्या संस्थानाची राजधानी केल्यावर तिला सावंतवाडी असें म्हणण्यांत येऊं लागलें. सावंतवाडीचे अर्वाचीन काळांत सावंत हे अधिपति असले तरी सावंतांपूर्वी कुडाळ प्रांतावर, किंबहुना परगण्यावर कुडाळ देशस्थ प्रभु यांची सत्ता होती. ते त्या परगण्याचे देसाई म्हणजे देशमुख असून त्यांचें कुडाळ

हें निवासस्थान होतें. त्यांत किल्ला व तट बांधून त्याचा त्यांनीं चांगला बंदोबस्त केला होता. विजापुरांत आदिलशाही राज्य स्थापन झाल्यावर प्रभु देसाई हे त्याचे अंकित बनून त्यास परगण्याचा वसूल ठरलेल्या प्रमाणांत देऊं लागले. परगण्याच्या कारभाराच्या सोयीकरितां तरफा पाडल्या असून प्रत्येक तरफेवर एक नाईक असे व तो प्रभु देसायाकडे आपल्या तरफेचा वसूल पाठवीत असे. सावंत हे माणगांव तरफेचे नाईक होते. त्यांजपैकीं खेम सावंत हा आपल्या तरफेचा वसूल प्रभु देसायाकडे पाठवीनासा झाला. अशी पुंडाई चालवून तो इतका प्रबळ झाला कीं, प्रभु देसायांचें वर्चस्व झुगारून विजापूरकरांच्या संमतीनें स्वतंत्र देसाई म्हणजे देशमुख बनला व त्यास बादशहाकडून इ. स. १६२७ त तशी सनदहि मिळाली.

लखम सावंत

खेम सावंतानें चौदा वर्षें देशकतीचें काम केल्यावर तो १६४० त निवर्तला. तो चांगला प्रबळ झाला असून त्याच्या पदरीं रवळ दळवी, फट सावंत, गांग सावंत, विठ सावंत व अन सावंत हे सरदार होते. खेम सावंतामागून सोम सावंत व फोंड सावंत गादीवर बसले. फोंड सावंत इ. स. १६५१ त निर्वतल्यावर त्याचा भाऊ लखम सावंत हा कारभार पाहूं लागला. पण गादीचा वारस फोंड सावंताचा पुत्र खेम सावंत हा असल्यामुळें लखम सावंताकडे एकंदर कारभारांत सहाजिकच दुय्यम स्थान होतें. पराक्रमाच्या व कर्तृत्वाच्या जोरावर त्यानें लवकरच पुतण्यास निस्तेज पाडून मुख्य सत्ता आपल्याकडेच घेतली.

सावंत आपणांस जरी विजापूरकरांचे अंकित म्हणवीत होते तरी ते त्यांची सत्ता वारंवार धाब्यावर बसवीत असत. विजापूरचा बादशहा महमदशहा असतां त्याचा शहाजहान बादशहाशीं सन १६३६ त तह होऊन तो मोगलांचा मांडलिक झाला होता. त्या तहाप्रमाणें सबंध कोंकणपट्टीवर त्याचें स्वामित्व होतें. तथापि महमदशहाला आपल्या ताब्यांतील संस्थानिक मोगल बादशहास मिळून आपली सत्ता झुगारून देतील अशी भीति वाटत असावी. यास्तव त्यानें खेम सावंतास न दुखवितां आपल्या लगामीं लावून घेण्याकरितां सन १६५६ त लिहिलेलें पत्र महत्त्वाचें आहे. महमदशहा म्हणतो, 'तुम्ही वडिलार्जित चाकरीवर आलां. ठीक केलें. कोणतेहि तऱ्हेनें मोगलां-

बरोबर मैत्री न ठेवावी. बादशाही मुलुखाची आबादानी करून कुमकेकरितां हुजूर फौजेंत येणें. एक हुशार मनुष्य पाठविणें.'

दंडाराजपुरीचा सुभेदार सिद्दी अंबर हाहि, उत्तर कोंकण मोगलांशीं झालेल्या तहानें विजापूरकरांना मिळून, त्यांचा ताबेदार बनल्यामुळें त्यालाहि महमदशहानें तशाच अर्थाचें पत्र लिहिलें होतें. त्यांत म्हटलें आहे, 'खेम सावंत सरदेसाई परगणे कुडाळ व महालानिहाय, हे एकनिष्ट चाकरीचे व तरवारबहाद्दर आहेत. त्यांनीं मोगलांकडे ममता न राखावी म्हणजे आपणांवर कृपा होईल हें त्यास कळवून वकील रवाना करणें. त्यास आज्ञा देऊं तसें काम करणें.'

सन १६५६ त महमदशहा मरून अल्ली आदिलशहा विजापूरच्या गादीवर आला होता. त्यानें बापाचेंच सौजन्य दाखवून खेम सावंतास लिहिलें — 'घाटाचे पायाखालील तमाम परगणे इनाम दिले. जमाबंदी करणें. वाजवी वसूल घेणें. अदिलखान अमलांत हिंदवींत लिहिल्याप्रमाणें मसुरा वगैरे १३ गांवें हक्कासह इनाम दिलीं. घाटावरून फौजा येतील तेव्हां हजर राहणें. रहदारीस हरकत न होईसा बंदोबस्त करणें.'

रुस्तुमजमा व लखम सावंत

तळकोंकणांत सन १६५५ पर्यंत विजापूरकरांचा अंमल चांगलासा बसला नव्हता. कुडाळच्या सरदेसायाप्रमाणेंच पोर्तुगीज, शृंगारपूरचे सुर्वे इत्यादि सत्ताधीश स्वतंत्रपणें वावरत होते. त्या सर्वांना दाबांत ठेवण्यासाठीं विजापूरकरांनीं रणदुल्लाखानाचा पुत्र रुस्तुमजमा यास सरसुभेदार व सेनापति नेमून त्याच्या मदतीस मलिक याकुत यास दिलें. कुडाळाचा खेम सावंत याजबरोबर त्याचा चुलता लखम सावंत हाहि कुडाळाचा कारभार पाहत असून त्यानें विजापूरकरांचें वर्चस्व वर्ष-दोन वर्षेंहि टिकूं दिलें नाहीं. तो १६५८ त स्वतंत्रपणें वावरूं लागलेला दिसतो. रुस्तुमजमाला त्या वर्षाच्या मे महिन्यांत कोंकणांत सैन्यानिशीं पाठविण्यांत विजापूरकरांचा 'सावंतास जिंकणें' हा एक हेतु होता. गोव्याचा गव्हर्नर ता. ५ मे १६५८ रोजीं पोर्तुगॉलच्या बादशहास पुढीलप्रमाणें पत्र लिहितो —

"मोठा सरदार रणदुल्लाखान याचा पुत्र रुस्तुमजमा हा कोंकणचा मुख्य सुभेदार नेमला गेला असून तो कोंकणांत आला आहे. त्याचा इकडे

येण्यांतील उद्देश लखम सावंत यास जिंकणें हा आहे. लखम सावंतानें त्याचे १५०० च्यावर लोक मारले. तरीसुद्धां रुस्तुमानें त्याजकडून रांगणा किल्ला परत घेतला."

सावंतावर पहिली स्वारी

लखम सावंत हा मोठा शूर व कारस्थानी होता. त्याचा पुतण्या खेम सावंतहि तसाच शूर असून चुलत्या-पुतण्यांचें चांगलें सख्य होतें. त्याजपाशीं फौजहि बारा हजारांपर्यंत असूनहि कुडाळांत अद्यापि प्रभु देसाई टिकाव धरून होते. त्यांचा समूळ नाश करून सबंध कुडाळ परगणा काबीज करण्याचा लखम सावंतानें उद्योग चालविला. या वेळीं श्रीशिवाजीमहाराजांनीं कोंकणांत प्रवेश केला होता व उत्तरेकडून त्यांचें आक्रमण झपाट्यानें सुरू होतें. त्यांजबरोबर लढून विजापूरकरांची पुनः मर्जी संपादन करण्यास लखमाला ही संधि अनुकूल वाटली. म्हणून त्यानें बादशहास कळविलें कीं, आपणांकडून जर कांहीं मदत मिळेल तर मी शिवाजीपासून कोंकण प्रांत सोडवून घेईन. बादशहालाहि शिवाजीचा कांटा असा निघाला तर पाहिजेच होता. म्हणून त्यानें खवासखान नामक आपल्या बलाढ्य सरदाराच्या हाताखालीं दहा हजार फौज देऊन त्यास लखम सावंताच्या मदतीस पाठविलें. शिवाजीमहाराजांस ही बातमी कळतांच महाराजांनीं त्याला वाटेंतच गांठून त्याच्याशीं युद्ध केलें. त्या प्रसंगाचें वर्णन महाराजांच्या शब्दांतच दिलेलें बरें. ते लिहितात, "खवासखान पुढें आलेला पाहून त्याजवर चाल केली. ते मारीत लुटीत गर्दी केली. खटा होऊन पळून गेले; ते विजापुरास पावविले. त्यानंतर सावंताचा निशाच करावा म्हणोन त्या प्रांतांत शिरलों. तेहि येऊन पावले. मुलूख तळपट करीत चाललों. ठाणीं किले तमाम घेतले. सावंत दमोन गेले. गोमंतकराचा आश्रय निघोन फोंड्याचा किल्ला भांडूं लागला. त्यास सुरुंग लावून बुरुज उडवून बळानें घेतला. याप्रमाणें एकंदर ते सवस्थान घेतलें. यानंतर फिरंगी याजवर शह देऊन त्याचा प्रांत मारीत चाललों. त्याणीं तह करून तोफा नजराणा पाठविला. सावंत यास तेथें दम न निघे. टोपीकार यास धार न पडे. त्याजवरून पितांबर शेणवी कारभारी वकील पाठविले. 'आपण सावंत भोसले कुळींचे आपले पुत्र आहों' असा शरण आणल्यावर त्यानें तह केला."

सावंताचा तहनामा

" तहनामा खेम सावंत व लखम सावंत सरदेसाई बहादुर प्रांत कुडाळ यांजकडील पितांबर शेणवई कारभारी येऊन ठराव करून दिला.

" प्रांत मजकूरचे महाल वगैरे चालत आहेत. आकार होईल त्याचा ऐवज दरसाल निमे हुजूर पावता करावा. निमा आकार राहील त्यांत ३ हजार लोक पायदळ, हेटकरी ठेवावे. आणि ज्या वेळेस हुजूर चाकरीस बोलाविले जाईल तेव्हां तीन हजार लोकांनिशीं सेवा करावी. खासा जातीनें येण्याचें प्रयोजन पडेल तेव्हां बोलावणें होईल तेव्हां यावें.

" किल्ले फोंडा, प्रांत तालुका, घेऊन हुजूर ठेविला, त्यास हरएक प्रसंगास कुमक राखीत जावी. बिदनूर वगैरे संस्थानच्या खंडण्या घेण्यास स्वारी होईल त्याच्या कुमकेस जात असावें.

" स्वराज्यसाधनाच्या ठायीं वकिलापाशीं मध्यें राहून तुरुक लोकांचें साधान (संधान ?) करावें.

" प्रांतांतील जमाबंदीच्या चौकशीस हुजूरुन लोक राहतील ते ठेवून त्यांच्या नेमणुकीबद्दल हुजूर अमलाप्रमाणें पावते करावे.

" प्रांत मजकूरची देसकत, वतनें व बहादुर किताबत अजरामरामत चालेल; त्यांतील किल्ले कोट व ठाणीं तुमच्या स्वाधीन केलीं आहेत. तेथें दास्तान करून जतन करावीं. तेथें हुजुरचे कारकून व लोक येतील ते ठेवावे.

" शके १५८० विलंबीनाम संवत्सरे फाल्गुन वद्य ७ मीस. एकूण पांच कलमी करार करून तहनामा दिला असे " (५ मार्च १६५९).

शिवाजीमहाराजांना सावंतांची खोड माहीत असल्यामुळें सावंत स्वतंत्र होणार नाहींत अशा धोरणानें त्यांचे हात-पाय कायमचे बांधून टाकण्याची सर्व तजवीज वरील तहनाम्यांत त्यांनीं करून ठेवली होती. परंतु हा तह फार दिवस टिकला नाहीं. कारण सावंतांना स्वराज्याची उच्च महत्त्वाकांक्षा झेपण्यासारखी नव्हती. त्यांना कोणाचे आपण ताबेदार नसावें एवढेंच कळत होतें. पण शिवाजीनें त्यांना अटी घातल्या त्या इतक्या जाचक व त्यास नोकर बनविणाऱ्या होत्या कीं, त्यापेक्षां विजापूरकरांचें वर्चस्व बरें, असें त्यास वाटूं लागणें हें स्वाभाविक होय. त्यानें आपल्या

जहागिरीच्या उत्पन्नाचा निम्मा भाग शिवाजीला द्यावयाचा म्हणजे निम्म्या राज्यावर पाणी सोडावयाचें. त्याशिवाय फोंडा किल्ला शिवाजीस देऊन त्याचे अंमलदार आपल्यावर लादून घ्यावयाचे. इतकीं सगळीं बंधनें सावंतांना कसची सहन होणार! तथापि तहाप्रमाणें महाराजांनीं कुडाळ प्रांतांत घेतलेले किल्ले व ठाणीं प्रथम लखम सावंताच्या स्वाधीन केलीं. त्याचे सरदार राम दळवी व तान सावंत यांस प्रत्येकीं एक सहस्र स्वारांची मनसबदारी दिली व आपले तीन सरदार कुडाळ प्रांतांत ठिकठिकाणीं ठेवले. पण त्यानंतर लखम सावंत पुनः विजापूरकरांस जाऊन मिळाला. त्यानें शिवाजीचीं सर्व ठाणीं उठवून त्या जागीं आपलीं बसविलीं.

सावंतावर दुसरी स्वारी

शिवाजीला कुडाळचे सावंत, शृंगारपूरचे सुर्वे व पालवणींचे दळवी हीं खेंकटीं एकदां संपवून टाकायचींच होतीं. त्यांपैकीं कुडाळचें खेंकटें शिवाजीनें १६६० च्या फेब्रुवारींत राजापुरावर स्वारी केली त्या वेळीं संपवून टाकण्याचें योजिलें. एप्रिल १६६० त शिवाजीच्या सैन्यानें तळकोंकणांत शिरून दाभोळ ते कुडाळपर्यंत मजल मारली. तेव्हा लखम सावंतानें बांदा व वेंगुर्लें या भागाचें संरक्षण करण्याचा निश्चय केला. कुडाळच्या नैर्ऋत्येस वेंगुर्लें बंदर सुमारें १२ मैल आहे व वेंगुर्ल्यापासून आग्नेयीस बांदा १८ मैल आहे. बांद्याच्या व वेंगुर्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी आपण विजापूरकरांचा अंकित असें समजून त्यानें पत्करली हें उघड आहे. या कार्यासाठीं त्यानें कुडाळ प्रांतांतील देसाईहि जमविले. लखम सावंतापाशीं फेब्रुवारीच्या प्रारंभीं चार हजार सैन्य जमा झालें, तें घेऊन सावंत हा वाडीहून कुडाळास आला. वाडीहून कुडाळ वायव्येस १३ मैल व बांदा दक्षिणेस ९ मैल आहे. पण शिवाजीचे सैनिक कुडाळवर येतांच लखम सावंतास त्याच्या सोबत्यांनीं सोडलें; तेव्हां तो कुडाळाहून मागें हटून वाडीस गेला आणि शिवाजीच्या सैनिकांनीं कुडाळचा किल्ला ताब्यांत घेतला. तो एका उंचवट्यावर आहे. त्यानंतर लखम सावंतानें पुनः देसायांना जमवून ता. १७।१८ मार्च रोजीं कुडाळावर रात्रीचा हल्ला केला. पण शिवाजीच्या सैनिकांनीं त्यास दाद दिली नाहीं. मात्र शिवाजीच्या सैनिकांजवळचें स्फोटक द्रव्य रात्रीच्या लढाईत संपल्यामुळें ते दुसऱ्या दिवशीं सकाळीं शत्रूची फळी फोडून निघून गेले.

लखम सावंतास असा विजय मिळालेला पाहून आचरें येथील देसायांनींहि शिवाजीशीं शत्रुत्व जाहीर करून तिकडील बंदरांतून शिवाजीच्या लोकांना घालवून दिलें. (आचरें हें वेंगुर्ल्याच्या उत्तरेस ३० मैल आहे.) ही बातमी ऐकतांच विजापूरकरांचा तळकोंकणावरील सर सुभेदार रुस्तुमजमा तेथें येऊन पोंचला. त्यानें लखम सावंतापासून कुडाळ व फोंडा हे दोन्ही किल्ले ताब्यांत घेऊन खाशा मीर यास सुभेदार नेमलें व लखम सावंताशीं लढण्याचें काम त्यानें त्याजवर सोंपविलें. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती ही कीं, लखम सावंत यानें शिवाजीप्रमाणेंच विजापूरकरांचेंहि वर्चस्व आतां झुगारून दिलें असल्यामुळेंच रुस्तुमजमा त्याजबरोबर लढण्यास सिद्ध झाला. मात्र फायदा दृष्टीस पडल्यास तो उपटण्याकरितां विजापूरकरांचा अंकित म्हणविण्याचीहि सावंताची तयारी होतीच. त्यानें शिवाजीपासून आपल्या मुलुखाचें संरक्षण करण्याकरितां म्हणून दोन हजार होन व चारशें पौंड स्फोटक द्रव्य यांची डचांकडे मागणी केली. पण त्याला त्यांनीं फक्त सहाशें पौंड स्फोटक द्रव्य दिलें.

शिवाजीचें चातुर्य

विजापूरचा बादशहा महमदशहा सन १६५६ त मरण पावला. त्याच्या पश्चात् त्याचा पुत्र अल्लीशहा गादीवर बसला. तो अल्पवयी असल्यामुळें राज्यकारभार त्याची आई बडी साहेबीण पाहत होती. तिनें आपल्या अविचारी कृत्यांनीं राज्यांत पुष्कळच घोटाळे उत्पन्न केले. तिच्या मर्जीविरुद्ध वागणारे पण अनुभविक असे सरदार तिनें जीवें मारण्यास कमी केलें नाहीं. तिनें सन १६५७ च्या नोव्हेंबरांत खान महम्मद याचा वध केला. तिच्या या कृत्यांनीं राज्यांत साहजिकच अंदाधुंदी माजून कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहिला नाहीं. याच दुरवस्थेचे पडसाद कुडाळच्या बाजूलाहि उठल्यावांचून राहिले नाहींत. तेव्हां त्यांचा फायदा शिवाजीनें घेण्याचें योजिलें. रुस्तुमजमा विजापूरकरांचाच सरदार व सेनापति, लखम सावंतहि आपणांस विजापूरकरांचाच म्हणविणारा. पण तेच मुळीं कुडाळ प्रांतांत परस्परांशीं लढत होते. त्यांची ही लढत पाहून शिवाजीहि आपणांस विजापूरकरांचाच मुखत्यार म्हणवूं लागला. त्यानें कुडाळ प्रांताचा ताबा विजापूरकरांनीं आपणांसच दिला आहे, अशी हूल उठविली व वेंगुर्ले

घेण्याच्या इराद्यानें १६६३ च्या मे महिन्यांत वेंगुर्ल्याच्या डच रेसिडेंटकडे खडा टाकून पाहिला. आपण वेंगुर्लें घ्यावें किंवा काय याविषयीं डच रेसिडेंट कमांडर व्हर्स प्रिट यास त्यानें सल्ला विचारला. अर्थात् डचांनीं आपण 'बेपारी' असल्यामुळें या बाबतींत सल्ला देऊं शकत नाहीं, असें धूर्तपणाचें उत्तर दिलें.

लखम सावंताचें पलायन

विजापूरच्या सुलतानानें कुडाळचा ताबा आपणांस दिला असल्याचें प्रसिद्ध करण्यांत कुडाळच्या बाबतींत लोकमत अनुकूल करून घेण्याचा व विरोध कमी करण्याचाच त्याचा हेतु होता. सावंतांवर दाब ठेवून कुडाळ प्रांतांत शांतता प्रस्थापित करण्याकरितां शिवाजीनें रावजी सोमनाथ पंडित यास सुभेदार नेमलें होतें; परंतु परिस्थिति त्याच्या आवांक्याबाहेर गेल्याचें पाहून शिवाजी मे १६६३ मध्यें कुडाळ प्रांतीं आला. त्याजपाशीं चार सहस्र घोडदळ व दहा सहस्र पायदळ होतें. त्याला तोंड देण्यास लखम सावंत, केशव नाईक, राम दळवी व चंदा राणा हे एक झाले. पण शिवाजीनें त्यांचा मोड करून त्यांस पळवून लावलें. तेव्हां लखम सावंत वाडींतून बाहेर पडून सह्याद्रीच्या पायथ्याशीं जंगलांत जाऊन राहिला.

शिवाजीमहाराज वरील प्रसंगानंतर पुढील वर्षांत फार महत्त्वाच्या राजकारणांत गुंतले होते. सुरतेची लूट, मोगल सरदार जसवंतसिंग याजबरोबर सामना, इकडे त्यांचें शक्तिसर्वस्व खर्च होत असल्यामुळें, त्यांना कुडाळसारख्या प्रकरणांत लक्ष घालण्यास फुरसतच सांपडली नाहीं. या संधीचा फायदा घेऊन लखम सावंतानें कुडाळांत पुनः उचल खाल्ली. त्यानें शिवाजीनें घेतलेला कांहीं मुलूख पुनः काबीज केला व त्याबद्दल विजापूरकरांचा सरदार अजीजखान सरनोबत यानें अल्ली आदिलशहाकडे शिफारस केली. त्यावरून अल्लीनें मालवण बंदर सर्व हक्कांसुद्धां वंशपरंपरेनें १९ जुलै १६६४ त लखम सावंतास इनाम दिलें! तेवढ्यावर तृप्त न होतां लखम सावंतानें आपला कारभारी पितांबर शेणवी यास विजापुरास बादशहाच्या भेटीस पाठविलें. त्याच्या विनंतीवरून बादशहानें त्यास आणखी बक्षीस लवकरच दिलें. त्याविषयीं आदिलशहानें ता. २९ जुलै

१६६४ रोजीं अमलदार व देसाई परगणे कुडाळ यांस पुढीलप्रमाणें फर्मान पाठविलें –

" पितांबर शेणवी निसबत लखम सावंत सरदेशमुख परगणे मजकूर अर्जी केली कीं, ' सरदेसाई हे बरोबर चांगली फौज घेऊन अजीजखान सरनोबत सुभे तळ कोंकण यांजबरोबर हुजूरच्या चाकरींत असून त्यांनीं मुलखांत लावणी व आबादानी केली. याजकरितां परगणे मजकूरची नाडगौडगी दहा गांवांची कृपा करून बक्षीस द्यावी.' ती दिली आहे " (प. सा. सं. खंड १, पृ. २६३).

शिवाजीचा पराभव

सावंतानें शिवाजीच्या मुलखास असा उपद्रव दिल्यावर शिवाजीनें कांहीं फौज कुडाळचा सुभेदार रावजी पंडित याच्या मदतीस पाठविली. तेव्हां सन १६६४ च्या मे महिन्यांत अजीजखान घाट उतरून कोंकणांत आला व रावजी पंडितावर चालून गेला. रावजी पंडिताचा त्याजपुढें निभाव लागण्यासारखा नसल्यामुळें रावजी कुडाळ प्रांत सोडून राजापुरास स्वसंरक्षणार्थ जाऊन राहिला. तेव्हां देसाई लखम सावंत व अजीजखान यांची भेट होऊन तींत कुडाळ किल्ल्यावर स्वारी करण्याचें ठरून, तें काम एकट्या सावंतानें करावें व जरूर पडल्यास अजीजखानानें त्याच्या मदतीस जावें, असें योजण्यांत आलें. या वेळीं लखम सावंत इतक्या शौर्यानें लढला कीं, कुडाळांत अडकलेले शिवाजीचे सैनिक त्यास शरण आले. तेव्हां अजीजखानानें आपलीं हत्यारें व नेतां येतील तेवढ्या वस्तु बरोबर घेऊन लोकांनीं बाहेर पडावें व लखम सावंत व शिवाजी यांचें हाडवैर असल्यामुळें, त्या लोकांचें लुटीपासून रक्षण करण्यासाठीं, अजीजखानानें त्याजबरोबर दोनशें घोडेस्वार देऊन त्यांस खारेपाटणच्या सरहद्दीवर सुरक्षित नेऊन पोंचवावें असें ठरलें व त्याप्रमाणें त्यांची रवानगी करण्यांत आली. कुडाळास वेढा घातला असतां लखम सावंतानें डचांपाशीं स्फोटक द्रव्य मागितलें होतें; परंतु तें त्यांनीं त्यास देण्याचें नाकारलें. अजीजखान वरीलप्रमाणें मराठ्यांवर जय मिळविल्यानंतर वेंगुर्ल्यास गेला व तेथें १० जून १६६४ रोजीं मरण पावला. त्याच्या जागीं बादशहानें रुस्तुमजमाची नेमणूक केली.

लखम सावंतास शाबासकी

अजीजखान वेंगुर्ल्यास असतां तेथें भिकाजी पंडित हा विजापूरकरांचा सुभेदार होता. तो तळकोंकणांतील एकंदर वृत्तान्त बादशहास निवेदन करण्याकरितां १ ऑगस्ट १६६४ रोजीं विजापुरास निघून गेला. त्यानें दरबारचा विचार घेऊन परत आल्यावर हुकेरीस जाऊन रुस्तुमजमाची भेट घेतली व तेथें दोघांनीं विचारविनिमय करून शिवाजीशीं कोणत्या धोरणानें लढावयाचें याचा आराखडा तयार केला. त्याप्रमाणें कुडाळचा किल्ला, तेथें नेमलेला किल्लेदार व सेनापति फत्तेखान यांजपासून घेण्याकरितां रुस्तुमजमा व त्याचा पुत्र हे कुडाळास आले. पण फत्तेखान किल्ला व सेनापतित्व रुस्तुमजमास देईना. या वेळीं विजापूर-दरबारांत इतकी अंदाधुंदी माजली होती कीं, एका हुकुमाचा मेळ दुसऱ्या हुकुमाशीं नसे. एक हुकूम आला कीं, त्याच्या अगदीं उलट दुसरा हुकूम निघावा. अशा स्थितींत फत्तेखानानें सैन्य व कुडाळचा किल्ला यांचें आधिपत्य आपणांकडे राहावें, यासाठीं विजापूर-दरबारापाशीं संधान बांधलें. तें यशस्वी होऊन रुस्तुमजमाला तेथून निघून जावें लागलें.

त्यानंतर कुडाळ प्रांतांतील शिवसेनेस आरमारी मदत येऊन तिनें नोव्हेंबर १६६४ त समुद्रकिनाऱ्यानें डचांचीं जहाजें लुटण्यास सुरुवात केली. शिवाजीच्या दर्यासारंगानें येमेनला निघालेल्या एका लहानशा जहाजाचा पाठलाग चालविला; पण त्या जहाजावरील लोकांनीं केलेल्या गोळीबारानें शिवाजीचे कांहीं सैनिक मेले व जखमी झाले. त्याबरोबर शिवनौकांनीं त्या जहाजाचा पिच्छा सोडला. आणखी असेंच एक लहानसें इंग्रजांचें जहाज सुरतेहून निघालें होतें. तें शिवनाविकांनीं पकडून त्याजवरचा माल काढून घेतला. डच कंपनीचे काशीबा व संतूबा शेणवी असे दोन व्यापारी आपलें मालानें भरलेलें लहान जहाज घेऊन चालले होते. त्यांजवर शिवनाविकांनीं ७ डिसेंबर १६६४ रोजीं सकाळीं अचानक हल्ला करून तेंहि पकडलें.

वरील बातम्या विजापुरास कळल्यावर शिवसेनेचें पारिपत्य करण्याकरितां खवासखान विजापुराहून निघून तळकोंकणांत उतरला. त्याला कुडाळ प्रांतांत लखम सावंत व खेम सावंत हे येऊन मिळाले. खवास-

खान कोंकणांत आल्यावर त्याच्या सैन्यास रसद पोंचविण्याकरितां आठ लाख होन घेऊन बाजी घोरपडे विजापुराहून कूच करीत चालला. तो कोंकणांत उतरण्यापूर्वीच शिवाजीनें मुधोळच्या आसपास त्यास एकाएकीं गांठून जखमी केलें; त्या जखमा इतक्या भयंकर होत्या कीं, त्यांनीं बाजी थोड्याच अवधींत गतप्राण होऊन पडला, त्याचे दोनशें लोक ठार झाले व त्याजजवळचा सर्व पैका शिवाजीनें लांबविला. त्यानंतर शिवाजीनें कुडाळ प्रांतांत शिरून खवासखानाशीं गांठ घातली व त्याच्याशीं लढून त्यास विजापुराकडे पळवून लावलें. उरले सावंत. त्यांचींहि ठाणीं व किल्ले त्यानें घेतले. सावंत गोमंतकरांच्या आश्रयास गेले. तेव्हां शिवाजीनें गोमंतकांत शिरून फोंडा किल्ल्यास वेढा दिला व त्याचा बुरूज सुरुंग लावून उडविला. पोर्तुगीज या दणक्यानें शरण आले. त्यांनीं तह करून नजराणा पाठविला. या तहानें सावंताचा आश्रय नाहींसा झाल्यावर त्यांनीं आपला कारभारी पितांबर शेणवी यास शिवाजीकडे वकील म्हणून पाठविलें. सावंत म्हणाले, "आपण भोसले कुळींचे आपले पुत्र आहों. सर्फराज करून देसगतीच्या वतनाची सेवा घेऊन प्रांताचा ठराव, निम्मे ऐवज फौजेनिशी चाकरी करतों. त्यास निम्मे ऐवज द्यावा व आपणांकडे (शिवाजी) निम्मे ऐवज घ्यावा असा तह झाला."

अशा रीतीनें शिवाजीनें तीन महत्कृत्यें केलीं : (१) बाजी घोरपड्यावर शहाजीकरितां सूड उगविला, (२) खवासखानास पळवून लावलें, (३) आणि सावंतांचा फडशा पाडला. पण सावंत शेवटीं मूळ वळणावर गेले. ते शिवाजीची पाठ फिरतांक्षणींच आदिलशहाचे अंकित बनले. त्यांनीं आदिलशहाची मर्जी संपादण्याकरितां पितांबर शेणव्यास विजापुरास पाठविलें. कारण लखम सावंतानें आपल्यातर्फे पितांबर शेणव्यानें विजापुरास जाऊन बादशहाचा मुख्य कारभारी दयानतराव मजलसी याच्यामार्फत बादशहाची भेट घेतली, त्या वेळीं बादशहानें लखम सावंतासाठीं बहुमान-वस्त्रें पाठविलीं, त्यासंबंधीं दिलेल्या फर्मानांत बादशहानें म्हटलें होतें, 'हीं वस्त्रें अंगावर घेऊन संतोषित होणें आणि सर्व कामाविषयीं हुजूर खातरजमा ठेवून कोणत्याच गोष्टीचा संशय न करणें. याउपर बादशहा मेहरबान जलदी होऊन वतन मिरास तुम्ही पावाल.'

सन १६६५ च्या मार्च महिन्यांत जयसिंग शिवाजीवर चालून आला. तेव्हांपासून पुढें आठ महिने त्याला कुडाळच्या सावंताकडे लक्ष देण्यास फुरसतच मिळाली नाहीं. त्या काळांतच लखम सावंतानें शिवाजीपासून आपल्या गेलेल्या मुलुखापैकीं कांहीं मुलूख परत मिळविला. शिवाजीनें जयसिंगामार्फत औरंगजेबाबरोबर सप्टेंबर १६६५ मध्यें तह केला व जयसिंगाबरोबर विजापूरच्या स्वारीवर जाण्याचें कबूल केलें. जयसिंगाचा जोडीदार दिलीरखान याची भेट घेऊन 'दहा दिवसांत विजापूर शहर जिंकून दाखवितों ' असेंहि त्यानें त्यास आश्वासन दिलें. तो त्या कामगिरीवर म्हणून वीस सहस्र स्वारांनिशीं जयसिंगाबरोबर निघाला व सातारा प्रांतांत शिरल्यावर जयसिंगाच्या परवानगीनें त्याला सोडून विजापूरकरांपासून पन्हाळा किल्ला जिंकून तुम्हांस देतों असें सांगून विजापुरावर न जातां पन्हाळ्याकडे गेला. पण तो गड घेण्याचें न साधल्यावर त्यानें खेळण्याकडे कूच करून तेथून दोन सहस्र सैनिक, गोवेकरांचें मर्मस्थान जो कुडाळच्या दक्षिणेकडील फोंडा किल्ला तो घेण्याकरितां पाठवून दिले.

शिवाजी पन्हाळा व खेळणा या दिशेनें गेल्याचें समजतांच विजापूरच्या बादशहानें त्याच्या पाठीवर सिद्दी जोहाराचा जावई सिद्दी मसाऊद, सिद्दी जोहाराचा पुत्र व रुस्तुमजमा यांस रवाना केलें. त्यांजबरोबर पांच हजार स्वार व एक हजार पायदळ होतें. त्यांनीं शिवसैन्यास गांठून त्याचे ५०० स्वार व १०० शिपाई ठार केले व महंमदखान इखलास यास फोंड्यास वेढा उठविण्यास धाडलें. त्या सैन्यानें आपण रुस्तुमजमाकडून आल्याची बातमी फैलावून दिली. रुस्तुमजमा शिवाजीचा स्नेही असल्यामुळें वेढा घालणारे शिवाजीचे सैनिक गाफिल राहिले.

महमदखान ईदनिमित्त खुदबा पढण्याचें निमित्त करून जवळच्या टेकडीवर मुसलमान सैनिक घेऊन गेला व त्यानें फसवून शिवाजीच्या सैन्यावर अचानक हल्ला केला. किल्ल्यांत सांपडलेल्या लोकांवर तीन दिवस अन्नाभावीं पाला खाऊन राहण्याची पाळी आल्यामुळें ते मराठ्यांना शरण आल्यासारखेच होते. इतक्यांत महमदखान सैन्यानिशीं त्यांच्या मदतीस वरीलप्रमाणें येतांच सारा रंग बदलून मराठ्यांना वेढा उठवून जावें लागलें. फोंडा घेतल्यावर स्वतः रुस्तुमजमानें कुडाळावर स्वारी करून शिवाजी-

पासून फोंडा (गांव), कुडाळ, बांदा, डिचोली व साखळी हीं पांच ठाणीं घेतलीं. अर्थात् हें सर्व, रुस्तुमजमा शिवाजीस सामील असल्याचा बादशहास संशय आल्यावरून, त्यानें त्यास ‘फोंड्याचा वेढा उठीव नाहींतर तुला कामावरून कमी करीन’ असा सक्त हुकूम पाठविल्यामुळेंच त्यानें केलें. तथापि अंतःस्थ रीतीनें शिवाजीस साहाय्य करण्याचा क्रम रुस्तुमजमानें सोडला नाहीं. त्याच्याच कारवाईमुळें शिवाजीला याच सुमारास रांगणा किल्ला हस्तगत करतां आला. फोंडा किल्ला गेल्यामुळें शिवाजीचें जें नुकसान झालें तें अंशतः भरून काढण्याचा हा प्रयत्न असावा.

तिसरी स्वारी

शिवाजीनें जानेवारी सन १६६६ त कुडाळच्या हद्दीवरचा रांगणा घेतल्यावर तो परत मिळविण्याकरितां विजापूरकरांनीं मे १६६७ मध्यें बहलोलखान व शिवाजीमहाराजांचे सापत्न बंधु व्यंकोजी राजे यांस रवाना केलें. महाराजांवर हा एक नाजूक प्रसंगच होता. तरी त्यांनीं दोघांचा मोड करून त्यांस उधळून लावलें. यानंतर सप्टेंबर १६६७ त महाराजांनीं कुडाळावर स्वारी केली. रांगण्याच्या लढाईत विजापूरकरांच्या मदतीस लखम सावंतहि होता. तेंहि एक निमित्त या स्वारीस होतेंच. शिवाजीचें सैन्य ८ नोव्हेंबर १६६७ त रांगणा किल्ल्याच्या शेजारीं व पाटगांवापाशीं उतरलें. त्याजबरोबर पांच सहस्र पायदळ व एक सहस्र घोडदळ होतें. त्यांनीं तेथें १७ नोव्हेंबरपर्यंत मुक्काम केला व तीन दिवस पुरण्याइतक्या पोळ्या भाजून घेऊन ते पुढे चालते झाले. जातांना वाटेंत लखम सावंताच्या लोकांना बिलकुल त्रास न देतां शिवाजी पोर्तुगीज हद्दींतील बारदेशांत एकाएकीं शिरला. तो दिवस रविवारचा असल्यामुळें ख्रिस्ती लोक प्रार्थना मंदिरांत प्रार्थनेस गेले होते. त्यानें तीन खेडीं लुटून सर्व बारदेश तीन दिवसांत पायाखालीं घातला. शिवाजीचा उद्देश लूट मिळविणें व गोव्याच्या हद्दींत पळून आलेल्या देसायांना (लखम सावंत प्रभृति) पकडून नेणें हा होता. त्याला लूट मिळाली, पण देसाई गोव्याला पळून गेल्यामुळें सांपडले नाहींत. त्यानें कांहीं किरिस्तावांनाहि ठार मारले, त्यांत तीन पाद्री होते.

इतकें कार्य उरकल्यावर शिवाजी बारदेश सोडून डिचोलीस गेला, तेथें जाण्यांत त्याच्या पोर्तुगीजांपाशीं दोन मागण्या होत्या :– (१) देसायांना

त्यांनीं शिवाजीच्या स्वाधीन करावें; (२) व पोर्तुगीजांनीं शिवाजीस दोन लक्ष रुपये खंडणी द्यावी. या दोन अटींपैकीं पहिली अट त्यांनीं कबूल केल्याचें दिसून येतें. कारण १६ फेब्रुवारी १६६८ रोजीं पोर्तुगीज व्हाइसरॉय शिवाजीचा सुभेदार रायाजी गंगादास यास लिहिलेल्या पत्रांत म्हणतो, 'गोव्यांतील देसाई शिवाजीच्या राज्यांत दंगा करतात. तरी देसाई लखम सावंत व केशव यांना मीं माझ्या राज्यांतून निघून जाण्यास आज्ञा केली आहे' (प. सा. सं. खं. १, पृ. ३३४).

स्वराज्यद्रोही सावंत

शिवाजी व सावंत यांचें सन १६६० पासून जें युद्ध सुरू झालें तें १६६८ त संपलें. त्यानंतर महाराजांचें कोंकणांतील सैन्य दंडाराजपुरीच्या सिद्दीशीं लढण्यांत गुंतलें व तो लढा महाराजांच्या मृत्यूपर्यंतहि संपला नाहीं. कोंकणांतील सैन्यास हा उद्योग होता तर देशावरच्या सैन्यामागें देश व मावळ या भागांत मोगलांनीं शिवाजीचा जो मुलूख व किल्ले घेतले होते ते परत मिळविण्याची कामगिरी होती. त्या कामगिरीस शिवाजीचा मोगलांशीं झालेला तह सन १६६९ त मोडला तेव्हांपासून सुरुवात झाली. या योगानें कुडाळचा प्रश्न जो एकदां मागें पडला तो कायमचाच पडला. सन १६७५ त लखम सावंत मेला. तो सन १६५५ नंतर शिवाजीस कधींहि अनुकूल झाला नाहीं. तो विजापूरकरांचा पूर्णपणें अंकित बनून विजापूरचे तळकोंकणांतील सुभेदार व सेनापति त्यास जो हुकूम करतील तो मानणें हेंच त्याजकडे काम उरलें. शिवाजीनें त्याचा उत्तरेकडील मुलूख घेतला व विजापूरकरांची त्याजभोंवतीं कायमची पक्कड बसली. त्यामुळें त्याचें पूर्वीचें महत्त्व व दर्जा न राहून सावंत उपेक्षणीय ठरला. शिवाजीनें त्याचा पिच्छा सोडण्याचें हेंहि एक कारण असावें. त्यानंतर सन १६८६ त विजापूरचें राज्य बुडाल्यावर सावंत प्रायः स्वतंत्र झाला. त्याचा व मराठ्यांचा त्यानंतर १७०८ मध्यें ताराबाईचा मुलगा शिवाजी व मागाहून शाहूमहाराज यांजबरोबर तह होऊन तो मराठी राज्याचा कायमचा मांडलिक व सरदार बनला.

सावंत घराण्यांत लखम सावंत व त्याचा पुतण्या खेम सावंत हे शूर व कर्तृत्ववान् पुरुष होऊन गेले. पण त्यांच्या कारकीर्दींत शिवाजीमहा-

राजांशीं त्यांचा झगडा सुरू झाल्यामुळें त्यांच्या राज्याची पिछेहाट होऊं लागली. त्या दृष्टीनें सावंतांचा खरा भरभराटीचा काळ म्हटला म्हणजे लखम सावंताचा वडील भाऊ फोंड सावंत याजपर्यंतचाच. फोंड सावंत सन १६५१ त मरण पावला, त्या वेळीं त्याच्या ताब्यांत ४०–५० मैल लांब व २०–२५ मैल रुंद इतका प्रदेश होता. त्यांत वाडी, कुडाळ, बांदें, वेंगुर्लें इत्यादि सात कोट आणि सिदगड, महादेवगड, नारायणगड इत्यादि आठ किल्ले होते. त्यांजपाशीं आरमार असून त्यांत गुराब व गलबतें होतीं. वेंगुर्लें बंदरांतून चांचेगिरीचा धंदाहि सावंत करीत. त्यांच्या शेजारच्या पोर्तुगीजां-पासून त्यांजवर आक्रमण होत असे व गोवें प्रांतांत त्यांच्यासमोर धार्मिक जुलूमहि चालू असे. त्यांचे हे प्रकार सहन न होऊन सावंतांनीं गोवेंहद्दींत शिरून ख्रिस्ती देवळांचाहि नाश केला. शिवाजी व सावंत एकाच धर्माचे होते, पण शिवाजीच्या ठिकाणीं स्वातंत्र्यप्रीति हा गुण होता. तो सावंतांत नसल्यामुळें सावंतांकडून स्वराज्यस्थापनेस व स्वराज्यवृद्धीस जी मदत व्हावयास पाहिजे ती न होतां विरोध होऊन उभयतांच्या सामर्थ्याचा व्यय परस्परांशीं झगडण्यांत झाला. उलटपक्षीं शिवाजीच्या स्वराज्यपक्षास सावंत मिळाले असते तर त्यांचें आरमार व सैन्य यांची महाराजांस मदत होऊन पोर्तुगीजांचें गोव्यांतील उच्चाटन शक्य कोटींत आलें असतें; इतकेंच नव्हे तर सिद्दीचाहि हातातोंडाशीं आलेला ग्रास सिद्धीस जाऊन सिद्दी जंजिऱ्यांतून नष्ट झाला असता.

प्रकरण तेरावें

शिवाजी, मोगल व विजापूरकर

तत्कार्मुकैराभरणै रथैश्च तद्वर्मभिश्चाग्निसमानवर्णैः ।
बभूव सैन्यं पिशिताशनानां सूर्योदये नीलमिवाभ्रजालम् ॥

— रामायण

शिवाजी औरंगजेबाच्या भेटीस ता. ५ मार्च १६६६ रोजीं निघाला व ता. १२ मे रोजीं आग्र्यास पोंचला. म्हणजे त्यास दक्षिणेंतून आग्र्यास पोंचण्यास दोन महिन्यांहून अधिक दिवस लागले; आणि त्याच दिवशीं औरंगजेबानें आपल्या ५० व्या वाढदिवसाकरितां भरविलेल्या भपकेबाज दरबारास तो गेला. पण त्या दिवशीं त्यांची दोघांची तशी भेट न होतां फक्त नजरभेट झाली. त्यानंतर आग्र्यास शिवाजीचा मुक्काम होता; त्या मुदतींत ते एकमेकांस कधीं भेटलेच नाहींत; उलट त्याऐवजीं औरंगजेबानें त्यास नजरकैदेंतच ठेवलें. आग्र्यास तीन महिने काढल्यावर शिवाजीनें ता. १९ ऑगस्ट १६६६ रोजीं गुप्तपणें दक्षिणेंत जाण्याकरितां प्रयाण केलें व हिंडत हिंडत तो २० नोव्हेंबर १६६६ रोजीं राजगडावर सुखरूप येऊन पोंचला. या रीतीनें त्याच्या आयुष्याचे बहुमोल ८॥ महिने वायां गेले.

राजगडास महाराज आले तरी त्यांजबरोबर आग्र्यास गेलेले त्यांचे दोन मुत्सद्दी त्रिंबकपंत डबीर व रघुनाथपंत कोरडे हे मागें आग्र्यास औरंगजेबाच्या हातीं लागून अटकेंत पडले होते. महाराज आग्र्याहून पळून गेल्यावर ती बातमी व बादशहाच्या दरबारांतील जयसिंगाच्या शत्रूंनीं बादशहापाशीं त्याजविरुद्ध केलेल्या चुगल्यांची वार्ता जयसिंगास दक्षिणेंत कळल्यावर त्यानें ऑगस्ट १६६५ च्या पत्रांत शिवाजीच्या ज्या ब्राह्मणांचा उल्लेख केला आहे ते हेच ब्राह्मण होत. तो लिहितो, " माझ्या शत्रूंनीं चिथावून दिल्यामुळें शिवाजीच्या पदरच्या ब्राह्मणांनीं शिवाजीच्या सुटकेची सर्व जबाबदारी रामसिंगावर टाकली. रामसिंगाच्या सांगण्यावरून आणि रामसिंगाच्या पहाऱ्यांतील ढिलाईमुळें शिवाजीला जातां आलें, अशी

त्यांनीं समजूत करून दिल्यामुळें रामसिंगाची मनसब व जहागीर काढून घेण्याचें घाटत आहे" (प. सा. सं. खंड १, पृ. ३१६).

एकंदर परिस्थितीचा सारासार विचार करतां शिवाजीच्या ब्राह्मणांना म्हणजे त्रिंबकपंत डबीर व रघुनाथपंत कोरडे यांना रामसिंगाचें नांव बादशहास सांगण्यापासून कांहींच लाभ नव्हता. उलट रामसिंगाशीं तो कृतघ्नपणाच होता व अशा कृत्यानें ते व शिवाजी रामसिंगाच्या व जयसिंगाच्या रोषास व तिरस्कारास पात्र होणार होते. या दृष्टीनें वरील मुत्सद्द्यांवर औरंगजेबाच्या लोकांनीं जयसिंगाविरुद्ध हें मुद्दाम कुभांड रचलें असलें पाहिजे. बाकीं औरंगजेबानें त्या दोघांची आपणांकडून कसून छाननी केली असेल हें उघड आहे. परंतु त्यापासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं; तेव्हां बादशहानें महाराज राजगडास पोंचल्यावर चार महिन्यांनीं त्यांची सुटका केली व जयसिंगासहि कांहीं शिक्षा केली नाहीं.

महाराज राजगडास आले तेव्हां राज्य असें कांहींच राहिलें नव्हतें. ती एक लहानशी जहागीर होती. जयसिंग दक्षिणेंतच असून शिवाजीनें सोडलेल्या मुलखावर त्यानें आपले अधिकारी नेमले होते. "त्यानें बाबाजी भोसल्यास सुपें येथें, हलालखानास इंदापूरच्या बाजूला, घलीवखानास चांभारगोंद्याकडे आणि हसनखान, अब्दुल रसूल व आणखी कांहीं दक्षिणी यांना इतरत्र ठेवलें होतें. बाबाजी भोसले यानें सुपें परगण्याचा सर्वांच्या आधीं ताबा घेतला. बजाजी निंबाळकराचा पुत्र महादजी निंबाळकर हा शिवाजीचा जावई, शिवाजीच्या विरुद्ध व विजापूरकरांच्या बाजूनें पुण्याच्या आसपास धुमाकूळ घालीत होता. त्याजवर बाबाजीनें हल्ला करून त्याचे पुष्कळ लोक मारले व त्याचा झेंडा, तोडा, १५० घोडे, बाण इत्यादि पकडून तो परत आला. तोडा व झेंडा परक्याच्या हातीं राहूं देऊं नये या समजुतीनें महादजी शरण गेला. परंतु बाबाजीनें त्या वस्तु दिल्या नाहींत. पुढे चार दिवसांनीं महादजीस विजापूरकरांची मदत मिळाली तेव्हां त्यानें बाबाजीवर अचानक छापा घातला. त्या हल्ल्यांत बाबाजी पडला. दत्ताजी देशमुख पंढरपुरानजीक पडला. महादजीलाहि जखमा झाल्या. या अपयशाचें परिमार्जन करण्याकरितां जयसिंग तिकडे जाणार होता. परंतु आपण तिकडे गुंतल्यास विजापूरकर

मध्येंच उचल खातील या भीतीनें तो बेत रद्द करून त्यानें त्या बाजूस अब्दुल हमीद यास ५ हजार लोकांनिशीं पाठविलें" (प. सा. सं. खंड १, पृ. ३२०).

जयसिंगाची पिछेहाट

शिवाजीला गेलेलें राज्य परत मिळवावयाचें होतें व नवीन प्रदेश जिंकून तें वाढवावयाचें होतें. या कार्यास मोगल व विजापूरकर या दोन सत्ता आड येणाऱ्या होत्या. यांपैकीं मोगलांतर्फें जयसिंग याची शिवाजीच्या अनुपस्थितींत प्रगति न होतां पिछेहाटच झाली होती. महाराज त्याच्या मदतीस होते तेव्हां मोगल सैन्य विजापुरापासून दोन कोसांवर आलें होतें. या शीघ्र प्रगतीच्या दृष्टीनें गेल्या ८-९ महिन्यांत विजापूरचें राज्य खालसा न झालें तरी त्याचा पुरता मोड होऊन तह घडून यावयास पाहिजे होता. परंतु तें तर झालें नाहींच; उलट विजापूरकरांच्या मदतीस गोवळकोंडेकर आल्यामुळें जयसिंगाला विजापुरापासून माघारच खावी लागली. तो रामसिंगास लिहिलेल्या एका पत्रांत म्हणतो, 'मीं (बादशहाकडे) असा अर्ज केला आहे कीं, एक तर मला दख्खनच्या सैन्याचा संपूर्ण अधिकार तरी सोपवून द्या किंवा तसें जमत नसेल तर परत बोलवा.' याचा स्पष्ट अर्थ हा कीं, जयसिंग व दिलीरखान यांसारखे इतर मुसलमान सेनापति यांचें परस्परांशीं जमत नसल्यामुळें धोरणांत एकसूत्रीपणा राहत नव्हता. शिवाजीला औरंगजेबानें अटक केल्यावर त्याला सोडून देण्याविषयीं जयसिंगानें बादशहास विनाविलें होतें. परंतु त्यानंतर कांहीं दिवसांनीं विजापूरकरांच्या बंदोबस्ताचें कार्य बिकट झाल्यावर त्यानें बादशहास कळविलें कीं, 'आतां दख्खनमधील स्थिति थोडी बिकट झाली असल्यामुळें, शिवाजीला इकडे या वेळीं येऊं देणें शहाणपणाचें होणार नाहीं.' बादशहानें जयसिंगाविषयीं अविश्वास दाखविल्यामुळें त्याच्या हाताखालचे अधिकारी त्याच्या हुकमतींत वागेनासे झाले व त्या योगानें विजापूरचें अर्धवट राहिलेलें प्रकरण अधिकच घोटाळ्यांत पडलें (प. सा. सं. खंड १, पृ. ३१५-३१६). शिवाजी आग्र्यास जाण्यास निघण्याच्या सुमारास जयसिंगानें मुख्य वजीर जाफरखानास पाठविलेल्या पत्रांत लिहिलें आहे, 'विजापूर, गोवळकोंडा व शिवाजी या त्रयीविरुद्ध माझें सर्व सामर्थ्य एकवटून मीं प्रयत्न केला आहे

व करीत राहीन' (प. सा. सं. खंड १, पृ. ३२२). यानंतर शिवाजी आग्र्याहून सुटल्याची बातमी समजल्यावर इंग्रजांनीं सुरतेहून इंग्लंडास नोव्हेंबर १६६६ मध्यें पत्र धाडलें. त्यांत म्हटलें आहे, 'विजापूरचा आदिलशहा व गोवळकोंडेकर असे उभयतां मोगलांच्या पिछाडीवर हल्ला करणार आहेत अशी वार्ता आहे' (प. सा. सं. खंड १, पृ. ३१९).

जयसिंगाच्या अपयशाचीं कारणें

या सर्वांचा निष्कर्ष काढला म्हणजे जयसिंगाच्या अपयशाचीं पुढील कारणें संभवतात : (१) जयसिंगाच्या सेनापतींत बेबनाव होता व शिस्त नव्हती, (२) शिवाजीची त्यास मदत नव्हती आणि (३) विजापूर व गोवळकोंडा या दोन सत्तांशीं त्याला तोंड द्यावें लागत होतें. शिवाजी परत आला तेव्हां मोगलांची अशी दुर्दशा होती व विजापूरकर हे शिवाजीचें मोगलांशीं पूर्वी सख्य झालें असल्यामुळें त्याच्या विरुद्ध होते. परिस्थितीचा असा आढावा घेतल्यावर शिवाजीनें एक महिन्याच्या आंत 'आपण बादशाही सत्तेला शरण जाणार' असें उघडपणें बोलण्यास सुरुवात केली व त्यानंतर चार महिन्यांनीं पुढचा व्यूह रचून ता. २३ एप्रिल १६६७ रोजीं औरंगजेबास पुढीलप्रमाणें पत्रहि लिहिलें, "हा बंदा गुलाम आपली नोकरी करून हुकूम पाळण्यांत मोठें भूषण मानीत आहे. हिंदुस्थानच्या बादशहाची मोठी फौज मजवर चालून येत आहे. या फौजेशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य पृथ्वीवर कोणास तरी आहे काय? म्हणून माझी अशी नम्र विनंती आहे कीं, माझा मुलगा संभाजी यास चार हजार स्वारांची मनसब बादशाही फौजेंत मिळावी. मनसब न मिळाली तरी ही फौज घेऊन नेहमीं तो बादशहाची नोकरी करीत राहणार. माझ्या ताब्यांत किल्ले होते ते सर्व मीं बादशहाकडे सोपवून दिले आहेतच आणि अद्यापि जे कांहीं किल्ले मजकडे आहेत ते व माझी जिंदगी आपल्या सेवेस अर्पण आहे [हें पत्र वाचून बादशहानें दिवाणाजवळ दिलें] (प. सा. सं. खंड १, पृ. ३२३). पत्रांत किती ही दिखाऊ लीनता! काय हा मायावीपणा! कसलें हें ढोंग! हें पत्र वाचून व शिवाजीची अक्कल पाहून औरंगजेबानें तोंडांत बोटच घातलें असेल.

शिवाजीनें आग्र्यास जाण्यापूर्वी औरंगजेबाशीं केलेल्या तहाची ही

पुनरावृत्तीच होती व तिला नकार देण्यास औरंगजेबाला तोंड नव्हतें. आपण शिवाजीस विश्वासघातानें अटक केली असतांहि तो आपल्याशीं इमानानें वागण्यास तयार होता, याचा औरंगजेबास अचंबा वाटला असावा. मात्र शिवाजी राजगडास आल्याचें समजल्यावर जयसिंगाची पांचावर धारण बसणें स्वाभाविक होय. त्याला वाटलें कीं, शिवाजी औरंगजेबावर सूड घेण्याकरितां आपणांबरोबर झुंजण्यासाठीं दंड थोपटणार. त्या भीतीनें त्यानें गोव्याच्या पोर्तुगीज व्हाइसरॉयाबरोबर आरमारी मदतीसाठीं पत्रव्यवहारहि सुरू केला होता. त्याला १९ एप्रिल १६६७ रोजीं व्हाइसरायानें कळविलें कीं, मराठ्यांविरुद्ध गोव्याचें आरमार मोगलांस मदत करील, पण त्याचा खर्च मोगलांना करावा लागेल. तथापि त्यानंतर शिवाजीनें मैत्रीचा हात पुढें केल्यामुळें जयसिंगाला त्याजपासून कांहीं भीतीच राहिली नाहीं. महाराजांनीं राजगडावर विश्रांति घेण्यांत सुमारें दहा महिने घालविले. दरम्यान कोंकणांत मनोहरगडावरील एकांतांतहि ते कांहीं दिवस राहिले. या विश्रांतीच्या काळांत राजनिष्ठेची मात्रा लागू पडून त्रिंबकपंत डबीर व रघुनाथपंत कोरडे हे आग्र्याहून सुटून आले आणि वरील उपायानें मोगलांकडील भय नाहींसें झाल्यावर शिवाजीनें दक्षिण कोंकणाकडे आपली दृष्टि वळविली. तिकडील बराच प्रदेश जिंकून शिवाजीनें पूर्वीच रावजी पंडितास राजापुरास त्या प्रदेशाचा सुभेदार म्हणून नेमलें होतें. त्याजपाशीं दोन हजारांपर्यंत सैन्य होतें तरी शिवाजी आग्र्याहून परत येईपावेतों तो स्वस्थच बसला होता. कुडाळ प्रांताचा लखम सावंत शिवाजीचा शत्रु असून त्याजपासून बराच प्रदेश शिवाजीनें जिंकून घेतला होता. कुडाळ प्रांताच्या हद्दीवरचा रांगणा किल्ला शिवाजीकडेच होता.

दिलीरखान व मुअज्ज़म

रांगणा किल्ला विशाळगडाच्या दक्षिणेस ५५ मैल आहे. तो घेण्याकरितां सन १६६७ च्या मे महिन्यांत विजापूरकरांनीं बहिलोलखान व व्यंकोजी राजे भोसले यांस पाठविलें. त्यांजबरोबरची लढाई ही महाराज आग्र्याहून परत आल्यानंतरची पहिलीच लढाई होय असें समजण्यास हरकत नाहीं. त्या लढाईंत महाराजांनीं त्या दोघांचा मोड करून

त्यांस उधळून लावलें. तेथून खालीं कोंकणांत उतरल्यानंतर लखम सावंतावर ते घसरले. पण लखम सावंताच्या साहाय्यास महमद इखलासखान असल्यामुळें महाराजांचा नाममात्र पराभव झाला. नाममात्र म्हणण्याचें कारण असें कीं, त्यानंतर थोड्याच दिवसांनीं म्हणजे ता. ३० नोव्हेंबर १६६७ पूर्वी महाराजांनीं कुडाळशेजारच्या बारदेशावर स्वारी करून, गोव्याच्या पोर्तुगीजांनीं हिंदूंना बाटविण्याचा व त्यांना छळण्याचा जो जुलमी प्रकार चालविला होता त्याबद्दल तेथील पाद्र्यांचा शिरच्छेद केला व पोर्तुगीजांना शरण यावयास लावलें. आक्रमणाचें हेंच कार्य जोरानें व त्वरेनें पुढें चालविण्यास सांपडावें या उद्देशानेंच महाराजांना मोगलांशीं मित्रत्वानें राहण्याची निकड भासली व त्याच दृष्टीनें त्यांनीं मागील पत्र औरंगजेबास लिहिलें होतें. त्या पत्राचा पूर्ण फायदा मिळण्याची संधि आतां नजीक आली. जयसिंग उत्तरेकडे निघून गेल्यावर दक्षिणेंतील राजकारणाची सर्व सूत्रें सुभेदार मुअज्झम ऊर्फ शहाअलम याच्या हातीं आलीं.

विजापूरच्या मोहिमेंत जयसिंगाचा जोडीदार दिलीरखान होता. दिलीरखानास जयसिंगाचा दुय्यम म्हणून काम करण्यांत अपमान वाटत असल्यामुळें असो, किंवा जयसिंग हिंदु व दिलीरखान मुसलमान या भेदामुळें असो, त्या उभयतांचें सख्य असावें तितकें नव्हतें; शिवाय जयसिंगहि विजापुरावरील स्वारी अपेशी ठरल्यानंतर परत फिरला. इकडे दिलीरखानाची नेमणूक औरंगजेबानें गोंडवनांतील हिंदु राजांपासून खंडणी वसूल करण्याकडे केली. परंतु दक्षिणेचा सुभेदार मुअज्झम हा दुर्बल व आळशी असल्याचें औरंगजेबास माहीत होतें. त्याचा मदतनीस जसवंतसिंग याचा व मुअज्झमचा स्नेह होता. पण तो हिंदु होता व शाइस्ताखानावर शिवाजीनें छापा घातला तेव्हा जसवंतसिंग जवळ असतांहि शिवाजीचा त्यानें प्रतिकार केला नाहीं, यावरून तो शिवाजीला सामील असल्याविषयीं दाट संशय उत्पन्न झाला होता. तो लक्षांत घेऊन जसवंतसिंगास शिवाजी वश करून आपला कावा साधील असें औरंगजेबास वाटून, त्याजहूनहि जबरदस्त असा मुसलमान सेनापति मुअज्झमच्या मदतीस देण्याचें ठरवून औरंगजेबानें दिलीरखानास गोंडवनांतून परत मुअज्झमपाशीं जाण्याचा हुकूम पाठविला. त्याप्रमाणें दिलीरखान गोंडवनांतून ऑक्टोबर १६६७ त मुअज्झमपाशीं

आला. तो जरी समर्थ, चलाख व प्रसिद्ध योद्धा होता तरी त्याचें व मुअज्झमचें सूत नव्हतें. दिलीरखानाचें बादशहाच्या दरबारीं वजन असल्यामुळें मुअज्झम त्याचा मत्सर करीत होता. दिलीरखानहि मुअज्झमास मेचून नव्हता. मुअज्झम त्यास बादशहाचा हेर समजत असे. दिलीरखान व जसवंतसिंग या दोघांचेंहि एकमेकांशीं नीट नव्हतें. हा गर्विष्ठ सेनापति जसवंतसिंगाचा पाणउतारा करीत असे. दिलीरखानाच्या फौजेंत बिकानेरचा राजा राव करण राठोड हा एक सरदार होता. त्याचे रजपूत शिपाई रात्रीं छावणींत चोऱ्या करीत. त्याविरुद्ध दिलीरखानानें बादशहाकडे तक्रार केली व बादशहानें त्यास पकडण्याचा दिलीरखानास हुकूम केला. पण मुअज्झम यानें राव करण यास पाठीशीं घातलें. अशा रीतीनें मोगल सैन्यांत पडलेल्या फुटीमुळें मोगल सैन्य दुर्बल झालें होतें. याच वेळीं पेशावराकडे युसफझाईनीं केलेलें बंड मोडण्यांत बादशहाचें बळ खर्च होत असल्यानें दक्षिणेंतील बंदोबस्ताकरितां अधिक सैन्य व द्रव्य पाठविणें बादशहास शक्य नव्हतें.

शिवाजीचें राजकारण

अशा स्थितींत औरंगजेबानें शिवाजीचें पत्र विचारांत घेऊन त्याजबरोबर सख्य करण्याचें ठरविलें. सभासद म्हणतो, "बादशहानें शहाजाद्यास सांगितलें कीं, जोरावरीनें शिवाजी हातास लागत नाहीं. तुम्ही औरंगाबादेस जाऊन राहणें आणि सल्लामामला राजियासी करून त्याचें सख्य करणें." येणेंप्रमाणें बुद्धिवाद सांगून बादशहानें शहास साठसत्तर हजार स्वारांनिशीं औरंगाबादेस रवाना केलें. त्यानें औरंगाबादेस पोंचल्यावर राजाकडे पत्रें, जासूद, हरकारे व हेजीब राजगडास पाठविले. राजानें तीं पत्रें वाचून पाहिलीं. त्यांत लिहिलें होतें कीं, 'सल्ला करून तुम्हीं आम्हीं एक व्हावें.' त्यावरी राजे बहुत संतुष्ट होऊन त्यांनीं रघुनाथपंत कोरडे यांस औरंगाबादेस पाठविलें. कित्येक जडजवाहीर वस्त्रेंहि शहास पाठविलीं. रघुनाथपंतांनीं जाऊन भेट घेतली. शहानें बहुत सन्मान केला. एकांतीं कित्येक गोष्टी बोलला कीं, "राजे व आपण भाऊ, तुम्ही व आम्ही एकविचारें राहून तुम्ही भेटीसहि येणें. तुमचे नांवें दौलत देतों. एक सरदार व फौज चाकरीस देणें व एक ब्राह्मण मातबर देणें. मोकासा देऊन चालवूं.

तुम्ही पातशाही रुजवातीस असणें." दोघांच्या वाटाघाटींत असें ठरलें कीं, बादशहानें संभाजी राजाच्या नांवें सप्तहजारी दौलत द्यावी, वऱ्हाड व खानदेश हा पंधरा लक्ष होनांचा मुलूख मोकासा द्यावा. त्यानंतर रघुनाथपंतांस उत्तम भूषणें व वस्त्रें देऊन शिवाजीकडे रवाना करण्यांत आलें.

"रघुनाथपंत परत राजाकडे राजगडास आल्यावर राजांनीं विचार केला कीं, आपणांस विजापूर, भागानगर व मोगल या तिघांशीं दावा सोसवत नाहीं. आपलें राज्य नवें; त्याहिमध्यें दोन तीन चपेटे खाऊन हलाखी झाली आहे. यासाठीं एका शत्रूस मित्र करावें, दोन वर्षें बळ धरून सांवरावें व मग पुढें जें कर्तव्य तें करावें.

"असा पोक्त विचार करून प्रतापराव सरनोबत याजबरोबर पांच हजार स्वार व निराजीपंत सरकारकून दिले आणि मोरोपंत पेशवे व मुजुमदार व सुरनीस यांचे मुतालिक पाठविले. निराजीपंताचे पुत्र प्रल्हादपंत यांस सैन्याची सबनिशी सांगितली. बादशहा जो मुलूख मोकासा म्हणून देतील त्यावर रावजी सोमनाथ यांस सुभेदार व कारकून नेमावें असें राजांनीं योजलें. ते सर्व गेल्यावर मोगलांशीं सल्ला झाला. आणि मागाहून संभाजीराजे यांस घेऊन निराजीपंत व प्रतापराव औरंगाबादेस सप्तहजारीवर गेले."

"शहानें त्यांची सन्मानपूर्वक भेट घेतली, त्यांस स्वतंत्र जागा नेमून देऊन पुरा बसविला आणि सर्वांस हत्ती, घोडे, जवाहीर व वस्त्रें दिलीं. वऱ्हाड प्रांत मोकासा मिळाला, त्याजवर रावजी सोमनाथ कारभार पाहण्यास गेले.

"हा वृत्तान्त शहाजाद्यानें दिल्लीस पातशहास कळविला. तो समजतांच पातशहा बहुत खुशाल झाला. संभाजी राजे असे दोन वर्षें फौजेसुद्धां औरंगाबादेस होते. इकडे शिवाजीराजास फुरसत मिळाली. टक्कापैका मुलखांत मिळविला. आदिलशहाचे कित्येक गड कोट व देश काबीज केला. शहाजादा शहाअलम व शिवाजीराजे यांचा घरोबा बहुत झाला. ते एकमेकांकडे वस्ताभावा धाडूं लागले. त्यावरून औरंगजेबास शंका उत्पन्न झाली कीं, शहाजादे व शिवाजी एक होऊन एखादे वक्तीं फितव्यानें आपणांस दगा करतील; यासाठीं त्या दोघांत कज्जा लावून द्यावा! म्हणून बादशहानें शहाजाद्यास सावध करण्याकरितां लिहिलें, 'शिवाजी हरामी आहे. त्याचा

सरदार प्रतापराव व निराजीपंत हे दोघे फौजेनिशीं आहेत, यासाठीं त्यांजवर विश्वास ठेवूं नये. एखादे वक्तीं दौलताबादेस (किल्ल्यांत) भेद करतील. तरी तुम्ही त्या दोघांस कैद करणें, त्यांचीं घोडीं अवघीं तबेल्यास लावणें. कसूर न करणें.'

"हें वर्तमान शहाअलमास पत्र पोंचण्याच्या आंत त्याचा वकील पातशहाजवळ होता त्यानें शहास पाठविलें. शहाअलमास ही बातमी समजतांच त्यानें निराजीपंतास एकांतीं बोलावून त्यास गुप्तरूपें निरोप दिला कीं, 'तुम्ही उद्यां रात्रीं सर्व फौजेनिशीं राजाकडे पळून जावें. मागून वस्तभाव सावकाश न्यावी. दोन-चार दिवसांत बादशहाचे कागद येतील. ते आले म्हणजे तुम्हांस कैद करावें लागेल. याकरितां त्यापूर्वी निघून जावें.' त्याप्रमाणें निराजीपंत व प्रतापराव दुसऱ्या दिवशीं रात्रीं फौज घेऊन राजाकडे निघून गेले. त्यांनीं बरोबर कित्येक खजीना व चित्र-विचित्र वस्त्रें-भूषणें नेलीं. राजे खुष होऊन त्यांस बोलले, दोन वर्षें लष्कराचें पोट भरलें आणि शहाजादा मित्र जोडला. ही बरी गोष्ट झाली. आतां मोगलाई मुलूख मारून खावयास वाव झाला."

कोंकणपट्टी जिंकली

शिवाजी व औरंगजेब यांजमधील हा सलोखा दोन वर्षें म्हणजे सन १६६८ ते १६७० पर्यंत टिकला. त्या दोन वर्षांत सभासदानें म्हटल्याप्रमाणें शिवाजीचा बराच कार्यभाग साधला. त्यानें पोर्तुगीजांशीं युद्ध सुरू ठेवून त्यांचीं बारदेशांतील बरींच खेडीं हस्तगत केलीं व तो त्यांच्या साष्टी बेटावर हक्क सांगूं लागला आणि सबध गोंवेंप्रांत गुप्त कारस्थानानें जिंकण्याचा त्यानें डाव टाकला, पण तो फसला. तथापि गोव्यापर्यंतची बहुतेक सर्व दक्षिण कोंकणपट्टी त्यानें हस्तगत केली. मि. डेलन या इंग्रजानें ६ जानेवारी सन १६७० रोजीं लिहून ठेवलें आहे, "मी राजापूर बंदरांत आलों. येथें इंग्रजांची एक वखार होती. पण तेथून मराठ्यांनीं त्यांना काढून लावलें आहे. शिवाजी मोठा प्रबळ राजा असून सामर्थ्यवान् अशा अनेक शत्रूंना न जुमानतां त्यानें सर्व कारभार अशा धोरणानें चालविला आहे कीं, पोर्तुगीजांचीं कांहीं बंदरें सोडलीं तर सुरत ते गोवा यांच्या दरम्यानच्या सर्व मुलखांत त्यानें आपलें बस्तान कायमचें बसविलें आहे (प. सा.

सं. खंड १, पृ. ३५७–३५८). याच काळांत औरंगजेबानें शिवाजीस 'राजे' हा किताब देऊन त्याला खुष करण्याचा प्रयत्न केला. डेलन याच्या माहितीप्रमाणें शिवाजीनें सन १६७० पर्यंत दक्षिण कोंकणच काय, पण उत्तर कोंकणहि फिरून काबीज केलें होतें. याला आणखी एक प्रमाण इंग्रजांनीं मुंबईहून सुरतेस ता. ६ ऑक्टोबर १६६८ रोजीं पाठविलेल्या पत्रांतहि सांपडतें. त्यांत म्हटलें आहे, ' हिंदुस्थान व दख्खन यांचा संबंध चांगल्या रस्त्यांनीं जोडणारें उत्तम बंदर पेण, हें शिवाजीच्या अमलाखालीं असलें तरी शिवाजी औरंगजेबाचा ताबेदार झाल्यामुळें सुलतान मुअज्झम त्यास आज्ञा करील तर इंग्रजांना त्याचा वापर करूं देणें शिवाजीस भाग पडेल.' (प. सा. सं. खंड १ पृ. ३४०)

सभासदानें, शिवाजी व औरंगजेब यांजमध्यें तह कसा झाला, तो दोन वर्षें टिकला असतां त्या काळांत कोणकोणत्या घडामोडी झाल्या, याची दिलेली हकीकत तत्त्वतः विश्वसनीय आहे. मात्र तिच्यांतली तारखा वा मित्या यांची उणीव भरून काढणें जरूर आहे.

जयसिंग दिल्लीकडे परत जातांना बऱ्हाणपुरास मृत्यु पावला (२८ ऑगस्ट १६६७). त्याच्या जागीं मे महिन्यांत मुअज्झम आला व त्याच्या मदतीस जसवंतसिंगहि आला. शिवाजी आग्र्याहून नुकताच सुटून आल्यापासून त्यालाहि विश्रांति पाहिजे होती. म्हणून त्यानें मागें लिहिल्याप्रमाणें औरंगजेबास नम्रतेनें पत्र पाठविलें. त्या पत्राच्या आधारें मुअज्झम यानें औरंगाबादेस आल्यावर शिवाजीशीं तह करण्याचें ठरविलें. उभयपक्षीं तहाचें बोलणें सप्टेंबर १६६७ मध्यें सुरू झालें. त्यासाठीं ९ ऑक्टोबर १६६७ रोजीं संभाजी मुअज्झमास भेटण्यास औरंगाबादेकडे जाण्याकरितां निघाला. दोघांच्या भेटी २७ ऑक्टोबर रोजीं झाल्या व तह झाला. दुसऱ्या दिवशीं संभाजी जसवंतसिंगास भेटला. त्या भेटीनंतर ४ नोव्हेंबर १६६७ रोजीं संभाजी राजगडास शिवाजीकडे परत यावयास निघाला. औरंगजेबास झालेला तह पसंत पडून त्यानें शिवाजीस 'राजे' हा किताब दिल्याचें पत्र पाठविलें (९ मार्च १६६८). तहांतील अटीप्रमाणें मुअज्झमच्या कुमकेस शिवाजीनें जें सैन्य द्यावयाचें तें घेऊन निराजी रावजी २ ऑगस्ट १६६८ रोजीं औरंगाबादेस जावयास निघाला. त्याच्यामागून

तीन दिवसांनीं संभाजीसह प्रतापराव (कडतोजी गुजर) निघाला. संभाजीला ५ हजारांची मनसब, एक हत्ती व रत्नखचित तरवार देण्यांत आली. त्याला वऱ्हाड व खानदेश यांत जहागीर मिळाली. त्याजबरोबरच्या सैन्यापैकीं निम्में सैन्य औरंगाबादेस राहिलें व निम्में जहागिरीवर गेलें. दीड वर्षपर्यंत हें सैन्य जहागिरीवर होतें. त्यानंतर औरंगजेबानें संशयावरून प्रतापराव प्रभृतींना कैद करण्याचें ठरवितांच ते, सभासदानें लिहिल्याप्रमाणें, मुअज्झमच्या कानमंत्रावरून शिवाजीकडे ताबडतोब निघून आले.

शिवाजीमहाराजांनीं आपल्या लाघवी वर्तनानें मुअज्झमास मोहिनी घालून मुठींत आणला असेल हा औरंगजेबास आलेला संशयहि निराधार नव्हता. मुअज्झम शिवाजीला वश झाला होता; इतकेंच नव्हे तर बहुधा शिवाजीच्या प्रोत्साहनानें तो औरंगजेबाविरुद्ध बंड करण्यासहि उद्युक्त झाला होता, हें ता. ३० मार्च सन १६७० मध्यें सुरतेच्या इंग्रजांनीं इंग्लंड-मध्यें कंपनीस पाठविलेल्या पत्रानें सिद्ध होतें.

"शहाजादा मुअज्झम शिवाजीला उत्तेजन देत असून, औरंगजेबानें त्याच्या धाकट्या भावाला गादीचा वारस ठरविल्याकारणानें, त्याजविरुद्ध बंड करून शिवाजीला तो मिळणार आहे. या मताला शिवाजीच्या हाल-चाली पाहून दुजोरा मिळतो. कारण आतां तो पूर्वीप्रमाणें चोरासारखा न वागतां, राजरोसपणें तीस हजार सैन्यानिशीं मिळेल तो मुलूख जिंकण्याचा त्याचा क्रम चालू झाला आहे. शहाजादा मुअज्झम जवळ असतांनाहि त्याला विरोध करीत नाहीं. शिवाजीनें मुंबईजवळचीं कल्याण व भिवंडी हीं गांवें घेतलीं आहेत. तीं त्याच्याकडेच राहतील तर बरीं; कारण मुसलमानांच्या शेजारापेक्षां शिवाजीचा शेजार अधिक बरा वाटतो" (प. सा. सं. खंड १, पृ. ३६१–३६२). सारांश, शिवाजीनें त्या दोन वर्षांच्या मुदतींत आपले अनेक हेतु साधून घेतले. तैनाती फौजेच्या तत्त्वाप्रमाणें त्याचें पांच हजार सैन्य परभारें पोसलें गेलें, खानदेश व वऱ्हाड हा सुपीक प्रदेश ताब्यांत राहून त्यांतून पुष्कळ पैसा त्यास वसूल करतां आला. दक्षिणेचा मोगल सुभेदार व युव-राज मुअज्झम त्याचा मित्र बनून त्याजकडून राज्यवृद्धीस होणारा विरोध ढिला पडला आणि मुअज्झम व औरंगजेब यांच्या दरम्यान परस्पर कलागत लागून शिवाजीस औरंगजेबाचें भय वाटेनासें झालें. त्याची फौज कात टाकल्या-

प्रमाणें पुनः जोमदार व सामर्थ्यसंपन्न होऊन नवीन मुलूखगिरीचें तें प्रभावशाली हत्यार बनलें. त्यानें जून १६६९ तच जंजिऱ्याच्या सिद्दीशीं जोरानें युद्ध सुरू केलें व त्यानंतर तो मोगलांनीं घेतलेला सर्व मुलूख परत मिळविण्याच्या मार्गास लागला. त्यानें ४ फेब्रुवारी १६७० त कोंढाणा, ८ मार्च १६७० रोजीं निळोपंत मुजुमदाराकरवीं पुरंदर, १७ मार्च रोजीं कल्याण, १३ मे रोजीं माळ लावून लोहगड, १५ जून रोजीं हिंदोळा, १६ जून रोजीं माहुली, २२ जून रोजीं अर्नाळा, २४ जून रोजीं रोहिडा घेतला आणि ऑगस्ट महिन्यांत मोगलांचें पुण्याजवळील मोठें ठाणें जें जुन्नर त्यास खुद्द शिवाजीनें जातीनें वेढा घातला. मोगलांशीं युद्ध सुरू झालें कीं विजापूरकरांशीं तह करून ती बाजू निर्भय करावी आणि विजापूरकरांशीं युद्ध पुकारण्यांत आलें कीं, मोगलांशीं सख्य जोडावें असें शिवाजीचें राजकीय धोरण होतें. त्यास अनुसरून त्यानें ता. ८ ऑक्टोबर १६६८ पूर्वींच विजापूरकरांशीं तह करून ठेवला असल्यामुळें त्याचा विजयी घोडा असा भरधांव सुटला (प. सा. सं. खंड १, पृ. ३४०).

तानाजीचा प्रताप

वर लिहिल्याप्रमाणें कोंढाणा किल्ला शिवाजीनें घेतला, त्या वेळीं दारुण रणसंग्राम त्यास करावा लागला. त्याचें वर्णन सभासदानें फार बहारीचें केलें आहे. “ मोरोपंत पेशवे, निळोपंत मुजुमदार व अण्णाजीपंत सुरनीस यांस राजियांनीं सांगितलें कीं, तुम्ही राजकारण, यत्न करून किल्ले घ्यावे आणि मावळे लोकांस सांगितलें कीं, ‘ गड (कोंढाणा) घेणें. ’ त्याजवरून तानाजी मालुसरा म्हणून हजार मावळयांचा होता. त्यानें कबूल केलें कीं, कोंढाणा गड आपण घेतों. असें म्हणून वस्त्रें व विडे घेऊन ५०० माणसांनिशीं गडाखालीं गेला आणि दोघे मावळे बरे मर्दानें निवडून रात्रीं गडाच्या कड्यावरून चढले. जैसे वानर चालून जातात त्याप्रमाणें कडा चढून गडावर गेले व तेथून माळ लावून वरकड लोकांसुद्धां तानाजी मालुसरा गडावर गेला. त्या वेळीं त्याजपाशीं तीनशें माणूस होतें. गडकरी उदेभान रजपूत होता. त्यास कळलें कीं, गनीम लोक आले. ही खबर कळून कुल रजपूत कंबरबस्ता होऊन, हातीं तोडाबार घेऊन हिलाल, चंद्रज्योति लावून, तोफाची (गोलंदाज) तिरंदाज, बरचीवाले, पटाईत,

सुऱ्या, आडहत्यारी ढाला चढवून चालून आले. तेव्हां मावळे लोकांनीं 'श्रीमहादेव' असें स्मरण करून रजपुतांच्या फौजेवर नीट चालून घेतलें. एक प्रहर मोठें युद्ध झालें. पांचशें रजपूत ठार झाले. चाळीस-पन्नास मावळे ठार झाले. उदेभान किल्लेदार खासा त्यास व तानाजी मालसुरा सुभेदार यासी गाठ पडली. दोघे मोठे योद्धे, महाशूर एक एकावर पडले. वार करीत चालले. तानाजीच्या डाव्या हातांतली ढाल तुटली. दुसरी ढाल समयास आली नाहीं. मग त्यानें आपल्या डाव्या हाताची ढाल करून, त्याजवर वोड (शत्रूचा मारा) घेऊन दोघे महा रागास पेटले. मोठें युद्ध केलें. एकाचे हाते एक असे तुकडे होऊन फिरंगीच्या वारे पडले. दोघे ठार झाले. मग सूर्याजी मालसुरा तानाजीचा भाऊ यानें हिंमत धरून, कुल लोक सावरून उरले रजपूत मारले. कित्येक रजपूत कडे उडून पळून मेले, असे बाराशें माणूस मारलें. किल्ला काबीज केला. आणि गडावर पागेचे खण होते, त्यांस आग लावली. त्याचा उजेड राजियांनीं राजगडाहून पाहिला आणि बोलले कीं गड घेतला, फत्ते झाली. तो जासूद दुसरे दिवशीं वर्तमान घेऊन आला कीं, तानाजी मालसुरा यांनीं मोठें युद्ध केलें, उदेभान किल्लेदार यास मारिलें. आणि तानाजी मालसुराहि पडला. गड फत्ते केला असें सांगतांच राजे म्हणूं लागले कीं ' एक गड घेतला, परंतु एक गड गेला ' असे तानाजीसाठीं बहुत कष्टी झाले. पुढें गडावर ठाणें घातलें. सूर्याजी मालुसरा भाऊ नांवाजून तानाजीचा सुभा त्यास सांगितला, धारकरी लोकास सोन्याचीं कडीं बाक्षिस दिलीं. द्रव्य अपार दिलें. जरीचीं वस्त्रें कुल लोकांस दिलीं. ये जातीनें प्रथम कोंडाणा घेतला. पुढें मोरोपंत पेशवे याणी व निळोपंतीं व मावळे याणी सव्वीस गड ऐसेच ख्यात करून चौं महिन्यांनीं घेतलें. सल्ल्यानें गड दिधले होते ते मागुती घेऊन आपलें राज्य करूं लागले."

सभासदाच्या या वृत्तान्तांत शिवाजीनें 'गड आला पण सिंह गेला' असें म्हटल्याचा वा येथून कोंढाण्यास 'सिंहगड' म्हणूं लागल्याचा उल्लेख नाहीं. वास्तविक कोंढाण्यास सिंहगड हें नांव शिवाजीनें या प्रसंगापूर्वींच ठेवलें होतें.

शिवाजीनें असें चढाईचें धोरण स्वीकारल्यावर औरंगजेबाला दक्षिणेंतील आपल्या राज्याविषयीं चिंता उत्पन्न झाली. त्याचा पुत्र मुअज्जम

औरंगाबादेस सुभेदार होता. पण तो शिवाजीस सामील असल्याच्या वार्ता दिल्लीस औरंगजेबापर्यंत गेल्या होत्या. अशा स्थितींत दक्षिणेचा पुरा माहीतगार दिलीरखास यास मुअझ्झमाच्या मदतीस पाठविण्याचा विचार औरंगजेबानें ठरवून त्यास त्यानें गोंडवनांतून औरंगाबादेस मुअझ्झमपाशीं जाण्यास फर्मावलें. त्याचा त्याला दुहेरी फायदा वाटला. एक तर त्याच्या आगमनानें मोगलांचें महाराष्ट्रांतील बळ वाढेल व दुसरें असें कीं, मुअझ्झमावर त्याचा साहजिकच दाब पडून तो शिवाजीस मिळण्याची भीति दूर होईल. पण दिलीरखानाची इच्छा परत यावयाची नव्हती. मुअझ्झमाशीं आपलें पटणार नाहीं हें तो जाणून होता. शिवाय गोंडवनांतील हिंदु राजांना पिळून काढण्यांत त्याचा फायदाहि होता. म्हणून तो महाराष्ट्रांत येण्याची टाळाटाळ करूं लागला व तशीं त्यानें औरंगजेबास उत्तरेंहि पाठविलीं. तथापि औरंगजेब कांहीं झालें तरी आपला आग्रह सोडीना. तेव्हां नाइलाज म्हणून औरंगजेबाच्या हुकमाप्रमाणें दिलीरखान नागपुराहून ता. २९ मार्च १६७० रोजीं औरंगाबादेस यावयास निघाला. त्याचें व शहाजाद्याचें पूर्वीपासून वितुष्ट होतें. मुअझ्झमाची दिलीरखानाविरुद्ध मुख्य तक्रार अशी कीं, त्याची अफगाण फौज त्याच्या कह्यांत वागत नसून गरीब रयतेस लुटते व दिलीरखान तिला आळा घालीत नाहीं. या दोघांतील बेबनावामुळें दिलीरखान मुअझ्झमास भेटण्यास भीत होता. म्हणून तो ८ एप्रिल रोजीं औरंगाबादेपासून २६ मैलांवर पाथरी या गांवीं थांबला. मुअझ्झमास तो आपणांस भेटावयास येण्याचें टाळीत आहे असें वाटल्यावरून त्यानें त्यास आपल्यासमोर लवकर हजर होण्याचा हुकूम केला. या हुकमानें खानाची भीति अधिकच दुणावून त्यानें आजारीपणाचें ढोंग केलें व शहाजाद्याकडे येण्यास उशीर लावला. मुअझ्झमाच्या मदतीस जसवंतसिंग होताच. त्या दोघांनीं या दिरंगाईचा फायदा घेऊन दिलीरखान आपणांविरुद्ध बंड करून उठला असल्याचें बादशहास कळविलें. उलट पक्षीं दिलीरखानानेंहि मुअझ्झमाविरुद्ध पसरलेल्या बातम्यांचा फायदा घेऊन मुअझ्झम शिवाजीस मिळाला असल्याचें बादशहास भासविलें. या बातम्या वारंवार उठतच असत. डच व इंग्रज यांच्या कानांवर त्या जात व त्यांचा पडसाद त्यांच्या पत्रव्यवहारांत उमटत असे.

वेंगुर्ल्यांहून डच गव्हर्नर-जनरल ता. २८ सप्टेंबर १६७० त लिहितो, 'शिवाजीच्या स्थितींत बदल झाला नाहीं. त्याच्यावर चालून आलेलें मोगली सैन्य अकस्मात् परत बोलावलें गेलें. शिवाजी, आदिलशहा व सुलतान मुअज्झम यांचें संगनमत आहे. यामुळें कित्येक गोष्टींचा उलगडा होत नाहीं. शिवाजी मात्र किनाऱ्यावरील सर्व किल्ल्यांवर रसद व दारूगोळा यांचा पुरवठा करीत आहे' (प. सा. सं. खंड २, पृ. ३७४). त्यानंतर एक महिन्याच्या आंत मुअज्झमानें बापाशीं लढण्याकरितां शिवाजीच्या व इतर राजांच्या (आदिलशहा) मदतीनें सैन्य उभारलें असल्याचें मुंबईहून सुरतेस २ ऑक्टोबर १६७० रोजीं पत्र गेलें. 'सुलतान मुअज्झमानें शिवाजी व इतर राजे यांच्या मदतीनें बापाशीं लढण्याकरितां मोठें सैन्य उभारलें. कित्येकांच्या मतें तो औरंगजेबावर स्वारी करण्याकरितां निघून आग्ऱ्याजवळ गेला. दुसरे कित्येक असें म्हणतात कीं, बापानें तह करून त्यास दख्खनचें राज्य व गुजराथ प्रांत दिल्यामुळें तो परत फिरला' (प. सा. सं. खंड २, पृ. ३७४). औरंगजेब व मुअज्झम यांजमधील लढा व मुअज्झमाचें शिवाजीशीं सख्य याचाच फायदा घेऊन शिवाजीनें ऑक्टोबर १६७० च्या प्रारंभीं सुरतेंत लूट केली. ता. १४ ऑक्टोबर १६७० रोजीं सुरतेहून इंग्रजांनीं कारवारास पत्र लिहिलें त्यांत पुढील मजकूर आहे –

"मुअज्झम मोगलांविरुद्ध शिवाजीस मिळाल्यामुळें आणि शिवाजीनें आसपासच्या मुलुखांत जाळपोळ करून मुलूख वैराण केल्यामुळें या प्रांतांत इतकी अंदाधुंदी माजली आहे कीं, येथील बसलेला व्यापार यापुढें भरभराटीस येण्यास कित्येक वर्षें लागतील" (प. सा. सं. खंड २, पृ. ३७५).

वरील पत्रांवरून मुअज्झमच्या बखेड्याचें स्वरूप मुअज्झम व दिलीरखान यांजमधील भांडणाइतकें मर्यादित नसून त्याचीं पाळेंमुळें फार खोल गेलीं असलीं पाहिजेत हें स्पष्ट आहे. मुअज्झमाचा औरंगजेबाशीं बेबनाव झाला असला पाहिजे आणि औरंगजेबाचा संशयी स्वभाव लक्षांत घेतां मुअज्झमानें त्याजविरुद्ध दक्षिणेंत कारस्थानें करावीं यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं.

मुअज्झम व दिलीरखान यांजमध्यें समेट घडवून आणण्याकरितां बादशहानें आपला खान-इ-सामान इफ्तियारखान यास औरंगाबादेस पाठविलें;

पण त्याच्या दुटप्पी वर्तनानें समेट न होतां तंटा कायम राहिला. तेव्हां बादशहानें शहाजाद्याची कड घेऊन त्यास दिलीरखानास वठणीवर आणण्यास सांगितलें. हें दिलीरखानास समजतांच खान माळव्याकडे पळून जाऊं लागला व त्याचा पाठलाग शहाजादा व जसवंतसिंग यांनीं चालविला. त्यांनीं या कामीं शिवाजीचीहि मदत मागितली. औरंगजेबास हें दृश्य सहन न होऊन त्यानें शहाजाद्यास परत औरंगाबादेस जाण्यास फर्मांविलें व जसवंतसिंगास दुसरा हुकूम येईपर्यंत बऱ्हाणपुरास राहण्याची ताकीद दिली. अशा रीतीनें या दोघांच्या तावडींतून सुटलेला दिलीरखान माळव्यांतून दिल्लीस पोंचता झाला. डचांनीं आपल्या पत्रांत मुअज्झम आग्ऱ्याला गेला असें म्हटलें आहे तें खरें नसून तो बऱ्हाणपुरापर्यंतच जाऊन औरंगाबादेला परत आला.

बागलाणांत पुंडाई

बादशहाच्या हुकमाप्रमाणें मुअज्झम औरंगाबादेस सप्टेंबर १६७० मध्यें परत आला. तेथें आल्यावर एक महिन्यानें त्यास शिवाजीनें सुरत दुसऱ्या खेपेस लुटल्याची खबर समजली. तसेंच बागलाणांत शिवाजीच्या सैन्यानें शिरून तेथेंहि पुंडाई माजविली असल्याचें त्यास कळलें. आतां शिवाजीशीं शहाजाद्याचें जें कांहीं थोडेंबहुत सख्य होतें त्यास तिलांजलि देणें त्यास भाग पडून मराठ्यांपासून बागलाणाचें रक्षण करण्याचा त्याला निर्धार करावा लागला. त्याप्रमाणें दाऊदखान व जसवंतसिंग बऱ्हाणपुरास होते, त्यांपैकीं दाऊदखानास त्यानें बागलाणांत शिवाजीवर जाण्यास फर्मांविलें. दाऊदखान बऱ्हाणपुराहून बागलाणच्या रोखानें निघाला व त्यानें त्यास बागलाणांत अडवून त्याच्याशीं झगडण्यास सुरुवात केली. दाऊदखान प्रथम वैजापुरापाशीं आला व तेथून आपलें सामान औरंगाबादेस पाठवून त्यानें बागलाणांत चांदवडाकडे प्रयाण केलें.

चांदवड हें गांव नाशिक ते बागलाण रस्त्यावर पश्चिम-पूर्व अशा डोंगराच्या रांगेपाशीं आहे व जवळच चांदवडचा डोंगरी किल्ला आहे. याच रांगेंत पश्चिमेकडून पूर्वेकडे अहिवंत, सप्तशृंग, मार्कंडा किल्ला, रवळा व जावळा हे किल्ले व धोडपचा किल्ला आणि ईशान्येस कांचना किल्ला आहे. वणी सप्तशृंगीच्या पायथ्याशीं असून दक्षिणेस १५ मैलांवर दिंडोरी आहे. दाऊदखान चांदवड किल्ल्याच्या पायथ्याशीं रात्रीं ९ वाजतां दाखल झाला.

त्याला कळलें कीं, शिवाजी उत्तरेकडून मुल्हेरहून निघून चांदवडच्या पूर्वेस दहा मैलांवर कांचना-मंचना खिंडींतून चांदवडची डोंगरांची रांग ओलांडून जाणार आहे. त्यानंतर मध्यरात्रीं दुसरी बातमी हेरांनीं आणली कीं, शिवाजी कांचना-मंचना खिंडींतून नाशिककडे निम्मी फौज घेऊन गेला असून, त्यानें निम्मी फौज खिंडीपाशीं ठेवली आहे. ही बातमी कळतांच दाऊदखान तावडतोब निघाला. त्या वेळीं पहांटेची तीन वाजण्याची वेळ होती. चंद्र मावळून जिकडे तिकडे अंधार पडला होता. त्यांत कोणाचा पत्ता कोणास न लागून त्याचें सैन्य इतस्ततः पांगलें.

"दाऊदखानाच्या आघाडीवर इखलासखान मियाना हा होता. त्यानें जवळच्या टेकडीवर चढून पाहिलें तों शिवसेना खालच्या सपाटीवर लढाईच्या तयारीनें सिद्ध आहे. त्याचे सैनिक चिलखतें घालून तयार होण्या-पूर्वींच इखलासखान थोड्याशा सैनिकांनिशीं शत्रूवर तुटून पडला. मराठ्यांची फौज दहा सहस्र असून तिजबरोबर प्रतापराव गुजर, व्यंकाजी दत्तो व आनंदराव इत्यादि नामांकित सेनापति होते. त्यांजपुढें इखलास-खानाचा टिकाव कसा लागणार? तो जखमी होऊन घोड्यावरून खालीं पडला. थोड्या वेळानें दाऊदखान तेथें आला. त्यानें आघाडीच्या सेनेच्या मदतीस राय मकरंद व इतर अधिकारी पाठविले; आणि बाकीच्या सैन्यास हत्ती, निशाणें व नगारा यांसह मागें टेकडीपाशीं छावणी करण्यास सांगि-तलें. यानंतर चार तास चांगलेंच रणकंदन माजलें. संग्रामखान घोरी व त्याचे भाईबंद जखमी झाले व पुष्कळ मेले. दाऊदखान स्वतः लढाईंत घुसला. त्यानें तोफखान्याच्या बळावर शत्रूस मागें हटवून जखमी इखलास-खानाची सुटका केली.

वणी-दिंडोरीचें युद्ध

दाऊदखानाच्या सैन्याचा एक विभाग मीर अब्दुल महबूब याच्या हाताखालीं इतर ठिकाणीं गुंतला होता. त्याजवर शिवसेनेनें हल्ला करून त्यास व त्याच्या एका पुत्रास जखमी केलें व पुष्कळ सैनिकांना ठार मारलें आणि त्यांचीं निशाणें व घोडे लुटून नेले. या वेळीं दाऊद-खानापाशीं दोन सहस्र सैनिक असून शिवसेना पांच पट होती आणि शिवाजी निम्मी फौज घेऊन नाशिककडे निघून गेल्याची दाऊदखानास

लागलेली माहिती खोटी होती. बहुधा शत्रुसेनेस फसविण्याकरितां शिवाजीनें तशी हूल उठविलीहि असेल; कारण या लढाईत शिवाजी स्वतः हजर होता. मोगलांपाशीं तोफखाना होता तसा शिवाशीपाशीं नसल्यामुळें एका अर्थानें दाऊदखान मराठ्यांपेक्षां प्रबळ होता; पण ती उणीव मराठ्यांनीं संख्येनें भरून काढल्यामुळें मराठे दाऊदखानाशीं तुल्यबल झाले होते आणि खुद्द शिवाजी त्यांस चेव आणण्यास हजर असल्यामुळें मराठे मोगलांशीं विलक्षण आवेशानें लढले. हें युद्ध वणी-दिंडोरीचें युद्ध म्हणून इतिहासांत नमूद असून त्याची हकीकत सभासदानें पुढीलप्रमाणें वर्णिली आहे :—
'राजा खासा घोड्यावर बसून बख्तर (पोलादी कड्यांचें चिलखत) व घुगी (शिरस्त्राण) घालून हातीं पट्टे चढवून मालमत्ता (सुरतेच्या लुटींतील) पुढें रवाना करून आपण दहा हजार स्वारांनिशीं सडे सडे राऊत उभे राहिले. वणी-दिंडोरी म्हणून शहर आहे. ते जागा उभे राहून सुभ्याचे लोक (मोगल) आले, त्यांशीं घोरांदर युद्ध केलें. राजियांनीं आपली फौज पुढें करून पाठीवर आपण खासा राहून झगडा दिला. प्रतापराव सरनौबत, व्यंकोजी दत्तो व आनंदराव वरकड सरदार पुढें होऊन कत्तल मोठी केली आणि मोगल मारून मुडदे पाडले. दोन प्रहर युद्ध झालें. मराठे यांनीं शर्थ केली. तीन हजार मोगल मारले. तीन-चार हजार घोडे पाडाव केले. दोन मोगलाई वजीर सांपडले. असे फत्ते करून आले.''

या पराभवानंतर मोगलांनीं त्या रात्रीं तेथेंच मुक्काम करून मेलेल्यांना पुरलें व जखमींची शुश्रूषा केली. हें युद्ध १७ ऑक्टोबर १६७० रोजीं झालें. त्यानंतर मोगलांत एक महिना फिरून युद्धाची हिंमत राहिली नाहीं. दुसऱ्या दिवशीं उरलेलें सैन्य घेऊन दाऊदखान नाशिक येथें गेला व तेथें एक महिनाभर राहिला. तेथून त्यानें जखमी लोकांना औरंगाबादेस पाठविलें व स्वतः आपण अहमदनगरास राहावयास गेला.

मोगल निघून गेल्यावर मराठ्यांनीं त्यांच्या पश्चात् बागलाणांतील चांदवडाजवळचे अहिवंत, मारकंडा, रवळा, साल्हेर हे किल्ले घेतले आणि शिवाजी तसाच खानदेश लुटावयास निघाला. त्यानें झपाट्यानें मजल मारून बऱ्हाणपुरापासून दोन मैलांवरील बहादरपुरा हें खेडें लुटलें. पण बऱ्हाणपुरांत जसवंतसिंग होता, त्यानें त्यास इशारा देतांच शिवाजीनें बऱ्हाण-

पुरास उपद्रव न देतां वऱ्हाडांत शिरून कारंजा नगर अचानक लुटलें. त्या लुटींत मिळालेलें तलम कापड, रुपें व सोनें इत्यादि एक कोट रुपयांचा माल चार हजार घोड्यांवर लादून त्यानें नेला. खंडणी द्याल तर सोडीन, अशा अटीवर त्यानें तेथील श्रीमंत लोकांना पकडून नेलें. फक्त एक जण बायकोचें सोंग घेऊन सुटला. दुसऱ्या वीस हजार सैन्यानें औसेंगांवाभोंवतालचा मुलूख लुटला. पहिल्या सैन्यानें कारंजा व नंदुरबार येथील लोकांपासून चौथाईचीं अभिवचनें लिहून घेतलीं. मराठ्यांना मोगल विरोध करूं शकले नाहींत. याच वेळीं दाऊदखानाचा मुलगा अहमदखान व जसवंतसिंग यांजमध्यें बऱ्हाणपुरास भांडण जुंपलें होतें. जसवंतसिंग त्याजपाशीं मुअज्झमकरितां पांच लाख रुपये मागत होता व अहमदखान बादशहाच्या हुकुमाशिवाय मी ते देणार नाहीं असें म्हणत होता.

या वेळीं दाऊदखान मनमाडाजवळ अनकाई-तनकाई या डोंगरापाशीं होता. तो शिवाजीच्या पाठीवर बऱ्हाणपुराकडे जावयास निघाला. पण वाटेंत अंजठ्याच्या घाटांत त्याला कळलें कीं, मराठे बऱ्हाणपुरावर न जातां वऱ्हाडांतून परत बागलाणाकडे गेले. दाऊदखान खानदेशाकडे गेल्यावर मोरोपंतास बागलाणांत मोकळें रान सांपडून तो बागलाण व पश्चिम खानदेश यांत लुटालूट करूं लागला. इतक्यांत शिवाजीहि वऱ्हाडांतून परत येऊन मोरोपंतास मिळाला व त्या दोघांनीं मिळून साल्हेरच्या किल्ल्यास वेढा दिला. तेव्हां दाऊदखान परत सायंकाळीं ८ वाजतां जलदीनें तेथें आला, पण त्याचें सैन्य मागें राहिल्यामुळें तें येईपर्यंत त्यास स्वस्थच बसावें लागलें, तें सैन्य त्यास येऊन मिळाल्यावर तो दुसऱ्या दिवशीं सकाळीं मराठ्यांनीं घातलेला वेढा उठविण्यास आला; पण तोंपर्यंत मराठ्यांनीं साल्हेर घेतलीहि; म्हणून तो निराश होऊन चांदवडाजवळील कंचना-मंचनापाशीं येऊन राहिला.

महाबतखानाची रवानगी

शिवाजीनें साल्हेर किल्ला वीस हजार घोडदळ व पायदळ यांच्या बळावर घेतला. आंतील शिबंदी बेसावध असल्याचें पाहून त्याचे सैनिक दोरीची शिडी लावून किल्ला चढले. किल्लेदार फाढुल्लाखान लढतां लढतां पडला व त्याच्या मेहुण्यानें किल्ला शिवाजीच्या स्वाधीन केला. या मुसं-


डींत मराठ्यांनीं चौरागड व हातगड हेहि किल्ले घेतले, बागलाणाचा फौजदार नेकनामखान याची रसद तोडली व धोडपच्या किल्ल्यास वेढा दिला. शिवाजीच्या अशा पराक्रमापुढें दाऊदखानाचा टिकाव लागत नाहीं, असें औरंगजेबाच्या लक्षांत येतांच त्यानें त्याच्या मदतीस महाबतखानास पाठविलें. महाबतखान दिल्लीहून चाळीस सहस्र स्वार घेऊन दक्षिणेंत यावयास निघाला. तो जानेवारी १६७१ मध्यें बऱ्हाणपुरास आला. तेथून जसवंतसिंगास घेऊन तो औरंगाबादेच्या वाटेस लागला. त्यानें औरंगाबादेस जाऊन बादशहाविरुद्ध मुअज्झमाच्या मनांत असलेलें किल्मिष काढून टाकण्याचा प्रयत्न केला व त्याजपाशीं फक्त सातशें सैन्य ठेवून त्याचीं नखेंच काढून घेतल्यासारखीं केलीं आणि आपण दाऊदखानाच्या मदतीस बागलाणांत गेला. तो जानेवारी १६७१ अखेर दाऊदखानास चांदवडापाशीं जाऊन मिळाला व त्या दोघांनीं मिळून अहिवंत किल्ल्यास वेढा घातला आणि तो किल्ला व साल्हेर, मार्कंडा, जवळा व अचलगिरी हे किल्ले मराठ्यांपासून पुनः काबीज केले. ८ एप्रिल १६७१ पर्यंत इतकी कामगिरी बजावल्यावर औरंगजेबानें दाऊदखानास परत बोलावलें. त्याप्रमाणें दाऊदखान जून महिन्यांत दिल्लीस परत गेल्यावर महाबतखानाच्या मदतीस बादशहानें दिलीरखान व बहादुरखान यांची रवानगी केली. ते आल्यामुळें मोगलांचें सामर्थ्य पुष्कळच वाढलें. त्यांचे महाबतखान, दिलीरखान, बहादुरखान, जसवंतसिंग इत्यादि अव्वल दर्जाचे सेनापति एकवटले. त्यांनीं मोहिमेचा नवा आराखडा तयार करून शिवाजीस सळो का पळो करण्याचें ठरविलें. अशा रीतीनें आराखडा आंखल्यावर शिवाजीच्या मुलखांत मोगली फौजा चोहोंकडून चालून येऊं लागल्या.

ता. १३ जानेवारी १६७२ च्या सुमारास दिलीरखान, महाबतखान व बहादुरखान यांनीं पुणें व चाकण घेऊन शिवाजीच्या काळजासच हात घातला. जयसिंग व दिलीरखान यांनीं पांच वर्षांपूर्वीं जो बिकट प्रसंग शिवाजीवर आणला होता त्याहूनहि आतांचा प्रसंग अधिक बिकट होता. मोअज्झिमानें बादशहाविरुद्ध बंड करून मोगलांत पाडलेल्या फुटीचा फायदा शिवाजीस मिळाला होता तोहि, फायदा दिलीरखान व महाबतखान यांच्या आगमनानें मुअज्झमाचें बंड मोडल्यामुळें, नाहींसा

होऊन मोगलांत एकजूट झाली. मागील खेपेपेक्षां शिवाजीचें बळ आतां पुष्कळच वाढलें असलें तरी या नवीन संकटास तोंड देतांना शिवाजीचा मुत्सद्दीपणा, चातुर्य, धूर्तपणा, शौर्य व बुद्धिकौशल्य आतां चांगलेंच कसोटीस लागणार होतें. या प्रसंगीं महाराज रायगडावर असून त्यांनीं पायथ्याला महाड गांवीं आपली ठिकठिकाणच्या किल्ल्यावरील शिबंदी व आपले सेनापति यांना एकत्र जमवून पुढचा व्यूह रचला. त्यांनीं आपल्या सैन्याची एक मोठी तुकडी मोरोपंत पेशवे यांच्या हाताखालीं देऊन त्यांना उत्तर कोंकणांतून रामनगरच्या मार्गानें नाशिक जिल्ह्याच्या पश्चिम भागांत उतरून मोगलांना पायबंद देण्याची आज्ञा केली. मोरोपंत ता. २५ जानेवारी १६७२ च्या सुमारास रामनगरास पोंचला आणि रामनगर व जव्हार घेऊन बागलाणांत शिरला. त्यानें फेब्रुवारीपर्यंत बागलाणांतील साल्हेर, मुल्हेर व इतर किल्ले घेतले. ही बातमी कळतांच दिलीरखान शिवाजीचा मावळ प्रांत काबीज करण्याचें काम तहकूब ठेवून मोरोपंताशीं लढण्यास बागलाणांत आला.

त्याच्या स्वारीचें सभासदानें रसभरित वर्णन केलें आहे. दिलीरखान व मराठे यांचें युद्ध कणेरा गडापाशीं झालें. या गडास हल्लीं कान्हरा म्हणतात. तो धोडपच्या वायव्येस चार मैलांवर असून त्याच्या पायथ्याजवळून चांदवडच्या रांगेंतील मार्कंडा डोंगरांत उगम पावलेली त्याच नांवाची मार्कंडा नदी वाहते. कणेऱ्यापासून उत्तरेस ३।४ मैलांवरून दिंडोरी ते कळवण सडक जाते. मकरंद हाहि किल्ला (मकेरान) कांचना (कांचण) किल्ल्याच्या ईशान्येस आहे. सभासद लिहितो :—

“ दिलेलखान येऊन रवळजवळ्यास लागले. गडकरी बरे भांडले. मोठें युद्ध झालें. गड हातास (दिलेलखानाच्या) आला नाहीं. मोरोपंत पेशवे यांनीं गडकऱ्यांच्या (रवळा-जवळा) उपराळ्यास बारा हजार मावळे लोक रवाना केले. त्यांनीं जाऊन छापे घातले. ऐसा घाबरा केला. रामाजी पांगेरा म्हणून हशमांचा हजारी यानें हजार लोकांनिशीं कणेरा गडाखालीं युद्ध केलें. हजार लोक देखून दिलेलखान यानें फौजेनिशीं चालून घेतलें. रामाजी पांगेरा यानें आपले लोकांत निवड करून सातशें माणूस घेतलें. तितक्यांनीं निदान करून भांडण दिधलें. दिलेलखानाची फौज पायउतारा


वणी दिंडोरी रणक्षेत्र
जिल्हा नासिक
प्रमाण १"=१६ मैल
मुल्हेर
साल्हेर
सटाणे
गिरणा नदी
कळवण
अहिवंत
कान्हेरा
सप्तश्रृंगी
मार्कंडा
धोडप
कांचन
मंचन
चांदवड
वणी
रावळा
जावळा
दिंडोरी
बाणगंगा नदी
गोदावरी नदी
नासिक
त्र्यंबक

होऊन चालून घेतलें. चौफेरा मावळे वेढले. एक प्रहर टिपरी जैसी शिमग्यांत दणाणते तैसे मावळे भांडले. दिलेलखानाचे बाराशें पठाण रणास आले. मग सातशें माणूस व रामाजी पांगेरा सर्वहि उघडे बोडके होऊन एक एकास वीस वीस तीस तीस जखमा तीराच्या व बर्चीच्या लागल्या. लोक मेले. मोठें युद्ध झालें. मग दिलेलखान यांनीं तोंडांत अंगोळी घालून एक ..ग्का आश्चर्य केलें." या लढाईचा शेवट काय झाला हें सभासदानें सांगितलें नाहीं. परंतु तींत मराठ्यांचा पराभव झाला असावा. मराठ्यांची मर्दुमकी दिलीरखानास पाहण्याची हौस होती. ती पांच वर्षांपूर्वी पुरंदराच्या वेढ्यांत मुरारबाजी यानें अतुल पराक्रमानंतर धारातीर्थीं देह ठेवून बरीचशी पुरी केली होती. आतांहि रामाजी व त्याचे जोडीदार यांनीं विलक्षण शौर्य प्रकट करून दिलीरखानाचे डोळे पुनः निवविले.

साल्हेरचा वेढा

रवळा-जावळा व कणेरा गड लढून घेतल्यावर मोगलांचा एक सेनापति इखलासखान यानें साल्हेर किल्ल्यास वेढा दिला. मोरोपंत पेशवे किल्ल्याच्या रक्षणार्थ तेथें होतेच. कणेरा गडाची हकीकत कळल्यावर मोरोपंताच्या मदतीस अधिक सैन्य देणें आवश्यक वाटल्यावरून महाराजांनीं प्रतापराव गुजर यास साल्हेरीस जाण्यास सांगितलें. "त्या युद्धांत एका बाजूनें मराठ्यांच्या लष्करानें घोडीं घातलीं व दुसऱ्या बाजूनें मावळे (पायदळ) शिरले आणि मारामारी केली. चार प्रहर युद्ध झालें. मोगल, पठाण, रजपूत, रोहिले, तोफांचे हत्ती व उंटें आराबा घालून युद्ध झालें. त्यांत धुराळा असा उडाला कीं, तीन कोस औरस-चौरस आपलें व परकें माणूस ओळखूं येत नव्हतें. हत्ती रक्षणास आले. दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा झालें. घोडीं, उंटें व माणूस यांची (मेलेल्यांची) गणना नाहीं. रक्ताचे पूर वाहिले. रक्ताच्या चिखलांत रुतों लागले, असा कर्दम जाहला. राजियास सहा हजार घोडे, सहा हजार उंटें व सवाशें हत्ती सांपडले. मालमत्ता, खजिना, जडजवाहिर, कापड यांची अगणित बिछाईत हातास लागली. तेवीस नामांकित वजीर (सरदार) धरले. खासा इखलासखान व बहिलोलखान पाडाव जहाले. हजार दोन हजार सडे सडे पळाले. या युद्धांत प्रतापराव सरनोबत, आनंदराव, व्यंकाजी दत्तो, रुपाजी भोसले, सूर्यराव काकडे,

शिदोजी निंबाळकर, खंडोजी जगताप, गोंदजी जगताप, संताजी जगताप, मानाजी मोरे, विसाजी बल्लाळ, मोरो नागनाथ, मुकुंद बल्लाळ, इत्यादिकांनीं कस्त केली. तसेंच मावळे लोक व सरदार यांनीं कस्त केली. मुख्य मोरोपंत पेशवे व प्रतापराव सरनोबत या उभयतांनीं आंगीजणी (मोठें शौर्य) केली. सूर्यराव काकडे पंचहजारी मोठा धारकरी यानें युद्ध थोर केलें. तो जंबूरियाचा गोळा लागून पडला. सूर्यराव म्हणजे सामान्य योद्धा नव्हे. भारतीय युद्धांत जसा कर्ण त्याच प्रतिमेचा हा होता. वरकडहि नामांकित शूर पडले. असें युद्ध होऊन फत्ते जाहली.

" प्रतापराव व मोरोपंत यांनीं ही खुषखबर राजियास (रायगडावर) जासुदाबरोबर पत्रें देऊन कळविली. ती ऐकून तोफा मारिल्या. साखरा वांटल्या. जासुदाच्या हातांत सोन्याचीं कडीं घातलीं. प्रतापराव सरनोबत, मोरोपंत पेशवे, आनंदराव, व्यंकाजीपंत यांस अपार द्रव्य बक्षिस दिलें. सरदार हजारी, पंचहजारी, तसेच मावळे यांस बक्षिसें दिधलीं. नांवाजिलें. जे वजीर पाडाव झाले त्यांस वस्त्रें व अश्व देऊन सोडणें म्हणून हुकूम पाठविला. त्यावरून पेशवे व सरनौबत सरदार खुशाल जहाले. बहिलोलखान, इखलासखान व वजीर पाडाव झाले त्यांस वस्त्रें व अश्व देऊन सोडून दिलें. दिलेलखान ही खबर ऐकून माघारा पळोन गेला " (सभासद). एकंदरींत हें युद्ध फार मोठें व घनघोर झालें. मोगलांच्या या स्वारींतील हें एक अत्यंत मोठें युद्ध होय. त्यानें कणेरा गडावरील मराठ्यांच्या नाशाचें उट्टें भरून काढलें.

हें युद्ध १५ फेब्रुवारी सन १६७२च्या पूर्वीं झालें. त्याविषयींचा मजकूर मॅथ्यू ग्रे या इंग्रज अधिकाऱ्यानें स्वालीहून (सुरत) मुंबईस ता. १५ फेब्रुवारी रोजीं पाठविलेल्या पत्रांत आहे. " साल्हेरीस वेढा घालणाऱ्या दिलेलखानाच्या सैन्याचा मोड करून त्या किल्ल्याचा शिवाजीनें चांगला बंदोबस्त केला. दुसऱ्या एका लढाईत त्यानें बहिलोलखानास ठार मारून साल्हेरींत सुमारें तीस अंमलदार कैदेंत ठेवले आहेत. आतां त्यानें मुल्हेर घेतलें हें निश्चित असून सुरतेचा मार्ग ताब्यांत असल्यामुळें तो सुरतेला केव्हांहि येऊं शकेल " (प. सा. सं. खंड २, पृ. ४०९). या पत्रानेंहि सभासदानें

म्हटल्याप्रमाणें हें युद्ध घनघोर झाल्याचेंच सिद्ध होतें. यांतील ‘ बहिलोलखान कोण ’, अशी शंका सभासदाच्या शिवछत्रपति चरित्राचे संपादक रा. ब. काशिनाथ नारायण साने यांनीं घेतली आहे. ती शंका आदिलशहाच्या पदरींहि बहिलोलखान नांवाचा एक नामांकित सरदार होता, त्यावरून त्यांना आली असावी. पण मोगलांकडेहि बहिलोलखान या नांवाचा एक सरदार होता असें इंग्रजांच्या वरील पत्रानें सिद्ध झालें आहे. एतावता बहिलोलखान दोन असून एक आदिलशहाचा व हा दुसरा मोगलांचा.

साल्हेरचें युद्ध हें शिवकालांतील मराठ्यांचें अतिशय रोमहर्षणीय युद्ध होय. त्या युद्धाचें वर्णन त्या काळीं मराठे घरोघरीं व अड्ड्याअड्ड्यांतून मोठ्या आवेशानें एकमेकांपाशीं करीत असले पाहिजेत. तो एक अभिमानाचा व तरुणांना स्फूर्तीचा विषय झाला असला पाहिजे. त्यांतील योद्ध्यांचें गुणगान करतांना व ऐकतांना तरुणांचे बाहु स्फुरण पावत असतील. त्यांतील स्थळें व बलिदान केलेल्या वीरांचीं नांवें बहुतेकांना तोंडपाठ झालीं असतील. म्हणूनच सभासदाला त्या युद्धाची हकीकत ठसकेबाजपणानें व्यक्तींचा व स्थळांचा नामनिर्देश करून लिहितां आली. त्यांतील स्थळें नकाशावरून पाहतां अगदीं बिनचूक आहेत. ही लढाई कळवण तालुक्यांत झाली. कळवण तालुका डोंगराळ असून सह्याद्रीचा घाटमाथा तेथून अगदीं जवळ आहे. त्यावरच साल्हेर व मुल्हेर हे दोन किल्ले आहेत. साल्हेरच्या उत्तरेस बारा मैलांवर मुल्हेर आहे. हे दोन्ही किल्ले कळवण गांवाच्या वायव्येस अनुक्रमें १२ व १६ मैलांवर आहेत. साल्हेरच्या दक्षिणेस धोडप २४ मैलांवर आहे. आणि धोडपच्या आग्नेयीस चांदवडची डोंगराची रांग १२ मैल पसरली असून तींत कणेरागड धोडपपासून ४ मैलांवर आहे. या रांगेंतच रवळा-जवळा हीं शिखरें आहेत. त्या दोन शिखरांच्या मध्यभागीं एक डोंगरी किल्ला होता, तो आतां पडला आहे. याच किल्ल्यावर प्रथम दिलीरखान आला. तेथील गडकरी त्याजबरोबर चांगले लढले. त्या वेळीं रामजी व त्याचे सवंगडी यांनीं शर्थ केली. तेथून कणेर गडास वेढा देऊन तो घेतला. त्यानंतर प्रथम साल्हेर येथें वर सांगितल्याप्रमाणें तुंबळ युद्ध झालें. त्यांत मोगलांचा मोड झाल्यावर मुल्हेरहि मराठ्यांनीं घेतलें.

शिवाजीची चौथाई

साल्हेर-मुल्हेर युद्धांत मोंगलांचा चक्काचूर होऊन इतकी दाणादाण उडाली कीं, त्यांची हिंमत कायमची खचली. उलट शिवाजीच्या सैन्यास अधिक उमेद चढून मुलूखगिरीचें काम सोपें झालें. या युद्धानंतर मोरोपंत किल्ल्यांची व्यवस्था लावून जव्हारकडील उरलेलें कार्य पुरें करण्यास गेला. त्याला जव्हार येथें १७ लाखांचा खजिना मिळाला व त्यानें जव्हार संस्थान ताब्यांत घेतलें. त्याच्या भीतीनें रामनगराचा राजा आपलें कुटुंब घेऊन गणदेवीपासून चार कोसांवर असलेल्या चिखलीस पळाला. लढाया सारख्या सुरू असल्यामुळें शिवाजीला पैसा पाण्यासारखा खर्चावा लागत होता. म्हणून त्यानें मोगलाई मुलुखांतून चौथाई वसूल करण्याची क्लृप्ति काढली. त्यानें सुरतेच्या सुभेदारास पत्र पाठवून कळविलें, "तुमच्या बादशहानेंच माझा देश व माझी प्रजा यांच्या संरक्षणार्थ मला सैन्य ठेवण्यास भाग पाडलें आहे. त्या सैन्याचा पगार तुमच्यापासून पैसा घेतल्याशिवाय मी कसा देणार ! तुम्ही पैसा जर लवकर न द्याल तर मजकरितां सुरतेस एक घर पाहून ठेवा म्हणजे मी त्यांत बसून कर व जकात तेथील लोकांपासून जातीनें वसूल करीन" (प. सा. सं. खंड २ पृ. ४१९).

जव्हार संस्थान मोरोपंत काबीज करीत असतां दिलीरखान व बहादुरखान जवळ असूनहि त्यांची मोरो पंडितास प्रतिकारण्याची छाती झाली नाहीं. जव्हार संस्थानामागून मोरो पंडितानें मोगलांचा किल्लेदार जाधवराव याजपासून पूर्वेस सोळा मैलांवर असलेला व मोगलांनीं पुनः जिंकलेला त्रिंबकचा किल्ला व मग नाशिक घेतलें. (जाधवराव हा शिवाजीच्या मातुल घराण्यांतील आप्त होता). त्रिंबकास मोगलांच्या चारशें सैन्यापैकीं बरेंच जण कामास आले व जाधवराव कैद झाला. ता. १८ ऑक्टोबर १६७२ रोजीं मुंबईच्या इंग्रजांनीं सुरतेस कळविलें, 'शिवाजी मोठें सैन्य उभारीत आहे. त्याचें सोळा हजार सैन्य तयार असून तो चार मोठीं घोडदळाचीं पथकें आणखी वाढवीत आहे. आतां दिलीरखान एकटा पडला आहे. त्याच्याशीं युद्ध करण्याचा त्याचा विचार आहे. खानाचा त्यानें पराजय केल्यास गुजराथेचा शिवाजी मालक बनेल'. वरील पथकें मूळचीं मोगलांकडील असून तीं आतां फुटून सिद्दी हिलाल व इतर दोघे जण शिवाजीस

मिळाले आहेत व आणखीहि पुष्कळ येणार अशी वदंता आहे" (प. सा. सं. खंड २, पृ. ४२४).

शिवाजीनें मोगलांची नस पुरतेपणीं ओळखली होती. 'द्रव्येण सर्वे वशाः' या न्यायानें पैसा सोडला म्हणजे खान कसलाहि खाईन खाईन करणारा असला तरी तो वश होतो, असा त्यास अनुभव असल्यामुळें वरील पत्रांत म्हटल्याप्रमाणें सिद्दी हिलालासारखे सरदार त्यानें आपल्या गोटांत आणून दिलीरखानाचें सामर्थ्य अधिकच खच्ची केलें. त्याचा जोडीदार बहादुरखान याचें पाणी शिवाजीनें केव्हांच जोखलें होतें. त्याजविषयीं शिवाजी म्हणे, 'बहादुरखान 'पेंडीचें गुरूं' आहे. त्याचा गुमान काय आहे!' (सभासद, पृ. ७६). शिवाजीचें हें मत किती बरोबर होतें, याची साक्ष परभारें इंग्रजांनींच दिली आहे. "शिवाजीचा पुरा नाश व्हावा असा त्यांचा (मोगल सरदार) उद्देशच नाहीं. हे उमराव स्वतःच्या फायद्याकरितां या लढाया विशिष्ट धोरणानें बादशाही खर्चानेंच चालवीत असतात. नेट धरून एकदां युद्धाचा निकाल लावावा असें त्यांना कधींच वाटत नाहीं" (प. सा. सं. खंड २, पृ. ४५३). याचा अर्थ बादशहा व शिवाजी यांजकडून स्वतःची तुंबडी भरून घेऊन युद्ध लांबवावें व त्यावर गबर व्हावें. असो. बागलाणांतील पराभवानंतर बहादुरखान कांहीं दिवस भीमेच्या कांठीं जाऊन राहिला व तेथून पावसाळ्यासाठीं अहमदनगरास गेला. महाबतखानहि मे १६७२ मध्यें उत्तर हिंदुस्थानांत चालता झाला व त्याच्यामागून एका महिन्यानें मुअज्झमहि दिल्लीकडे रवाना झाला. त्यांच्या अनुपस्थितींत बहादुरखान हाच मुख्य सेनापति व दक्षिणेचा हंगामी सुभेदार नेमण्यांत आला. त्या जागेवर तो ऑगस्ट १६७७ पर्यंत होता.

सातारा ते कोल्हापूर

शिवाजीस जयामागून जय मिळाल्यामुळें व मोगलांचा चक्काचूर उडाल्यामुळें तो मोगली आघाडीसंबंधानें इतका निर्भय झाला होता कीं, तो मोरो पंडिताला मोगलांच्या तोंडावर ठेवून विजापूरकरांपासून मुलूख जिंकण्यास मोकळा झाला. त्यानें ६ जानेवारीपासून १६७३ त अण्णाजी दत्तो सुरनीस याच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यास सातारा प्रांतीं पाठविलें. "त्यांनीं नांदागिरी, चंदनवंदन, सातारा, परळी असे किल्ले घेतले, राजा

खासा किल्ले व देश पाहावयास रायरीहून निघाले. त्यांनीं वाईचा कोट येतांच घेतला. तसाच कऱ्हाडचा कोट, शिरोळ व कोल्हापूर घेतलें. रायबागपर्यंत देश घेतला. अण्णाजी दत्तोनें माल सावंत व मावळे यांची हजारी यांस सांगून हल्ला करून पन्हाळा किल्ला (६ मार्च १६७३) आदिलशाही होता तो घेतला. अशा रीतीनें मुलूख चौतर्फा आदिलशहाकडून सुटत चालला. तेव्हां त्याची व्यवस्था लावण्याकरितां कल्याण, भिवंडी, कोळवण, सालेर, लोहगड, जुन्नर, व बारा मावळें हारळीच्या घाटापर्यंत (खंडाळे पेट्यासुद्धां) राजांनीं मोरोपंत पेशव्याच्या हवालीं केली. चेऊल, दाभोळ, राजापूर, कुडाळ, बांदे, फोंडा पर्यंतचा कोंकणांतील मुलूख अण्णाजी पंताच्या स्वाधीन केला, वाईपासून कोपळपर्यंतचा प्रदेश दत्ताजीपंत वाकनीस यांच्या ताब्यांत दिला व दत्ताजीपंतास पन्हाळ्यावर ठेवलें " (सभासद).

मुंबईच्या इंग्रजांनीं ता. १५ सप्टेंबर १६७३ रोजीं लिहिलेल्या पत्रानें सभासदाच्या या माहितीस पुष्टीच मिळते. " एका बाजूनें मोगल व दुसऱ्या बाजूनें बहिलोल (विजापुरी) यांच्या पेचांत शिवाजी असल्यानें तो प्रतिकार करण्यास असमर्थ आहे असें सुरतवाले म्हणतात. पण वस्तुस्थिति अशी नसून शिवाजी दोघांनाहि तोंड देण्यास समर्थ आहे; एवढेंच नव्हे तर नुकताच त्यानें आदिलशाहींतील महत्त्वाचा किल्ला सातारा घेऊन तेथील अमर्याद लूट रायगडास नेली. वर सांगितलेले दोघेहि सरदार त्याच्या मुलुखांत या वर्षी शिरतील हें खरें असलें तरी रसदेचा तुटवडा भासून दीर्घकाळ तेथें राहूं शकणार नाहींत. कारण यंदा दुष्काळ आहे " (प. सा. सं. खं. २, पृ. ४५२।५३).

वरील सर्वच किल्ले शिवाजीनें लढून घेतले, असें नसून त्यांपैकीं कांहीं किल्ले फितुरीनें व लांच देऊनहि घेतले असले पाहिजेत. त्यांपैकींच पन्हाळा हा किल्ला; तो उघडपणें लढून घेण्यास फार अवघड व त्यास विलंबहि फार लागावयाचा, म्हणून त्यानें तो मुसलमानांकडून काडीचाहि प्रतिकार न होतां सुवर्णप्रयोगानें घेतला, असें डच गव्हर्नरानें आपल्या ईस्ट इंडिया कंपनीस लिहिलेल्या पत्रांत नमूद आहे! डचांना किंवा सर्वच युरोपियनांना इकडील दूरच्या बातम्या अगदीं बिनचूक कळत होत्या, असें नाहीं; त्यांपैकींच ही बातमी दिसते. बाकी इतकें खरें कीं, गडावरील लोक बेसावध असतांना

आण्णाजीपंतानें तो गड अल्पशा हानीनें घेतला असावा. त्याविषयीं जयराम कवीनें 'पर्णालपर्वतग्रहणाख्यान' नामक एक संस्कृत काव्यच लिहिलें आहे. जयरामाचें हें काव्य श्रेष्ठ प्रतीचें नाहीं व बिनकाहि नाहीं. तथापि तो लेखक शिवकालीन असल्यामुळें तें साररूपानें ग्रहण करण्यास हरकत नाहीं. त्याचें सार येणेंप्रमाणें –

पन्हाळगड कसा घेतला ?

"आण्णाजी पंडित प्रथम कोंकणांत राजापुरास गेला. तेथें त्यानें दोरांच्या शिड्या बाळगणारे, वाघनखवाले, मेखावाले, घोरपडवाले या सर्वांस जमवून पन्हाळगडावर रात्रींची चाल केली. हें सैन्य रात्रीं पन्हाळ्याच्या पायथ्याशीं पोंचलें व गडाच्या एका तुटलेल्या कड्याजवळ आलें. त्यांतील सैनिक एकमेकांस हात देऊन कडा चढले व कड्यावरून पठारावर गेले. गडावरच्या लोकांस शत्रूची चाहूल लागतांच किल्लेदार व त्याचे शिपाई शत्रूवर चालून गेले. किल्लेदार पठाण होता. तो तरवार उपसून आला. पण त्याचें मुंडकें शिवाजीचा एक योद्धा कोंडाजी यानें धडापासून वेगळें केलें. किल्ल्यावर आदिलशहाचा अधिकारी नागोजी पंडित होता. त्याच्या घराला वेढा घालून त्यास पकडण्यांत आलें. या रीतीनें किल्ला सर केल्यावर तें आनंददायक वर्तमान अण्णाजी पंडितानें जासुदाबरोबर शिवाजीस कळविलें. शिवाजीनें त्यास शंभर होन देऊन त्याच्या तोंडांत साखर घातली व स्वतः शिवाजी पन्हाळगड पाहावयास आला. तेथील नोकरांस ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें पारितोषिकें देऊन त्यानें गडावर एक महिना मुक्काम केला. गडावर त्यास शत्रूच्या तोफा, बाण, गोफणी, तरवारी, भाले, गोटे, लोखंडी गोळे, धनुष्यें, गवत, सरपण, तूप, तेल, मीठ, मध, गूळ इत्यादि सामग्री मिळाली." गडकरी गाफिल असतांना रात्रींची चढाई करून गड घेतला असला तरी, तेथील कांहीं अधिकाऱ्यांना अगाऊ अन्य रीतीनें वश करून घेण्याचा प्रयत्न झाला नसेल, असें म्हणवत नाहीं.

उमराणीची लढाई

या वेळीं विजापूर दरबाराची स्थिति समाधानकारक नव्हती. ता. २४ नोव्हेंबर १६७२ त दुसरा अली आदिलशहा मरण पावला व त्याच्या गादीवर बसलेला शिकंदरशहा अल्पवयी होता. तेव्हांपासून वजीर खवासखान

व इतर सरदार यांच्यांत भांडणें लागून एकंदर कारभारास विस्कळितपणा आला होता. त्यामुळें शिवाजीशीं मुद्दाम कलह माजविण्याची विजापूर दरबाराची इच्छा नव्हती. उलट शिवाजी मोंगलांशीं लढण्यांतच गुंतलेला बरा, म्हणजे त्याची झळ आपणांस लागणार नाहीं, या विचारानें विजापूरकर व गोवळकोंडेकरहि शिवाजीस प्रसंगविशेषीं मोठमोठ्या रकमा देऊन द्रव्यसाहाय्य करीत होते. पण मोंगलांशीं युद्ध चालू ठेवूनहि शिवाजी जेव्हां विजापूरकरांचा मुलूख जिंकीत चालला व त्यांचा मोक्याचा किल्ला पन्हाळा हाहि त्यानें घेतला, तेव्हां विजापूरचा वजीर खवासखान यानें बहिलोलखान यास पन्हाळा घेण्यास पाठविलें. बहिलोल याचें सबंध नांव अब्दुल करीम बहिलोलखान. त्याचा बहिलोलखान हा किताब दिसतो. त्याच किताबाचा सरदार दक्षिणेंत आलेल्या मोगल सैन्यांतहि असल्यामुळें त्यांच्या नांवांचा घोटाळा होतो. जयराम कवीच्या माहितीप्रमाणें त्या वेळीं शिवाजी पन्हाळ्यावर होता. बहिलोल विजापुराहून निघाल्याची बातमी कळतांच शिवाजीनें प्रतापराव गुजराकडून कुल-लष्कर जमविलें व हुकूम केला कीं, 'विजापूरचा बेलोल एवढा वळवळ करीत आहे. त्यास मारून फत्ते करणें.' त्याप्रमाणें प्रतापरावानें निघून खानास उमराणीस गांठलें. उमराणी हें गांव विजापूरच्या पश्चिमेस ३६ मैलांवर आहे. त्याच्या उत्तरेस जत सहा मैल व पश्चिमेस महांकाळ-कवठें सुमारें अठरा मैल आहे. तेथून कोल्हापूर साठ मैल असावें. सभासद म्हणतो, "चौतर्फा राजियाचे फौजेनें त्यास कोंडून उभा केला. त्याला पाणी मिळूं दिलें नाहीं, असा जेर केला. युद्धहि थोर जाहलें. इतक्यांत अस्तमानहि जाहला. मग निदान करून नबाब (बहिलोल) पाणियावरी जाऊन पाणी प्याला. त्यानें प्रतापराव सरनोबत यास अंतःस्थ कळविलें कीं, 'आम्ही तुम्हांवरी येत नाहीं. पादशहाच्या हुकुमानें आलों. याउपरी मी तुमचा आहें; हरएक वक्तीं आपण राजियाचा दावा न करी!' असें किती एक ममतेनें उत्तरें सांगून सल्ला केला. मग राजियाचें लष्कर निघून गेलें."

जयराम कवीनें उमराणीच्या युद्धाची हकीकत अधिक खुलासेवार दिली आहे. ती अशी : "शिवाजीनें पन्हाळा घेतल्याचें वर्तमान विजापुराचा धनी होऊन बसलेल्या खवासखानास ताबडतोब कळलें. बहिलोलखानादि

विरुद्ध पक्षाच्या मंत्र्यांनीं या पराजयाचें खापर खवासखानाच्या डोक्यावर फोडलें. शिवाजीचा विजापूरकरांशीं झालेला तह तुझ्यामुळें मोडला असा त्यांनीं त्यास दोष दिला. तें ऐकून खवासखानानें, मी जर असें राज्याचें नुकसान करण्यास कारण झालों आहें तर, तूंच शिवाजीवर जाऊन राज्याचा फायदा करून दे, असा त्यास टोमणा दिला. बहिलोलहि युद्धास सिद्ध होऊन बादशहाचा विडा घेऊन निघाला. त्यानें पहिला मुक्काम विजापुरापासून तीन कोसांवर तिकोटें या गांवीं गेला. तिकोट्याहून खान दोन दिवसांनीं उमराणी गांवाजवळ आला. तेथें त्याला बादशहाकडून पत्र आलें कीं, सर्जाखान, मुजफर मलिक हे दोघे रांगणा किल्ल्याच्या आसपास आहेत त्यांस वश करून घ्यावें. त्याचप्रमाणें आदवानी येथें सिद्दी मसूद, कर्नूल येथें अब्दुल अजीज व नळदुर्गाजवळ खिदीरखान हे तिघे सेनापति आहेत. या तिघांनीं दिलीरखानास भेटून व लांचलुचपत देऊन त्याच्या सैन्याची मदत घ्यावी आणि अशा सर्वांनीं मिळून शिवाजीला युक्तीनें जिंकावें. अर्थात् हा सर्व जथा जमण्यास साहजिकच बराच काळ लागणार व ते सर्व एकत्र जमले म्हणजे त्यांना तोंड देणें दुरापास्त होणार; यास्तव हीं सर्व तोंडें एकत्र जमण्यापूर्वीच एकट्या बहिलोलखानास जलदीनें गांठून त्याचा धुव्वा उडवावा असा राजांनीं विचार करून पन्हाळगडावर प्रतापराव, आनंदराव आदि सेनापतींशीं एकांतांत गुप्त मसलत केली. तींत स्वारीचा बेत ठरला व प्रतापराव प्रभृति सेनापति विडे घेऊन निघाले. ते रातोरात गुप्तपणें दोन दिवसांत शत्रूचा तळ जेथें होता तेथें पोंचले. त्यांचें सर्व सैन्य एकदम न येतां टोळयाटोळयांनीं आलें व त्यांनीं शत्रूच्या चहूंबाजूंस तळ दिला. इतकें मोठें सैन्य जमलेलें पाहून शत्रु घाबरला. शिवाजीच्या सैन्याच्या आघाडीला सिद्दी हिलाल होता. त्याच्यामागें एका कोसावर विठोजी शिंदा राहिला. कृष्णाजी भास्कर व विठ्ठल पीलदेव हे दोघे चांगल्या तयारीनें शत्रु-सैन्याच्या दोन्ही बगलांवर राहिले आणि विठो बल्लाळ नांवाचा सेनापति सभोंवतीं घिरट्या घालीत राहिला. इतक्यांत प्रतापराव एक हजार घोडेस्वारांनिशीं तेथें दौडत आला. तेव्हां हत्तीस पाणी पाजण्यासाठीं बहिलोल तलावावर जात असतां, त्यास शत्रूकडून आपण वेढले गेलों असल्याचें कळलें. त्यापूर्वी बहिलोलखानाला याची कल्पना नव्हती. या कारणानें

त्याच्या सैन्याची धांदल उडाली. ती पाहून मराठे वीरांनीं तत्क्षणीं शत्रूवर हल्ला केला. येथें उभय पक्षांकडील घोडदळ व पायदळ यांचें चार घटका मोठें युद्ध झालें. त्यांत कांहीं लोक ठार होऊन पडले. आनंदरावानें शत्रूवर पिछाडीकडून हल्ला केला. शत्रूनें त्यास जखमी केला असतां तो डोक्यावर ढाल धरून व तरवार उगारून शत्रु-सैन्यांत घुसला आणि तीन घटकांपर्यंत त्यानें शत्रुसैन्याची त्रेधा उडविली. इतक्यांत शत्रूचा उन्मत्त हत्ती सुटला. त्यानें साखळदंड तोडले व धांवत सुटून आपल्याच सैन्याची दाणादाण उडवून दिली !

"शिवसैन्यापैकीं रूपाजी भोसला, सोनाजी मोहिता व शिदोजी निंबाळकर हे आपल्या सैन्याच्या तुकडीसह एका बाजूनें शत्रूवर चालून गेले व दुसऱ्या बाजूनें विठोजी शिंदा व विठ्ठल पीलदेव हे दोघे चालून गेले. इतक्यांत विजापूरकरांचा भाईखान नांवाचा पठाण सेनापति युद्धांत घुसला. त्याजवर नाईक, पांढरे, खराडे व दुसरे वीर चालून गेले. त्या वेळीं पठाणांचें व मराठ्यांचें मोठें युद्ध जुंपलें (१५ एप्रिल १६७३). त्यांत उभयतांनीं एकमेकांवर बाण, तरवार, भाले इत्यादि आयुधांनीं प्रहार केले. कित्येकांचीं तरवारींनीं छाटलेलीं डोकीं खालीं पडलीं. या वेळीं शिदोजी निंबाळकरानें मोकाट सुटलेला हत्ती पकडून घट्ट शृंखलांनीं बांधून टाकला ! सिद्दी महमद बरकी हा बहिलोल-खानाचा मोठा साथीदार होता. तो सूर्यास्तसमयीं मोठ्या घोड्यावर बसून गजव्यूहामधून बाहेर पडला. त्याच्या अंगावर मराठ्यांकडील दिपाजी राऊतराव व कृष्णाजी भास्कर नागव्या तरवारी उगारून व घोडे भरधांव सोडून तुटून पडले. बरकी चिलखत घातलेला असून त्याच्या खांद्यावर वार करण्यांत आला. उलट बरकीनें मोठें धनुष्य उचलून दिपाजी राऊताच्या घोड्यावर बाण सोडला. त्या बाणानें दिपाजीचा घोडा प्राणास मुकला. तेव्हां दिपाजी दुसऱ्या उत्तम घोड्यावर स्वार झाला. त्या घोड्याच्या कुशींत व पाठीवर तरवारीचे तीन घाव बसले. तरी तो घोडा डगमगला नाहीं. नंतर दिपाजीनें बरकीच्या खांद्याच्या उघड्या सांध्यावर प्राणहारक प्रहार करून त्याला भूमीवर पाडला; आणि दिपाजीनें आपला जखमी झालेला घोडा सोडून देऊन बरकीच्या घोड्यावर तो बसला ! बरकीच्या

मृत्यूनें बहिलोलखानास थोर दुःख झालें; पण त्याला न पकडतां प्रतापरावानें जाऊं दिलें. मागाहून कृष्णाजी भास्करानें शत्रूचे हत्ती, घोडे व रथ यांचें संकीर्ण सैन्य लुटलें."

प्रतापरावावर रोष

बहिलोलखान याचाच शिवाजीला मुख्य विरोध असून त्यालाच प्रतापरावानें सोडून दिला, याविषयीं सभासद व जयराम कवि या दोघांची एकवाक्यता आहे. प्रतापरावानें उमराणीच्या युद्धांत अप्रतिम शौर्य गाजविलें, याबद्दल शिवाजीनें त्यास धन्यवादच दिले असतील. परंतु आयता हातीं लागलेला मोठा झुंजार सेनापति बहिलोल यास सोडून देण्यांत राजकीय दृष्ट्या प्रतापरावानें चूक केली यांत शंका नाहीं. म्हणूनच महाराजांचा त्याजवर रोष होऊन त्यांनीं त्यास दोष दिला. महाराज म्हणाले, 'सल्ला काय निमित्य केला?' यानंतर प्रतापराव उमराणीहून धारवाडाकडे गेला. तिकडे त्यानें अनेक गांवें लुटलीं त्यांत हुबळीहि लुटली. त्या लुटींत इंग्रजांची हुबळींतील वखार सांपडून तिचीहि लूट झाली; आणि तांब्याचीं भांडीं, कापड, मिरीं, शिसें, काथ्या, कागदाचीं रिमें, इत्यादि ७८९४ होन किमतीचा माल प्रतापरावानें नेला (१६ एप्रिल १६७३). ही बातमी समजतांच आदिलशहानें मुजफरखानास हुबळीवर पाठविलें. पण तो येण्यापूर्वींच प्रतापराव लुटीचे बोजे घेऊन चालता झाला होता. प्रतापराव व मुजफरखान यांजमध्यें एक दिवसाचें अंतर पडलें. मुजफरखानापाशीं चार हजार घोडदळ होतें. मुजफरखानानें ही चूक केल्यामुळें असो किंवा तो फितूर झाल्याचा संशय त्याच्या सेनापतींना आल्यामुळें असो, त्याचें सैन्य त्याजविरुद्ध बंड करून उठलें. आदिलशहाचीहि त्याजवर इतराजी होऊन त्यानें त्याची जहागीर काढून घेतली.

हा अपमान सहन न झाल्यामुळें मुजफर आदिलशहावर उलटला व उरलेल्या फौजेनिशीं बेळगांवास गेला. त्याचें बंड मोडण्याकरितां बहिलोलखान १४ जून १६७३ च्या सुमारास विजापुराहून बेळगांवावर चालून आला. तो पन्हाळा प्रांतांत आला असतां प्रतापरावास उद्देशून राजे म्हणूं लागले कीं, 'हा घडोघडीं येतो. यासाठीं तुम्ही लष्कर घेऊन, बेलोलखान येतो

याशीं गांठ घालून फत्ते करणें, नाहीं तर तोंड न दाखविणें.' महाराज मनांत प्रतापरावाविषयीं प्रेम व आदर बाळगूनहि असे जरबेचे शब्द बोलले. ते प्रतापराव मानी व मर्द त्याच्या मर्मी झोंबले. कोल्हापुरापासून गडहिंग्लज दक्षिणेस फारसें दूर नाहीं. तेथून ८ मैलांवर नेसरी या गांवापाशीं प्रताप-रावानें बहिलोलखानास गांठलें. प्रतापरावाजवळ सैन्य बरेंच होतें. पण त्यास मागें टाकून प्रतापराव अगदीं थोड्या लोकांनिशीं बहिलोलवर चालून गेला. त्याच्याबरोबर फक्त सहाच स्वार होते आणि बहिलोल फार मोठ्या फौजे-निशीं खिंडींत होता. त्याजवर प्रतापराव बेफामपणानें तुटून पडला. त्या चकमकींत त्याच्या व बरोबरच्या सहा शूरांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. सेनापतीच नाहींसा झाल्यावर प्रतापरावाच्या सैन्याचा बहिलोलला सहज धुव्वा उडवितां आला. त्या लढाईत मराठ्यांचें फार नुकसान झालें. प्रताप-रावाचा दुय्यम सेनापति आनंदराव होता, त्यानें उरलेल्या सैन्याची जमवा-जमव केल्याचें समजल्यावर, शिवाजीनें त्यालाच त्या सैन्याचें आधिपत्य देऊन प्रतापरावाच्या मृत्यूचा सूड उगविण्याची आज्ञा केली. त्यानंतर आनंदरावानें शिवाजीस धीराचें पत्र पाठवून प्रतापराव नेसरीजवळील खिंडींत फक्त सहा सवंगड्यांनिशीं शत्रूशीं कसा लढला व सैन्याची कुमक न पोंचल्यामुळें कसा मारला गेला हें लिहिलें होतें. त्यालाच शिवाजीनें 'शत्रूचा मोड केल्याशिवाय मला तोंड दाखवूं नकोस' असा हुकूम केला. तो हुकूम हातीं पडतांच आनंद-राव कसलेला योद्धा, बहिलोलखानाचा पाठलाग करीत शत्रूच्या मुलुखांत शिरला. या वेळीं मोगलांनीं बहिलोलखानाला प्रत्यक्ष मदत करण्याचें ठरवून दिलीरखान स्वतः त्याच्या साहाय्यास त्वरेनें आला. त्या दोघांच्या संयुक्त सैन्यापुढें आपली धडगत नाहीं असें पाहून आनंदराव रोजीं ४५ मैलांच्या मजला मारीत कारवाराकडे वळला. त्याचा पाठलाग त्या दोघांनीं पुष्कळ दिवस केला तरी कांहीं न साधल्यामुळें ते दोघे परत फिरले. दिलीरखान पन्हाळ्यास वेढा घालण्याकरितां म्हणून गेला. तो तेथें फक्त पांच दिवस थांबून परतला आणि बहिलोलखान कोल्हापुरास थांबला.

इकडे आनंदरावानें कर्नाटकांत बरेंच आंत शिरून बहिलोलखानाच्या जहागिरीपैकीं बंकापुरापासून २५ मैलांवरील पेंच नांवाचा गांव लुटून ती लूट ३ हजार बैलांवर लादून नेली. बहिलोलखान व खिदरखान यांनीं त्याचा

प्रतिकार केला. त्यांचें त्याजबरोबर बंकापुरापाशीं घनघोर युद्ध झालें. त्यांत खिदरखानाचा भाऊ व बहिलोलचा भाचा असे मारले गेले आणि आनंदरावाचा जय होऊन त्याला पांचशें घोडे व दोन हत्ती वगैरे भरपूर लूट मिळाली. ती शिवाजीकडे पोंचवून तो आतां बालाघाटाकडे लूट मिळविण्यास गेला (४ एप्रिल १६७४; प. सा. सं. खंड २, पृ. ४७७।४७८).

वरील हकीकत नारायण शेणव्यानें रायगडाहून मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरास लिहून पाठविली. ती त्यास शिवाजीच्या अधिकाऱ्यापासून कळल्यानें विश्वसनीय मानावयास पाहिजे. अर्थात् ती सर्व ४ एप्रिल १६७४ रोजीं घडली नसून त्यापूर्वींच्या काळांतील आहे.

प्रतापराव व आनंदराव हे विजापूरच्या सरदारांशीं लढत असतां शिवाजी स्वस्थ नव्हता. आनंदराव व शिवाजी यांचा रोख आतां नवीन मुलूख जिंकण्यापेक्षां लूट मिळविण्याकडेच अधिक होता. आनंदरावानें कर्नाटकांत शिरून कारवारापर्यंतच्या मुलखांत लूट केली तर शिवाजी पंचवीस हजार सैन्य घेऊन विजापूरकरांच्या मुलखांत तीन महिने सैन्याच्या खर्चाकरितां लूट मिळवीत हिंडत होता. तो ८ डिसेंबर १६७३ च्या सुमारास चार हजार पायदळ व दोन हजार घोडदळ घेऊन कुदेरा येथें (कारवाराकडे) गेला. त्याची बंकापुरापाशीं बहलोलखानाबरोबर व चंदगडापाशीं सर्जाखानाबरोबर लढाई झाली व तींत त्याचा मोड झाल्याचें वर्तमान कारवारच्या इंग्रजांनीं सुरतेस कळविलें आहे. त्या लढाईनंतर शिवाजी लवकर परत गेला, असें बातमीदार लिहितो (प. सा. सं. खंड २, पृ. ४७१).

मागें लिहिल्याप्रमाणें प्रतापरावाचा शोचनीय शेवट झाल्यावर महाराजास आपण त्यास बोललेल्या कठोर शब्दाबद्दल दुःख वाटलें असेल यांत नवल काय ? प्रतापरावासारखा प्रतापी मुख्य सेनापति पडल्यावर महाराजांपुढें त्याच्या पदावर कोणास नेमावें हा प्रश्न आला. पण महाराजांनीं आपल्या अलौकिक गुणांच्या जोरावर इतकीं नररत्नें जमा केलीं होतीं कीं, त्यांना लायक माणसांचा कधींच तुटवडा भासला नाहीं. त्यांच्या सैन्याचें एक शिबिर कोंकणांत चिपळुणाजवळ होतें, तेथें जाऊन व लायक माणसांची चौकशी करून त्यांनीं हंसाजी मोहिते याची निवड केली (८ एप्रिल

१६७४). तो 'बरा, शहाणा, मर्दाना, सबुरीचा चोंकस शिपाई, मोठा धारकरी पाहून त्यास हंबीरराव हा किताब दिला व त्यास सरनौबती सांगितली.'

शिवाजीस रायगडावर ६ जून १६७४ रोजीं राज्याभिषेक झाला. तोंपर्यंत मोगल व आदिलशहा यांजबरोबर त्याचा तह झाला नसला तरी युद्धाची तीव्रता आतां कमी झाली होती. मोगलांचा मुख्य सेनापति दिलीरखान हा मे महिन्यांत दिल्लीस औरंगजेबाच्या भेटीस जाऊन सरहद्दीवर अफगाणांशीं लढण्याकरितां गेला व एकटा बहादुरखान इकडे उरला. पण तो शिवाजीच्या खिसगणतींतहि नव्हता. विजापूरकरांनाहि युद्धाचा कंटाळा आला असून त्यांचे मुत्सद्दी मे महिन्यांत शिवाजीकडे जाऊं-येऊं लागले होते (प. सा. सं. खंड २, पृ. ४९१) आणि शिवाजीनेंहि राज्याभिषेक होऊन जाईपर्यंत त्यांस नादावर ठेवलें असल्यामुळें विजापूरकरहि थंडावलेच होते. अशा रीतीनें राज्याभिषेकासारख्या अत्यंत मंगलसमयीं जी शांतता असावयास पाहिजे ती बरीचशी प्रस्थापित झाली होती.

प्रकरण चौदावें

श्रीशिवराज्याभिषेक

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥

— श्रीमद्भगवद्गीता

शिवाजीमहाराजांस राज्याभिषेकाची कल्पना काशीचे विद्वान् व स्वधर्मनिष्ठ ब्राह्मण विश्वेश्वर ऊर्फ गागाभट्ट यांनीं सुचविली. ते महाराजांच्या भेटीस काशीहून रायगडावर मुद्दाम आले. " भट गोसावी, थोर पंडित, चार वेद, सहा शास्त्रें, योगाभ्याससंपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येनें निपुण, कलियुगींचा ब्रह्मदेव असे पंडित. ते येतांच त्यांस राजे व सरकारकून (प्रधान) यांनीं सामोरे जाऊन भेट घेऊन सन्मानानें आणिलें. त्यांची पूजा नाना प्रकारें रत्नखचित अलंकार, पालखी, घोडे, हत्ती देऊन व उदंड द्रव्य देऊन करण्यांत आली. त्यायोगें गागाभट्ट बहुत संतुष्ट झाले " (सभासद). भेट झाल्यावर कांहीं दिवसांनीं भटजींनीं राज्याभिषेकाचा महत्त्वपूर्ण मुद्दा विचारासाठीं काढला. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा कीं, मुसलमान बादशहा या देशांत येऊन तक्तावर बसून, छत्र धरून पातशाही करतात, तर महाराजांनींहि तसेंच कां करूं नये ? " त्यांनींहि चार पादशाही दबाविल्या, पाऊण लाख घोडा, लष्कर, गड, कोट असे मिळविले आहेत; पण त्यांस तक्त नाहीं हें योग्य नव्हे. याकरितां शिवाजी या मराठा राजानें छत्रपति व्हावें ! राजांना ही कल्पना मानवली व तिचा पूर्ण विचार करण्याकरितां अवघे मातबर लोक बोलावून आणून त्यांचें मत घेण्यांत आलें." राज्याभिषेकाची ही कल्पना खरोखरच अभिनव व चित्तवेधक होती. मुसलमानांचा अंमल गेल्या तीनशें वर्षांत बसल्यापासून विजयनगरचे राजे सोडल्यास दक्षिणेंत स्वतंत्र असा एकहि राजा झाला नाहीं. तो अभूतपूर्व मान शिवाजीराजांनीं मिळविला. ते गेलीं कांहीं वर्षें राजे म्हणूनच नांदत होते व औरंगजेबानेंहि त्यांना 'राजा' ही पदवी आपण होऊन दिली होती.

पण असे नामधारी राजे भरतखंडांत छपन्न पडले होते. जयसिंग हाहि राजाच होता. शहाजी हेहि राजेच होते. या राजांना 'सरदार' याहून अधिक किंमत नव्हती. ते स्वतंत्र नव्हते. शिवाजीमहाराज हे स्वतंत्र होते. तरी राज्याभिषेकावांचून त्यांचा राजेपणाचा दर्जा सर्वमान्य होणार नव्हता. आणि तो प्राप्त झाल्यावांचून भोंवतालचे मुसलमान बादशहा यांना शिवाजी आपल्याबरोबरीचा झाला असें वाटणार नव्हतें. इंग्रज, डच, पोर्तुगीज व फ्रेंच व्यापाऱ्यांवरहि त्याचें वजन पडणार नव्हतें आणि अखिल भारत-वासीयांनाहि आपला एकमेव स्वतंत्र राजा झाल्याचें कळून जें आनंदाचें भरतें यावयाचें तें आलें नसतें व भविष्य काळ उज्ज्वल होईल अशी आशा उत्पन्न झाली नसती. असा सर्व बाजूंनीं साधक-बाधक व पोक्त विचार करून त्या सर्वांनीं या अभिनव व उद्दीपक घटनेस अन्तःकरणपूर्वक संमति दिली.

अडचणींचा निर्वाह

अशा रीतीनें राज्याभिषेक करण्याचें ठरल्यावर त्याची पूर्वतयारी करण्यास गागाभटजींना रायगडीं राहणेंच भाग होतें. या कार्यांत धर्म-शास्त्रदृष्ट्या बऱ्याच अडचणी दिसूं लागल्या. त्यांचें निवारण गागाभटजी करीत गेले. पहिली अडचण ही कीं, राज्याभिषेकाचा विधि क्षत्रियांना विहित आहे. तेव्हां महाराजांचें क्षत्रियत्व प्रथम सिद्ध करावयास पाहिजे. महाराज हे राजपुतान्यांतील शिसोदे या रजपूत घराण्यापैकीं ही गोष्ट तेव्हां मशहूर होती. आणि रजपूत हे वर्णानें क्षत्रिय असून क्षत्रिय या दृष्टीनें त्यांस राज्याभिषेक करण्यास हरकत नाहीं, असें भटजींनीं ठरविलें; पण क्षत्रिय म्हटला म्हणजे त्यास त्रैवर्णिकांस अवश्य असा उपनयन-संस्कार व्हावयास पाहिजे. त्यावांचून राज्याभिषेकविधि करतां यावयाचा नाहीं. यास्तव त्यांचें उपनयन करण्यांत आलें. महाराज या वेळीं चव्वेचाळीस वर्षांचे होते. त्यांचे अनेक विवाह होऊन त्यांस मुलें-बाळेंहि झालीं होतीं. अशी स्थिति असतां जो व्रतबंध १० व्या वर्षी व्हावयास पाहिजे तो इतक्या प्रौढ वयांत करावयास धजणें हें एक मोठेंच धाष्टर्य; किंबहुना हा एक क्रान्तिकारक उपक्रम होता यांत शंका नाहीं. त्यामुळें त्या बाबतींत कसा घोळ पडला असेल याची कल्पना तत्कालीन डच पत्रावरून येण्यासारखी

आहे. हें पत्र ता. ३ ऑक्टोबर १६७४ रोजीं म्हणजे राज्याभिषेकानंतर चार महिन्यांनीं वेंगुर्ल्याहून बटेव्हियास लिहिलें आहे. त्यांत पत्रलेखक म्हणतो :–

" पुष्कळ दिवस पूर्वतयारी करून जूनमध्यें शिवाजीस राज्याभिषेक झाला. ब्राह्मण व विद्वान् भटजी सुमारें ११००० रायगडावर जमले शिवाजीनें मुख्य व विद्वान् गृहस्थांना आपला हेतु सांगितला. हल्लींची भोसले जात सोडून क्षत्रिय जातींत प्रवेश केल्याशिवाय आपल्याला मुकुट धारण करतां येणार नाहीं याकरितां आपल्याला त्या जातींत घ्यावें अशी त्यानें विनती केली. तुमचे पूर्वज पिढ्यानुपिढ्या भोसलेच असल्यानें तसें करणें अशक्य आहे असें विद्वज्जनांनीं सांगितलें. भोसले हे क्षत्रियांचेच वंशज असल्यानें असें जातिपरिवर्तन होऊं शकेल, असें शिवाजीचें म्हणणें पडलें. तेव्हां प्रथम क्षत्रिय बनल्याशिवाय शिवाजी मुकुटधारणाला योग्य होणार नाहीं, असा विचार करून आणि पूर्वीसारखें जुलमानें राज्य न करण्याचें वचन त्यानें दिलें आहे हें लक्षांत घेऊन, गेल्या २९ मे रोजीं दुसऱ्या पक्षाच्या मंडळीनें त्याला मोठ्या समारंभानें क्षत्रिय करून घेतलें. क्षात्रधर्माची दीक्षा ते त्याला देणार होते; परंतु ब्राह्मणांचा आचार आपणांस शिकवावा अशी त्यानें इच्छा दर्शविली; परंतु ही गोष्ट त्यांना मान्य होईना. तथापि त्यांपैकीं एका मुख्यानें (गागाभट्ट) आपली संमति दिली; आणि शिवाजीनें त्याला सात सहस्र होन बक्षिसी (दक्षिणा) दिली. एक सबंध दिवस त्याबद्दल संस्कार करून १७ सहस्र होन धर्मादाय करण्यांत आला " (प. सा. सं. खंड २, पृ. ५०४).

उपनयनाची बाब इतक्या वयाला विचित्र असल्यानें ब्रह्मवृंदांना एकदम मान्य न व्हावी यांत आश्चर्य कसलें ? तथापि त्यांनीं महाराजांच्या लोकोत्तर कृत्याचा विचार करून त्यास संमति दिली, यांत त्यांची समयज्ञताच दिसून आली. आतां राज्याभिषेकाची मूळ कल्पना शिवाजीची कीं गागाभट्टांची, हा मुद्दा गौण असला तरी त्याचा उल्लेख डचांच्या पत्रांत आला असल्यानें त्याजकडे डोळेझांक करणें इष्ट नव्हे. डचांना मराठी भाषेचें, इकडील रीति-रिवाजांचें व विचारपद्धतीचें ज्ञान नसल्यामुळें त्यांच्या माहितीपेक्षां सभासदाचीच माहिती अधिक ग्राह्य मानावयास पाहिजे.

आणि त्यानें तर ही कल्पना गागाभट्टापासूनच उद्भूत झाली, असें स्वच्छ लिहिलें आहे, त्या अर्थीं तेंच खरें मानून चालावयास पाहिजे.

रत्नजडित सिंहासन

सभासद पुढें म्हणतो, "उत्तरेचे क्षत्रियांचे व्रतबंध होतात, त्याप्रमाणें व्रतबंध करावा हा विचार आधीं करून भट गोसावी यांनीं राजियाचा क्षेत्रीं (महाबळेश्वरीं !) व्रतबंध केला. शुद्ध क्षत्रिय आधीं केला. अपार द्रव्यधर्म केला. कुल आपले देशांतून परदेशांतून पन्नास सहस्र ब्राह्मण थोर थोर क्षेत्रींहून मिळाले. तो सर्वहि समुदाय (राज्याभिषेकापर्यंत) राहून घेतला. प्रत्यहीं मिष्टान्नभोजनास घालूं लागले. पुढें तक्तारूढ व्हावें म्हणून तक्त सुवर्णाचें बत्तीस मणांचें सिद्ध करविलें. नवरत्नें अमोलिक जितकीं कोशांत होतीं त्यामध्यें शोध करून मोठीं मोलाचीं रत्नें तक्तास जडविलीं व जडित सिंहासन सिद्ध केलें. रायरीचें नांव रायगड म्हणून ठेवलें. तक्तास स्थळ तोच गड नेमिला. गडावरीं तक्तीं बसवावें असें केलें. सप्त नद्यांचीं उदकें व थोर थोर नद्यांचीं उदकें व समुद्रांचीं उदकें आणविलीं. नामांकित तीर्थें व क्षेत्रें तेथील उदकें आणविलीं. सुवर्णाचे कलश केले व सुवर्णाचे तांब्रे केले. आठ कलश व आठ तांबे यांनीं अष्टप्रधानांनीं अभिषेक करावा असा निश्चय करून सुदिन पाहून मुहूर्त पाहिला. शालिवाहन शके १५९६ ज्येष्ठ मासीं शुद्ध त्रयोदशीस मुहूर्त पाहिला. ते दिवशीं राजियांनीं मंगल स्नानें करून श्रीमहादेव व श्रीभवानी कुलस्वामी, उपाध्ये प्रभाकर भटाचे पुत्र बाळंभट कुलगुरु व भट गोसावी, वरकड श्रेष्ठ भट व सत्पुरुष अनुष्ठित या सर्वांची पूजा यथाविधि अलंकार वस्त्रें देऊन केली. सर्वांस नमस्कार करून अभिषेकास सुवर्ण चौकीवर बसले. अष्टप्रधान व थोर थोर ब्राह्मणांनीं स्थळोस्थळींच्या उदकांनीं सुवर्ण-कलशपात्रांतून अभिषेक केला. दिव्य वस्त्रें, दिव्य अलंकार घेऊन व सर्व पूज्य मंडळींना नमस्कार करून राजे सिंहासनावर बसले. कितयेक नवरत्नादिक सुवर्ण-कमळें व नाना सुवर्ण-फुलें, वस्त्रें उदंड दिधलीं. दान पद्धतीप्रमाणें षोडश महादानें इत्यादिक दानें केलीं. सिंहासनास अष्टखांब जडित केले. त्या स्थानीं अष्टप्रधानांनीं उभें राहवें. पूर्वीं कृतयुगीं, त्रेतायुगीं, द्वापारयुगीं, कलियुगाचे ठायीं पुण्यश्लोक राजे सिंहासनीं बैसले. त्या

पद्धतीप्रमाणें शास्त्रोक्त सर्वहि साहित्य सिद्ध केलें. अष्टखांबीं अष्टप्रधान उभे राहिले. त्यांचीं नांवें बितपशील—

(१) मोरोपंत (त्रिंबकपंतांचे पुत्र) पेशवे मुख्य प्रधान. (२) नारो नीलकंठ व रामचंद्र नीलकंठ मुजुमदार यांचें नांव अमात्य. (३) रघुनाथ पंडितराव होते त्यांचे पुत्र मोरेश्वर पंडितराव. (४) हंबीरराव मोहिते सेनापति. (५) दत्ताजी त्रिंबक वाकनीस यांचें नांव मंत्री. (६) त्रिंबकजी सोनदेव डबीर यांचे पुत्र रामचंद्रपंत सुमंत. (७) अण्णाजीपंत सुरनीस यांचें नांव सचिव. (८) निराजी रावजी यांस न्यायाधिशी.

येणेंप्रमाणें संस्कृत नांवें ठेवलीं. अष्टप्रधान स्थळें नेमून उभे केले. बाळ प्रभु चिटणीस व नीळ प्रभु पारसनीस, वरकड अष्टप्रधानांचे मुतालिक व हुजरे प्रतिष्ठित सर्वहि यथाक्रम पद्धतीप्रमाणें उभे राहिले. छत्र जडावाचें, मोतीलग झालरीचें करून मस्तकावर धरिलें. छत्रपति असें नांव चालविलें. कागदींपत्रीं स्वस्ति श्री (राज्याभिषेक) शक सिंहासनावर बसलेल्या दिवसापासून नियत चालविला. पन्नास सहस्र वैदिक ब्राह्मण मिळाले. यावेगळे तपोनिधि, सत्पुरुष, संन्यासी, अतिथी, मानभाव, जंगम, जटाधारी, जोगी नाना जाती मिळाले. तितक्यास चार मास मिष्टान्न उलके (शिधे) चालविले. निरोप देतां पात्र पाहून द्रव्य, अलंकार, भूषणें, वस्त्रें अमर्याद दिलीं. गागाभट प्रमुख अध्वर्यु त्यांस अपरिमित द्रव्य दिलें. संपूर्ण खर्चाची संख्या एक कोटि बेचाळीस लक्ष होन झाले. अष्टप्रधानांस लक्ष लक्ष होन बक्षिस दर असामीस, त्याखेरीज एक एक हत्ती, घोडा, वसनें, अलंकार असें देणें दिलें. येणेंप्रमाणें राजे सिंहासनारूढ झाले. या युगीं सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशाह, मऱ्हाठा पातशाह येवढा छत्रपति झाला. ही गोष्ट कांहीं सामान्य झाली नाहीं " (सभासद).

रायगड हीच राजधानी कां ?

रायगड राजधानी करण्यापूर्वी महाराज रायगडावरहि राहत असत. त्यांचा मुक्काम मुख्यतः राजगडावर असून कधीं कधीं ते रायगडावर असत. त्या दृष्टीनें राजगड हीच त्यांची पहिली राजधानी होती. रायगड व राजगड यांमध्यें अंतर फक्त वीस-पंचवीस मैलांचें. घाटमाथ्यावर राजगड तर घाटमाथ्याखालीं तळकोंकणांत रायगड. या कारणानें राजगडावर राहण्यांत

धोका वाटला कीं चटदिशीं खालीं उतरण्यास भोपेघाट, शिवळाघाट, बोचेघोळीघाट, मढ्याघाट इत्यादि लहानमोठे घाट आहेत. त्यांपैकीं कांहीं घोड्यावर बसून उतरण्याजोगे व कांहीं पायांनीं उतरण्याइतके अवघड आहेत. राजगड व प्रचंडगड (तोरणा) हे दोन गड दोन-तीन कोसांच्या अंतरावर जयविजयांसारखे जोडीनें उभे असून त्यांतील प्रचंडगड रायगडासमोर येतो. त्याच गडाशेजारच्या शिवळया घाटांतून महाराज रायगडाकडे दोन-अडीच घंट्यांत जात-येत असतील.

रायगडाची उंची समुद्रसपाटीपासून २८५१ फूट आहे. "गड बहुत चखोट, चौतर्फा गडाचे कडे तासल्याप्रमाणें, दीड गांव उंच, पर्जन्यकाळीं कड्यावर गवत उगवत नाहीं व धोंडा तासीव एकच आहे. दौलताबादहि पृथ्वीवर चखोट गड खरा, परंतु तो उंचीनें थोडका. दौलताबादेच्या दशगुणी गड उंच" असें सभासदानें त्यांस वर्णिलें आहे. रायगड व घाट (सह्याद्रि) यांमधील दरी एक मैल रुंद आहे. कोणत्याहि दिशेनें रायगड चढावयाचा म्हटलें तरी मधील एक खोरें उतरावेंच लागतें. त्याच्या-भोंवतालीं खरोखरच इतर गडांचें कडें आहे. त्यांतील ईशान्येस लिंगाणा, पूर्वेस तोरणा व राजगड, दक्षिणेस कांगोरा, चांभारगड व सोनगड, पश्चिमेस (वायव्य) तळेगड व उत्तरेस घोसाळगड असे गड सर्व बाजूंनीं त्याच्या रक्षणार्थ उभे आहेत. भोंवतालीं काळ नदीचा वेढा आहे. या सर्व दृष्टींनीं महाराष्ट्रांतील कोणत्याहि गडापेक्षां रायगड दुर्भेद्य व दुर्गम असल्यामुळें महाराजांनीं राजधानीचा मान अखेर त्यासच दिला. रायगडाच्या पायथ्याचें पाचाडगांवच मुळीं समुद्रसपाटीपासून ६०० फूट उंच आहे. तेथून खुद्द रायगड २२५१ फूट चढावा लागतो. हा चढहि अतिशय अवघड असून तो चढतांना एका बाजूला उंच कडे तुटलेले व दुसऱ्या बाजूला डोळे फिरण्याजोग्या खोल दऱ्या पसरलेल्या; या कारणानें हल्लीं वर जाण्यास पुष्कळ सोयी केल्या असल्या तरी मनुष्यास तो चढतांना विचारच पडतो.

सभासदाच्या काळीं गडावर 'घरें, वाडे, माड्या, सदरा, चौसोपे, अठरा कारखान्यांकरितां वेगळाले महाल, राण्यांकरितां महाल, सरकारकुनाकरितां (प्रधान) वेगळीं घरें, बाजार, पंचहजाऱ्यांकरितां घरें,

मातब्बर लोकांस घरें, गजशाळा, अश्वशाळा, उष्टरखाने, पालखीमहाल, वहिली महाल (रथशाळा), कोठी, थटीमहाल (गोशाळा) हे सर्व चुनेगच्ची व चिरेबंदी बांधले होते.'

शिवाजीच्या राज्याभिषेकासंबंधीं तत्कालीन इंग्रज व डच यांच्या कागदपत्रांतहि विस्तृत माहिती मिळते. त्यांतील कांहीं पत्रें राज्याभिषेका-पूर्वींचीं व कांहीं त्या वेळचीं आहेत. नारायण शेणवी हा एक इंग्रजांचा वकील असून तो राजापुरच्या लुटीच्या प्रकरणाचा निकाल लावून घेण्या-करितां रायगडास मंगळवार ता. २४ मार्च १६७४ रोजीं गेला होता. तो लिहितो –

नारायण शेणवी

"मंगळवार ता. २४ मार्च रोजीं रायरीस आलों. त्याच दिवशीं निराजी पंडिताची भेट घेण्याकरितां पायथ्याच्या पाचाड गांवीं गेलों. चौकशी केली तेव्हां निराजी गडावर होता असें समजलें. म्हणून माझ्या आगमनाची वर्दी गडावर राजाकडे एका नोकराकरवीं पाठविली. त्याच दिवशीं नोकरानें निराजीचा असा हुकूम आणला कीं, 'शिवाजीच्या पत्नीच्या मृत्यूचें सुतक फिटेपर्यंत तुम्हीं आमच्या घरीं राहावें.' असे पांच दिवस रिकामे गेले. मध्यंतरीं २८ मार्च रोजीं पाडव्याकरितां निराजी पाचाडास आपल्या घरीं आला. दुसऱ्या दिवशीं त्यानें मला आपल्याबरो-बर एका प्रशस्त घरांत नेऊन माझी सरबराई केली. तेथें आणखी पांच दिवस राहिलों. काल ३ तारखेस दोन प्रहरीं निराजी मला दरबारांत शिवाजीसमोर घेऊन गेला. स्वागत व कुशल प्रश्न झाल्यावर मीं राजापुरा-बद्दल प्रश्न काढला. निराजीनें अपेक्षेपलीकडे आमची तरफदारी केली आणि शिवाजीनें ताबडतोब कारकुनास हिशेब लिहिण्यास सांगितलें.

"नव्या वर्षाच्या आरंभीं जूनमध्यें स्वतःला राज्याभिषेक करण्याच्या हेतूनें शिवाजी सोनें व हिरे यांचें भव्य सिंहासन बनवीत आहे. या समा-रंभाकरितां असंख्य विद्वान् ब्राह्मणांना बोलावून तो मोठा दानधर्म करणार आहे" (प. सा. सं. खंड २, पृ. ४७८).

रायरी हा गड होता, तसेंच त्याच्या पायथ्याला रायरी नांवाचें खेडें होतें. तेथें नारायण शेणवी प्रथम गेला व मागाहून पाचाडास आला.

पाचाडास निराजीप्रभृति प्रधान व इतर नोकर हवेच्या व सोयीच्या दृष्टीनें राज्याभिषेकापूर्वी कायमचे राहत असत. गडावर महाराज राहत व त्यांजकडे कामकाजाकरितां पाचाडाहून नोकर मंडळी जात. तेथेंहि त्यांना राहण्याकरितां घरें असत. नारायण शेणवी पाचाडास गेला, तेव्हां निराजी गडावर गेला होता. महाराजांची कोणती पत्नी या वेळीं मरण पावली न कळे. पण तिचें त्यांना दहा दिवस सुतक होतें. त्यांनीं पाडव्याच्या सुमुहूर्तावर सिंहासनाचें काम सुरू केलें होतें. म्हणजे ज्येष्ठमासीं होणाऱ्या राज्यारोहणसमारंभाची तयारी चैत्रांतहि चालू होती. निराजी गडावरून पाचाडास आला व मग महाराजांच्या भेटीकरितां नारायण शेणव्यास गडावर घेऊन गेला.

ऑक्झिंडेनची भेट

नारायण शेणवी शिवाजीशी तहाचें बोलणें करून गेल्यावर दोन महिन्यांनीं म्हणजे मे महिन्याच्या मध्यांत ऑक्झिंडेन मुंबईहून रायगडास शिवाजीच्या भेटीस जाण्याकरितां चौलांत आला. चौलाचे दोन भाग होते. एक खालचें चौल व दुसरें वरचें चौल. खालचें चौल म्हणजे अगदीं समुद्रकांठचें, पोर्तुगीजांच्या ताब्यांत होतें व वरचें चौल म्हणजे हल्लींचें रेवदंडा, पूर्वेस चौलच्या खाडीवर (कुंडलिका नदी) होतें. हीं दोन्ही गांवें अगदीं शेजारीं आहेत. ऑक्झिंडेन आपल्या रोजनिशींत लिहितो, "मे ता. १३ रोजीं किनाऱ्यावर पोर्तुगीजांच्या चौल शहरांत आलों. १४ तारखेला चौलास असतांनाच दोन प्रहरच्या तीन वाजतां, शिवाजी चिपळुणाहून रायरीस आल्याची खबर लागली. तेथून दोन मैलांवर असलेल्या वरचें चौल या शिवाजीच्या शहरांत गेलों. मोगलांच्या युद्धांनीं उद्ध्वस्त होण्यापूर्वी हें दख्खनच्या व्यापाराचें महत्त्वाचें केंद्र होतें. नागोठणें, पेण आदिकरून समोरच्या मुलुखाचा ब्राह्मण सुभेदार (शिवाजीचा) येथें राहतो. तो थोडासा इंग्रजांना प्रतिकूल असल्याचें नारायण शेणव्याकडून कळल्यामुळें त्याला भेटून पामरी-जोडीच्या नजराण्यानें त्यास खुष केलें. १६ तारखेला होडीनें निघून अष्टमी, निजामपूर, गंगावळी या मार्गानें १९ तारखेला सकाळीं ९ वाजतां पाचाडाला आलों. (मे महिन्यांत शिवाजीनें चिपळुणाजवळील परशुरामाचें दर्शन घेतलें

होतें.) शिवाजी प्रतापगडावर देवीला अर्पण करण्याकरितां व देवीच्या दर्शनाकरितां (राज्यारोहणापूर्वी) छत्र घेऊन गेला होता. त्याचें वजन सवा मणाचें होतें. हें छत्र शुद्ध सोन्याचें होतें. २० तारखेला माझें निराजींशीं बोलणें झालें. त्याला मीं एक अंगठी दिली व त्याचा पुत्र प्रल्हाद याला पामरीची जोडी दिली. ता. २२ रोजीं आम्ही गडावर गेलों. गड फितुरीखेरीज अभेद्य असून त्याजवर राजमहाल, दरबार, प्रधानांचीं घरें मिळून सुमारें तीनशें इमारती आहेत. २६ तारखेला राजदर्शन व संभाषण झालें. याच वेळीं राजा व राजपुत्र (संभाजी) यांस नजराणा दिला. पुढें मोरोपंताकडे तहाचें काम सोंपवून उभयतांहि (शिवाजी व संभाजी) महालांत परत गेले. २८ मे रोजीं निराजीचा नजराणे देण्याच्या कामीं सल्ला घेतला. त्यानें सांगितलें, 'मोरोपंताकडे मीं स्वतः जावें व इतर प्रधानांना नारायणामार्फत नजराणा पोंचवावा. मोरोपंताला दोन पामऱ्या योग्य नसून चार द्याव्या.' दत्ताजीपंत वाकनीस यांस १२५ रुपयांची एक अंगठी, डबीर किंवा फारशी लेखकाला चार पामऱ्या, श्यामजी नाईक मुद्राधारी यास व आबाजी पंडितास प्रत्येकीं चार पामऱ्या दिल्या म्हणजे मग काम त्वरेनें होईल, असें निराजीचें मत पडलें.

"प्रल्हाद निराजीला बरोबर घेऊन मीं मोरोपंताकडे जाऊन नजराणा दिला. ता. २९ रोजीं राजानें तुला केली. वजन १६ सहस्र तोळे झालें. यांत एक लक्ष होनांची भर घालून राज्याभिषेकानिमित्त जमणाऱ्या ब्राह्मणांना दक्षिणा वांटावयाची आहे. जून ५ रोजीं म्हणजे दुसऱ्या दिवशीं ७।८ वाजतां सिंहासनारूढ राजाला मुजरा व नजर करण्यासाठीं यावें असा निराजी पंडिताचा निरोप आला. ता. ६ जून रोजीं त्या वेळीं (७।८ वाजतां) राजा भव्य सिंहासनावर आरूढ झालेला व मूल्यवान् पोशाख केलेल्या प्रधानांनीं वेष्टिलेला दिसला. संभाजी राजे, पेशवा मोरोपंत व एक श्रेष्ठ ब्राह्मण (गागाभट्ट) हे सिंहासनाखालीं पायरीवर बसले होते. राहिलेले सेनापति व इतर अंमलदार बाजूला आदरानें उभे होते. मीं मुजरा केला व नारायण शेणव्यानें नजरेची अंगठी वर धरली. शिवाजीचें आमच्याकडे लक्ष जातांच त्यानें अगदीं सिंहासनाच्या पायरीजवळ येण्याचा आम्हाला हुकूम केला व पोशाख देऊन आम्हाला लाग-

लीच रजा दिली. थोडाच वेळ आम्हीं सिंहासनासमोर उभे होतों. तेवढ्या वेळांत सिंहासनाच्या दोन्ही बाजूंना सुवर्णांकित भाल्याच्या टोंकांवर अनेक अधिकारदर्शक व राजसत्ता-निदर्शक चिन्हें असल्याचें आम्हीं पाहिलें. उजव्या हाताला दोन मोठ्या दांतांच्या मत्स्यांचीं सुवर्णाचीं शिरें होतीं. डाव्या हाताला अनेक अश्वपुच्छें व एका मूल्यवान् भाल्याच्या टोंकावर समपातळींत लोंबणारीं सोन्याच्या तराजूचीं पारडीं न्यायचिन्ह म्हणून तळपत होतीं. राजवाड्याच्या दाराशीं आम्ही परत आलों तों दोन लहान हत्ती दरवाजाच्या दोन्ही बाजूंना उभे केले असून दोन सुंदर श्वेत अश्व शृंगारून आणलेले दिसले. गडाचा मार्ग इतका बिकट होता हें लक्षांत घेतां हे पशु कोठून वर आले असावे याचा आम्हांला तर्कच करवेना. जून ८ रोजीं राजानें समारंभाशिवायच चौथ्या बायकोशीं लग्न केलें."

सुवर्णतुला

शिवाजीच्या राज्याभिषेकाची हकीकत ऑक्झिंडेनपेक्षांहि वर निर्दिष्ट केलेल्या डचांच्या पत्रांत अधिक विस्तृत दिली आहे. "राज्याभिषेकाच्या वेळीं शिवाजीनें १७ सहस्र होन किंवा १६० पौंड वजनाची स्वतःची सुवर्ण-तुला करून व त्याचप्रमाणें रुपें, तांबें, जस्त, कथील, शिसें, लोखंड, ताग, कापूर, मीठ, खिळे, जायफळें, जायपत्री, मसाले, लोणी, साखर, सर्व प्रकारचीं फळें, खाद्यें, सुपारी, ताडीसुद्धां नानाविध वस्तूंच्या तुला करून त्या सर्वांचा धर्म करून टाकला. शिवाजीनें जाळपोळ केली त्यामध्यें स्त्रिया, मुलें, पशु व ब्राह्मण यांची हत्या झाली असण्याचा संभव आहे. त्या पापाच्या क्षालनार्थ दोघां ब्राह्मणांच्या सूचनेवरून आणखी १६०० होनांचें (सर्व प्रायश्चित्त) दान करण्यांत आलें. सर्व आवश्यक धार्मिक विधि यथासांग झाल्यानंतर ५ जून रोजीं मुद्दाम आणविलेल्या गंगाजलानें स्नान करून शिवाजीनें प्रत्येक ब्राह्मणाला १०० होन दक्षिणा दिली. मुख्याला (गागा-भट्ट) पांच सहस्र होनांचें व दोन सहस्र होनांचें वर्षासन दिलें. ६ जून रोजीं पहांटे पांच वाजतां त्यानें मुद्दाम बनविलेल्या सिंहासनावर आरोहण केलें आणि जमलेल्या सर्व लोकांनीं त्यास 'शिवराज' असें अभिधान दिलें.

सुवर्णवृष्टि

"त्यानंतर मुख्य प्रधान मोरो पंडित यांनीं मुजरा करून आठ

सहस्र होन आणून शिवाजीच्या मस्तकावर उधळले. मुख्य हिशेबनीस निळोपंत यानें सात सहस्र होन आणले. दोघां इतर प्रधानांनीं प्रत्येकीं पांच सहस्र होन आणून शिवाजीला सुवर्णस्नान घातलें. उरलेल्या प्रधानांनींहि मुजरे केले आणि ते सिंहासनाच्या दोन्ही बाजूंना ओळीनें उभे राहिले. संभाजी राजा सिंहासनाच्या पायरीवर बसला. ता. ७ जून रोजीं आलेले सर्व वकील व ब्राह्मण मंडळी यांना सार्वत्रिक देकार सुरू झाला. प्रत्येक ब्राह्मणाला योग्यतेप्रमाणें ३, ४ किंवा ५ रुपये आणि बायका-मुलांना सरसकट एक किंवा दोन रुपये दक्षिणा देण्यांत आली. हा दानधर्म बारा दिवस चालला होता व तितके दिवस ब्राह्मण-भोजनें चालू होतीं. ह्या दानधर्माचा व समारंभाचा एकंदर खर्च दीड लाख होन इतका झाला असें म्हणतात" (प. सा. सं. खंड २, पृ. ५०४।५०५).

शिवाजीची माता जिजाबाई ७८ वर्षांची होती. तरी इतक्या वृद्धपणीं राज्याभिषेकाच्या महनीय समारंभास गडावर उपस्थित राहून समारंभानंतर अकराच दिवसांनीं मरण पावली. त्या माउलीच्या डोळ्यांचें पारणें फिटलें. ती आपल्या जगद्वंद्य पुत्राचा दिगंत गाजणारा डंका ऐकण्यास व त्याचें अद्भुत चरित्र व पराक्रम पाहण्यास दीर्घकाल जगली हें तिचें केवढें भाग्य होय! शिवाजीमहाराजांचीहि पुण्याई थोर म्हणून तिच्या डोळ्यांदेखत त्यांना हा अपूर्व व मंगलमय सोहळा घडवून आणतां आला. जिजाबाई या रायगडास आल्या म्हणजे गडावर न राहतां पाचाडासच राहत असत. त्यांच्या नांवाची विहीर अद्यापि पाचाडास असून तिला पायऱ्या आहेत. तिची अलीकडे दुरुस्ती करण्यांत आली आहे. राज्याभिषेकसमयीं त्या पाचाडाहून गडावर गेल्या होत्या. त्यांचा वाडा अर्थातच पाचाडास आहे.

वरील मोठा राज्याभिषेक झाल्यानंतर शिवाजीनें आश्विन शुद्ध पंचमी शके १५९६ रोजीं (२४ सप्टेंबर १६७४) तांत्रिक राज्याभिषेक करून घेतला.

प्रकरण पंधरावें


राजधानी रायगड

गिरीसी वळें आदळें तोयराशी। बहूसाळ त्या तोडिलें पर्वतासी॥
गिरीशृंग पाठार दारीं कपाटें। शिळाशीखरें वृक्ष पाषाण थाटे॥
दरे दर्कुटे थोर भ्यासूरवाणे। बहुतापरीचे तरू ते पुराणे॥

— रामदास

पेशवाईत

रामदासांनीं युद्धकांडांत वर्णन केल्याप्रमाणें रायगड हा शिवरायाच्या राजधानीचा गड आजहि भव्य व भयानक दिसतो. तो गड, संभाजीस पकडून नेऊन त्याचा वध अत्यंत क्रूरपणें औरंगजेबानें केल्यानंतर मोगलांच्या ताब्यांत गेला. तेव्हांपासून शाहूमहाराजांच्या कारकीर्दीपर्यंत मोगलांतर्फे जंजिऱ्याचा सिद्दी त्याजवर अंमल चालवीत होता. शाहूनें बाजीराव पेशव्यास पाठवून गड सिद्दीपासून जिंकून घेतला. त्यानंतर गडावरील व्यवस्था पेशवाईच्या अखेरीपर्यंत उत्तम ठेवण्यांत आली होती. शिवरायाच्या तख्ताचा गड म्हणून त्याजविषयीं सर्वांना भक्ति वाटत होती. सवाई माधवरावाचा मृत्यु झाल्यावर त्याची द्वितीय पत्नी यशोदाबाई रायगडीं कांहीं काल जाऊन राहिली होती. तेथील राजवाडा पेशवाई लयास जाईपर्यंत चांगला शाबूत असून त्याच्या दुरुस्तीसाठीं इ. स. १८११ त रुपये १००४ खर्च झाला होता. त्या वेळीं गडावर पांचशेंपर्यंत सेवक होते. महाराजांचें सिंहासन, शिर्काबाई, वाडेश्वर इत्यादि देवालयें व हत्ती महालासारख्या इमारती सुस्थितींत होत्या. महाराजांच्या सिंहासनाचा मान देवालयाप्रमाणें ठेवण्यांत आला होता. त्याजवर घुमटी असून तिला किनखापाचा चांदवा, त्याला गझनीचें अस्तर, खांबांना मखमाल गुंडाळलेली होती (स. १७९७). तख्ताची रोज पूजा-अर्चा होत असे. त्याजपुढें कीर्तन करण्यास हरदास ठेवला होता. समोर नगारखाना असून त्यांत नगारजी, कर्णाजी, सनईजी, सूरवाजी असे वाजंत्री व एक



श्रीशिवछत्रपतींचें सिंहासन (रायगड)



श्रीशिवछत्रपतींची छत्री (रायगड)

घड्याळ होतें. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत नाना फडणीस महाडास राहिले असतां त्यांनीं गडावर मुद्दाम जाऊन त्याची पाहणी केली होती. त्या वेळीं त्यांनीं नगारखान्याकरितां १३०० रु. मंजूर केले. गडावरचा मुख्य अधिकारी कांहीं दिवस बाळोबा कुंजीर होता. शिर्काबाईचा नवरात्रांत नऊ दिवस उत्सव चाले, तेव्हां कीर्तनें व ब्राह्मणभोजनें होत असत. गडावर अठरा तोफा, पहारे, गस्त, इतका कडेकोट बंदोबस्त होता. गडास व सिंहासनास दुरवस्था प्राप्त झाली ती स. १८१८ त पेशवाई बुडून इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर. सारांश, स्वराज्यांत शिवाजीमहाराजांस, त्यांच्या सिंहासनास व छत्रीस महाराष्ट्र विसरला नव्हता (भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक, १९३९).

इंग्रजी राज्यांत

इंग्रजी राज्यांत रायगड जंगलखात्यांत समाविष्ट करण्यांत आला. सर रिचर्ड टेंपल मुंबई इलाख्याचे गव्हर्नर असतां ते रायगड पाहावयास गेले होते. त्यांजबरोबर रेव्हिन्यू कमिशनर क्राफर्ड, डॉ. वॉटर्स व कॅप्टन पिट हे होते. टेंपलसाहेबांनीं शिवाजीच्या समाधीच्या चौथऱ्यावर चढून शिवाजीसंबंधीं काव्यमय वर्णन केलें व रायगडाच्या डागडुजीकडे पूर्णपणें लक्ष देण्यास क्रॉफर्डसाहेबांस सांगितलें. पुढें आठ वर्षांनीं कुलाबा जिल्ह्याच्या जंगल अधिकाऱ्यानें मुंबई सरकाराकडे लिहून सरकाराकडून सालिना खर्चाची मंजुरी मिळविली, ती अवघ्या पांच रुपयांची ! डग्लससाहेबानें मुंबई इलाख्यावर एक पुस्तक लिहून त्यांत समाधीच्या दुःस्थितीचें वर्णन केलें. तें गोविंद बाबाजी जोशी वसईकर यांनीं वाचून सन १८८५ सालीं रायगडावरील समाधीच्या जीर्णोद्धाराच्या प्रश्नास जोरानें चालना दिली. त्यांनीं रायगड समक्ष पाहून त्यावर सन १८८७ सालीं एक पुस्तकहि प्रसिद्ध केलें. त्यानंतर जोशी यांनीं के. जनार्दन नांवाच्या शिल्पज्ञ इंजिनियराकडून समाधीच्या दुरुस्तीस येणाऱ्या खर्चाचें अंदाजपत्रक तयार करविलें होतें. त्यांत खर्चाचा आंकडा ४५०४६ रु. दाखविला होता. पुढें सन १८९५ च्या एप्रिलांत शिवाजी-स्मारकावर 'केसरीं'त लेख येण्यास सुरुवात झाली. ता. ७ मेच्या 'केसरीं'त स्मारकासाठीं एक कमिटी नेमून तिजमार्फत पद्धतशीर काम करण्याचा विचार जाहीर झाला; आणि ता. २१ मेपासून 'केसरीं'तून फंडाची पोंच प्रसिद्ध होऊं लागली. ५ नोव्हेंबरपर्यंत हा आंकडा ११०००

रुपयांवर गेला. सन १८९६ सालीं ही रक्कम १६००० रु. पर्यंत वाढली आणि रायगडावरील पहिला शिवजयंत्युत्सव सन १८९६ च्या मे महिन्यांत झाला. वर लिहिल्याप्रमाणें रक्कम जमली खरी, पण तिच्या विनियोगांतून छत्री (समाधि) दुरुस्त होण्याचा योग ३१ वर्षांनीं म्हणजे इ. स. १९२७ सालीं आला.

स्वराज्यांत

रायगडावर इतर गडांप्रमाणेंच गेल्या १३७ वर्षांत बरीच पडझड झाल्यामुळें प्राचीन इमारतींपैकीं सुस्थितींत असें कांहींच राहिलें नाहीं. मात्र श्रीशिवाजी रायगड स्मारक मंडळ, कुलाबा जिल्हा लोकल-बोर्ड, मुंबई सरकार व भारत सरकार यांच्या परिश्रमानें व द्रव्य साहाय्यानें प्राचीन अवशेषांचें संरक्षण, त्यांची दुरुस्ती व प्रवाशांकरितां सुखसोयी अलीकडे करण्यांत आल्या आहेत, याबद्दल त्या सर्वांस कोणीहि धन्यवादच देईल.

रायगडच्या पायथ्याचें गांव कोंझर व त्यानंतरचें गांव पाचाड. गडाच्या चढाला कोंझरपासूनच सुरुवात होऊन तो पाचाडापासून वाढत जातो. पाचाडापासून गड चढून कांहीं अंतर चालून गेल्यावर एक खिंड लागते, तिला पाचाडची खिंड म्हणतात. तेथें पूर्वी एक दरवाजा होता त्याला चित-दरवाजा हें नांव देण्यांत आलें होतें. हा दरवाजा आतां शिल्लक नाहीं. या ठिकाणापासून पुढची पायवाट कुलाबा जिल्हा लोकलबोर्डानें दुरुस्त केली आहे. या वाटेनें गेल्यावर पुढचा टप्पा म्हणजे महादरवाजा. महादरवाजा हें गडाचें मुख्य प्रवेशद्वार. चित-दरवाजापाशीं एक बुरूज आहे. त्याचें नांव ‘ खूब लढा ’ हें उद्बोधक आहे यांत शंका नाहीं.

महादरवाजांतून किल्ल्यांत प्रवेश केल्यावर हत्ती हौद, कुलाबा जिल्हा लोकल बोर्डानें बांधलेली धर्मशाळा व गंगासागर हीं स्थळें एका-मागून एक येतात. धर्मशाळा गंगासागर तलावापाशींच असल्यामुळें धर्म-शाळेंतील उतारूंना त्या पाण्याचा उपयोग होतो. हत्ती हौद हें नांव हत्तींला पाणी पाजण्याचा हौद यावरून पडलेलें दिसतें. पण आज तो हौद कोरडा असून त्यांत पाणी नसतें.

गंगासागराला डावी घालून पुढें गेल्यावर ३२ पायऱ्यांचा दगडी

जिना आहे. तो जिना चढून गेलें कीं, आपण बालेकिल्ल्यांत प्रवेश करतों. बालेकिल्ला ९०० फूट लांब व ४५० फूट रुंद आहे.

बालेकिल्ल्यांतून एका दरवाजामधून पायऱ्या उतरल्यावर आपण राजसभेपाशीं येतों. यांत महाराजांचें दगडी सिंहासन आहे. त्यावरच त्यांस राज्याभिषेक झाला. राजसभेच्या समोर पूर्वेस नगारखाना आहे. नगारखान्याची इमारत ५० फूट उंच, ३० फूट लांब व २० फूट रुंद आहे. तिच्या खालच्या कमानींतून जो रस्ता जातो त्याच्या दोन्ही बाजूंस पहारेकऱ्यांसाठीं दोन देवड्या आहेत. याच इमारतींत चौघडा व नगारा झडत असे.

नगारखान्यापासून उत्तरेस जो रस्ता जातो त्या रस्त्यानें पुढें गेल्यावर बाजारपेठेंतील दुकानांचे चौथरे लागतात. रस्त्याच्या प्रत्येक बाजूला २२ याप्रमाणें एकंदर ४४ चौथरे आहेत. बाजारपेठेंतून बाहेर पडून कांहीं अंतर चालून गेलें म्हणजे जगदीश्वराचें मंदिर लागतें. तें बालेकिल्ल्यापासून अर्ध्या मैलावर आहे. हें अर्थात् महादेवाचें देऊळ आहे. देवळाभोंवतीं उंच तट व आंत सभोंवार फरसबंदी आहे. मूर्ति भग्न स्थितींत आहेत. या देवालयापासून महाराजांच्या समाधीचें स्थान अगदीं नजिक पूर्वेस आहे. समाधि अष्टपैलू व चिरेबंदी आहे. तिजवर रायगड-स्मारक-मंडळ, मुंबई सरकार व पुराणवस्तुसंशोधन खातें यांनीं मिळून १९ सहस्र रुपये खर्च करून १९२७ सालीं छत्री बांधली आहे. यांपैकीं रायगड-स्मारक कमिटीचे बारा सहस्र रुपये आहेत. समाधीवरील शिळा उखडून काढली तेव्हां तिच्या खालीं महाराजांची रक्षा काळजीपूर्वक ठेवलेली आढळून आली. तिच्यापेट्या भरून आंत ठेवल्या आहेत. तिजवरील छत्री अर्धगोलाकार घुमटाची आहे. छत्रीच्या गाभाऱ्यांत प्रसिद्ध शिल्पकार श्री. विनायकराव करमरकर यांनीं बनविलेला ब्रॉंझ धातूचा प्रतिमाफलक पश्चिमाभिमुख बसविला आहे.

याशिवाय गडावर बारा टाकीं, दारूचीं कोठारें, भवानी टोंक, टकमक टोंक, हिरकणी टोंक, अंधारकोठड्या इत्यादि अवशेष आहेत. प्रवाशांस उतरण्याकरितां अलीकडे बांधलेली धर्मशाळाहि आहे. तिच्या शेजारीं १४।१५ तोफा पडलेल्या आहेत.

रायगड महाडापासून १२ मैल असून त्याच्या पायथ्याशीं पाचाड गांव आहे. तेथपर्यंत लोकलबोर्डानें बांधलेल्या सडकेनें बैलगाड्याच काय, पण मोटारीहि जाऊं शकतात. तेथून गड पुढें पायीं चढावा लागतो (राजधानी रायगड, ले. विष्णु वासुदेव जोशी).

सह्याद्रीच्या दोन रांगा व दोन नद्यांचें खोरें यांच्या दरम्यान रायगड असल्यामुळें दळणवळणाच्या दृष्टीनें तो तुटक झाला आहे. शिवकालांत घाटावरून येणारा माल कावले नि बावले या दोन खेड्यांच्या खिंडींतून येत असे. या खिंडींत शिवाजीनें चौकीपहारा बसविला होता. बैलांचें लमाण या खिंडींतून एक रांग करून सांदोशी गांवांत उतरत असे. बैलांची एकेरी रांग या खिंडींतून घाट उतरूं लागली कीं बैलांच्या गळ्यांतील घुंगुरांचा आवाज सांदोशीच्या मैदानांत त्यांच्या पूर्वी बराच वेळ ऐकूं यावा. या मैदानाच्या विस्तृत सपाटीवर घाटी मालाची एक पेठच वसली होती. या पेठेंतून रायगडावर हरजिनसी माल पुरविला जाई. शिवकाळांत या बाजारपेठेची इतकी भरभराट झाली कीं, तेथील धनिक व्यापाऱ्यांनीं अनेक देवालयें बांधलीं. त्यांचे अवशेष सांदोशीच्या आसपास अद्यापि पुष्कळ आहेत. या पेठेमुळें पाचाड, बीरवाडी इत्यादि शेजारचीं गांवेंहि सधन बनलीं.

छत्र निजामपूर व पाचाडाजवळील कोंझर या दोन गांवीं परटवणी होती. त्या ठिकाणीं परीट लोक गडावरील कपडे धुण्यासाठीं आणीत असत. 'खूब लढा ' बुरूजावरून वाडी नांवाच्या गांवाकडे उतरतांना वाटेंत एक समाधि (वृंदावन) लागते. काळ्या कभिन्न दगडाचें हें लहानसें पण टुमदार वृंदावन ' सती गोदावरीचें वृंदावन ' म्हणून शिवकालापासून प्रसिद्ध आहे. शंभु छत्रपति युवराज असतां त्यानें एका ब्राह्मणाच्या सुनेवर भाळून तिला लिंगाणा किल्ल्याजवळील एका जागेंत कैदेंत ठेवलें होतें. पुढें हें प्रकरण उघडकीस येतांच थोरल्या महाराजांनीं (शिवाजी) सती गोदावरीची सुटका केली व महाराजांच्या संमतीनें गोदावरीनें त्या ठिकाणीं देहार्पण केलें. संभाजीनें तिचें क्रियाकर्मांतर केलें! जेथें तिनें उडी टाकली तेथें उदक वाहत असतें. त्या ठिकाणीं कुंडहि बांधण्यांत आलें आहे.

गवळण हिरकणी

'खूब लढा ' बुरुजापाशीं पाचाडची चढण संपते आणि आपण एका

खिंडीच्या माथ्यावर येतों. येथून डाव्या हाताकडे (ईशान्य, उत्तर, वायव्य) काळनदी व प्रत्यक्ष गडाचा भाग यांच्या दरम्यानचें मैदान दिसतें. तें नदीच्या बाजूस क्रमानें उतरत गेलें आहे. याच विस्तीर्ण व नयनमनोहर मैदानावर सांदोशी, छत्र निजामपूर, वाघेरी, वाडी इत्यादि इतिहासप्रसिद्ध खेडीं व नदीपलीकडील डोंगरांच्या रांगांत लिंगाणा किल्ला दृष्टीस पडतो (ले. शां. वि. अवळसकर, महाड, ठाकरेकृत रायगड, पृ. ४८ ते ५२).

टकमक नि हिरकणी हीं रायगडावरील प्रसिद्ध स्थळें आहेत. टकमक या टोंकावरून खालील खोल दरीचें भयानक स्वरूप दिसतें. या एका टोंकाला हिरकणी हें नांव कसें पडलें याचा इतिहास आश्चर्यकारक आहे. रायगडाच्या पायथ्याशीं पाचाडानजीक कोळंब नांवाचें गांव आहे. त्या गांवची एक गवळण गडावर दूध घालावयास जात असे. एके दिवशीं ती गडावर गेली असतां बराच वेळ वर राहिली. तो दिवस कोजागरीचा असल्यामुळें त्या दिवशीं सायंकाळींहि ती दूध घालावयास वर गेली होती. ती बराच वेळ गडावर तेथील सायंकाळची मौज पाहत राहिल्यामुळें फार रात्र होऊन गडावरचे दरवाजे बंद झाले व ही तरुण गवळण गडांत अडकून पडली.

तिचें तान्हें मूल घरीं होतें. त्याला सोडून तिला गडावर सारी रात्र काढणें शक्य नव्हतें. म्हणून तिची खालीं उतरण्यासाठीं धडपड सुरू झाली. तिचा जीव टांगणीला लागला. वाट तर तिला सांपडेना. अशा स्थितींत ज्याला हल्लीं हिरकणी म्हणतात त्या टोंकावरून तिनें जिवाचा धडा करून उडी टाकली. पण कांहींहि इजा न होतां ती आपल्या घरीं सुखरूप पोंचली.

दुसऱ्या दिवशीं नित्याप्रमाणें ती दूध घालावयास गडावर आली. आदल्या दिवशीं ती अडकून पडली असल्याची बातमी शिवाजीमहाराजांपर्यंत गेली होती. त्यांना ती गवळण दुसऱ्या दिवशीं तेथें आल्याचें कळतांच तिला बोलावून घेऊन ती त्या दुर्भेद्य गडांतून कशी बाहेर पडली, याची त्यांनीं चौकशी झाली. तेव्हां गवळणीनें आपण कडा कोठून व कसा उतरलों हें महाराजांस सांगतांच त्यांनीं तिची वाहवा करून तिला तिच्या धाडसी कृत्याबद्दल इनाम दिलें. पण या घटनेनें महाराजांच्या लक्षांत किल्ल्याचें वैगुण्य येऊन त्यांनीं त्या कड्यावर पाषाणाची तटबंदी करून घेतली. आणि त्या टोंकाला हिरकणीप्रमाणें चमकणाऱ्या त्या धाडसी

स्त्रीसाठीं हिरकणी हें नांव देण्यांत आलें. तेव्हांपासून त्या स्थळाला हिरकणीचें टोंक म्हणण्यांत येऊं लागलें. कोळंब्र गांवांत आजहि गवळ्यांची वस्ती असून ते हिरकणी आमच्या गांवची असें अभिमानानें सांगतात. पण तिच्या वंशजांचा शोध मात्र आतां लागत नाहीं. (ठाकरेकृत रायगड).

टॉमस निकल्स

रायगड समुद्रांतून मुंबईहून येणारास सोयीचा असल्यामुळें तत्कालीन इंग्रज लोक शिवाजीस राजगडावर भेटावयास न जातां रायगडींच येत. ते मुंबईहून कसे व कोणत्या मार्गानें येत, हें समजून घेण्याची इच्छा कोणासहि असणार, त्यांना खालील माहिती उद्‌बोधक वाटेल. टॉमस निकल्स हा गृहस्थ, मुंबईचा गव्हर्नर व प्रेसिडेंट यांच्या हुकुमावरून, मुंबईहून सोमवार ता. १९ मे १६७३ रोजीं रायरीकडे जाण्यास निघाला. तो लिहितो, " मी ३७ इसमांसह मुंबईहून निघालों. मध्यरात्रीं नागोठण्यास उतरून आम्हीं तेथेंच रात्र काढली. नागोठणें हें शिवाजीच्या मुलुखांतील एका सुंदर नदीच्या मुखाशीं वसलें आहे (२० मे). नागोठण्याहून दुसऱ्या दिवशीं निघाल्यावर उजव्या हाताला पाली शहर व डाव्या हाताला सरसगड टाकून दोन वाजण्याच्या सुमारास नदी-कांठच्या एका खेड्यांत आम्हीं राहिलों. त्याचें नांव कुलुक (कोलाड, ता. रोहें). तेथून सहा मैलांवर काल्रून (कालवाडी, ता. माणगांव) येथें रात्रीं मुक्काम केला (२१ मे). आज पाऊस पडत होता. दोन प्रहरीं पापणूसला आलों (पाणोसें, ता. माणगांव). तेथें जेवण करून अस्तमानाच्या समयास राजेरी (रायरी) च्या पायथ्याशीं असलेल्या त्याच नांवाच्या (रायरी) भिकार खेड्यांत पोंचलों. शिवाजी तेथून दोन दिवसांच्या मुक्कामावर असलेल्या क्षेत्रास स्नानाकरितां गेला होता. राजेरी नागोठण्यापासून तीस मैल असावी असें वाटतें (मे २२). शिवाजी येथें नसल्यामुळें गडावर येऊन बोलण्याची परवानगी संभाजीपाशीं मागितली. ती त्यानें लगेच दिली. परंतु पाऊस फार पडत असल्यामुळें आम्ही गडावर गेलों नाहीं (२३ मे). सकाळीं त्या उंच टेकडीवर आम्ही गेलों. वाटेंत पायऱ्या खोदल्या आहेत. चाळीस फुटांवर लगेच दुसरी भिंत बांधून हा किल्ला इतका दुर्भेद्य बनविला आहे कीं, अन्नाचा

भरपूर पुरवठा असल्यास हा किल्ला अगदीं अल्प शिबंदीच्या साहाय्यानें सर्व जगाशीं लढूं शकेल. पाण्याकरितां मोठा तलाव असून तो पावसाळ्यांत भरल्यावर त्यांत वर्षभर पुरेल इतकें पाणी असतें. टेकडीच्या माथ्यावर मोठें शहर वसलें आहे. घरें सामान्य प्रतीचींच खराब अशीं आहेत. अत्युच्च भागीं शिवाजीचा चौसोपी वाडा आहे. त्याच्या मध्यभागीं मोठी इमारत आहे. तींत बसून तो कारभार पाहतो. मला येऊन कांहीं वेळ झाल्यावर पिलाजी येऊन भेटला. 'संभाजी अद्यापि लहान व अननुभवी असल्यामुळें त्याजवर महत्त्वाच्या गोष्टी सोपविलेल्या नाहींत' वगैरे त्यानें सांगितलें. ... सायंकाळीं गिराजी (Geragee) राजा (निराजी रावजी) मजकडे कापडाच्या खरेदीकरितां आला. शिवाजीचें मोठेपण व त्यानें नुकतेच मिळविलेले जय याविषयीं तो पुष्कळ बोलला. त्यानें खरेदी केलेल्या कापडाची सगळी किंमत मला अद्यापि मिळाली नाहीं (मे २४). संभाजीनें मला भेटीकरितां एका ठिकाणीं बोलावलें. तेथें शिवाजीचा चिटणीस बसला होता. त्यानें किरकोळ प्रश्न विचारले. इंग्लंडच्या राजाजवळ माणसें, घोडीं, शिपाई किती आहेत याची चौकशी त्यानें केली. त्यावर मीं त्याला (मिस्किलपणें) विचारलें, 'समोरच्या झाडाला पानें किती आहेत तीं सांगा पाहूं. त्याचें जसें तुम्हांला उत्तर देतां येणार नाहीं तसेंच तुम्हीं विचारलेल्या प्रश्नाचेंहि आहे.'

शिवाजी व संभाजी

"आमचें इतकें बोलणें होत आहे तोंच संभाजी तेथें आला. त्यानें विचारल्यावरून मीं माझीं कामें त्याला क्रमशः सांगितलीं. तीं ऐकून 'मला त्याबद्दल कांहीं करतां येणार नाहीं' असें तो म्हणाला. 'मी फक्त तुमच्या आगमनाची बातमी शिवाजीस सांगतों. म्हणजे ते लवकरच येतील. तुमच्या प्रकृतीला ही उंचावरची हवा मानवणार नाहीं. तेव्हां तुम्ही खालीं जाऊन राहा' असेंहि त्यानें सांगितलें. मग मी गडाखालीं गेलों (मे ३०). शिवाजीनें तो ज्या ठिकाणीं गेला होता तेथून आणखी कांहीं कपडे मागविले आहेत. यावरून त्याचा तेथील मुक्काम लांबला असावा (मे ३१). हिंदोळ्यांतून गडावर जाऊन मीं राहावें कीं आतां परत मुंबईस जावें असें पिलाजीस विचारलें. त्याच्या मतें राजाचें येणें

केव्हां होईल हें अनिश्चित असल्यामुळें मीं परत जावें असें होतें. त्यांतून भयंकर पाऊस व नद्यांना पूर आल्यास येथील पावसाला मला असह्य होईल असेंहि त्याचें मत पडलें (जून १). शिवाजीनें गोव्याजवळची एक टेकडी घेतली अशी बातमी आली (जून २). मीठ व लांकूड या बाबतींत संभाजीचा हुकूम घेण्याकरितां मीं शामजीला संभाजीकडे पाठविलें. परंतु संध्याकाळीं शिवाजी राजा एक मैलावरील आपल्या मातुःश्रीच्या किल्ल्यावर (कांगोरी !) आल्याची पक्की बातमी आली. रात्रीं टेकडीवर चढतांना (रायगड) आम्हीं त्याला पाहिलें (जून ३). शिवाजीशीं बोलणें करण्याकरितां टेकडीवर गेलों. मी जाऊन बसलों होतों त्या खोलींत तो ११ वाजतां आला. सर्व शिपायांना त्यानें तेथून घालवून दिलें. परंतु मुहूर्त चांगला नसल्यामुळें तो माझ्याशीं बोलला नाहीं. ४ वाजतां शामजीच्या हातीं मीं प्रेसिडेंटांकडून आणलेलें पत्र त्याजकडे पाठविलें. ५ वाजतां मला बोलावल्यावरून मी खोलींत जाऊन बसलों. तो येतांच मी उभा राहून दारापर्यंत गेलों; आणि येतां क्षणीं त्यास मागील खेपेस ओळखलें नाहीं म्हणून त्याची क्षमा मागितली. त्यानें माझा हात धरून आपल्या डाव्या अंगाला लोडापासून जवळ बसविलें व काम काय आहे असें मला विचारलें ... (आमचें बोलणें झाल्यावर) मला व शामजीला पानसुपारी व वस्त्रें देऊन त्यानें निरोप दिला " (प. सा. सं. खंड २, पृ. ४४०।४४१).

निकलसच्या माहितीप्रमाणें व इतर रीतीनें रायगडाची ओळख अधिक होते. रायगडावर बडे लोक पाळण्यांत बसून जात. जिजाबाई रायगडावर न राहतां जवळपास पाचाडास वा दुसऱ्या कांगोरीसारख्या लहान गडावर राहत असे. गडावर घरें सुमारें तीनशें असून तीं सामान्य प्रतीचीं होतीं. तेथील हवा राहण्याजोगी नव्हती. नागोठण्यास निकलसला जी नदी लागली ती अंबा नदी. नागोठण्यापर्यंत तो मुंबईपासून होडींतून आला असावा. नागोठण्यापासून पुढचा प्रवास त्यानें पालखींतून वा डोलींतून केला असावा. तो प्रथम नागोठण्यास आला. नागोठणें ते पाली ६ मैल, पाली ते कोलाड १२ मैल, कोलाड ते पाणोसें १२ मैल व पाणोसें ते रायगड १२ मैल म्हणजे नागोठणें ते रायगड एकूण अंतर ४२ मैल. तो रायगडाहून चौलास परत गेला. तेव्हां निजामपूर, अष्टमी, चौल

हीं गांवें लागलीं. त्यांपैकीं रायगड ते निजामपूर १४ मैल, निजामपूर ते अष्टमी १६ मैल व अष्टमी ते चौल १६ मैल. अष्टमी ते चौलपर्यंतचा त्याचा १६ मैलांचा प्रवास कुंडलिका नदींतून झाला. हा एकंदर प्रवास ४८ मैलांचा होता. या परतीच्या प्रवासांतील मार्गाचें खुलासेवार ज्ञान होण्याकरितां पुढील चार शब्द उपयोगीं पडतील. चौल हें अलिबागेच्या दक्षिणेस जवळच समुद्रकांठीं आहे. तेथें कुंडलिका नदी समुद्रास मिळते. चौलाहून कुंडलिका नदीच्या खाडींतून अष्टमीस बोटीनें जातां येतें. याच अष्टमीस निकल्स निजामपुराहून आला व तेथून चौलास जाऊन चौलाहून समुद्रांतून मुंबईस पोंचला. अर्थात् त्याचे जाण्यायेण्याचे मार्ग भिन्न होते.

निकल्सचे हाल

निकल्सच्या परतप्रवासांत त्याचे बरेच हाल झाले. तो लिहितो, (जून ७) "निजामपुरास मी आलों तेव्हां मेघांचा गडगडाट होऊन पाऊस कोसळल्यामुळें नदीला उतार नव्हता. रात्रभर राहिल्यावर (जून ८) पाणी उतरलें. नदी उतरून अष्टमीला २ वाजतां आलों. तेथून होडींत बसून रात्रीं चौलाला (हल्लींचें रेवदंडा) पोंचलों (जून ९). चौलाच्या सुभेदाराला भेटलों. मी मुसलमानाच्या घरांत उतरल्याचें ऐकून त्यानें माझ्याकरितां शहरांत एक दुसरें घर दिलें. चौल शहर किंवा गढी वर्तुळाकार असून तिला अर्धचंद्राकृति ९ बुरूज आहेत. तोफा थोड्याच पण चांगल्या आहेत. शक्य त्या मर्यादेपर्यंत खंदक खणून समुद्रापासून बंदोबस्त केला आहे. इमारती चांगल्या आहेत. परंतु $\frac{2}{3}$ भाग पडका असून बाकीच्या भागांत दर रस्त्यावर १–२ कुटुंबें अशी पातळ वस्ती आहे. येथें शहरांत ६, बाहेर ४ व नदीकिनाऱ्यावर १ अशीं ११ खिस्ती देवळें आहेत (जून १७). होडींतून मुंबईला २ वाजतां पोंचलों" (प. सा. सं. खंड २, पृ. ४४२). निकल्सनें येथें ही पोर्तुगीजांच्या ताब्यांतील चौलाची माहिती सांगितली आहे.

प्रकरण सोळावें

पुनश्च हरिः ॐ

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः।

फोंडा किल्ला सर केला

शिवाजीचा राज्याभिषेक ता. ६ जून सन १६७४त पार पडला. त्या आनंदानें व उत्साहानें अखिल महाराष्ट्र दुमदुमून गेलें नाहीं तोंच पाठशिवणीच्या खेळांतल्याप्रमाणें महाराजांवर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यांची परमपूज्य मातुःश्री अवघ्या ११ दिवसांनंतरच म्हणजे ता. १७ जून रोजीं निवर्तली; परंतु महाराज कर्मयोगी होते. ते आनंदानें हुरळून जाणारे नव्हते व दुःखानें हाय हाय करणारेहि नव्हते. सुखदुःखें समान मानणारे ते असल्यामुळें मातुःश्रींचें उत्तरकार्य आटोपून दोन महिने झाले नाहींत तोंच त्यांनीं 'पुनश्च हरिः ॐ' सुरू केलें. कारण त्यांच्या उशापायथ्याला बसलेल्या शत्रूंस उसंत मिळूं देणें त्यांस धोक्याचें होतें. मोगल व विजापूरकर हे त्यांचे दोन जबरदस्त शत्रु. त्यांस तोंड देण्यासाठीं व त्यांच्या मुलखांत गोंधळ उडवून त्यांना गांगरून सोडण्यासाठीं त्यांनीं जुलै महिन्यांत आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या करून त्या तीन दिशांना पाठविण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें मोरोपंत पेशवा कल्याण-भिवंडीकडे जाऊन तळ देऊन बसला. संभाजी आतां मोहीम अंगावर घेण्याइतका म्हणजे सतरा वर्षांचा झाला होता. त्याला त्यांनीं भागानगराकडे लूटमार करण्यास व कुतुबशहावर दहशत बसविण्यास पाठविलें आणि आपण स्वतः बहादुरखानावर हल्ला करण्यास गेले. त्या वेळीं बहादुरखानाची छावणी पेडगांवास होती. शिवाजीचें सैन्य येत असल्याचें कळतांच बहादुरखान आपली छावणी सोडून त्याजवर चालून गेला. त्याला हुलकावण्या दाखवीत शिवाजीनें छावणीपासून २०–३० कोसपर्यंत नेलें. एकीकडे त्याला असा त्यानें झुलवीत ठेवला आणि दुसरीकडून त्याच्या छावणीवर छापा घालून ती लुटली. या लुटींत त्याला एक कोटि रुपये व इतर बरीच चीज-

वस्त मिळाली. बादशहाला नजर करण्याकरितां बहादुरखानानें दोनशें उत्तम घोडे मिळविले होते. ते सगळे शिवाजीच्या हातीं लागले. इतकें सर्व लुटून घेतल्यावर त्याच्या तंबूस आग लावून ते जाळून टाकण्यांत आले (१ ऑगस्ट १६७४; प. सा. सं. खं. २, पृ. ४९८).

बहादुरखानाची छावणी लुटल्यापासून शिवाजीला हा फायदा झाला कीं, राज्याभिषेकसमयीं दानधर्मादिकांत त्याचा खजिना रिता पडला होता तो बराचसा भरून निघाला. त्यानंतर त्याचें लक्ष गोवेकर व कुडाळकर यांच्या सीमेवरील फोंडा किल्ला घेण्याकडे वेधलें. फोंडा किल्ला गोव्यापासून वीस मैल आहे. शिवाजी त्या बाजूस मार्च महिन्यांत वळला. तो तिकडे येण्याची बातमी समजतांच लुटीच्या भीतीनें हुबळीचे व्यापारी हुबळी सोडून पळाले. तो प्रथम राजापुरास व तेथून त्याच्या ताब्यांतील कुडाळास गेला. राजापुराहून त्यानें चाळीस लहान जहाजें वेंगुर्ल्याकडे रवाना केलीं. राजापुरास आल्यावर इंग्रजांनीं त्यास नजराणा पाठवून त्याचें स्वागत केलें. त्याजबरोबर १५ हजार घोडदळ, १४ हजार पायदळ व १० हजार मजूर होते. यांपैकीं २ हजार घोडदळ व ७ हजार पायदळ घेऊन तो कुडाळाहून फोंड्यास गेला व त्यानें त्या किल्ल्यास वेढा घातला (१४ एप्रिल १६७५).

फोंडा किल्ला शिवाजीपासून सन १६६६ त विजापूरकरांनीं घेतला होता. तेव्हांपासून गेलीं आठ वर्षें त्याचा ताबा विजापूरकरांकडेच होता. कुडाळ प्रांताचें व पोर्तुगीजांचें तें मर्मस्थान होतें. हें मर्मस्थान आदिलशहाच्या हातीं गेलेंच होतें. त्याशिवाय त्यांचा सेनापति रुस्तुमजमा यानें बांदा, डिचोली, साखळी, कुडाळ हीं ठाणींहि घेतल्यामुळें शिवाजीच्या कुडाळ प्रांतावरील वर्चस्वास धोका आला होता. यासाठीं प्रथम फोंडा किल्ला लढून घेणेंच शिवाजीला क्रमप्राप्त होतें. फोंड्यावर आदिलशहानें महमद इखलासखान यास सुभेदार नेमलें होतें. त्याजविरुद्ध कुरापत काढण्यास शिवाजीस कांहीं निमित्त पाहिजेच होतें. तें निमित्त या वेळीं उत्पन्न झालें. महंमदखानानें फोंड्यापासून १६ मैलांवरील शिवाजीच्या हद्दींतील मसुरा या गांवच्या एका श्रीमंत व्यापाऱ्यास धरून नेल्यामुळें शिवाजीस त्याचा सात्त्विक संताप आला. आपल्या प्रजेचें रक्षण

करणें हें राजाचें आद्य कर्तव्य असून तें त्यास नीट बजावतां न आल्यास त्याजवरची प्रजाजनांची निष्ठा उडाली तर त्यांत आश्चर्य काय ? शिवाजीचा हा क्रोधाग्नि समजतांच सुभेदारानें फोंड्याकडे तोफा आणल्या व इंग्रजांपाशींहि कांहीं तोफा व गलबतें मागितलीं. तथापि शिवाजीच्या हद्दींत राजापुरास वखार घातली असल्यामुळें इंग्रजांनीं खानाच्या मागणीस नकार दिला. हा वेढा पावसाळा आला तरी उठवावयाचा नाहीं असा त्यानें निश्चय केला. वेढ्यांत सांपडलेला विजापुरी सुभेदार महमदखान याजपाशीं चार महिने जेमतेम पुरेल इतकाच रसदेचा सांठा होता (प. सा. सं. खंड २ पृ. ५२०). शिवाजीनें वेढा घातल्याचें समजल्यावर त्या प्रांताचा सरसुभेदार रुस्तुमजमा १५०० घोडदळ व पायदळ घेऊन महमदखानाच्या मदतीस आला. त्याच वेळीं संभाजीबरोबर भागानगर भागांत गेलेल्या सैन्यानें आदिलशाहीच्या हद्दींतील एटगिरी (यादगिरी) व गोवळकोंड्याच्या हद्दींतील भागानगराजवळील दोन नगरें लुटून आणि तेथून पुष्कळ संपत्ति व सावकार पकडून फोंड्यास शिवाजीपाशीं आणले. पोर्तुगीज हद्दींतील कुकुली व वरुडें हीं गांवेंहि त्याच्या सैन्यानें लुटलीं; आणि त्याचें सैन्य फोंड्यापाशीं तीस हजारांपर्यंत जमलें (प. सा. सं. खंड २, पृ. ५२१). यामुळें तर वेढ्याचें काम अधिकच नेटास लागलें. त्यानें माऱ्याच्या दोन जागा घेऊन किल्ल्याभोंवतालचा खंदक भरून काढला आणि किल्ल्याच्या तटाला पांचशें शिड्या लावून त्यावरून चढून जाण्याचें धाडस करणाऱ्या वीरांना बक्षिसें देण्याकरितां अर्धा शेर वजनाचीं पांचशें सोन्याचीं कडीं करविलीं. इतकी तयारी ता. ३ मे १६७५ तच झाल्यावर पांच दिवसांच्या आंत किल्ला सर करून किल्लेदार महमदखान याच्या पायांत शिवाजीनें बेड्या ठोकल्या.

कारवारावर स्वारी

फोंडा किल्ला असा शर्थीनें घेतल्यावर शिवाजीचें सैन्य अधिक मुलूखगिरी करण्यास कारवार प्रांतांत घुसलें. त्याचें तीन सहस्र घोडदळ व कांहीं पायदळ यांनीं शिवेश्वर किल्ल्यास वेढा दिला व कारवार शहर जाळलें (प. सा. सं. खंड २, पृ. ५२२). शिवाजीनें फोंडा किल्ला जिंकला याचा दरारा कारवार प्रांतावर इतका बसला कीं, तो जिकडे जाईल तिकडे त्याला एकसारखें यशच येत गेलें. त्या बाबतींत भागानगराकडून लुटून आणलेल्या

द्रव्याचा प्रयोगहि कमी उपयोगी पडला असें नाहीं. कांही अंशीं त्याच्याच बळावर त्यानें अंकोला व शिवेश्वर हे दोन्ही किल्ले घेतले; आणि अंकोल्यापर्यंतच्या सर्व मुलुखाचा तो मे महिन्याच्या २५ तारखेपर्यंत स्वामी झाला. शिवाजी फोंड्यास होता तेव्हां बहिलोलखान मिरजेस होता. तो शिवाजीवर जाणार होता. परंतु शिवाजीनें त्याचीहि मूठ दाबल्यामुळें, देशावरून कोंकणांत उतरावयाचे घाट शिवाजीनें झाडें तोडून व तीं वाटेंत टाकून अडविल्याची सबब सांगून, बहिलोलखान फोंड्याकडे न जातां आपलें सैन्य मिरजेस ठेवून पावसाळ्याकरितां विजापुरास गेला. वर लिहिल्याप्रमाणें शिवाजीनें फोंडा व कारवार प्रांत जिंकून घेतल्यावर त्याच्या बंदोबस्ताकरितां अण्णाजी पंडित सुरनीस (सचिव) यास फोंड्यास ठेवलें आणि आपण ता. ११ जून १६७५ रोजीं राजापुरावरून रायगडाकडे निघून गेला (प. सा. सं. खंड २, पृ. ५२५). अशा रीतीनें फोंडा व कारवार या बाजूची मोहीम त्यानें सुमारें नऊ महिन्यांत संपविली. तिकडून परत येण्यापूर्वी शिवाजीनें कांहीं सैन्य सोंधे-बेदनुराकडे रवाना केलें. बेदनूरची राणी व तिचा कारभारी तिमय्या यांचें एकमेकांशीं वांकडें आलें होतें. म्हणून राणीनें शिवाजीपाशीं मदत मागितली होती. ती देऊन त्यानें राणीपासून मिळावयाच्या खंडणीचा ठराव केला व आपला वकील उमाजी पंडित यास त्यानें तिच्या दरबारीं ठेवलें.

मोरोपंताची मोहीम

मोरोपंत पिंगळे हा शिवाजीचा उजवा हात होता. तो मुत्सद्दी होता व शूरहि होता. हे दोन्ही गुण शिवाजीच्या अधिकाऱ्यांत एकट्या मोरोपंतांतच उत्कटत्वानें वसत असल्यामुळें शिवाजी त्याजवर फार विसंबून असे. सन १६७२ त मोरोपंतच जव्हार, रामनगर व कोळवण या भागांत जाऊन मोठें पराक्रम करून आला होता. सुरत बंदरास हा टापू अगदीं नजिक होता व तेथें मराठ्यांनीं आपलें पाऊल रोवल्यामुळें सुरतेच्या नागरिकांस त्यांची सतत भीति वाटत होती. शिवाय हा टापू मराठ्यांच्या ताब्यांत राहूं देणें म्हणजे मराठ्यांना नाशिक व खानदेश या मोगली प्रदेशाचें आक्रमण करूं देण्यास वाव देणेंच होतें. याकारणानें बहादुरखान हा मोगलांतर्फे मराठ्यांना रोखण्याकरितां त्या बाजूस फौज घेऊन राहिला होता.

मोरोपंतानें मागील खेपेस कोळवण व नाशिक भागांतील महत्त्वाचे किल्ले हस्तगत केलेच होते. रामनगर व जव्हार मागील खेपेस मोरोपंतानें जिंकलें होतें; परंतु एखादें ठाणें वा प्रदेश आज जिंकावा व उद्यां तो शत्रूंनीं परत जिंकून घ्यावा, असें शिवकालांत वारंवार घडत असे. त्याप्रमाणें रामनगरच्या राजानें मराठ्यांचें वर्चस्व झुगारून दिलें होतें व आतां तो मोगलांचा अंकित बनला होता. त्यालाहि वठणीवर आणावयाचें होतें. नवीन जिंकलेल्या भागांत तो भाग शत्रूनें पुनः जिंकून परत घेतल्यावर तो परत घेण्यासाठीं स्वारी करण्यांत शिवाजीला मनुष्यबळ व द्रव्यबळ खर्चीं घालावें लागत असे. हा खर्च लुटीनें भरून काढावयाचा किंवा चौथाईच्या रूपानें तिकडील प्रजेकडून वसूल करावयाचा असे दोन उपाय असत. त्यांपैकीं दुसरा उपाय केव्हांहि अधिक प्रशस्त व प्रजाजनांस कमी त्रासदायक या दृष्टीनें शिवाजीनें चौथाईची क्लृप्ति अलीकडे हुडकून काढली होती. तिचाहि अंमल त्या बाजूस पोर्तुगीजांवर व सुरतेवर करावयाचा होता. हें एक राजकारण असल्यामुळें, तें साधलें तर मोरोपंतासारख्या सव्यसाची वीर-मुत्सद्दयासच साधावयाचें, यास्तव असे अनेक हेतु डोळ्यापुढें ठेवून महाराजांनीं या बहुविध कामगिरीवर मोरोपंत पेशव्याचीच योजना केली.

मोरोपंताची भरारी

हा शिवाजीचा सेनापति व पेशवा मोरोपंत कल्याण-भिवंडीजवळ जुलै १६७४ त गेला असल्याचें मागें सांगितलेंच आहे. तेथून तो रामनगराकडे निघाला असतां वाटेंत रामनगरच्या अरण्यांतील भिल्लांनीं त्यास अडविल्यामुळें तो रामनगराकडे न जातां औरंगाबादेकडे वळला व तिकडे त्यानें आसपास लूट केली. ही बातमी तिकडील मोगल सेनापति कुतुबखान यास कळल्यावर तो मोरोपंतावर चालून आला. पण मोरोपंतानें त्याचा पार धुव्वा उडवून त्याचे तीनशेंच्यावर शिपाई कापून काढले (९ जानेवारी १६७५). कुतुबखानाचा असा धुव्वा उडवून दिल्यावर मोरोपंतानें खानदेशांत शिरून धरणगांव लुटलें. त्यांत इंग्रजांची वखारहि लुटली गेली. धरणगांवाहून थेट त्यानें बऱ्हाणपूर गांठलें. त्या वेळीं प्रसिद्ध दिलीरखान बऱ्हाणपुरास होता. त्याचा मोड करून मोरोपंतानें त्याचे एक हजार पठाण कापून काढले. मोरोपंताचे फक्त ५।६ शें सैनिक मेले (५ फेब्रुवारी १६७५,

प. सा. सं. खंड २, पृ. ५१५). ब्ऱ्हाणपुरापासून मोरोपंताच्या मागें मोगलांचें सैन्य हात धुऊन लागलें. त्याजबरोबर लढत लढत मोरोपंत कल्याणपाशीं परत आला. कल्याणहून दमणाकडे जाऊन पारनेरा नांवाचा ओसाड व पडका किल्ला त्यानें घेतला व त्याची डागडुजी केली (२६ एप्रिल १६७६).

कल्याण व दमण या भागांत आल्यावर मोरोपंतानें वसईच्या पोर्तुगीजांपाशीं चौथाईची मागणी केली. ती नाकारून त्यांनीं वसईचा पक्का बंदोबस्त केला व ते युद्धासाठीं सज्ज झाले. पण वसईवर स्वारी करावयाची म्हणजे नाविकदलाची बाजू मजबूत पाहिजे. मोरोपंताची ती बाजू लंगडी. त्याजपाशीं लहान गुराबा व हलक्या नावाच काय त्या होत्या. ही गोम लक्षांत घेऊन व त्यास इतक्या खोल पाण्यांत शिरावयाचें नव्हतें म्हणूनहि मोरोपंतानें या वेळीं गम खाल्ली असें दिसतें. सिद्दी व शिवाजी यांचें वितुष्ट असल्यामुळें शिवाजीच्या कोंकण प्रांतांत समुद्रांतून मीठ पाठविणें शिवाजीस धोक्याचें किंबहुना अशक्य झालें होतें. यासाठीं मोरोपंतानें मुंबईस इंग्रजांच्या प्रेसिडेंटास अनेक पत्रें व निरोप पाठवून त्यांच्या जहाजांतून मीठ रवाना करण्यास विनंती केली, तीहि फुकट गेली.

पोर्तुगीज व इंग्रज यांकडे केलेल्या कारवाईची अशी वासलात लागल्यावर मोरोपंतानें रामनगरावर जाऊन तेथील राजास हांकून लावलें. तेथून पुढें सरकून त्यानें पिंडवाल व पेनेका हीं ठाणीं घेतलीं. तेथून सुरत तीन दिवसांच्या वाटेवर म्हणजे ४० मैल होती. तिला लुटीचें भय उत्पन्न करून तेथील सुभेदारापाशीं त्यानें खंडणीचें बोलणें लावलें. पोर्तुगीजांवर चौथाईचा टाकलेला डाव फसला तरी, मोरोपंतानें सुरतेकडे जाण्याचा मार्ग खुला होण्याकरितां पोर्तुगीजांपासून त्यांच्या मुलखांतून जाण्याची परवानगी मिळविण्यांत यश संपादिलें आणि भीमपूर व दमण येथें वसाहत करण्यासहि त्यानें त्यांजपासून परवानगी घेतली. सन १६७० त शिवाजीनें सुरत शहर लुटलें. त्या वेळीं त्यानें सुरतकरांपाशीं दरसाल १२ लक्ष रुपये खंडणी मागितली होती. ती वसूल करण्याचा या वेळीं मोरोपंताचा इरादा होता व त्यासाठींच सुरतेस जावयाचा मार्ग तो खुला करून घेत होता. परंतु त्यास शिवाजीचें रायगडाहून तांतडीचें बोलावणें आल्यामुळें सुरतेवर जाण्याचा बेत तहकूब ठेवून तो रायगडास परत जाण्यास जुलै १६७६ च्या

आरंभीं निघाला व निघण्यापूर्वी त्यानें पिंडवालच्या रक्षणार्थ चार सहस्र सैन्य ठेवलें.

मोरोपंतास रायगडावर तांतडीनें महाराजांनीं बोलावलें याचें कारणहि तसेंच महत्त्वाचें होतें. दंडाराजपुरीच्या सिद्द्याशीं शिवाजीचें भांडण कित्येक वर्षें चालू होतें. त्यास जंजिरा (किल्ला) सिद्द्यापासून घेऊन सिद्द्यास कोंकणपट्टींतून उखडून काढावयाचें होतें; पण तें कांहीं केल्या साधेना. तेव्हां मोरोपंतासारखा मोठा सेनापति व मुत्सद्दी या मोहिमेवर पाठविला तरच जंजिरा पडेल अशी शिवाजीची अपेक्षा होती व त्याच अपेक्षेनें त्यानें त्यास रायगडीं बोलावून घेतलें. महाराज या वेळीं मोठ्या आजारांतून बरे झाले असून ते आतां गोवळकोंडा व कर्नाटक यांच्या मोठ्या मोहिमेवर जाण्याच्या विचारांत होते. तिकडे जावयास निघण्यापूर्वी जंजिऱ्याचा प्रश्न निकालांत काढण्याचें त्यांनीं ठरविलें व मोरोपंतापाशीं दहा हजार फौज देऊन त्यास दंडाराजपुरीवर ऑगस्ट १६७६ च्या प्रारंभीं रवाना केलें. दंडाराजपुरी जिंकल्याशिवाय महाराजांस तोंड दाखवावयाचें नाहीं, अशी प्रतिज्ञा करून मोरोपंत तेथें आला तरी त्यास तेथील प्रतिकूल परिस्थितीमुळें केलेली प्रतिज्ञा अखेर मोडणेंच भाग पडलें.

दंडाराजपुरीच्या मोहिमेंत व नंतर जवळ जवळ वर्ष गेल्यावर मोरोपंत जून १६७७ त रामनगरास दहा हजार सैन्य घेऊन आला. त्याचा उद्देश मागच्या खेपेस सुरतेपासून जी खंडणी वसूल करावयाची राहिली होती ती आतां वसूल करण्याचा होता. त्याच्या आगमनानें सुरतेस लुटीची भीति वाटूं लागली. पण त्याच्या सैन्यानें लूट न करतां हल्ल्याची भीति दाखवून डचांच्या माहितीप्रमाणें दहा हजार रुपये उकळले (प. सा. सं. खंड २, पृ. ५७९). या वेळीं मोरोपंतास केवळ मोहिमेचें तेवढेंच व्यवधान नव्हतें. शिवाजीमहाराज कर्नाटकाच्या दिग्विजयावर गेले होते व महाराष्ट्रांतील राज्याचा सर्व भार त्यांनीं मोरोपंत, अण्णाजीपंत व दत्ताजीपंत वाकनीस या त्रिवर्गावर टाकला असल्यामुळें मोरोपंताच्या मोहिमा महाराज कर्नाटकांतून परत येईपर्यंत साहजिकच थांबल्या.

प्रकरण सतरावें

गोवळकोंड्यावर स्वारी

देहे दुःखें कद़रों नये। उदंडचि करावे उपाय।
मग सर्व सुखासी काय। उणें आहे॥

— रामदास

शिवाजीचा आजार

फोंड्याची मोहीम संपवून व तिकडील व्यवस्था लावून महाराज जून १६७५ मध्यें रायगडास परत आले. त्यानंतर सातार्‍यास असतां ते त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्यांत आजारी पडले. ही महत्त्वाची बातमी सर्वत्र अल्पावधींत पसरून तिजविषयीं तर्कवितर्क सुरू झाले. मुंबईच्या इंग्रज व्यापार्‍यांना ती अर्थातच विकृत स्वरूपांत कळली. शिवाजीच्या शत्रूंना ती ऐकून परमावधीचा आनंद झाला व त्या आनंदाच्या भरांत तो मेला, त्याचें दफन झालें, असेंहि उठविण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. मुंबई-च्या इंग्रजांनीं ही वार्ता सुरतेस पत्रानें कळविली. तिचा मजकूर पुढीलप्रमाणें होता — " शिवाजी मेला तें ठिकाण, त्याची पुरण्याची जागा व तर्‍हा अशा संपूर्ण तपशिलासह शिवाजीचा मृत्यु व और्ध्वदेहिक विधि याबद्दल गेले कित्येक दिवस बातमी ऐकूं येते. शिवाजीच्या एका मुख्य ब्राह्मणाच्या मुलीशीं संभाजीनें व्यभिचार केला. तिला भेटण्यासाठीं गडाखालीं (पाचाड) जाण्याचें त्यानें न सोडल्यास, त्याचा कडेलोट करण्याचा हुकूम शिवाजीनें दिल्याचें ऐकून, संभाजीनें त्याला विषप्रयोग केला, असें कित्येक बोलतात. तो आजारी होता व त्याचा आजार मुख्यतः त्याच्या डोक्यांतील भयंकर कळांमुळें होता (कारण त्याचा मेंदू बहुतेक कुजला होता) इतकें आम्हांस खात्रीलायक माहीत आहे! डेप्युटी प्रेसिडेंटाच्या एका नोकराला सिद्दी संबूळकडून शिवाजी मेला असें कळलें. दाभोळ, कल्याण, चौल इत्यादि ठिकाणचे व्यापारी तसेंच बोलतात. परंतु त्यावर फारसा विश्वास ठेवतां येत नाहीं. कारण मोरो पंडित माहुली-

खालीं (कल्याणाजवळ) ससैन्य आहे. तो अद्याप तेथून हलला नाहीं." हें पत्र ता. १७ जानेवारी सन १६७६ चें आहे (प. सा. सं. खंड २, पृ. ५३८).

या पत्रावरून इतकें स्पष्ट दिसतें कीं, महाराज जानेवारी महिन्यांत भयंकर आजारानें पछाडले होते. संभाजीचें वय या वेळीं १९ वर्षांचें होतें म्हणजे तो अगदीं उमेदवार होता. तो राजा झाल्यानंतर त्याच्यांत दिसून आलेल्या दुर्व्यसनांचा विचार करतां, वरील पत्रांत नमूद केलेला अत्याचार त्याजकडून घडला नसेल असें म्हणवत नाहीं. शिवाजीस देखील तो जुमानणारा नव्हता, हें पुढें तो शिवाजीविरुद्ध दिलीरखानास मिळाला, त्यावरून सिद्ध होतच आहे. कदाचित् त्याला कारण शिवाजीनें त्याला फार जरबेंत ठेवलें हेंहि असूं शकेल. वरील अत्याचार महाराजांसारख्या सच्छील पुरुषास सहन होऊं नये व त्यांनीं आपल्या कडक शिस्तीस अनुसरून संभाजीस कडेलोटीचा धाक घालावा यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. आणि त्यावरून चिडून तारुण्याच्या उन्मादांत संभाजीनें बापावर विषप्रयोग करणें त्याच्या पुढील चरित्राशीं विसंगत वाटत नाहीं. तें कसेंहि असो. महाराज आजारी पडून त्यांतून पुढें अनेक रामबाण औषधें घेऊन वांचले एवढें खरें. ते रायगड सोडून साताऱ्यास येऊन राहिले. यालाहि कारण रायगडचें वातावरण त्यांस धोक्याचें वाटलें असावें हेंहि असूं शकेल. महाराजांवर विषप्रयोग झाला असावा हा संशय महाराज कर्नाटकाच्या मोहिमेवर गेले असतां त्यांनीं मद्रासेहून विषाच्या उताऱ्यावर औषध आणविलें यामुळेंहि दृढावतो. तें पत्र १८ जून १६७७ चें आहे. "शिवाजीमहाराजाचें वेलूरच्या वेढ्यांतून १५ मेचें पत्र आलें, त्यांत त्यानें आणखी जिनसा मागितल्या; त्या खटपटीनें मिळवून आपला वकील रामण्णा याच्याबरोबर शिष्टाचाराचें पत्र देऊन पाठविल्या. जिनसांच्या किंमती न मागतां त्याला ह्या वस्तु नजर केल्या. त्यानें पुष्टिकारक रत्नें व विषावर उतारे पुनः मागितले. ते अशा रीतीनें त्याजकडे रवाना केले. त्याचें सामर्थ्य वाढत आहे हें लक्षांत घेऊन त्याजपासून जिनसांच्या किंमती मुद्दाम मागितल्या नाहींत" (प. सा. सं. खंड २, पृ. ५७९). या औषधांची किंमत ५२ होन असल्याचेंहि त्या पत्रांत नमूद आहे. शिवाजी आजारांतून बरा होऊन कर्नाटकांत गेला असला तरी त्याची प्रकृति अगदीं

निर्दोष झाली नसून विषबाधेपासून त्याला कित्येक महिने त्रास होत होता; किंबहुना त्यामुळेंच त्याला पुढें अकालीं मृत्यु आला असावा.

शिवाजी महाराजांची प्रकृति सन १६७६ च्या जून महिन्यांत चांगली सुधारली. त्यांचा आतांपर्यंत अनेक वर्षें मोगल व विजापूरकर यांजबरोबर घनिष्ट संबंध आला होता. पण गोवळकोंड्याच्या कुतुबशहाशीं, तो त्यांच्या कार्यक्षेत्रापासून आडवळणी असल्यामुळें, संघर्ष विशेषसा झाला नव्हता. यासाठीं त्याजबरोबर मैत्री संपादून मोगल व विजापूरकर यांना नरम आणतां आल्यास पाहावें, असा विचार महाराजांच्या मनांत आतां घोळूं लागला होता. याशिवाय आणखी एक प्रबळ कारण कर्नाटकांत जाण्यास होतें. सन १६६४ त शहाजी मरण पावला. तेव्हांपासून शहाजीच्या पश्चात् त्याचा पुत्र व शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकोजी शहाजीच्या जहागिरीचा गेलीं बारा वर्षें उपभोग घेत होता. शिवाजी व व्यंकोजी हे बंधु असले तरी मनोवृत्तींत, विचारांत व वागणुकींत त्यांच्यांत महत्त्वाचा फरक होता. व्यंकोजी विजापूरकरांचा सेवक व सरदार आणि शिवाजी हा विजापूरकरांचा शत्रु व प्रतिस्पर्धी होता. या कारणानें उभय बंधूंचें परस्परांकडे येणें-जाणें बंद पडलें होतें. इतकेंच नव्हे, तर व्यंकोजी हा आदिलशहातर्फे बहिलोलखानासह रांगण्यास सन १६६७ त वेढा घालण्यास आला असतां, शिवाजीला त्याजबरोबर लढणें व त्याचा पराभव करणें भाग पडलें. असे हे परस्परसंबंध लक्षांत घेतले म्हणजे शिवाजीस बापाच्या जहागिरीचा कर्नाटकांतील हिस्सा त्याजपासून मिळविण्याची इच्छा व्हावी यांत नवल नाहीं.

व्यंकोजीशीं वितुष्ट

शिवाजीचें व्यंकोजीशीं जसें क्रमप्राप्त वितुष्ट होतें, तसेंच शिवाजीच्या घरांतहि भांडणें होतींच. संभाजी आतां १९ वर्षांचा झाला असून वडिलकीच्या नात्यानें शिवाजीच्या पश्चात् राजपद त्यासच मिळावयाचें हें ठरल्यासारखें होतें. संभाजीची आई त्याच्या लहानपणींच निवर्तली होती व घरांत राजारामाची आई सोयराबाई हिचाच वरचष्मा होता. शिवाजी तिच्याच तंत्रानें कौटुंबिक बाबतींत चालत होता. तिला शिवाजीच्या पश्चात् राजपद आपला पुत्र राजाराम यास प्राप्त व्हावें असें स्वार्थबुद्धीनें वाटत

असावें. परंतु तें व्हावें कसें! संभाजी दुराचारी होता, या दोषाचा फायदा घेऊन सोयराबाईनें एकान्तांत शिवाजीचें मन संभाजीविषयीं कलुषित केलें नसेल असें म्हणवत नाहीं. अशा स्थितींत एकच तोड होती ती ही कीं, दोघांना दोन राज्यें देणें. त्या दोन राज्यांपैकीं एक राज्य महाराष्ट्रांत होतेंच, दुसरें राज्य पाहिजे होतें. तें व्यंकोजीपासून घ्यावें व बहुत वाढवावें, असा उद्देश मनांत बाळगून शिवाजी दक्षिण-दिग्विजयार्थ निघाला.

दक्षिणेंतील कार्यभाग साधण्यास बरेच दिवस लागतील असा संभव लक्षांत घेऊन त्यानें राज्यरक्षणाचें काम मोरोपंत पेशवे, आण्णाजीपंत सुरनीस व दत्ताजी त्रिंबक वाकनीस यांजवर सोंपविलें आणि आपणांबरोबर जनार्दन नारायण व रघुनाथ नारायण हणमंते यांस घेतलें. दोघेहि कर्नाटकाचे माहितगार व नारो त्रिमलचे पुत्र होते. नारो त्रिमल प्रथम निजामशाहींत नोकर असून पुढें दादाजी कोंडदेवाप्रमाणें शहाजीच्या पदरीं राहिला. त्याचा पुत्र रघुनाथपंत प्रथम शहाजीजवळ कर्नाटकांत कारभार करून नंतर व्यंकोजीचा कारभार पाहूं लागला. शहाजीच्या पश्चात् मदुरा व तंजावर येथील नायक आपसांत भांडत असतां त्या भांडणाचा फायदा घेऊन व्यंकोजीनें सन १६७५ त तें जिंकलें. त्या कामीं व्यंकोजीस रघुनाथ नारायण हणमंते यांच्या बुद्धिमत्तेचा व कारस्थानाचा पुष्कळ उपयोग झाला. पण कांहीं दिवसांनीं रघुनाथपंताचें व्यंकोजीशीं बनेनासें होऊन तो शिवाजीकडे आला. त्यानेंच भागानगरास अगोदर जाऊन व मादण्णाशीं खलबत करून शिवाजीचें राजकारण आगाऊ शिजवून ठेवलें व मगच शिवाजी त्यास व त्याचा भाऊ जनार्दनपंत यास बरोबर घेऊन गोवळकोंड्यास जावयास निघाला. मात्र आपला पोटांतला मुख्य हेतु कोणास कळूं न देण्याकरितां, त्यानें आपण रामेश्वर-यात्रेला जात असल्याची अफवा सर्वत्र पसरून दिली. त्याजबरोबर सैन्य स्वार व पायदळ मिळून ३६ हजार होतें. अशा तयारीनें शिवाजी ६ ऑक्टोबर सन १६७६ रोजीं निघाला. त्याच्या या स्वारीविषयीं डचांनीं सन १६७६ त पुढील वृत्तान्त लिहून ठेवला आहे (प. सा. सं. खंड २, पृ. ५६३).

"सन १६७६ मध्यें शिवाजीनें बारा हजार पायदळ व चोवीस हजार घोडदळ यांसह गोवळकोंड्यापासून ९ मैलांवर तळ दिला आणि

मोठी रक्कम न दिल्यास शहर जाळण्याची त्यानें धमकी दिली. त्यामुळें भिऊन जाऊन आम्हीं आमच्या मालाचें रक्षण व्हावें म्हणून एक हजार फ्लॉरिन किमतीचा बदाम, खारीक, द्राक्षें, पिस्ते अशा वस्तूंचा त्याला नजराणा केला. त्याबद्दल योग्य मान देऊन त्यानें आम्हांस कौल दिला.

"गुप्तपणें ठेवलेली अपार संपत्ति हातीं लागावी यासाठीं तो सुलतानाच्या व उमरावांच्या वाड्यांवर हल्ला करणार होता. परंतु सुभेदार मादण्णा यानें प्रसंग जाणून त्याला दररोज हजार दोन हजार होनांचा जणू काय रतीब लावला. नंतर शिवाजी सुवर्णानें स्वतःला मढवून घेऊन परत गेला.

"सुलतानाची व त्याची भेट झाली, तेव्हां राजेलोकांच्या वहिवाटी-प्रमाणें त्यानें स्वतंत्र दरवाजानें प्रवेश केला. भेटीच्या प्रसंगीं त्याजकरितां विशेष आसन तयार करण्यांत आलें होतें. सुलतानाशीं त्याचें संभाषण चालू असतां राजवाड्याला त्याच्या सहा हजार घोडेस्वारांनीं बोल-बोल म्हणतां वेढा घातला. ते फारच हलक्या पावलांनीं कोणाला न कळत गोळा झाले. त्याची प्रजा त्याला जितकी मानते तितकेंच त्याजवर प्रेमहि करतें असें ह्यावरून दिसून आलें" (प. सा. सं. खंड, २, पृ. ५६४). डचांनीं वरील वृत्तान्तांत आपला अनुभव नमूद करून ठेवला आहे. त्यावरून शिवाजीनें धाकदपटशानें व सैन्याच्या बळावर कुतुबशहापासून अपार संपत्ति काढली, तसेंच त्याचे सैनिक व प्रजाजन यांचा त्यानें अलोट लोभ संपादन केला होता हेंहि समजतें.

थाटाचें स्वागत

वरील प्रसंगीं कुतुबशहानें शिवाजीचें फार थाटाचें स्वागत केलें व त्याला बराचसा कारण मादण्णा झाला यांत शंका नाहीं. या वेळीं कुतुब-शाहीच्या गादीवर अबू हसन कुतुबशहा हा असून तो आळशी व विलासी होता व त्याचा कारभार आकण्णा व मादण्णा हे दोन ब्राह्मण प्रधान पाहत असत. अबू हसन याजपूर्वी अब्दुल्ला हुसेन हा तक्तनशीन होता. तो सन १६५८ त मरण पावल्यावर त्याचा हा जावई गादीवर बसला. अर्थात् या वेळीं तो चांगलाच प्रौढ असला पाहिजे.

अबू हसन यास गादी मिळवून देण्यांत सय्यद मुजफर या सरदारानें पुढाकार घेतला होता. या उपकाराची फेड अबूनें त्यास आपला वजीर नेमून केली. सय्यद मुजफर हा जसा अबूचा सहायक होता तशीच आकण्णा व मादण्णा हीहि जोडी होती. यांचें घराणें वारंगळ प्रांतांतील हनुमकोंडा येथील. त्यांचा बाप भानुपंत हा त्या प्रांतांत मुलकी नोकर होता. हे एकंदर चार भाऊ — (१) आकण्णा, (२) मादण्णा, (३) विसण्णा व (४) मृत्युंजय. मादण्णा म्हणजे मदन पंडित व आकण्णा म्हणजे एकनाथ पंडित. हे दोघे गरीब ब्राह्मणाचे मुलगे प्रथम मीरजुम्लापाशीं नोकरीस राहून आपल्या हुशारीनें मोठ्या योग्यतेस चढले. मादण्णास फारसी, संस्कृत व देशी भाषा चांगल्या अवगत होत्या. मादण्णा मनमिळाऊ व चौरस असून आकण्णा कांहींसा लहरी व तुसडा होता. अबू हसन गादीवर बसल्यानंतर त्याचा वजीर सय्यद मुजफर त्यास जुमानीनासा झाला. म्हणून अबूनें मादण्णाच्या मदतीनें त्यास कामावरून काढून टाकून मादण्णास सन १६७३त वजीर नेमलें व त्यास सूर्यप्रकाशराव अशी पदवी दिली. मादण्णास प्रधान-पद मिळालें तेव्हां आकण्णा कर्नाटकांतील प्रदेशावर कारभारी होता. त्यास पुढें मादण्णानें गोवळकोंड्यातर्फे विजापुरास वकील म्हणून नेमलें आणि मागाहून त्याची त्यानें सेनापतिपदावर नेमणूक केली. मादण्णाचे तिघे पुतणे लिंगण्णा, गोपण्णा ऊर्फ रामदास व यंगण्णा ऊर्फ रुस्तुमराव हे निरनिराळ्या ठिकाणीं तहशिलीच्या कामावर असून या समस्त कुटुंबानें गोवळकोंड्याच्या राज्यांत हिंदूंची बाजू चांगली राखून बंडाळी मोडली व सुव्यवस्था प्रस्थापित केली. शिवाजीच्या गोवळकोंडा येथील मुक्कामांत त्यास आकण्णा व मादण्णा यांची चांगलीच मदत झाली. शिवाजीनें त्याजकडे रघुनाथपंताप्रमाणें प्रल्हाद निराजी यासहि आगाऊ पाठवून संधान बांधलें होतें (सरदेसाई).

सभासदानें या कारवाईचें वर्णन केलें आहे तें विचारार्ह आहे. तो लिहितो, "शिवाजीनें आपला हेजीब प्रल्हाद निराजी यास अगाऊ भागानगरास पाठविलें होतें. त्यानें सुलतान व त्याचे कारभारी आकण्णा व मादण्णा यांच्या गांठी घेऊन त्यांस शिवाजीच्या आगमनाचा उद्देश सांगून ठेवलाच होता व शिवाजीशीं नीट वागल्यास त्याजकडून दगा होणार

नाहीं, अशी त्यांची खात्री पटविली होती. कर्नाटक साधावयास द्रव्य लागेल, त्यास खजिन्यांतील द्रव्य वेचूं नये, नूतन मिळवावें आणि वेच करून देश साधावा, असा विचार करतां भागानगरचें पातशाहींत द्रव्य उदंड आहे तें मिळवावें " हा महाराजांचा उद्देश सभासदानें स्पष्ट लिहिला आहे. सभासद पुढें लिहितो, " पातशहानें दोनचार गांव पुढें सामोरें यावें असें केलें. राजा मोठा साधक. आण घालून पातशहास सांगून पाठविलें कीं, तुम्हीं न येणें; आपण वडील भाऊ, मी धाकटा भाऊ. आपण पुढें न यावें. असें सांगून पाठविल्यावरी पातशाहा बहुत सतुष्ट जहाले. आणि मादण्णा-पंत व आकण्णापंत म्हणजे सर्व पातशाहीमध्यें 'धणी'; हे उभयतां पुढें येऊन राजियास घेऊन शहरास गेले. सुमुहूर्त पाहून पातशहाचे भेटीस नगरामध्यें चालिलें. पातशाहांनीं कुल नगर शृंगारिलें. चौफेरी बिदीस कुंकुम-केशराचे सडे, रंगमाळा घातल्या. गुडिया, तोरणें, पताका, निशाणें नगरांत लाविलीं. नगर-नागरिक लोक राजा पाहावयास उभे राहिले. नारींनीं मंगल आरत्या अगणित उजळून राजियास वंदिलें. सोनें-रुपियाचीं फुलें राजियावरी उधळिलीं. राजियांनीं लोकांस खैरात द्रव्य, वस्त्रें अगणित दिलीं. आणि सर्व सैन्यासह दाद महालास पावले. पातशहास 'खालते उतरूं नका, आपण खासा येतों,' म्हणून शपथ घालून सांगून पाठविलें. पातशहा महालावरी राहिले, राजियांनीं आपले लष्करचे लोक कबरबंदी करून महालाखालीं बसविले आणि शिडीवरून चालिले. खासा राजा, जनार्दन नारायण, प्रल्हादपंत, सोनाजी नाईक, दौलत बकी व बाबाजी ढमढेरे पांच जण चढले. महालांत गेले. पातशहा पुढें येऊन क्षेम आलिं-गन केलें. उभयतां एकासनीं बसले. मादण्णापंत, आकण्णापंत, जनार्दनपंत, प्रल्हादपंत, सोनाजी नाईक, बंकी व बाबाजी ढमढेरे असे होते. पातशाहा, राजे व मादण्णापंत त्रिवर्ग बसले. वरकड उभे राहिले. उभयतांचा स्नेह अतिशय, बोलणें झालें. पातशहाच्या स्त्रिया झरोकियांतून जाळपालांतून राजा पहात बहुत थक्क झाल्या. पातशाहाहि बहुत खुशाल जहाले. एक प्रहर बसून राजियाच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकल्या. कित्येक अलंकार रत्नजडित व वस्त्रें, हत्ती, घोडे, राजियास व राजियाकडील सर्व लोकांस देऊन निरोप दिला. राजे व पातशहा महालाखालीं येऊन राजे आपल्या स्थळीं चालिले.

" महालाखालीं रघुनाथपंत व हंबीरराव वरकड सरदार लष्कर ठेवलें होतें. त्यांसहि समागमें घेऊन आपलें जागियास आले. राजे उठून गेलियावरी पातशहाचें समाधान झालें कीं, राजा प्रामाणिक, आपल्यास रक्षिलें, क्रिया जतन केली. ऐसें आश्चर्य मानून प्रल्हादपंतास पातशाहानें कित्येक बक्षिसें दिलीं व तुम्ही प्रामाणिक असें म्हणून राजियाकडे पाठविलें. दुसरे दिवशीं मादण्णापंतीं राजियास आपले घरास मेजवानीस नेलें आणि आपले मातोश्रीचे हातीं पाक सिद्ध करून मादण्णापंत व आकण्णापंत जवळ बसून राजियास भोजनास घातलें. वरकड राजियाकडील समुदाय होता त्यासहि भोजनास घातलें. आणि अलंकार, वस्त्रें, घोडीं, हत्ती देऊन स्थळास पोंचविलें.

" पातशाहांनीं मादण्णास बोलावून विचारलें कीं, राजियास काय पाहिजे तें देऊन संतुष्ट करून निरोप द्यावा. असा विचार करून मुहूर्त पाहून मागती राजे भेटीस आणिले आणि जडजवाहिर रत्नाचे अलंकार हत्ती, घोडे अपरिमित दिले. कुल सरकारकून, हंबीरराव, वरकड सरदार यांचे मुजरे महालावरी उभयता छत्रपति बैसून मुजरे घेऊन सरदारांचे पराक्रम, नांव, पाहून सर्वांस अलंकार, वस्त्रें, हत्ती, घोडे, मनुष्य पाहून दिधले. आणि पातशाहा म्हणाले, 'सर्वाप्रसंगीं आपणांस तुम्ही सहाय्य असावें.' ऐशी बळकटी करून राजियाची आणशपथ घेऊन निरोप दिला. प्रतिवर्षी करभार जो देणें तो येणेंप्रमाणें देऊन, प्रल्हादपंत नेहमीं आपणांजवळ ठेवून आमचे निसबतीनें आपणांजवळ असो देणें, ऐसें बोललें. राजे आपले स्थळास गेले."

गोवळकोंड्याचा किल्ला

वर डच व सभासद या दोघांचें वृत्त दिलें आहे. त्यांत पुष्कळच मेळ आहे यांत शंका नाहीं. डचांच्या वृत्तांत गोवळकोंडें असा व सभासदाच्या वृत्तांत भागानगर असा निर्देश आहे. या वेळीं गोवळकोंड्याचा बादशहा गोवळकोंडा किल्ल्यांत राहत होता. हा किल्ला हैदराबादेच्या पश्चिमेस पांच मैलांवर आहे. शिवाजीच्या वेळीं भागानगरास तितकें महत्त्व नसून गोवळकोंडा हीच राजधानी प्रसिद्ध होती. गोवळकोंड्याचा किल्ला हैदराबादेच्या पश्चिमेस खडकावर बांधला आहे. त्याभोंवतीं आजहि बरेच

तट आहेत. सर्व तटांबाहेरचा तट पक्क्या विटांचा व तीन मैल परिघाचा आहे. अर्थात् त्यांत राजवाडा व लोकवस्ती मोठ्या प्रमाणावर राहूं शकेल. त्या काळच्या राजधान्या म्हटल्या तरी आजच्यासारख्या लाखों लोकसंख्येनें मोजण्याजोग्या नसत. किल्ल्याला ८ दरवाजे व ८७ बुरूज आहेत. यावरून तो फारच मजबूत बांधलेला आहे. आंत बाला-हिसार (बालेकिल्ला) आहे. त्यांतच कुतुबशहाचा राजवाडा व आश्रितांच्या हवेल्या असाव्या आणि बाले किल्ल्याबाहेर इतर लोकांचीं घरें व वाडे असावे. किल्ल्याभोंवतीं खंदक आहे, पण तो बुजला आहे. आजहि आंत मशिदी, घरें व इतर इमारती आहेत. पण त्या पडक्या स्थितींत आहेत. दाद महालांत शिवाजी शिडीवरून कुतुबशहास भेटावयास गेला असें सभासद म्हणतो. ती शिडी मधील बालेकिल्ल्याभोंवतालचा खंदक ओलांडून आंत शिरण्याकरितां असावी. देवगिरीच्या किल्ल्यांत जातांना खंदकावर टाकलेला एक सरक पूल आहे. त्यासारखाच हा पूल असून त्याला सभासदानें शिडी म्हटलें असावें. शिवाजीची सुलतानास भीति वाटत असल्यामुळें बालेकिल्ल्यांत बंदोबस्तानें राहून शिवाजीला, हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या माणसांसह, त्यानें आंत घेतलें व शिवाजीनेंहि आत्म-रक्षणार्थ आपलें सैन्य बालेकिल्ल्याच्या बाहेर उभें केलें.

भागानगर नांव कां ?

कुतुबशाहीची स्थापना झाल्यापासून गोवळकोंडा हीच तिची राजधानी होती. परंतु पुढें आंतील वस्ती वाढली, हवा खराब झाली व पाणीपुरवठा पुरेसा होईना, तेव्हां किल्ल्यापासून कांहीं अंतरावर मुसी नदीच्या कांठीं महमद कुली कुतुबशहा यानें सन १५८९ त एक नवीन शहर वसविलें व त्याची भागावती नामक आवडती पत्नी होती, तिच्या स्मरणार्थ त्या शहरास त्यानें भागानगरी असें नांव दिलें. महमदाचा पुत्र हैदर याच्या नांवावरून त्यास हैदराबाद हें नांव पडलें. त्यानें भागानगराची रचना प्रारंभापासूनच पद्धतशीर करून गांवांत पाणी आणलें. भव्य इमारतीहि बांधण्यांत आल्या. त्यांपैकींच हल्लींची चारमिनार व जुम्मामशिद या प्रसिद्ध इमारती होत. शिवाजीचा मुक्काम या भागानगरापाशींच असून तेथून तो गोवळकोंड्यांत पातशहा व त्याचे उमराव यांजकडे भेटावयास जात असला पाहिजे.

असो. महाराजांचें प्रचंड स्वागत व सोहळा भागानगरास व गोवळकोंड्यास कुतुबशहानें केला. महाराजांना सन १६७४ त रायगडीं राज्याभिषेक झाला, त्यानंतरचा हा पहिलाच सुखसोहाळा. परराज्यांत जाऊन तेथील राजाच्या बरोबरीचा मान मिळून एवढा सत्कारसमारंभ करण्यांत आल्याचें महाराजांच्या कारकीर्दींत हें पहिलेंच उदाहरण होय. सभासदानें पुढें म्हटलें आहे त्याप्रमाणें महाराज एक महिनाभर भागानगरास राहिले होते त्या वेळीं त्यांना मोठमोठ्या सरदारांच्या घरीं एकसारख्या मेजवान्या झडत होत्या; आणि तेथून निघाले तेव्हां सोन्यानें मढवून निघाले, असें डचांनीं लिहिलें आहे, तें लक्षांत घेतल्यास सभासदाचें हें वर्णन अवास्तव खास नव्हे, असें वाटल्याशिवाय राहत नाहीं.

पण शिवाजी तेथें नुसत्याच मेजवान्या झोडीत बसला नसून मोठें राजकारण शिजवीत होता. त्यानें या भेटींत कुतुबशहाशीं स्नेहसंपादन केला इतकेंच नव्हे तर त्याच्या सेनेचें आधिपत्य पत्करून एक प्रकारचा सर्वाधिकारच आपणांकडे घेतला. कारण तो गोवळकोंड्यानंतर कर्नाटकांत शिरल्यावर १९ जून १६७७ रोजीं मद्रासेहून इंग्लंडास इंग्रजांनीं लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे, "मोगल व विजापूरकर यांच्या हद्दींत शिरून मुलूख जिंकून व लूट मिळवून प्रबळ झालेला शिवाजी आतां १६ ते २० हजार घोडदळ व कित्येक हजार पायदळ घेऊन गोवळकोंड्याच्या सुलतानाच्या म्हणजे मादण्णाच्या बोलावण्यावरून इकडे आला आहे. जिंजी, वेलूर, पेनमकोंडा आणि पोर्टोनोव्होपर्यंतचा कर्नाटकाचा भाग विजापूरकरांच्या ताब्यांतून घेण्यासाठीं शिवाजीला सेनापतिपद दिल्यामुळें त्याला एका अर्थानें या प्रांताचें स्वामित्वच दिल्यासारखें आहे. कारण त्याला विरोध करण्यास समर्थ असें सैन्य गोवळकोंडेकरांपाशीं नाहीं" (प. सा. सं. खं. २, पृ. ५८०).

प्रकरण अठरावें

दक्षिणी पक्षाची स्थापना

मराठा तितुका मेळवावा। आपला महाराष्ट्रधर्म वाढवावा।
येविषयीं न करितां तकवा। पूर्वज हांसती॥

— रामदास

गोवळकोंड्यास असतां शिवाजीनें मुधोळच्या बाजी घोरपड्याचा पुत्र मालोजी घोरपडे यास एक मुत्सद्देगिरीचें पत्र लिहून आपलें पुढील राजकीय धोरण स्पष्ट केलें. शिवाजीला दक्षिणेंतून मोगलांची हकालपट्टी करावयाची होती. मोगली साम्राज्य अकबराच्या कारकीर्दीपासून दक्षिणेंतील राज्यांच्या राशीस लागलें होतें. दक्षिणेंतील राज्यें मुसलमानांचीं होतीं तरी प्रस्तुत प्रश्न धर्माचा नसून राज्यतृष्णेचा होता. अखिल भरतखंडभर मोगलांना आपलें एकछत्री साम्राज्य स्थापावयाचें होतें. तें कार्य उत्तरेंत त्यांनीं पुरें करीत आणलें होतें. त्यास दक्षिणेंत निजामशाही, कुतुबशाही व आदिलशाही हीं तीन राज्यें विरोध करीत होतीं. त्यांपैकीं निजामशाही मागेंच बुडवून ते आतां आदिलशाही व नवीन उदय पावलेला शिवाजी यांना बुडविण्यास टपले होते. हा उद्योग हाणून पाडण्याचें सामर्थ्य एकट्या शिवाजींत नव्हतें. त्यासाठीं त्याला आदिलशाही व कुतुबशाही या दोन राजसत्तांचें सहकार्य पाहिजे होतें. त्यांपैकीं आदिलशाहींत बहिलोलखान प्रबळ असून सुलतान शिकंदर आदिलशाहा हा केवळ ९–१० वर्षांचा पोर असल्यामुळें बहिलोलखान कर्तुम्-अकर्तुम् होऊन राहिला होता. मोगल सेनापति दिलीरखान हा सन १६७६ त दिल्लीहून दक्षिणेंत परत येऊन बहादुरखानास मिळाला व १६७७ च्या ऑगस्ट महिन्यांत बहादुरखान परत दिल्लीस गेल्यावर दिलीरखान एकमेव सेनापति राहिला. दिलीरखान जातीनें पठाण व बहिलोलखानहि पठाण या कारणानें दिलीरखानानें त्यास आपल्या पक्षांत ओढलें व त्याचा परिणाम असा झाला कीं, आदिलशाहींत पठाण व दक्षिणी अशी मुसलमानांतच फूट पडली. या

ठिकाणीं पठाण म्हणजेच मोगलांचा परदेशी पक्ष होय. त्याविरुद्ध दक्षिणी मुसलमान सरदारांची एकजूट होत चालली व त्यांच्या मोगलांशी लढाया सुरू झाल्या. मोगलांचें दक्षिणेंतून उच्चाटन शिवाजीला दक्षिणी मुसलमान पक्षाप्रमाणेंच अभिप्रेत असल्यामुळें त्यानें त्या पक्षास मिळण्याचें ठरविलें व तो त्या पक्षाचा लवकरच पुढारी बनला. या पक्षाच्या साहाय्यानें त्याला प्रथम बहिलोलखानापासून विजापूरचें राज्य सोडवून घ्यावयाचें होतें व तें करीत असतां आदिलशाहींतील मराठे सरदारांना आदिलशाहींत जितकी अधिक सत्ता मिळवून देतां येईल तितकी मिळवून द्यावयाची होती.

त्यानें या उद्देशानें बाजी घोरपड्याचा पुत्र मालोजी घोरपडे यास एक महत्त्वाचें पत्र लिहिलें. त्याचा आशय असा – "इब्राहिम आदिलशहानें आपल्या कारकीर्दींत पातशाहीचा कारभार शहाजी राजे यांच्या शिरावर टाकला. तेव्हां मराठे लोक सरदारकी करून पोटें भरतात, त्यांना पातशाही वजीर करावें, असें शहाजी राजे यांनीं मनांत आणिलें. त्याप्रमाणें त्यांनीं बाजी घोरपडे यांस पातशहास भेटवून पातशाही वजीर केलें. तेव्हांपासून आतांपर्यंत तुमच्या दोन पिढ्या व पातशहाच्या तीन पिढ्या झाल्या. शहाजी राजांनीं केलेले हे उपकार न स्मरून बाजी घोरपडे यांनीं शहाजीस कैद करून मुस्तफाच्या हातीं दिलें. तेव्हांपासून तुमच्या व आमच्या घराण्याचा दावा वाढत चालला. त्यापासून उद्भवलेल्या कित्येक झगड्यांत तुम्ही आमचे व आम्ही तुमचे लोक मारले. तुमचे बाप बाजी घोरपडे यांस आमच्या लोकांनीं मारलें. पण हल्लींची स्थिति लक्षांत घेऊन या झाल्या-गेल्या गोष्टी आपण विसरून जाऊं या. कारण हल्लीं आदिलशाही बहिलोलखान पठाणानें घेतली आहे. पातशहा लहान लेकरूं, फक्त नांवाचा पातशहा राहिला आहे. अशा रीतीनें दक्षिणेच्या पातशाहीस पठाण झाला हें बरें नव्हे. कारण तो बळावला म्हणजे एकामागून एक सर्व दक्षिणी घराणीं तो बुडवील. कोणास जगूं देणार नाहीं. यासाठीं आम्ही हजरत कुतुबशहा पातशहा यांची भेट घेतली. कुतुबशहाचा व आमचा घट्ट बरेपणा करून घेतला. यानंतर कुतुबशहानें महादण्णापंताचा व आमचा तह करून दिला. त्यांत असें ठरलें कीं, 'आम्ही कुतुबशहाची पातशाही शक्य तितकी वाढवावी, पठाणाची

नेस्तनाबूत करावी. दक्षिणेची पातशाही आम्हां दक्षिण्यांच्या हातीं राहील असें करावें.' असा अधिकार आमचे हातीं आल्यामुळें आपल्या जातीचे जेवढे म्हणून मराठे आहेत ते आपल्या कटांत घेऊन कुतुबशहाशीं त्यांची रुजवात करावी, त्यांना दौलत देववावी व त्यांजकडून पातशहाचें काम करून घ्यावें. आपल्या जातीच्या मराठ्याचें बरें करावें, हें आम्हांस उचित वाटून तुमच्याशीं आमचा वडिलापासून वाढत चाललेला दावा आम्हीं मनांतून काढून टाकला आहे; आणि निष्कपट भावनेनें हजरत कुतुबशहाशीं बोलून त्यांच्या कौलाचा फर्मान तुम्हांकडे पाठविला आहे. तरी तुम्ही स्वार होऊन आम्हांपाशीं यावें. मग तुमची व कुतुबशहाची आम्ही भेट करवून देतों व तुमचें दौलतीचें काम असें मजबूत करून देतों कीं, तें तुम्हीं व तुमच्या पुत्रपौत्रांनीं आठवत राहावें.

"कदाचित् तुम्हांला असें वाटेल कीं, आदिलशहाचें आपण दोन पिढ्यांचे वजीर, त्यास सोडून आपण कुतुबशहाकडे कसें जावें? तर जे समयीं आदिलशहाचा मुख्य वजीर खवासखान यास धरिला, विजापुराचा कोट पठाणानें घेतला, विजापूरचा बादशहा धाकटा आहे, त्याला कैदेंत ठेवलें, त्याच समयीं बादशाही बुडाली. विजापूर पठाणाचे हातीं गेलें. जरी पठाणाची चाकरी करून आपण राहूं, असें तुम्ही म्हणाल तरी पठाण कांहीं तुम्हांस थोर दौलत देत नाहीं. शिवाय पठाणासहि कुतुबशाहा, आम्ही व सर्व दक्षिणी मिळून बुडविणार आहोंतच. तुम्ही मराठे लोक आमचे आहां. तुमचें गोमटें व्हावें म्हणून स्पष्टच तुम्हांस लिहिलें आहे. जें कांहीं पठाण तुम्हांस देईल त्याच्या दुप्पट आम्ही कुतुबशाहापासून तुम्हांस देववीत आहों. सर्व प्रकारें तुमचें गोमटें करूं. याविषयीं जर अंतर पडेल तरी श्रीदेवाची आण असे. तुम्ही निस्संदेह होऊन येणें" (प. सा. सं. खंड २, पृ. ५६१).

वरील पत्रांत महाराजांचें थोर राजकारण प्रतिबिंबित झालें आहे. 'मराठा तितुका मेळवावा' हा दिव्य संदेश त्यांत आहे. पठाणापासून अर्थात् मोगलांपासून आदिलशाही हिसकावून घ्यावी, आदिलशाहींत व कुतुबशाहींत मराठ्यांचें वजन इतकें वाढवावें कीं, या दोन शाह्या नाममात्र राहून खरी सत्ता मराठ्यांच्या हातीं यावी, ती आल्यावर सर्व सामर्थ्य एकवटून मोगली साम्राज्य होतें कीं नव्हतें असें करावें, असा या पत्राचा गर्भितार्थ आहे.

शिवाजीची महत्त्वाकांक्षा

या वेळीं शिवाजीची महत्त्वाकांक्षा काय होती हें मुंबईहून इंग्रजांनीं इंग्लंडांत ईस्ट इंडिया कंपनीस लिहिलेल्या पत्रांत वर्णिलें आहे, तेंहि चिन्त्य आहे (१६ जानेवारी १६७८). तें पत्र लिहितांना लेखकानें शिवाजीची ओतप्रोत स्तुति केली आहे. त्याची त्यानें स्पेनमध्यें आलेल्या सीझर-बरोबर व अलेक्झांडर दि ग्रेटबरोबर तुलना केली आहे. ती केल्यावर लेखक म्हणतो, 'दख्खनची राजधानी विजापूर या किल्ल्यावर तो स्वारी करणार आहे. तो घेतल्यावर थेट दिल्लीवर चाल करून जाऊन औरंगजेबाला तेथें कोंडून टाकीपर्यंत तलवार म्यानांत घालावयाची नाहीं, अशी त्यानें देवीजवळ प्रतिज्ञा केली आहे, असें म्हणतात' (प. सा. सं. खं. २, पृ. ६०१). तात्पर्य, शिवाजी हा आसेतुहिमाचल इस्लामी अर्ध-चंद्रास अर्धचंद्र देण्यासाठीं चंग बांधून असून प्रथम विजापूर व गोवळ-कोंडा यांतील दक्षिणी मुसलमानांच्या मदतीनें दिल्लीपदपातशाही जमीन-दोस्त करणार होता व मागाहून विजापूर व गोवळकोंडा यांची तशीच गत करून अखिल भारतभर हिंदुपदपातशाही स्थापन करणार होता; आणि त्याला सन १६८०त अकालमृत्यु जर आला नसता तर त्याचें हें दिव्य स्वप्न साकार झालेलें त्यानें जगास दाखविलें असतें, यांत तिलप्राय संदेह नाहीं.

शिवाजीनें मालोजी घोरपड्यास लिहिलेल्या पत्राची मात्रा त्याज-वर कितपत लागू पडली हें समजण्यास साधन नाहीं. परंतु इतकें खरें कीं, शिवाजी गोवळकोंड्यास येऊन-जाऊन सुमारें वर्षभर होता. कारण १६ जून १६७७ रोजीं इंग्रजांचा गोवळकोंड्याच्या दरबारीं असलेला वकील वीर राघवय्या गोवळकोंड्याहून मद्रासचा गव्हर्नर विल्यम लँघॉर्न यास कळ-वितो, 'शिवाजीराजा, शेख मिनाजू, शेख मगदूम, मसाल कोटि तिमय्या वगैरे मोठे असामी अनेक देशांहून येथें जमा झाले आहेत. त्यांची सरबराई करणें, त्यांना भेटी देणें व त्यांची रवानगी करणें इत्यादि कामांत मादण्णा ब्राह्मण गुंतून गेल्यामुळें मी पाठवीत आहें या जिनसांची रवानगी करण्यास इतका विलंब लागला. आतां पूर्वीप्रमाणें कारभार एकाच्या हातीं राहिला नसून या सर्व मातबर असाम्यांवर आम्हांला अवलंबून राहिलें पाहिजे, हें आपल्या लक्षांत आलेंच असेल" (प. सा. सं. खंड २, पृ. ५७८).

श्रीशैलास आत्मबलिदान

यावरून गोवळकोंड्यास दक्षिणी पक्षाची स्थापना विजापूर व गोवळकोंडा राज्यांतील सेनापति एकत्र जमून शिवाजीच्या नेतृत्वानें झाली. ती करीत असतां दरम्यानच्या काळांत महाराज सुप्रसिद्ध बारा ज्योतिर्लिंगांपैकीं श्रीशैल पर्वतावरील मल्लिकार्जुनाच्या दर्शनास गेले होते. महाराज हे शिवोपासक होते. त्यांच्या जीवनाचीं दोन अंगें होतीं. राजकारण हें त्यांचें प्रधान अंग असून स्वराज्य-स्थापना हें त्यांचें जीवितकार्य होतें. स्वराज्य-स्थापना ही स्वधर्मरक्षणार्थ असल्यामुळें स्वराज्य-स्थापनेच्या मोहिमेवर असतां प्रख्यात देवस्थानांस भेट देण्याची संधि ते चुकूनसुद्धां दवडीत नसत. याच धर्मभावनेनें त्यांनीं कारवाराकडील स्वारींत गोकर्ण-महाबळेश्वराची यात्रा केली होती. आग्र्याहून परत येतांना त्या संकटावस्थेंतहि गंगामाईचें स्नान केलें व श्रीकाशीविश्वेश्वराचें दर्शन त्यांनीं घेतलेंच. आतां भागानगरापासून फार दूर नसलेल्या श्रीशैल पर्वतावर ते गेले. जदुनाथ लिहितात, "सन १६७७ मार्च महिन्यांत हैदराबादेहून शिवाजी थेट दक्षिणेस कृष्णानदीवर जाण्यास निघाला. वाटेंत कर्नूल नगरांतून त्यानें पांच लक्ष होन खंडणी उकळली. तेथून तो निवृत्ति-संगमावर गेला. हा संगम भवनाशी व कृष्णा या दोन नद्यांचा कर्नूलच्या ईशान्येस २४ मैलांवर आहे. हें स्थान हिंदु यात्रेकरू फार पवित्र समजतात. या ठिकाणीं व चक्रतीर्थ या भोंवऱ्यांत शिवाजीनें स्नान केलें आणि तीर्थविधि उरकून जलदीनें थेट पूर्वेस श्रीशैलपर्वत ३७ मैल आहे, त्या स्थळीं तो गेला. त्या वेळीं त्यानें आपलें सैन्य कर्नूलच्या पूर्वेस ४४ मैलांवर अनंतपूर येथें ठेवलें होतें. या ठिकाणीं ७० मैलांचें वळण घेऊन कृष्णानदी पूर्वेस समुद्राकडे जाते. तिच्या पात्राच्या दोन्ही बाजूंस येथें एक सहस्र फूट उंचीच्या दरडी आहेत. या स्थळापाशीं नल्लामाळा या नांवाचें एक निर्जन अरण्य लागतें. त्यासभोंवतीं ओबडधोबड टेकड्या आहेत व तापसरीचा उजाड भूमीचा पट्टा आहे. त्यांतच १५६३ फूट उंचीचें पठार असून त्यावरून कृष्णानदीचें दर्शन घडतें. याच पठारावर श्रीशैलावरील प्रसिद्ध शिवालय आहे. या पठारावर जाण्यापूर्वी कैलासद्वार नामक महाद्वार आहे. देवालयाभोंवतीं ६६० फूट लांब व ५१० फूट रुंद असा तट आहे.

तो मोठमोठ्या शिळांचा बांधला असून त्यावर हत्ती, घोडे, वाघ, पारधी, योद्धे व योगी यांच्या सुरेख मूर्ति व रामायण-महाभारतांतील ग्रंथांमधून वर्णिलेले देखावे खोदले आहेत. या तटाच्या मध्यभागीं मल्लिकार्जुनाचें लिंग आहे. देवालयाच्या आंतील भिंती व छत विजयनगरचा प्रतापी सम्राट् कृष्णदेव यानें सन १५१८ त पितळेच्या पत्र्यांनीं मढविलें आहे. मल्लिकार्जुनाच्या मंदिरापाशींच पार्वतीचेंहि जरासें लहान देवालय आहे. या देवालयापासून कृष्णानदीवर जाण्याकरितां विजयनगरच्या राणीनें घाट बांधला असून येथें कृष्णेस पाताळगंगा म्हणतात. पाताळगंगेच्याच खालीं नीलगंगा (ford) आहे. हीं दोन्ही स्थानें स्नानाचीं पवित्र तीर्थें समजलीं जातात.

“ शिवाजी हें पठार चढून गेला. त्यानें तेथें दहा दिवस वास करून तीर्थविधि केला. तें शांत व एकांत स्थल पाहून शिवाजीचें अंतःकरण अध्यात्मविचारांनीं उजळलें व मरणास यासारखें दुसरें पवित्र स्थळ नाहीं अशी त्याची भावना झाली. म्हणून तो देवास आपलें मस्तक वाहण्यास निघाला. पण त्याच्या प्रधानांनीं त्यास कर्तव्याची जाणीव देऊन ह्या घोर कृत्यापासून परावृत्त केलें. या ठिकाणीं शिवाजीनें श्रीगंगेश या नांवाचा घाट, एक मठ, एक धर्मशाळा व अन्नछत्र बांधून ब्राह्मणांना मोठी दक्षिणा दिली. ” ‘सभासद’हि या प्रसंगाचें वर्णन करतो, ‘ महाराज श्रीशैल पर्वतावर गेले. नीलगंगेचें स्नान करून श्रीचें दर्शन झालें. तीर्थविधि झाला. तें स्थळ देखून राजांना इतका परमानंद झाला कीं, तो दुसरा कैलास आहे असें त्यांना वाटलें. त्या कैलासनाथास आपला देह अर्पण करावा, शिरकमल वाहावें, असें योजिलें. ते समयीं श्रीभवानी अंगांत आविर्भवली आणि बोलली जे ‘ तुज ये गोष्टी मोक्ष नाहीं. हें कर्म करूं नको. पुढें कर्तव्यहि उदंड तुझे हातीं करणें आहे ’ असें सांगून श्री गेली. हें वर्तमान महाराज सावध झाल्यावर त्यांस कारकुनांनीं सांगितलें. मग श्रीस शिरकमल वाहावें हा विचार राहिला ” (सभासद). शिवाजीमहाराज हे योगभ्रष्ट होते. पूर्वजन्मीं जें महत्कार्य करावयाचें राहिलें होतें तें पूर्ण करण्यासाठीं त्यांचा हा जन्म होता. त्यानंतर त्यांना मोक्षच मिळावयाचा होता. पण अंतःकरणाची खरी ओढ अध्यात्माकडे असल्यामुळें

त्यांच्या अंगीं अशा पवित्र स्थळीं वैराग्य बाणून श्रीचरणीं देह अर्पून या राजकारणाच्या उपाधींतून मोकळें व्हावें अशी ऊर्मि त्यांना एकदम येत असे. हा अद्भुत प्रसंग त्याचाच द्योतक होय. पण ईशसत्ता त्यांस आवरून धरून पुनः निष्काम कर्मयोगास प्रवृत्त करी. 'धर्म्याद्धि युद्धात् श्रेयोऽन्यत् क्षत्रियस्य न विद्यते' हाच भगवंतांनीं अर्जुनास केलेला उपदेश देवींनें महाराजांस केला.

प्रकरण एकोणिसावें

दक्षिणी पक्षाची वाटचाल

दोनी दळें एकवटें। मिसळतां लखलखाटे।
युद्ध करावें खणखणाटें। सीमा सांडूनी॥

— रामदास

मोगलांचा पहिला पराभव

शिवाजीच्या कर्नाटकांतील स्वारीकडे वळण्यापूर्वी दक्षिणी पक्षानें आपल्या क्षेत्रांत किती वाटचाल केली हें पाहणें आवश्यक आहे. मोगलांना विजापूरकर व शिवाजी हे दोन प्रबल शत्रु होते. त्या दोघांकडे त्यांचें लक्ष सारखेंच वेधलें होतें. मोरोपंत हा खानदेश व औरंगाबाद या भागांत लुटालूट करून परत रायगडास गेल्यावर बहादुरखान त्याचा पिच्छा सोडून आदिलशाहीच्या पाठीस लागला. त्याला विजापुरांतील बजबजपुरीचा व पक्षोपपक्षांचा फायदा घेऊन विजापूरचें राज्य बुडविण्याची औरंगजेबानें सोंपविलेली कामगिरी बजावणें भाग होतें. म्हणून तो ३१ मे १६७६ च्या सुमारास आदिलशहाच्या मुलुखांत शिरून विजापुरापासून अर्ध्या दिवसाच्या मुक्कामावर आला. परंतु तेथें विजापूरकरांतर्फे बहिलोलखानानें त्यास आडवून त्याचा हळसंगी येथें ता. १ जून रोजीं मोठा पराभव केला. त्या युद्धांत बहादुरखानास चार सहस्र सैनिक, पुष्कळ सामान व चार प्रसिद्ध सेनापति यांस मुकावें लागलें. बहादुरखान तेथून सोलापुराकडे हटला. बहिलोलखानास या वेळीं शिवाजी गोवळकोंड्याकडे आल्यामुळें त्याची भीति उत्पन्न झाली होती. यास्तव मोगलांच्या पराभवाचा फायदा घेऊन त्यांची मदत त्यास शिवाजीच्या निःपातासाठीं मिळवावयाची होती. म्हणून त्यानें बहादुरखानाकडे वकील व नजराणे पाठवून त्याच्याशीं शिवाजीविरुद्ध बोलणें केलें. इतक्यांत दिलीरखान दहा हजार घोडदळ घेऊन बहादुरखानाच्या मदतीस आला. त्याला विजापूरकरांकडून पराभव खाल्ल्यानंतर त्याजबरोबर तह करणें मानहानिकारक वाटलें व त्याबद्दल औरंगजेबाचा हुकूम

आणावा असें ठरलें. परंतु औरंगजेबाचा हुकूम आला म्हणून असो किंवा दिलीरखान व बहिलोलखान हे दोघेहि पठाण म्हणून असो, बहिलोलखान व मोगल यांचा समेट होऊन ते गुलबर्ग्याचा किल्ला घेण्यासाठीं त्याजपाशीं एकत्र जमले व येथेंच पुढील संग्रामाला पठाण विरुद्ध दक्षिणी असें स्वरूप आलें. पठाण-पठाण एक झाले असें पाहून त्यांना तोंड देण्याकरितां आपसांतील भेद विसरून 'दक्षिणी मुसलमान' या समान भूमिकेवरून विजापुरी सेनापति व गोवळकोंड्याचे सेनापति एकजुटीनें निघाले. त्यांत प्रमुख गोवळकोंड्याचा सरलष्कर महमद इब्राहिम, सिद्दी मसाऊद, गसला कोटि तिमय्या व सय्यद मगदुम हे होते. गुलबर्ग्याचा किल्ला गोवळकोंड्याचा असल्यामुळें सैन्याचें नेतृत्व साहजिकच महमद इब्राहिम याजकडे होतें. मोगलांनीं दक्षिणी पक्षाचें सैन्य येण्यापूर्वीच गुलबर्ग्याचा किल्ला घेतला व दक्षिणी सैन्य येतांच त्यांत फितुरीचा प्रयत्न केला. त्या सैन्यांतील एक प्रमुख शेख मिनाजू याला मोगलांची नोकरी करण्याच्या अटीवर पुष्कळ रकमाहि दिल्या. हा सामना अटीतटीचा असल्यामुळें अलमपन्हा (कुतुबशहा) स्वतः सैन्यावर जरब ठेवण्याकरितां जवळच येऊन राहिला. त्यानें आपल्या सेनापतींना मोगलांनीं कितीहि मोठमोठ्या रकमा देऊं केल्या तरी मोगलांस मिळूं नये असा सक्त हुकूम सोडला. पण शक्य तर समेटाचा प्रयत्न करावा असेंहि त्यांस बजावलें. मोगलांनीं कुतुबशहावर मुख्य ठपका हा ठेवला कीं, त्यानें आपल्या राज्यांतून कर्नाटकांत जाण्यास शिवाजीस वाट दिली. या गुन्ह्याबद्दल औरंजजेबानें कुतुबशहापाशीं १ कोटि रुपये व दहा हजार घोडे हा दंड मागितला. पण दिलीरखान व बहादुरखान यांस तो फक्त पांच लाख रुपये द्यावयास कबूल झाला.

मोगलांचा दुसरा पराभव

तहाचें बोलणें इतकेंच राहिल्यावर मोगल सेना त्रिविनिकोजवळ आली. कुतुबशहास ही बातमी लागतांच त्यानें आपल्या सैन्याच्या मदतीस दूलशा, सर्जेखान वगैरे सरलष्कर व सरखेल यांना पाठविलें. या ठिकाणीं मोगलांचे ४–५ हजार स्वार व बहिलोलचे सैनिक एवढेंच सैन्य होतें. त्यांचें हें थोडें सैन्य पाहून त्याजवर कुतुबशहाच्या २५–३० हजार स्वारांनीं हल्ला चढविला. त्यांचें थोडा वेळ युद्ध होऊन बहिलोलखानाचे

स्वार माघार खाऊं लागले. दिलीरखानाच्या लक्षांत हें आल्यावर तो त्याच्या कुमकेस आला. या युद्धांत मोगलांचे पांचशें घोडे व बहिलोलचे ५–६ मोठे सेनापति मेले. अलमपन्हाला ही बातमी कळल्यावर मोगलांचा पुरा मोड करण्याकरितां त्यानें आणखी स्वार पाठविले व मादण्णालाहि जाण्यास सांगितलें. पण मादण्णानें स्वतः न जातां पलपेल येंगाण्णा यास व तसेंच मिर्झा संगीर, गुडचारुलो वगैरे मोठे सरदार तिकडे रवाना केले. वरील युद्धांत शत्रूच्या झालेल्या प्राणहानीची कल्पना कुतुबशहास येऊन तो संतुष्ट व्हावा यासाठीं त्याजकडे सेनापतींनीं रणांगणावरून रक्तानें भरलेले कपडे लादून तीन उंट पाठविले. तरीहि तहाचें बोलणें कुतुबशहानें चालू ठेवलें होतें व गोवळकोंड्यास वेढा पडण्याची पाळी आल्यास टिकाव धरण्याकरितां किल्ल्यांत सर्व प्रकारची सामग्रीहि तो जमवीत होता आणि बहादुरखानासहि त्यानें लांच दिली होती. बहादुरखानाच्या खाबूपणाचा बोभाटा आतां इतका झाला कीं, औरंगजेबानें त्यास दिल्लीस परत बोलावून आणि त्यास दिलेल्या पदव्या व खजिना काढून घेऊन त्याची मक्केच्या यात्रेस रवानगी केली! औरंगजेबाचा कडक स्वभाव लक्षांत घेतां त्यानें खानास दिलेली ही शिक्षा कांहींच नव्हे, यापेक्षांहि फार मोठ्या शासनास तो पात्र होता; परंतु तो त्याचा दूध-भाऊ (Foster brother) असल्यामुळें त्यानें त्याची गय केली असावी (प. सा. सं. खंड २, पृ. ५९०; १० सप्टेंबर १६७७).

अटीतटीचा सामना

गोवळकोंड्याच्या सैन्यास मादण्णानें वर लिहिल्याप्रमाणें मोठी कुमक पाठविल्यानंतर त्याच्या आकांक्षा व जोम पुष्कळच वाढला. हें सैन्य गोवळकोंड्यापासून बारा कोसांवर गिविनी या नांवाच्या विजापूरहद्दीवरील गांवीं आलें. दिलीरखान व बहिलोलखान गुलबर्गा किल्ल्यापासून अलीकडे दीड कोसावर होते. इतक्यांत अलमपन्हानें आपल्या सैन्यास मोगलांवर चालून जाण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणें त्याचें सैन्य मोगल सेनेपासून एक कोसावर मंगलीग गांवापाशीं येऊन पोंचलें. त्यांतील हिंडोलशहा व इतर कांहीं सरदार यांनीं मोगल सैन्याची कुरापत काढली. त्याबरोबर मोगलांनीं त्यांजवर हल्ला चढविला. तो हल्ला अंगावर घेत


घेत गोवळकोंड्याची ही तुकडी आपल्या मुख्य सैन्यापाशीं आली. तेव्हां उभय पक्षांत खडाजंगी उडाली. तींत मोगलांकडील एक सरदार प्रोही हसनखान वीस हजार स्वारांनिशीं फारच शौर्यानें लढला; परंतु हा संग्राम अनिर्णीतच राहिला. यानंतर तीन दिवसांनीं सिदेलोर येंगाण्णा वगैरे सरदार मोगल सैन्यावर चालून गेले. या खेपेस, मागील खेपेस गोवळकोंडेकरांनीं दाखविली तशी त्यास मोगलांनीं हूल दाखवून त्यांना अडचणीच्या जागेंत आणलें व त्यांजवर चोहोंकडून मारा करून त्यांचे सैनिक कापून काढले आणि नौबत व निशाणें काबीज केलीं. आतां मोगल कुतुबशाही सेनापतींना कैद करणार तोंच कुतुबशहाचे सर लष्कर महंमद इब्राहिम वगैरेंनीं त्यांच्या मदतीस धांऊन येऊन बाजू मोगलांवर उलटविली. युद्धाचा रंग बदलला व मोगल सैन्य मागें हटलें. त्यांनीं मोगलांची सर्व रसद मारून आणली. उलट मोगलांनीं अडचणींत सांपडल्यामुळें बेफाम होऊन ता. २० ऑक्टोबर १६७७ रोजीं कुतुबशहाच्या गोटावर हल्ला करून मुला-माणसांची कत्तल केली व दाणागोटा नेला. त्याच्या सरलष्कराचा मोड होऊन त्यास मागें हटावें लागलें. या प्रसंगांत कित्येक मोठमोठे ब्राह्मण बेपत्ता झाले. या युद्धांत कुतुबशहास अपयश येण्याचें मुख्य कारण असें कीं, त्याच्या सैन्यांत सरजा अलमखान, हसनखान, हाजीखान, मसाऊदखान हे सर्व पठाण सरदार, प्रत्येकापाशीं दोन हजार स्वार असलेले, होते. ते सजातीय असे दिलीरखान व बहिलोलखान यांजबरोबर लढेनात (प. सा. सं. खं. २, पृ. ५९५).

विजापुराचा पाडाव

मोगल व दक्षिणी पक्ष म्हणजे कुतुबशाही पक्ष यांच्या युद्धांत यशाचें पारडें असें खालींवर होत असतां बहिलोलखान व दक्षिणी पक्ष यांत तहाची वाटाघाट सुरू होती. बहिलोलखानाच्या वतीनें हकीम शमशा या नांवाचा वकील तहाचीं कलमें ठरविण्याकरितां डिसेंबर १६७७ त कुतुबशहाकडे गेला. बहिलोलखान गुलबर्ग्याच्या लढाईत जखमी झाला होता, त्याची प्रकृति तेव्हांपासून बिघडली ती बिघडलीच. तिच्यांत कांहीं सुधारणा न होतां बहिलोल २३ डिसेंबर सन १६७७ त मरण पावला. त्यामुळें मोगल पक्ष साहजिकच दुर्बल झाला. बहिलोलखानानें मरणापूर्वी आपले दोघे पुत्र

सर्जेखानाच्या स्वाधीन केले. सर्जेखान दक्षिणी पक्षाचा होता तरी त्यानें पूर्ववैर विसरून त्यांचा सांभाळ करण्याचें त्यास आश्वासन दिलें.

बहिलोलखानाचा जमशेदखान नांवाचा गुलाम होता. त्यानें बहिलोलच्या दफनाची वार्ता विजापुरास पोंचली नाहीं तोंच विजापूर शहर व किल्ला सिद्दी मसाऊदच्या म्हणजे दक्षिणी पक्षाच्या स्वाधीन केला. आतां गोवळकोंडेकर, विजापुरांतील दक्षिणी पक्ष व शिवाजी या त्रिवर्गांनीं मोगलांविरुद्ध एकजूट करून दिलीरखानाला दक्षिणेंतून हांकून लावण्याचें ठरविलें (प. सा. सं. खंड २, पृ. ६०४). पुढें लवकरच फेब्रुवारी सन १६७८ च्या सुमारास दिलीरखान दिल्लीस परत गेला आणि ५० हजार घोडेस्वारांचें दक्षिणी सैन्य सर्जेखान व सिद्दी मसाऊद यांच्या नेतृत्वानें विजापूर ताब्यांत घेऊन बसलें व त्यांत समारंभानें प्रवेश करण्यासाठीं त्यांनीं शिवाजीला बोलावलें (प. सा. सं. खंड २, पृ. ६०५).


शिवाजीमहाराजांचे कार्यक्षेत्र
महाराष्ट्र व कर्नाटक
प्रमाण- १इंच =300मैल
पूर्व समुद्र
पश्चिम समुद्र
नर्मदा न.
तापी न.
गोदावरी न.
कृष्णा न.
तुंगभद्रा न.
कावेरी न.
सुरत
दमण
मुंबई
चौल
दाभोळ
राजापूर
सिंधुदुर्ग
वेंगुर्ले
गोवे
कारवार
चोपडा
ब्र्हाणपूर
कारंजा
मलकापूर
नासिक
संगमनेर
वेरूळ
दौलताबाद
जालना
औरंगाबाद
जुन्नर
अहमदनगर
बीड
चाकण
पुणे
बारामती
परिंडा
तुळजापूर
शिंगणापूर
पंढरपूर
वाई
माहुली
गुलबर्गा
गोवळकोंडा
मिरज
कुरुंदवाड
अथणी
विजापूर
श्रीशैल
नंदी
कुडाळ
कोल्हापूर
अनंतपूर
पेनुकोंडा
होनहळ्ळी
हिंदुपूर
बाळापूर
तुमकूर
कोलार
शिरे
तिरुपती
वेलोर
आरणी
कांचीवरम्
जिंजी
कडलोर
पोर्टोनोव्हो
सेलम
वृद्धाचलम
तंजावर
मदुरा
मद्रास
(Fort St. George)
20
15
12
8
24
72
76
80
84
88

प्रकरण विसावें

कर्नाटकांतील दिग्विजय

(सन १६७७)

जो स्वयेंचि कष्टत गेला तोचि भला ।

— रामदास

महाराष्ट्रांतून बाहेर पडून गोवळकोंड्याच्या बाजूस सात महिने घालविल्यावर शिवाजी गोवळकोंड्याकडून सन १६७७ च्या एप्रिल महिन्यांत कर्नाटकाच्या स्वारीवर निघाला. त्याला आतां गोवळकोंड्याच्या वतीनें कर्नाटक जिंकावयाचें होतें. शहाजीच्या कारकीर्दीत विजापूर व गोवळकोंडा यांचा तह होऊन कर्नाटकाचा पूर्व भाग कुतुबशहानें घ्यावा व पश्चिम भाग आदिलशहानें घ्यावा असें ठरलें होतें. परंतु उभयतांच्या अहमहमिकेंत हा तह मोडून ज्याच्या हाताला जो प्रदेश लागेल तो त्यानें बळकवावा, असें होत गेलें. त्यांत विजापूरकरांचा सेनापति शहाजी याचीच सरशी होऊन त्यानें कुतुबशहाच्या वांटणीचाहि प्रदेश हस्तगत केला. तेव्हांपासून कुतुबशहाच्या मनाला चुटपुट लागून राहिली होती. त्याला तो प्रदेश घेण्याची प्रबळ इच्छा होती, पण त्यास लागणारें सामर्थ्य शिवाजीच्या ठिकाणीं आहे असें पाहून कुतुबशहानें त्यास सर्वाधिकार देऊन त्याची कर्नाटकांत रवानगी केली. त्याच्या मदतीस आपला एक सरलष्कर, मिर्झा अमीन यास दिलें व मोहिमेच्या खर्चाकरितां त्यास रोजचा तीन सहस्र होनांचा तनखा चालू केला. शिवाजीचें विजापूरकरांच्या मुलुखावरील हें आक्रमण दक्षिणी पक्षाच्या हेतूशीं विरुद्ध दिसतें. पण त्याचें समर्थन विजापूर व गोवळकोंडा यांच्या पूर्वी झालेल्या कराराकडे बोट दाखवून करतां येण्यासारखें आहे. कारण गोवळकोंड्याच्या क्षेत्रांतील हा मुलूख असल्यानें तो गोवळकोंड्यानें विजापूरकरांपासून परत घेणें न्याय्य म्हणतां आलें असतें.

शिवाजी कर्नाटकांत जाण्यापूर्वीच विजापुरांतील दुफळीचा कर्नाटकांतील राजकारणावर अनिष्ट परिणाम झाला होता. अफगाण — म्हणजे

पठाण – पक्षाचा पुढारी बहिलोलखान व दक्षिणी पक्षाचा पुढारी खवासखान असतां सिद्दी सरदार खवासखानाच्या पक्षांत होते. अली आदिलशहा १६७२ त मेल्यावर खवासखानाच्या हातीं राज्यसूत्रें गेलीं. हें बहिलोल-खानास न खपून खवासखानास ठार करून तो विजापूर दरबारांत प्रमुख बनला. दरबारांत माजलेल्या या दुफळीनें कर्नाटकांतील अंमल ढिला पडून तेथील विजापुरी अधिकारी स्वतंत्रपणें वागूं लागले. त्यांपैकींच जिंजीचा सुभेदार नसीर महंमद व तिरुवादीचा सुभेदार शेरखान लोदी हे होत. या एकंदर बखेड्याचा फायदा कुतुबशहास करून देण्याचा कुतुबशहाचा दिवाण मादण्णा याचा इरादा होता. कुतुबशहा स्वतः कर्नाटकांत जाऊन तो जिंकण्याचें मनावर घेईल तर तो मोगलांच्या डोळ्यावर येईल, या भीतीनें मादण्णानें पाहुण्याकडून साप मारावा याप्रमाणें शिवाजीमार्फत तें कार्य उरकून घेण्याचा डाव टाकला. शिवाजीला कर्नाटकांत आपली सत्ता वाढवावयाची असल्यानें त्याला कुतुबशहाची मदत मिळाली तर हवीच होती. मादण्णा हा हिंदु व शिवाजी हाहि हिंदु असून हिंदुपदपादशाही स्थापन करण्याचा शिवाजीनें चंग बांधला होता. मादण्णाला या निमित्तानें कर्नाटकांत हिंदूंचें स्वतंत्र राज्य होणें अभिप्रेत असल्यानें त्यानें शिवाजीस हरतऱ्हेची मदत या पवित्र कार्यांत मिळवून देण्याचें ठरविलें. त्यानें शिवाजीस जिंजीची जहागीर प्रथम जिंकण्याचा सल्ला दिला. ती घेतली कीं तिच्या पाठोपाठ तंजावर, मदुरा व सर्व कर्नाटक घेणें सुलभ होणार होतें.

त्या काळीं कर्नाटकांत जिंजीचें महत्त्व विशेष होतें. जिंजीचा किल्ला वेलोरच्या तोडीचा आहे. तो दक्षिण अर्काट जिल्ह्यांत पूर्व-किनाऱ्यावर तिंदीवनम् या तालुक्यापैकीं आहे. किल्ल्याजवळ जिंजी नांवाचें खेडें आहे. तें इतकें लहान आहे कीं, त्याची वस्ती सन १९०४ सालीं अवघी ५२४ होती. या किल्ल्यांत राजगिरी, कृष्णगिरी व चंद्रदुर्ग या तीन तटबंदी केलेल्या टेकड्या आहेत. त्यांत प्रमुख टेकडी राजगिरी असून तिजवर बालेकिल्ला आहे.

कुतुबशहाची मदत

शिवाजी कर्नाटकाच्या स्वारीवर निघाला तेव्हां त्यास मदत करण्याविषयीं कुतुबशहानें तिकडील पाळेगारांना व सुभेदारांना पत्रें लिहिलीं.

तशींच पत्रें त्यानें डच, फ्रेंच व इंग्रज यांनाहि पाठविलीं. या त्रिवर्ग युरोपियन लोकांत डच व फ्रेंच यांचें वैमनस्य होतें.

शिवाजी आपल्या स्वारींत मुलखगिरी व तीर्थयात्रा हे दोनहि हेतु शक्य तेव्हां साधीत असे. गोवळकोंड्याच्या स्वारींत श्रीशैल पर्वतावर जाऊन त्यानें मल्लिकार्जुनाचें दर्शन घेतलें व त्यानंतर अनंतपुरास येऊन तो आपल्या सैन्यास मिळाला. त्याजबरोबर वीस सहस्र घोडदळ व चाळीस सहस्र पायदळ होतें. त्यासुद्धां तो मे महिन्यांत मद्रास प्रांतांत येऊं लागला. त्याचें अन्तःकरण मल्लिकार्जुनाच्या दर्शनापासून भक्तीनें ओतप्रोत भरलें होतें. त्याच भावनेच्या भरांत तो तिरुपति पर्वतावर श्रीव्यंकटेशाच्या दर्शनास गेला. त्या काळीं मद्रास शहराला हल्लींचें महत्त्व नव्हतें. तें स्थळ डाव्या हाताला टाकून तो थेट पालार नदीवरील कांचीकाम नगरास आला. कांचीचे शिवकांची व विष्णुकांची असे दोन भाग असून तेथें सैन्यास पाण्याचीहि सोय झाली व शिवाजीला शिवविष्णूंचें दर्शनहि घडलें. कांचीपासून पश्चिमेस पालार नदीच्या कांठीं चाळीस मैलांवर वेलोरचा प्रसिद्ध किल्ला आहे व दक्षिणेस तितक्याच अंतरावर जिंजीचा प्रख्यात किल्ला आहे. हे दोन्ही किल्ले, विशेषतः जिंजी त्यास आधींच घ्यावयाची होती. पण जिंजीचा सुभेदार नसीर महंमद याचा वकील कांचीस भेटावयास येऊन तें प्रकरण बोटचेपें झाल्याचें दिसतांच शिवाजीनें स्वतः तिकडे न जातां आपल्या सैन्याची एक तुकडी पाठविली व आपण १८ मेच्या सुमारास मुख्य सैन्यासह अर्काटवरून वेलोरकडे गेला. इकडे नसीरबरोबर तहाची वाटाघाट करण्याकरितां शिवाजीचा सेनापति जिंजीच्या किल्ल्यांत गेला आणि त्याजबरोबर तावडतोब तहाच्या अटी ठरल्या. नसीर महंमद हा कांहीं रोख र[illegible] ५० हजार रुपयांची वंशपरंपरा चालणारी जहागीर घेऊन किल्ला [illegible]ाजीच्या ताब्यांत देण्यास तयार झाला. जिंजीचा किल्ला अवघड व [illegible]कर हस्तगत होण्यासारखा नसल्यामुळें शिवाजी नसीर महंमदास एवढी जहागीर व रक्कम देण्यास कबूल झाला हें उघड आहे.

जिंजीचा निकाल असा लागत असतां शिवाजीचा वेलोर जिंकण्याचा उद्योग सुरू होता. वेलोरवर विजापूरकरांचा अब्दुल्लाखान सिद्दी अधिकारी

होता. या अधिकाऱ्याला नसीर महंमदानें शिवाजीशीं तह करण्याबद्दल गळ घातली; पण असला भ्याडपणा आपण करणार नाहीं, असें नसीरला त्यानें स्पष्ट सांगितलें. जिंजीच्या तहाप्रमाणें नसीर महंमदाला गोवळकोंडा राज्यांतील कांहीं मुलूख जहागीर म्हणून मिळावयाचा होता, पण तो मुलूख कुतुबशहा त्यास देईना. त्यानें अशी सबब सांगितली कीं, जिंजीचा किल्ला घेतल्यावर शिवाजीनें तो त्याजबरोबर झालेल्या कराराप्रमाणें आपणांस द्यावयास पाहिजे होता. पण त्यानें तो आपणांस दिला नसल्यामुळें आपण नसीरला मुलूख देण्यास बांधलेलों नाहीं. या पेंचामुळें नसीर सर्वस्वास मुकून त्या दुःखानें झुरणीला लागला व त्यांतच मरण पावला.

जिंजीसारखा वेलोरचा किल्लाहि बळकट असल्यामुळें तो सहज जिंकून घेणें शक्य नव्हतें. (वेलोर उत्तर अर्काट जिल्ह्यांत मद्रासपासून १९० मैलांवर आहे.) म्हणून तो घेण्यास सैन्याची एक तुकडी ठेवून शिवाजी तेथें फार वेळ न थांबतां शेरखानाकडे वळला.

शेरखान तिरुवादीस होता. त्याअलीकडचा शिवाजीनें बहुतेक सर्व सपाटीचा प्रदेश जिंकला. फक्त मधील डोंगरी किल्ले ताबडतोब हस्तगत होण्यासारखे नसल्यामुळें ते तेवढे शेरखानाकडे राहिले. शिवाजी अशा रीतीनें आक्रमण करीत असतां फ्रेंचांनीं पांदेचरीहून आपला ब्राह्मण वकील शिवाजीस भेटावयास पाठविला. शिवाजीचा प्रधान जनार्दनपंत हणमंते व शिवाजी यांची त्यानें भेट घेतली. कुतुबशहाचें एक गलबत मच्छलीपट्टणास जात होतें, तें फ्रेंचांनीं पकडल्याबद्दल शिवाजीनें त्यांना चमकावून, कुतुबशहा आपणांस पित्याच्या जागीं असून आपला धनी असल्याचा बहाणा केला व त्याची आगळीक केल्याचें आपणांस खपणार नाहीं असें त्यांस बजावलें. तसेंच वेलोरचा किल्ला घेण्यास आपणांस फ्रेंचांनीं मदत करावी अशी त्यानें त्यांस विनंती केली. पण [illegible] फ्रेंचांच्या ब्राह्मण वकिलानें नम्रतापूर्वक नाकारली. शेवटीं त्यानें तुम्ही तटस्थ राहाल तर तुम्हांस मजपासून धक्का लागणार नाहीं, असें त्यांस आश्वासिलें.

फ्रेंचांप्रमाणें कर्नाटकांतील हिंदु राजांच्या मनाचीहि चलबिचल झाली होती. तिकडील मदुरा व म्हैसूर येथील नायकांचे वकीलहि शिवाजीस भेटावयास आले. फ्रेंचांनीं जसें शिवाजीशीं संधान बांधलें तसें शेरखाना-

शींहि आपलें सूत कायम ठेवलें. कारण त्यांचा सततचा संबंध शेरखानाशीं; शेरखानाचें नेहमींचें राहण्याचें गांव त्रिविदी ऊर्फ तिरुवादी. पांदेचरीहून तिरुवादी २४ मैल, फोर्ट सेंट डेव्हिडपासून १५ मैल व जिंजीपासून दक्षिणेस ४० मैल आहे. शिवाजीची हालचाल पाहून शेरखानाचा पुत्र इब्राहिमखान यानें आपल्या कुटुंबांतील सर्व माणसें बाडबिछान्यासुद्धां शेजारच्या अरियालुर वनांत बोनागिरीकडे पाठवून आपण तेथें सडा राहिला. शेरखानहि तेथें २२ जूनपूर्वी आला. त्याजकडे भोंवतालचे नायक व पाळेगार सल्ला विचारावयास येऊं लागले. त्याला भेटावयास फ्रेंचांचा पांदेचरीचा अधिकारी मार्टिन ता. २७ जून रोजीं घोड्यावरून निघाला. त्यानें बरोबर चार फ्रेंच शिलेदार (cavaliers), दहा फ्रेंच सैनिक व वीस देशी सैनिक घेतले होते. ता. २९ रोजीं फ्रेंच लोक शेरखानास भेटले. त्या वेळीं तो आपले मुख्य अधिकारी घेऊन कचेरींत (दिवाण) विचार करीत बसला होता. मार्टिन व शेरखान यांनीं बराच वेळ खलबत केल्यावर शेरखानाच्या आग्रहावरून त्यानें प्रामाणिकपणानें असा सल्ला दिला कीं, ' शिवाजीशीं लढण्यापासून निभाव नसल्यामुळें शेरखानानें अरियालुरच्या वनांत निघून जावें व आपल्या सर्व किल्ल्यांत जरूर ती सामग्री सांठवून शिवाजीशीं लढण्यासाठीं दोन महिन्यांची तयारी ठेवावी; कारण दोन महिन्यांपेक्षां जास्त दिवस शिवाजी कर्नाटकांत राहणें शक्य नाहीं. '

शेरखानाचा पळ

दरम्यानच्या काळांत शिवाजी स्वतः वेलोरास वेढ्यासाठीं थोडें सैन्य ठेवून जिंजीस गेला व जिंजीहून सहा सहस्र स्वार घेऊन शेरखानाशीं लढावयास निघाला. तो ६ जुलै रोजीं तिरुवादीपासून दृष्टीच्या टप्प्यांत आला. शेरखानानें पळून न जातां आपली फौज शिवाजीस सामना देण्यास उभी केली. शिवाजी शत्रूच्या हल्ल्याची वाट पाहत तयारीनें राहिला. शेरखानास आपण सामन्यास उभे राहण्यांत चूक केली असें लवकरच उमजून आलें. तेव्हां त्यानें ताबडतोब पळ काढण्याचा निश्चय केला. युद्धशास्त्रविशारद अशा शिवाजीनें शत्रूची उडालेली गाळण ओळखतांच आपल्या सैन्यास त्याजवर चालून जाण्याचा हुकूम सोडला. शेरखानानें प्रथम थोडी माघार घेऊन मागून पळ काढला. शिवसेनेनें त्याचा पाठलाग करून त्याचें सैन्य

दाही दिशांना उधळून लावलें. शिवाजीनें शेरखानास पळून जाऊं न देतां पकडून लढाईस पूर्ण विराम देण्याचें ठरविलें. शिवाजीच्या पाठलागानें घाबरा झालेला शेरखान बोनागिरीच्या (भुवनगिरी) गचाळ अरण्यांत ता. ७ जुलै रोजीं शिरला व तेथें त्याला त्याचा दुसरा पुत्र अब्दुल्ला व इतर अधिकारी येऊन मिळाले. हें युद्ध रात्रीचें होऊन त्यांत शिवाजीला शेरखानाचे २७० घोडे, २० उंट, कित्येक बैल, तंबू, नगारें इत्यादि लूट मिळाली. शेरखानाजवळ फक्त १०० स्वार शिल्लक राहिले. शेरखान बोनागिरीच्या किल्ल्यांत लपला व त्याला शिवसेनेनें वेढा दिला. (बोनागिरीपट्टण हें चिदंबरपासून चार मैल व पोर्टोनोव्हो बंदरापासून पश्चिमेस सहा मैल आहे.)

ता. ९ रोजीं बालदूर, तेगेनापट्टम (कडलोर) इत्यादि किल्ले, तेथील लोक भिऊन पळाल्यामुळें, मराठ्यांना अनायासेंच मिळाले. शेरखान हा आपल्या प्रांतांतील सर्व मुलूख, शिवाय वीस हजार होन रोख देऊन व आपला मुलगा इब्राहिम यास ओलीस म्हणून ठेवण्याचें कबूल करून शिवाजीशीं तह करण्यास ता. १७ जुलै रोजीं तयार झाला. शिवाजीनेंहि त्याची मुक्तता करून गोंडेलूर किल्ल्यांतील सर्व मालमत्ता त्यास देण्याचें कबूल केलें. तहाच्या अटी ठरल्यावर शेरखान बोनागिरीपट्टणहून शिवाजीला भेटण्यास गेला. शिवाजीनेंहि त्याचा आस्थापूर्वक परामर्श घेऊन त्याजविषयीं सहानुभूति दाखविली. त्यानंतर शेरखान अरियालुरच्या अरण्यांत निघून गेला.

शेरखानानें आपल्याबरोबरच्या सामानांत बरींचशीं मूल्यवान् रत्नें गुप्तपणें लपवून ठेवलीं होतीं; विशेषतः त्याच्या बेगमेच्या अंगावर सरासरी एक लाख रुपयांचें जडजवाहीर असावें अशी जरी पुष्कळांची समजूत होती तरीसुद्धां वीस हजार होनांची भरती करणें त्याला मुष्किल होतें. तो अरियालुरास गेल्यावर त्याचें तेथील नायकानें अगत्यपूर्वक स्वागत केलें. व त्याला त्याच्या खर्चाकरितां दरसाल १५०० रु. उत्पन्न येईल अशीं दोन खेडीं लावून दिलीं. शेवटीं (फेब्रुवारी १६७८) त्या प्रांतांतील राजांना शेरखानाची दया येऊन त्यांनीं त्याजकरितां वीस हजार होन स्वेच्छेनें जमविले व ती रक्कम भरून मराठ्यांच्या जाचांतून त्याचा पुत्र इब्राहिम यास सोडविलें.

" आपला आश्रयदाता बहिलोलखान येऊन आपल्या मदतीस सैन्य

पाठवील, या आशेवर शेरखान जीव धरून होता. परंतु खुद्द विजापुरांतच यादवी माजून बहिलोल ता. २३ डिसेंबर रोजीं मरण पावला. फेब्रुवारी सन १६७८ त वर लिहिल्याप्रमाणें शेरखानाच्या वतीनें खंडणी भरण्यांत आल्यावर कर्नाटकांतील शिवाजीच्या वकिलानें शेरखानाबरोबर सलोख्याचें बोलणें सुरू केलें. शिवाजीनें त्याला गोंडेलोर किल्ला देऊन त्यास व्यापार करण्यासहि मोकळीक दिली; इतकेंच नव्हे तर एक महिन्यानंतर आपल्या नोकरींत येण्यासहि त्यास सांगितलें. पण विजापूरच्या मदतीच्या आशेवर त्यानें त्यास नकार दिला व शेवटीं तो मदुरा नायकाकडे त्रिचनापल्लीस आश्रयार्थ जाऊन राहिला (प. सा. सं. खंड ३ पृ. १२७).

कर्नाटकांतील तीर्थक्षेत्रें

शिवाजी ज्या प्रदेशांत आला होता तो प्रदेश अनेक तीर्थक्षेत्रांनीं गजबजलेला होता. तिरुपति, कांची, भुवनगिरी, श्रीरंगम, चिदंबरम, वृद्धाचलम् इत्यादि नगरें पर्वत व पवित्र स्थानें म्हणून तिकडे प्रसिद्ध आहेत. जवळच समुद्रकिनारा, अरण्यें आणि महानदी कावेरी व तिचें अफाट पात्र आहे. अशा रम्य व पवित्र प्रदेशांत आल्यानंतर शिवाजीसारख्या भक्तिमान्, श्रद्धाळू व निसर्गप्रेमी महापुरुषास अत्यानंद व्हावा व धन्यता वाटावी आणि सारा मुलूख मुसलमान व गोरे लोक यांच्या मगरमिठींतून सोडवून कायमचा आपल्या हिंदु राज्याखालीं आणण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न व्हावी, हें स्वाभाविक होय. शिवाजीच्या तिकडील चार महिन्यांच्या मुक्कामांत तो विष्णुकांची-शिवकांचीप्रमाणें कुंभकोणम्, वालीकंदपुरम, इत्यादि स्थळें पाहिल्यावांचून राहिला नसेल. रामेश्वराचें दर्शन घेण्याचेंहि त्याच्या मनांत असेल. पण राजकारणाच्या लगबगींत त्याला तिकडे जाण्यास सवडच मिळाली नसावी.

शिवाजीचा मुक्काम कोलेरून या कावेरी नदीच्या एका फांट्यावर होता. येथून पूर्व-समुद्र जवळ असल्यानें कावेरीचें पात्र भरतीच्या वेळीं एक मैल रुंद होतें. तेथून जवळच असलेल्या वृद्धाचलम्‌वरील (भुवनगिरीपाशीं) शिवाचें दर्शन घेण्यास शिवभक्त शिवाजी आपल्याबरोबरच्या मोटमोठ्या लोकांसह गेला होता. त्याच्या परिवारांत शहाजीचा दासीपुत्र संतोजी हाहि होता. संतोजी प्रथमपासून व्यंकोजीपाशीं असे. पण शिवाजी कर्नाट-

कांत आल्यावर त्याच्या विभूतिमत्त्वाला भाळून तो त्याजपाशीं येऊन त्याची सेवा करूं लागला. तोहि चांगला लढवय्या व त्या प्रांताचा पुरा माहितगार असल्यामुळें शिवाजीला त्याचें अमूल्य साहाय्य झालें.

पूर्व किनाऱ्यावर मद्रासपासून दक्षिणेस फ्रेंच, इंग्रज व डच यांच्या मुख्य बंदरांतून वखारी होत्या. त्यांपैकीं मद्रासला (फोर्ट सेंट जॉर्ज) इंग्रज, पांदेचेरी व फोर्ट सेंट डेव्हिड येथें फ्रेंच आणि पुलिकट तेगेनापट्टण व पोर्टो-नोव्हो येथें डच लोक वखारी घालून होते. शिवाजीची कोलेरून नदीवरील छावणी ती काय, अगदींच साधी. दोन जाडे-भरडे तंबू. पण त्यास या मुक्कामावर भेटावयास आलेल्या डचांचा थाट काय विचारावा! त्यांपैकीं दोघे जण पालख्यांत बसून आले होते. त्यांतील एक जण तेगेनापट्टणच्या वखारीचा प्रमुख व्यापारी होता. त्याला देशी भाषा अवगत होती. त्यांजबरोबर कांहीं गोरे सोजीर, घोडे, निशाणें, डेरे, नगारे, ४०।५० देशी सैनिक, सामान लादलेले बैल, खुर्च्या, टेबलें, पलंग इत्यादि बडेजाव होता. त्यांचें शिवाजीनें चांगलें स्वागत केलें व डचांनीं त्याला नजराणाहि मूल्य-वान् दिला. त्यांत रेशमी कापड, चंदन, गुलाबपाणी, मालदिवी नारळ, लवंगा व तरवारीचीं पातीं इत्यादि वस्तु होत्या.

पण शिवाजीचें एवढ्यानें समाधान झालें नाहीं. त्याला खर्चाकरितां २५।३० सहस्र होन (ecus) हवे होते. पण ते आपणांस आपल्या धन्या-च्या परवानगीशिवाय देतां येणार नाहींत, असें डचांनीं सांगितल्यावर शिवाजीनें त्यांस आपल्या शिबिरांत २।३ महिने पदरमोड करीत अडकून ठेवलें. शेवटीं त्यांनीं त्यांपैकीं बरीचशी रक्कम देऊन आपली सुटका करून घेतली. डचांप्रमाणें त्याच सुमारास फ्रेंचांनींहि येऊन शिवाजीस नजराणा दिला. त्याविषयीं मार्टिन लिहितो, "आम्ही जमलों व शिवाजीकडे नज-राणे घेऊन वकील पाठविण्याचें ठरविलें. पांदिचेरी येथें आमच्याजवळ नजराण्याजोगे मूल्यवान् वा कुतूहलजनक जिन्नस नसल्यामुळें आम्ही विचारांत पडलों. शेवटीं आम्ही जुना विटलेला जरीच्या कापडाचा तुकडा, पांचसहा पांढऱ्या कापडाचे तागे, सोनेरी पिवळ्या रंगाची शाल, एक डबल बॅरलच्या पिस्तुलाची जोडी, आणि चार रंगीत कापडाचे रेजे असे जिन्नस निवडून काढले. खरोखरीच हे जिन्नस फारच क्षुद्र होते. तथापि तेच घेऊन

सियूर जरमेन यास व त्याजबरोबर दुभाषा म्हणून अंटोनी कॅटेल यास आम्हीं पाठविलें. ते दोघे पांदिचेरीहून ता. १५ जुलै रोजीं निघाले. त्यांना ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांत शिवाजीच्या कोलेरून येथील तळावर जावें लागलें. त्यांना शिवाजीचा प्रधान (जनार्दनपंत हणमंते) त्याजकडे घेऊन गेला. त्यांनीं त्यास नजराणा अर्पण केला. पण शिवाजीनें तिकडे लक्षच दिलें नाहीं. शेवटीं त्यांनीं आपली गरिबी व व्यापाराची मंदी कळविल्यावर शिवाजीच्या प्रधानानें कांहीं रंगीत कापड व रोकड पैसा ठेवून घेऊन तीन दिवसांत वकिलाला निरोप दिला. शिवाजीनें पांदिचेरी येथील लोकांच्या सुरक्षिततेबद्दल कौलनामा देऊन व आमच्या माणसांपैकीं प्रत्येकाला ४ ते ५ होन व किंमतवान् कापड देऊन आमच्या वकिलास जाण्याची परवानगी दिली" (प. सा. सं. खंड ३, पृ. १३३).

मदुरेपासून खंडणी

शिवाजी कर्नाटकांत शिरून आतां दोन-अडीच महिने झाले होते, तरी त्याची व व्यंकोजीची भेट अद्यापि व्हावयाचीच होती. व्यंकोजी कांहीं झाला तरी शहाजीचा मुलगा. तोहि शूर होता. शहाजीच्या मृत्यूनंतर तो विजापूरकरांचा कर्नाटकांतील विश्वासू सेनापति असून तो आपल्या परीनें आपली सत्ता पूर्व किनाऱ्यावर क्रमशः वाढवीत होता. त्याचा इंग्रजांशीं संघर्ष होऊन त्यानें नागापट्टणाजवळचीं १।२ खेडीं जाळलीं व लुटलीं होतीं. त्यानंतर त्याचा इंग्रजांशीं तह झाल्यावर ते उभयतां एकमेकांशीं सलोख्यानें वागत होते. त्याचें व मदुरेच्या नायकाचें भांडण असून व्यंकोजी त्याच्या राज्याचा अभिलाष करीत होता. आणि शिवाजीच्या आगमन-प्रसंगीं तो तंजावर प्रांताचा स्वामी झाला होता. शिवाजी कोलेरून नदीच्या तीरावर (कावेरीचा फांटा) तंजावरापासून १० मैलांवर (६ जुलै सन १६७७) तिरुमलवाड्यास (तिरुवादी) मुक्कामास होता. तेथून तंजावरास व्यंकोजी-कडे त्यानें भेटीस येण्याचा निरोप पाठविला व मदुरेच्या नायकापाशींहि खंडणी मागितली. नायकाचा हेजीब शिवाजीच्या भेटीस आला असतां शिवाजी त्याला म्हणाला, 'तुझ्या धन्यापासून आम्ही नऊ कोटि रुपयांची अपेक्षा करतों. ही सगळी रक्कम आजच आम्ही तुम्हांपाशीं मागत नाहीं. तूर्त खर्चाकरितां तुम्ही एक कोटि रुपये पाठविले तरी पुरे होतील.' त्यावर

हेजीब उत्तरला, 'आमच्या धन्याचा कांहीं मुलूख म्हैसूरच्या नायकानें व कांहीं मुलूख व्यंकोजीनें घेतला आहे. हा मुलूख तुम्हीं आम्हांस परत मिळवून दिला तर मग आम्ही सात लक्ष रुपये तुम्हांस देऊं.' या वेळीं कावेरी नदी भरली असल्यामुळें शिवाजीच्या मनांत मदुरेवर जावयाचें असलें तरी ती गोष्ट अशक्यप्राय होती. याच सुमारास रघुनाथपंत (रघुनाथ नारायण हणमंते) चारशें घोडेस्वारांसह शिवाजीच्या शिबिरास आला, त्याला शिवाजीनें सामोरें जाऊन त्याचा सन्मान केला व आपल्याजवळ दोन दिवस ठेवून घेऊन मदुरा नायकाच्या हेजिबाबरोबर मदुरेस नायकाकडे पाठविलें. रघुनाथपंतानें नायकाशीं सहा लक्ष होनांचा करार करून शिवाजीनें आपलें सैन्य परत न्यावें असें ठरविलें व त्या रकमेपैकीं दीड लाखांचा भरणा नायकानें हेजिबामार्फत ताबडतोब केला.

व्यंकोजीची भेट

मदुरेचा प्रश्न या रीतीनें निकालांत निघाल्यावर व्यंकोजीचा प्रश्न शिल्लक राहिला. व्यंकोजी दोन हजार स्वार घेऊन जुलैअखेर कोलेरून नदीवरील तिरुमलवाड्यास (तिरुवादी) शिवाजीला भेटण्यास आला. शिवाजी तेरुपतोरा गांवापर्यंत त्यास सामोरा गेला. मुक्कामास आल्यावर 'वडिलांच्या हयातींत मिळविलेली संपात्ति, घोडे, जवाहिर यांचा $\frac{3}{4}$ ($\frac{1}{2}$) हिस्सा आम्हांस द्यावा' असा निरोप शिवाजीनें व्यंकोजीस पाठविला. पण व्यंकोजी त्यास कबूल झाला नाहीं, म्हणून शिवाजीनें रागावून त्यास 'चालता हो' असें सांगितलें. तें ऐकतांच व्यंकोजी ५ घोडेस्वार घेऊन तात्काळ निघाला. शिवाजीनें लागलीच व्यंकोजीच्या बरोबरचे जगन्नाथ पंतलू, शिवाजी पंतलू, कोनेरी पंतलू व निळोजी नायक नांवाचा एक व्यापारी यांस धरून ठेवलें आणि व्यंकोजीचा प्रांत ताब्यांत घेण्याकरितां जनार्दनपंताला पाठविण्याचें योजिलें (प. सा. सं. खंड २ पृ. ५८५).

व्यंकोजीस पत्र

हा मजकूर नेलोर रामण्णा या इंग्रजांच्या वकिलानें मद्रासेस गव्हर्नर लँघार्न यास ता. २७ जुलै १६७७ रोजीं लिहिला आहे. त्यांत शिवाजीनें जे इसम पकडून ठेवले असें म्हटलें आहे ते व्यंकोजीचे अधिकारी होत. या बाबतींत शिवाजीनेंहि व्यंकोजीस लिहिलेलें पत्र उपलब्ध आहे. त्याचा

आशय असा–" शहाजीच्या मृत्यूनंतर तुम्हीं तेरा वर्षें त्यांचें उत्पन्न खाल्लें व त्यांच्या सर्व मिळकतीचा उपभोग घेतला. मीं तेरा वर्षें सबूर केली. तुम्ही माझा हिस्सा मला स्वेच्छेनें द्याल असें मला वाटलें होतें. पण तसें घडलें नाहीं. अशा स्थितींत राजकारण-प्रसंगें भागानगरास गेलों. तेथून कर्नाटकांत गेलों. जिंजी घेतली व येलूर (वेलोर) तर्फेचा मुलूख घेतला. शेरखानास झगड्यांत मोडून गर्देस मेळविला. शेरखानाच्या हातांत मुलूख होता तो सर्व घेतला. त्यानंतर मजल-दरमजल कावेरी तीरावर गेलों. तेथून तुम्हांस पत्रें लिहून गोविंदभट, काकाजीपंत, निळोबा नाईक, रंगोबा नाईक व तिमाजी यक्षीयारराव असे भले लोक आम्हांकडे पाठविण्यास सांगितलें व आम्हांस आमचा अर्धा वांटा द्या अशी मागणी केली. त्याप्रमाणें बाळंभट गोसावी, कृष्ण ज्योतिषी, कृष्णाजी सेखजी असे भले लोक तुम्हीं आम्हांकडे पाठवून दिले. त्यांची व आमची वाटाघाट होऊन आम्हीं सांगितलें तें त्यांस पटलें. त्यांनींहि तुम्हांस अर्धा वांटा देण्याचा सल्ला दिला. परंतु तुम्हीं कपटबुद्धि मनांत धरली. तुम्हांस वाटलें कीं, ' शिवाजी राजे यांनीं फार मोठें राज्य मिळविलें आहे. त्यांनीं मजपासून वांटणी घेण्याचा लोभ कां धरावा? आपण जरा गरिबीनें वागून राजाच्या तोंडाला पानें पुसावीं.'

श्रीदेवाची कृपा

" अशा विचारानें वांटणीचा मुद्दा गुलदस्तांत ठेवून तुम्ही स्वतःच आमच्या भेटीस आलां, त्या वेळीं आम्हीं तुम्हांपाशीं अर्धा वांटा मागितला. परंतु तुम्ही त्याविषयीं कांहींच बोलाना. तेव्हां आम्हीं मनांत आणिलें असतें तर तुम्हांस धरून ठेवतां आलें असतें. पण तो विश्वासघात झाला असता, असें जाणून तुम्हांस तंजावरास परत जाण्यास आम्हीं निरोप दिला व मागाहून तुमचें मन वळविण्यास शामजी नाईक, कोनेरी पंत व शिवाजी शंकर यांस धाडलें. पण तुम्हांस दुर्योधनासारखी दुष्ट बुद्धि होऊन युद्ध करावें असेंच योजिलें. त्या समयीं आम्हांस रायगडप्रांतीं बहुत कार्य असल्यामुळें आम्ही चि. संतोजी राजे, रघुनाथपंत व हंबीरराव यांस त्या प्रांतांत ठेवून स्वार होऊन तोरगल प्रांतास आलों. आमच्या पश्चात् तुम्ही तुरुक लोकांच्या (मुसलमान) बुद्धीस लागून आमच्या सरदारांवर सैन्य पाठवून दिलें.

तुमचें सैन्य बालगोंडपुरास आलें. तुमच्या व आमच्या लोकांचा झगडा थोर झाला. तुमचे लोक पराजय पावले. प्रतापजीराजे, भिवजी राजे व शिवाजी डबीर असे तिघे धरले गेले. कित्येक मारले गेले व कित्येक पळून दाणादाण होऊन गेले. असा समाचार ऐकला. हें ऐकून बहुत नवल वाटलें कीं, कै. महाराज यांचे तुम्ही पुत्र, बहुत थोर लोक, ऐसे असून विचार करीत नाहीं. आतां तुम्ही कष्टी व्हाल यांत नवल काय ? आतां तुम्ही असा विचार करावयाचा होता कीं, अधर्मेंकरून तेरा वर्षे आपण सारें राज्य खाल्लें तें खाल्लें; आतां अर्धा वांटा मागतात, तो त्यांचा त्यास द्यावा आणि आपण सुखी व्हावें. दुसरा विचार तुम्हीं असा करावयास पाहिजे होता कीं, आम्हांवर श्रीदेवाची व श्रीची कृपा पूर्ण झाली आहे. दुष्ट तुर्कांला आम्ही मारतों. आणि तुमच्या सैन्यांत तुरुक लोकच असतां तुमचा जय कसा होईल ? तुरुक लोक आम्हांपासून तुम्हांला कसें वांचवितील ?

"तथापि आतांपर्यंत जें झालें तें झालें; यापुढें तरी हट्ट सोडून द्यावा. आणि अरणी, बेंगळूर, कोल्हार, होसकोट, सिरलकटे किरकोळ ठिकाणें व तंजावर हा प्रदेश तुमच्या हातांत उरला आहे तो आमच्या लोकांच्या हातीं द्यावा. नगद पैका, जडाव, हत्ती व घोडे यांचा अर्धा वांटा आम्हांस द्यावा. असा संधि तुम्हीं आमच्याबरोबर करावा. हा संधि निर्मळ मनानें तुम्हीं केल्यास आम्ही तुम्हांस तुंगभद्रेच्या अलीकडची पन्हाळा प्रांतांतली तीन लक्ष होनांची दौलत देऊं. किंवा आम्हीं दिलेली दौलत तुम्हांस नको असली तर कुतुबशहास अर्ज करून त्याजपासून तुम्हांस तीन लक्ष होनांची दौलत देऊं. असे दोन्ही विचार तुम्हांस लिहिले आहेत. त्यांपैकीं कोणचा तरी एक मान्य करून हट्ट सोडून द्यावा. आपण आपसांत गृहकलह करून कष्टी व्हावें हें योग्य नव्हे. आम्हीं तरी वडीलपणानें आंजवर तुम्हांस सांगितलें. आतांहि सांगतों. ऐकाल तर बरें. तुम्हीच सुख पावाल. न ऐकाल तर कष्टी व्हाल. आमचें काय चालणार ! बहुत काय लिहिणें 'मर्यादेयं विराजते।' " (प. सा. सं. खंड २, पृ. ७१२).

कर्नाटकाची मोहीम संतोजी प्रभृति आपल्या सेनापतींवर सोपवून शिवाजी नोव्हेंबर १६७७ त कर्नाटकांतून निघून महाराष्ट्रांत परत आला, त्यानंतर त्यानें व्यंकोजीस हें पत्र लिहिलें आहे. तोंपर्यंत कर्नाटकांत त्यानें

जिंकलेल्या प्रदेशाचें थोडक्यांत वर्णन त्यांत आलें आहे. जिंजी, वेलोरचा किल्ला व त्याखालचा मुलूख आणि शेरखानाच्या ताब्यांतील विजापूरकरांचा प्रदेश त्यानें घेतला होता. हा प्रदेश समुद्रकिनाऱ्यापासून थोडा आंत आहे. व्यंकोजीच्या कावेरीच्या दक्षिणेकडील प्रदेशास त्यानें धक्का लावला नव्हता. हा घरगुती झगडा आपसांत मिटविण्यासाठीं त्यानें कावेरी तीरापासून जवळ व समुद्रापासून थोडें आंत तिरुमलवाड्यास राहून त्याच्याशीं बोलणें केलें. व्यंकोजीचें राज्य बरेंच मोठें होतें. त्यांतील बेंगळूर, अरणी, कोल्हार, होसकोट, तंजावर इत्यादि पश्चिमेचा व दक्षिणेचा मोठा प्रांत त्याजकडे होता. शिवाजीनें व्यंकोजीच्या सगळ्या राज्याची निम्मी वांटणी न मागतां शहाजीच्यावेळीं जेवढी जहागीर होती तिचा निम्मा वांटा मागितला असला पाहिजे. पण तो देण्यास जेव्हां व्यंकोजी कबूल होईना तेव्हां लढाईचा प्रसंग आला. शिवाजी लिहितो त्याप्रमाणें व्यंकोजीचें सैन्य शिवसेनेवर चालून आलें. शिवसेनेचे प्रमुख संतोजी राजे, रघुनाथपंत व हंबीरराव मोहिते हे होते. अशा जबरदस्त सेनापतींच्यापुढें व्यंकोजीच्या सैन्याचा साहजिकच टिकाव लागला नाहीं. त्याचे प्रमुख सेनापति पकडले गेले. असा व्यंकोजीचा पराभव झाल्यानंतर अर्ध्या वांटणीची भाषा अर्थातच संपून शिवाजीनें जेता या नात्यानें त्याजपुढें आपल्या अटी ठेवल्या. शिवाजीला कर्नाटकाचा सलग प्रदेश हवा होता. त्यानें स्वतः जिंकून घेतलेला व व्यंकोजीचा मिळून तें एक मोठें राज्य होण्याजोगें होतें. आपल्या दोघां पुत्रांपैकीं कोणा एकाला तें देऊन त्याला स्वतःच्या घरांतील कलह मिटवावयाचा होता. म्हणून त्यानें व्यंकोजीस पन्हाळ्याकडील म्हणजे कोल्हापुराकडील तीन लक्ष होनांचा मुलूख देऊं केला. पण तो नको असेल तर कुतुबशहाकडून त्याच्या राज्यांतील तितक्याच उत्पन्नाचा मुलूख देण्याचें त्यास आश्वासन दिलें. पण या ठिकाणीं एक सहजच प्रश्न सुचतो कीं, शिवाजी व्यंकोजीपाशीं शहाजीच्या जहागिरीची कर्नाटकांतील निम्मी वांटणी जशी मागतो तशी पुण्याकडे शहाजीची जी जहागीर होती व जिची वहिवाट शिवाजी करीत होता तिचा अर्धा वांटा शिवाजी व्यंकोजीस आपण होऊन देण्यास कसा कबूल झाला नाहीं ? न्यायतः म्हटलें तर त्यानें असें करावयास पाहिजे होतें. बाकीं हें पत्र वाचलें असतां शिवाजीच्या

ठिकाणीं तुरुकांविषयीं म्हणजे मुसलमानांविषयीं किती चीड होती व आपणांवर ईश्वराची पूर्ण कृपा असल्याविषयीं किती निस्सीम श्रद्धा होती, याचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाहीं.

‘स्वतः धाकटे व बुद्धीहि धाकटी’

सभासदानेंहि कर्नाटकांतील मोहिमेचें आपल्यापरीनें वर्णन लिहिलें आहे. तो लिहितो, “पुढें कर्नाटकाचा देश साधावा म्हणोन जिंजीस वेढा घातला, चंदीमध्यें (जिंजी) विजापूरकरांचा वजीर खानखानान याचे पुत्र रुपलखान व नासरीखान हे उभयतां होते. त्यांस राजकारण करून त्यांस कौल देऊन बाहेर काढलें आणि स्थळ साध्य केलें. त्रिमल महाल (तिरुमलवाडी) म्हणून आहे, तेथें विजापूरचा वजीर शेरखान पांच हजार स्वारांनिशीं होता. पठाण तोलदार, हत्ती, सामान, द्रव्य अगणित होतें. तो राजावर चालून आला. त्याशीं युद्ध करून त्यास बुडविला. जिवंत खासा शेरखान धरला. पांच हजार घोडे व बारा हत्ती पाडाव केले. द्रव्य जवाहिरहि अपार हस्तगत केलें. मोठें युद्ध केलें. असें कर्म करून त्रिमल महाल (तिरुमलवाडी) फत्ते केला.

“त्या उपरी एकोजी राजे हे चंदावरचें (तंजावर) राज्य साध्य करून असत. ते आपल्या कारकुनांसह राजाचे भेटीस आले. भेट बंधू-बंधूंची झाली, एकोजी राजाचे कारकून काकाजीपंत पेशवे व कोन्हेर महादेव मुजुमदार भेटले. व्यंकाजी दत्तोचे पुत्र जगन्नाथपंत, भिवजी राजे व प्रतापजी राजे (शहाजीच्या नाटकशाळेचे पुत्र) तेहि भेटले. बहुत संतोष झाला. उभयतां बंधूंची परस्परांस मेजवानी झाली. आठ दिवस एकत्र होते. मग राजियांनीं एकोजी राजे यांजपाशीं वडिलांचीं बारा बिरुदें मागितलीं. त्याजवरून एकोजी राजे यांनीं चित्तांत विकल्प आणून तीं दिलीं नाहींत. त्याजवर एकोजी राजे यांच्या कारकुनांनीं व कारभाऱ्यांनीं त्यांचें पोटांत भय घातलें कीं, राजे तुम्हांशीं खटखट करून बिरुदें जोरावरीनें घेतील. यानें धास्त उत्पन्न होऊन एकोजी राजे बिरुदें घेऊन चंदावरास रात्रीचे वेळेस पळून गेले.

“दुसरे दिवशीं राजास हें वर्तमान कळलें. त्याजवरून आश्चर्य केलें कीं, ‘काय निमित्य पळाले! आम्ही त्यांस धरीत होतों कीं काय!

आम्हांस बिरुदें काय करावयाचीं! आमचीं बिरुदें अष्टदिशेस लागलीं आहेत. वडिलांची वस्त असावी म्हणून मागितलीं होतीं. 'धाकटे ते धाकटे व बुद्धीहि धाकटी.' मग त्यांचे कारकून व सरदार पळत होते ते राजियाच्या लोकांस सांपडले. त्यांस धरून आणिले आणि वस्त्रें, भूषणें व अश्व देऊन चंदावरास (तंजावर) बंधूसन्निध पाठविले. संतोजी राजे म्हणून महाराजांच्या (शहाजी) नाटकशाळेचे पुत्र होते. ते शूर पराक्रमी होते. ते राजियांच्या भेटीस आले. त्यांस कर्नाटकांत एक हजार घोड्यांची दौलत दिली. येळूर (वेलोर) कोट यांत इदिलशाही ठाणें होतें. कोटांत जिवंत पाण्याचा खंदक, पाण्यास अंत नाहीं. उदकांत दहा हजार सुसरी. कोटाचा तट दोन गाड्या जोडून जाव्या इतका मजबूत. पडकोट तरी चार चार फेऱ्यावरी फेरे.

व्यंकोजीचा पराभव

"हें कर्नाटकांतील राज्य वीस लक्ष होनांचें होतें. त्याच्या व्यवस्थेस रघुनाथ नारायण हणमंते (मुजुमदार) व हंबीरराव मोहिते यांस ठेवून राजे आनंदराव व मानाजी मोरे या सरदारांसह महाराष्ट्रांत निघून आले. हें वर्तमान व्यंकोजी राजे यांस कळून आपली फौज व पाळेगार जमवून हंबीररावावर चालून गेले. मग दोघांत युद्ध झालें; हंबीररावांनीं व्यंकोजी राजियाची फौज मोडली. मोठें युद्ध झालें. अगणित रण पडलें. व्यंकोजी राजांचे चार हजार घोडे पाडाव केले. हत्ती जडजवाहिर वाजे सरदार भिवजी राजे, प्रतापजी राजे वरकडहि नामांकित लोक पाडाव केले अशी फत्ते झाली. पाडाव केलेल्या सरदारांस वस्त्रें देऊन सोडलें. यानंतर रघुनाथपंत व हंबीरराव चंदावराकडे (तंजावर) गेले. तेव्हां व्यंकोजी राजे यांनीं सभ्य मनुष्य मध्यस्थ घालून सख्य करावें असें झालें; म्हणून रघुनाथपंत व हंबीरराव यांनीं शिवाजी राजाकडे त्यांची आज्ञा घेण्यासाठीं पत्रें देऊन जासूद पाठविले. राजाकडून 'तोहि आपला भाऊ आहे. त्याचें रक्षण करावें व त्याचें राज्य बुडवूं नये' असें उत्तर आलें. त्याप्रमाणें व्यंकोजी राजाशीं या दोघांनीं सल्ला केला. त्याजपासून त्यांनीं उदंड द्रव्य घेतलें. मग रघुनाथपंतांनीं हंबीररावास लष्करसहवर्तमान राजियांकडे पाठविलें व आपण दहा हजार स्वार पागा व शिलेदार जमा करून राज्य रक्षून राहिले."

शिवाजीनें व्यंकोजीस लिहिलेलें पत्र व सभासदाची हकीकत यांचा मेळ चांगला बसतो. त्याशिवाय पुढचा इतिहास देऊन सभासदानें व्यंकोजींशीं तह कसा केला, त्याचें राज्य त्याजकडे कसें ठेवण्यांत आलें व शिवाजीनें विजापूरकरांपासून घेतलेल्या मुलुखाचा बंदोबस्त करण्याकरितां रघुनाथपंताची योजना कशी झाली, हेंहि स्पष्ट केलें आहे.

नेलोर रामण्णा यानें ता. २७ जुलै सन १६७७ च्या पत्रांत व्यंकोजी शिवाजीपासून निघून गेल्यावर त्याचे अधिकारी जगन्नाथ पंतलू, शिवाजी पंतलू, कोनेरी पंतलू आणि निळोजी नायक व्यापारी यांस शिवाजीनें पकडून ठेवलें असें म्हटलें आहे. त्यांनाच बरोबर घेऊन शिवाजी तिरुमलवाड्याहून उत्तरेस येलावनसोर हा किल्ला घेण्यास गेला. त्यांपैकीं जगन्नाथ पंडितास आपलें वजन खर्चावयास लावून किल्ल्यावरील लोकांना किल्ला सोडून जाण्यास शिवाजीनें भाग पाडलें, असें २ ऑगस्टच्या पत्रांत नेलोर रामण्णानें लिहिलें आहे. अशा रीतीनें कावेरीच्या अलीकडचा म्हणजे उत्तरेकडचा व्यंकोजीचा सगळा प्रांत शिवाजीनें २ ऑगस्ट १६७७ पर्यंत जिंकून घेतला. जिंजीच्या दक्षिणेकडील वेलोर व अर्णी घेण्याचा उद्योग शिवाजी करीतच होता. पण तीं ठाणीं तोंपर्यंत पाडाव झालीं नव्हतीं. तथापि अखेर २ ऑगस्टपर्यंत शिवाजीनें व्यंकोजीचा जेवढा मुलूख जिंकून घेतला होता तेवढा सगळा व्यंकोजीकडे राहूं दिला व त्याजकडून आपल्या वांटणीच्या मोबदल्यांत ३ लक्ष होन घेतले (प. सा. सं. खंड २, पृ. ६१८).

शिवाजीचे सेनापति हंबीरराव मोहिते प्रभृति यांचें व्यंकोजीबरोबर युद्ध झालें. त्याचा वृत्तान्त शिवाजीनें व्यंकोजीस लिहिलेल्या पत्रांत व सभासदाच्या चरित्रांतहि आहे. हें युद्ध नोव्हेंबर १६७७ मध्यें झालें. याचा मजकूर इंग्रजांच्या पत्रव्यवहारांत पुढीलप्रमाणें आढळतो – "जिंजीकडील मुलुखांत ठेवलेला शिवाजीचा भाऊ व सेनापति संतोजी याचे सहा हजार स्वार व सहा हजार पायदळ एवढें सैन्य गेले कांहीं दिवस तंजावराच्या एकोजीशीं लढण्यांत गुंतलें होतें. एकोजीपाशीं ४ हजार स्वार व १० हजार पायदळ होतें. सकाळपासून संध्याकाळपर्यंत युद्ध झालें. त्यांत संतोजीचा पराभव होऊन त्यास पाऊण कोस मागें हटावें लागलें. छावणींत पोंचल्यावर या पराभवाचे दूरवरचे परिणाम व आपली होणारी बदनामी यांचा

आपल्याबरोबरच्या सरदारांशीं (हंबीरराव) विचार करून त्यांनीं लगेच पोशाख व खोगिरें चढविलीं. त्यांनीं निराळ्या वाटांनीं जाऊन, शत्रूचे लोक त्या दिवसाच्या परिश्रमानें विश्रांति घेत बेसावध पडले असतां भर मध्यरात्रीं जाऊन, त्यांची भयंकर कत्तल केली. त्या छाप्यांत त्यांनीं एक हजार घोडे, तीन मुख्य सेनापति व सर्व तंबू वगैरे सामान मिळविलें. पेंढाऱ्यांनीं त्याशिवाय आणखी शंभर घोडे व किरकोळ लूट नेली. एकोजीचे बाकीचे लोक कावेरीपलीकडे तंजावरास पळाले. या जयामुळें शिवाजीचा ताबा यापुढें शांततेनें राहील असें वाटतें. या युद्धांत मदुरेचा नायक तटस्थ होता " (प. सा. सं. खंड २, पृ. ५९७). युद्धाची ही माहिती अधिक विस्तृत आहे. हें युद्ध कावेरीच्या अलीकडे म्हणजे तिरुमलवाड्याच्या बाजूस झालें व शिवाजीनें आपल्या पत्रांत म्हटल्याप्रमाणें व्यंकोजीनें आपणच हल्ला करून सुरू केलें. पण शिवाजीचा वीर हंबीरराव व तिकडचे माहितगार संतोजी राजे यांनीं स्वतःची फौज शत्रूहून कमी असतांहि केवळ महाराजांवरील भक्तीनें, जिवापाड मेहनतीनें व धाडसानें शत्रूस जिंकलें, यांतच शिवसेनेचें युद्धकौशल्य व हिंमत यांची परीक्षा झाली.

मशिदींचा अपमान ?

शिवाजीची कर्नाटकावरील ही स्वारी केवळ लूटमारीकरितां नव्हती. त्याला तेथें कायमचें राज्य स्थापावयाचें होतें. या दृष्टीनें मुलूख जिंकतांच त्याच्या बंदोबस्ताचें काम त्यानें सुरू केलें. त्यासंबंधीं मद्रासचे जेसुइट आपल्या पत्रांत लिहितात, 'जुलमी शिवाजीनें जिंजी घेतल्यावर आणि एक वर्ष वेढा घालून वेलोरचा किल्ला जिंकल्यावर, हिंदुस्थानांतील मुसलमानांचें बळ लक्षांत घेऊन त्यानें बंदोबस्त करण्यास सुरुवात केली. मुसलमानांना या राज्यांतून घालवून देतांना शिवाजीनें त्यांच्या मशिदींचा अपमान व भ्रष्टाकार केला होता. जिंजी किल्ल्याची त्यानें पुनः डागडुजी केली. पहिले तट पाहून नवे तट व बुरूज असे बांधले कीं, तें काम हिंदी लोकांचें नसून युरोपियनांचेंच असावें असें वाटतें. कांहीं जुने निरुपयोगी किल्ले पाहून त्यानें कित्येक नवे भुईकोट व डोंगरी किल्ले बांधले. पाश्चात्यांच्या पद्धतीचें अवलंबन करून त्यानें मोठे खडक फोडले, तलाव बांधले

आणि युद्धोपयोगी इमारतींची रचना केली. या कामावर त्यानें आपल्या प्रजेवर जुलूम करून जमविलेली अपार संपत्ति खर्च केली " (प. सा. सं. खंड २, पृ. ५७१).

किल्ल्यांचा बंदोबस्त

शिवाजीनें या कामासाठीं गोवें व वेंगुर्लें येथून पोर्तुगीजांच्या तालमींत तयार झालेले कसबी कारागीर आणविले होते. यामुळेंच त्याचीं कामें युरोपियन पद्धतीबरहुकूम झाल्याबद्दल जेसुइटांनीं त्याची पाठ थोपटली. पण तीं कामें करीत असतां आणलेले कारागीर मरून गेल्यामुळें शिवाजीनें ता. २२ सप्टेंबर १६७७ रोजीं मद्रासचा इंग्रज गव्हर्नर लँघार्न याजकडे मदत मागितली. त्या पत्रांत तो लिहितो, " मीं कर्नाटकांत आल्यापासून अनेक किल्ले जिंकले. कित्येक किल्ल्यांत मला नवीन बांधकामें करावयाचीं आहेत. मोठ्या तोफांचे गाडे कसे करावे व सुरुंग कसे लावावे हें जाणणारीं माणसें तुम्हांपाशीं असलीं तर तीं आम्हांस द्यावीं. दगडी भिंती उडविण्यास त्यांची जरुरी आहे. गोवें व वेंगुर्लें येथून या कामासाठीं आणलेलीं माणसें मरून गेलीं. तरी तुम्हांकडे २०।२५ किंवा निदान १०।१५ सुरुंगे मिळाले तरी चालेल. त्यांना चांगला तनखा देऊं "(प.सा.सं.खंड २, पृ.५९१).

इंग्रज महाधूर्त. ते शिवाजीला थोडाच प्रबळ होऊं देणार! त्यांनीं शिवाजीच्या पत्रास कशा वाटाण्याच्या अक्षता लावल्या, हें त्यांनींच ३ ऑक्टोबर १६७७ रोजीं लिहिलेल्या पत्रांत दृष्टीस पडतें : " शिवाजीचे दोन जासूद त्याचें ता. २२ सप्टेंबरचें पत्र घेऊन आले. त्यांत त्यानें इंजिनियर मागितले होते. परंतु शिष्टाचार संभाळून त्याला आम्हीं नकार दिला. कारण इंजिनियर पुरविल्यास शिवाजी प्रबळ होऊन शिवाय गोवळकोंडेकर व मोगल यांचें शत्रुत्व पत्करावें लागेल. शिवाजीचे गुप्त हेर सर्वत्र पसरले आहेत व तो स्वतः सैन्य घेऊन येथून दोन दिवसांच्या मुक्कामावर आला आहे. तेव्हां रक्षणाकरितां शिबंदी पाठवून तटबंदीचें काम जोरांत पुरें केलें पाहिजे. म्हणजे मग शिवाजीसारख्या अनिष्ट शेजाऱ्याचें किंवा विरोधी दिवाणाचें भय बाळगावें लागणार नाहीं "(प. सा. सं. खंड २, पृ. ५९३).

शिवाजी कर्नाटकाच्या स्वारीवर असतांनाच त्यानें गोवळकोंड्यास १६ जून १६७७ च्या सुमारास जाऊन दक्षिणी पक्षाची स्थापना केली.

त्याच्या स्वारींत गोवळकोंड्याचा सरलष्कर मिर्झा महंमद अमीन हा होता व शिवाजीस स्वारीच्या खर्चाकरितां दररोज तीन हजार होनांचा तनखाहि पोंचत होता. शिवाजी कर्नाटकांतील मोहीम संपवून नोव्हेंबर १६७७त तो परत महाराष्ट्रांतहि गेला व जातांना जिंकलेला कर्नाटकाचा सर्व मुलूख आपला मंत्री रघुनाथपंत याच्या स्वाधीन त्यानें केला. अर्थात् गोवळकोंड्याशीं त्यानें केलेला करार मधील पांच महिन्यांत मोडून कुतुबशहाच्या तोंडाला त्यानें पानें पुसलीं असें स्पष्ट दिसतें. किंबहुना तो करार त्यानें फार दिवस पाळलाच नाहीं असेंच म्हणावें लागतें; कारण फोर्ट सेंट जॉर्जहून इंग्रजांनीं ई. इं. कंपनीस ता. १८ जून १६७७ रोजीं पाठविलेल्या पत्रांत म्हटलें आहे : ' जिंजी आदिकरून जिंकलेला सर्व मुलूख शिवाजी स्वतःच दाबून बसल्यामुळें त्याचें व गोवळकोंडेकरांचें वैमनस्य येऊन गोवळकोंडेकरांनीं त्याला चालू केलेला तीन हजार होनांचा तनखा बंद केला आहे " (प. सा. सं. खंड २, पृ. ५९०). वरील ३ ऑक्टोबरच्या इंग्रजांनीं लिहिलेल्या पत्रांत शिवाजीस ' आम्हीं मदत केली तर गोवळकोंडेकरांचा आम्हांवर रोष होईल ' अशी कबुली आहे. तिजवरूनहि गोवळकोंड्याशीं झालेला करार शिवाजीनें मोडला व त्या रूपानें दक्षिणी पक्षाच्या अस्तित्वास धक्का दिला असें म्हणावें लागतें.

शेवट गोड

कर्नाटकांत असतां शिवाजी व व्यंकोजी यांजमध्यें युद्धप्रसंग होऊन वितुष्ट वाढलें तरी अखेरीस त्या वितुष्टाचा शिवाजीनें शेवट गोड करून आपल्या धाकट्या भावाचे अपराध पोटांत घातले व तंजावरच्या राज्याचा कारभार चांगला चालण्यास त्यानें व्यंकोजीस हरतऱ्हेनें मदत केली. त्यास चांगले अधिकारीहि शिवाजीनें पुरविले. शिवाजीनें कर्नाटकांत जातांना आपणांबरोबर रघुनाथ नारायण व जनार्दन नारायण हे दोघे कर्नाटकाचे माहितगार अधिकारी नेले होते; त्यांपैकीं रघुनाथपंत यास आपल्यातर्फे कर्नाटकाचा कारभारी नेमलें. व्यंकोजीनें शिवाजीपाशीं असलेला गंगाधरपंत नांवाचा अधिकारी मागितला. त्यास शिवाजीनें कळविलें, ' रघुनाथपंडितास कर्नाटकांत ठेवल्यामुळें येथें फडावर काम करण्यास त्यांच्याऐवजीं दुसरा लायक इसम पाहिजे; यासाठीं तें काम आम्हीं गंगाधरपंतावर सोंप

विलें आहे. जनार्दनपंतास तुम्ही मागतां तर त्यांस दरबारांतील स्वतंत्र काम सांगितलें आहे. जनार्दनपंतांचे एक चिरंजीव गंगाधरपंत, ते वर सांगितल्या-प्रमाणें इकडे गुंतले आहेत आणि जनार्दनपंतास देतां येत नाहीं. वास्तव जनार्दनपंतांचे दुसरे चिरंजीव श्रीनिवासपंत हे शहाणे आहेत. त्यांस आम्ही तुमच्या सेवेस देत आहों. ते अद्यापि लहान आहेत. यासाठीं ते मोठे होई-पर्यंत कोणी शहाणा मुतालीक नेमून त्याजकडून मजमूचें कार्य उरकून घ्यावें " (प. सा. सं. खंड २, पृ. ६२९).

शिवाजी स्वारीवर असतां त्याची छावणी अतिशय साधी किंबहुना दरिद्री असे, हें सुरतेच्या पहिल्या लुटींत इंग्रजांनीं पाहिलें होतें. त्यांच्या माहितीप्रमाणें शिवाजीपाशीं त्या वेळीं तंबूसुद्धां नसून तो दोन प्रहरीं उन्हाचा एका झाडावर पासोडी टाकून तिच्याखालीं राहत असे. मार्टिनलाहि शिवाजीच्या छावणीचा थाट यासारखाच दिसला. तो म्हणतो, "शिवाजी-बरोबर स्वारीमध्यें केव्हांहि बायका-मुलें, पेटया, पेटारे असा कोणताहि प्रकारचा बादशाही बडेजाव नसे. जाडजूड व साधे असे दोनच तंबू असत. पैकीं लहान तंबू स्वतःकरितां व मोठा त्याच्या इतर सरदारांकरितां असे. शिवाजीच्या शिलेदारांना दर महिना २ होनांप्रमाणें मुशाहिरा मिळे. स्वारींतील सर्व घोडे त्याच्या मालकीचे होते व त्याकरितां त्यानें कांहीं मोतद्दारहि ठेवले होते. हालचाली जलद करतां याव्या यासाठीं प्रत्येक दोन इसमांमागें तीन घोडीं दिलीं जात. स्वारीवर असतां खरी व उपयुक्त माहिती देणाऱ्या हेरांना तो सढळ हातानें देणग्या देत असे."

कर्नाटकांतून परत येण्यास तो सप्टेंबर १६७७ मध्यें निघाला. वाटेंत त्यानें कोलार, उस्कोटा, बेंगळूर, बाळापूर, शिरें हीं शहाजीच्या जहागिरींतील गांवें सहज घेतलीं. ३१ ऑक्टोबर १६७७ रोजीं त्यानें श्रीरंगपट्टण लुटलें आणि धारवाड जिल्ह्यांतून तो पन्हाळ्यास पोंचला. त्यानें घेतलेला व्यंकोजीचा मुलूख त्याचा त्यास मागाहून परत दिला.

शिवाजी कर्नाटकाच्या स्वारीवर होता तेव्हां त्याच्यामागें प्रथम-पासून इंग्रजांनीं आपल्या हेरांचें झेंगट लावून दिलें होतें. त्याचा निर्देश येथें करणें जरूर आहे. जिंजीच्या बाजूस इंग्रजांच्या ठिकठिकाणीं वखारी

असून फोर्ट सेंट जॉर्जमधील त्यांची वखार प्रमुख होती व तेथेंच त्यांचे मुख्य अधिकारी राहत असत. फोर्ट सेंट जॉर्ज हा किल्ला तिकडील नायकाच्या परवानगीनें इंग्रजांनीं सन १६४० त बांधला. त्याशेजारींच मद्रासपट्टण हें नगर होतें. त्याचाहि ताबा इंग्रजांस मिळाला व तेव्हांपासून तें नुसतें मद्रास या नांवानें प्रसिद्ध झालें. तथापि कागदोपत्रीं मद्रास हा नामोच्चार न करतां कित्येक वर्षेंपर्यंत फोर्ट सेंट जॉर्ज या पत्त्यानेंच इंग्रज लोक पत्रव्यवहार करीत. शिवाजीची कीर्ति मद्रासच्या इंग्रजांना ऐकून माहीतच होती. म्हणून त्याच्या हालचाली आपणांस आगाऊ कळाव्या यासाठीं त्यांनीं शिवाजीच्या स्वारीबरोबर आपले दोन ब्राह्मण वकील मदनांत पंतलु व पोट्टेला लिंगाप्पा यांना ठेवलें होतें. परंतु हें हेरांचें झेंगट शिवाजीला नकोसें होतें. तथापि इंग्रजांना दुखविण्याचीहि इच्छा त्याला नव्हती. कारण त्याला इंग्रजांपासून बरींचशीं कामें करून घ्यावयाचीं होतीं. त्यांजकडून तो औषधेंहि मागवीत असे. जहरी मोहरें या नांवाचें औषध विषावर उतारा असल्यामुळें तें तो त्यांजपासून आणवीत असे. परंतु इंग्रजांचे हेर आपल्या छावणींत असूं देणें म्हणजे आपल्या गुप्त बेतांची परिस्फुटता करूं देणें असल्यामुळें, शिवाजीनें मादण्णा पंतलूकरवीं त्यांस दोन-तीन महिन्यांच्या आंत छावणींतून घालवून दिलें. त्याविरुद्ध मद्रासचा गव्हर्नर लँघार्न यानें गोवळकोंड्याचा राजा व मादण्णा यांना २२ सप्टेंबर १६७७ रोजीं पुढील पत्र पाठविलें —

"आपलें फर्मान व तश्रीफ पावलीं. तीं सन्मानपूर्वक स्वीकारलीं. शिवाजीच्या मुलुखांत पश्चिम किनाऱ्यावर आमच्या वखारी आहेत. तेथील अनुभवावरून शिवाजी या प्रांतांत आल्यापासून त्याची आम्हांला भीति वाटते. म्हणून त्याच्या हालचालींवर नजर राखण्याकरितां आमचे ब्राह्मण आम्हीं पाठविले. त्यांना आपला सेवक मादण्णा पंतलू यानें वाईट रीतीनें वागवून कैद करण्याची धमकी दिल्यामुळें उगाच वाद वाढूं नये म्हणून ते परत आले. त्यामुळें नजर ठेवणें अशक्य होऊन आमची मालमत्ता धोक्यांत पडली आहे. तरी आपल्या सेवकांना जरूर ते हुकूम द्यावे. आमचे करार व आमची शांतवृत्ति लक्षांत घेऊन आम्हांला न्यायानें वागवावें, अशी विनंती आहे" (प. सा. सं. खंड २, पृ. ५९१).

शिवाजी महाराष्ट्रांत निघून आल्यावर त्याच्या पश्चात् त्यानें नेमलेले मुत्सद्दी व सेनापति शिवाजीची नियोजित कामगिरी पुरी करीत होते व मुलुखाचा कारभार पाहत होते. या सर्वांत रघुनाथपंत हा मुख्य असून तो जिंजीस राहत होता व एव्हांपासून जिंजी हीच शिवाजीची कर्नाटकांतील राजधानी झाली. गोपाळपंत तेगेनापट्टणास राहून तेथील किल्ला बांधून घेण्याच्या कामांत गुंतला होता. तो मुत्सद्दीपणाबरोबरच युद्धकर्मांतहि हुशार असल्यामुळें त्याच्या हाताखालीं बरेंच सैन्य होतें. हंबीरराव व संतोजी मुलूखगिरीवर असून नवीन प्रदेश जिंकीत होते. वेलोरचा किल्ला जिंकण्याचें काम बरेच महिने रेंगाळत पडलें होतें. जून १६७७ मध्यें त्या किल्ल्यास शिवाजीनें वेढा दिला. तो कमी-अधिक प्रमाणांत ऑगस्ट १६७८ पर्यंत म्हणजे १४ महिने चालू होता. त्याजवर वरील सेनापतींनीं आपलें सारें बळ अखेर एकवटून उपासमारीनें आंतील लोकांस रंजीस आणलें. शेवटीं तर किल्ल्यांत सांसर्गिक रोगाची सांथ फैलावली. तेव्हां किल्लेदार शरण येऊन त्यानें किल्ला शिवसेनेच्या स्वाधीन केला व तो १०० शिबंदी व ३० स्वार यांनिशीं बाहेर पडला.

शिवाजीनें कर्नाटकांत जें कारभारी मंडळ नेमलें होतें तें फार जुलमी आहे, प्रजेवर जबर कर बसवून पैसा उकळतें, त्यास कंटाळून प्रजाजन शिवाजीच्या राज्यांतून निघून शेजारच्या संस्थानांत जाऊन राहतात व आम्हांपाशींहि पैसा मागतात अशा तक्रारी फ्रेंचांनीं आपल्या पत्रांतून केल्या आहेत. त्याविषयीं त्यांनीं पुढीलप्रमाणें लिहिलें आहे: "पांदेचरीपाशीं एका खेड्यांत पंडाराम (Pandaram) नांवाचा साधु राहत होता. त्याला हिंदु व मुसलमान राजांनीं गांवें इनाम दिलीं होतीं. त्यांच्या उत्पन्नांतून तो सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांना अन्नदान करीत असे. यात्रेहून जाणाऱ्या-येणाऱ्यांना सहस्र संख्येपर्यंत जरी ते असले तरी त्यांना तो भोजन घाली. त्याजवरहि शिवाजीच्या कारभाऱ्यांनीं कर बसविण्यास कमी केलें नाहीं." ही हकीकत मार्टिननें देतांना शिवसेना कर्नाटकांत मोठी असल्यामुळें तिचा खर्च भागविण्यास कारभाऱ्यांना याशिवाय गत्यंतर नसे हेंहि कबूल केलें आहे. ('Foreign Biographies of Shivaji.' By Sen).

प्रकरण एकविसावें

दक्षिणी पक्षाची वाताहत

(इ. स. १६७७–१६८०)

अञ्जलिः शपथः सान्त्वं शिरसा पादवन्दनम् ।
आशाकरणमित्येवं कर्तव्यं भूतिमिच्छता ॥

— कणिकनीति

शिवाजी, गोवळकोंडा व विजापूर या त्रिवर्गांचा मिळून दक्षिणी पक्ष स्थापन होऊन त्याचें पुढारीपण शिवाजीनें आपणांकडे घेतलें होतें व त्याचा उद्देश मोगलांची सत्ता दक्षिणेंतून उखडून टाकण्याचा होता. ही एक प्रकारें आवळयांची मोटच असून त्यांस एकत्र ठेवण्याचें सामर्थ्य एकट्या शिवाजींतच होतें. पण कर्नाटकाच्या स्वारींत शिवाजीनें कुतुबशहाशीं केलेला करार मोडल्यामुळें त्या पक्षास सुरुंगच लावल्यासारखा झाला. त्या काळांतील एकंदर राजकारण संधिसाधूपणाचें, भोंदूपणाचें, मायावी व घातकी होतें. वरील श्लोकांत म्हटल्याप्रमाणें हात जोडणें, आणा-शपथा घेणें, एकमेकांच्या गळयांत गळे घालणें, मैत्री करणें, इतकेंच काय, पण पायाहि पडणें यास वेळ लागत नसे आणि हें सर्व गंभीरपणानें घडवून आणल्यानंतर त्याजवर बोळा फिरवून एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्यास कंबर कसणें याचीहि दिक्कत वाटत नसे. भोंवतालचे मुसलमान राज्यकर्ते या राजनीतींत पटाईत असल्यामुळें शिवाजी त्यांजवर विश्वासून न राहतां संधि येईल तेव्हां आपला उत्कर्ष साधण्याकरितां जें योग्य वाटेल तें करण्यास तयार असे. कर्नाटकांत गेल्यावर शिवाजी व कुतुबशहा यांजमध्यें जी फूट पडली त्यास हें धोरणच कारण झालें. ते दोघे एकमेकांपासून फुटले व त्यानंतर विजापूरकर व गोवळकोंड्याचा कुतुबशहा हेच काय ते शेवटीं एकत्र उरले म्हणावयाचें. शिवाजी व विजापूरकर यांची जुगल शिवाजी कर्नाटकांत होता तोंपर्यंत फुटली नव्हती. पण नोव्हेंबर १६७७ त तो कर्नाटकांतून रायगडास परत आल्यावर त्यानें एक महिन्याच्या आंत

विजापूरकरांच्या मुलुखावर स्वाऱ्या सुरू करून विजापूरकरांशींहि शत्रुत्व संपादिलें. मोगलांचा विचार केल्यास बहादुरखानास औरंगजेबानें ऑगस्ट १६७७ मध्यें दिल्लीस बोलावून नेलें व मक्केस पाठविलें; आणि दिलीरखान दक्षिणेची स्थिति औरंगजेबास सांगण्याकरितां व मोहिमेचा नवीन आराखडा तयार करण्याकरितां फेब्रुवारी सन १६७८ मध्यें दिल्लीस परत गेला. त्यामुळें शिवाजी, कुतुबशहा व आदिलशहा यांजवरील दडपण कांहीं काल नाहींसें झाल्यानें दक्षिणी पक्षाची आवश्यकताहि तात्पुरती भासली नाहीं. शिवाजीनें दक्षिणी पक्षाची जूट कायम ठेवली असती तर दक्षिणेंतून मोगल सत्ता उखडून टाकण्यास ही फार नामी संधि होती. सध्यां दक्षिणी व पठाण किंवा परदेशी ही फूट एकट्या आदिलशाहींत असून त्या बजबजपुरीनें ती सत्ता अतिशय दुर्बळ झाली होती. ही दुर्बलावस्था लक्षांत घेऊन शिवाजीनें प्रथम तिजवरच घाव घातला.

दैवाचा उलटा फासा

या वेळीं शिवाजीनें चौथाई वसूल करण्याचा धडाका चालविला. एक चौथाई तरी द्या, नाहींपेक्षां लुटीस तयार व्हा, असा त्याचा परराज्यांतील लोकांना सवाल होता. त्यानें दत्ताजीपंत वाकनिसास उत्तर कर्नाटकांत याच कामासाठीं डिसेंबर १६७७ त हुबळी, कारवार या बाजूस पाठविलें. तो २१ जानेवारी १६७८ पर्यंत हुबळीच्या आसपास लुटालूट करीत फिरत होता. त्याच्या या उपद्रवास भिऊन आदिलशहाचा हुबळींतील सुभेदार अंतू पंडित यानें हुबळी सुभ्याबद्दल शिवाजीस चौथाई देण्याचा तह केला. शिवाजीनें हुबळीकडे असा उपद्रव दिल्यावर विजापूरचा दक्षिणी पक्ष व शिवाजी यांचें साहजिकच वैर उत्पन्न होऊन दक्षिणी पक्षाचा एक पुढारी सर्जाखान यानें विजापुरास २५।३० हजार स्वार जून १६७८ त जमा करून अथणी व रायबाग येथें येऊन तेथून शिवाजीच्या अधिकाऱ्यांना हाकून दिलें व आपलें सैन्य तेथें ठेवलें. याच वेळीं शिवाजीचें सैन्य मुळगुंद, लक्ष्मेश्वर, गदग इत्यादि पेठा लुटीत हिंडत होतें. सर्जाखानाच्या मदतीस जमशीरखान ऑगस्ट महिन्यांत निघाला. त्याजपाशीं ३ हजार स्वार असून वाटेनें दररोज सैन्याची नवीन भरती करीत तो बंकापुराच्या रोखानें शिवाजीशीं युद्ध करण्याकरितां आला. पण त्यापूर्वीच दत्ताजीपंत कर्नाटकांतून पसार

झाला होता. कर्नाटकांत चौथाई वसूल करण्याचा धुमधडाका चालू असतां शिवसैन्याची दुसरी तुकडी मोगलाईत औरंगाबादेपर्यंत चौथाई वसूल करून परत सुरतेजवळ येऊन पोंचली. सन १६७८ सालांतील अशा धामधुमीची वार्ता दिल्लीस पोंचल्यावर दिलीरखान व त्यामागून शहाजादा मोअज्झीम (१८ सप्टेंबर १६७८) दक्षिणेंत प्रविष्ट झाले.

दिलीरखानानें पुढें येऊन निराळेंच कारस्थान रचलें. शिवाजीच्या शिस्तींत संभाजी राहणारा नव्हता. त्याच्या या वृत्तीचा फायदा घेऊन दिलीरखानानें त्यास मोगलाईत मनसब देण्याचें मधाचें बोट लावलेलें दिसतें. त्यास भुलून संभाजी शिवाजीस सोडून दिलीरखानास जाऊन मिळाला (१३ डिसेंबर १६७८). हा एक विचित्र प्रसंग शिवाजीवर गुदरला. जी मोगली सत्ता बुडविण्याची शिवाजीनें प्रतिज्ञा केली, त्याच सत्तेच्या बाजूनें उभें राहून संभाजीनें शिवाजीशीं लढण्यास प्रवृत्त व्हावें, यासारखा दैवाचा फासा उलटा पडावयाचा तो काय राहिला ? संभाजी मोगलांस मिळूं नये तो मिळाला आणि शिवाय तो मुसलमान होणार अशीहि वार्ता सर्वत्र पसरली. ती ऐकून शिवाजीच्या मनाची स्थिति काय झाली असेल याची कल्पनाच करणें कठीण आहे. सरकार म्हणतात, "संभाजी दिलीरखानाकडे ता. १३ डिसेंबर १६७८ त येसूबाईसह पळाला. त्यापूर्वी विवाहित ब्राह्मण स्त्रीवर त्यानें अत्याचार केल्यामुळें शिवाजीनें त्याला पन्हाळ्यावर (अटकेंत ?) ठेवलें होतें. शिवाजीनें त्याला धरून आणण्यास सैन्य पाठविलें, पण तें फार उशिरां निघाल्यामुळें शिवाजीचा तो प्रयत्न फसला. संभाजीनें दिलीरखानास आगाऊ पत्र पाठविलें होतें. त्या वेळीं दिलीरखानाची छावणी बहादुरगडास होती. तें पत्र पोंचतांच दिलीरखानानें इखलासखान व घैरतखान यांजबरोबर चार हजार सैन्य देऊन संभाजीस आणावयास पाठविलें. ते त्यास सुप्याच्या दक्षिणेस ८ मैलांवर भेटले व तेथून बारा मैलांवर करकंब येथें त्यांनीं त्यास दिलीरखानाच्या हवालीं केलें. संभाजी ताब्यांत येतांच खानाचा आनंद गगनांत मावेनासा झाला. 'त्याला वाटलें कीं, आतां आपण दक्षिणच हस्तगत केली.' त्यानें आनंदाच्या भरांत नगारे वाजविले व ही आनंददायक वार्ता बादशहास कळविली. संभाजीस त्यानें सप्तहजारी मनसब व 'राजा' हा किताब दिला व एक हत्ती

बक्षीस दिला. खान संभाजीस घेऊन बहादुरगडाच्या दक्षिणेस ५० मैलांवर अकलूज येथें थांबला व तेथें राहून त्यानें विजापुरावरील स्वारीची तयारी केली" (सरकार, पृ. ३०३).

"दिलीरखान विजापुरावर चालून येणार अशी भीति मसाउदाला वाटल्यावरून त्यानें शिवाजीची मदत मागितली. शिवाजीनें विजापुराच्या रक्षणार्थ ६।७ हजार घोडदळ पाठविलें. मसाउदास मराठ्यांचा विश्वास न वाटून त्यानें त्यांस विजापुराजवळ येऊं न देतां विजापुरापासून पांच मैलांवर वायव्येस इटगीहाळ या खेड्याजवळील ओढ्यावर थांबावयास सांगितलें, पण त्यांनीं पुढें येऊन खानापुरा व खुश्रूपुरा येथें तळ दिला आणि विजापूरच्या दरवाजांपैकीं एक दरवाजा व एक बुरूज आपल्या स्वाधीन करण्याची मागणी केली. पण सिद्दी मसाऊद यानें ती नाकारली. म्हणून जोहारपुऱ्याकडे जाऊन त्यांनीं तटाबाहेरील मैदानावर तळ दिला व त्या योगानें मसाऊदचा संशय अधिकच दुणावला. मराठे हत्यारें धान्याच्या पोत्यांत घालून तीं पोतीं बैलांवर लादून व सैनिकांना बैलांबरोबर देऊन किल्ल्यांत घुसडीत आहेत, असें त्यास आढळून आलें. यानंतर शिवाजीनें हें सोंग टाकून देऊन आदिलशाही मुलूख लुटण्यास व उजाड करण्यासच सुरुवात केली. त्याच्या सैनिकांनीं विजापुराच्या उपनगरांतील दौलतपुरा (खवासपुरा), खुश्रूपुरा व जोहारपुरा लुटून श्रीमंत वाण्यांना खंडणीकरितां पकडून नेलें. शेख अहमद खवासखानी याच्या कबरीजवळ त्यांनीं अली रेझा यास वधिलें व सिद्दी याकूत यास घायाळलें. तेथून ते इब्राहिम आदिलशहाच्या कबरीपाशीं गेले असतां, मराठ्यांचा एक सेनापति किल्ल्यावरील तोफगोळा लागून मेला व त्याचे लोक पळून गेले. या स्थितींत मसाऊदला दिलीरखानाशीं तह करून संकट टाळणेंच श्रेयस्कर वाटलें.

"त्यानें विजापुरास मोगल सैन्यास बोलावून त्याचा सत्कार केला व त्याजबरोबर वेंकटाद्रि यास ससैन्य देऊन मराठ्यांवर पाठविलें. ते विजापुराच्या पश्चिमेस तेरा मैलांवर तिकोट्यास पोंचल्यावर शिवाजी स्वतः विजापुराच्या पश्चिमेस ५५ मैलांवर सलगर येथें ७।८ हजार सैन्यानिशीं आल्याची बातमी त्यास लागली. त्याचा विजापुरी सैन्य वा मोगल सैन्य

यांजवर चालून जाण्याचा बेत होता. पण इतक्यांत मसाऊद व सर्जाखान यांत कलह माजून विजापुरी सैन्यास पक्षघात झाला (B. S. 471–477).

भूपाळगडावर हल्ला

"शिवाजीनें मोगलांच्या स्वारींत आपली मालमत्ता व प्रजा यांच्या सुरक्षिततेसाठीं भूपाळगड नांवाचा किल्ला जतेच्या वायव्येस २० मैलांवर व सातारा जिल्ह्यांतील खानापुरापासून आग्नेयीस १० मैलांवर बांधला होता. (त्याचें सध्यांचें नांव बाणूर आहे.) त्याजवर दिलीरखानानें हल्ला केला. त्यानें रात्रीं उंच टेकाडावर तोफा चढवून किल्ल्याची तटबंदी व बुरूज यांवर मारा चालविला. हा हल्ला २ एप्रिल १६७९ रोजीं सकाळीं ९ वाजतां सुरू झाला व दोन प्रहरपर्यंत उभय पक्षांची पुष्कळ प्राणहानि होऊन मोगलांनीं किल्ला सर केला. धान्य-सामग्रीहि त्यांस पुष्कळ मिळाली. शिबंदीपैकीं सातशें लोकांचा एक एक हात तोडून त्यांस सोडून देण्यांत आलें. इतर कैदी गुलाम म्हणून विकले.

"यापूर्वीं शिवाजीनें किल्ल्याच्या मदतीस १६ सहस्र घोडदळ रवाना केलें होतें; पण तें उशिरां आलें. इतक्यांत त्यास कळलें कीं, इराजखान व बजाजीराव (निंबाळकर) परिंड्याहून मोगलांकरितां रसद घेऊन येत आहेत. त्यांना वाटेंत गांठण्यास शिवसैन्य गेलें. दिलीरखानानें इराजखानाच्या मदतीस इखलासखान यास १२०० घोडदळ देऊन धाडलें. भूपाळगडापासून १२ मैलांवर त्यानें मराठ्यांना गांठलें. इखलासखानाच्या या लहान फौजेस मराठ्यांनीं चोहोंकडून घेरल्यावर खान एका खेड्यांत गांवकुसवाच्या आश्रयास गेला व तेथून त्यानें मराठ्यांवर तोफांची मारगिरी करून व त्यांचे एक सहस्र लोक मारून त्यांचा धुव्वा उडविला. इतक्यांत इखलासखानाच्या मदतीस दिलीरखानाकडून आणखी फौज येताच मराठे पसार झाले. मग दिलीरखानानें परत भूपाळगडास जाऊन तो लुटला, त्याचा तट पाडला व आपण धूळखेड येथें गेला (B. S. 477–478; Dat. 160). येथून मराठे जे निसटले ते करकंबपाशीं आले. तेथें इराजखानावर छापा घालून व त्याचें धान्य व सर्व सामग्री घेऊन त्यांनीं त्याला पळावयास लावलें. तो शेवटीं तेथून उत्तरेस ३० मैलांवर परिंड्याच्या किल्लेदारापाशीं आश्रयार्थ गेला.

" भूपाळगडाच्या लढाईनंतर मोगल सुभेदार मुअझ्झम व विजापुरी सरदार, यांच्या परस्परांविरुद्ध मसलती आणि मसाऊद व सरजाखान, मसाऊद व दिलीरखान आणि मसाऊद व त्याचा प्रिय वेंकटाद्रि यांचीं आपसांत भांडणें सुरू झालीं " (सरकार).

अशा स्थितींत दिलीरखानानें ता. १८ ऑगस्ट १६७९ रोजीं विजापूरकरांविरुद्ध नवी मोहीम सुरू केली. तो भिवरा ओलांडून विजापुरापासून ८–९ मैलांवर येऊन थडकला. शिवाजीहि विजापुराजवळच पश्चिमेस निम्म्या अंतरावर होता. त्याजबरोबर १०–१२ हजार स्वार होते. त्याजपाशीं आदिलशहानें मदत मागून त्यास दरसाल दोन हजार होनांचें उत्पन्न मंजूर केलें. कोर्वरवेंकट्टी (वेंकटाद्रि) नांवाचा एक प्रधान, विजापूरची सल्तनत मोगलांस मिळावी यासाठीं खटपट करतांना आढळल्यावरून, आदिलशहानें त्याचा शिरच्छेद केला व त्याची सर्व संपत्ति सैनिकांत वांटून दिल्यामुळें त्यांचा उत्साह वाढला " (प. सा. सं. खंड २, पृ. ६५८).

विचित्र मागणी

कुतुबशहामागेंहि दिलीरखानानें जबरदस्त खंडणीचा तगादा लावला. त्याजकडे मोगलांनीं अशी विचित्र मागणी केली, " गोवळकोंड्याकडून येणें राहिलेल्या खंडणीबद्दल सोन्याचीं चाळीस मोठीं पिपें, शहाजादा मुअझ्झम याजकरितां गोवळकोंड्याची राजकन्या आणि हिरेजडित सलकडीं-जोड मोगलांच्या वकिलानें येऊन मागितला. त्याला सुलतानानें रोखठोक उत्तर दिलें, ' आम्हांपाशीं इतकें द्रव्य नाहीं. राजकन्येचा एका वराशीं आधींच वाङ्निश्चय झाला आहे. आणि सलकड्यांवर हिऱ्याऐवजीं स्फटिकांचीच योजना होऊं शकेल. ' आणखीहि चोवीस पिपांची मागणी दिलीरखानानें आपल्या सैन्याच्या तनख्याकरितां केली आहे. आणि ती न पुरविल्यास तो गोवळकोंड्यावर स्वारी करणार अशी बातमी आहे. शिवाजी मदतीस आला नाहीं तर ही गोष्ट करण्यास खान चुकणार नाहीं, असें लोक समजतात " (प. सा. सं. खंड २, पृ. ६४६).

अशा रीतीनें आदिलशहाप्रमाणें कुतुबशहाहि शिवाजीच्या मदतीवर अवलंबून होता. शिवाजी ठरल्याप्रमाणें आदिलशहाच्या मदतीसाठीं विजापुराकडे नोव्हेंबर महिन्यांत गेला. त्यासंबंधीं इंग्रजांनीं एक पत्र मुंबईहून

सुरतेस ता. २९ नोव्हेंबर १६७९ रोजीं लिहिलें, 'शिवाजी मुंबईपासून पांच दिवसांच्या मुक्कामावर पट्टा किल्ल्यांत आहे. (अहमदनगर जिल्ह्यांत संगमनेराजवळ) दिलेलखानानें विजापुरास त्याचा पुरता मोड करून त्याचे दोन हजार घोडे व कित्येक लोक पकडल्यामुळें आपलें बहुतेक सैन्य त्या बाजूला ठेवून फक्त पांचशें स्वारांनिशीं आत्मरक्षणार्थ तो इकडे पळून आला आहे. मोरोपंत पेशवा त्यास भेटण्यास गेला आहे. अण्णाजी पंडित तिकडेच जाईल असें वाटतें. मोरोपंत सुरतेकडे येणार होता. पण रणमस्तखान पठाणानें त्याचे दोन हजार लोक मारले व चारशें घोडे पकडले; म्हणून त्यानें तो रोख सोडून दिला" (प. सा. सं. खंड २, पृ. ६५९).

शिवाजी विजापुराहून नगर जिल्ह्याकडे वळला, याचा हेतु मोगल सैन्याविरुद्ध उत्तरेस दुसरी आघाडी उभी करून त्यांना उत्तरेकडे खेचण्याचा होता. म्हणून त्यानें डिसेंबर १६७९ मध्यें खानदेशांत जाऊन धरणगांव व चोपडें हीं गांवें लुटलीं. त्याच्या सैन्यांत बारा हजार स्वार होते. धरणगांवास दोन दिवस राहून व जाळपोळ करून त्याचें सैन्य वऱ्हाडांत मलकापुरास जाऊन त्याला मिळालें. मलकापुराहून तो औरंगाबादेवर घसरला. तें शहर त्यानें लुटलें व जाळलें अशी ताजी बातमी आहे. तेथून तो जालन्यावर गेला (प. सा. सं. खं. २, पृ. ६६४)

शिवाजीचा गनिमी कावा

खुद्द शिवाजीनें व्यंकोजीस एक महत्त्वाचें पत्र लिहिलें आहे, तें इंग्रजांच्या पत्रापेक्षां केव्हांहि अधिक विश्वसनीय होय. शिवाजीच्या या पत्रांत अनेक विषय असून त्यांपैकीं एका विषयाचा व्यंकोजीशीं संबंध असल्यामुळेंच त्यानें हें पत्र त्यास लिहिलें आहे. त्यांतील महत्त्वाचा आशय असा — "दिलेलखान विजापूरची पातशाही कमकुवत देखोन जोरावरी धरून विजापूर घ्यावें या मतलबें विजापुरावर चाल करून आला. तो भीमा नदी उतरून शहरानजीक येऊन भिडला. हें वर्तमान खान अलीशान मसाऊदखान यांनीं आम्हांस लिहिलें. त्यांनीं लिहिलें कीं, गनीमें जोरावरी बहुत धरली आहे, तरी येऊन मदत करणें. त्यावरून आम्ही तेच क्षणीं स्वार होऊन मजल दर मजल पन्हाळ्यास आलों. सारी कुल जमेती जमा करून खासा लष्करानिशीं विजापुरासन्निध गेलों. विचारें पाहतां गनिम कट्टा,

त्याहिमध्यें पठाण जात हट्टी, याशीं हुन्नरेंकरून खजील होऊन नामोहरम होय तोच हुन्नर करावा. म्हणून ऐशी तजवीज केली कीं, त्याचे मुलुखांत फौजेचा पैसावा करून त्यास ओढ लावावी. त्यावरून दिलेलखानास तीन गांवांचें अंतर सोडून भीमा नदी उतरून तहत जालनापूरपावेतों मुलूख ताख्त ताराज करीत चाललों.

" जालनापुरास जाऊन चार दिवस राहून पेठ मारली. बहुत मालमत्ता हातीं लागली. शाहाजादा मोअज्जम चार गांवें अंतरावर औरंगाबादेस होता. त्याचा हिसाब न धरितां (जालनापूर) पेठ लुटली. सोनें, रुपें, हत्ती, घोडे यांखेरीज मत्ता बहुत सापडली. ती घेऊन पट्टा गडाकडे येत असतां वाटेंत रणमस्तखान, आसफखान, जाबीतखान व इत्तर पांच सात उमराव आठ दहा हजार स्वारांनिशीं आम्हांवर आले. त्यांस शाहाबाजीच्या हुन्नरें जशी तंबी देतां येईल तशी देऊन घोडे व हत्ती पाडाव करून पट्टा गडावर आलों. तेथें आल्यावर आम्हीं आपलें लष्कर मोगलाईंत धुंदी करावयास पाठविलें. राजश्री मोरोपंत प्रधान यास बागलाण व खानदेश प्रांतीं २७ किल्ले मोगलांचे आहेत ते व मुलूख कबज करावयास पाठविलें. त्यानंतर खान अलीशान मसाऊदखान याची कितावती (पत्र) आली कीं, तुम्ही गनिमाचे मुलुखांत स्वारी करून मुलूख खराब केला व त्यास ओढा लावला. परंतु गनीम इतका जबरदस्त आहे कीं, तो या जागचा (विजापूर) उखळत नाहीं. बहुतच बळ धरून कोटानजीक भिडला आहे. तरी या समयीं तुम्ही येऊन व आम्हांस मदत करून पातशाही राखिली पाहिजे. त्यावरून मागती स्वार होऊन मजली दर मजली पनाळियास आलों. विजापुरास द्रव्य व सेना पाठवून प्रथम सहाय्य केलें व मागाहूनहि आणखी मुबलग द्रव्य पाठविलें. शिवाय मोगलांच्या मुलुखांत माझी इतर फौज पसरली होती तिलाहि बोलावून आणून दिलेलखानावर पाठविली. तिनें जाऊन कही क़बाड मारून कूल सामान बात धरून गनिमास रोखून धरला. त्याचे मदतीस औरंगाबादेहून रणमस्तखान, अलीखान व इतर उमराव ७।८ हजार स्वारांनिशी येत होते. त्यांस आमच्या सैन्यानें मारीत गर्दीस मेळवीत पिटीत औरंगाबादेपावेतों नेलें. कित्येक शहरें लुटीत व देश खराब करीत आमचें सैन्य परत विजापुरास येऊन गनिमास घेरून बसलें.

दिलीरखानास ओढ

" मोरोपंतास बागलाण व खानदेश या प्रांतीं पाठविलें होतें. त्यांनीं अहिवंत किल्ला घेतला. अहिवंत म्हणजे जैसा कांहीं पन्हाळा. त्याजबरोबरी समतुल्य आहे. दुसरा नाहवागड हा बागलाणांत आहे. तोहि कठीण पण तोहि घेतला. त्या किल्ल्यावर बहुत मालमत्ता सापडली. त्याजवर फौज होती, ती मुलुखांत पाठवून बहुत धामधूम केली. हें वर्तमान व पूर्वीचें वर्तमान पादशहास (औरंगजेबास) कळून बाकी बाहाल जाला. पातशहा बहुत खजिल झाला. त्याच्या दिलेलखानास ताकिदीवर ताकिदी येऊं लागल्या. या रीतीनें मुलूख खराब करून व गडकोट कबज करून आम्हीं दिलेलखानास ओढा लावला. आणि त्याचा लवाजमा धरून व वारंवार कही कबाड मारून त्यास जेर केला. त्यावरून दिलेलखानाची खात्री झाली कीं, दक्षिणेंतील मोगली राज्य टिकत नाहीं म्हणून तो विजापूर सोडून दिवसास कोस दोन कोस मजली मारून हटत चालला; ऐसा जेर जेर करून, खट्टा करून उखळला. खान अलीशहानेंहि बहुतच शर्त केली व विजापूरचा कोट राखला.

" आम्ही या प्रकारें विजापुरास द्रव्यानें व सेनेनें सहाय्य करून विजापुरावरील अरिष्ट दूर केलें व विजापूर रक्षिलें. यानंतर अलीशान मसाऊदखान याजबरोबर आमचा तह झाला. त्या करारामध्यें होसकोट, बंगलूर, अरणी व चंदावर आदि करून तुमचे निसबती आपणांसीच लावून घेतली. पेशकसी, तोफा (नजराणा ?) तुम्हीं निराळा घ्यावा. सतत निसबती तुम्हांस लागावी ऐसें केलें नाहीं. आवघें आम्हींच केलें. तोफा आम्हींच तुम्हां देखील घ्यावा ऐसा तह ते प्रसंगीं करून करारबाब करून सला केला (नोव्हेंबर १६७९).

" विजापुराहून दिलेलखान आदवानी कारबळ प्रांताकडे गेला होता. आमचीहि सेना त्याच्या पाठीवर गेली. आम्ही विजापुरास जात आहों. कारबळ प्रांताकडे राजश्री जनार्दनपंत ठेवले. त्यांनीं तिकडे फिसालती करणाऱ्या पुंडपाळेगारांना मारून काढले. हुसेनखानाचा भाऊ कासीमखान दोन-तीन हजार स्वारांनिशीं आला होता. त्यास व त्याचे कबिला व हुसेनखानाचे

दोन लेक दस्त केले. पांच हत्ती व पांचशें घोडे पाडाव केले. खेरीज पुंड-पाळेगारांचा मुलूख, गड व कोट कबज करून ठाणीं बसविलीं व फत्ते केली.

"या उपरी दिलेलखान, सर्जाखान व हुसेनखान येतो हें कळल्यावर जनार्दनपंतहि ५।६ हजार स्वारांनिशीं गनिमावर गेले व त्यांचा पाठलाग करून जिकडे गनीम गेला तिकडे त्यास मारून काढला. गनीम सांप्रत भीमानदी उतरून पेडगांवास आपले मुलुखांत गेला. गनिमास असा खट्टा केला आहे कीं, पुनः त्यानें विजापुराची वाट न धरावी.

"चिरंजीव राजश्री संभाजी राजे मोगलाईत गेले होते. त्यांस परत आणावयास उपाय बहुत केले. त्यांसहि कळून आलें कीं, दिल्लीच्या पातशाहींत, अगर विजापूरचे अगर भागानगरचे पातशाहींत आपल्या मनोगतानुरूप चालणार नाहीं. ऐसें जाणोन आमच्या लिहिण्यावरून स्वार होऊन आले. त्यांची आमची भेट जाली. घरोब्याचे रीतीनें जैसें समाधान करूं ये तैसें केलें" (प. सा. सं. खंड २, पृ. ६८३-८४).

दिलीरखान व आदिलशहा यांच्या युद्धांत शिवाजीनें जो भाग घेतला त्यासंबंधीं इंग्रजांनीं लिहिलेली माहिती कांहींशी उडत, विस्कळित व अगदीं त्रोटक आहे. त्यापेक्षां शिवाजीच्या पत्रांतील माहिती सुसंगत, तपशीलवार व खात्री पटविणारी आहे. शिवाजी मसाऊदच्या बोलावण्यावरून विजापुरास गेला; तो मोगलांशीं तेथें मुळीं लढलाच नाहीं. त्यानें दिलीरखानाचें मनुष्यबळ व जंगी तयारी पाहून विजापुराचा वेढा उठविण्यास मोगलांशीं तेथेंच लढणें व्यर्थ व मनुष्यहानि विनाकारण फार करणारें आहे हें तावडतोब ओळखून तो जालना-औरंगाबाद या मोगलाई मुलुखांत लूटमार करण्यास निघाला आणि शहाजादा मुअज्जम औरंगाबादेस असतां त्याच्या नाकावर टिचून त्याच्या लष्करांतून हत्ती, घोडे व इतर मूल्यवान् जिन्नस लुटून नेण्यास त्यानें कमी केलें नाहीं. हें तर त्याचें अतुल धाडस होय. त्यानंतर वाटेंत रणमस्तखानाची मस्ती जिरवून पुढील योजना आपल्या मंत्र्यांच्या सल्ल्यानें निश्चित करण्याकरितां तो पट्टा गडावर जाऊन राहिला. शिवाजी पक्का युद्धविशारद व एका दगडानें दोनच काय, पण त्यांहूनहि अधिक पक्षी मारणारा होता. त्याची ही मोहीम म्हणजे गनिमी काव्याच्या युद्धपद्धतींतील

एक अजब चमत्कार होता. ही मोहीम नोव्हेंबर १६७९ ते फेब्रुवारी १६८० पर्यंत म्हणजे सुमारें तीन महिने चालू होती. ह्या तीन महिन्यांच्या अवधींत त्यानें विजापुरापासून वऱ्हाडांत मलकापुरापर्यंत आणि नगर जिल्ह्याच्या पश्चिमेपासून पूर्वेस अदोनी, कडाप्पा, कर्नूलपर्यंत तीन-चारशें मैल लांब व तितकाच रुंद असा विस्तीर्ण प्रदेश आपले सवंगडी मोरोपंत व जनार्दनपंत यांच्या मदतीनें ढवळून काढून बागलाण व खानदेश यांतील बराच टापू त्यांतील किल्ल्यांसुद्धां आपल्या राज्यास जोडला व त्या-शिवाय अदोनीकडील पुंड-पाळेगारांची हड्डी नरम करून तिकडचाहि म्हणजे कर्नाटक व आंध्र यांच्या सीमेवरील मुलूख व गड-कोट घेऊन त्यानें तेथें जनार्दनपंतांकडून आपलीं ठाणीं बसविलीं.

इतके अनेक मतलब साधून शेवटीं त्यानें दिलीरखानास विजापूरचा वेढा उठविण्यास लावण्याचें थोर यश संपादिलें. अवघ्या वीस वर्षांपूर्वी जी आदिलशाही शिवाजीचा जीव घेण्यास टपली होती त्याच आदिल-शाहीनें, वीस वर्षांनंतर शिवाजीकडे जीवदानाची याचना करण्यास यावें व अखेर त्याजबरोबर समान भूमिकेवरून नाक मुठींत धरून तह करण्यास तयार व्हावें, हा शिवाजीचा केवढा नैतिक विजय! शिवाजीच्या आयुष्यां-तील हा शेवटचा व तसाच कळसाचा विजय ठरावयाचा होता. कारण त्यानंतर थोड्याच महिन्यांनीं निर्घृण काळानें त्याजवर झडप घालून हा संग्रामसिंह, हा वीरशिरोमणि, हा स्वतंत्रतादेवीचा कलिजा महाराष्ट्रभूमी-च्या कुशींतून उचलून नेला!

व्यंकोजीचें कल्याण

शिवाजीनें याच मोहिमेंत आपला भाऊ व्यंकोजी याचेंहि कल्याण केलें. त्यासहि आदिलशहापासून स्वातंत्र्य मिळवून देऊन आपल्या राज्यांत घेतलें व जो मुलूख त्यानें स्वतः कर्नाटकाच्या स्वारींत विजापूरकरांपासून जिंकला होता त्याजवरहि आदिलशहाकडून शिक्कामोर्तब करून घेतलें. शिवाजीनें मसाऊदबरोबर तह केला त्याचीं कलमें केळुसकरांनीं पुढील-प्रमाणें दिलीं आहेत : "(१) कोपळ व बल्लारी यासभोंवतालचा मुलूख आमच्या (शिवाजीच्या) स्वाधीन करावा. (२) द्राविड देशांतील जो मुलूख आम्हीं काबीज केला आहे त्यावर आदिलशहानें कांहींहि हक्क सांगू

नये. (३) तंजावर वगैरे जे प्रांत शहाजीच्या जहागिरींत मोडतात त्यांवर आदिलशहानें कोणत्याहि प्रकारचा ताबा सांगू नये, त्यांवर आमचा पूर्ण अंमल चालावा आणि (४) प्रसंगोपात्त एकमेकांनीं एकमेकांस साहाय्य करावें " (पृ. ४८७).

यावरूनहि शिवाजीनें व्यंकोजीस लिहिलेल्या पत्रावर अधिक प्रकाश पडत असून, या तहानंतर व्यंकोजी आदिलशहाचा ताबेदार न राहतां तो शिवाजीचा ताबेदार झाला व त्याचा सर्व राजकीय संबंध शिवाजीशीं जोडला गेला.

जदुनाथ सरकारांनीं, दिलीरखानानें विजापुरास घातलेला वेढा व तो उठविण्याकरितां शिवाजीनें केलेला प्रयत्न यासंबंधीं दुसरी बाजू मांडली आहे, तीहि उद्‌बोधक असल्यामुळें येथें दिली आहे.

" दिलीरखानानें विजापुरापासून उत्तरेस ४० मैलांवर धूळखेड येथें ता. १८ ऑगस्ट १६७९ रोजीं भीमानदी ओलांडली व मसाऊदविरुद्ध मोहीम सुरू केली. त्या वेळीं मसाऊदनें शिवाजीपाशीं मदत मागितली. त्यावरून शिवाजीनें दहा हजार घोडदळ मसाऊदच्या साहाय्यास पाठविलें; तशीच आपल्या ठिकठिकाणच्या किल्ल्यांवरून दोन सहस्र बैलांवर धान्य-सामग्री लादून ती रवाना केली व त्याशिवाय आपल्या प्रजेस विजापुरास जाऊन आपलें धान्य तेथील लोकांना विकण्यास सांगितलें. शिवाजीतर्फे विसाजी नीलकंठ यानें मसाउदास भेटून निरोप कळविला कीं, तूं किल्ला लढीव व मी दिलीरखानास शासन करण्यास जातों. या वेळीं मराठ्यांचें पांच सहस्र सैन्य मिरजेपासून २० मैलांवर ऐनापुरास आलें होतें. खेरीज आणखी पांच सहस्र भूपाळगडास येऊन विजापूरच्या बोलावण्याची वाट पाहत होतें.

" मोगलांचा सेनापति सुजनसिंग यानें शिवाजीपासून सप्टेंबरांत मंगळवेढें घेतलें व तो विजापुराजवळ आला. मसाऊदनें साबाजी घाटगे याची समजूत घातली. त्याला मोगलांच्या तोंडावर सैन्यांसह इंडीस पाठविलें (विजापुरापासून उत्तरेस २८ मैल). त्या वेळीं संभाजी मोगल सेने-करितां कांहीं कबाड गोळा करण्यास आला होता. त्याजबरोबर या फौजेची चकमक उडून तींत दोन्ही बाजूंची १५ माणसें ठार झालीं. साबाजी

जखमी झाला. पण त्यानें संभाजीचे ५० घोडे, ५० बैल व ४ उंट धरले. शिवाजीचा वकील आनंदरावासह अडीच हजार स्वार घेऊन विजापुरास आला. त्यांचें मसाऊदनें स्वागत करून त्यास नवरसपुऱ्यास ठेवलें. बजाजीनें (निंबाळकरानें) मोगलांच्या बाजूनें अकलूजच्या किल्ल्यास वेढा घातला. पण विजापुराचा सेनापति बहादूर यानें सांगोल्याहून त्याजवर जाऊन त्यास पळवून लावलें.

"ता. १५ सप्टेंबर रोजीं दिलीरखान धूळखेडाहून विजापुराजवळ आला व ७ ऑक्टोबर रोजीं विजापुरापासून ६ मैलांवर बरटगी (?) येथें थांबला. तेथें मसाऊदचे वकील त्यास भेटले. ता. ३० ऑक्टोबरास शिवाजी पन्हाळा व विजापूर यांजमधील सलगर गांवीं १० हजार स्वारांनिशीं आला. नवरसपुऱ्याहून त्यांची एक तुकडी त्याच्या स्वागतार्थ आली. शिवाजीच्या मनांत आदिलशहास भेटावयाचें होतें. मसाऊदनें त्यास ५०० माणसांसह येण्याची परवानगी दिली. पण मोरोपंतानें मसाऊदच्या जाळ्यांत सांपडण्यापासून त्यास परावृत्त केलें.

"शिवाजी ता. ४ नोव्हेंबर १६७९ रोजीं आपल्या सैन्याच्या दोन तुकड्या करून ८।९ हजार सैन्यांनिशीं घुसला व आलमाला या रस्त्यानें निघाला व त्यानें आनंदरावास १० हजार सैन्य देऊन मोगलाई मुलुखांत लूट करण्यास व दिलीरखानाचें लक्ष तिकडे वळविण्यास माण देशांतून सांगोल्यावर पाठविलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, दिलीरखानास विजापूरचा वेढा उठवावा लागला. तो ता. १४ नोव्हेंबर १६७९ रोजीं विजापूर सोडून पश्चिमेस निघाला. त्याचा विचार मिरज व पन्हाळा या बाजूस शिवाजीला मोगलाईतून परत आपल्या मुलुखाच्या बचावास ओढण्याचा होता. संभाजीनेंहि त्यास, मी तुम्हांस मिरज, पन्हाळा इत्यादि किल्ले मिळवून देईन, असें मधाचें बोट लावलें होतें. तो बहामनहळ्ळी, मकणापूर व जलगेरी या मार्गानें विजापुरापासून १३ मैलांवरील तिकोट्यास आला. तिकोटें हें श्रीमान् व मोठ्या वस्तीचें गांव असून तेथें भोंवतालच्या गांवांतील धनिक लोक स्वसंरक्षणासाठीं येऊन राहिले होते. मोगल येतील याची कल्पनाहि तिकोट्याच्या रहिवाशांना नव्हती. इखलासखान हा दिलीरखानाचें आघाडीचें सैन्य घेऊन आला व लूट करूं लागला. तेव्हां हिंदु व मुसलमान स्त्रियांनीं

आपलीं मुलें घेऊन विहिरींत जीव दिला. हिंदु व मुसलमान मिळून तीन सहस्र लोकांना गुलाम म्हणून विकण्यासाठीं कैद करण्यांत आलें. ता. १८ नोव्हेंबर रोजीं मोगल तिकोट्याहून होनवाड व तेलसंग या गांवांवरून लूट करीत व लोकांना गुलाम करीत विजापुरापासून पश्चिमेस ४३ मैलांवर अथणीस आले. या ठिकाणीं संभाजी व मोगल यांजमध्यें विरोध आला. अथणीची पेठ मोगलांनीं लुटून सर्व हिंदु रहिवाशांना गुलाम म्हणून विकण्याचें ठरविलें. तेव्हां संभाजीनें मोगलांना विरोध केला. तो त्यांच्या संगतीस विटून पळाला. ता. २१ नोव्हेंबर रोजीं दिलीरखान अथणीहून बारा मैलांवरील ऐनापुरास आला, तेव्हां त्याला संभाजी विजापुराकडे निघून गेल्याचें समजलें.

पुरुषाचें सोंग

" डिसेंबर १६७८ मध्यें संभाजी मोगलांकडे आल्यापासून शिवाजी माणसें पाठवून त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न करीत होता. त्याचा मेहुणा व शिवाजीचा जावई महादाजी निंबाळकर यानें, तो मोगलांचा नोकर असतां, संभाजीची या वर्तनाबद्दल निर्भर्त्सना केली होती. शेवटीं या वेळीं संभाजीनें मोगलांना सोडून जाण्याचा निश्चय केला. ता. २० नोव्हेंबर १६७९ रोजीं रात्रीं आपली पत्नी येसूबाई हिला पुरुषाचें सोंग देऊन संभाजी निसटला. त्याजबरोबर फक्त दहा सैनिक होते. त्यानिशीं तो तडक विजापुरास दुसऱ्या दिवशीं पोंचला. तेथें मसाउदानें त्याचें मनःपूर्वक स्वागत केलें. दिलीर-खानास ही खबर ता. २१ रोजीं कळल्यावर तो विजापुरास ताबडतोब गेला. त्यानें ख्वाजा अब्दुल रजाक यास लांच देऊन मसाऊदकडे संभाजीस ताब्यांत घेण्यास धाडलें. संभाजीस ता. ३० रोजीं असा संशय येतांच तो गुप्तपणें विजापूर सोडून निघाला. शिवाजीनें त्याला आणण्याकरितां सैनिक रवाना केलेच होते. त्यांजबरोबर तो घोड्यावरून टाकोटाक ता. ४ डिसेंबर रोजीं पन्हाळ्यास पोंचला."

संभाजी शिवाजीकडे पन्हाळ्यास परत आल्याचें सांगून, जदुनाथ, शिवाजीनें स्वतः मोगलाईंत शिरून जो धुमाकूळ माजविला तिकडे वळून, लिहितात, " शिवाजी ता. ४ नोव्हेंबर १६७९ रोजीं विजापुराच्या पश्चिमे-कडील ५५ मैलांवरील सलगरहून १० हजार घोडदळानिशीं उत्तरेस त्वरेनें

निघाला. तो व आनंदराव समांतर रेषेवरून मोगलाईंत जाळपोळ व लूट करीत फिरूं लागले. नोव्हेंबरच्या मध्यांत औरंगाबादेपासून ४० मैलांवर असलेलें जालना हें व्यापारी शहर लुटण्यांत आलें. येथील बगीच्यांत सय्यद जान महंमद नामक मुसलमान अवलिया शहराबाहेर राहत होता. शिवाजी आपल्या स्वाऱ्यांत साधुसंतांना व देवस्थानांना त्रास देत नाहीं, या समजुतीनें जालन्यांतील धनिकांनीं त्याच्या तकियांत आपलें जडजवाहीर नेऊन ठेवलें होतें. जालन्यांत शिवाजीला फार थोडी प्राप्ति झाली. त्याला कळलें कीं, अवलियाच्या तकियांत लोकांनीं आपली संपत्ति ठेवली आहे. म्हणून त्याच्या फौजेनें तो तकिया लुटला. अवलियानें तसें न करण्यास विनविलें. पण तें त्यांनीं न ऐकल्यामुळें त्यानें शिवाजीस शाप दिला. त्याच शापानें शिवाजी पुढें पांच महिन्यांनीं मरण पावला असा समज आहे!

"जालन्याची लूट मराठ्यांनीं चार दिवस केली. तेथून मराठे सोनें, चांदी, रत्नें व कापड घेऊन जात असतां वाटेंत रणमस्तखानानें त्यांच्या पिछाडीवर छापा घातला. सिधोजी निंबाळकरानें पांच हजार फौजेनिशीं त्याला तीन दिवस अडवून ठेवलें. पण सिधोजी बऱ्याच लोकांनिशीं मारला गेला. दरम्यान औरंगाबादेहून मोगलांच्या मदतीला बरेंच मोठें सैन्य निघालें होतें. त्याजबरोबर केसरीसिंग व सरदारखान हे सेनापति होते. ते मराठ्यांपासून सहा मैल आल्यावर केसरीसिंगानें शिवाजीस पळून जाण्याचा गुप्त निरोप पाठविला. बहिरजी नाईक या गुप्त हेरावर विश्वास ठेवून, तीन दिवस सारखी दौड मारून शिवाजी शत्रूच्या हातावर तुरी देऊन गेला. पण या झटापटींत शिवाजीचे चार हजार स्वार ठार व हंबीरराव जखमी झाला. शिवाजी पट्टा किल्ल्यावर ता. २२ नोव्हेंबर रोजीं पोंचला व तेथें कांहीं दिवस विश्रांति घेतल्यावर रायगडास गेला (सरकार). यावरून शिवाजीची इंग्रजांनीं सांगितलेली प्राणहानि खरी ठरते.

जदुनाथ यांनीं आपल्या विवेचनांत दक्षिणी पक्ष व त्याच्या हालचाली यांना योग्य तें महत्त्व दिलेलें दिसत नाहीं. परंतु त्या समजल्याशिवाय शिवाजी, मोगल व विजापूरकर यांजमधील युद्धप्रसंगाचा उलगडा व संगति नीट लागणार नसल्यामुळें, त्या अनुसंधानानें कांहीं घटना येथें सांगणें आवश्यक आहे.

मागें सांगितल्याप्रमाणें मुअज्झम व दिलीरखान दक्षिणेंत आल्यावर आदिलशहा व कुतुबशहा यांस आपणांवर त्यांचें आक्रमण होणार असें वाटून भय उत्पन्न झालें व जो तो आपल्या बचावाच्या तजविजीस लागला. या वेळीं दक्षिणी पक्ष सुसंघटित व मजबूत असता तर त्यानें मोगली सैन्याची मात्रा चालू दिली नसती. त्यांत फूट पडल्यामुळें पूर्वीच्या वैरावर पांघरूण घालण्याकरितां कुतुबशहानें शहाजादा याजकडे मोठा नजराणा पाठवून त्याला प्रसन्न राखण्याचा प्रयत्न केला. कुतुबशहा असा नरम आल्यावर आदिलशहासहि वठणीवर आणण्याचा पवित्रा या मोगल सेनापतींनीं टाकला. त्यांनीं मे महिन्यांत संभाजीस बगलेंत मारून पन्हाळा घेण्याच्या उद्देशानें त्यास मे १६७९ त वेढा घातला आणि विजापूरच्या वजिरांना आपणांस मिळण्यास भाग पाडलें (प. सा. सं. खंड २, पृ. ६३४).

सर्जाखान हा दक्षिणी पक्षाचा पुढारी; पण "त्यासच मोगलांनीं फोडून आपल्या मदतीस घेतलें आणि दिलीरखान व संभाजी यांनीं १९ ऑक्टोबर (नोव्हेंबर?) १६७९ च्या सुमारास अथणी लुटली. नंतर त्यांनीं तें शहर जाळून कांहीं लोक कैदहि केले. या शेवटच्या बाबतींत संभाजी व सर्जाखान हे अनुकूल नव्हते. कैदी सोडावे असा त्यांनीं दिलीरखानापाशीं आग्रह धरला. पण दिलीरखानानें आपला हट्ट सोडला नाहीं. म्हणून सर्जाखान व संभाजी विजापुराकडे दिलीरखानास सोडून पळून गेले. यानंतर संभाजी राजा कोल्हापुराकडे ३०० घोडे व १००० पायदळ घेऊन गेला. त्याला शिवाजीनें हरप्रयत्न करून मन वळवून बोलावल्यावरून तो आला (प. सा. सं. खंड २, पृ. ६४२).

पितापुत्रांची भेट

संभाजी शिवाजीस सोडून एक वर्ष होता. त्याला कोणाच्या तरी पदरीं नोकरी हवी होती असें दिसतें. आपल्या बापाची मर्जी आपणांवर नाहीं, यास्तव इतर दरबारीं जाऊन नशीब काढावें, या उद्देशानें तो बाहेर पडला असावा. पण मोगल व विजापूरकर यांकडे कोठेंहि डाळ शिजत नाहीं, असें पाहून तो शिवाजीकडे परत आला. त्याच्या परत येण्याचें कारण सभासदानें असें सांगितलें आहे, "दिलेलखानानें दिल्लीस पातशहाकडे लिहून पाठविलें कीं, 'शिवाजीचा पुत्र संभाजी राजा रुसून आपणांकडे आला

आहे; त्यास गौरव करून आम्हीं ठेवून घेतला आहे, तरी पातशहांनीं मेहेरबानी करून त्यास नांवाजावें म्हणजे राज्यांत दुही होईल. राज्यांतील लष्कर उठून आपणांकडे येईल व शिवाजीचे किल्लेकोट साधतां येतील.' त्याजवरून पातशहानें विचार केला कीं, संभाजीस नांवाजल्यास (मराठे) पातशाहींत फितवा करून पातशाही बुडवितील. नांवाजूं नये. हुजूर आणून कैदेंत ठेवावा. ऐसा विचार करून दिलेलखानास हुकूम पाठविला कीं, संभाजी राजास घेऊन हुजूर येणें. तों दिलेलखानाचा वकील पातशहाजवळ होता, त्यानें हें वर्तमान खानास लिहून पाठविलें. तें कळतांच खानानें संभाजी राजास सूचना देऊन पळविलें (सभासदाची ही माहिती विश्वसनीय वाटत नाहीं). ते पळून पन्हाळ्यास आले, हें वर्तमान शिवाजी राजास पुरंदरावर कळतांच संतोष पावून राजे पुत्राचे भेटीस पन्हाळ्यास आले. मग पिता-पुत्रांची भेट झाली. बहुत रहस्य जहालें. त्याउपरी राजे म्हणाले, 'लेकरा! मला सोडूं नकोस, औरंगजेबाचा व आपला दावा तुजला (त्याच्या मनांत) दगा करावयाचा होता; परंतु श्रीकृपेंकरून सोडून आणिला. थोर कार्य झालें. आतां तूं ज्येष्ठ पुत्र थोर झालास आणि स्वतंत्र राज्य कर्तव्य हें तुझ्या चित्तांत आहे असें मला कळलें. तें मजला अगत्य आहे. तरी तुजलाहि एक राज्य देतों. माझे पुत्र दोघे जण. एक तूं संभाजी व दुसरा राजाराम. ऐसियास या राज्याचे दोन विभाग करतों. एक चंदीचें राज्य. त्याची हद्द तुंगभद्रा ते कावेरी. दुसरें तुंगभद्रा ते गोदावरी. तूं वडील. तुजला कर्नाटकाचें राज्य दिधलें. इकडील राज्य राजारामास देतों. तुम्ही दोघे पुत्र दोन राज्यें करणें. मी श्रीचें स्मरण करून उत्तर (आयुष्य) सार्थक करीत बसतों. तेव्हां संभाजी राजे बोलले कीं, 'आपणांस साहेबांच्या पायाची जोड आहे. आपण दूधभात खाऊन साहेबांच्या पायांचें चिंतन करून राहीन.'

संभाजी परत येण्याचीं कारणें वर उद्धृत केलेल्या पत्रांत आहेत व तीं राजपूरच्या इंग्रजांनीं सुरतेस पाठविलेल्या पत्राशीं जुळतीं आहेत (प. सा. सं. खंड २, पृ. ६४२). संभाजीचा लाग तर कांहीं साधलाच नाहीं. उलट दिलीरखानाच्या क्रूर कृत्यांचीं व हिंदूंवरील जुलमाची त्यास चीड येऊन तो अथणीहून विजापुराकडे पळाला व तेथील बजबजपुरींत कांहीं लभ्यांश होणार नाहीं, अशी खात्री पटल्यावर तो पन्हाळ्यास शिवाजीकडे

आला. दिलीरखानानें आयती चालून आलेली शिकार आपल्या अविचारानें हातची गमावली असेंच म्हटलें पाहिजे. कारण संभाजीस त्यानें आपल्यापाशीं कायमचा ठेवला असता तर औरंगजेबाचा पक्ष सबळ होऊन शिवाजीचें मन नेहमींच व्यग्र राहिलें असतें.

असो. संभाजी परत आल्यावर शिवाजी त्याजपाशीं एक महिनाभर त्याची समजूत काढण्याकरितां राहिला. दोघांनीं बसून सर्व राज्याची व दौलतीची मोजदाद केली. आणि बाजी देशपांडे याचा नातू विठ्ठल त्रिंबक, हिरोजी फर्जंद, सोमाजी नाईक बंकी, सूर्याजी कंक इत्यादिकांच्या देखरेखीखालीं त्यास शिवाजीनें ठेवून दिलें आणि जनार्दनपंत हणमंते खालीं कोप्पळाकडे होता, त्याला कोल्हापूर प्रांतीं येऊन संभाजीवर नजर ठेवण्याचा हुकूम केला. मुलाच्या उच्छृंखलपणाबद्दल खेद वाटून महाराजांनीं त्याजवर पहारे बसविले आणि परत रायगडास जातांना वाटेंत सज्जनगडीं येऊन ३१ डिसेंबर १६७९ पासून ४ फेब्रुवारी १६८० पर्यंत ते समर्थांच्या सहवासांत राहिले.

प्रकरण बाविसावें

शिवाजी व पोर्तुगीज

(इ. स. १६६३-१६७८)

देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते ॥

– रामदास

शिवाजीच्या एकंदर युद्धप्रसंगांत पोर्तुगीज, इंग्रज, सिद्दी व सावंत यांजबरोबर त्याच्या घडलेल्या सामन्यांचें स्थान दुय्यम आहे. त्यापेक्षां विजापूरकर, मोगल व गोवळकोंडेकर यांच्याशीं त्याचा झालेला संघर्ष अव्वल दर्जाचा व महत्त्वाचा होय. म्हणून त्यांचें विवेचन कालानुक्रमानें यापूर्वींच येऊन गेलें आहे. त्याच कालानुक्रमांत पोर्तुगीज, इंग्रज, सिद्दी व सावंत हे बसतात. पण त्यांचें कथन त्रुटित स्वरूपानें त्या त्या वेळीं केलें असतें तर तें वाचकांना नीट समजणें कठीण झालें असतें. तथापि यांपैकीं कुडाळच्या सावंतांचें प्रकरण एकत्र पण पूर्वींच देण्यांत आलें असून बाकीचीं प्रकरणें विजापूरकर, मोगल व गोवळकोंडेकर यांच्या अनुसंधानाच्या आड येऊं नयेत म्हणून त्यांचा परामर्श येथून पुढें घेत आहें. शिवाजी व पोर्तुगीज हें त्यांपैकींच एक प्रकरण होय.

शिवाजीनें सन १६५६ त चंद्रराव मोऱ्यापासून जावळी प्रांत घेऊन कोंकणांत प्रवेश केला व दोन-तीन वर्षांच्या आंत उत्तर व दक्षिण कोंकणाचा बराच भाग जिंकला. तेव्हां गोव्याच्या व्हाइसरॉयास शिवाजीचा पराक्रम प्रथमच समजला. तोंपर्यंत शिवाजी हा स्वतःच्या नांवापेक्षां बापाच्याच नांवावरून त्यांजकडून ओळखला जात होता. सदर व्हाइसरॉयानें भारतांतील घडामोडींविषयीं पोर्तुगॉलच्या बादशहाला पत्र लिहितांना प्रथमच शिवाजीची ओळख त्यास 'शहाजीचा एक मुलगा' या शब्दांनीं ५ मे १६५८ रोजीं करून दिली. त्या वेळीं त्यानें आपलीं लढाऊ गलबतें कल्याण, भिवंडी, पनवेल या बाजूस बांधलीं असल्यानें पोर्तुगीजांस नवीनच दहशत उत्पन्न झाली होती. त्यांना वाटलें कीं, शिवाजी सबंध

कोंकण-किनारा ताब्यांत घेऊन त्यावर आरमारी सत्ता स्थापन करील व त्या योगानें आपल्या व्यापारास धोका पोंचून भारतांतील आपलें राज्यहि संपुष्टांत येईल. म्हणून व्हाइसरॉयानें शिवाजीच्या आरमाराच्या गळ्यास बालपणींच नख लावण्याकरितां शिवाजीचीं जहाजें बंदराबाहेर न येऊं देण्याचा आपल्या ठिकठिकाणच्या अंमलदारांना हुकूम काढला.

व्हाइसरॉयानें असा हुकूम काढला असला तरी त्याची अंमलबजावणी न होतां तो दप्तरींच राहिला असावा असें दिसतें. त्यानंतर एका वर्षाच्या आंत शिवाजीनें अफझलखानाचा वध करून त्याचा मुलगा फाजलखान व रुस्तुमजमा यांच्या सैन्यास रायबागेजवळ उधळून लावलें. त्यामुळें गोव्याच्या व्हाइसरॉयास अधिकच चिंता उत्पन्न होऊन त्यानें ती आपल्या बादशहास ता. १२ मार्च १६६० रोजीं कळविली. तेव्हां तो लिहितो, 'सरदार शहाजीचा पुत्र शिवाजी हा सध्यां विजापुराजवळ असून विजापूरकरांच्या सरदारांशीं त्याचें युद्ध चालू आहे. त्यांत त्यानें कांहीं सरदारांचा पराभव करून त्यांचे बरेच शिपाई व घोडे ठार केले. चौलपासून बांद्यापर्यंत सर्व मुलूख शिवाजीच्या ताब्यांत आहे. त्यानें या मुलखांतील पुष्कळ शहरें व समुद्रकांठचीं बंदरें काबीज केलीं आहेत, तशीच बरीच संपत्तिहि मिळविली आहे. विजापूरचा आदिलशहा हा त्याच्याविरुद्ध लढाईची तयारी करीत आहे. पण ती पूर्ण होईल कीं नाहीं याविषयीं शंका आहे. कारण एक तर त्याच्या राज्याची अव्यवस्था व दुसरें शिवाजीनें त्याचे हुशार व वजनदार सेनापति मारले आहेत. हल्लींचा विजापूरचा राजा हा दासीपुत्र असल्यामुळें शिवाजी विजापूरच्या तक्तावर दुसरा एक राजपुत्र बसविणार आहे, अशाबद्दलची एक अफवा येथें उठली आहे" (प. सा. सं. खं. १, पृ. १८४).

हें पत्र लिहिल्यानंतर लवकरच गोव्याजवळ राजापूर बंदरांत जाऊन शिवाजीनें कांहीं इंग्रजांस कैद केलें. त्यामुळें कोंकणांत शिवाजीचा दरारा इतका बसला कीं, विजापूरचें राज्य तो सहज लवकरच आपल्या मुठींत आणील असें लोकांस वाटूं लागलें. शिवाय विजापूरकरांचे रुस्तुमजमासारखे लांचखाऊ सरदार शिवाजीस आंतून सामील असल्यामुळें त्या

राज्यांत कांहीं दम राहिला नसून अव्यवस्था व अंदाधुंदी माजली आहे ही गोष्ट या वेळीं सर्वश्रुत झाली.

भीतिजनक घटना

पोर्तुगीजांच्या दृष्टीनें शिवाजीसंबंधीं महत्त्वाच्या व भीतिजनक अशा घटना सन १६६० ते १६६३ पर्यंत बऱ्याच घडल्या. त्यांतील दोन विशेष महत्त्वाच्या होत. एक १६६३ च्या एप्रिल महिन्यांत शिवाजीनें पुण्यांत शाइस्ताखानासारख्या फार मोठ्या मोगल सुभेदारावर अचानक घातलेला धाडसी छापा व दुसरी कुडाळ प्रांताच्या सावंतावर त्यानें त्याच वर्षी केलेली स्वारी. पहिल्या घटनेनें शिवाजी ही एक असामान्य व्यक्ति आहे अशी पोर्तुगीजांची खात्री झाली व दुसऱ्या घटनेनें शिवाजीचें संकट पोर्तुगीजांच्या अगदीं दाराशीं येऊन भिडलें.

आतां शिवाजीशीं आपला संघर्ष टळत नाहीं हें गोव्याच्या पोर्तुगीज व्हाइसरॉयानें तात्काळ ओळखून त्याच्याशीं तह करण्याचा घाट घातला. शिवाजीनेंहि त्यास एक दरबारी पद्धतीचें पत्र लिहिलें. त्यास १६ एप्रिल १६६३ रोजीं व्हाइसरॉयानें उत्तर पाठविलें. त्यांत तो म्हणतो, "तुमचें पत्र आल्यामुळें पत्रव्यवहारास मोकळीक झाली. मी आतां डाम अलवारो डी आटेड हा वजनदार गृहस्थ तुमच्याशीं तहाचें बोलणें करण्याकरितां पाठवीत आहें. त्याला तुमच्या व आमच्या राज्यांत शक्य तों अविरोधी असे संबंध घडवून आणण्याचा अधिकार दिला आहे. पण तुमचें-आमचें हें बोलणें गुप्त राहिलें पाहिजे. तुमच्याविरुद्ध कोणतीहि गोष्ट त्यानें करूं नये असें आम्हीं त्यास सांगितलें आहे" (प. सा. सं. खंड १, पृ. २२६).

वरील पत्रांतील आशयास अनुसरून व्हाइसरॉयानें त्याच्या ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांना व किल्लेदारांना हुकूम पाठवून, शिवाजी जोंपर्यंत आपल्याशीं स्नेहानें वागत आहे तोंपर्यंत त्यांनीं मोगलांच्या छावणीला कसलीहि अन्नसामग्री पुरवूं नये असें फर्माविलें.

शिवाजीचें कुडाळच्या लखम सावंताशीं सन १६६० पासून युद्ध सुरू होतें. त्याच बाबतींत सन १६६३ च्या मे महिन्यांत शिवाजी वेंगुर्ल्यावर आला. वेंगुर्ल्यावर विजापूरकरांचा अंमल होता व लखम सावंत विजापूरकरांचा मांडलिक होता. म्हणून तो वेंगुर्ल्याचें रक्षण करण्याकरितां पुढें सर-

सावला. पण त्याचा शिवाजीनें सहज पराभव करून वेंगुर्ले ताब्यांत घेतलें. त्यानंतर गोव्याच्या व्हाइसरॉयानें शिवाजीकडे आपला वकील रामजी शेणवी कोठारी यास मुद्दाम, मोगलांवर (शाइस्ताखानावर) त्यानें मिळविलेल्या विजयांबद्दल त्याचें अभिनंदन करण्यास पाठविलें. पूर्वी डाम अलवारो याजबरोबर तहाचें बोलणें होऊन कांहीं अटी ठरल्या होत्या. आतां उरलेल्या अटी पूर्ण करण्याची कामगिरी व्हाइसरॉयानें रामजीवर सोंपविली होती. हा तह झाला तर दोघांच्याहि फायद्याचा होईल, अशीहि रामजीजवळ दिलेल्या पत्रांत आशा व्यक्त करण्यांत आलेली होती.

रावजी सोमनाथ

लखम सावंताचा पुरता मोड झाला नसला तरी शिवाजीनें कुडाळ प्रांत १६६३ त जिंकल्यावर त्याची व्यवस्था लावण्याकरितां रावजी सोमनाथ पंडित यास जुलै महिन्यांत सुभेदार नेमलें. तसें रावजीनें पोर्तुगीजांना त्यांच्या माहितीसाठीं कळविलें. शिवाजीचा मुक्काम त्या सुमारास वेंगुर्ल्यास असेल अशा समजुतीनें गोव्याच्या व्हाइसरॉयानें त्यास भेटण्याकरितां रामजी शेणवी कोठारी यास ४३००० असरफीचा नजराणा देऊन पाठविलें. परंतु शिवाजी तेथून उत्तरेकडे आधींच निघून गेला असल्यामुळें रामजी त्यास न भेटतांच परत आला.

पोर्तुगीज बाह्यात्कारीं शिवाजीशीं गोडीनें वागत असतांना दिसत असले तरी अंतःस्थ रीतीनें त्याला कुडाळ प्रांतांतून हांकून लावण्याची एकहि संधि ते दवडत नव्हते. कारण त्यांना हा प्रबळ शत्रु आपल्या शेजारीला नकोच होता. म्हणून गुप्त रीतीनें लखम सावंतादि देसायांना शिवाजीवर उठविण्याची मसलत ते करीत होते. शिवाजी मे महिन्यांत कुडाळ प्रांत जिंकून त्याची व्यवस्था लावून गेल्यावर, शिवाजीचा अंमल उलथून पाडण्याकरितां देसायांना विजापूरकरांचा हुकूम आला. त्याप्रमाणें लखम सावंत, केशव नाईक, राम शेणवी व चंदाराणा यांनीं शिवाजीविरुद्ध उठावणी केली व तिला पोर्तुगीजांनीं साहाय्य केलें. या वेळीं लखम सावंत वाडींतून बाहेर पडून सहाशें सैनिकांनिशीं सह्याद्रीच्या पायथ्याशीं अरण्यांत राहत होता व तेथून शिवाजीविरुद्ध बंडावा करीत होता.

शिवाजीची आरमारी स्वारी

सन १६६५ च्या फेब्रुवारींत शिवाजीनें कोंकणपट्टीच्या दक्षिणेस एक प्रचंड आरमारी मोहीम काढली. "८५ लहान व ३ मोठीं गलबतें घेऊन शिवाजी मालवणांतून (सिंधुदुर्ग) बाहेर पडला. तो कांहींहि विरोध झाल्याशिवाय गोव्यावरून बार्सिलोरपर्यंत (बसनूर) जाऊन व तें बंदर लुटून गोकर्णाला परत आला. तेथें तीर्थयात्रा आटोपून चार हजार पायदळासह अंकोल्याला गेला. तेथून सर्व आरमार पाठवून, जमिनीवरून स्वदेशीं जातांना वाटेंत लागणाऱ्या नद्या तरून जाण्यापुरतीं १२ छोटीं तरांडीं त्यानें राखून ठेवलीं. २२ फेब्रुवारीला तो कारवारास आला" (प. सा. सं. खं. १, पृ. २८२).

सभासद शिवाजीची ही मोहीम पुढीलप्रमाणें वर्णितो – 'शिवाजी फोंडा घेऊन कडवाड (कारवार), शिवेश्वर, मिर्जान, अंकोलें, कदरें, सुपें, उडवें हे कोट कुल घेऊन गोकर्ण महाबळेश्वर आणि वर-घाट सुपें येथवर सरद (सरहद्द) लाविली. गोव्याचे फिरंगीयास दबावून त्यांजवळून तोफा, नख्त जडजवाहिर घेऊन आपलेसे करून त्यास उदीमास कौल देऊन आला. असें कुल कोंकण काबीज केलें' (सभासद, शि. छ. च. पृ. ७१).

जयसिंगाची तंबी

जयसिंग व दिलीरखान ही जोडी शिवाजीचें सारें राज्य धुळीस मिळवून त्याला कैद करण्याच्या उद्देशानें मार्च १६६५ त पुण्यास आली. त्यांनीं येतांक्षणींच शिवाजीचे किल्ले एकामागून एक घेण्यास सुरुवात केली. शिवाजीचे जे शत्रु होते त्यांना त्यांनीं आपल्या निशाणाखालीं येण्यास आवाहन केलें व जे त्याला आंतून मदत करतात असा त्यांना संशय आला त्यांना त्यांजपासून अलिप्त राहण्यास बजावलें. पोर्तुगीज कांहींसे संशयास्पद स्थितींत होते. त्यांची या देशांतील भूमिका इंग्रजांसारखी होती. जो प्रबळ असेल त्याजपुढें नमून वागावयाचें व त्याची मर्जी राखण्याकरितां कमी सामर्थ्यवानास दूर लोटावयाचें. तोच प्रसंग जयसिंगाच्या आगमनाबरोबर आतां प्राप्त झाला. जयसिंगाचें दटावणीचें पत्र येतांच २१ मार्च १६६५ रोजीं गोव्याच्या व्हाइसरॉयानें त्यास उत्तर लिहिलें तें असें– "पोर्तुगीजांचा राजा व औरंगजेब यांचे संबंध शांततेचे व स्नेहाचे आहेत. आमच्या मुलु-

खांत आम्हीं शिवाजीला कधींहि सवलत अगर मदत दिलेली नाहीं. शिवाजीच्या नोकरींत कांहीं पोर्तुगीज असतीलहि. पण ते माझ्या संमतीनें नाहींत. कारण माझी परवानगी न घेतां खुद्द मोगल बादशहा, गोवळकोंडे-कर, कानड्यांतील राजे व विजापूरकर यांच्याहि मुलुखांत पुष्कळ पोर्तुगीज आहेत. त्यांची जबाबदारी अर्थातच मजवर नाहीं" (प.सा.सं.खं.१, पृ.२८४).

जयसिंगाला पोर्तुगीज व्हाइसरॉयानें असें पत्र लिहिलें खरें, पण त्याला मोगलांपेक्षां शिवाजीचाच शेजार अधिक सोयीचा व सुखाचा वाटत असावा. म्हणून त्यानें शिवाजीशीं कसें वागावें यासंबंधीं वसईच्या आपल्या अधिकाऱ्यास लिहिलेलें पत्र बोधप्रद आहे. तें पत्र त्यानें ८ एप्रिल १६६५ रोजीं लिहिलें. त्यांत म्हटलें आहे, "मोगलांचें प्रकरण सध्यां गुंतागुंतीचें झालें आहे. त्यांचा व आपला स्नेहसंबंध तुटतां कामा नये. किंवा आमच्या मनांत संशय आहे असें त्यांस दिसतां कामा नये. आम्ही शिवाजीला मदत करतों हा त्यांचा संशय घालवावा. पण संशय येऊं न देतां तुम्ही पैसे घेऊन शिवाजीला स्फोटक दारू व अन्न पोंचवाल तर बरें. कारण मोगलांनीं शिवाजीचा मुलूख व्यापणें इष्ट नाहीं. पण शिवाजीशीं ठेवावयाचा संबंध गुप्त असावा. तुम्ही शिवाजीसहि कळवा कीं, तुम्हांस आमच्या आश्रयास यावें लागेल तेव्हां चौलास न येतां गोव्याकडे यावें. यांत सुरक्षितपणा अधिक आहे" (प. सा. सं. खं. १, पृ. २८६).

शिवाजीचें अभिनंदन

यानंतर एका वर्षानें शिवाजीमहाराज आग्ऱ्यास औरंगजेबास भेटावयास गेले. त्या काळांत जयसिंग व मराठे यांचे संबंध सलोख्याचे असून जयसिंग विजापूरकरांचा मुलूख जिंकण्यांत गुंतला होता. शिवाजी-महाराज ५ मार्च १६६६ रोजीं महाराष्ट्रांतून निघाले व १९ ऑगस्ट १६६६ रोजीं आग्ऱ्याहून पेटाऱ्यांत बसून पळाले. ते सुटल्याची बातमी कळल्यावर जयसिंग मराठ्यांवर उलटला व त्यांचें राज्य बुडविण्याच्या तयारीस लागला. शिवाजीचें मुख्य राज्य कोंकणांत होतें. तें समुद्राकडून जिंकावयास मोगलांजवळ पुरेसें आरमार नव्हतें. म्हणून जयसिंगानें गोव्याच्या व्हाइसरॉयापाशीं आरमारी मदत मागितली. त्यावर त्यानें ता. १९ एप्रिल १६६७ रोजीं उत्तर पाठवून जयसिंगास कळविलें कीं, 'मराठ्यां-

विरुद्ध गोव्याचें आरमार मोगलांशीं सहकार्य करील, पण त्या कामीं येणारा खर्च गोवेकरांस झेपणारा नसल्यामुळें तो मोगलांनीं करावा ' अर्थात् हें मदतीचें आश्वासन केवळ जुलुमाच्या रामरामापैकीं होतें. कारण कांहीं दिवसांनीं जयसिंग मोहीम टाकून दिल्लीस जावयास निघाला व त्यापूर्वीं महाराज २० नोव्हेंबर १६६६ रोजीं राजगडास येऊन पोंचले. नंतर कांहीं दिवसांनीं ते सावंतवाडीच्या ईशान्येस १४ मैलांवरील रांगणा किल्ल्यापासून १५ मैल दूर असलेल्या मनोहरगडावर येऊन राहिले. पोर्तुगीज व्हाइसरॉय शिवाजीची मैत्री संपादण्यास साहजिकच उत्सुक होता. या दृष्टीनें शिवाजीचें सुटके-संबंधीं अभिनंदन करण्याकरितां व्हाइसरॉयानें रामजी शेणवी कोठारी यास त्याजकडे पाठविण्याचें योजिलें. पण मनोहरगड चढावयास अवघड व २५०० फूट उंच असल्यामुळें रामजी तेथें जाण्यास अळंटळं करूं लागला. यास्तव व्हाइसरॉयानें तो बेत रहित करून शिवाजी मनोहरगडावरून रायगडावर राहावयास गेल्यावर ता. ५ जुलै १६६७ रोजीं आपला वकील रामजी शेणवी यास रायगडावर पाठवून त्याचें अभिनंदन केलें.

बारदेशावर स्वारी

पण शिवाजी व पोर्तुगीज यांजमधील ही गोडी फार दिवस टिकली नाहीं. कुडाळ प्रांत शिवाजीनें लखम सावंतापासून जिंकून घेतला असला तरी सावंत शेजारच्या पोर्तुगीज हद्दींत राहून कुडाळांत वारंवार पुंडावा करीतच होता. म्हणून त्याला वठणीवर आणण्याकरितां शिवाजी १८ सप्टेंबर १६६७ रोजीं कुडाळांत आला आणि लखम सावंत व केशव नाईक हे गोव्याच्या हद्दींतील बारदेशांत लपून बसले असल्याचें कळल्यावर शिवाजीनें बारदेशावर स्वारी केली. त्या वेळीं कोंद द व्हिन्सेंट हा गोव्याचा व्हाइस-रॉय होता. त्याला लखम सावंत व केशव नाईक आपल्या राज्यांत असल्याचें नाकारतां येईना. पण ते दोघे विजापूरकरांचे मांडलिक असल्यामुळें विजापूर-करांशीं गोवेकरांनीं केलेल्या तहास अनुसरून त्यांना आपल्या राज्यांत येऊं देणें भाग पडलें असें त्यानें शिवाजीस कळविलें. शिवाजीनें वरील स्वारींत देसायांचा पाठलाग करीत बारदेशांत शिरल्यावर बरींच गांवें लुटलीं व जाळलीं आणि गोव्याच्या व्हाइसरॉयाला न जुमानतां १२०० इसमांना कैद करून आपल्याबरोबर नेलें.

पाद्र्यांचा शिरच्छेद

शिवाजीला बारदेशावर स्वारी करण्यास आणखी एक निमित्त झालें होतें. शिवाजीचा अवतार धर्मस्थापनेकरितां होता. त्या धर्माचा छळ पोर्तुगीज कित्येक वर्षें करीत आले होते. त्याविषयीं वाटणारा संताप शिवाजीनें योग्य समय येईपर्यंत दाबून ठेवला होता. पण गोमांतकास त्याच्या राज्याची हद्द भिडल्यापासून गोव्यांत चालू असलेल्या धार्मिक जुलमाचीं कृत्यें आतां त्याच्या धडधडीत दृष्टीस पडूं लागलीं. त्या वेळीं गोव्याच्या व्हाइसरॉयानें रोमन कॅथोलिक धर्म वगळून हिंदु आदि इतर धर्मीयांना गोवें प्रांतांतून हद्दपार करण्याचा हुकूम काढला होता. हा हुकूम मोडून जे लोक गोव्यांत तसेच डोकें देऊन राहतील त्यांचा शिरच्छेद करण्याचा कोणा चार पाद्र्यांनीं व्हाइसरॉयास सल्ला दिला. अशा नराधमांस पकडून शिवाजीनें त्यांचा जागच्या जागीं शिरच्छेद केला. शिवाजी त्या वेळीं इतका चिडला होता कीं, गोव्यांतून पोर्तुगीजांची सत्ता समूळ उखडून टाकण्याचाहि डाव त्यानें टाकला. त्यानें गोवें शहरांत व भोंवतालच्या इतर भागांत आपले सैनिक या ना त्या मिषानें जिकडे तिकडे गुप्तपणें पेरून ठेवले व त्यांनीं त्यांस इशारा मिळतांच चोहोंकडून उठून पोर्तुगीज बेसावध असतां धामधूम उडवून द्यावी व त्या दंगलींत गोव्याची सत्ता काबीज करावी असें योजिलें. पण हा क्रांतीचा कट अकालीं फुटून व्हाइसरॉय व्हिन्सेंट सावध झाला व त्यानें त्या चार-पांचशें कटवाल्यांस पकडून गोवें प्रांताच्या हद्दीबाहेर हाकून दिलें. शिवाजी त्या दंगलींत सामील होण्यास ८।१० हजार पायदळ व एक हजार स्वार यांनिशीं तयारच हाता. त्याला कट फुटल्याची वातमी कळल्यावर तो आपल्या किल्ल्यांची पाहणी करण्याचें मिष करून निघून गेला.

पोर्तुगीजांशीं तह

शिवाजीनें असा नारसिंह अवतार धारण केलेला पाहून गोव्याचा व्हाइसरॉय व्हिन्सेंट अगदीं भेदरला व त्यानें शिवाजीशीं तह करण्याकरितां पाद्री गोसाल मार्तीस यास पाठविलें. गोवेकरांतर्फे मार्तींस आणि शिवाजीतर्फे पितांबर शेणवी व सखोपंत यांच्या तहासंबंधीं बऱ्याच वेळां वाटाघाटी झाल्या. मार्तींस शिवाजीस भेटला व पितांबर व सखोपंत

व्हिन्सेंटला भेटले. या वाटाघाटींचा शेवट गोड होऊन खालीलप्रमाणें तह ठरला –

(१) शिवाजीनें बारदेशांतून ९ नोव्हेंबर १६६७ रोजीं अधिकारी, स्त्रिया व मुलें यांना नेलें आहे. त्यांना खंडणी न घेतां सोडून द्यावें.

(२) लखम सावंत व केशव नाईक हे विजापूरकरांचे मांडलिक गोव्याच्या हद्दींत पळून आले आहेत. त्यांनीं शिवाजी व त्याचे प्रजाजन यांविरुद्ध कोणतेंहि कृत्य करूं नये. जर तसें ते करतील तर त्यांना गोवें प्रांतांतून हांकून देण्यांत येईल. शिवाजीच्या राज्यांतील देसायांनीं पोर्तुगीज प्रजाजनांशीं तशीच आगळीक केल्यास शिवाजीनेंहि त्यांच्याशीं तसेंच वागावें.

(३) नारबा सावंत व मल शेणवी हे पोर्तुगीज मुलखांत आहेत, त्यांनीं दंगे टाळण्यासाठीं साष्टी व बारदेश यांत न राहतां गोवें शहरांत येऊन राहावें. जो देसाई पुंडावा करील त्यास पोर्तुगीज हद्दपार करतील.

(४) बालाघाटाकडून जो माल व वाहनें गोव्याला येतील त्यांना शिवाजीनें अडवूं नये व त्रास देऊं नये. तसेंच गोवें, साष्टी व बारदेश येथून जो माल व गाड्या शिवाजीच्या राज्याची जकात देऊन बालाघाटांत वा इतरत्र जातील त्यांनाहि शिवाजीनें, आदिलशहाशीं त्याचें युद्ध चालू असलें तरी, अडथळा करूं नये. कारण खुला व्यापार हा उभयपक्षीं हितावह आहे.

(५) समुद्र व भूमि यांवर उभयतांत स्नेह राहावा.

या तहावर शिवाजीनें ११ डिसेंबर १६६७ रोजीं शिक्कामोर्तब केलें.

शिवाजीचा पोर्तुगीजांशीं वरीलप्रमाणें तह झाला तरी लखम देसाई व केशव नाईक हे स्वस्थ बसले नाहींत. तहांतील कलमें धाब्यावर बसवून कुडाळ प्रांतांत शिरून दंगे करण्याचा क्रम त्यांनीं सुरूच ठेवला. तेव्हां शिवाजीला तहाची पायमल्ली गोवेकर व्हाइसरॉयाच्या नजरेस आणणें भाग पडलें. अशा बऱ्याच तक्रारी ऐकल्यावर व्हाइसरॉयानें ता. १६ फेब्रुवारी १६६८ रोजीं शिवाजीचा रायाजी गंगादास सुभेदार यास पत्र लिहून आपण वरील दोघां देसायांस गोवें प्रांतांतून निघून जाण्याची आज्ञा केली असल्याचें कळविलें.

डचांकडे संधान

देसायांचा पुंडावा हें एक निमित्त होतें, तें दूर झालें. म्हणून शिवाजीचा पोर्तुगीजांमागचा ससेमिरा सुटणारा नव्हता. त्याला जुलमी व हिंदुधर्मद्वेष्ट्या पोर्तुगीजांच्या सत्तेचें गोव्यांतून कायमचें उच्चाटन करावयाचें होतें. त्यापूर्वी सन १६६७ मध्यें शिवाजीनें आदिलशहा-बरोबर तह केला होता, त्या तहाचा आधार घेऊन शिवाजी आपणांस आदिलशहाचा मुखत्यार म्हणवूं लागला. बारदेश मूळ विजापूरकरांचा असून तो पोर्तुगीजांनीं अन्यायानें बळकावला आहे, असा शिवाजीचा दावा असून त्याजवर तो आपला ताबा सांगूं लागला. यांतून त्याचें गोवेकरांशीं भांडण उत्पन्न होणार होतें. तें उत्पन्न होऊन शिवाजीला त्यांज-विरुद्ध युद्ध पुकारावें लागल्यास सागरी युद्धांत आपणांस पोर्तुगीजांसारख्या प्रबळ आरमारी सत्तेपुढें टिकाव धरतां येणार नाहीं याची त्यास जाणीव असल्यामुळें त्यानें पोर्तुगीजांचे जे प्रतिस्पर्धी डच त्यांजकडे मदतीचें बोलणें सुरू केलें. ता. २८ ऑक्टोबर सन १६६८ रोजीं डच गव्हर्नर जनरलनें डच ईस्ट इंडिया कंपनीस पत्र लिहिलें. त्यांत तो म्हणतो, "शिवाजी किनाऱ्या-वरील मुलुखाचा सुभेदार झाला असल्यामुळें शिरस्त्याप्रमाणें त्याला २५३ होनांचा नजराणा देणें भाग पडलें. शिवाजी डच कंपनीला अनुकूल असल्याचें पुष्कळ रीतींनीं दाखवितो. 'पोर्तुगीजांशीं तुमचें युद्ध सुरू झाल्यास तुम्हीं मला कळविलें असतां पोर्तुगीजांची कायमची हकालपट्टी करण्यास मी तुम्हांस मदत करीन,' असें त्यानें आम्हांस कळविलें आहे. पोर्तुगीजां-विरुद्ध त्याची ही भावना मनापासूनची दिसते. तिचा आपणांस फायदा होण्याचा संभव आहे."

अशा रीतीनें शिवाजीच्या मनांत गोव्यांतून पोर्तुगीजांचें उच्चाटन करण्याचें होतें तरी सन १६६९ त त्याचें जंजिऱ्याच्या सिद्दीशीं युद्ध जोरांत जुंपल्यामुळें त्याला तेव्हांपासून पोर्तुगीजांकडे लक्ष देण्यास फुरसत राहिली नाहीं. पोर्तुगीजहि या युद्धांत संधि मिळेल तेव्हां सिद्दीला मदत करीतच होते. याच कारणानें ऑक्टोबर सन १६७० मध्यें दमणजवळ मराठ्यांच्या आरमारानें पोर्तुगीजांचें एक मोठें जहाज पकडून तें दाभोळ बंदरांत नेऊन ठेवलें. उलटपक्षीं पोर्तुगीजांनींहि मराठ्यांचीं बारा गलबतें

पकडून तीं वसईस नेऊन ठेवलीं. पण त्यांचा हा झगडा उभयतांत पुनः तह होऊन तात्पुरता मिटला.

जेसुइटांचा जुलूम

त्यानंतर सन १६७५ पर्यंत शिवाजी व पोर्तुगीज यांचे संबंध बरे होते. पण त्या वर्षीं शिवाजीला सिद्दीशीं युद्ध चालू असतांहि पोर्तुगीजांकडे लक्ष पुरविणें भाग पडलें. पोर्तुगीज सत्तेचीं दोन मुख्य केंद्रें होतीं. एक केंद्र दक्षिणेस गोव्यास व दुसरें उत्तरेस वसईस होतें. गोव्याप्रमाणेंच शिवाजीची सत्ता उत्तरेस वसईपाशीं भिडली होती. हिंदु मनुष्य मेला व त्याचीं बायकामुलें अनाथ झालीं म्हणजे तीं बाटून ख्रिस्ती न बनलीं तर त्यांची मालमत्ता जप्त करण्याचा कायदा या वेळीं जारी होता. वसईस असा जुलूम होत असल्याची बातमी शिवाजीस नोव्हेंबर १६७५ त कळतांच त्याचें रक्त रागानें उसळलें व त्या जुलमाविरुद्ध शिवाजीनें पोर्तुगीजांना तंबी दिली. त्या योगानें वसईचा कॅप्टन जनरल शुद्धीवर येऊन त्यानें अनाथ बायका-मुलांचा पक्ष घेऊन त्यांची मालमत्ता त्यांस परत करण्यास जेसुइट पाद्र्यांना भाग पाडलें.


पोर्तुगीजांचें समुद्रावर स्वामित्व असल्यामुळें पश्चिम समुद्रांतून जाणाऱ्या-येणाऱ्या एतद्देशीय जहाजांनीं आपणांपासून परवाना घेतला पाहिजे असा दंडक त्यांनीं पाडला होता. पण शिवाजीच्या लहान जहाजांना परवान्याची ही अट लागू करण्यांत आली नव्हती. तरीसुद्धां सन १६७८ त शिवाजीचे दोन मचवे वेंगुर्ल्यापाशीं पोर्तुगीजांनीं पकडले. त्याविरुद्ध वेंगुर्ल्याचा शिवाजीचा सुभेदार तानाजी राम यानें पोर्तुगीजांकडे तक्रार केली तेव्हां त्यांनीं ते दोन मचवे सोडून दिले.

पितांबर शेणवी

गोव्यास ता. १८ ऑक्टोबर १६७७ रोजीं कोंद द असुमार या नांवाचा नवा व्हाइसरॉय नेमून आला होता. त्याच्या नवीन कारकीर्दीत एक नवीनच प्रकरण उद्भवलें. पेशवा मोरोपंत यानें रामनगरचें राज्य जिंकल्यावर त्या राज्यांतूनच हें प्रकरण उद्भवलें. रामनगरच्या राजाच्या मुलुखांतील लोक दमणभोंवतालच्या खेड्यांत जाऊन लूटमार करीत.

त्यापासून त्यांचें रक्षण करण्याकरितां रामनगरचा राजा चौथ हा कर घेत असून त्या राजाला 'चौथीया' असें नांवच पडलें होतें. हीं खेडीं पोर्तुगीजांनीं दमण जिंकल्यापासून त्यांच्या अमलाखालीं गेलीं होतीं. शिवाजीनें रामनगरचें राज्य घेतल्यावर तो हा कर पोर्तुगीजांपाशीं मागूं लागला. पोर्तुगीजांच्या नव्या व्हाइसरॉयापुढें हा प्रश्न आल्यावर त्यानें त्याची चौकशी सुरू केली. शिवाजीची बाजू मांडण्याचें काम त्याचा वकील पितांबर शेणवी हा करीत होता. व्हाइसरॉयानें हा वादग्रस्त प्रश्न अधिक विचाराकरितां दोघां न्यायाधिशांकडे सोंपविला होता. पण त्याचा निर्णय लागण्यापूर्वींच पितांबर शेणवी मेला व त्याच्या जागीं दुसऱ्या वकिलाची नेमणूक व्हावयाची तोंच शिवाजीमहाराजहि १६८० त मृत्यु पावल्यामुळें या प्रश्नाची तड लागली नाहीं.

पोर्तुगीज शिवाजीशीं उघडपणें युद्ध करण्याचें टाळीत असले व स्नेहभाव दाखवीत असले तरी शिवाजी अडचणींत सांपडला असतां त्याला मदत न करतां त्याच्या शत्रूंना मदत कशी करीत असत, याचा प्रत्यय सिद्दी, इंग्रज व शिवाजी या तिरंगी सामन्यांत सिद्दी कासीमचें आरमार जाळण्याकरितां माजगांवास जाणारा शिवाजीचा आरमारी अधिकारी दौलतखान यास ठाण्यापाशीं अडवून त्यांनीं शिवाजीचा घात १६७८ त केला तेव्हां आलाच.



कुलाबा व रत्नागिरी
जिल्हा
उरण
पेण
अलिबाग
मुरुड
रायगड
महाड
सावित्री नदी
खेड
दापोली
श्रीवर्धन
चिपळूण
गुहागर
संगमेश्वर
रत्नागिरी
राजापूर
रायपाटण
खारेपाटण
विजयदुर्ग
देवगड
फोंडे
फोंडा घाट
सावंतवाडी
वेंगुर्ले
प्रतापगड
विशाळगड
लोहगड
तिकोना
तोरणा
राजगड

प्रकरण तेविसावें

शिवाजी व इंग्रज

(इ. स. १६६०–७०)

नित्यमुद्यतदण्डाद्धि भृशमुद्विजते जनः।
तस्मात्सर्वाणि कार्याणि दण्डेनैव विधारयेत् ॥

— कणिकनीति

कोंकणावर पहिली स्वारी (इ. स. १६६०)

शिवाजीनें स्वराज्याची स्थापना प्रथम मावळांत केली. तेथून पूर्वेस देश व पश्चिमेस कोंकण हे महाराष्ट्राचे दोन भाग त्याच्यापुढें पसरले होते. यांपैकीं स्वराज्याचा प्रसार देशावर करण्यापेक्षां कोंकणांतच करणें बचावाच्या दृष्टीनें सोपें व सोयीचें, हें शिवाजीनें प्रारंभींच हेरून आपली दृष्टि पश्चिमेकडे वळविली. पश्चिमेस त्याच्या मावळास लागूनच चंद्रराव मोऱ्याचें राज्य होतें. त्याची राजधानी जावळी व त्याजवळचा किल्ला प्रतापगड १५ जानेवारी १६५६ रोजीं शिवाजीनें जिंकून घेतला. मोऱ्यांचें राज्य सह्याद्रीच्या माथ्यावरून खालीं उत्तरेस रायगडापर्यंत विस्तारलें होतें. त्यांतील जावळीचा किल्ला त्याच्या ताब्यांत आला म्हणून रायगडापर्यंतचा सारा प्रदेश त्याला ताबडतोब मिळाला असें नाहीं. त्यासाठीं शिवाजीला लढावें लागून तो त्याच्या स्वाधीन एप्रिल महिन्यांत झाला.

मोऱ्यांचें कोंकणांतील राज्य जिंकून घेऊनच शिवाजी थांबला नाहीं. त्याला सबंध कोंकणपट्टीच जिंकावयाची होती. पण जावळीचें राज्य जिंकणें जितकें सोपें होतें, तितकी कोंकणपट्टी जिंकणें सोपें नव्हतें. कोंकणावर मुख्य राज्य विजापूरकरांचें होतें. अहमदनगरची निजामशाही शहाजहान बादशहानें इ. १६३६ त जिंकल्यावर तें राज्य दि. ६ मे १६३६ च्या तहानें शहाजहान व विजापूरकर यांनीं पुढीलप्रमाणें वांटून घेतलें.

कोंकणाची वांटणी

(१) विजापूरच्या बादशहानें दिल्लीपतीचें अधिराज्य मान्य करावें.

(२) निजामशाही राज्याचा मुलूख दिल्लीपति व आदिलशहा यांनीं वांटून घ्यावा. (३) आदिलशहाच्या राज्याला पुढील मुलूख जोडावा – पश्चिमेकडे भीमा व सीना या दोन नद्यांमधील प्रदेश, सोलापूर व परिंडा या दुर्गांसह सोलापूर व वांगणी हे महाल; ईशान्येकडे थालकी व चिटगुपा हे परगणे; निजामशाही कोंकण, पुणें व चाकण हे दोन परगणे. हा सर्व मुलूख मिळून दरसाल २७ लक्ष होन किंवा ८० लक्ष रुपये वसुलाचे ५० परगणे होतात.

सारांश, या तहानें वसईपासून कारवारपर्यंतची सर्व कोंकणपट्टी विजापूरकरांच्या मालकीची झाली असली तरी त्यावर अधिराज्य दिल्लीपतीचें होतें. तथापि या कोंकणपट्टींत इतर भानगडी थोड्या नव्हत्या. तींत समुद्रकांठानें पोर्तुगीज, इंग्रज, डच व फ्रेंच यांच्या वखारी असून दंडाराजपुरी व तिच्याभोंवतालचा टापू सिद्दीच्या मालकीचा होता. त्याशिवाय बाणकोटच्या खाडीजवळ पालवणीची जहागीर, खालीं विशाळगडाच्या दक्षिणेस शृंगारपूरचे सुर्वे यांची जहागीर, त्याच्याहि दक्षिणेस कुडाळांत सावंतांची जहागीर व तिच्या पलीकडे पोर्तुगीजांचा गोवें प्रांत होता.

शिवाजीनें रायगड घेऊन न थांबतां त्या झपाट्यांत एक महिन्याच्या आंत उत्तरेस कल्याण-भिवंडीपर्यंत स्वारी करून त्या प्रदेशावर आपलें स्वामित्व (ऑक्टोबर १६५७) स्थापलें. पण जावळीच्या दक्षिणेकडील कोंकणपट्टी घ्यावयाची राहिलीच होती. तीहि अफजलखानाचा वध जावळीस दि. १० नोव्हेंबर सन १६५९ रोजीं करीपर्यंत शिवाजीनें घेतली. आणि त्या सर्वांवरील मोगलांचें अधिराज्य लक्षांत घेऊन ३ एप्रिल १६५७ रोजीं शिवाजीचा वकील सोनाजीपंत यानें औरंगजेबास भेटून 'विजापूरकरांचे शिवाजीराजे यांनीं घेतलेले किल्ले, दाभोळ बंदर व त्याखालील मुलूख यांवर मराठ्यांचा अंमल चालावा' याबद्दल त्याजपासून मान्यतापत्र मिळविलें. यावरून उत्तर कोंकण जिंकून झाल्याबरोबर शिवाजीनें चिपळुणापर्यंत मजल मारल्याचें दिसून येतें. पुढें कुडाळ प्रांताचे खेम सावंत व लखम सावंत यांना शरण आणून त्यानें त्यांचा कारभारी पितांबर शेणवी याजमार्फत दि. ५ मार्च इ. १६५९ रोजीं तह केला. या तहानें कुडाळचे सावंत शिवाजीचे मांडलिक होऊन फोंडा किल्ला व प्रांत यांजवर शिवाजीनें आपला अंमल बसविला. तात्पर्य, अफजलखानाची स्वारी शिवाजीवर

होण्यापूर्वीच त्यानें कल्याण-भिवंडीपासून गोव्यापर्यंतची सारी कोंकणपट्टी पादाक्रांत केली. त्यामुळें इंग्रज, पोर्तुगीज, डच यांच्याशीं त्याचा संघर्ष सुरू झाला. राजापुरास इंग्रजांची वखार होती. राजापूर शिवाजीच्या प्रदेशास भिडलें असल्यानें तेथील वखारीस झळ लागूं लागली. अफजलखानाचा वध झाला तेव्हां दाभोळ व दक्षिणेकडील इतर अनेक बंदरें शिवाजीच्या ताब्यांत असून त्यांच्या व भोंवतालच्या प्रदेशाच्या संरक्षणाकरितां त्यानें आपलें सैन्यहि ठेवलें होतें. उत्तर कोंकणापैकीं दंडा-राजपुरीच्या सिद्दीसहि त्यानें हात दाखविला होता. परंतु शिवाजीपाशीं आरमारी बळ नसल्यामुळें त्याला राजपुरी नगर घेतां आलें तरी त्याशेजारचा जलदुर्ग (जंजिरा) तेवढा जिंकून घेतां आला नाहीं. आणि तो घेतल्याशिवाय सिद्दीचें कोंकणांतून समूळ उच्चाटन करणें शक्य नव्हतें. मुसलमानी सत्तेचा शिवाजी कर्दनकाळ होता व त्यामुळें दंडा-राजपुरीचें राज्य लहान असतांहि तें आपल्याला बुडवितां आलें नाहीं हें शल्य त्याच्या मनास बोचत राहिलें असल्यास नवल नाहीं.

फाजलखानाचें नाजूक काम

शिवाजीनें दि. १० नोव्हेंबर सन १६५९ रोजीं अफजलखानास जिवें मारलें. त्या प्रसंगीं अफजलखानाच्या जावळीस जमा झालेल्या सैन्यांत त्याचा वडील पुत्र फाजलखान हा होता. त्याचें एक नाजूक काम राजापुरीच्या इंग्रज वखारवाल्यांपाशीं होतें. विजापूरचे सुभेदार वा सरदार यांना त्यांच्या अधिकारपदाबद्दल सरकारांतून मिळावयाचा।तनखा वा जहागीर हीं मिळतच असत; पण त्याखेरीज कित्येक मातबर सुभेदार आपल्या खासगी मालकीचीं जहाजें बाळगून मालाची ने-आण करीत व त्या व्यापारांत चांगलाच नफा मिळवीत. अशा सुभेदार-सरदारांपैकीं अफजलखान हा एक असून त्याचीं तीन जहाजें माल घेऊन याच सुमारास दाभोळ बंदरांत आलीं होतीं. दाभोळ बंदर नुकतेंच शिवाजीनें घेतल्यामुळें तेथील सुभेदार महमूद शरीफ तीं तीन जहाजें राजापूर बंदर शिवाजीच्या अमलाबाहेरचें म्हणून सुरक्षिततेसाठीं तेथें घेऊन आला. राजापूरचें बंदर विजापूरकरांचा दुसरा मोठा सरदार रुस्तुमजमा याच्या जहागिरींत होतें. फाजलखानानें त्या तीन जहाजांवरील माल ताब्यांत घेण्याबद्दल राजापूरचा सुभेदार अब्दुल करीम

यास पत्र लिहिलें. शिवाजीच्या सैन्यानें रुस्तुम व फाजल यांच्या फौजेचा रायबागेजवळ धुव्वा उडविला, ही बातमी राजापुरास कळतांच सुभेदार अब्दुल करीम याची पांचावर धारण बसली. त्याला इंग्रजांचा हिशेब पुरा करावयाचा होता. तो करण्याचें काम टाकून तो दाभोळच्या जहाजावरून जैतापुरास रातोरात पळाला. (जैतापूर हें बंदर जैतापूर खाडीच्या मुखाशीं समुद्रावर व राजापूर बंदरापासून पश्चिमेस १५ मैल आहे.) इंग्रजांस ही खबर लागल्याबरोबर त्यांनीं राजापुराहून जैतापुरास आपलें गलबत पाठवून अबदुल करीमला अडविलें व हिशेब पुरा करण्यासाठीं आपल्या गलबतावर बोलाविलें. त्यानें पूर्वीच्या देणें रकमेपैकीं १२ हजार होनांचा माल देऊन राहिलेली रक्कम सवडीनें मागाहून देण्याचें कबूल केलें.

इकडे आड तिकडे विहीर

इतकें बोलणें होत आहे तोंच राजापुरास पांच-सहाशें व जैतापुरास दोनशें अशीं शिवाजीचीं माणसें अफजलखानाचीं गलबतें ताब्यात घेण्यास आलीं व तीं घेण्याच्या कामीं इंग्रजांची मदत मागूं लागलीं. इंग्रजांची स्थिति ‘ इकडे आड तिकडे विहीर ’ अशी झाली. अफजलखानाचीं जहाजें शिवाजीस भिऊन त्याच्या स्वाधीन करावीं तर विजापूरकरांसारख्या बलिष्ठ सत्तेचें शत्रुत्व पत्करावें लागणार आणि न करावीं तर शिवाजीशीं तंटा करावा लागणार व त्याचे दुष्परिणाम भोगावे लागणार. तथापि शिवाजी-कडील लोकांची मागणी मान्य करण्याचें इंग्रज अधिकाऱ्यांनीं नाकारून आपण तटस्थ आहों, आपणांस या भानगडींत पडण्याचें कारण नाहीं, असें त्यांनीं शिवाजीचा सेनापति दोरोजी यास सांगितलें. इंग्रज अधिकाऱ्यांच्या या उत्तरानें मुसलमान सुभेदारास धीर येऊन तो आपलीं जहाजें शिवाजी-च्या हातीं पडण्यापेक्षां इंग्रजांच्या स्वाधीन केल्यास त्यांवरील माल किंवा मालाची किंमत केव्हां तरी आपणांस मिळेल या भरंवशानें अफजलखानाचीं तीनहि जहाजें इंग्रजांच्या स्वाधीन करण्यास तयार झाला. पण त्यास संमति दिल्यास शिवाजीचे अधिकारी आपणांवर रागावतील असें वाटून इंग्रजांनीं मध्यमक्रम स्वीकारला. त्यांनीं सुभेदाराला सांगितलें कीं, तुमच्याकडून जितक्या रकमेची फेड व्हावयाची आहे तितकी लक्षांत घेऊन आपण ती रक्कम फिटेपर्यंत फक्त एकच जहाज व त्यावरील माल आपल्या

ताब्यांत घेतों. आणि त्याप्रमाणें करून त्यांनीं तसा लेख सुभेदाराला लिहून दिला.

ही एक गोष्ट आपल्या मनाजोगी झाल्यावर इंग्रजांनीं आपणांस वेंगुर्ल्यास पोंचवावें अशी मागणी सुभेदाराच्या लोकांनीं इंग्रजांना केली. पण ती शिवाजीच्या भीतीनें त्यांनीं नाकारली. अशा रीतीनें इंग्रजांनीं एक जहाज घेतल्यावर अफजलखानाचीं दोन जहाजें उरलीं. त्यांची वाट कशी लावावयाची हा सुभेदारापुढें प्रश्न उभा राहिला. त्या बाबतींत सदर जहाजें सुरतेला किंवा दुसऱ्या कोणत्या तरी मोगली बंदरांत घेऊन जाण्याचा सल्ला इंग्रजांनीं सुभेदारास दिला. पण त्या गलबतांवरील नोकरांनीं शिवाजीच्या बाजूनें बंड केल्यामुळें तीं जहाजें तशींच सोडून राजापूरचा सुभेदार अब्दुल करीम एका भाड्याच्या जहाजांत बसून वेंगुर्ल्याकडे चालता झाला व तेथें डचांच्या संरक्षणाखालीं राहिला. आणि इंग्रज अधिकारी हेन्री रेव्हिंग्टन जैतापुराहून राजापुरास परत आला.

तरी शिवाजीचा अधिकारी दोरोजी यानें इंग्रजांचा पिच्छा सोडला नाहीं. त्यानें अफजलखानाचें गलबत व त्यावरील माल इंग्रजांपाशीं मागितला. परंतु गलबत तर नाहींच, पण त्यावरील माल दोरोजी त्याची किंमत देत असेल तर आपण त्याच्या स्वाधीन करूं असें इंग्रजांनीं सांगितलें व तें त्यानें कबूल केलें. इतकें झाल्यावर इंग्रज लोक दंडाराजपुरीचा किल्ला व त्यांतील खजिना काबीज करण्यास आरमारी मदत करतील किंवा कसें, याविषयीं दोरोजीनें प्रश्न विचारून खडा टाकून पाहिला. परंतु या बाबतींत कांहींच उत्तर न देतां ते जैतापुराला गेले व तेथील अफजलखानाच्या उरलेल्या दोन जहाजांवरील लोकांशीं कानगोष्टी करून त्यांना त्यांनीं मथविलें व शिवाजीच्या सैनिकांच्या बंदुकांच्या टप्प्याबाहेर समुद्रांत जाऊन नांगर टाकून राहण्याचा त्यांस सल्ला दिला. मराठ्यांपाशीं जहाजें नसल्यामुळें हातची ही शिकार इंग्रजांनीं मुद्दाम घालविल्याबद्दल त्यांनीं चिडून जैतापुरांतील इंग्रजांच्या दलालास पकडलें. त्याला मुक्त न कराल तर आम्ही तुम्हांवर तोफांचा मारा करूं अशी इंग्रजांनीं मराठ्यांना तंबी दिली. तेव्हां असा निरोप घेऊन येणारा गिफर्ड यासहि पकडून त्यासह दलालाला घेऊन मराठे निघाले. मराठेहि पक्के वस्ताद. त्यांना वाटलें कीं, दलालाबरोबर एक

इंग्रजहि असला म्हणजे इतर इंग्रज अधिकारी त्याच्या प्राणरक्षणासाठीं तरी आपणांवर तोफा डागणार नाहींत. मराठ्यांचा हा अंदाज खरा ठरला व त्यांजवर तोफा डागण्यांत आल्या नाहींत.

इंग्रजांशीं पहिली झटापट

दलालाबरोबर गिफर्ड कैद झाल्यावर मराठ्यांनीं त्या दोघांना ओलीस ठेवून घेऊन अफजलखानाचीं जहाजें व त्यांजवरील माल आमच्या स्वाधीन कराल तरच त्यांना सोडूं असा उलटा पेंच इंग्रजांना घातला आणि इंग्रज अधिकाऱ्यांना हात चोळीत बसण्यास लावलें.

दोरोजीनें त्या दोन कैद्यांबरोबर अफजलखानाच्या एका जहाजावरील मालहि त्याची किंमत लागलीच न देतां नेला असें दिसतें. पुढें पंचवीस दिवसांनीं मराठ्यांनीं दलालास मुक्त केलें, पण गिफर्ड यास खारेपाटणच्या किल्ल्यांत अडकवून ठेवलें. याविरुद्ध तक्रारीचें पत्र राजापूर येथील वखारीवरील मुख्य अधिकारी रेव्हिंग्टन यानें दि. १३ फेब्रुवारी इ. १६६० रोजीं शिवाजीस पाठविलें. त्याजप्रमाणें फाजलखान व रुस्तुमजमा यांसहि पत्रें लिहून त्यानें घडलेली हकीकत त्यांस कळविली. शिवाजीस तक्रारीचें पत्र मिळाल्यावर त्यानें सैनिकांनीं आणलेला इंग्रजांचा माल त्यांचा त्यांस परत देण्याचा हुकूम केला. गिफर्ड यास ज्या खारेपाटणच्या किल्ल्यांत ठेवलें होतें तो किल्ला राजापुरापासून त्याच खाडीवर दक्षिणेस १२ मैलांवर होता. तेथें गिफर्डला इंग्रज वखारवाले अन्नपाणी पुरवीत असत व त्याचा त्यांजबरोबर पत्रव्यवहारहि होत असे. त्यांत गिफर्डनें फेब्रुवारीच्या मध्यांत एक पत्र पाठवून आपणांस खारेपाटणाहून काढून सातवळी वा खेळणा किल्ला यावर रवाना करण्यांत येणार असल्याचें कळविलें. ही गुप्त बातमी व त्याला न्यावयाचा रस्ता इंग्रजांना कळल्यावर त्यांनीं आपले तीस सैनिक त्या बाजूस पाठविले. ते वाटेंत दबा धरून बसले व गिफर्डला घेऊन मराठ्यांचे सैनिक येतांच त्यांजवर हल्ला करून त्यांनीं त्याला सोडवून नेलें. मराठ्यांचे सैनिक पंचवीस व बेसावध असल्यामुळें त्यांचे इंग्रज सैनिकांपुढें कांहीं चाललें नाहीं.

दुसरी झटापट

पहिल्या झटापटींत मराठे व इंग्रज या उभय पक्षांपैकीं कोणासहि लभ्यांश असा कांहींच झाला नाहीं. मात्र उभयतांस एकमेकांचें अवसान

अजमावतां आलें व जानपछान चांगली झाली. या वेळीं पन्हाळगडास विजापूरकरांनीं वेढा घातला होता व त्यांत महाराज अडकून पडले होते. वेढ्याच्या कामांत रुस्तुमजमा व फाजलखान झटत होते. तरी सेनानायकत्व सिद्दी जोहार याजकडे होतें. पन्हाळगड फार बळकट, तो लवकर जिंकला जावयाचा तर त्यावर तोफांचा प्रभावशाली मारा करावयास पाहिजे. विजापूरकरांपाशीं तोफा होत्या, पण त्या तितक्या परिणामकारक नव्हत्या. राजापूरचे इंग्रज वखारवाले यांजपाशीं विक्रीकरितां तोफा व गोळेहि होते. ते प्राप्त झाल्यास पन्हाळगड लवकर पडेल असें वाटून जोहारानें राजापूरकर इंग्रजांकडे त्यांच्या गोलंदाजास गडापाशीं आणण्यास ५ पालख्या व चारशें पायदळ व घोडेस्वार पाठविले. राजापूर विजापूरच्या राज्यांत असल्यामुळें इंग्रजांना तोफा व दारूगोळा नाकारणें शक्य नव्हतें. उलट शिवाजीच्या सेनापतीनें गिफर्ड यास पकडून बराच त्रास दिला असल्यामुळें शिवाजी विजापूरकरांना कैद करतां आल्यास त्यांना आनंदच वाटणार होता. म्हणून राजापूरचा इंग्रज अधिकारी रेव्हिंग्टन यानें विजापूरकरांशीं खळखळ न करितां सौदा ठरविला आणि तोफा व ५० गोळे घेऊन रेव्हिंग्टन हा मिंघॅम, गिफर्ड व वेलजी यांसह दि. २ एप्रिल सन १६६० रोजीं रायपाटणावरून अणस्कुराच्या घाटांतून पन्हाळ्यास जावयास निघाला. तो प्रथम कोल्हापुरास कंपनीच्या दुकानीं मुक्कामास गेला व तेथून सिद्दी जोहार तथा सलाबतखान यानें त्यास मोठ्या सन्मानानें पन्हाळगडाच्या पायथ्याजवळील रणक्षेत्रांत नेलें. तेथें गेल्यावर रेव्हिंग्टन यानें स्वतः गोळा उडविला व त्याचा विलक्षण प्रभाव पाहून जोहार खूष झाला.

शिवाजीनें २ मार्च १६६० पासून १३ जुलै १६६० पर्यंत पन्हाळगड शौर्यानें लढविला. पण विजापूरकरांपुढें आतां निभाव लागणार नाहीं अशी खात्री पटून तो सोडून त्यानें विशाळगडावर व विशाळगडावरून राजगडाकडे कूच केलें. शिवाजी राजगडास गेला तेव्हां विजापूरकरांनीं मोगल बादशहास केलेल्या विनंतीवरून शिवाजीला शह देण्यास शाइस्ताखान देवगिरीकडून चालून आला होता. चाकणचा किल्ला घेऊन तो इ. १६६० च्या सप्टेंबर महिन्यांत पुण्यास मुक्कामास आला. म्हणजे आतां शिवाजीला दोन जबरदस्त शत्रूंशीं एकदम तोंड द्यावयाचें होतें. ही गोष्ट त्याच्या

शक्तीबाहेरची असल्यामुळें त्यानें पन्हाळगडावरील आपला विश्वासू अधिकारी त्र्यंबक भास्कर यास कळवून किल्ला सिद्दी जोहाराच्या हवालीं केला व एकट्या मोगलांशीं लढण्यास तो मोकळा झाला.

उंबरखिंडींतील झुंज

या व इतर राजकारणाकरितां त्यानें माता जिजाबाई व आपलें मंत्रिमंडळ यांचा विचार घेतला. शिवाजीपुढें या वेळीं किती तरी महत्त्वाचे प्रश्न होते. एक, त्याला युद्ध चालविण्यास द्रव्यबळ पाहिजे होतें. दुसरा, राजापूरचे इंग्रज, पालवणीचे दळवी व शृंगारपूरचे सुर्वे यांनीं पन्हाळगडच्या वेढ्यांत शत्रुपक्षास साहाय्य केलें असल्यामुळें त्यांचा कांटा काढावयाचा होता व तिसरा, आपला कोंकणांतील मुलूख जिंकण्यास टपलेला शाइस्ताखान याजपासून त्याचें संरक्षण करावयाचें होतें. सैनिक खूष व कार्यक्षम ठेवावयाचे तर त्यांना नियमितपणें पगार पोंचावयास पाहिजे व तो खर्च म्हणजे पाण्यासारखा. सचिवांनीं त्यास सांगितलें कीं, ‘ मुलूखगिरीशिवाय पैसा नाहीं. तुमचें राज्य जर लोकांसाठीं आहे तर तो खर्चाचा भार लोकांनीं सोसावयास पाहिजे. या दृष्टीनें लोकांचा पैसा म्हणजे तुमचाच पैसा होय. ’ शिवभारतांत कवींद्र परमानंदानें यासंबंधीं लिहिलेला श्लोक उद्धृत करण्यासारखा आहे. तो लिहितो –

योऽर्थः सर्वेषु लोकेषु स तवैवेति विद्महे ।
तद्याहि जैत्रयात्रार्थे शिवराज महाद्युते ॥

असा मंत्र मिळाल्यावर शिवराज मुलूखगिरीवर निघाला. या वेळीं शाइस्ताखानाचें चाकणचें सैन्य थेट पश्चिमेस निघून लोहगड व विसापूर या मार्गानें उत्तर कोंकणांत उतरत होतें. त्याचा बेत सह्याद्रि उतरून नागोठणें, चौल, पनवेल, कल्याण, भिवंडी हा प्रदेश शिवाजीपासून परत घ्यावयाचा होता. या सैन्याचें आधिपत्य शाइस्ताखानानें कारतलब याजकडे दिलें असून त्याच्या मदतीस चव्हाण अमरसिंह, यशवंत कोकाटे, सर्जेराव घाडगे व वऱ्हाडांतील ब्राह्मण स्त्री राय बागीण होती. हें सैन्य सह्याद्रींतून खालीं उतरून कोंकणांत पसरण्यापूर्वीच त्याजवर गुपचुप छापा घालून त्याचा चक्काचूर उडविण्याचा मनसुबा महाराजांनीं केला. त्यांनीं आपल्याबरोबर प्रख्यात रणधुरंधर नेताजी पालकर व पुढें सिंहगडच्या

युद्धांत अमरत्व पावलेला तानाजी इत्यादि शूर वीर घेतले होते. कारतलब उंबरखिंडींतून नागोठण्याकडे उतरणार अशी बित्तंबातमी शिवाजीस लागली असल्यानें खिंडीच्या आसपास दाट झाडीच्या छताखालीं त्यानें आपलें सैन्य लपवून ठेवलें. कारतलब खिंडींत आला (३ फेब्रुवारी १६६१). त्याची शिवाजीच्या सैन्यानें अशी नाकेबंदी केली कीं, त्याच्या सैनिकांना दोन-तीन दिवस प्यावयास पाणीसुद्धां मिळूं दिलें नाहीं. कारतलबाची अशी हैराणगत झाल्यावर आतां त्याजवर एकदम तुटून पडण्याची हीच वेळ आहे, असें पाहून नेताजीनें नगारा वाजविण्यास हुकूम केला. तो ऐकल्याबरोबर जागजागीं लपून बसलेले शिवरायाचे सैनिक एकदम बाहेर पडले व त्यांनीं मोगलांवर जोरदार हल्ला चढविला. कारतलबाच्या तोंडचें पाणी पळालें. राय बागिणीनें प्रसंग ओळखून कारतलबास शरण जाण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणें त्यानें जीवदान मागितल्यावर शिवाजीनें त्याला सेनेसह निघून जाण्यास सांगितलें व आपण पुढच्या तजविजीस लागला.

परशुरामाचें दर्शन

कारतलब पराभव पावून निघून गेला तरी मोगलांविषयीं शिवाजीची धास्ती नष्ट झाली नव्हती. मोगल पुनः कदाचित् कोंकणांत उतरण्यास धजावतील हें ओळखून नेताजीस महाराजांनीं उंबरखिंडीबाहेर पालीच्या आसपास राहण्यास सांगितलें व आपण तानाजीसुद्धां दक्षिणेस निघाला. महाराज मोठे धर्मनिष्ठ व भक्तिमान्. कोंकणांतील देव आपल्या बंधमुक्ततेची जणूं काय वाट पाहत होते म्हणून त्यांनीं पालीस जाऊन विघ्ननाशक श्रीसिद्धिविनायकाचें दर्शन पवित्र अन्तःकरणानें घेतलेंच असेल. तेथून त्यांनीं दाभोळास जाऊन श्रीदालभेश्वरापुढें आपला माथा लवविला आणि दाभोळच्या बंदोबस्ताकरितां सैन्याची एक तुकडी ठेवून चार-दोन दिवसांनीं ते चिपळुणास गेले. तें तर परशुराम-क्षेत्र. तेथून जवळच सहस्रार्जुनाचा वध करणाऱ्या धनुर्धर परशुरामाचें डोंगरचें देवालय. परशुरामाच्या एका बाजूस काम व दुसऱ्या बाजूस काळ हे दोन भ्राते. महाराजांनीं त्यांचें दर्शन डोळे भरून घेतलें, पूजा केली व ब्रह्मवृंदांस दक्षिणा देऊन त्यांचा आशीर्वाद मिळविला. मागील खेपेस शिवाजीनें दक्षिण कोंकण पादाक्रांत केलें होतें तरी दाभोळ, संगमेश्वर या ठिकाणीं मुसलमान अधिकारी ठाण

मांडून होतेच. त्यांच्या जागीं त्यांनीं आतां आपले अधिकारी नेमले. संगमेश्वरास 'द्विज' नीलकंठ राजाचा पुत्र पिलाजी यास नेमून त्याच्या रक्षणार्थ शूर तानाजीस सैन्याच्या तुकडीसह ठेवलें व आपण स्वतः राजापुरास इंग्रजांचा समाचार घेण्यास निघून गेले. परमानंदाच्या वर्णनावरून या काळांत कोंकणांत ब्राह्मण वस्ती चांगली असून एकंदर वस्तींत राजापूर ते देवरुखापर्यंत ब्राह्मणांचें बाहुल्य होतें. हा प्रदेश हल्लीं पाहिला तरी जलाशय व तरुलता यांनीं रमणीय करून सोडला आहे. मग त्या तीनशें वर्षांपूर्वीच्या अत्यंत कमी लोकवस्तीच्या काळांत त्याचें सौंदर्य अनुपमेय असेल हें काय सांगावयास पाहिजे? त्याचें वर्णन परमानंद पुढील शब्दांनीं करतो : 'देवरुख व राजापूर यांमधील प्रदेश उंडी व बकुळी यांच्या पुष्पांनीं सुगंधित झालेला, नागवेली, नारळी व पोफळी या वेलीवृक्षांची दाटी असलेला, उपवनमय पर्वतांनीं व्यापलेला, तीर्थमय नदीनदांनीं पावन केलेला व ब्रह्मवृंदांनीं गजबजलेला होता.'

राजापूरच्या मोहिमेंत द्रव्यप्राप्ति हा एक प्रधान हेतु होता. एका अर्थानें शिवाजी हा स्वराज्यपट्टीच वसूल करण्यास चालला होता. त्याचें कार्य व ध्येय अफजलखानाच्या वधापासून हिंदु जनतेला पूर्णपणें कळून चुकलें होतें.

राजापूरची लूट

राजापूर ही द्रव्याची खाणच होती. सुरतेच्या खालोखाल पश्चिम समुद्रावर राजापूर हेंच मोठें बंदर असून तेथें देशोदेशींचे व्यापारी येऊन राहिले होते. त्यांत इंग्रज, डच, फ्रेंच, अरब, मलबारी इत्यादि लोक होते. यांतील गोऱ्या लोकांच्या योग्यतेविषयीं तत्कालीन लोकांचें किती थोर मत होतें, हें परमानंदांच्या वर्णनावरून सहज लक्षांत येणार आहे. तें असें— 'तेथें निरनिराळ्या देशांचे फिरंगी असून ते तोफांच्या गोलंदाजींत असामान्य पराक्रमी, किल्ल्याच्या तटावरून लढण्यांत कुशल, श्रीमंतींत कुबेरावर ताण करणारे, शिल्पकलेंत मयासुराप्रमाणें निष्णात, दुर्मार्गगामी म्हणजे अफाट अशा सागरांतून संकटाशीं झुंजत दूरवर प्रवास करणारे होते' मलबारी असेच दर्यावर्दी पण उघडे-बोडके होते. तेथील गोऱ्या व

इतर व्यापाऱ्यांच्या कोठारांतून सोनें, रुपें, पितळ, शिसें, तांबें, लोखंड, कथील, मोती, पाचू, माणिक, हिरे, पोवळीं, इत्यादि मूल्यवान् माल ठेवून भरला होता. त्याशिवाय इतरहि हस्तिदंत, कस्तुरी, केशर, वेलदोडे, खारका, खजूर, अक्रोड, बेदाणा इत्यादि विलासी व खाद्य पदार्थांची रेलचेल होती.

हे पदार्थ शिवाजीस मिळाले तर पाहिजेच होते; पण त्यापेक्षां रोकड रकमेची त्याला फार जरूर होती. ती गोरे व्यापारी खुषीनें थोडीच काढून देणार! त्या काळीं दरोडेखोरव लुटारू लोक यांच्या धास्तीनें द्रव्य हंड्यांत घालून जमिनींत पुरून ठेवण्याची पद्धत होती. ज्यांनीं बऱ्या बोलानें आपण होऊन खंडणी दिली त्यांच्या वाटेस शिवाजी गेला नाहीं. पण गोऱ्या इंग्रज आदिकरून ज्या वखारवाल्यांनीं ती देण्याचें नाकारलें, त्यांजपासून त्यानें ती सैनिकांमार्फत सक्तीनें वसूल केली व जे अगदीं खमंग भेटले त्यांच्या घरांना वा वखारींना खणत्या लावून पुरलेलें द्रव्य काढून नेलें. अशी विपुल संपत्ति व इतर माल शिवाजीस मिळाला तो त्यानें घोडीं, बैल, कावडीवाले व बिगारी यांजकडून वाहवून आपल्या अनेक गडांवर नेऊन सांठविला.

वर मलबारी लोकांचा उल्लेख आला आहे. ते मलबारी लोक कोण याचा खुलासा होणें जरूर आहे. त्यांविषयीं फ्रेंच प्रवासी जीन बॅप्टिस्ट टॅव्हरनियर हा लिहितो, ‘मलबारी हे अत्याचारी मुसलमान आहेत. ते खिस्ती लोकांशीं फार क्रूरपणानें वागतात. त्यांच्या हातीं सांपडणें हें मोठें संकट होय. त्यांनीं एकदां एका कारमेलाइट फ्रायरला पकडलें होतें. त्यांनीं त्याजपासून खंडणी वसूल करण्याकरितां त्याचे इतके हाल केले कीं, त्या योगानें त्याचा एक हात थोटा व एक पाय लंगडा झाला. ते पश्चिम किनाऱ्यावर चांचेगिरीचा धंदा करतात. ते किनाऱ्यापासून ५०।६० मैलांपलीकडे समुद्रांत जात नाहींत. पोर्तुगीजांचा त्यांजवर फार राग आहे. ते त्यांस पकडून फांशी देतात किंवा समुद्रांत फेकून जलसमाधि देतात. मलबारी १०।१५ पडाव एकत्र करून दोन-अडीचशें इसम मिळून मोठ्या जहाजावर हल्ला करतात. आणि त्याजरील गोलंदाजीस न जुमानतां जहाजावर चढून त्याजवर आग फेकतात व त्यांचा प्रतिकार न झाल्यास ते

जहाजावर किती अनन्वित कृत्यें करतील याचा नेम नसतो. ते अतिशय धाडसी असतात. ' (बहुधा हे मोपले असावे.)

दक्षिण कोंकण हें मागील स्वारींत प्रायः शिवाजीच्या मालकीचेंच झालें होतें. पहिल्या खेपेस त्याचा वाफेचा रूळ या भागांत आदिलशाही सत्तेवरून फिरला होता. त्यांत जे कांहीं आदिलशाही अंमलदार अर्धवट जीव धरून राहिले होते त्यांजवरून आपला वाफेचा रूळ या दुसऱ्या खेपेस फिरवून याहि अंमलदारांचें शिवाजीनें उच्चाटन केल्यावर तेथील हिंदु जनता निर्भय व शिवाजीच्या स्वराज्याच्या चळवळीस अधिक अनुकूल झाली होती. तिजपासून स्वराज्यपट्टी वसूल करावयास शिवाजी राजापुराहून परत येतांना आला तेव्हां ती तिनें खुषीनें दिली असली पाहिजे असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. म्हणून या वेळीं शिवाजीनें दक्षिणेस विजयदुर्गच्या खाडीपासून उत्तरेस जयगडाच्या खाडीपर्यंतचा सुमारें ५० मैलांचा प्रदेश निवडला. कोंकणांतील समुद्रकांठचा प्रदेश अधिक सुपीक आहे, आणि खाड्यांवरील गांवेंहि व्यापारामुळें कांहींशीं सुखी आहेत असा अंदाज बांधून शिवाजीनें त्या प्रदेशांतील कांहीं प्रमुख गांवांपासून खंडणी घेतली. त्यास सुरुवात विजयदुर्गच्या खाडीपासून त्यानें केली. नांदिवडें, नेवरें, धामणसें, कोतवडें, पावस, कशेळी हीं गांवें समुद्रकांठीं किंवा त्याच्या आसपास एकमेकांपासून चार-दोन मैलांच्या अंतरावर आहेत. सौंदळ रायपाटणापासून जवळच त्याच खाडीवर आहे. खारेपाटण राजापूरच्या आग्नेयीस विजयदुर्गच्या खाडीवर आहे. कशेळीच्या ईशान्येस ८।१० मैलांवर सातवली हा गांव पूर्णगड खाडीपाशीं आहे. आणि भालवली (बेलपडें) कशेळीच्या पूर्वेस ४ मैल आहे. या सर्व गांवांनीं शिवाजीला स्वराज्यपट्टी दिली. हीं बहुतेक गांवें राजापूर व रत्नागिरी या दोन तालुक्यांतील आहेत.

हें कार्य आटोपल्यावर शिवाजी संगमेश्वराकडे वळला. संगमेश्वरास त्यानें तानाजीला सैन्यानिशीं ठेवलें होतें. तेथें शिवाजी आल्यावर त्यास तानाजी भेटला.

शृंगारपूरचे सुर्वे पळाले

शृंगारपूर प्रचीतगडाच्या पायथ्याला व संगमेश्वर पोस्टाखालीं

असून तेथून प्रभानवल्ली दक्षिणेस २६ मैलांवर आहे. म्हणजे हा सगळा प्रदेश सुर्वे यांच्या राज्यांत मोडत होता. तो शिवाजीस भेटला व हरजी राजे व सूर्याजी प्रभानवल्लीकर यांनीं विजापूरकरांच्या कोंकणांतील अधिकाऱ्यांच्या मदतीनें वा चिथावणीनें आपल्यावर छापा घालून बेइमानी केली हें वृत्त त्यानें सांगितलें. तें समजल्यावर शिवाजी शृंगारपूरच्या म्हणजे प्रभानवल्लीच्या राजावर चालून गेला. तो आल्याचें वृत्त समजतांच सूर्याजी व हरजी पळून गेले. शिवाजीनें पालखींत बसून शृंगारपुरांत प्रवेश केला (२९ एप्रिल १६६१) आणि प्रभानवल्लीचें राज्य जिंकून पन्हाळगडावरील युद्धनिपुण, प्रख्यात व शहाणा असा त्र्यंबक भास्कर याजकडे तेथील कारभार सोपविला आणि शृंगारपुराशेजारच्या गडास प्रचीतगड असें नांव ठेवून पालवणीस यशवंतराव (दळवी) याजवर सूड घेण्यास गेला. त्याचाहि निःपात करून व तें राज्य आपल्या ताब्यांत घेऊन जवळच्या एका डोंगरावर त्यानें किल्ला बांधला व त्यास मंडनगड असें नांव देऊन त्यानें दक्षिण कोंकणांतील ही विजयशाली मोहीम संपविली.

सूर्याजी राजे प्रभानवल्लीकर यांनीं सन १६५९–६० च्या सुमारास संगमेश्वर तर्फेतील केसो नारो व नारो आतो पाध्ये धर्माधिकारी, ज्योतिषी व अष्टाधिकारी यांस मिराशीचा कौल दिला होता (प. सा. खंड १, पृ. १८३). त्यानंतर २१ जानेवारी सन १६६२ रोजीं शिवाजी राजे यांनीं पिलाजी नीलकंठराव सुभेदार नामजाद मामले प्रभानवल्ली यांस पत्र लिहून वेदमूर्ति नारो पाध्ये बिन अंतो पाध्ये व केसो पाध्ये बिन राघो पाध्ये व केसो पाध्ये बिन विठ्ठल पाध्ये गोळवलीकर राहणार कसबे संगमेश्वर यांजकडे धर्माधिकरण, ज्योतिष व देशोपाध्येपण अष्टाधिकार चालविण्यास फर्माविलें. यावरून सन १६६० ते १६६२ च्या दरम्यान शिवाजीराजांची सत्ता मामले प्रभानवल्ली येथें दृढमूल झाली होती (प. सा. सं. खंड १, पृ. २०८).

इंग्रजांना अटक

राजापूरची ही खंडणी शिवाजीनें इ. १६६१ च्या मार्च महिन्यांत म्हणजे शिवाजी पन्हाळा सोडून राजगडास गेल्यावर आठ महिन्यांनीं वसूल केली. या वेळीं इंग्रजांच्या माहितीप्रमाणें शिवाजीपाशीं एक हजार घोडदळ व तीन हजार पायदळ होतें. शहराजवळ आल्यावर

शिवाजीचा विचार सामोपचारानेंच स्वराज्यपट्टी वसूल करण्याचा अस-ल्यामुळें त्याच्या सेनापतीनें शहरांतील प्रमुख पुढाऱ्यांना भेटीस बोलावलें व त्यांस कोणत्याहि प्रकारचा त्रास न देण्याचें आश्वासिलें. या मंडळींतच रेव्हिंग्टन, रेंडाल्फ टेलर व रिचर्ड टेलर, फेरांड, रिचर्ड नेपियर, सॅम्युएल बर्नार्ड, मिंघॅम व गिफर्ड हे इंग्रज अधिकारी होते. त्यांपैकीं रेव्हिंग्टन, मिंघॅम व गिफर्ड यांनीं पन्हाळगडच्या वेळ्यांत शिवाजीविरुद्ध सिद्दी जोहा-रास तोफ व दारूगोळा यांची मदत करून शिवाजीशीं शत्रुत्व केलें होतें. ते त्रिवर्ग आयतेच स्वागतार्थ पुढें येतांच मराठ्यांनीं त्यांस व त्यांच्या-बरोबरच्या इतरांस पकडलें. त्यासंबंधीं इंग्रजांचा वेंगुर्लें येथील रेसिडेंट १ जुलै सन १६६१ रोजीं लिहितो, “ त्या सर्वांना पकडून त्यांना महाडा-जवळील सोनगड नामक किल्ल्यावर मराठ्यांनीं कैदेंत ठेवलें. त्यांच्या वखारीची सर्वस्वी नागवणूक करून पुरून ठेवलेलें द्रव्य उकळण्याकरितां वखारीची जमीन कुदळीनें खणून काढली. इराण व मस्कत येथील व्यापारी आपला माल घेऊन दरसाल राजापुरास विक्रीसाठीं येतात व काम होतांच परत जातात. त्यांचीहि लूट झाली ” (प. सा. सं. खंड २, पृ. २०३). यावरून शिवाजीस ज्यांनीं विरोध केला त्यांचीच शिवाजीनें लूट केली व ज्यांनीं मुकाट्यानें त्यास खंडणी दिली त्यांच्या वाटेस तो गेला नाहीं असें स्पष्ट दिसतें.

वरील इंग्रज कैद्यांना शिवाजीनें प्रथम जावळी प्रांतांत वासोट्यावर व नंतर वासोट्याहून सोनगडावर आणून ठेवलें. सरते शेवटीं सोनगडाहून रायगडावर त्यांची रवानगी झाली. एकंदर इंग्रज कैदी आठ होते. रेव्हिं-ग्टन प्रभृति सोनगडावर कैदेंत असतां त्यांनीं दि. १० जून इ. १६६१ रोजीं सुरतेस जें एक पत्र लिहिलें त्यावरून शिवाजी सिद्दीपासून दंडाराज-पुरी घेण्यासाठीं किती दीर्घोद्योग करीत होता हें लक्षांत आल्याशिवाय राहत नाहीं. त्यांनीं शिवाजीशीं करावयाच्या तहाचीं कलमें सुचविलीं तीं या दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत. ते म्हणतात –

“ (१) राजापुरास धरलेले कैदी सोडून द्यावे व नेलेल्या लुटीची भरपाई करावी. (२) दंडाराजपुरी घेण्यास शिवाजीला इंग्रजांच्या गल-बतांची कुमक पाहिजे आहे. त्यांचा खर्च शिवाजीनें द्यावा. त्यानें खर्चाचें

विचारलेंच तर चार गलबतांपैकीं प्रत्येक गलबताबद्दल १० हजार होन खर्च सांगावा आणि ही रक्कम अगाऊ एकदम मागितली म्हणजे त्याला देणें शक्य नसल्यामुळें मदत देण्याचा प्रश्न आपोआपच टळेल. (३) शिवाजी या मदतीच्या मोबदल्यांत एक बंदर आपणांस देण्यास तयार आहे. त्या बंदरावर शिवाजीनें आपल्या खर्चानें आम्हांकरितां किल्ला बांधून द्यावा. (४) त्या बंदराचें अर्धें उत्पन्न आम्हांस मिळावें व आमच्या म्हणजे इंग्रजांच्या मालास आयात-निर्यात कर माफ असावा. (५) रुप्याचें नाणें पाडण्यास त्या बंदरांत शिवाजीनें आम्हांस एक टांकसाळ काढू द्यावी आणि त्यानें कोणाहि मलबाऱ्यास हाताशीं धरूं नये. (६) आम्हांस सोरा बिन हरकत खरेदी करण्यास परवानगी असावी. (७) आणि या नवीन बंदरांत आमच्या वखारीकरितां एक इमारत बांधून द्यावी." यानंतर रेव्हिंग्टन आजारी पडल्यामुळें दि. १५ ऑक्टोबर १६६१ रोजीं परत येण्याच्या अटीवर त्याची सुटका करण्यांत आली. या वेळीं शिवाजीचा वकील रावजी सोमनाथ पंडित होता. वरील अटी इतक्या कडक होत्या कीं, रावजीनें त्या कबूल न कराव्या यांत नवल काय ! त्या रावजीनें अमान्य केल्यावर इंग्रजांनीं शिवाजीवर अन्य रीतीनें दडपण आणण्याचा उपाय योजला. त्याला अनेक पत्रें पाठविलीं असतांहि त्यांचें त्यानें उत्तरच दिलें नाहीं. या वेळीं विजापूरची राणी बडी साहेबीण मक्केच्या यात्रेहून परत येतांना वेंगुर्ल्यास उतरण्याचा संभव होता. तेव्हां ते तिला विनंती करून पाहणार होते. सुरतेंतील मोगल सुभेदारास नजराणे पाठवून त्याजकडेहि सुरतेचा इंग्रज गव्हर्नर ऑक्झिंडेन कैद्यांच्या सुटकेविषयीं जोरदार मागणी करणार होता. सुभेदारानें शाइस्ताखानाला लिहिलें म्हणजे तो शिवाजीचें पारिपत्य करील व कैद्यांची सुटका घडवून आणील अशी त्यांची अपेक्षा होती. शिवाजीचीं गलबतें माल भरण्याकरितां जैतापुरास जात, तीं पकडून शिवाजीला आपली मागणी पूर्ण करण्यास भाग पाडावें इत्यादि बेत ३ फेब्रुवारी इ. स. १६६३ पर्यंत इंग्रज अधिकारी करीत होते.

इंग्रजांची सुटका

अखेरीस रावजी पंडिताच्या हुकमावरून रेव्हिंग्टन जाऊन उरलेले टेलर प्रभृतींची सुटका दि. १७ जानेवारी १६६३ रोजीं झाली. रावजी

खारेपाटणाहून रायगडास आल्यावर त्याच्या सांगण्यावरून त्यांच्या बेड्या काढण्यांत आल्या. त्यानें झाल्या गोष्टी विसरून जाण्यास सांगून इंग्रज व शिवाजी यांचा तह ठरेपर्यंत आपल्याला कळविल्याशिवाय आम्ही राजापूर सोडून जाणार नाहीं, अशी त्यांजपासून शपथ घेवविली. शिवाजीनें मार्च १६६१ मध्यें इंग्रजांना कैद केलें व त्यानंतर त्यांची सुटका दि. १७ जानेवारी सन १६६३ रोजीं झाली. म्हणजे जवळजवळ १॥। वर्षेंपर्यंत ते कैदेंत होते. तेव्हांहि त्यांना सोडलें तें शिवाजी व इंग्रज यांचा तह झाला म्हणून नसून एक प्रकारें उदारबुद्धीनें व भूतदयेनेंच त्यानें त्यांची सुटका केली.

तहाचें भिजत घोंगडें

यानंतर तहाचें घोंगडें जें भिजत पडलें तें तब्बल तेरा वर्षें. या दीर्घकाळांत किती तरी उलथापालथी झाल्या. शिवाजीनें सुरत व हुबळी लुटली. शिवाजीला राज्याभिषेकहि झाला. त्या समारंभाच्या गडबडींतच इंग्रजांचा वकील ऑक्झिन्डेन रायगडावर येऊन वाटाघाटी करीत बसला. इंग्रजांना राजापुरास झालेल्या हानीची भरपाई पाहिजे होती व शिवाजीला पन्हाळगडच्या वेढ्यांत इंग्रजांनीं विजापूरकरांना केलेल्या मदतीबद्दल इंग्रजांना शासन करावयास पाहिजे होतें. इंग्रजांनीं आपल्या नुकसानीचा आंकडा पुष्कळच फुगवून म्हणजे ३९९५७ होन सांगितला. या कामीं शिवाजीतर्फें सुंदरजी, पिलाजी, भिमाजी, रावजी, निराजी इत्यादि मुत्सद्दी बोलणें करीत होते व कॅप्टन उस्टिक, चाइल्ड, ऑक्झिडेन इत्यादि इंग्रज मुत्सद्दी कंपनीची बाजू मांडीत होते. नुकसानभरपाईचा आंकडा, भिमाजीनें ९ हजार होनांवर आणला. ही रकम सात वर्षांत रोख न देतां मालाच्या रूपानें व इंग्रजांनीं राजापुरास पुनः वखार घातल्यावर जकातींतून द्यावी असें ठरलें. ज्या कलमाबद्दल मतभेद असेल तीं कलमें गाळावीं असें इंग्रज वरिष्ठांनीं आपल्या वकिलास कळविलें. तह राज्याभिषेकाच्या सुमारासच रायगडावर ऑक्झिडेन यानें १६७४ च्या जून महिन्यांत घडवून आणला व तो फायदेशीर, कायमचा व चिरस्थायी होवो अशी इच्छा कंपनीतर्फें व्यक्त करण्यांत आली. तहानंतर इंग्रजांनीं राजापुरास परत येऊन वखार घातली. त्यासंबंधीं विलायतेहून कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं दि. ७ मार्च सन

१६७७ रोजीं कळविलें, 'राजापूरची वखार किफायतशीर होण्याचा संभव आहे, हें ऐकून आनंद झाला. शिवाजीकडून यावयाच्या द्रव्याबद्दल खटपट सोडूं नका. कर्ज जुनें होईल तशी त्याची वसुली करणें कठीण जाईल!' ही भरपाई शिवाजीकडून इ. स. १६७७ पर्यंत तरी इंग्रजांना मिळाली नव्हती. त्यानंतर ती शिवाजीच्या उरलेल्या तीन वर्षांच्या जीवनमानांत केव्हां फिटली कोण जाणे!

भरपाईशिवाय शिवाजी व इंग्रज यांच्या दरम्यान झालेल्या तहांत इतरहि कलमें महत्त्वाचीं होतीं. त्यांपैकीं कांहीं येथें देणें उचित होईल. (या तहावर शिवाजीनें ११ जून १६७४ रोजीं सही केली).

"(१) सर्व शत्रुत्व नष्ट व्हावें व उभयपक्षीं कोठल्याहि भागांत लूट करणें, छापे घालणें इत्यादि प्रकारें नुकसान करूं नये. (२) शिवाजीच्या राज्यांत इंग्रजांना संचार, रहिवास व व्यापार या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य असावें. इंग्रजांनीं नित्याच्या जकाती देऊन सरकारशीं आज्ञाधारकपणानें वागावें. शिवाजी राजाच्या प्रजेला मुंबई बेटावर याच प्रकारच्या सवलती असाव्या. (३) इंग्रजांनीं राजापुरास वाटेल तेव्हां येऊन रहावें. शिवाजी राजानें आपल्या खर्चानें त्यांच्याकरितां घर द्यावें. आयात-निर्यातीच्या वेळीं फक्त एकदांच जकात दिल्यावर मालाची वाहतूक करण्यास देशांत कोठेंहि हरकत करूं नये. (४) आयात-निर्यात मालावर शें. २॥ प्रमाणें जकात इंग्रजांनीं द्यावी. (५) राजापूरची वखार मोडकळीस आल्यामुळें तिची दुरुस्ती इंग्रजांनीं करून दुरुस्तीचा खर्च जकातींतून घ्यावा. (६) इंग्रजांची डच, पोर्तुगीज व इतर कोणाशीं लढाई जुंपल्यास इंग्रजांच्या शत्रूंना शिवाजीनें मदत करूं नये. (७) परस्परांचीं नाणीं परस्परांच्या मुलखांत चालावीं. (८) शिवाजी इंग्रजांच्या मुंबईतील प्रजेला ज्या सवलती देईल त्याच सवलती इंग्रजांनीं शिवाजीच्या सर्व प्रजेला द्याव्या."

वरील कलमांत दंडाराजपुरी घेण्याच्या कामीं शिवाजीला इंग्रजांनीं मदत करण्याचें कलम नाहीं. कदाचित् हें कलम घालणें इंग्रजांना सोयीचें नसावें. तसेंच इंग्रजांच्या शत्रूंना शिवाजीनें मदत करूं नये हें कलम आहे. त्याच्या उलट शिवाजीच्या शत्रूंना इंग्रजांनीं मदत करूं नये हेंहि कलम

नाहीं. सारांश, या तहांत शिवाजीपेक्षां इंग्रजांनाच झुकतें माप मिळाल्याचें स्पष्ट दिसतें.

नाण्यासंबंधाच्या वरील कलमास शिवाजीतर्फे असा आक्षेप घेण्यांत आला कीं, इंग्रजांचीं नाणीं मोगली नाण्याइतकींच चांगलीं झालीं तर लोक तीं आपखुषीनें घेतील; परंतु आपण तीं घेण्यास कोणाला भाग पाडणार नाहीं किंवा प्रतिबंधहि करणार नाहीं. पण इंग्रजांचीं नाणीं चांगलीं असल्यामुळें ३० मे १६७४ रोजीं इंग्रजांचा वकील ऑक्झिडेन रायगडावर असतां त्यानें कांहीं मोड आणविली, तींत मुंबईचे (इंग्रजांचे) पैसे पुष्कळ होते. यावरून इंग्रजांचीं नाणीं शिवाजीच्या राज्यांत त्याच वेळीं येऊं लागलीं होतीं (प. सा. सं. खंड २, पृ. ४९४).

तिसरी झटापट : सुरतेची पहिली लूट

राजापूरची खंडणी शिवाजीनें इ. स. १६६१ च्या मार्च महिन्यांत वसूल केली तेव्हां शाइस्ताखानाचा तळ पुण्यास पडला होता. त्याच्या जोडीला जसवंतसिंगहि लवकरच आल्यावर शिवाजी अधिकच संकटांत सांपडला. उत्तर कोंकण व देश या दोन्ही प्रांतांतील शिवाजीचा मुलूख ते जिंकीत सुटले. शिवाय विजापूरकरांनीं वैर सुरू ठेवलेंच होतें. या तीनहि शत्रूंत त्याचा बडा शत्रु म्हणजे शाइस्ताखान होय. तो दक्षिणेचा सुभेदार व औरंगजेबाचा मामा होता. त्याला हात दाखविल्यास मोगलांवर दरारा बसून कदाचित् ते आपला पिच्छा सोडतील व प्राप्त संकट हलकें होईल या समजुतीनें शाइस्ताखानावरील हल्ल्याचा धाडसी प्रयत्न शिवाजीनें केला. त्यांत खानास चांगलीच अद्दल घडली तरी शाइस्ताखान महाराष्ट्र लागलीच सोडून गेला नाहीं. तो पुण्यासच जून १६६३ पर्यंत होता. उलट मोगलांना अधिकच चेव येऊन ते सर्व बाजूंनीं शिवाजीवर उठले. त्यांचा उत्तर कोंकण जिंकण्याचा प्रयत्न चालू असून ते डिसेंबर १६६३ त कल्याण-भिवंडीवरून वसईपाशीं पोंचले होते. इकडे देशावर नोव्हेंबर १६६३ त जसवंतसिंग कोंढाण्यास वेढा घालून बसला होता. यांना तोंड देण्यास सैन्य वाढविणें शिवाजीस भाग असलें तरी त्यांचा रोजमुरा वेळच्या वेळीं पावता करणें अशक्य झालें. अशा रीतीनें सैनिक असंतुष्ट ठेवले तर युद्धांत यश येणार नाहीं व सैनिकहि लष्कर सोडून घरीं बसतील अशा आर्थिक तंगीनें

शिवाजी हैराण झाला. यावर तत्काल पैका मिळविण्याचें साधन म्हणजे राजापूरचीच आवृत्ति सुरतेस काढणें हें होय.

' सुरतेची सुरत घेतली '

' सुरतेची सुरत घेतली ' म्हणून मोगल वसईच्या बाजूस असतां व जसवंतसिंग सिंहगडास वेढा घालून बसला असतां त्यांस झुकांडी देऊन शिवाजी सुरतेच्या रोखानें ६ डिसेंबर १६६३ रोजीं निघाला. हा बेत या कानाचा त्या कानास त्यानें कळूं दिला नाहीं. तो कळल्यास मोगल सावध होऊन त्यांनीं सुरतेच्या संरक्षणाची जय्यत तयारी केली असती. सबब शिवाजी हुलकावण्या दाखवीत ५ जानेवारी १६६४ रोजीं सुरतेपासून १५ कोसांवर घणदेवीस आला. पण घणदेवीहून तो सुरतेवर येईल असें कोणाच्या ध्यानींमनींहि नव्हतें. घणदेवीहून तीन दिवसांनीं म्हणजे ८ जानेवारी रोजीं सुरतेबाहेर दोन कोसांवर त्यानें मुक्काम केला. त्याबरोबर सुरतकरांचे चक्क डोळे उघडून भावी संकटाची त्यांस कल्पना आली. पण त्यास तोंड देण्याचा संघटित प्रयत्न सुरतेच्या सुभेदारानें वा पुढाऱ्यांनीं मुळींच केला नाहीं. शिवाजीचा बेत सुरत लुटण्याचा प्रारंभीं नव्हता. त्याला स्वराज्य-स्थापनेकरितां निधि पाहिजे होता. तो सुरतकरांनीं निमुटपणें त्यास पोंचतां केला असता तर शिवाजीनें त्यांच्या केसालाहि धक्का लावला नसता. कारण त्याला लोकमत प्रतिकूल करावयाचें नव्हतें. म्हणून त्यानें सुरतेच्या वेशीपाशीं आल्यावर तेथील सुभेदार इनामतखान यास निरोप पाठविला. सुरतेचे हाजी सय्यद बेग, वीरजी व्होरा व हाजी कासम हे नगरशेट होते. त्यांनीं आपणांस भेटून मिळावयाच्या खंडणीचा ठराव करावा असें त्यानें सुभेदारास कळविलें. हिंदु व मुसलमान या दोन्ही जमातींच्या पुढाऱ्यांची निवड करण्यांतील त्याचा स्पष्ट हेतु हा होता कीं, नगरांत ते स्वराज्यनिधि गोळा करावयास हिंडूं लागतील तेव्हां त्यांजबरोबर सर्वांनीं सहकार्य करून आपला मतलब बिनबोभाट साधावा. हें न कराल तर शहरास आगी लावून व तलवार चालवून आपला हेतु तडीस न्यावा लागेल असा त्यानें त्यांस इशाराहि देऊन ठेवला. पण ही अक्कल भ्याड सुभेदारास न सुचून सुरतेच्या बचावाची कांहींहि तरतूद न करतां तो किल्ल्यांत लपून बसला व सुरतेच्या नागरिकांस त्यानें वाऱ्यावर सोडून दिलें.

सामोपचाराचा प्रयत्न

सुरतेस देशी व्यापाऱ्यांप्रमाणें इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज, तुर्क, आर्मीनियन यांसारख्या परदेशी व्यापाऱ्यांच्याहि पेढ्या होत्या. तेव्हां स्वदेशी व्यापाऱ्यांस बोलावूनहि त्याचा कांहींहि उपयोग झाला नाहीं असें दृष्टीस पडल्यावर शिवाजीनें परदेशी व्यापाऱ्यांनाहि आपला हेतु आगाऊ कळविण्याची संधि दवडली नाहीं. इंग्रज लोकांशीं तीन वर्षांपूर्वीपासून वैर आलें असल्यामुळें त्यांच्या बाबतींत शिवाजी विशेषच सावध होता. त्यानें त्यांस स्पष्ट सांगितलें कीं, 'माझा इंग्रज वा इतर व्यापारी यांच्याशीं व्यक्तिशः द्वेष नाहीं. औरंगजेबानें माझ्या मुलुखावर स्वाऱ्या करून माझें फार नुकसान केलें आहे. त्याचा सूड उगवावयाचा आहे. यासाठीं इंग्रजांनीं मला तीन लाख रुपये खंडणी द्यावी. किंवा हाजी सय्यद बेग या नगरशेटास पाठीशीं न घालतां मला त्याची वखार लुटूं द्यावी!'

हाजी सय्यद बेग

सुरतेंत वखारींचा वेगळा टापू असून त्यांत इंग्रज, डच आदिकरून परदेशीयांच्या वखारी होत्या. हाजी सय्यद बेग याचें घर इंग्रजांच्या वखारीशेजारीं असून त्याच्या घराचा व आसपास पाव मैलांतील दुकानांचा इंग्रजांनीं बंदोबस्त ठेवला होता. तरीसुद्धां मराठ्यांनीं हाजी सय्यदाचें घर फोडून लुटलेंच आणि इंग्रजांनीं शिवाजीच्या पहिल्या निरोपास उत्तरहि पाठविलें नाहीं. इतकेंच नव्हे तर शिवाजी ५ जानेवारी रोजीं सुरतेस आला, त्याच्या दुसऱ्या दिवशीं म्हणजे बुधवार दि. ६ रोजीं इंग्रजांच्या प्रेसिडेंटानें सकाळीं १० वाजतां नागरिकांस धीर येण्याकरितां दोनशें इंग्रज व इतर शिपाई यांची किल्ल्याजवळच्या मैदानांतून मिरवणूक काढली व शिवाजी-वर आपण हल्ला करण्यास तयार आहों असें जाहीर केलें. तसेंच डचांच्या वखारीवर येऊन त्यांचा बंदोबस्त कसा आहे याची त्यानें पाहणी केली. डचांनीं आपल्या वखारींवर तोफा ठेवल्या असल्यामुळें मराठे त्या बाजूस फिरकले नाहींत.

इंग्रजांची धमकी

इंग्रजांनीं शिवाजीच्या मागणीस भीक घातली नाहीं तेव्हां शिवाजीनें त्यांचें नाक दाबण्याची एक युक्ति काढली. मध्यंतरीं अँथनी स्मिथ या

नांवाचा एक इंग्रज नोकर सुरतेजवळच्या समुद्रावरील स्वाली बंदराकडून सुरतेकडे येत होता. त्याला मराठ्यांनीं कैद करून शिवाजीपुढें नेलें व त्याजपासून तीनशें रुपये दंड घेऊन इंग्रजांवर दडपण आणण्याकरितां त्यास आपल्या शिपायांच्या ताब्यांत देऊन इंग्रजांकडे पाठविलें. त्यानें शिवाजीचा निरोप आपल्या देशबंधूंस सांगितला. पण तो त्यांनीं न जुमानतां शिवाजीस उलट कळविलें, 'एका इंग्रजास अडकवून ठेवणें, आमच्या तबेल्यांतून आमचा घोडा घेऊन जाणें व जकातीच्या नाक्यापुढील आमचा माल लुटणें या शत्रुत्वाच्या आगळिकी तुम्हीं केल्या असल्यामुळें तुम्हांवर विश्वास न ठेवतां पुन्हा बोलणें करण्यास जर तुमचा कोणी माणूस आम्हाकडे येईल तर त्याचें डोकें उडविलें जाईल.'

हें उत्तर आल्यावरहि शिवाजीनें आपला आग्रह सोडला नाहीं. त्यानें स्मिथकडून इंग्रज प्रेसिडेंटाला दहशतीचें पत्र पाठविलें. तेंहि इंग्रजांनीं कस्पटासमान मानलें. स्मिथचें डोकें उडविण्याचीहि तयारी त्यानें दर्शविली, तरी इंग्रज बधले नाहींत. अखेर शेवटचा इलाज म्हणून शिवाजीनें स्मिथला इंग्रज व डच यांजकडे परवलीवर पाठविलें. या वेळीं इंग्रज इतके शिरजोर बनले होते कीं, त्यांनीं स्मिथला शिवाजीकडे परत जाऊं न देतां ठेवून घेतलें आणि 'तुजवर आमचा विश्वास नाहीं' असें शिवाजीस कळविलें.

सुरतेंत निकोलस कॅलोस्ट्रा या नांवाचा एक ग्रीक व्यापारी होता. त्याजबरोबर गुरुवार दि. ७ जानेवारी रोजीं एक घोडेस्वार देऊन शिवाजीनें इंग्रजांकडे बोलणें करण्याकरितां पाठविला. तो वखारींत आल्यावर पोर्तुगीज भाषेंत सांगूं लागला, 'शिवाजीला सैन्याच्या खर्चाकरितां पैसा पाहिजे आहे. म्हणून तुम्ही कांहीं रक्कम द्यावी. न दिल्यास तो हें शहर जाळून टाकील.' त्याजपाशीं डायरेक्टरानें उलट निरोप पाठविला, 'आम्ही व्यापारी लोक. आम्ही आपला पैसा जवळ ठेवीत नाहीं. तुम्हांस चालत असेल तर कांहीं कापड व मसाला नजराणा म्हणून आम्ही देऊं.' तथापि एकंदरींत सुरतेच्या या लुटींत इंग्रजांना म्हणण्यासारखी झळ लागली नाहीं. त्यांचें नुकसान १ हजार पौंडांपेक्षां अधिक झालें नाहीं.

लुटीची रेलचेल

सुरतेचे तीन नगरशेट शिवाजीनें निवडले होते. त्यांपैकीं हाजी

सय्यद याची वखार लुटून त्यानें दिलेल्या नकाराचें प्रायश्चित्त त्यास मिळालें. दुसरा नगरशेट वीरजी व्होरा. तें सुरतेंतील बडें प्रस्थ होतें. त्याचें अत्यंत भव्य मंदिर भस्मसात् झालें. त्यांतच सोनें, मोहरा, मोती, हिरे वगैरेंनीं भरलेलीं पांच पिपें नाश पावलीं. तरीसुद्धां तो ८० लाखांचा धनी समजला जात असल्यामुळें त्याच्या एकट्याच्या पेढीवरूनच शिवाजीला २०।२५ लाखांची लूट मिळाली. सुरतेंतील दंगल वाढलेली पाहून दोन बनिया (व्यापारी) आपले जडजवाहीर घेऊन तापी नदीच्या पैलतीरीं जाणार होते. त्यांना सुभेदारानें परवानगी न दिल्यामुळें त्यांचीं सोनें भरलेलीं तीस पिपें शिवाजीला आयतींच मिळालीं.

शिवाजीला सुरतेच्या सुभेदारानें वा पुढाऱ्यांनीं सुसंघटित प्रयत्नानें द्रव्यसाहाय्य न दिल्यामुळें त्याला जबरदस्तीनें नागरिकांचें द्रव्यहरण करावें लागलें हें खरें आहे. सामान्य नागरिकांपैकीं पैसा मागतांच ज्यांनीं दिला त्यांना शिवाजीकडून उपसर्ग न पोंचावा हें स्वाभाविक होय. परंतु ज्यांनीं तो देण्याचें नाकारलें त्यांजवर जुलूमजबरदस्ती झाली असली पाहिजे. एकदां सैनिक नगरांत द्रव्य गोळा करण्याकरितां इतस्ततः हिंडूं लागल्यावर ठिकठिकाणीं प्रतिकार व मारामाऱ्या, जाळपोळ व अत्याचार व्हावे हा नैसर्गिक परिणाम आहे. त्यांतच गुंडांनीं शिरून घरें लुटलीं असतील व आगीहि लावल्या असतील. तथापि त्यामुळें तीन हजार घरें जळालीं हें सुरतेचा इंग्रज अधिकारी हेन्री गॅरी यानें केलेलें वर्णन भडक असलें पाहिजे. कारण यांतील बरीच माहिती ऐकीव व इंग्रजांनीं द्वेषबुद्धीनें व संतापानें पराचा कावळा करून लिहिलेली असणार. अँथनी स्मिथ शिवाजीस सांपडला, त्याला एका सकाळच्या वेळांत पंचवीस हात कापलेले व कित्येक डोकीं धडावेगळीं केलेलीं दिसलीं ही माहिती यापैकींच होय.

शिवाजी ५ जानेवारी रोजीं सुरतेस आला व १० जानेवारी रोजीं निघून गेला. या पांच दिवसांत त्याचा मुक्काम सुरतेपासून दोन कोसांवर रानांत होता. त्याच्यापाशीं तंबू, डेरे, राहुट्या, कनाती यांपैकीं कांहींच नव्हतें. जानेवारी म्हणजे ऐन थंडीचे दिवस. त्यांतून ती गुजराथेंतील थंडी, महाराष्ट्रांतल्यापेक्षां कडक. अशाहि थंडींत त्याचे ८।१० हजार सैनिक रात्रंदिवस उघड्यावर राहत होते. खुद्द शिवाजीलासुद्धां तंबू नसून तो

एका झाडाखालीं राहत असून दिवसां सावलीकरितां त्या झाडावर फक्त एक पासोडी टाकलेली असे. त्याजपुढें लुटींतील जिनसांच्या राशी सैनिक एका-मागून एक येऊन ओतीत असत व शिवाजी त्यांतील सोनें, नाणीं ठेवून घेऊन बाकीच्या चिल्लर जिनसा सैनिकांस लागलीच बक्षिसादाखल देऊन टाकीत असे. औरंगजेबानें त्याला अतिशय सतावून सोडल्यामुळें त्याचा त्यानें अशा रीतीनें सूड उगवला व सुरत सोडतांना तो म्हणाला, 'औरंग-जेबाच्या सुरतेची सुरत घेण्याचा माझा फारा दिवसांचा हेतु होता, तो आज सफळ झाला.' सुरतेपासून शिवाजीला किती प्राप्ति झाली याचा नक्की आंकडा उपलब्ध नाहीं. परंतु वर दिलेल्या वर्णनावरून त्यास पन्नास लाखां-वर तेथें लूट मिळाली असावी असें वाटतें.

सुरतेच्या लुटीचें विस्तृत वर्णन डच व इंग्रज यांनीं लिहिलेल्या पत्रांच्या आधारें (प. सा. सं. खंड १, पृ. २४१, २४२, २४३, ते २५४) देण्यांत आलें आहे. सभासदानेंहि लुटीची संक्षिप्त हकीकत लिहिली आहे. तीहि तुलनेसाठीं येथें उद्धृत करण्यासारखी आहे.

बहिर्जी नाइकाची करामत

बहिर्जी नाईक जाधव हा शिवाजीचा एक बिलंदर हेर होता. त्यानें सुरतेहून बातमी आणली : "सुरतेहून पाळती बहिरजी जासूद आला कीं, सुरत मारिल्यानें अगणित द्रव्य सांपडेल" असें सांगितलें. त्याजवरून राजे यांनीं विचार केला, 'लष्कर चाकरी, नफरी, काम मनाजोगें होणार नाहीं. याजकरितां जावें तरी आपण खासा लष्कर घेऊन जावें. असा विचार केला. आणि मकाजी आनंदराव म्हणजे महाराज शहाजी यांचा फरजंद पाळलेला व वेंकाजी दत्तो ब्राह्मण मोठे लष्करी नामोशाचे सरदार हे महाराजांकडून सेवा सोडून राजियाकडे आले होते. त्यांस राजियांनीं नांवाजून पागेच्या पंच हजाऱ्या सांगितल्या; आणि प्रतापराव सरनोबत व वेंकाजी दत्तो व आनंदराव व वरकड सरदार दहा हजार पागा व दहा हजार शिलेदार असे वीस हजार जमाव लष्कर, तसेच सात पांच हजार मावळे लोक निव-डक व सर कारकून मोरोपंत पेशवे व निळोपंत व अण्णाजीपंत व दत्ताजी-पंत व बाळ परभु चिटणीस असे बरोबर घेतले. कोळवणांतून नीट सुरतेस पांच गांव, सात गांव एक मजल करून एकाएकीं सुरतेस पावले. सुरतेचे लोक

गैरहुशार होते. चढे घोड्यानिशी सुरतेच्या दरवाजाजवळ पेठेंत लष्कर शिरलें. मोंगलांचीहि फौज पुढें आली. मोठी मारामारी जाहली. तांब्राकडील बहुत लोक मारले. आणि सावकारांचे वाडे काबीज करून सोनें, रुपें, मोतीं, पोंवळे, माणिक, हिरे, पाच, गोमेदराज, वैडूर्य, अशीं नवरत्नें, नाणें, मोहोरा, पुतळ्या, इभ्राम्या, सतराम्या, असफ्या (निरनिराळ्या बादशहांचीं सुवर्णाचीं नाणीं), होन, नाणें नाना जातींचें इतक्या जिनसांच्या थोकव्या भरल्या. कापड, भांडें, तांब्याचें वरकड जिन्नस यांस हात लावलाच नाहीं.

"असें शहर दोन दिवस अहोरात्र लुटिलें. उत्तम घोडे जितके युद्धांत व सावकारांच्या घरांत सांपडले तितके घेतले. आणि राजियांनीं विचार केला कीं, लौकर निघून जावें. असें करून कुल लष्करांतून निमे घोडीं भांडावयास लष्करांत ठेवलीं. निमे घोड्यांवर मालाच्या थोकव्या घातल्या. पाईच्या लोकांस हमेण्या (लांब पिशव्या) करून त्यांजजवळ दिधल्या. अशी मुस्तेदी करून ओझीं घेऊन निघाले. सुरतेचा कोट घेतला नाहीं. अवकाश थोडा म्हणून शहर मारून चालिले." सभासदाचें हें वर्णन त्याच्या इतर वर्णनाप्रमाणेंच अतिरंजित आहे. त्याचें तात्पर्य तेवढेंच घ्यावयाचें. चिं. वि. वैद्य आपल्या शिवचरित्रांत लिहितात –

"शत्रूचीं गांवें लुटण्याची ही पद्धति त्या काळीं जगभर होती. तिला ख्रिस्ती राष्ट्रेंहि अपवाद नव्हतीं. इतिहासकाळांत रोम शहर ३।४ वेळां लुटलें गेलें. त्याची शेवटची लूट सुरतेच्या लुटीपूर्वी सुमारें सवाशें वर्षें स्पेन व जर्मनी या देशांचा बादशहा पांचवा चार्ल्स यानें इ. स. १५२७ त केली. त्याचें वर्णन 'इतिहासकारांचा जगाचा इतिहास, भाग ९ – इताली' पान ४५८ वर दिलें आहे. "ह्या शहरांत अनेक वर्षांपासून संपत्ति जमत चालली होती व अनेक श्रीमंत लोक राहत होते. त्यांचे व सर्व कार्डिनल (रोमन कॅथोलिक पंथाचे महंत) लोकांचे वाडे लुटले गेले. एका धर्मगुरूस उघडेंबोडकें करून तडाखे देत शहरांतून मिरविण्यांत आलें. मिनर्व्हा व पानगेटी येथील कार्डिनलांसाहि त्याच रीतीनें धिंड काढीत मिरविण्यांत आलें." पण त्याहिपेक्षां भयंकर गोष्ट म्हणजे "चारहि बाजूंनीं रोममधील सभ्य स्त्रिया व भिक्षुणी ह्यांच्याबर जर्मन सैनिकांनीं जबरी केल्यामुळें त्यांच्या

निघालेल्या किंकाळ्या व रडणें ऐकूं येत होतें. त्याप्रमाणेंच सर्वत्र जे लोक खंडणी उकळण्यासाठीं पिटले जात त्यांजकडून लपवून ठेवलेलें द्रव्य दाखविण्यासाठीं त्यांस मारहाण करण्यांत येत असे. त्यांच्याहि आरोळ्या ऐकूं येत होत्या " (चिं. वि. वैद्यांचें शिवचरित्र, पृ. ७७).

या प्रकाराशीं तुलना करतां शिवसेनेनें सुरतेंत केलेले अत्याचार कांहींच नव्हते. तिनें धार्मिक छळ तर कोणाचा केला नाहींच, पण स्त्रियांवर बलात्कार व जुलूमजबरदस्तीहि त्यांजकडून घडली नाहीं.

चौथी झटापट : सुरतेची दुसरी लूट

इ. स. १६६४ च्या जानेवारी महिन्यांत सुरतेवरील स्वारीमध्यें इंग्रजांशीं तिसऱ्यांदा झटापट करण्याचा प्रसंग शिवाजीस आला. शिवाजीनें राजापुराची लूट केली, त्यापूर्वी अफजलखानास शिताफीनें वधण्याचा अजब चमत्कार त्यानें करून दाखविला. सुरतेच्या पहिल्या लुटीपूर्वी शाइस्ताखानाचीं बोटें तोडून त्यानें दुसरा अजब चमत्कार करून दाखविला. त्या योगानें त्याचें वजन व दरारा पुष्कळच वाढला. सुरतेची पहिली लूट झाल्यावर दुसरी लूट करण्यापूर्वी सहा वर्षे गेलीं. त्या अवधींत आग्ऱ्याहून औरंगजेबासारख्या दगलबाजालाहि चकवून त्याच्या दाढेंतून निसटून जाण्याचा तिसरा चमत्कार शिवाजीनें जगास दाखविला. त्यामुळें थक्क होऊन जगानें तोंडांत बोट घातलें. या सहा वर्षांत शिवाजीचें वजन, दरारा व सामर्थ्यहि पुष्कळ वाढलें. त्याबरोबर त्याचा व्याप व जबाबदारीहि वाढली. एकाहून एक वरचढ अशीं संकटें त्याजवर गुदरलीं. शाइस्ताखान व जसवंतसिंग ही दुकल शिवाजीनें घेतलेला मुलूख जिंकण्यासाठीं जिवापाड मेहनत करीत होती. ती थकून गेल्यावर, दिलीरखान व जयसिंग ही ताज्या दमाची जोडी रणांगणावर पातली. तिच्यापुढें शिवाजीची हिकमत चालेनाशीं झाल्यामुळें त्यानें मोगलांना आपला बराच मुलूख व कोटकिल्ले देऊन टाकले. त्याला औरंगजेबाकडे आग्ऱ्यास नाक मुठींत धरून भेटीस जावें लागलें. तेथून परत आल्यावर गेलेला मुलूख व गड हिसकावून घेण्यासाठीं मनुष्यबळ व द्रव्यबळ यांच्या आहुति द्याव्या लागल्या. अशा स्थितींत खर्चाखालीं झालेली ओढाताण थांबविण्याकरितां

इ. स. १६७० च्या ऑक्टोबर महिन्यांत त्याला सुरतेकडे पुन्हा नजर फिरवावी लागली.

तो कल्याण-भिवंडी दुसऱ्यांदा लुटून कोळी राज्यांत शिरला. तेथून वसई व पोर्तुगीजांचा इतर मुलूख जवळ होता. त्यांत अरण्य फार दाट होतें. अशा अरण्यांत शिवाजी येईल अशी रामनगरच्या राजाला कल्पनाहि नव्हती. पण त्यांतहि शिवाजी शिरतांच कोळी राजा गुहेंत जाऊन लपला. पण त्याला शिवाजीच्या लोकांनीं धरून त्याजपुढें हजर केलें. राजानें शिवाजीचें आधिपत्य कबूल करून खंडणीहि देण्याचें मान्य केलें. तें पाहून शिवाजीनें त्यास बहुमानपूर्वक सोडून दिलें. तेथून शिवाजी दमणजवळील चौंतियाच्या राज्यांत गेला. तेथील राजा शूर, भिल्ल जातीचा व अरण्यांत राहणारा होता. पण रामनगरच्या राजाची झालेली अवस्था जाणणारा हा राजा शिवाजीस विरोध न करतां शिवाजीस सामोरा गेला व त्यास त्यानें मोठा मूल्यवान् नजराणाहि केला. त्याजकडूनहि खंडणी कबूल करून शिवाजी वाटेंत पोर्तुगीजांच्या मुलखांत शिरला. या मुलखांतून जातांना कोणींहि झाडाच्या पानालाहि हात लावूं नये अशी त्यानें आपल्या सैनिकांस आज्ञा केली होती. पोर्तुगीज राज्य व मोगली राज्य यांच्या सीमेवर खाडी होती ती ओलांडून शिवाजी मोगली राज्यांत शिरला. तेथून सुरत ४८ मैलांवर होती. शिवाजीचा बेत सुरतेवर एकाएकीं छापा घालावा असा होता. पण त्याच्या आगमनाची बातमी आगाऊच फुटून लोक सावध झाले होते (कास्म ड गार्डा).

शिवाजी ऑक्टोबरच्या ३ तारखेस सुरतेजवळ आला. त्याजपाशीं या खेपेसहि फौजफाटा फार मोठा होता. घोडदळ व पायदळ मिळून त्याचें सैन्य पंधरा सहस्रांपर्यंत होतें. युरोपियन वखारवाले तयारीनें होते. पण तो येतांच इतर लोक रस्त्यांतून उघडे-वाघडे इतस्ततः कांहीं न सुचल्यानें पळत सुटले. मोगल अंमलदार मात्र त्यांच्या स्वभावाप्रमाणें गाफील व सुस्त होते. तेथील सुभेदारापाशीं सुरतेचें रक्षण करण्यास अवघे तीनशें लोकहि नव्हते. शिवाजीनें येतां क्षणींच सुरतेच्या तटबंदीस सर्व बाजूंनीं वेढा घातला. त्याबरोबर मोगल अधिकारी भेदरले. असे भ्याड लोक शिवाजीशीं लढाई तरी काय देणार! थोडीशी चकमक

झाली नाहीं तोंच शहर शिवाजीच्या ताब्यांत आलें. मोगल सैनिक पळून, किल्ल्यावर तोफा ठेवल्या होत्या त्यांच्या आश्रयास गेले. शिवाजीला सुरत कायमची जिंकून घ्यावयाची नसल्यामुळें किल्ल्याकडे दुर्लक्ष करून आपला मुख्य कार्यभाग तो उरकून घेऊं लागला.

मागील खेपेस शिवाजीनें सुभेदारास निरोप पाठवून खंडणीची रक्कम ठरविण्याकरितां तिघां नगरशेटांना आपणांकडे धाडा असें कळविलें होतें. पण तें कोणीच न ऐकल्यामुळें तेव्हां 'सुरतेची सुरत गेली.' त्या अनुभवापासून योग्य तो बोध घेऊन शिवाजीला खंडणी देण्याची तजवीज सुभेदार वा पुढारी यांनीं ताबडतोब या खेपेस केली असती तर सुरतेची धूळधाण झाली नसती. कारण शिवाजीनें या खेपेस सुरत सोडून जाण्यापूर्वी तेथील मुख्य अधिकारी व प्रमुख व्यापारी यांना पत्रानें कळविलें कीं, दरसाल तुम्हीं मला बारा लाख रुपये खंडणी देत जावी. ती न द्याल तर पुढच्या वर्षी सुरतेचा उरलेला भाग मी जाळून टाकीन. म्हणून एवीतेवीं देणें चुकत नाहीं हें लक्षांत घेऊन या वेळीं सुरतकरांनीं वागावयास नको होतें काय?

इंग्रजांची सावधगिरी

असो, पण इंग्रज फार सावध व दूरदर्शी. त्यांनीं शिवाजीची स्वारी येणार अशी कुणकुण लागतांच आपला बांधलेला सर्व माल सुरतेंतून काढून स्वाली बंदरांत नेऊन ठेवला व फक्त सुटा माल तेवढाच सुरतेच्या वखारींत राहूं दिला. शिवाजीचें सैन्य दि. ३ ऑक्टोबर रोजीं सुरतेस आलें. त्याच्या आदल्या दिवशीं रात्रीं इंग्रज अधिकारी मास्टर हा स्वालीहून सुट्या मालाच्या रक्षणाकरितां सुरतेस आला. आणि वखारींतील लोकांना जरूर पडल्यास सुरतेहून तापीच्या खाडींतून स्वालीस जाण्याकरितां बंदरांत त्यानें एक गलबतहि तयार ठेवलें. पहिल्याच दिवशीं इंग्रजांची वखार व तातारांची जुनी सराई यांजवर शिवाजीनें हल्ला केला. इंग्रजांवरील हल्ल्यांत शिवाजीचे कांहीं सैनिक मेले व सबंध दिवस वखारीवर गोळी चालवूनहि इंग्रजांपुढें कांहीं इलाज चालत नाहीं असें अनुभवास आल्यावर त्यांचा नाद त्यानें सोडला. जुन्या सराईवर त्यानें हल्ला चढविला तेव्हां तार्तरीचा राजा सराईत असल्यामुळें त्याच्या लोकांनीं प्रारंभीं जोराचा प्रतिकार केला. पण शिवाजीस फ्रेंचांकडून दारूगोळा मिळाल्यावर तातारांचा नाइलाज

होऊन त्यांनीं रात्रीं आपल्या राजाला सुरतेच्या किल्ल्यांत नेऊन ठेवलें व आपण सराई सोडून गेले. ते गेल्यावर शिवाजीला तेथें सोनें, रुपें, मूल्यवान पदकें, सोन्याचा पलंग वगैरे वस्तु मिळाल्या.

जुन्या सराईंत बरीच संपत्ति हस्तगत झाल्यावर शिवाजी नव्या सराईकडे गेला. तींत इराणी व तुर्की रक्षक होते. त्यांजपुढें शिवाजीची डाळ शिजली नाहीं. इंग्रजांवर केलेला हल्ला फसल्यावर शिवाजीनें आपलीं कांहीं माणसें इंग्रजांशीं सलोख्याचें बोलणें करण्यास पाठविलीं. त्या वेळीं इंग्रज अधिकारी मास्टर हा रागावलेला दिसला. तो म्हणाला, "इंग्रज व शिवाजी यांचें मुंबईंत सख्य असतां त्यानें सुरतेंत तेवढें आपल्याविरुद्ध कां वागावें?" त्यावर मराठा सेनापतीनें त्याची समजूत घालून आपल्यातर्फे एक जाणता माणूस शिवाजीकडे धाडण्याचा त्यास सल्ला दिला. त्याप्रमाणें त्यानें एक इसम शिवाजीस भेटण्यास पाठविला. त्याची भेट झाल्यावर उभयपक्षीं जाऊन-येऊन बरीच वाटाघाट करण्यांत आली. अखेर शिवाजीच्या प्रतिनिधीनें, शिवाजीहि त्याचे सैनिक मधल्या चकमकींत मारले गेल्यामुळें चिडला असून त्याजकडे कांहीं नजराणा पाठविल्यास त्याचा राग शांत होईल, असें सांगितल्यावरून मास्टरनेंहि नजराणा पाठविला. नजराणा घेऊन आलेल्या माणसांचें गोड स्वागत करून शिवाजी म्हणाला, 'आपण व इंग्रज मित्र आहों.' आणि त्यांच्याशीं हस्तांदोलन करून 'माझा हा हातच (लेखी) कौलापेक्षां अधिक आहे' असें त्यांस आश्वासन दिलें. अशा रीतीनें कौल दिल्यावर शिवाजीनें इंग्रजांना पुनः दुखविलें नाहीं. आाणि सभोवारच्या शहराची अपार लूट करून शिवाजी तिसऱ्या दिवशीं शहर सोडून निघून गेला.

फ्रेंच व डच

फ्रेंच व डच यांच्या वाटेस शिवाजी गेला नाहीं. शिवाजीच्या मुलखांत फ्रेंचांनीं आपली वखार घातली असल्यामुळें शिवाजीनें सुरतेवर जाण्यापूर्वीच 'तुमच्या रक्षणाची काळजी घेतली जाईल' असें त्यांस कळविलें होतें. नगरांत आल्यावर शिवाजीच्या सैनिकांनीं त्यांच्या वखारीला वेढा घातला व दंगा माजविला, पण त्यांचें नुकसान केलें नाहीं. डच लोक आधींपासून सावध होते. त्यांनीं आपली मालमत्ता व बायकामुलें खालीला

पाठवून आपले फक्त ३५ इसम वखारींत ठेवले होते. शिवाजीकडून त्यांजकडे कळविण्यांत आलें कीं, 'तुम्ही गप्प बसाल तर तुम्हांस कांहींहि त्रास पोंचणार नाहीं. मात्र शहरांतील मुख्य व्यापाऱ्यांकडून पैसा काढण्याचा उत्तम मार्ग सुचवाल तर मी आपला आभारी होईन.' त्यावरून शिवाजी स्वभावतः जनतेशीं वागण्यांत कसा शांततेचा भोक्ता होता हेंच कळून येतें.

तार्तरांच्या राजाप्रमाणें काशगरचा राजाहि शिवाजीच्या तावडींत सांपडला होता. तो शिवाजीच्या भीतीनें सराई सोडून गेल्यावर त्याची सर्व संपत्ति शिवाजीच्या हातीं पडली. नंतर शिवाजी आपण होऊन सुरत सोडून निघून गेला.

प्रकरण चोविसावें

शिवाजी, सिद्दी व इंग्रज

सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धमीदृशम् ।

– श्रीमद्भगवद्गीता

विजापूरकरांशीं शिवाजीचा तह सन १६८० च्या प्रारंभीं झाला. त्यानंतर उभयतांचा युद्धप्रसंग शिवाजीच्या हयातींत घडून आला नाहींच, पण शिवाजीच्या पश्चातहि विजापूरकर व मराठे परस्परांशीं लढले नाहींत. अशा रीतीनें उभयतांच्या वैरभावास शिवाजीनें पूर्णविराम दिला असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिवाजीस हें प्रकरण जसें कायमचें मिटवितां आलें तसें सिद्दी-प्रकरण निकालांत काढण्याचें साधलें नाहीं. शिवाजीच्या कारकीर्दींत तें दोन तपें वारंवार डोकें काढीत होतें आणि सिद्दी व शिवाजी यांच्या वारंवार लढाया होत होत्या. शिवाजीच्या अंतकाळींहि तें प्रकरण न संपल्यानें त्या काळापर्यंतचा समग्र इतिहास देण्यास हें अंतकाळापूर्वीचें स्थळ योग्य असें जाणून त्याचा अथपासून इतिपर्यंतचा वृत्तान्त येथें देण्याचें योजिलें आहे. त्यांत इंग्रजांचाहि सिद्दीचे साथीदार या नात्यानें संबंध आला असल्यामुळें त्याचाहि परिचय याच संदर्भांत वाचकांस करून देण्यांत येत आहे. मात्र सिद्दी व इंग्रज यांजमधील फरक हा कीं, जंजिऱ्याच्या सिद्दीशीं चालू असलेलें भांडण संपलें नाहीं; पण इंग्रजांनीं मात्र शिवाजीशीं तह करून आपल्यापुरतें तें संपवून घेतलें.

दंडाराजपुरीचा जलदुर्ग (जंजिरा) हें कोंकणांत एक मोक्याचें ठिकाण आहे. त्याजपाशीं राजपुरीची मोठी खाडी असून त्या खाडीच्या तोंडाशींच भर समुद्रावर हा जलदुर्ग बांधण्यांत आला आहे. राजपुरी ही अलीकडे सिद्दींची राजधानी होती. पण राजधानीचा हा मान दंडाराजपुरीस दीड सहस्र वर्षांपूर्वींपासूनच मिळाला आहे. त्या वेळीं मौर्य नामक एका राजघराण्याची ती राजधानी असून तिजवर बदामीचा प्रसिद्ध चालुक्य सम्राट् पुलकेशी दुसरा यानें स्वारी करून मौर्य राजाचा पराभव केला होता. त्याचें राज्य उत्तर

कोंकणावर होतें. त्याच्याच वंशापैकीं जावळीचा चंद्रराव मोरे हा असावा.

जंजिऱ्याचा सिद्दी हा प्रथम अहमदनगरच्या निजामशाहीचा नोकर होता. शहाजहान बादशहानें निजामशाही बुडविल्यावर सिद्दी विजापूरच्या आदिलशाहीचे नोकर झाले. पण त्यांजवर आदिलशाहीची हुकमत नाममात्रच असल्यामुळें सिद्दी हे प्रायः स्वतंत्रच होते. शिवाजीच्या कारकीर्दीस सुरुवात झाली तेव्हां फत्तेखान हा सन १६४८ ते १६६७ पर्यंत जंजिऱ्याचा सुभेदार होता व त्याजपाशीं सिद्दी खैर्यत, सिद्दी संबूल व सिद्दी कासीम हे तिघे गुलाम होते. फत्तेखान हलकट व व्यसनी निघाल्यामुळें सर्व राज्यकारभार हे त्रिवर्ग सिद्दीच पाहत असत. शिवाजीनें सन १६५६ त जावळी घेतल्यावर कोंकणांत अंमल बसविण्यास प्रारंभ केला. त्यास मुख्य अडथळा सिद्दींचा होत असल्यामुळें त्यांचें दंडाराजपुरींतून उच्चाटन करण्याचें त्यानें ठरविलें. घरांत जसा उंदीर तसा राजपुरीचा सिद्दी शिवाजीस वाटत होता. त्यानें प्रथम सन १६५८ त रघुनाथ बल्लाळ सबनीस याजपाशीं ५।६ हजार फौज देऊन त्यास सिद्दीवर पाठविलें. त्यानें सिद्दीचा मुलूख जिंकून जंजिऱ्याला वेढा घातला. या वेळीं जंजिरा हस्तगत झाला नाहीं, तरी रघुनाथपंतानें सिद्दीशीं तह करून, सिद्दी मराठ्यांच्या मुलखास त्रास देत होता तो कांहीं काळ थांबविला.

शामराजाची नामुष्की

पण त्यानंतर सिद्दी पुनः मराठ्यांच्या मुलखांत शिरून लूटमार करूं लागला. म्हणून सन १६५९ त शामराजपंत पेशवे व बाजी घोलप यांची शिवाजीनें जंजिऱ्यावर रवानगी केली. त्यांचा संग्राम सिद्दी खैर्यत व सिद्दी कासीम यांजबरोबर तळें येथें झाला. त्यांनीं तळयास वेढा घालून दोघां सिद्दींना कोंडून टाकलें. ते तेथें जनानखान्यांत लपून बसून बहुधा स्त्रियांचें सोंग घेऊन तळयाहून निसटले व जंजिऱ्यांत गेले. तेव्हां शामराजपंत जंजिऱ्यावर चालून गेला. या वेळीं फत्तेखानानें घाबरून आपलें सर्व लष्कर सिद्दी खैर्यतखान याच्या ताब्यांत दिलें. तेव्हांपासून खैर्यत व कासीम हेच प्रमुख होऊन फत्तेखान जवळजवळ कैदीच झाला म्हटलें तरी चालेल. खैर्यत मोठा विश्वासघातकी च मायावी होता. त्यानें विश्वास दाखवून शामराजपंतास किल्ल्यांत भेटीस बोलाविलें व कैद केलें. शेवटीं शामराज-

पंतानें, आपण पुनः जंजिऱ्यावर कधींहि येणार नाहीं, असें वचन देऊन आपली कशी तरी सुटका करून घेतली. शिवाजीस शामराजाचें हें वर्तन न आवडून त्यानें त्याला पेशवेपदावरून काढून टाकलें.

शामराजपंताची अशी अप्रतिष्ठा झाल्यावर शिवाजीनें जंजिऱ्याची महत्त्वाची कामगिरी दत्ताजीपंत वाकेनवीस यांजवर सोंपविली. या वेळीं सिद्दी कांहीं कामाकरितां जंजिऱ्याहून विजापुरास गेला होता. ती खबर शिवाजीस कळतांच त्यानें सिद्दी विजापुराहून परत जंजिऱ्यास जात असतां वाटेंत दबा धरून त्याजवर छापा घालण्यास दत्ताजीपंतास सांगितलें. पण दत्ताजीस तें साधलें नाहीं. तेव्हां तसाच सिद्दीचा पाठलाग करीत जाऊन दत्ताजीनें त्याचा मुलूख उद्ध्वस्त केला. शेवटीं सिद्दी तहास कबूल झाला. पण त्याजबरोबर तह न करतां दत्ताजीनें त्याचा कांहीं मुलूख लुटला व कांहीं जिंकला. सिद्दी किल्ल्यांत दडून बसला. त्यास मराठ्यांनीं वेढा घातला. तथापि याच सुमारास म्हणजे सन १६५९ त अफजलखान शिवाजीवर चालून आल्यामुळें मराठ्यांना पुढील काम अर्धवट टाकून वेढा उठवून निघून जावें लागलें.

इंग्रजांची वक्रदृष्टि

अफजलखानाचा वध केल्यावरहि शिवाजीला जंजिऱ्याकडे लक्ष देण्यास फावलें नाहीं. कारण मोगल राज्यसत्ता शिवाजीच्या राशीस लवकरच लागून शाइस्ताखान पुणें प्रांत जिंकावयास आला. अशा रीतीनें एका संकटांतून दुसरें व दुसऱ्यांतून तिसरें अशीं संकटें ओढवूं लागलीं. पुढें शिवाजी आग्ऱ्याहून निसटून महाराष्ट्रांत परत आल्यावरहि दोन वर्षांनंतरच सन १६६९ त शिवाजीस जंजिऱ्याचा प्रश्न निकालांत काढण्यास फुरसत सांपडली. या दरम्यानच्या काळांत इंग्रजांनीं आपली वक्रदृष्टि जंजिऱ्याकडे वळविली. त्यांना जंजिऱ्याचें महत्त्व पटलें होतें. सुरतेस त्यांची मुख्य वखार होती, पण सुरतेवर असलेल्या मोगली सत्तेचें पारतंत्र्य इंग्रजांस भोगावें लागत होतें. त्या पारतंत्र्यांतून सुटून पोर्तुगीजांप्रमाणें आपला स्वतंत्र संसार थाटण्याच्या दृष्टीनें त्यांची टेहेळणी बरेच दिवस चालू होती. कोंकणपट्टीवर त्यांस दंडाराजपुरी हें बंदर उत्कृष्ट असें आढळलें. सिद्दीला पैका देऊन तें खरेदी करावें असाहि एक विचार त्यांच्या मनांत आल्याशिवाय राहिला नाहीं. म्हणून त्या बाबतींत इकडील इंग्रज अधिकारी इंग्लंडमधील कंपनीच्या

वरिष्ठांशीं वाटाघाट करीत होते. सन १६५८ पर्यंत इंग्रजांना राजपुरीची इत्थंभूत माहिती नव्हती. ती मिळविण्याकरितां सिद्दीस कांहीं विलायती चमत्कारिक चिजांचा नजराणा म्हणून देण्याचें मिष करून राजपुरीस जाऊन त्यांनीं समक्ष पाहणी करण्याचाहि विचार ठरविला व त्याप्रमाणें सन १६६० च्या जून महिन्यांत सुरतेच्या वखारीवरील अध्यक्षानें मिडल्टन व एडवर्ड लॉइड यांची या कामगिरीवर नेमणूक केली. इंग्रजांचा बेत ८ हजार पौंडांस जंजिरा खरेदी करण्याचा होता. सिद्दीला पैसा मिळाल्यास हवाच होता, परंतु त्याकरितां जंजिरा विकून आपलें चंबूगबाळें हिंदुस्थानांतून हलविण्यास तो कसा कबूल होईल ? अर्थात् इंग्रजांचा हा बूट अगदींच अव्यवहार्य होता. म्हणून तो सोडून देऊन त्यांना राजपुरीवर स्वारी करून जंजिरा जिंकण्याची कल्पनाच जास्त बरी वाटली. पण तशी स्वारी करण्यास त्यांस कांहीं तरी सयुक्तिक निमित्त पाहिजे होतें. इंग्रजांसारख्या सुपीक मेंदूच्या लोकांना तें सांपडण्यास उशीर कसला ! सिद्दी हा चांचेगिरी करणारा आहे, तो आपल्या बंदरांत चांचेगिरी करणाऱ्या इतर भुरट्या लोकांना आश्रय देतो व इंग्रजांचीं जाणारीं-येणारीं जहाजें अधूनमधून लुटतो, हें सततचें निमित्त त्यांना होतेंच. तें निमित्त पुढें करून सिद्दीवर समुद्राकडून स्वारी करण्याची आज्ञा ई. इं. कंपनीनें इकडील अधिकाऱ्यांस दिली. पण इंग्रजांना स्वारीचा धीर होईना. त्यांना आपलें आरमारी बळ सिद्दीपुढें तोकडें वाटलें म्हणून त्यांनीं स्वारीचा विचार आपल्या अधिकारांत त्याज्य ठरविला. तथापि इंग्लंडांतील कंपनीच्या वरिष्ठांना हा बदल माहित नसल्यामुळें १९ मार्च १६६२ त त्यांनी इकडे जें पत्र लिहिलें, त्यांत त्यांनीं मनचे मांडे चुरलेले दिसतात.

सिंधुदुर्गाची स्थापना

सन १६५९ पर्यंत शिवाजीनें सिद्दीशीं झगडा केला त्या वेळीं त्याजपाशीं आरमारी बळ फार थोडें किंबहुना मुळींच नव्हतें म्हटलें तरी चालेल. तथापि त्यानंतर पुढील दहा वर्षांत त्याची त्या दिशेनें बरीच प्रगति झाली. राजपुरी घेण्याचें जमलें नाहीं, तेव्हां कोठें तरी समुद्रावर आपला किल्ला पाहिजे, ही आवश्यकता लक्षांत घेऊन त्यानें मालवणाजवळ एक बेट होतें त्यावर सन १६६४ त सिंधु-दुर्ग नामक किल्ला बांधला. किल्ल्याची ही

जागा ताम्रोजी, मानोजी, गंगाजी व शिवाजी कोळी यांनीं शोधून काढल्यानें आरमार ठेवण्यास ही सोयीची जागा उपलब्ध झाल्यावर शिवाजीनें आपलीं लढाऊ जहाजें वाढविण्यास सुरुवात केली. तो १६६५ त गोव्यावरून बार्सिलोरपर्यंत (बसनूर) गेला व तें बंदर लुटून गोकर्णास परत आला आणि तेथील यात्रा आटोपून त्यानें अंकोल्याकडे कूच केलें. या मोहिमेंत त्याजबरोबर ८५ लहान व ३ मोठीं गलबतें असून तीं घेऊन तो मालवणांतून बाहेर पडला होता. यावरून सिंधुदुर्ग हें १६६५ तच शिवाजीनें आपलें आरमारी ठाणें केल्याचें स्पष्ट दिसतें. शिवाजी कोंकणांत समुद्रावर प्रबळ होत चालल्याचें पाहून इंग्रजांनाहि त्याची इ. १६६६ पूर्वी भीति उत्पन्न झाली होती. त्याचा प्रतिकार करण्यास आपणांपाशीं अधिक गलबतें पाठविण्यास नाहींत, अशी कबुली ई. इं. कंपनीनें सुरतेच्या अधिकाऱ्यांना दिली होती. याचा अर्थ असा कीं, या वेळीं शिवाजी इंग्रजांनाहि समुद्रावर भारी झाला होता. शिवाजीच्या या सामर्थ्याची चुणूक सन १६६८ त इंग्रजांना राजापुरास दिसली. तेथें त्या वर्षी शिवाजीचीं दोन गलबतें व कॅप्टन स्मिथ यांची लहानशी चकमक उडाली. शिवाजी जबरदस्त असल्यामुळें त्याच्या मुंबईत येणाऱ्या मालावरील ३ टक्के जकात माफ करण्याचें इंग्रजांना सन १६६९ सालीं भाग पडलें. सारांश, एकट्या इंग्रजांनीं समुद्रावर शिवाजीशीं दोन हात करण्याचें मनांत आणलें असतें, तर शिवाजीनें त्यांस खास लोळविलें असतें.

शिवाजीनें सन १६६९ त जंजिऱ्याशीं युद्ध करण्याचें ठरविलें तेव्हां त्याची आरमारी तयारी इतकी झाली होती. त्या वर्षाच्या प्रारंभापासूनच युद्धाला तोंड लागलेलें दिसतें. सिद्दी मराठ्यांच्या मुलखांत येऊन लूटमार करीत होता. त्यास तेथून हुसकून लावण्याकरितां शिवाजीची फौज निघाली व तिनें हां हां म्हणतां सिद्दीचा मुलूख जिंकून एप्रिल महिन्यांतच सिद्दीला इतकें घाबरवून सोडलें कीं, सिद्दीनें आणीबाणीची वेळ आल्यास प्रजाजनांस मुंबईत आश्रय देण्याची इंग्रजांकडे विनंती केली. मालवणास सिंधुदुर्ग बांधून शिवाजीनें पोर्तुगीजांस आधींच शह दिला असल्यामुळें त्यांनाहि शिवाजीची भीति उत्पन्न झाली होती. त्यांतच सिद्दीचें राज्य त्यास बुडवितां आल्यास, आपल्या गोव्यांतील अस्तित्वावरच गदा येईल या विचारानें,

गोव्याच्या व्हाइसरॉयनें दि. २८ मे १६६९ रोजीं पोर्तुगॉलमधील सेक्रेटरी ऑफ स्टेटला पत्र लिहून सिद्दीस सैन्य, दारूगोळा व अन्नसामग्री पुरविण्यास परवानगी मागितली. ती आल्यावर त्यांनीं आपल्या अधिकाऱ्यांना दि. २१ ऑगस्ट १६६९ रोजीं सिद्दीला हरएक प्रकारची मदत पुरविण्यास आज्ञा केली. शिवाजीला ही गोष्ट अर्थातच इष्ट नसल्यामुळें त्यानें आपला वकील विठ्ठल पंडित यास गोव्यास शिष्टाईकरितां पाठविलें. तेव्हां विठ्ठलपंतानें पोर्तुगीजांचें मन वळवून, दंडाराजपुरीच्या सिद्दीस कसलीहि मदत करणार नाहीं, असें त्यांजपासून कबूल करून घेतलें. जंजिऱ्याच्या मोहिमेवर शिवाजीनें व्यंकाजीपंत याची दर्यासारंग म्हणून नेमणूक केली असून त्याच्या हाताखालीं दौलतखान व मयाजी नाईक भाटकर यांस आरमारी अधिकारी या नात्यानें नेमलें होतें.

शिवाजीचें आरमार

ऑक्टोबर १६६९ मध्येंच किल्ला हल्ला करून घेतां येत नाहीं, असें शिवाजीच्या अधिकाऱ्यांना आढळून आलें, म्हणून त्यांनीं आंतील लोकांची उपासमार सुरू केली. त्यामुळें सिद्दी टेकीस आला. वेढा शिवाजीनें उठवावा असा हुकूम सिद्दीनें मोगलांकडून आणविला, तरी त्यानें तो जुमानला नाहीं. वेढ्याचें काम १६७० च्या आरंभीं चालू असून पावसाळ्यांत कांहीं दिवस युद्ध मंदावलें होतें. पावसाळा संपत आल्यावर युद्धास पुनः जोर चढला. तेव्हां २१ नोव्हेंबर १६७० रोजीं जंजिऱ्याजवळील शिवाजीच्या आरमारांत १६० छोटीं जहाजें होतीं. छोट्या जहाजांनीं भागणार नसल्यामुळें शिवाजीनें कल्याण, भिवंडी व पनवेल या भागांत मोठीं जहाजें बांधून ठेवलीं होतीं. त्यांपैकीं डिसेंबरांत १२ गलबतें पोर्तुगीजांनीं पकडून वसईस ठेवलीं व इतरांचा पाठलाग चालविला. कारण यापूर्वी शिवाजीनें त्यांचें एक गलबत पकडलें होतें. त्याचें १२ हजार रुपये किमतीचें मोठें गलबत सुरतेकडे जात असतां पकडलें गेलें. उरलेलें आरमार जंजिऱ्यास व्यंकाजीच्या मदतीस गेलें. सिद्दीची नाकेबंदी करण्याकरितां, पश्चिम समुद्रावरील जितकीं बंदरें घेतां येतील तितकीं थोडींच असल्यानें, याच सुमारास नागांवावर स्वारी करून तेंहि बंदर शिवाजीनें घेतलें. जंजिऱ्याच्या मोहिमेवर शिवाजी स्वतः कधींच गेला नाहीं. त्यानें ही कामगिरी आपल्या सेनापतीवर सोंप-

विली होती. तो मुलूखगिरी आटोपून जेव्हां रायगडावर येत असे तेव्हां तो मोहिमेची विचारपूस करून जरूर ती तजवीज करीत असे. १६७१ च्या पावसाळ्यानंतर शिवाजी रायगडावरच होता. त्या वेळीं सिद्दीनें समुद्रकिनाऱ्यावरील शिवाजीचीं थळ वगैरे गांवें जाळलीं. सन १६७२ च्या प्रारंभीं सिद्दी व शिवाजी यांचा नांव घेण्याजोगा युद्ध-प्रसंग झाला नाहीं. या काळांत शिवाजीचें लक्ष पश्चिम किनाऱ्यावर जंजिरा व मुंबई यांच्या दरम्यान एक जलदुर्ग बांधून कोंकणपट्टीची अधिक मजबुती करण्याकडे होतें. खांदेरी हें बेट मुंबईपासून दक्षिणेस ११ मैलांवर आहे. तेथून दक्षिणेस ६ मैलांवर अलिबाग व ३० मैलांवर जंजिरा आहे. खांदेरी बेटाच्या शेजारींच जमिनीपासून १२०० यार्ड अंतरावर उंदेरी नांवाचें लहानसें दुसरें बेट आहे. शिवाजी खांदेरीवर किल्ला बांधणार असल्याची वार्ता इंग्रजांना समजली व ती ऐकून ते बेचैन झाले. त्यांनीं या कृत्यास हरकत करण्याचें ठरवलें व त्यांना मोगलांनीं मदत करण्याचें आश्वासन दिलें. मोगल बादशहा औरंगजेब यानें सुरतेहून अहमद नामक अधिकाऱ्यास आरमार देऊन पाठविलें व त्याला या कार्याप्रीत्यर्थ १२०००० रु. खर्च करण्याची मंजुरी दिली. त्याप्रमाणें इंग्रज, मोगल व सिद्दी यांचीं आरमारें एकत्र जमून आपणांस विरोध करणार, असें दिसतांच शिवाजीनें किल्ला बांधण्याचा विचार तूर्त रहित केला.

मोगलांची मदत

वरील प्रयत्न फसल्यावर १६७२ चा पावसाळा संपेपर्यंत उभय पक्षांनीं विशेष हालचाल केली नाहीं. या वर्षी सिद्दी कासीम यास मोगलांची मदत घेतल्याशिवाय मराठ्यांपुढें आपला निभाव लागणार नाहीं, अशी खात्री पटून त्यानें सुरतेस मोगलांकडे मदतीची याचना केली. त्याप्रमाणें औरंगजेबानें उमरगी नांवाच्या इसमाच्या हाताखालीं ३० जहाजें देऊन त्यास ऑक्टोबर १६७२ त सुरतेहून सिद्दीच्या मदतीस पाठविलें. त्यास अडविण्याकरितां शिवाजीनें आपलें आरमार रवाना केलें. त्या दोघांची लहानशीच चकमक झाली. तींत शिवाजीचा पराभव झाला असावा, कारण मोगली आरमारानें तेथून पुढें राजपुरीकडे जातांना वाटेंत किनाऱ्यावरील शिवाजीचीं गांवें लुटलीं व जाळलीं आणि सुमारें ५० गलबतांचा नाश केला.

शिवाजीचें सैन्य दंडाराजपुरी गांव घेऊन बसलें, पण त्याला जंजिरा जिंकतां येईना, अशी स्थिति झाल्यावर सिद्दीनें जंजिऱ्यावरून तोफा डागून शिवाजीच्या सैन्यास राजपुरीस राहणें अशक्य करावें हें स्वाभाविक होय. म्हणून शिवाजीचा आरमारी सरदार दौलतखान यानें राजपुरीजवळच समुद्रांत एका खडकावर पद्मदुर्ग नांवाचा किल्ला बांधला व राजपुरीभोंवतीं तटबंदी करून जागोजागीं चौक्यापहारे बसविले. या बंदोबस्तामुळें सैन्याचें रक्षण चांगलें होऊन जंजिऱ्याशीं युद्ध करणें मराठ्यांच्या आटोक्यांत आलें. सिद्दी असा अडचणींत सांपडल्यामुळेंच त्याला मोगलांची मदत मागावी लागली. बादशहानें वर लिहिल्याप्रमाणें उमरगीस आरमार देऊन पाठविलें तरी त्याचें सिद्दीशीं सूत जमेनासें झालें. त्याचा वरचष्मा सिद्दीस सहन होईना. अशा स्थितींत परकीय अंमलदाराच्या हाताखालीं नांदण्यापेक्षां आपल्यापैकींच कोणाला बादशहानें आपल्या आरमारावर नेमून तें आरमार आपल्या मदतीस पाठवावें ही योजना सिद्दींना श्रेयस्कर वाटली. स्वतः सिद्दी कासीम हा जंजिऱ्याचा सुभेदार होताच. म्हणून त्यानें आपला भाऊ सिद्दी संबूळ यास सुरतेस पाठवून मोगलांकडून त्यांच्या आरमारावरील सुभेदारी त्यास देवविली.

सिद्दी संबूळ आरमारासह सुरतेहून निघून मुंबई बंदरांत सन १६७२ च्या डिसेंबर महिन्यांत आला. त्याजबरोबर लहान ३२ जहाजें होतीं. इंग्रजांनीं मोगलांना खुष करण्याकरितां आपला मुख्य अधिकारी (Chief Customer) निकल्स यास सामोरा पाठविला. त्यानें संबूळ यास देण्याकरितां कांहीं नजराणा व अन्नसामग्रीहि नेली होती. संबूळ यानें शिवाजीविरुद्ध इंग्रजांनीं आपणांस मदत करावी असें बोलणें लावलें. याच वेळीं शिवाजीचाहि वकील मुंबईत असून तोहि इंग्रजांपाशीं सिद्दीविरुद्ध मदत मागत होता. इंग्रजांना ‘ इकडे आड तिकडे विहीर ’ असा पेंच पडला. त्यांतून त्यांनीं तटस्थपणाचें धोरण अवलंबून आपली सुटका करून घेतली.

शिवाजीचा पेंच

मोगलांची मदत मिळाल्यामुळें सिद्दीचें बळ पुष्कळच वाढलें. आणि शिवाजीला त्याजविरुद्ध इंग्रज मदत करीनात. अशा स्थितींत इंग्रजांऐवजीं डचांची मदत घेण्याचें शिवाजीनें योजिलें. याच सुमारास इंग्रज व डच यांचें

युद्ध सुरू असून दि. २० फेब्रुवारी १६७३ रोजीं डचांचीं सात गलबतें मुंबईजवळ समुद्रांत आलीं. आतां उभयतांची लढाई जुंपणार अशीं चिन्हें दिसतांच हजारों रहिवासी मुंबई सोडून भीतीनें निघून गेले. आणि शिवाजीनेंहि डचांची मदत घेण्याचा पेंच घातला. डचांनीं मुंबई बेट त्यास मिळवून देतों असें शिवाजीस सांगितलें, तेव्हां इंग्रजांनीं शिवाजीला आर्जवाचें पत्र लिहून सिद्दीच्या त्रासांतून सुटण्याकरितांच डचांची मदत तुम्ही घेत असाल तर तुम्हां दोघांचा समेट आम्ही घडवून आणतों, पण डचांची मदत घेऊं नका, कारण डच हे शेजारधर्माला वाईट आहेत असें शिवाजीस कळविलें. शिवाजीनें साधकबाधक विचार करून डचांची मदत न घेण्याचें व डचांनाहि मुंबई घेण्यास मदत न करण्याचें ठरविलें. हेतु हा कीं, इंग्रजांवर उपकार केल्यासारखें तर दाखवावें, म्हणजे ‘ कः कालः फलदायकः ’ या न्यायानें त्याचा पुढें केव्हां तरी फायदा मिळेल.

सिद्दी कासीमचा हल्ला

मात्र सिद्दींना संबूळच्या मदतीचा फायदा लवकरच घेतां आला. सन १६७३ च्या मार्च महिन्यांत शिमग्याचा सण आला होता. तो सण राजपुरीच्या नवीन बांधलेल्या किल्ल्यांत व राजपुरी गांवांत साजरा करण्यांत मराठे दंग होते. ते गाफील आहेत असें पाहून सिद्दी कासीम यानें राजपुरीचा किल्ला एकाएकीं हल्ला करून घेण्याचा डाव टाकला. शिमगी पौर्णिमेस व धुळवडीच्या रात्रीं मराठे दारू पिऊन धुंद असल्याची बातमी काढून ४० जहाजें घेऊन कासीम किल्ल्याच्या तटाशीं आला व त्याचा भाऊ सिद्दी खैर्यत ५०० लोक घेऊन जमिनीवर उतरला व मोठमोठ्या आरोळ्या ठोकीत तो आंतील शत्रूवर हल्ला करूं लागला आणि कासीम शिड्या लावून तटावरून किल्ल्यांत शिरला. आंतील मराठ्यांनीं शौर्यानें बचाव करून कासीमच्या कांहीं साथीदारांना समुद्रांत फेकून दिलें व कांहींना कापून काढलें. तरी शिड्यावरून चढून कासीमचे लोक किल्ल्यांत येतच होते. इतक्यांत मराठ्यांचा दारूखाना पेटला. त्याचा एवढा मोठा स्फोट झाला कीं, त्याच्या आवाजानें रायगडावर निजलेले शिवाजीमहाराज दचकून जागे झाले, असें म्हणतात. त्या वेळीं जे धुराचे लोट उसळले त्यांत शत्रु कोण व मित्र कोण हेंच कळेनासें झालें. दरम्यान खैर्यतहि आपल्या साथीदारांसहित भिंत

चढून किल्ल्यांत उतरला. अशा रीतीनें खैर्यत व कासीम यांची हात-मिळणी झाल्यावर हातघाईचें युद्ध होऊन किल्ला सिद्दीच्या स्वाधीन झाला. राजपुरीचा नवा किल्ला शत्रूनें घेतल्यामुळें मराठ्यांचें फारच नुकसान होऊन त्यांची बाजू अधिक कमकुवत झाली यांत शंका नाहीं. आतांपर्यंतच्या सिद्दी व मराठे यांच्या अनेक झटापटींत मिळून पंधरा हजारांहून अधिक मराठे धारातीर्थी पतन पावले व अपार संपत्ति खर्ची पडली.

सिद्दी संबूळ हा जंजिऱ्याचा असला तरी तो आतां मोगली आरमारा-वरील सुभेदार झाला असल्यामुळें त्याला अधूनमधून सुरतेच्या बंदोबस्ता-करितांहि जावें लागत असावें. त्याप्रमाणें तो गेला असतां ता. १० मे १६७३ च्या सुमारास तेथून परत येतांना मुंबईस उतरला. त्यानें प्रेसिडेंटाकरितां शिरपाव आणला होता. तो मुद्दाम बादशहानें पाठविला आहे अशी त्यानें लोणकढी थाप झोकून दिली. हेतु हा कीं, इंग्रजांनीं हुरळून जाऊन आपली मुंबई बंदरांत चांगली बडदास्त ठेवावी. प्रेसिडेंटानेंहि ईस्ट इंडिया हाउसमध्यें दरबार भरवून त्याचा इतमामानें स्वीकार केला. इतकें झाल्यावर सुरतेच्या सुभेदाराचीं पत्रें संबूळनें प्रेसिडेंटास दिलीं, त्यांत सिद्दीच्या सुमारें तीस गलबतांना मुंबई बंदरांत राहण्यास जागा द्यावी, असा मजकूर होता. पण सिद्दीचे सैनिक थोडेच सुधे होते! त्यांनीं बेटावरच्या मुक्कामांत किती तरी अत्याचार केले. त्यानें कित्येकांना जखमी केलें. शिवाय दांडगाई व शिवराळ-पणा यांना तर सीमाच नव्हती. त्यामुळें इंग्रजांना असें झालें कीं, कोठून ही ब्याद येथें आली. अखेरीस त्याचीं पांचच गलबतें माजगांवांत ठेवून घेऊन संबूळला त्यांनीं मुंबई बंदरांतून हाकून लावलें. अर्थात् संबूळ संतापला व इंग्रजांना हात दाखविण्याचा निश्चय करून बाहेर पडला.

इंग्रजांचा कोंडमारा

आपण दिल्लीपतीचे सुभेदार या ताठ्यांत संबूळनें इंग्रजांना दमदाटी देण्यास व सतावण्यास सुरुवात केली. त्यानें सुरतेच्या मोगल सुभेदाराकडे तक्रार करून त्याजकडून इंग्रजांना तंबी पोंचविण्याचा प्रयत्न केला. शिवाय मुंबई बंदरांतून बाहेर पडल्यावर त्यानें इंग्रजांस पूर्वी कुराणाची शपथ घेऊन दिलेलीं वचनें गुंडाळून ठेवून व त्यांनीं दारूगोळा व अन्नसामग्री पुरवून केलेले उपकार न स्मरून इंग्रजांची गळचेपी चालविली. त्यानें नागोठण्याच्या

खाडीच्या (धरमतर) तोंडाशीं किल्ला बांधण्याचें ठरवून आपलीं जहाजें करंजें, नागोठणें व पेण यांच्या खाडींत ठेवलीं आणि मुंबई बेटांत अन्न-सामग्री आदिकरून आवश्यक वस्तूंचा तुटवडा पाडला. इंग्रजांप्रमाणें शिवाजीच्याहि तो राशीला लागला. त्यानें शेजारच्या मुलखांत शिरून शिवाजीच्या शिवारांतील भाताचीं उभीं पिकें कापून नेलीं. शिवाजीनें त्याचें उट्टं काढण्यास मुळींच विलंब लावला नाहीं. त्याच्या सैनिकांनीं सिद्दीच्या टोळीवर अचानक छापा घालून त्याचीं शंभर माणसें कापून काढलीं व त्यांतील प्रमुखांचीं मुंडकीं शिवाजीस दाखविण्याकरितां नेलीं. तसेंच नागोठण्याच्या नाकेबंदीच्या बाबतींतहि तीन हजार लोकांना पाठवून तेथून सिद्दीस शिवाजीनें हुसकून लावलें.

सिद्दी संबूळ नागोठण्याहून निघाला तो थेट राजापुराकडे जाऊन शिवाजीचा मुलूख उद्‌ध्वस्त करूं लागला. शिवाजीचें कांहीं आरमार मुलखाच्या रक्षणाकरितां सिंधुदुर्गास होतें. तें घेऊन दौलतखान संबूळशीं मुकाबला देण्याकरितां बाहेर पडला. त्याची व संबूळची गांठ मार्च सन १६७४ त सातवळीच्या खाडींत पडली. तेथें दोघांचें तुंबळ युद्ध झालें. त्यांत सिद्दीचे १०० सैनिक व दौलतखानाचे ४४ कामास आले. दौलतखानाला एक बाण लागला, पण त्याचा जय झाला. सिद्दीचा हात भाजला. मग सिद्दी तिकडून निघून बाणकोटच्या खाडीवर हरेश्वर बंदरांत आला.

सिद्दीस इंग्रजांचा आश्रय

इकडे दंडाराजपुरीस मराठ्यांचें आरमार जंजिऱ्यासमोर होतें व त्याचा वेढा चालूच होता. दोन्ही पक्ष युद्धाला कंटाळले होते. सिद्दी इंग्रजांस मध्यस्थी करण्यास सांगत होता. शिवाजी रायगडावर असून त्याच्याशीं तहाचें बोलणें करण्यास इंग्रजांनीं नारायण शेणवी यास पाठविलें होतें. पण शिवाजी तह करण्यास कबूल झाला नाहीं, इतकेंच नव्हे तर सिद्दीला इंग्रज मुंबई बेटांत आश्रय देतील तर इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारणें आपणांस भाग पडेल असेंहि नारायण शेणव्यामार्फत शिवाजीनें इंग्रजांना बजावलें. असें असूनहि एप्रिलअखेर वादळामुळें सिद्दीचें आरमार मुंबई बंदरांत आलें व त्याला ठेवून घेणें इंग्रजांना भाग पडलें. इंग्रज आपल्या शत्रूचा पाठपुरावा करतात याचा शिवाजीला राग येऊन त्यानें कल्याण, भिवंडी, नागोठणें या

मुंबईभोंवतालच्या आपल्या प्रदेशांतील सुभेदारांना, मुंबईला कसलीहि सामग्री न जाऊं देण्याचा हुकूम सोडला. तेव्हां इंग्रजांची पांचावर धारण बसून त्यांनीं सिद्दीस मुंबई सोडण्यास सांगितलें. तरीहि तो तुरमुंडी देऊन मुंबईत राहिलाच. फार काय पण त्या पावसाळ्यांतहि त्यानें मुंबईतच तळ ठोकला. सिद्दी इतका खणपटीला कां बसत असे असा प्रश्न येथें कोणासहि विचारावासा वाटेल. त्याचें उत्तर हें कीं, जंजिऱ्याशेजारीं शिवाजीचें सैन्य व आरमार ठाण मांडून बसलें असल्यामुळें पावसाळ्यांत सिद्दीचें आरमार तेथें राहावयास आलें असतें तर तें शिवाजीनें जाळून टाकलें असतें. सिद्दीनें १६७४ च्या ऑगस्ट महिन्यांत मुंबईस बसल्या बसल्या आणखी एक उद्योग केला. तेथें पोर्तुगीज व इतर टोपकर होते. ते गोलंदाजीस व लढण्यास उपयोगी पडणारे असल्यामुळें त्यांची तो आपल्या फौजेंत भरती करूं लागला. शिवाजीला हें कळतांच त्यानें इंग्रजांच्या नजरेस तो प्रकार आणून दिला. तेव्हां, मुंबई बेटांतील जो कोणी सिद्दीची नोकरी पत्करील त्याची मालमत्ता जप्त होऊन त्याला कडक शिक्षा करण्यांत येईल, असा इंग्रजांनीं जाहीरनामा काढला. उलटपक्षीं शिवाजीनेंहि ऑक्टोबर महिन्यांत (१६७४) ४० ते ६० हंड्रेडवेटांच्या ५० मोठ्या तोफा इंग्रजांपाशीं मागितल्या. त्या देत नाहीं म्हणण्याची सोय नव्हती व द्याव्या तर मोगलांशीं वितुष्ट येणार, अशा स्थितींत इंग्रजांनीं त्यास गुप्तपणें फक्त दहा तोफा देण्याचें ठरविलें !

सिद्दी बंधूंचा बेबनाव

सन १६७५ च्या प्रारंभीं शिवाजीनें जंजिऱ्याच्या वेढ्याचें काम हिरीरीनें हातीं घेतलें. आपलें आरमार जंजिरा घेण्यास अपुरें पडतें याची जाणीव असल्यानें जैतापूरच्या बंदरांत नवीन गुराब बांधण्यास जोरानें सुरवात करून सुतार, लोहार, आर्कसदार इत्यादि कारागीर तेथें जमविण्यांत आले. सिद्दीच्या बाजूनेंहि तयारी जय्यत चालू होती. सुरतेस दोन मोठीं जहाजें त्याच्या मदतीसाठीं बांधण्यांत येत होतीं. संबूळ हा त्याच्या आडदांड व घातकी वागणुकीमुळें इंग्रजांना अप्रिय झाला होता. तसाच तो सुरतेच्या मोगल सुभेदारासहि अप्रिय झाला होता. तो सुभेदाराशीं भांडलाहि; त्यामुळें त्याजकडील मोगली आरमाराचें आधिपत्य मोगल सुभेदारानें

काढून घेऊन सिद्दी कासीम यास दिलें. सिद्दी संबूळ व सिद्दी कासीम यांचा एकंदर धोरणांतहि मतभेद होत असेल, म्हणूनच संबूळचा अधिकार कासीम पत्करण्यास कबूल झाला असावा. कासीमचा या योगानें दर्जा तर वाढणार होताच, पण त्याशिवाय धोरण एकमुखी झाल्यामुळें संबूळशीं उडणारे खटकेहि थांबणार होते. अधिकारांत बदल करण्याकरितां या वेळीं कासिमास सुभेदारानें सुरतेस बोलावून घेतलें होतें. कासीम सप्टेंबर १६७५ अखेर सुरतेहून जंजिऱ्यास जावयास निघाला. त्याजपाशीं मोगलांनीं दोन हजार सैनिक, दारूगोळा व अन्नसामग्री भरपूर दिली होती. कासीम इंग्रजांशीं वागण्यांत संबूळपेक्षां सीधा असल्यामुळें त्यांनाहि या खांदेबदलानें समाधान वाटलेलें दिसलें. हें आरमार घेऊन कासीम जंजिऱ्यास न थांबतां खालीं वेंगुर्ल्यापर्यंत गेला व वाटेंत त्यानें शिवाजीचीं कित्येक गांवें लुटलीं व जाळलीं. शिवाजी जैतापुरांत नवीन जहाजें बांधीत होता. तीं व इतर जहाजें अशीं ५७ जहाजें जैतापुरांतून बाहेर पडून कासीम याजपासून आपल्या मुलखाचा बचाव करण्यास निघालीं. सारांश, शिवाजी सन १६७५ च्या पावसाळ्यापूर्वी जंजिरा घेईल असें त्याच्या तयारीवरून इंग्रजांनीं अनुमान केलें होतें, तें खोटें ठरून १६७५ अखेर शिवाजी व सिद्दी यांचे परस्परसंबंध ' जैसे थे ' असेच राहिले.

सिद्दीचें पारडें सन १६७६ च्या प्रारंभीं जडच होतें. एक सिद्दी जंजिऱ्यास व दुसरा सिद्दी बाहेर शिवाजीच्या मुलखांत धुडावा करण्यास मोकळा, अशी स्थिति असल्यामुळें शिवाजीला त्याची विशेष धास्ती वाटत होती. शिवाजीचीं ५ गलबतें नागोठण्याच्या खाडींत होतीं, तीं सिद्दी जाळील अशी शिवाजीस भीति असल्यामुळें, त्यानें जानेवारी महिन्यांत त्यांना मुंबई बंदरांत राहूं देण्याबद्दल इंग्रजांस विनंती केली. सिद्दीस अशी सवलत इंग्रजांकडून नेहमीं मिळत गेल्यानें, त्यांना शिवाजीच्या बाबतींत ती नाकारतां येईना व म्हणून त्यांनीं शिवाजीला तशी परवानगी देण्याचें धाडस केलें. या वर्षाचा आरंभ शिवाजीस एकंदरींत प्रतिकूलच होता. तो पहिले तीन महिने साताऱ्यास अतिशय आजारी होता. तो इतका कीं, त्याच्या शत्रूंनीं शिवाजी मेला, अशी कंडी पिकविण्यासहि कमी केलें नाहीं. अर्थात् या मुदतींत जंजिरा प्रकरणीं विशेष लक्ष घालण्यासारखी त्याची मनःस्थितिच नव्हती. आजारां-

तून बरा झाल्यावर हवापालट करण्याकरितां तो मार्च १६७६ मध्यें पन्हाळयावर जाऊन राहिला. गोव्याचे पोर्तुगीज व जंजिऱ्याचे सिद्दी यांचें संगनमत होऊन पोर्तुगीजांनीं मे महिन्यांत शिवाजीविरुद्ध मोठ्या उत्साहानें तयारी चालविली आणि सिद्दी कासीम यानें सहा लहान होड्या व अकरा लहान गलबतें घेऊन वेंगुर्ल्याची लूट केली, शिवाजीचा तेथील सुभेदार व सैन्य यांस हाकून दिलें आणि मराठ्यांच्या आरमाराशींहि लढून त्यास त्यानें पळवून लावलें. मात्र शिवाजीस उमेद वाटण्याजोगी गोष्ट ही कीं, सेनापति मोरोपंत पिंगळे यानें मे १६७६ मध्यें रामनगरच्या राजाचा पराभव करून तिकडे बरीच खंडणी मिळविली. आणि मराठ्यांनीं अथणी लुटून तेथून सहा लक्ष होनांची लूट आणली. यामुळें जून महिन्यापर्यंत शिवाजीची आर्थिक तंगी बरीच कमी झाली व प्रकृतिहि चांगलीच सुधारून तो त्या महिन्यांत रायगडावर राहावयास आला. मोरोपंतहि जूनअखेर विजयश्री मिळवून महाराजांना भेटावयास रायगडीं परत आला आणि पावसाळ्यासाठीं त्याचें सैन्य स्वस्थानीं मुक्कामास गेलें.

मोरोपंताची योजना

मोरोपंत व मंत्रिमंडळ यांजबरोबर खलबत करून पुढील बेत निश्चित करण्यांत शिवाजीचा सबंध जुलै महिना गेला. इतकीं वर्षें भगीरथ प्रयत्न करून, पाण्यासारखा पैसा खर्च करून व १५।२० हजार शूर शिपायांचें बलिदान देऊनहि, जंजिरा हस्तगत होत नाहीं, याची महाराजांना खंती वाटली. हें बिकट काम मोरोपंताखेरीज दुसऱ्याच्यानें व्हावयाचें नाहीं अशा भरंवशानें मोरोपंतावर जंजिऱ्यावरील नवीन मोहिमेचा भार महाराजांनीं ऑगस्ट महिन्यांत टाकला व मोरोपंत दहा हजार फौज घेऊन, जंजिरा जिंकल्याशिवाय महाराजांस तोंड दाखवावयाचें नाहीं, अशी प्रतिज्ञा करून निघाला. त्यानें दंडा-राजपुरीस आल्यावर सभोंवारची झाडी तोडून हल्लयाची मोठी तयारी चालविली. होड्यांत लांकडी धमधमे उभारून किल्ल्याची तटबंदी पाडण्याचा व्यूह रचला. मराठ्यांची ही उभारी कळतांच सिद्दी कासीमहि मुंबईस पावसाळ्यांत राहिला होता तो किल्ल्याच्या रक्षणार्थ चार-पांचशें लोक घेऊन निघाला.

जंजिऱ्याची मोहीम आपल्या प्रथम श्रेणींतील सेनापतीवर सोंपवून

शिवाजी बेळगांव, विजापूर, भागानगर या मार्गानें ऑगस्ट १६७६ त कर्नाटकाच्या स्वारीवर गेला. पण पेशवा व सेनापति मोरोपंत जमिनी-वरील युद्धांत कितीहि अजिंक्य असला तरी, समुद्रावरील या किचकट युद्धांत त्याचा पराक्रम उपयोगी पडेना. सिद्दी संबूळ व सिद्दी कासीम यांचें बिनसत चाललें होतें. तरी दोघांचें भांडण अद्यापि तितकें विकोपास गेलें नसल्यामुळें, शिवाजीस विरोध करण्यांत त्या दोघांचें एकमत होतें. म्हणून वेढ्याचें काम सुरू असतांहि दक्षिणेस राजापुरापर्यंत शिवाजीच्या किना-ऱ्यावरील मुलखांत धुमाकूळ घालून जैतापूरच्या बंदरांत शिवाजीचीं जीं जहाजें होतीं तीं त्यांस जाळतां आलीं. तिकडील आरमाराचा नाश झाल्या-मुळें मोरोपंतास जैतापूर, मालवण या बंदरांतून जी आरमारी मदत मिळावयाची ती रोडावली. नोव्हेंबर महिन्यांत अशा रीतीनें जैतापुरा-कडील आरमारी नाश झाल्यावर मोरोपंतानें जंजिरा घेण्याचा नाद सोडला. या वेळीं शिवाजी व मोगल यांचा तह झाला असल्यामुळें, सिद्दीला मोगलां-कडून आरमारी व इतर मदत मिळत होती ती औरंगजेबानें थांबवावी, असाहि प्रयत्न मोरोपंतानें करून पाहिला, पण त्यांतहि त्यास यश आलें नाहीं. तेव्हां मोरोपंत जंजिऱ्याची रेंगाळत पडलेली मोहीम मामुली अधि-काऱ्यावर सोंपवून डिसेंबर १६७६ त नारायण शेणवी यास बरोबर घेऊन चौलास गेला (प. सा. सं. खंड २, पृ. ५५६). या वर्षाच्या डिसेंबर महिन्यापासून मराठ्यांच्या दृष्टीनें जंजिऱ्याचा प्रश्न मागें पडला तो त्या स्थितींत दीड वर्ष म्हणजे जुलै १६७८ पर्यंत होता. कर्नाटकांतील दिग्विजय आटोपून महाराज रायगडावर मुक्कामास आले, त्यानंतर जुलै १६७८ त जंजिरा मोहिमेस पुनः जोरानें तोंड लागलें. या दरम्यानच्या मुदतींत सिद्दी संबूळ व सिद्दी कासीम यांचें भांडण विकोपास गेलें, त्याकडे वळणें आवश्यक आहे.

सिद्दींच्या घरांत भाऊबंदकी

संबूळ व कासीम

सिद्दी संबूळ सन १६७२ च्या डिसेंबर महिन्यांत मोगली आरमाराचा सुभेदार झाला. त्याजकडे ही सुभेदारी सन १६७६ च्या जून महिन्या-

पर्यंत टिकली. म्हणजे तो सुमारें ३॥ वर्षेपर्यंत मोगली आरमाराचा सुभेदार होता. सिद्दी खैर्यत जंजिऱ्याचा सुभेदार, सिद्दी कासीम जंजिऱ्याच्या आरमाराचा सुभेदार व सिद्दी संबूळ हा मोगली आरमाराचा सुभेदार असे त्रिवर्ग सिद्दी तीन सुभेदाऱ्यांवर असल्यानें ते आपल्या एकजुटीनें मराठ्यांशीं मोठ्या उत्साहानें लढत राहिले. पण साडेतीन वर्षांच्या अखेरीस सिद्दी संबूळ याचा सुरतेच्या मोगल सुभेदाराशीं बेबनाव होऊन औरंगजेब बादशहानें त्याला मोगली आरमारावरून काढून टाकलें व त्याच्या जागीं त्याचा भाऊ सिद्दी कासीम याची नेमणूक केली. आतां सिद्दी कासीम हा मोगली आरमार व जंजिऱ्याचें आरमार या दोन्हींचा सुभेदार झाला. पण सिद्दी संबूळ यास या नवीन योजनेंत कांहीं स्थानच न राहिल्यानें तो संतापला व मोगली आरमाराचा कबजा सिद्दी कासीम यास देण्यास तयार होईना. त्या दंडेलींत त्यानें जवळजवळ दहा महिने घालविले.

शेवटीं सिद्दी कासीम या प्रकरणाचा निकाल लावून घेण्याकरितां सन १६७७ च्या एप्रिल महिन्यांत सुरतेस जाऊन तेथील मोगल सुभेदार घास्तीखान यास भेटला. घास्तीखानानें मोगली आरमाराचा ताबा घेण्याचा हुकूम कासीम याजपाशीं दिला व येत्या पावसाळ्यांत त्याच्या आरमारास मुंबई बंदरांत आश्रय देण्याचें पत्र मुंबईच्या इंग्रज अंमलदारांना लिहिण्याविषयीं त्यानें सुरतेच्या इंग्रज प्रेसिडेंटास विनंती केली. प्रेसिडेंटास ही ब्याद नको होती. पण मोगल सुभेदारास न दुखविण्याकरितां त्यानें तसें पत्र लिहिलें व कासीम याजपाशीं दिलें. तें पत्र ता. २८ एप्रिल १६७७ रोजीं कासीमच्या हातीं पडलें व त्याबद्दल त्यानें प्रेसिडेंटाचे आभार मानले. त्या पत्रांत इंग्रज प्रेसिडेंटानें लिहिलें होतें कीं, 'कासीमपाशीं त्याच्या रक्षणाकरितां फक्त दोनशें शिपाई राहतील. कासीम मुंबईत पावसाळ्यांत असेल. त्याला मुंबईत वा माजगांवांत राहावयास घर पाहून द्यावें. त्याची बरदास्त चांगली ठेवावी. तो मुंबई सोडून जंजिऱ्यास जाण्यास निघेल तेव्हां जरूर पडल्यास त्याच्या मदतीला कांहीं होड्या द्याव्या. अर्थात् या सर्व कामांत जो खर्च येईल तो कासीमपासून घ्यावा. शिवाजीला आमच्या या पक्षपाताबद्दल घुस्सा येईल, पण त्याची समजूत आम्ही घालूं.' सिद्दी कासीम ज्या वेळीं सुरतेंत होता त्याच वेळीं शिवाजीचा वकील सुंदरजी

परभू हाहि मोरोपंत पेशव्याचें पत्र घेऊन सुरतेस आला होता. त्यांत बहुधा सिद्दींना मदत इंग्रजांनीं करूं नये व आपल्याला सिद्दीच्या पारिपत्यासाठीं मदत करावी, असा मजकूर असावा. परंतु त्याला प्रेसिडेंटानें वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

संबूळशीं असहकारिता

या वेळीं सिद्दी संबूळ जंजिऱ्यास होता. त्याचेंहि पत्र ता. ३० एप्रिल १६७७ रोजीं म्हणजे दोन दिवसांनीं सुरतेच्या प्रेसिडेंटास आलें. त्याचीहि इच्छा आपल्या आरमारासुद्धां येत्या पावसाळ्यांत मुंबईस राहण्याची होती. मात्र शिवाजीशीं चालू असलेल्या युद्धांत जंजिऱ्याच्या सिद्दीस मदत न करतां, मुंबईच्या आसपास शिवाजीच्या मुलखांत शिरून लूटमार करण्याचा त्याचा उद्देश असल्याविषयीं प्रेसिडेंटास बळकट संशय आला. आतां संबूळ अधिकारच्युत होऊन मोगलांचें आरमार बळकावून बसला असल्यामुळें त्याला मुंबईत थारा न दिल्यास सुरतेच्या मोगल सुभेदाराची आपणांवर इतराजी होणार नाहीं, उलट तो खूषच होईल, अशी खात्री असल्यानें प्रेसिडेंटानें मुंबईच्या इंग्रज अधिकाऱ्यांना त्याला मुंबईत आश्रय न देण्यास लिहिलें. त्याउपर सिद्दी संबूळ मुंबईत उतरलाच तर त्याला तीन दिवसांनंतर कोणाहि रहिवाशानें कसलीहि मदत करूं नये, त्याच्या लोकांशीं बोलूं नये व त्याजबरोबर पूर्ण असहकारिता करावी, असें प्रेसिडेंटानें मुंबईकरांस कळविलें; आणि त्याला मुंबई सोडून जाण्याची नोटीसहि देण्यांत यावी, असाहि त्या पत्रांत इशारा होता. तशी नोटीस मुंबईच्या अधिकाऱ्यांनीं संबूळ मुंबईस आल्यावर त्यावर बजावली. पण त्यानंतर सुरतेच्या मोगल सुभेदारानें संबूळच्या विनंतीवरून प्रेसिडेंटाकडे रदबदली केल्यामुळें प्रेसिडेंटानें त्यास येत्या पावसाळ्यांत मुंबईत मुक्काम करण्याची परवानगी दिली. मात्र त्यानें ५० माणसांपेक्षां अधिक माणसें घेऊन मुंबई शहरांत राहूं नये, गांवच्या लोकांना उपद्रव देऊं नये व अधिक माणसें असतील तीं जहाजावर ठेवावीं, अशी त्यास अट घातली.

अशा रीतीनें मे महिन्यापासून संबूळ मुंबईत राहिला. त्यानें मोगली आरमार कासीमच्या ताब्यांत दिलें नाहीं व उलट तें आपल्याकडेच राहावें अशी बादशहाकडे विनंती केली. ती बादशहानें झिडकारली. तेव्हां सिद्दी

कासीम यानें मोगली आरमाराचा ताबा घेण्यास सावंत कोळी यास मुंबईस पाठविलें. सावंताबरोबर १५० लोक देण्यांत आले होते. सावंत जुलैअखेर मुंबईस आला. पण आपण आरमारावर केलेल्या खर्चाचे पैसे आपणांस सुरतेच्या सुभेदारापासून मिळेपर्यंत आपण आरमाराचा ताबा देणार नाहीं, असें संबूळ यानें कोळ्यास बजावलें. संबूळ व कोळी यांचा असा लढा लागलेला समजल्यावर कासीम जंजिऱ्याहून मुंबईस आला. त्या वेळीं आपलीं बायकामुलें जंजिऱ्यांत आहेत तीं आपल्या ताब्यांत आल्याशिवाय आपण आरमार सोडणार नाहीं, अशी संबूळनें दुसरी सबब सांगितली. तींहि त्याच्या ताब्यांत कांहीं दिवसांनीं देण्यांत आलीं. तेव्हां तो आरमार देण्यास कबूल झाला. पण त्यापैकीं एक मोठें जहाज सुरतेस जाण्यास आपणांस पाहिजे अशी त्यानें मागणी केली. ती ऐकून कासीम चिडला व सावंताच्या १५० लोकांनिशीं तो संबूळच्या माजगांवांतील घरावर चालून गेला. त्या वेळीं दोघांची चकमक उडून तींत उभयतांचे ८।९ शिपाई मेले व तितकेच घोडेहि मेले. इंग्रजांतर्फे कॅप्टन किग्विन हा त्यांचा झगडा तोडण्यास गेला असतां, कंपनीचा एक घोडा मेला व तीन जखमी झाले. त्यानें कासीम याच्या दंडेलीबद्दल त्याचा निषेध केला. त्याच्या शिपायांचीं हत्यारें काढून घेतलीं व ३।४ शिपाई ठेवून घेऊन बाकीच्या शिपायांना ४।५ दिवसांत घालवून देण्याचा हुकूम सोडला. अखेर २१ ऑक्टोबर १६७७ रोजीं दोघां सिद्दींचा समेट होऊन संबूळ आपलीं बायकामुलें व एक जहाज घेऊन सुरतेस गेला व कासीम जंजिऱ्याकडे रवाना झाला.

शिवाजीचा निश्चय

सिद्दी कासीम व सिद्दी संबूळ यांचें भांडण एप्रिल १६७७ ते ऑक्टोबर १६७७ पर्यंत चालू होतें. त्याचा फायदा त्या सहा महिन्यांत घेण्याचें मराठ्यांना साधलें नाहीं. जुलै व ऑगस्ट या पावसाळ्याच्या दोन महिन्यांत समुद्रांतील युद्ध मराठ्यांना बंद ठेवणें भाग होतें. शिवाय सिद्दी कासीम त्या वेळीं आरमारासह जंजिऱ्यास होता, हेंहि लक्षांत ठेवावयास पाहिजे. म्हणजे सुमारें एक वर्ष मराठे स्वस्थ होते, असें म्हणावयास हरकत नाहीं. सन १६७८ च्या जुलै महिन्यांत शिवाजी रायगडावर आल्यानंतर त्यानें सिद्दीचा पिच्छा पुरविण्यास पुनः सुरुवात केली. त्यानें आपलें आर-

मार जंजिऱ्यापाशीं आणून ठेवलें. तें आपल्या आरमारास जाळून टाकील, या भयानें पावसाळ्यांत त्या आरमाराचा बराच मोठा भाग घेऊन सिद्दी कासीम मुंबईस गेला. मुंबईकर इंग्रज त्यास ठेवून घेण्यास राजी नव्हते. पण सुरतेच्या वरिष्ठांनीं तसा त्यांस हुकूम केल्यामुळें त्यांना त्यास परवानगी द्यावी लागली. त्याचें आरमार माजगांवास होतें. तें तेथें जाऊन जाळण्याचा शिवाजीनें निश्चय केला. या बिकट कामगिरीवर त्यानें दर्यासारंग व्यंकाजीपंत व दौलतखान यांची नेमणूक केली. पूर्वी कित्येक वर्षें केलेल्या एकनिष्ठ सेवेबद्दल त्यानें प्रथम त्या दोघांस बोलावून व त्यांस पोशाख (तशरीफ) देऊन त्यांचा गौरव केला. त्याजबरोबर त्यानें खलाशी वगैरे मिळून चार हजार लष्कर दिलें. त्यासह ते दोघे जुलै १६७८ त पनवेलीस आले. त्यांजपाशीं मोठीं जहाजें नसल्यामुळें त्यांना समुद्रांतून मुंबईस जाणें अशक्य झालें. म्हणून जमिनीवरून ते कल्याण-भिवंडीकडे गेले. तेथून मुंबईस जातांना वाटेंत पोर्तुगीजांची हद्द होती. तिजवर पोर्तुगीजांनीं मराठ्यांना रोखून धरलें. इकडे मुंबईस इंग्रजांनींहि स्वसंरक्षणाची तयारी केली. त्यांनीं कॅप्टन किग्विन यास माहीमपाशीं मराठ्यांच्या तोंडावर ठेवलें.

कासीमची उचलबांगडी

हें सर्व संकट सिद्दी कासीम याच्या वास्तव्यानें इंग्रजांवर ओढवलें असल्यामुळें त्यांनीं कासीमला मुंबई सोडून जाण्यास सांगितलें. सिद्दीजवळचे लोक चोर असून ते मुंबईंतील रहिवाशांना बुचाडीत. शिवाय शिवाजीच्या राज्यांत शिरून त्यानें त्याच्या कित्येक प्रजाजनांना व ब्राह्मणांना गुलाम करून नेलें होतें. कासीमला बजावलें असतांहि तो मुंबई सोडून जाईना. कारण त्याजपाशीं त्याच्या नोकरांचा पगार देण्यास पैसाच नव्हता. म्हणून इंग्रजांनीं दोन हजार रुपये त्यास उसनवार दिले व अशा रीतीनें त्याची कशी तरी मोट बांधून त्याची उचलबांगडी केली. इंग्रजांनीं सिद्दीला या रीतीनें वांचविलें आणि पोर्तुगीजांनीं दौलतखानाला ठाण्याच्या खाडींत ४० सशस्त्र मचवे ठेवून अडवून धरलें. त्यामुळें शिवाजीनें सिद्दीला सपशेल बुडवावयाचा टाकलेला डाव फसला. शिवाजी या अपयशानें फारच चिडून गेला व त्या रागाच्या भरांत त्यानें दौलतखानास कामावरून काढून टाकलें. तसेंच त्याचा मदतगार भिवंडीचा सुभेदार (दादाजी) यासहि

कडक शासन केलें. वास्तविक या दोघांची एकंदर प्रकरणांत कांहीं कसूर होती असें दिसत नाहीं. कारण त्यांची ताकदच पोर्तुगीज व इंग्रज यांची फळी फोडून मुंबई बंदरांत शिरण्याइतकी नव्हती. दर्यासारंग व्यंकाजी या वेळीं दौलतखानाच्या जोडीला नसून तो राजापुराकडे होता. त्याजवर इंग्रजांशीं झालेल्या पैशाच्या व्यवहारांत कांहीं तोहमत येऊन त्याला व त्याच्या पुत्राला दोन महिन्यांनंतर शिवाजीनें कैद केलें. त्यांत दर्यासारंगाचा कांहीं दोष नाहीं, असा इंग्रजांनीं निर्वाळा दिला असतांहि, त्याचा उपयोग झाला नाहीं. दर्यासारंग व्यंकाजी यानें इंग्रजांपासून कांहीं लांच घेतली असा शिवाजीस संशय आला असल्यास न कळे. कदाचित् हाहि शिवाजीला आलेल्या वैतागाचाच परिणाम असावा.

मुंबईवरचा हल्ला फसल्यावर सिद्दी मुंबईहून जंजिऱ्यास येण्याच्या आंत शिवाजीच्या सैन्यानें जमीन व पाणी या दोन्ही बाजूंनीं वेढा घालून डिसेंबर १६७८ त जंजिरा घेण्याचा प्रयत्न केला. पण इतक्यांत सिद्दी कासीम मुंबईहून आल्यामुळें मराठ्यांना जंजिऱ्याचा वेढा उठवावा लागला.

इंग्रज लोक बाहेरून तटस्थपणाचा कितीहि आव आणीत असले तरी, आंतून त्यांची सिद्दीला कशी फूस होती, यावर प्रकाश पाडणारें एक लहानसें प्रकरण याच सुमारास उद्भवलें. हें प्रकरण जुलै १६७८ पासून नोव्हेंबर १६७८ पर्यंत धुमसत होतें. त्याची हकीकत अशी —

बहिरोपंत या नांवाच्या गृहस्थास शिवाजीनें चौल येथें आपला सुभेदार नेमलें होतें. त्यानें मुंबईचा डेप्युटी गव्हर्नर पेटिट व त्याचा गुमास्ता वल्लभ मेहता यांस सुपारी व नारळ मिळून बारा हजारांचा माल विकला. ती रक्कम मुदतींत येणें राहिल्यामुळें बहिरोपंतानें मराठ्यांच्या बंदरांत लांकूड, तांदूळ व इतर जिनसा खरेदी करण्यास आलेल्या मुंबईच्या व्यापाऱ्यांच्या २५।३० बोटी पकडल्या. त्या पुढें कॅप्टन थॉमस निकोलस यानें जबरदस्तीनें परत नेल्या. त्या बाबतींत नोव्हेंबर महिन्यांत बहिरोपंतानें मुंबईच्या नव्या डे. गव्हर्नरास पत्र लिहून त्यांत इंग्रजांची चांगलीच खरडपट्टी काढली. बहिरोपंत म्हणतो, 'तुम्ही आमच्या मुलखांतून अन्नसामग्री खरेदी करून ती सिद्दीस मुंबईस देतां व सिद्दीला मुंबईस ठेवून

घेतां हें अन्यायाचें आहे. सिद्दी आमच्या मुलखाला त्रास देतो व आमचीं माणसें धरून नेतो. त्याला तुम्ही मदत करतां. तरी यापुढें तुम्ही त्यास कसलीहि मदत करूं नये. पेटिट याजकडून आमची जी रक्कम येणें आहे ती त्याच्या जागीं आलेले तुम्ही द्याल अशी आशा आहे.'

खांदेरीचा जलदुर्ग

शिवाजीमहाराजांची चिकाटी विलक्षण. वीस वर्षें जंगजंग पछाडलें तरी जंजिरा पडत नाहीं असें अनुभवास आलें असतांहि महाराजांनीं प्रयत्नांची कास सोडली नाहीं. त्यांनीं आपल्या प्रयत्नांत चुकतें कोठें याचें मूळ शोधून काढलें. तें हें कीं, सिद्दीचें माहेर मुंबई आहे, तेथून सिद्दीला हरतऱ्हेचें साहाय्य होत नसतें तर महाराजांनीं सिद्दीचा केव्हांच चक्काचूर उडविला असता. यास्तव जंजिरा व मुंबई यांच्या मार्गांत एक अडसर घालण्याचें त्यांनीं योजिलें. डिसेंबर १६७८ नंतर पांच-सहा महिने त्यांनीं जाऊं दिले. त्या मुदतींत त्यांनीं पुढील कार्याची पूर्वतयारी केली. सन १६७२ त महाराजांनीं हेंच मर्म ओळखून उंदेरी-खांदेरीवर जलदुर्ग बांधण्याची तयारीहि केली होती. पण ती मोगल व इंग्रज यांनीं आपल्या आरमारी सामर्थ्याचें प्रदर्शन करून हाणून पाडली. तीच योजना महाराजांनीं पुनः हातीं घेऊन पूर्ण करण्याचें आतां ठरविलें. त्यांनीं ऑगस्ट १६७९ त चौलाजवळ नागांवास खांदेरीवर जलदुर्ग बांधण्याकरितां माणसें व साहित्य जमविलें. नागांवाहून खांदेरी ८ मैल. तेथें माणसें व साहित्य नेण्यास १।२ होड्या ठेवण्यांत आल्या. यास विघ्न आणण्याकरितां इंग्रजांनीं अशी शक्कल काढली कीं, खांदेरी बेट आपलें असल्यामुळें शिवाजीला त्यावर किल्ला बांधण्याचा हक्कच नाहीं. बेटावर शिवाजीचा माय नाईक हा आरमारी अधिकारी असून त्याजपाशीं १५० माणसें व ४ तोफा होत्या. त्याला इंग्रजांनीं बेट सोडून जाण्यास सांगितलें. पण त्यानें महाराजांच्या हुकमाशिवाय आपण बेट सोडणार नाहीं, असें साफ उत्तर दिलें. तेव्हां त्यास अडथळा करण्याकरितां एनसाइन ह्यूजेस हा १६७९ त सप्टेंबरच्या ४ तारखेस तीन शिबाडें घेऊन खांदेरीपाशीं आला. त्यानंतर नागांवाकडून नित्याप्रमाणें दोन तासांनीं साहित्य घेऊन महाराजांच्या होड्या आल्या. त्यांना बेटावर उतरण्यास ह्यूजेसनें मनाई केली. त्या वेळीं बेटावर महा-

राजांचे चारशे लोक काम करीत होते व चार तोफा रोखून ठेवलेल्या होत्या. बेटाभोंवतीं तीन फूट उंचीची तटबंदीहि बांधण्यांत आली होती.

इंग्रजांचा पराभव

एकव्या ह्यूजेसनें काम रेटत नाहीं असें पाहून कॅप्टन मिचिन हा रिव्हेंज व हंटर हीं दोन लढाऊ जहाजें घेऊन आला. त्यांनीं आपलीं जहाजें खांदेरीपासून दीड मैलावर ठेवलीं. पण त्यांची फौज थोडी व तीहि आजारानें बेजार झालेली; या कारणानें नागांव व खांदेरी यांजमधील मराठ्यांचें दळणवळण ते बंद करूं शकले नाहींत. त्यांना हा वेळपर्यंत मराठ्यांशीं लढण्याचा हुकूम नव्हता. तो आल्यावर सन १६७९ च्या सप्टेंबर महिन्यांत मिचिनच्या शिबाडांनीं बेटावर लहानमोठ्या गोळयांचा वर्षाव केला. या लढाईंत इंग्रजांचाच पराभव होऊन त्यांचें एक शिबाड, त्यावरील अधिकारी थार्प व २।३ इंग्रज ठार झाले आणि जॉर्ज कोल व कित्येक इंग्रज पकडले गेले. या वेळीं दौलतखानावरील महाराजांचा रोष नाहींसा होऊन तो कामावर आला होता हें लक्षांत ठेवलें पाहिजे. इंग्रजांचें रिव्हेंज व हंटर यांजपुढें दौलतखानाचीं गलबतें फार लहान व हलक्या दर्जाचीं असतांहि त्याला हा पराक्रम करतां आला ही गोष्ट त्यास अधिकच भूषणावह होय.

त्यानंतर १८ ऑक्टोबर १६७९ रोजीं नागांवाहून शिवाजीच्या ४०।५० गुराबा व गलबतें एकसारख्या फैरी झाडीत बाहेर आलीं. तीं इंग्रजांच्या गलबताजवळ येतांच उभयतांची लढाई जुंपली. तींत इंग्रजांच्या गलबतांची प्रथम पांगापांग झाली. मराठ्यांकडील २४ गुराब व गलबतें रिव्हेंजवर चालून गेलीं. पण त्यांचा अर्ध्या तासाच्या आंत मोड करून इंग्रजांनीं त्यांस नागांवच्या खाडींत परत जावयास लावलें. या लढाईंत इंग्रजांच्या कांहीं बंदुका फुटल्या. ता. २२ ऑक्टोबर रोजीं इंग्रजांनीं शिवाजीच्या तीन गुराबा बुडवून इतर बऱ्याच नादुरुस्त केल्या, ३०० लोक मारले व १०० जखमी केले. नादुरुस्त गुराबा व जखमी लोक नागांवास परत गेले. समुद्रांतून खांदेरीस दिवसा जातांना इंग्रजांच्या आरमारास तोंड द्यावें लागतें असें लक्षांत आल्यावर मराठ्यांनीं पवित्रा बदलून ता. २५ ऑक्टोबर रोजीं रात्रींच इंग्रजांचा डोळा चुकवून नागांवाहून सात लहान होड्या साहित्य घेऊन खांदेरीस नेल्या. मराठ्यांची ही युक्ति समजल्यावर इंग्र-

जांनीं आपलीं जहाजें खांदेरीजवळ आणलीं. तरी भंडारी होड्या वल्हविण्यांत चलाख व फार कुशल, त्यांनीं मधल्या सापटींतून ता. २७ ऑक्टोबर रोजीं पुन्हा इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन नागांवाहून खांदेरी गांठली. तसेंच दक्षिणेकडून १९ होड्या येऊन त्या नागांवच्या खाडींत साहित्य घेऊन शिरल्या.

कॅप्टन किग्विन

आपण कितीहि बंदोबस्त केला व डोळ्यांत तेल घालून बसलों तरी बेटाला पोंचावयाची मदत थांबत नाहीं असें पाहून कॅप्टन किग्विन यानें ता. २७ ऑक्टोबरच्या पत्रांत अश्रु ढाळले. त्यानें दुसऱ्या दिवशीं अधिक काळजी घेतली; तरीहि त्या रात्रीं १६।१७ लहान होड्या बेटावरील दिव्यांचा उजेड चुकवून अंधारांतून बेटावर गेल्या. त्यामुळें इंग्रज निराश होत चालले. खर्चहि वाढत चालला. तथापि आपलें बळ अधिक वाढविण्याकरितां इंग्रजांनीं मुंबईहून कॅ. नॉग्रेव्ह व ह्यूजेस यांजबरोबर हंटर फ्रिगेट ही बोट मदतीस पाठविली. मोठीं जहाजें खाडींत व अडचणीच्या जागेंत उपयोगी पडत नाहींत म्हणून लहान जहाजें ठेवण्यांत आलीं. नागांवाहून बेटाकडे जाणारें साहित्य थांबविण्याकरितां इंग्रजांनीं नागांवच्या खाडीच्या तोंडाशीं आपलीं कांहीं जहाजें ठेवलीं होतीं. तीं खांदेरीकडे नेण्याचा हुकूम मुंबईहून आल्यामुळें ता. १० नोव्हेंबर रोजीं स्थानिक अधिकाऱ्यांनीं काढून घेतलीं.

इंग्रज व मराठे यांचें परस्पर युद्ध जुंपल्यानें सिद्दीस साहजिकच आनंद झाला. या संधीचा फायदा घेऊन आपणहि इंग्रजांच्या मदतीस गेल्यास मराठ्यांच्या जाचांतून एकदांचें सुटूं, या आशेनें नोव्हेंबरच्या मध्यांत सिद्दी खांदेरीच्या बाजूस प्रकट झाला. सिद्दी व इंग्रज यांची युति जमली. सिद्दीनें येतांक्षणींच बेटाभोंवतीं फिरून त्याची टेहेळणी केली. त्या वेळीं बेटावर फक्त ३०० सैनिक व २०० कामकरी असल्याचें त्यास आढळून आलें. सिद्दीप्रमाणें पोर्तुगीजांच्या डोळ्यांतहि मराठे सलतच होते. त्यांनीं ठाण्याच्या बाजूनें मराठ्यांची नाकेबंदी करून व इंग्रजांना जरूर ती सामग्री पुरवून मदत केली. अशा रीतीनें हें त्रिकूट एकत्र जमलें तरी त्याचा परिणाम मराठ्यांवर दिसण्यास साहजिकच विलंब लागला. ता. १० नोव्हेंबर १६७९ रोजीं डोव्ह नांवाची इंग्रजांची गुराब मराठ्यांनीं पकडली. तिजवर

बरेच सैनिक व अंमलदार असून त्यांत २० युरोपियन होते. इंग्रजांपाशीं गोरे लोक मुळांतच थोडे असल्यामुळें त्यांना हें नुकसान पुष्कळच जाणवलें.

इंग्रजांच्या मदतीस सिद्दी आला तरी सुधारलेले इंग्रज व आडमुठा सिद्दी यांचें धोरण जमेना. तो इंग्रजांना बेटावर तोफा डागण्यास सांगूं लागला. इंग्रज त्या डागीनात. सिद्दी शिवाजीचा आसपासचा मुलूख लुटूं लागला. इंग्रज तो त्यास लुटूं देईनात. ता. २२ नोव्हेंबर रोजीं बेटावर ६ खंडी दारू, १ हजार गोळे, १२ मोठ्या तोफा, २०० बरकंदाज व ३०० तरवारबहाद्दर इतका मराठ्यांचा जमाव होता. पण दौलतखान नागांवच्या खाडींत कोंडला गेला होता. त्यामुळें बेटावरील सैनिकास योग्य मार्गदर्शक नसल्यानें ते शरण जातील अशी भीति उत्पन्न झाली. पण शिवाजीनें आपल्या ताब्यांत असलेल्या त्यांच्या बायकामुलांचीं डोकीं उडवीन असा धाक घातल्यामुळें सैनिकांनीं नेट धरला. त्यांना हैराण करण्याकरितां शत्रूनें त्यांचें पाणी तोडलें तरी सैनिक शरण येईनात. सिद्दी व मराठे यांची गोळागोळी सुरू झाली. सिद्दीच्या गलबतांना चुकवून मराठ्यांच्या तीन होड्या बेटावर माल पोंचवावयास गेल्याच. त्यांजपासून बेटावरच्या सैनिकांना गोडें पाणी मिळालें असेलच.

इंग्रजांशीं तह

सिद्दी मराठ्यांशीं लढत असतां शिवाजीच्या मुलखांत शिरून त्यानें त्याचीं चार खेडीं लुटलीं व बरींच जाळलीं. आणि पुष्कळ रहिवासी कैद करून नेलें. याचा ठपका दौलतखानानें इंग्रजांवर ठेवला. त्याच्या मतें इंग्रज लोक वरून कितीहि साळसूदपणा दाखवीत असले तरी त्यांची या कामीं फूस होती. याची दौलतखान व शिवाजी यांना चीड येऊन आपण अशा उपायांनीं खांदेरी तर सोडणार नाहींच, पण तुमच्या नाकावर टिचून तटबंदीचें काम तसेंच चालूं ठेवूं असें शिवाजीनें इंग्रजांना पत्र पाठवून बजावलें. पण सिद्दी बडा हरदम व कझाग, तो मराठ्यांच्या प्रतिकारास न जुमानतां खांदेरीशेजारच्या उंदेरी बेटावर ३ हजार सैनिक व १० तोफा घेऊन उतरला. ता. २३ जानेवारी सन १६८० रोजीं दौलतखानानें ३ हजार सैनिकांनिशीं उंदेरीवर तीन ठिकाणांवरून हल्ला चढविला. त्यांत सिद्दीचे २०० लोक मेले, १०० जखमी झाले व अनेक गलबतें नाश पावलीं. तेव्हां मरा-

त्यांवर उलट हल्ला चढवून त्यांना खांदेरी खाली करावयास लावण्याकरितां सिद्दीनें इंग्रजांकडे दारूगोळा, तोफा, गोलंदाज, ५०।६० बरकंदाज व २० हजार रुपये यांची मागणी केली. इंग्रज आतांपर्यंत झालेल्या खर्चाखालींच टेकीला आले होते, तेव्हां ते सिद्दीला कसची मदत करणार! शिवाय यशाचीहि आशा दिसेना. तेव्हां त्यांनीं २८ जानेवारी सन १६८० रोजीं शिवाजीशीं तह करून व आपलीं सारीं गलबतें घेऊन मुंबईची वाट सुधारली.

इंग्रजांनीं अंग काढून घेतल्याबरोबर सिद्दीनें उंदेरीवर किल्ला बांधून इंग्रजांवर उलटून त्यांना त्रास देण्यास सुरुवात केली. ता. ९ मार्च रोजीं १३ गलबतें घेऊन सिद्दी पेणच्या खाडींत शिरला. तेथें त्यास इंग्रजांची एक होडी दिसली. ती लुटून तिजवरील एका इसमास त्यानें जखमी केलें व दुसऱ्या एकास कैद केलें. तसाच त्यानें शिवाजीच्या मुलखासहि उपद्रव दिला. त्यानंतर एप्रिल महिन्यांत महाराजांची इहलोकची यात्रा संपून संभाजीचें नवी विटी व नवें राज्य सुरू झालें. तरी संभाजीनें बापाचें धोरण पुढें चालवून युद्धांना खंड पडूं दिला नाहीं. महाराजांच्या मृत्यूपर्यंत खांदेरी-वरील किल्ल्याची बरीच प्रगति झाली होती. किल्ला मजबूत बांधला असून त्याजवर ८०० लोकांची वसाहत करण्यांत आली होती.

पराजयाची मीमांसा

आतां शिवाजीच्या पराजयाची मीमांसा करावयाची. सुमारें दोन तपें सिद्दीशीं लढूनहि त्याचा पराभव झाला नाहीं. याचीं कारणें पुढील संभवतात. शिवाजी एकाकी होता. शिवाजीचें आरमार लहान व बाल्या-वस्थेंत होतें. सिद्दी नौ-युद्धांत मराठ्यांपेक्षां अधिक निष्णात होते. ते समुद्रां-तले मासे होते. त्यांना मोगल, इंग्रज व पोर्तुगीज यांचें साहाय्य होतें. इंग्रज व पोर्तुगीज सागरी युद्धांत मराठ्यांपेक्षां अधिक तरबेज होते. सिद्दीचा कोंडमारा करावा तर इंग्रज त्यास सामग्री पुरवीत. इंग्रजांचा कोंडमारा करावा तर मुंबईभोंवतालच्या पोर्तुगीजांच्या मुलखांतून पोर्तुगीज त्यांस पाहिजे ती सामग्री देत. शिवाय मोगलांची सार्वभौम सत्ता व बळ सिद्दीस जरूर तेव्हां पाठीशीं असे. शिवाजी हा मोगल, इंग्रज, सिद्दी व पोर्तुगीज यांचा समान शत्रु असून त्याजविरुद्ध त्या चौघांचें सहकार्य असे व त्यांजपुढें शिवाजी एकाकी होता. म्हणून त्याला यश आलें नाहीं.

प्रकरण पंचविसावें

रामदास व शिवाजी

> तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
> उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥
>
> – श्रीमद्भगवद्गीता

श्रीसमर्थ रामदासस्वामी व श्रीछत्रपति शिवाजीमहाराज यांचा परस्परांशीं गुरुशिष्याचा संबंध होता. या दोन महान् विभूति समकालीन असूनहि त्यांची एकमेकांशीं गांठ केव्हां पडली व छत्रपतींच्या स्वराज्य-स्थापनेंत समर्थांचा वांटा किती होता, याविषयीं विद्वानांत अनेक वर्षे वाद माजून राहिला आहे. अशा या महत्त्वाच्या विषयाचा प्रपंच प्रस्तुत ग्रंथांत न केल्यास ती एक मोठीच उणीव जाणवेल असें वाटल्यावरून तो ऊहापोह या प्रकरणांत करण्याचें योजिलें आहे.

रामदास व शिवाजी हे दोन महापुरुष समकालीन असले तरी रामदास हे शिवाजीपेक्षां बावीस वर्षांनीं वडील होते. शिवरायाचा जन्म शिवनेरीवर सन १६३० त झाला तर रामदासांचा जन्म जांबेस सन १६०८ मध्यें झाला. दोघांचे मार्गहि भिन्न होते. क्षात्रकर्म हा शिवरायाचा धर्म होता, तर ब्रह्मकर्म हा रामदासांचा धर्म होता. दोघांचींहि ध्येयें दोघांच्या डोळ्यासमोर त्यांना समजूं लागल्यापासून स्पष्ट होतीं. समर्थांना आपलें आयुष्य धर्मस्थापनेसाठीं व्यतीत करावयाचें होतें तर शिवाजीला स्वराज्याची स्थापना करावयाची होती. समर्थांच्या चरित्रांत धर्माला अग्रस्थान व स्वराज्याला दुय्यम स्थान होतें, तर शिवरायाच्या चरित्रांत स्वराज्याला अग्रस्थान व धर्माला दुय्यम स्थान होतें. समर्थांना धर्मस्थापनेचें कार्य यशस्वी होण्याकरितां स्वराज्य पाहिजे होतें, तर शिवाजीमहाराजांना स्वराज्य स्थापून धर्माचें रक्षण करावयाचें होतें. सारांश, उभयतांचीं कार्यें भिन्न पण परस्परांस पोषक व पूरक अशींच होतीं. या दृष्टीनें उभयतांत अभावितपणें कामाची वांटणीच झाली होती व तिला अनुसरून उभयतांची तयारी

पूर्व वयांत चालू होती. त्यांपैकीं आतां रामदासांच्या तयारीकडे वळणें आवश्यक आहे.

समर्थांचें पाळण्यांतलें नांव नारायण. या नारायणाचा जन्म मोगलाईत गोदातीरापासून जवळ जांब या गांवीं इ. स. १६०८ मध्यें झाला. त्या वेळीं जांब गांव अहमदनगरच्या निजामशाही राज्यांत होतें. नारायण हा बालपणापासूनच हूड व भक्तिमान् होता. त्याला वयाच्या बाराव्या वर्षींच वैराग्य उत्पन्न होऊन प्रपंचांत पडूं नयेसें वाटलें. म्हणून ऐन लग्नाच्या वेळीं मंडपांतून तो निघून गेला. त्या काळीं जांबेला जवळ अशीं गोदातीरावरील दोन क्षेत्रें : एक पैठण व दुसरें नाशिक. पैठण नजिक व नाशिक फार दूर. तरी रामभक्ति नारायणाच्या घराण्यांत पूर्वापार चालत आलेली व त्याचें आराध्य दैवत नाशिकासन्निध असलेल्या पंचवटीचा प्रभु श्रीरामचंद्र. या कारणानें नारायणानें पंचवटीकडेच धूम ठोकून पंचवटीपासून खालीं थोड्या अंतरावर टाकळी नांवाच्या गोदातीरावरील खेड्यांत राहून गायत्रीपुरश्चरण चालू केलें.

नाशिक हें जसें अखिल भारतीय प्रसिद्ध क्षेत्र तसें विद्येचेंहि माहेरघर होतें. तेथें वैदिक, शास्त्री, पुराणिक, कीर्तनकार, यति, योगी, संत, महंत, गंगातीरीं राहून त्या पुण्यक्षेत्राला पवित्रता आणीत. अशा स्थितींत नारायणासारखा धाडसी, तेजस्वी, बुद्धिमान्, ब्रह्मचारी व ध्येयनिष्ठ तरुण त्यांजपासून आपलें कल्याण करून घेतल्यावांचून कसा राहील ? त्याला मोठा वैदिक वा पढिक पंडित व्हावयाचें होतें असें नाहीं. सदाचार, सद्विचार व आत्मज्ञान यांची प्रायः गरज असल्यामुळें त्या त्या प्रवृत्तीच्या व मार्गांतल्या व्यक्तींपाशीं बारा वर्षें घालवून तो योगी व ज्ञानी बनला. अलीकडे आपल्या देशांत राजकोटच्या राजकुमार महाविद्यालयांत शिकणाऱ्या राजपुत्रांना तेथील विद्या संपादन झाल्यानंतर युरोपची यात्रा करून आणण्याची वहिवाट इंग्रजी राज्यांत होती. तिचाच अवलंब नारायणानें करून तो सन १६३२ त म्हणजे वयाच्या चोविसाव्या वर्षीं पृथ्वीप्रदक्षिणेस अर्थात् भरतखंडांतील संचाराकरितां निघाला. जगाचें समग्र ज्ञान होण्यास व पुढील कार्याची रूपरेखा आंखण्यास या यात्रेची त्यास अत्यंत जरूर होती. कदाचित् त्यास तसा आदेश पंचवटींतील गुरूनेंहि दिला असेल.

भारत-संचार

नारायण शके १५५४ (स. १६३१) फाल्गुन शुद्ध पक्षीं निघाला तो त्यानें प्रथम काशीक्षेत्रीं जाऊन विश्वेश्वराचें दर्शन घेतलें. काशीहून निघून त्यानें अयोध्या, गोकुळ, मथुरा, वृंदावन व राजपुतान्यांतील प्रभास हीं तीर्थें केलीं. तेथून फिरत फिरत द्वारकेस जाऊन त्यानें श्रीकृष्णाचें दर्शन घेतलें. नारायण या यात्रेंत त्या त्या प्रांतांतील जे धर्मज्ञ, धर्मोपदेष्टे व विचारी पुरुष असतील त्यांना भेटून त्यांजबरोबर देशस्थितीची चर्चा करी व त्यांची कार्यपद्धति समजून घेई. हिमालयांत बदरीनारायण व बदरीकेदार यांचें दर्शन घेऊन खालीं उतरल्यावर त्यानें पंजाबांत जाऊन शिखांचा गुरु नानक-पंथीय होता, त्याजबरोबर विचार-विनिमय केला. हा गुरु कोण याचा खुलासा हनुमानस्वामींनीं आपल्या रामदास-बखरींत केला नाहीं. हा काल सन १६३२ च्या पुढचा आहे. त्या काळीं शहाजहान बादशहा दिल्लीच्या गादीवर असून हर गोविंद हा शिखांचा गुरु होता. त्याजपाशीं शिखांची संघटना व कार्यपद्धति नारायणानें समजून घेतली असली पाहिजे. तिज-वरूनच त्यास रामदासी सांप्रदायाची संघटना पुढें सुचली असावी.

उत्तरेकडची यात्रा पूर्ण केल्यावर नारायण पूर्वेस जगन्नाथपुरीस गेला व तेथून दक्षिणेस रामेश्वराचें दर्शन घेऊन गिरीचा व्यंकटेश, श्रीशैल-पर्वतावरचा मल्लिकार्जुन, महाबलीपूरचा नरसिंह, किष्किंधेचा विरूपाक्ष सोंडूरचा कार्तिकस्वामी असें करीत करीत करवीरक्षेत्रीं आला आणि तेथून कोंकणांत उतरून कोंकणपट्टींत संचारत त्यानें चिपळुणाजवळ परशुरामाचें दर्शन घेतलें आणि मग कुंभारली घाट चढून कृष्णाकांठ पाहत पाहत महाबळे-श्वराचें उच्च शिखर त्यानें गांठलें. तो भीमाशंकरावरून पंढरपुरास गेला. पंढरपूर हे वारकरी सांप्रदायाचें आदिपीठ. तेथील वारकरी सांप्रदायाची कार्यपद्धति समजून घेऊन तो त्र्यंबकेश्वरास जाऊन परत पंचवटीस आला.

नारायणानें ही सगळी यात्रा एकट्यानें वा चार-दोन सवंगडी बरोबर घेऊन केली असावी. यात्रेंत निर्वाह माधुकरीवर. सुखास येईल तेथें हवें तितके दिवस राहावें व हवें तेव्हां पुढें चालतें व्हावें. मागचा पाश नाहीं व काल-मर्यादाहि नाहीं. घर बाराव्या वर्षी सोडल्यापासून आयुष्यच मुळीं कष्टाचें व अडचणीचें. मग बारा वर्षांच्या प्रवासांत तर त्याविषयीं बोलावयासच

नको. त्यामुळें नारायणास समाजांत मिळून-मिसळून राहण्याची व गोडीनें वागण्याची संवय लागली. जिकडे जाईल तिकडे तो मित्रच जोडीत गेला. हिंदी भाषा त्याला अवगत झाली व देशोदेशीं त्यानें असंख्य मित्र केले. हिंदुस्थानाच्या अन्तःस्थ स्थितीचें, मुसलमान राजकर्त्यांच्या धार्मिक जुलमाचें व जनतेच्या त्रिविधतापाच्या व्यथेचें त्यास सूक्ष्म निरीक्षण करावयास मिळालें.

कृष्णाकांठीं वास

अखिल भारतवर्षांत त्यानें आपल्या कार्यक्षेत्राकरितां कृष्णाकांठ पसंत केला. आतां नारायण आपणांस रामदास म्हणवूं लागला. या साऱ्या विश्वांतील व्यवहार ईश्वरी संकेताप्रमाणें चालत असून मानव हें ईश्वराच्या हातांतील खेळणें आहे असें आध्यात्मिकांचें मत आहे. रामदास आतां सिद्ध पुरुष झाले असून ईश्वरी आदेश वा दृष्टान्त जसा होईल त्याप्रमाणें ते वागूं लागले. त्या दृष्टीनें त्यांनीं कृष्णातीर पसंत केलें म्हणावें वा तसा त्यांस श्रीरामचंद्राचा आदेश झाला असेंहि म्हणावें. मात्र इतकें खरें कीं, त्यामुळें त्यांचें कार्यक्षेत्र छत्रपतींच्या कार्यक्षेत्रास भिडलें आणि कालेंकरून एकरूप झालें. कारण रामदास सातारा जिल्ह्यांत आले व त्यास लागून असलेल्या पुणें जिल्ह्यांत छत्रपतींना नियतीनें बेंगळुराहून ओढून आणलें.

सातारा प्रांतांतहि रामदासांनीं मसूर गांव प्रथम निवडून काढलें. त्यापूर्वी कांहीं दिवस त्यांनीं महाबळेश्वर, वाई, माहुली, जरंडा येथेंहि वास केला होता. महाबळेश्वर हा पर्वत व जरंडा हा डोंगर. त्यांवर एकान्तांत राहणारा उच्च व पवित्र विचारांत तरंगत असणार. या सर्व स्थळांची चांचपणी करून मसूर त्यांनीं पसंत केलें, याचें कारण तेथील जनमत त्यांस अनुकूल वाटलें. गांव फार चांगलें व ब्राह्मणसमुदाय मोठा. गांवांत घरोघरीं आड, गांवाजवळचा ओढा बारमहा वाहणारा आणि भोंवतालीं विहिरी, आंबराया व मळे. पवित्र कृष्णा तेथून एक कोसावर. रामदास प्रत्यहीं कृष्णेवरच स्नानाला जात. मसूर गांव शहाजीचें देशमुखी वतनाचें म्हणून तें त्यांनीं निवडलें असेंहि सांगण्यांत येतें. परंतु शहाजीराजे त्या वेळीं म्हणजे सन १६४४ त कर्नाटकांत असल्यामुळें रामदासांना त्यांजपासून कसलीहि मदत मिळण्याचा संभव नव्हता. कारण जेव्हां त्यांनीं आपलें आराध्य दैवत धनु-

धारी राम याचा उत्सव नव्यानें सुरू केला तेव्हां त्या उत्सवांत सिंहासनावरच्या निशाणांच्या काठ्यांना देवालयांत नेतांना मार्गांत आंब्याची फांदी आडवी आली, त्या वेळीं मसूरच्या यवन अधिकाऱ्यानें ती तोडण्यास हरकत केली. अर्थात् शहाजीचा अधिकार मसूरवर चालत असता तर यवन अंमलदार त्यांस हरकत करावयास धजला नसता. ही हरकत रामदासांनीं विजापुराहून लेखी परवानगी आणून दूर करून घेतली.

नारायणांनीं रामदास हें रामभक्तीचें निदर्शक नांव स्वतः धारण केलें होतें व ते भिक्षेस गेल्यावर 'जयजय रघुवीर समर्थ' अशी गर्जना करीत, तिजवरून त्यांचे भक्त व जन त्यांस गौरवानें समर्थ म्हणूं लागले व तेव्हांपासून तेंच नांव आबालवृद्धांच्या मुखीं झालें.

मसूर हेंहि स्थळ त्यांना कायम करतां आलें नाहीं. त्या गांवीं तीनच वर्षें रामनवमीचा उत्सव साजरा केल्यावर त्यांनीं कृष्णेपलीकडे, मांडनदीच्या कांठीं पर्वतांच्या घेऱ्यांतील चाफळास जाऊन तेथें मठ स्थापला, देवालय बांधलें, अंगापुराच्या डोहांत सांपडलेल्या श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली व इ. स. १६४८ सालापासून तेथें उत्सवास सुरुवात केली. एव्हांपासून त्यांच्या कार्याचें कायम केन्द्र चाफळ बनलें व शिष्यसंघटनेस त्यांस व्यवस्थित स्वरूप देतां आलें.

महत्त्वपूर्ण घटना

समर्थांचें सन १६४४ त कृष्णातीरीं आगमन झालें, त्याच्याआधीं फक्त दोनच वर्षें बाल शिवाजी बेंगळुराहून पुण्यास वा खेडेबारें येथें आपल्या जहागिरीवर येऊन राहिला होता. या दोन्ही महत्त्वपूर्ण घटना ईश्वरी संकेतानें जमून आल्यासारख्या दिसतात. या वेळीं समर्थ छत्तीस वर्षांचे व छत्रपति अवघे चौदा वर्षांचे होते. इतक्या बालवयांत समर्थांना शिवबाची माहिती लागली असली तरी तो कांहीं चमत्कार केल्यावांचून त्यांच्या नजरेंत भरावा कसा! ते या वेळीं मसूर येथें होते. मसूरपासून पुणें वा खेडेबारें हीं गांवें शंभर मैलांच्या आंतबाहेर होतीं. स्वामी चौकस व सर्वसंचारक असल्यामुळें त्यांना प्रसिद्ध शहाजी राजाचा पुत्र शिवाजी पुणें प्रांतीं राहावयास आल्याची बातमी ताबडतोब लागली असेल. परंतु त्याच्या अंगचा विशेष गुण प्रकट

झाल्याशिवाय त्याजकडे स्वामींचें लक्ष जाण्याचें कारण नव्हतें. तसा एक महत्त्वपूर्ण प्रसंग शके १५६७ चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या सुमुहूर्तावर (मार्च सन १६४५) म्हणजे स्वामी कृष्णातीरीं आल्यानंतर एक वर्षाच्या आंत घडून आला. त्या दिवशीं शिवाजीनें रोहिडेश्वराच्या डोंगरावर आपलें कुल-दैवत जो महादेव त्याच्यासमोर शेंकडों मावळे जमवून हिंदवी स्वराज्याची घोषणा केली. त्या प्रसंगीं दादाजी नरस प्रभु देशपांडे व दादापंत (दादाजी कोंडदेव) हे उपस्थित होते. ही माहिती हां हां म्हणतां सर्वत्र पसरली व विजापुरास आदिलशहापर्यंत पोंचली. स्वामींना ती सातारा प्रांतीं कळ-ण्यास विलंब लागला नसेल. शिवाजी त्या वेळीं केवळ १५ वर्षांचा होता. इतक्या कोंवळ्या वयाच्या मुलानें हें कल्पनातीत धाडस करावें ही गोष्ट अद्भुत होय यांत शंका नाहीं. स्वामी ही बातमी ऐकून चकितच झाले असतील व स्वराज्यस्थापनेच्या लोभानें व अतिशय आतुरतेनें शिवाजी-विषयीं शक्य ती बारीक माहिती काढण्याच्या उद्योगास लागले असतील. वरील प्रसंगीं दादाजी नरस प्रभु व दादाजी कोंडदेव उपस्थित होते. त्याअर्थी शिवाजीनें त्यांजबरोबर आगाऊ विचार-विनिमय केला असेल यांत शंका नाहीं. परंतु त्याशिवाय इतर कोणाचा सल्ला त्यानें घेतला होता कीं काय हें समजण्यास मार्ग नाहीं.

या वेळीं समर्थ सातारा प्रांतांत नवे होते. त्यांना आपल्या सांप्र-दायाची स्थापना करावयाची होती व शिष्यमंडळी जमवावयाची होती. त्यांना स्वतःला धर्मस्थापना करावयाची होती व स्वराज्य-स्थापना करणारा कोणी निघाल्यास त्यास शक्य तें प्रोत्साहन द्यावयाचें होतें. या दृष्टीनें स्वराज्याच्या घोषणेनंतर शिवाजी कशीं पावलें टाकतो यावर नजर ठेवून स्वामी आपल्या कार्यांत निमग्न झाले असतील. त्यांनीं त्यासाठीं एक चतुःसूत्रीच बनविली होती.

मुख्य हरिकथा निरूपण। दुसरें तें राजकारण॥
तिसरें तें सावधपण। सर्व विषयीं ॥ १ ॥

चौथा अत्यंत साक्षेप। फेडावे नाना आक्षेप॥
अन्याय थोर अथवा अल्प। क्षमा करीत जावें॥ २ ॥

संकेतें लोक वेधावा। येकून येक बोधावा।
प्रपंचहि सावरावा। यथानुशक्त्या ॥ (दा. द. ११, स. ५)

स्वामींच्या कार्यक्रमांत कथा, कीर्तन व पुराण याद्वारां धर्मस्थापना करणें, राजकारणाचें जनतेस शिक्षण देणें, लोकांस व्यवहार सावधपणें करण्यास सांगणें व प्रसंगाप्रसंगानें उपदेशद्वारां लोकांस आपलेसें करणें यांचा समावेश करण्यांत आला होता. त्यांपैकीं त्यांना स्वतःला धर्म-स्थापनेचें कार्य करावयाचें होतें व त्याशिवाय दुसरा कोणी स्वराज्यस्थापना करणारा नरवीर भेटेल तर त्यास साहाय्यभूत व्हावयाचें होतें.

स्वामी महान् तत्त्ववेत्ते होते. पारमार्थिक तत्त्वज्ञान व राजकीय तत्त्व-ज्ञान हीं दोन्ही त्यांना पूर्णपणें अवगत होतीं. गुप्तता हें त्यांच्या एकंदर कार्य-पद्धतीचें मुख्य सूत्र होतें. आंतून राजकारणी व बाहेरून धर्मकारणी अशीं त्यांचीं द्विविध अंगें होतीं. म्हणून राजकारणाची कोणतीहि गोष्ट करावयाची झाल्यास ती या कानाची त्या कानास कळूं नये, अशी ते प्रारंभीं बराच काळ दक्षता बाळगीत असत. कारण तशी दक्षता न बाळगल्यास त्यांचें धर्मस्थापनेचें कार्य गोत्यांत येण्याचा फार संभव होता. परकीय यावनी सत्तेपुढें भयभीत झालेली जनता त्यांजपाशीं राजकारणाचा वास आल्यास फटकून राहिली असती. त्यांना धर्मस्थापनेची चळवळ धडाक्यानें चालवून आपल्या रामदासी संप्रदायांत तेजस्वी तरुणांना घ्यावयाचें होतें व त्यांजमार्फत ठिकठिकाणीं नवीन मठ स्थापवून जनतेची नैतिक व आध्या-त्मिक अवनति थांबवून तिला उच्च पातळीवर चढवावयाचें होतें. यास्तव ‘इशारतीचें बोलतां नये। बोलायाचें लिहों नये। लिहावयाचें सांगों नये। जबाबीनें॥’ असा दंडक त्यांनीं आपल्या शिष्यांना घालून दिला होता.

सर्वत्र मुसलमानांचें राज्य होतें. विजापुरापासून तो लहान गांवा-पर्यंत मुसलमान सुभेदार, सरदार, काजी, फकीर, मुजावर हे ठाण मांडून बसले होते. त्यांची हिंदुधर्मोपदेशास प्रायः आडकाठी नसे. हिंदु धर्मोप-देशकहि एकट्या हिंदूंची काळजी आपण वाहतों असें न दाखवितां असा उपदेश करीत कीं, जो सर्व मानवांना लागू व्हावा. मोरया गोसावी यांची व निंबचे महानुभाव कमलनयन गोसावी यांची याच प्रकारची कार्यपद्धति

असल्यामुळें, त्यांना मुसलमान राज्यकर्त्यांकडूनहि पुष्कळ इनाम जमिनी मिळवितां आल्या. रामदासांनींहि हीच पद्धति स्वीकारल्यामुळें त्यांना व त्यांच्या असंख्य शिष्यांना मुसलमानांकडून अडथळा होत नव्हता. याशिवाय दुसरेंहि एक पथ्य ते पाळीत. ते वर म्हटल्याप्रमाणें राजकारणापासून बाह्यतः अलिप्त राहत. हा तटस्थपणा सोडून जर ते उघडपणें राजकारण करूं लागले असते तर इस्लामी राज्यकर्त्यांनीं त्यांचें केव्हांच चंदन उडविलें असतें. म्हणूनच समर्थ व शिवछत्रपति यांच्या भेटींचे, वाटाघाटींचे व सल्लामसलतींचे लेखी पुरावे राजकीय पत्रव्यवहारांत उपलब्ध नाहींत. ते उपलब्ध झालेच तर समर्थ सांप्रदायिक वाङ्मयांतच उपलब्ध होणार. या दृष्टीनें रोहिडेश्वरावरची महत्त्वपूर्ण घटना रामदासांना ज्ञात नव्हती असें म्हणणें धाष्टर्याचें ठरेल. अर्थात् त्या घटनेंत त्यांचें अंग कितपत होतें हा प्रश्न अलाहिदा.

शिवाजीमहाराज हे श्रद्धाळू, भक्तिमान् व वृत्तीनें सनातनी होते. संतसाधूंच्या संगतीसाठीं व उपदेशासाठीं बालपणापासून ते उत्सुक असत याची साक्ष, ते पुण्यास असतां तुकारामबुवांचीं कीर्तनें ऐकण्यास जात असत, या आख्यायिकेंत मिळते. ते सतरा वर्षांचे होते तेव्हांच त्यांनीं मोरगांवास मोरया गोसाव्यास गो-ब्राह्मण-प्रतिपालक या नात्यानें गाई चारण्याकरितां जमीन दिली (१६४७). पुण्याजवळ चाकण मुक्कामीं सिद्धेश्वर भट ब्रह्मेउपाध्ये वास्तव्य करून असत. त्यांनीं केलेल्या अनुष्ठानामुळें 'आपण राज्यास अधिकारी झालों व सकळ मनोरथ चिंतिले ते पावलों, ऐसा अनुभव आला म्हणून व संकटकालीं साहाकारी जाणोन, त्यास शंभर पातशाही होनांचें वर्षासन' महाराजांनीं स. १७–७–१६५३ रोजीं करून दिलें. महाराजांनीं महाबळेश्वरास शके १५७४ त (स. १६५३) फाल्गुन महिन्यांत वेदमूर्ति गोपाल भट यांजपासून मंत्रोपदेश संपादिला. त्या वेळीं दिलेल्या दानपत्रांत महाराज म्हणतात, 'स्वामी आपले गुरु. स्वामीस आपण आपले अभ्युदयार्थ सूर्यप्रीत्यर्थ अनुष्ठान सांगितलें. प्रतिवर्षी वर्षासन द्यावयाची मोईन केली असे' (प. सा. सं. खंड १, पृ. १३५–३६). कर्नाटकाच्या स्वारीवर निघतांना महाराजांनीं पाटगांवच्या मौनीबुवांचें दर्शन घेतलें व त्यांस ३ मे १६७७ रोजीं प्रतिवर्षी एक हजार मण, त्यांच्या अन्नसंतर्पणास लागेल इतकी, सामग्री 'प्रतिवर्षी देण्याची' सनद दिली (प. सा. सं. खं. ३, पृ. १२५).

महाराज मोगलाईंत औंढ्या नागनाथापाशीं छावणी करून राहिले असतां मुदलगांव येथें महापुरुष देव भारती हे महादेवाच्या मंदिरांत अनुष्ठान करून असत. "ऐसे तपस्वी होते, त्यांच्या दर्शनास शिवछत्रपति गेले. ते साल्हेर-मुल्हेरचे मोहिमेस जात होते. त्यांस भगवानांनीं आशीर्वचन दिधलें कीं, जा, नववे दिवशीं साल्हेर व मुल्हेर हे किल्ले फत्ते होतील. त्यास श्री महाराज छत्रपति बोलले कीं, किल्ले फत्ते जाले तर हा गांव आम्ही तुम्हांस मोकास देऊं. तेव्हां तेथून जातांच नववे दिवशीं किल्ले घेतले. तेव्हां गांव भगवानास मोकासा दिधला" (सनदा-पत्रांतील माहिती, पृ. १६०) हे किल्ले महाराजांनीं सन १६७०–१६७१ त घेतले.

हीं उदाहरणें इ. स. १६४७ ते १६७१ पर्यंतचीं चोवीस वर्षांवरचीं आहेत. तीं वाचून असें स्पष्ट लक्षांत येतें कीं, महाराज संतसत्पुरुषांच्या आशीर्वादासाठीं भुकेलेले असत. या सर्व साधुपुरुषांपेक्षां रामदासांचें स्थान केव्हांहि श्रेष्ठ होतें. इतकेंच नव्हे तर, धर्माबरोबर राजकारणाचीहि सदैव काळजी वाहणारे तेच एकमेव संत होते. आणि तेहि त्यांजपासून दूर नसून त्यांच्या मोहिमांच्या मार्गावरच होते. अशा अत्यंत थोर, निरपेक्ष, निरिच्छ व सिद्ध पुरुषाचा अनुग्रह शक्य तितका लवकर घेतल्यावांचून महाराज कसे राहिले असतील ? तर्कानें वरील विवेचन ग्राह्य वाटण्यासारखें असलें तरी त्यास कागदोपत्रीं पुरावा काय मिळतो हेंहि पाहावयास पाहिजे. तो पुरावा येणेंप्रमाणें –

(१) रामदासांचे कारभारी शिष्य दिवाकर गोसावी यांनीं सांगितल्यावरून अंताजी गोपाळ देशकुलकर्णी परगणे कुडाळ यांनीं 'वाकेनिसी टिपण' शके १६०३ (इ. स. १६८२) दुर्मतिनाम संवत्सरे माघ वद्य १३ सोमवार या दिवशीं लिहिलें, म्हणजे रामदासांच्या निधनानंतर चारच दिवसांनीं लिहिलें. त्यांत रामदासांनीं शिवाजीमहाराजांस चाफळाजवळच्या शिंगणवाडीस शके १५७१ त (इ. स. १६४९) अनुग्रह दिला, असा मजकूर आहे.

(२) एकदां समर्थशिष्य दिवाकर गोसावी यांचा मुक्काम पुण्याजवळ चाकण या गांवीं होता. तेथून त्यांनीं १८ डिसेंबर १६५४ रोजीं बहिरंभट यांस पुढील पत्र लिहिलें – "तुम्हीं आम्हांस येण्याविषयीं लिहिलें

तर, श्रीसमर्थ दहा संवत्सरपर्यंत कोठें न जातां सर्व ग्रंथास आरंभ केला. आणि सांगितलें कीं, श्रीकडील हरएकविषयीं बोभाटा येऊं न देणें, म्हणून आम्हांस सांगितलें. आणि सर्व मंडळींस आज्ञा केली कीं, तुम्हीं श्रीचे उत्सवाची भिक्षा करून आमचें स्वाधीन करणें. म्हणून सर्वांस सांगितल्याप्रमाणें सर्व मंडळी निघून गेली. आणि आपण व कल्याण गोसावी व चिमणाबाई आक्का व अनंत कवि यांस बरोबर घेऊन एकांतस्थानीं शिवथरचे घळींत जाऊन बसले. तुम्हीं महाबळेश्वराचें देवालयाचें काम चांगल्या रीतीनें करावें. भास्कर गोसावी आले म्हणजे मी एक दिवसाचें अवकाशे येतों. हे आशीर्वाद " (भाटेकृत सज्जनगड).

या वेळीं म्हणजे इ. स. १६५४ च्या डिसेंबर महिन्यांत दिवाकर गोसावी चाकणास म्हणजे शिवाजीच्या राज्यांत होते. आणि रामदास चंद्रराव मोरे यांच्या राज्यांत वरंधा घाटापाशीं शिवथरच्या घळींत आपल्या शिष्यांसह राहावयास आले होते. या घळीपासून मोरे यांचा वाडा जवळ होता व रायगड, राजगड हे किल्लेहि जवळ होते. शिवाजी राजगडावर राहत होता व तेथून मोरे याचें राज्य व कोंकणांतील आदिलशाही मुलूख घेण्याचा प्रयत्न करीत होता. त्या प्रयत्नांत तो व त्याचे सहायक त्या प्रदेशांतून जात-येत असतां त्यांच्या व रामदासांच्या गांठीभेटी वारंवार होण्याचा संभव दाट होता.

(३) रामदासांचे शिष्य भास्कर गोसावी यांनीं श्रीगुरुभक्तिपरायण मोक्षश्रियाविराजित दिवाकर गोसावी यांस १३ फेब्रुवारी इ. स. १६५८ रोजीं पत्र लिहिलें. त्यांत म्हटलें आहे : " श्रींचे उत्सवास ५० होन भिक्षेस मिळाले. ते भानजी गोसावीबरोबर पाठविले; पावतील. शिवाजीराजे यांजकडे भिक्षेस गेलों. त्यांनीं विचारलें, 'तुम्हीं कोठील, कोण, कोणा ठिकाणीं असतां?' त्यावरून आम्ही बोललों कीं, आम्ही रामदासी; श्रीसमर्थांचे शिष्य चाफळास हो! मग ते बोलले कीं, ते कोठें रहातात? मूळ गांव कोण? त्याजवरून मीं सांगितलें कीं, गंगातीरचे जांबचे राहणारे. प्रस्तुत चाफळास मठ करून व श्री देवाची स्थापना व उत्सव करून आहेत. तुम्हीं भिक्षा करून उत्सव करीत जावा म्हणून (असें सांगितल्यावरून) आम्ही हिंडत आहों. हें ऐकून राजेश्रींनीं दत्ताजीपंत वाकनीस यांस प्रतिवर्षीं

दोनशें होन देत जाणें म्हणून पत्र पाठविलें. ते होन येतील हे विनंती" (भाटेकृत सज्जनगड).

हें पत्र इ. स. १६४९ नंतर नऊ वर्षांनीं लिहिलें आहे. त्यावरून सकृद्दर्शनीं रामदास व शिवाजी यांची भेट इ. स. १६५८ पूर्वी झाली नव्हती असा ग्रह होतो. उलटपक्षीं तत्कालीन राजकीय व सामाजिक स्थिति लक्षांत घेतां आलेले गोसावी रामदासांचे शिष्य आहेत कीं दुसरेच कोणी लबाड व ढोंगी आहेत, अशी शंका वाटून खरें समजून घेण्याकरितां महाराजांनीं त्यांची उलटतपासणी करावी हेंहि स्वाभाविक होय. ते शिष्य पूर्वपरिचित रामदासांचे आहेत अशी खात्री झाली नसती तर त्यांना दोनशें होनांचें वर्षासन करून न देतां थोडीशी भिक्षा घालून महाराजांनीं वाटेस लावलें असतें.

रामदास सन १६५४ पासूनच शिवथरच्या घळींत राहूं लागले असल्यामुळें त्यांची व शिवाजीची गांठ सन १६५८ पर्यंत कैक वेळां पडली असेल. कधीं रामदास शिवाजीच्या भेटीस रायगडावर वा राजगडावर जात असतील तर कधीं शिवाजी शिवथरच्या घळींत येऊन रामदासांना भेटत असेल. त्या भेटींत त्यांची योग्यता माहीत झाल्यामुळेंच त्यानें रामदासांच्या देवस्थानाला दोनशें होनांचें वर्षासन नेमून दिलें हें उघड आहे. हा काळ अफजलखानाच्या वधापूर्वीचा एक वर्षाचा आहे.

समर्थांचें शिवथरीं राहणें इ. स. १६५४ तच काय, पण इ. स. १६७६ ताहि होतें. त्यासंबंधीं ८ ऑगस्ट १६७६ रोजीं शिवाजीराजे यांनीं दसमाजी नरसाळा सरहवालदार महाल इमारती किल्ले महिपतगड यांस पुढील पत्र लिहिलें आहे.

(४) "श्रीरामदास शिवतरीं राहतात. सांप्रत ते गडावर राहण्यास येतील. तरी त्यांचे लोकांस गडावर येणें व हरएक खबर घेणें." असेंच दुसरें पत्र शिवाजीराजांनीं जिजोजी काटकर हवालदार व कारकून किल्ले सज्जनगड यांस लिहिलें असून सज्जनगडावर रामदास आल्यास त्यांची बडदास्त चांगली ठेवण्यास सांगितलें आहे" (प. सा. सं. खं. २, पृ. ५५१).

वरील पत्रांवरून शिवाजीचा रामदासांशीं इतका दाट संबंध आला होता कीं, ते महिपतगडावर वा सज्जनगडावर राहावयास गेले तर त्यांची

व्यवस्था चांगली ठेवण्याची आज्ञा शिवाजीनें तेथील अधिकाऱ्यांना केली होती. सारांश, रामदास हे शिवथरच्या घळींत शिवाजीच्या स्वराज्य-स्थापनेस सुरुवात झाल्यापासून जाऊन येऊन बावीस वर्षें होते.

(५) खालील पत्र केशव गोसावी यांनीं गुरुभक्तिपरायण रा. रा. दिवाकर गोसावी यांस ४ एप्रिल १६७२ (शके १५९४ चैत्र कृ. २) रोजीं लिहिलें आहे – "आपण पत्र पाठविलें तें पावलें मजकूर समजला. रा. शिवाजीराजे भोसले हे समर्थांचे भेटीस येणार म्हणून लिहिलें तें समजलें. मी येणार होतों, परंतु माझी प्रकृति फार बिघडली. येणें होत नाहीं. मी इकडून अकास येणेसाठीं लिहिलें. परंतु अकाचेंहि येणें व्हावयाचें नाहीं. गांवीं भानजी गोसावी असतील. राजे यांची पहिलीच भेट आहे. वाडीचे लोकांस खटपटेस आणावें. उपयोग होईल. झाडी बहुत आहे. इकडून उदईक त्रिंबक गोसावी व विठ्ठल गोसावी व दत्तात्रय गोसावी उदईक पाठवून देतों. श्रीचे उत्सवास भिक्षेचें जें धान्य मिळालें तें अश्वत्थ भट ससूरकर या समागमें पाठविलें. दत्ताजीपंताकडून दोनशें होन उत्सवास पाठविले ते आले असतील. लोभ करावा, हे विनंती" (भाटेकृत सज्जनगड).

या पत्रांत शिवाजी रामदासांच्या भेटीस येणार असा उल्लेख आहे. पण याच भेटींत रामदासांनीं शिवाजीवर अनुग्रह केला असें या पत्रावरून अनुमान निघत नाहीं. भेटीचें स्थळहि स्पष्ट नाहीं. फक्त भेट पहिलीच आहे असें म्हटलें आहे व ती बहुधा चाफळास असावी असें वाटतें. हें पत्र अस्सल नसून नक्कल आहे असें म्हणतात. फार तर त्यावरून असें म्हणतां येईल कीं, ही भेट चाफळास पहिली होती; पण रामदास व शिवाजी यांची ही पहिली भेट नव्हती. याच पत्रांत दत्ताजीपंत वाकनीस यांजकडून (चाफळाच्या) उत्सवास पाठविलेले दोनशें होन आले असतील, असें म्हटलें आहे. ते होन सन १६५८ त शिवाजीराजांनीं वर्षासन म्हणून सुरू केलेले होन होत. 'हीच पहिली भेट' मानल्यास १६५८ ते १६७२ पर्यंत चौदा वर्षें चाफळच्या उत्सवास दरसाल दोनशें होन दिले जात होते, पण समर्थ व महाराज यांची भेट मात्र एकदांहि झाली नव्हती असें मानावें लागेल! पण वरील पत्रांत शिवाजीमहाराज समर्थांचा अनुग्रह घेण्यास वाडीस येत आहेत असें स्पष्ट म्हटलेलें नाहीं. म्हणून त्याचा अर्थ इतकाच

समजतां येईल कीं, महाराज त्या वाडीस इ. स. १६७२ पूर्वी कधींच आले नसून आतांच प्रथम येत आहेत. मग समर्थांनीं महाराजांना अनुग्रह केव्हां दिला असा प्रश्न उभा राहतो. त्याचें उत्तर असें देतां येईल कीं, वाकेनिसी टिपण प्रमाणभूत मानल्यास १६४९ त तो अनुग्रह दिला; तें टिपण मानावयाचें नसल्यास समर्थ शिवथरच्या घळींत इ. स. १६५४ ते १६७६ पर्यंत बावीस वर्षें जाऊन येऊन होते, त्या काळांत केव्हां तरी दिला असला पाहिजे. मग तो काळ १६७२ पूर्वीचा कीं नंतरचा? तो पूर्वीचा असावा असें अनुमान महाराजांनीं बाळगलेल्या भगव्या झेंड्यावरून निघतें. या भगव्या झेंड्याची वाकेनिसी टिपणांत दिलेली आख्यायिका अशी आहे: "शके १५७७ वैशाख शु. द्वितीयेस (इ. स. १६५५) शिवाजीच्या मनांत आलें कीं, आपलें सबंध राज्यच रामदासांस अर्पण करावें. त्याप्रमाणें त्यानें एक चिठ्ठी स्वामींच्या झोळींत टाकली. स्वामींनीं ती स्वीकारून तें राज्य आपला कारभारी या नात्यानें शिवाजीच्या स्वाधीन केलें व आजपासून हें राज्य माझें असें समजून त्याचें चिन्ह म्हणून भगवा झेंडा आपल्याबरोबर वागवीत जा, असें सांगितलें."

ही आख्यायिका खरी असो वा खोटी असो, शिवाजीचा झेंडा भगवा असल्याचें कोणीहि नाकारीत नाहीं. तो त्यानें केव्हां सुरू केला हें सांगतां येत नाहीं; पण इ. स. १६६६ त शिवाजी आग्र्यास औरंगजेबाच्या भेटीस जावयास निघाला तेव्हां त्याचा झेंडा भगवा होता हें सिद्ध आहे. कारण जयसिंगाचा पुत्र रामसिंग यानें आग्र्याहून जयपुरास शिवाजीच्या आग्रा येथील आगमनाचें पत्र लिहिलें, त्यांत त्याचें निशाण भगवें होतें (orange & vermillion) असें म्हटलें आहे (जदुनाथ सरकार, पृ.३३५). सारांश, शिवाजीनें रामदासांचा अनुग्रह १६७२ पूर्वी केव्हांहि घेतलेला असो, त्या दोघांचा गुरु-शिष्य नात्याचा दाट संबंध इ. स. १६६६ पूर्वीच आला होता याविषयीं शंका राहत नाहीं.

या विधानाला परिपोषक असा आणखी एक पुरावा उपलब्ध आहे.

कास्म ड गार्डा या नांवाचा पोर्तुगीज गृहस्थ शिवकालांत मार्मा गोव्यास राहत असे. त्यानें शिवाजीच्या मृत्यूनंतर पंधरा वर्षांनीं शिवाजीचें चरित्र पोर्तुगीज भाषेंत लिहिलेलें प्रसिद्ध झालें आहे. तें त्यानें लिहिलें त्या

वेळीं रामदासस्वामी जिवंत असून त्यांची कीर्ति भरतखंडभर पसरली होती. त्यांच्या रामास शिवाजीनें व इतरांनीं बरींच गांवें इनाम दिलीं असून त्यांच्या मठास लहानशा संस्थानाचा दर्जा प्राप्त झाला होता. त्या सर्वांचा खोल परिणाम गार्डावर होऊन तो रामदासांचें साधुत्व व थोरपण याविषयीं पुढील प्रशंसापर उद्गार काढतो –

" या प्रांतांत एक ब्राह्मण असून त्याचें नांव रामजी. त्याला जमीनजुमला फार मोठा आहे. त्याजविषयीं मुसलमान व सर्व जातींचे हिंदु यांना फार आदर वाटतो. या प्रांतांत नेहमीं युद्धें चालू असतात. पण कोणत्याहि धर्माचा व जातीचा सैनिक असो, तो त्याच्या जहागिरीस बिलकुल धक्का लावीत नाहीं. म्हणून या आश्रमांत (settlement) हिंदुस्थानांतील सर्व लोकांचा परामर्श घेतला जात असतो. कारण तो म्हणतो कीं, मला देवानें दिलेलें द्रव्य सर्वांकरितां आहे. हें औदार्य व सद्गुण जगांत अत्यंत दुर्मिळ होत. त्यामुळें या ब्राह्मणाला पूज्य मानीत नाहीं असा एकहि मानव हिंदुस्थानांत नाहीं. या बाजूनें हमेश सैन्य जातयेत असतें व तें लहानहि नसतें, तें त्यास जगांतील अद्वितीय पुरुष समजतें.

" या प्रांतांत जाती अनेक आहेत व त्या एकमेकींच्या हातचें खात नाहींत. म्हणून यानें त्या त्या जातीचे आचारी आपल्यापाशीं ठेवले असल्यानें त्याच्या मठांतील अन्नग्रहण कोणासहि नाकारणें शक्य नाहीं. कोणी एखादा त्याचें आदरातिथ्य चुकवून जाऊं म्हणेल तर त्यानें ठेवलेले हेर (शिष्य) त्याला अगत्यपूर्वक मठांत घेऊन जातात. पहिल्या खेपेस शिवाजी त्याच्या मठावरून जात असतां रामजीनें त्यास मठांत पाहुणचार घेण्यास बोलावलें. पण त्यानें तें नाकारलें. तेव्हां रामजीनें आपल्या मनुष्याबरोबर त्याजकडे शिधा पाठवून दिला व निरोप धाडला कीं, ' सर्वच लोक गरीब आहेत. तेव्हां तूं आपणांस श्रीमंत न समजतां पाठविलेल्या शिध्याचा अव्हेर करूं नकोस. कारण देवानें जें धन मला दिलें आहे तें माझें एकट्याचें नसून सर्वांचें आहे.' देवाची त्याजवर कृपा असल्यामुळें रामजीच्या (Ramagy) हातून हीं पुण्यकृत्यें घडतात " (Foreign Biographies of Shivaji, Pages 61–62).

जयसिंगाची स्वारी शिवाजीवर इ. स. १६६५ त झाली. त्या वेळीं

शिवाजीनें जयसिंगास भेटून आपण उभयतां हिंदु आहोंत व हिंदूंचें रक्षण करणें आपलें कर्तव्य आहे, तें मी करीत असल्यामुळें मला तुमचें साहाय्य व सहानुभूति पाहिजे असें आपल्या लाघवी भाषेनें सांगितलें. शेवटीं तो म्हणाला, 'आपण उभयतांनीं परस्परांशीं स्नेहभावानें वागण्याविषयीं रामाची व इतर देवांची शपथ घेऊं या' (कास्म ड गार्डा, पृ. ८९). शिवाजी आग्र्यास औरंगजेबाच्या भेटीस निघाला, तेव्हां त्यानें आपणांबरोबर एक 'रामदासी' जयसिंगाच्या परवानगीनें घेतला होता, असें गार्डा लिहितो.

कास्म ड गार्डा हा पोर्तुगीज ख्रिस्ती चरित्रकार आहे. तो भोंगळ लेखक असला तरी रामदासी संप्रदायाचा खास नाहीं. अतएव रामदासांचा पक्षपाती नाहीं. तो शिवकालीं गोव्यांत राहत असून त्याच्या कानावर ज्या वार्ता आल्या त्यांच्या आधारें त्यानें हें वर्णन लिहिलें आहे. त्यावरून इतकें निष्पन्न होतें कीं, त्याच्या काळांत रामदासांचें नांव भरतखंडभर न म्हटलें तरी महाराष्ट्रभर सर्वत्र गाजत असून शिवाजी व रामदास यांचा संबंध इतका घनिष्ठ समजला जात होता कीं, शिवाजी रामभक्त बनला होता व त्यानें आग्र्यास जातांना बरोबर एक रामदासी घेतला होता, इतकी माहिती गार्डापर्यंत गेली होती.

शिवाजी आपल्या हयातींत अनेक साधूंना भेटला. सिद्धेश्वरभट उपाध्ये यांनीं केलेल्या अनुष्ठानामुळें, आपण राज्यास अधिकारी झालों व सकळ मनोरथ चिंतिले ते पावलों, असें शिवाजी म्हणतो (इ.स. १६५३). गोपाळभट यांजपासून इ. स. १६५२ त मंत्रोपदेश घेऊन त्यांस तो गुरु मानूं लागला. मौनीबुवास तो इ. स. १६७७ त कर्नाटकाच्या स्वारीवर जातांना भेटला. तसेंच त्यानें इ. स. १६७० च्या सुमारास देव भारतीचेंहि दर्शन घेतलें. यांपैकीं कोणीहि राजकारणी नसून केवळ पारमार्थिक होते. सिद्धेश्वर भटाच्या सनदेंत 'तुम्ही संकटकाळीं साहाकारी झाला' असें शिवाजीनें म्हटलें आहे. म्हणजे संकटकालांत कोणातरी साधूच्या साहाय्याची शिवाजी अपेक्षा करीत असे, हें सिद्ध होतें.

रामदास हे वरील साधूंप्रमाणें केवळ पारमार्थिक नसून राजकारणीहि होते, असा कांहीं लेखी पुरावा आपणांस सांपडतो का हें पाहूं. रामदासांची ग्रंथरचना प्रचंड असून तींत राजकारणाविषयीं त्यांनीं आपले विचार

शेंकडों ठिकाणीं प्रदर्शित केले आहेत. त्यांच्या ग्रंथांपैकीं 'दासबोध' हा सर्वमान्य ग्रंथ प्रथम आपण घेऊं. ते दासबोध, दशक १९ समास ९ यांत लिहितात –

गनीमाच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुर्फुरिती भुजा । ऐसा पाहिजे कीं राजा । कैपक्षी परमार्थी ॥

हे धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें । ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ॥

दासबोध दशक ११ समास ५ –

मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण । तिसरें तें सावधपण । सर्वविषयीं ॥ राजकारण बहुत करावें । परंतु ते कळोंच नेदावें । परपीडेवरी नसावें । अन्तःकरण ॥

कल्पांत मांडिला मोठा । म्लेंच्छ दैत्य बुडावया । कैपक्ष घेतला देवीं । आनंदवनभूवनीं । बुडालें सर्वही पापी । हिंदुस्तान बळावलें । अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभूवनीं ॥

संभाजीस उपदेश –

बहुत लोक मेळवावे । एकविचारें भरावें । कष्ट करोन घसरावें । म्लेंच्छावरी ॥

देवीचा साक्षात्कार

संकटकाळीं श्रीशिवाजीमहाराजांस देवी भवानी दृष्टान्त देत असे व त्याप्रमाणें महाराज वागत, ही गोष्ट शिवाजीच्या सर्वच चरित्रकारांनीं मान्य केली आहे. सभासदाची बखर विशेष विश्वसनीय मानली जाते. त्या बखरींतहि अफजलवध, शाइस्ताखानाची स्वारी, जयसिंगाची स्वारी आणि आग्र्याची अटक इत्यादि प्रसंगीं देवीचा दृष्टान्त झाल्याचा उल्लेख आहे. समर्थांनींहि **'उत्तम-पुरुष-लक्षण'** या समासांत (दास. द. १८, स. ६) **'बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभवानी'** असें म्हणून देवीच्या कृपेचें वर्णन केलें आहे. समर्थांचे बखरकार एवढेंच म्हणतात कीं; 'संकट-प्रसंगीं एकाग्र मन करून देवीची प्रार्थना केल्यास देवी दृष्टान्त देईल त्याप्रमाणें वागावें' अशी तोड समर्थांनीं सुचविली. समर्थांनीं तरी 'देवीवर भार टाकण्यासच सांगितलें' यांत अविश्वसनीय असें काय आहे? ज्याची ज्या

देवतेवर निष्ठा असते त्या देवतेचा संकट-प्रसंगीं दृष्टान्त होतो, हें सर्व भाविकांस मान्य आहे. श्रीसमर्थ हे **'तुझा तूं वाढवी राजा'** अशी प्रार्थना देवीजवळ करीत असत. अर्थातच शिवाजीची निष्ठा पाहून, समर्थांनीं देवीच्या दृष्टान्ताची भावना दृढ केली, अफजलवधप्रसंगीं शिवाजीला तसा दृष्टान्त झाला आणि समर्थांनीं अफजलवध-प्रकरणास अनुलक्षून लिहिलेल्या **'उत्तम-पुरुष-लक्षणां'**त, **'बरें ईश्वर आहे साभिमानी। विशेष तुळजाभवानी'** असें वर्णन करून शिवाजीच्या यशाचें श्रेय 'देवीच्या दृष्टान्ता'ला दिलें. हा सर्व पूर्वापार संदर्भ लक्षांत घेतल्यास समर्थांनीं शिवाजीला देवीचें ध्यान करून तिच्या दृष्टान्ताप्रमाणें वागण्याची कल्पना सुचविली व ती अफजल-वधाच्या पूर्वीं सुचविली, हें म्हणणें पटण्यासारखें नाहीं काय ?

रामदास हे पारमार्थिक व राजनीतिविशारद असल्याचें वरील थोड्याशा उताऱ्यांवरून कोणासहि पटण्यासारखें आहे. म्हणून शिवाजी-महाराज सर्व साधूंत त्यांस श्रेष्ठ मानून त्यांच्या मठास हरएक प्रकारें साहाय्य करूं लागले. त्या विषयीं इ. स. १६७६ मार्च ३१ रोजीं त्यांनीं आबाजी मोरदेव देशाधिकारी व देशकुलकर्णी, प्रांत जावली, यांस आज्ञापत्र पाठविलें.

"कसबे चाफळ प्र॥ कऱ्हाड येथील नित्य पूजा व सेवकांस वेतनें व शिष्य समुदाय व अतीत-अभ्यागतासह श्रीरामदासस्वामी यांसाठीं १२१ खंडी गला हें स्वामींच्याच सांगण्याप्रमाणें चालत असतां स्वामींनीं 'दिल्हें तें सर्व पावलें. या उपरी येक रुकापर्यंत द्रव्य व दाणा गला न पाठविणें. आपणांस कांहीं न पाहिजे' असें रायगडास सांगोन पाठविलें. त्यामुळें राजे यांनीं ज्याचें कर्तव्य स्वामींस मानलें आलें (मान्य आहे) त्या मुख्यास म्हणजे दिवाकर गोसाव्यास पन्हाळ्यास बोलावून स्वामींच्या त्या नकाराबद्दल विचारलें. त्यास त्यांनीं सांगितलें कीं, 'श्रींची निःस्पृह स्थिति आहे. महाराजांचे भक्तीस्तव वैभव घेतात. तरी अमान सामग्रीची मोईन चालवावी.' नंतर बाकीसह मोईन देऊन ऐवज निवळ पोताहून देत जाणें, वराता न देणें. काडीइतकें अंतर न पडणें. जाणीजे" (प. सा. सं खंड २, पृ. ५४४).

या पत्रांत समर्थांचा शिष्यसमुदाय, त्यांच्या मठांत येणारा-जाणारांचा घेतला जाणारा परामर्श, समर्थांची विरक्त स्थिति, महाराजांची त्यांजवरील गाढ भक्ति व त्यांजकडून त्यांच्या मठास होणारें फार मोठें साहाय्य यांचें चित्र प्रतिबिंबित झालें आहे.

शिवाजीमहाराजांनीं त्यांच्या मठास ११ गांवें इनाम दिलीं. त्याविषयीं दत्ताजी त्रिमल यांनीं महादाजी सामराज, वेंकाजी रुद्र, सुभेदार व कारकून माहालनिहाय अनुक्रमें तरफ सातारा व तर्पे कोळे यांस ता. ३ सप्टेंबर १६७७ रोजीं खालील पत्र लिहिलें.

"शिवाजी राजे श्रीरामदासांना भेटण्यास शिवतरीं गेले व श्रीरघुनाथ देवास ११ गांवें इनाम दिलीं. ते गांव देवाचें नांवें लिहोन त्या गांवींचें उत्पन्न देवाचा प्रसाद म्हणौन राजगृहीं जमा करणें असें समर्थांनीं सांगितलें. पण ह्या गांवच्या ११।११ बिघ्यांचें इनाम समर्थांकडे अखेर चालू केलें. बाकीचें दिवाणांत (सरकारांत) घेतलें. त्यांच्या सनदा दिवाकर गोसावी यांजपाशीं दिल्या. याखेरीज इदिलशाही इनाम चालत आला असेल तोहि चालविणें" (प. सा. सं. पृ. ५८९).

वरील तारखेचें दुसरें पत्र दत्ताजी त्रिमल यांनीं वेंकाजी रुद्र, सुभेदार व कारकून महाला निहाय ता. कोळे यांस लिहिलें आहे तें –

"चाफळ येथें श्रीरघुनाथ देवाल्य आहे. राजश्री छत्रपति स्वामी (शिवाजीराजे) देवाचे भेटीस आले होते. ते वेळीं स्वामी समर्थांनीं रा. राजियास आज्ञा केली. त्यावरून जाऊलीचें सुभेवरी मोईन करून रामनवमी उत्सवास दिली. ११ होन १५० टक्के खुर्दा इत्यादि. समयानुसार जटाधारी जोगी येऊन पीडा करतील तरी करूं न देणें. जागाजागाचीं सिंहासनें येऊन यात्रा समारंभ चाले ऐसें करणें. खासा (वेंकाजी) जाऊन संरक्षण करणें. व १२१ ब्राह्मणांस टंकसाळी ४ टक्के दक्षणा देणें" (प. सा. सं. खं. २, पृ. ५८९).

वरील दोन्ही पत्रें महत्त्वाचीं आहेत. चाफळचा श्रीरामाचा उत्सव शिवाजीमहाराज स्वतःच्या घरचा उत्सव समजून वरीलप्रमाणें पोलीस व इतर बंदोबस्त ठेवीत असत.

समर्थ शिवथरास फार वर्षे राहिल्यामुळें त्यांचें त्या स्थळावर फार प्रेम जडलें होतें. त्यांची रामावर मुख्य भक्ति असल्यामुळें शिवथराजवळ रामनगर नांवाची पेठ वसविण्याची त्यांना इच्छा झाली. ती महाराजांनीं २ सप्टेंबर १६७५ रोजीं संबंधित अधिकाऱ्यांस पत्र लिहून खालीलप्रमाणें पुरी केली.

अजर शिवाजीराजे – मोकदम, उदमी, व इतर लोक यांस 'तर्फ शिवतर मौजे पार माची कोंड नलवडा पेठ रामनगर वसविण्याबद्दल समर्थांनीं आज्ञा केली. आणि बारा वर्षेंपावेतों दिवाण हसील माफ म्हणून सांगितलें त्याप्रमाणें करणें ' (प. सा. सं. खंड २, पृ. ५३१).

या ठिकाणीं शिवथराविषयीं थोडासा खुलासा करणें इष्ट आहे. वरंधा घाटाच्या पायथ्याशीं शिवतर (शिवथर) नांवाचीं तीन शिवतरें एकमेकांपासून मैल-दीड मैलाच्या अंतरावर आहेत. त्यांचीं नांवें आंबे शिवतर, कसबा शिवतर, कंबा शिवतर, अशीं आहेत. या शिवतरापासून पार माची दोन मैल आहे. पारमाचीच्या उत्तरेस सोनगड (ज्यावर इंग्रज कैदी ठेवले होते) आहे. कांगोरी ऊर्फ मंगळगड ५ मैल, वरंधा गांव एक मैल व रायगड १५ मैल आहे. शिवतर व रायगड यांमध्यें काळनदी आहे. दहा मैलांवर बिरवाडी आहे.

समर्थ करतील ती आज्ञा प्रमाण अशी महाराजांची मनःस्थिति झाली होती. समर्थांवर त्यांची भक्ति इतकी जडली होती कीं, त्यांचे शिष्य दिवाकर गोसावी यांच्या मठासहि २१ सप्टेंबर १६७७ रोजीं त्यांनीं कांहीं सवलती दिल्या.

' मोरो त्रिमल प्रधान – गोपाळ रायाजी देशाधिकारी व देशकुलकर्णी प्रांत जावली यांस – श्रीसमर्थशिष्य दिवाकर गोसावी यांचा मठ भगगांव व॥ कारवी येथें आहे. तेथें गोसावी यांच्या गुरांची वणी न घेणें, बागास आजार न देणें ' (प. सा. सं. खंड २, पृ. ५९०).

दिवाकर गोसाव्याच्या मठास महाराजांनीं कांहीं सवलती तरी दिल्या; पण दुसरे समर्थशिष्य वासुदेव महंत यांचा मठ भोर संस्थानांत कण्हेरी या गांवीं होता. त्यास शके १५९३ (इ. १६७१) अधिक वैशाख वद्य ७ स पुष्पवाटिका व बाग करावयास दोन ठिकाणीं मिळून ११ बिघ

जमीनहि शिवछत्रपतींनीं इनाम दिली. म्हणजे इ. १६७२ पूर्वींच समर्थ-शिष्यांवर महाराजांची जर अशी कृपा झाली होती तर महाराजांच्या त्या कृपेचा ओघ समर्थांच्या कार्याकडे किती तरी पूर्वी वळला असला पाहिजे.

समर्थांच्या मठाला शिवाजीनें इनामें दिलीं त्यापूर्वींच म्हणजे चाफळास रामाचा उत्सव समर्थांनीं इ. स. १६४८ (शक १५७०) त सुरू केल्यावर लागलीच त्याच वर्षी विजापूरच्या आदिलशहाचा दिवाण दानतराव यानें उंब्रज व कोरटी येथें इनाम जमीन दिली व मुधोळचे राजे बाजी घोरपडे यांनीं चरेगांव व माजगांव (चाफळाजवळ) यांनींहि इनाम जमीन दिली. याचा अर्थ असा कीं, रामदासांच्या साधुत्वाची कीर्ति विजापूर व मुधोळ येथपर्यंत इ. स. १६४८ तच पसरून खुद्द आदिलशहा व त्याचा सरदार बाजी घोरपडे यांना चाफळच्या मठाचा परामर्श घेणें कर्तव्य वाटलें.

समर्थ-शिवाजीचें गुरुशिष्याचें नातें अनेक वर्षें जडलें होतें असें सिद्ध झालें तरी त्यापासून शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेच्या कार्यांत समर्थांची भूमिका कोणती हा प्रश्न शिल्लक राहतोच. समर्थ स्वतः कधीं लढले नाहींत व त्यांनीं स्वतः त्याच्या दैनंदिन राज्यकारभारांत भाग घेतला नाहीं हें स्पष्ट आहे. त्यांचें कार्य म्हटलें म्हणजे पारमार्थिक व सल्लामसलतीचें.

समर्थांपूर्वींच्या संतांनीं जनतेस भक्तिमार्गास लावून हिंदुधर्माचें रक्षण केलें. त्यानंतर अखिल भरतखंडांत हिंडल्यावर स्वराज्यस्थापनेशिवाय हिंदु-धर्माचें रक्षण व्हावयाचें नाहीं, अशी समर्थांची खात्री झाली. त्यांनीं लिहिलेल्या 'दासबोधा'च्या पूर्वार्धांत स्वराज्योदयास शिस्त, उद्योगशीलता, नियमित-पणा, धैर्य, स्वार्थत्याग, ऐक्य, प्रामाणिकपणा, चारित्र्य, निष्ठा हे जे आवश्यक सद्गुण त्यांची जोपासना करून जनता स्वराज्योन्मुख केली. पुढील काळांत शिवाजीकडून स्वराज्योदय खरोखरच होऊं लागल्याची साक्ष पटतांच, त्यांनीं स्वराज्यास पोषक अशा राजकीय उपदेशास सुरुवात केली. हा उपदेश खुद्द 'दासबोधां'त थोडा आहे, पण त्यांच्या स्फुट कवितेंत विपुल आहे. समर्थांनीं स्वराज्याच्या दृष्टीनें केलेली मुख्य कामगिरी हीच होय. त्याशिवाय अफजलखान, शाइस्ताखान, जयसिंग, आग्र्यास प्रयाण इत्यादि आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांनीं शिवाजीस जो सल्ला दिला असेल तो कर्मा

महत्त्वाचा नाहीं. जयसिंग व आग्र्यास प्रयाण या बाबतींत रामजीनें (रामदास) शिवाजीस केलेल्या उपदेशाची साक्ष गार्डासारखा तिऱ्हाईत पोर्तुगीज लेखक देतच आहे. शिवाजी इ. १६६५ पूर्वी रामभक्त बनला होता व त्यानें आपणांपाशीं रामदासांचा एक शिष्य म्हणजे रामदासी बाळगला होता. तो अशाकरितां कीं, संकटकाळीं जेव्हां रामदासांच्या उपदेशाची वा मार्गदर्शनाची आवश्यकता भासेल तेव्हां ताबडतोब त्यांच्याशीं संबंध जोडता यावा. समर्थांकडून पारमार्थिक व राजकीय दृष्ट्या शिवाजीस जें साहाय्य झालें असें सर्वसामान्य जाणत्या लोकांचें मत आहे तें या प्रकारचें होय. उलटपक्षीं शिवाजीनें जे जे राजकारण संबंध आपल्या हयातींत केलें तें सर्व शिवाजी रामदासांना विचारून करीत होता असें कोणीहि समंजस माणूस समजत नाहीं व त्या कार्याचा वांटा रामदासांस कोणी देऊंहि इच्छीत नाहीं. स्वराज्य-स्थापनेची स्फूर्ति शिवाजीस स्वतंत्रपणेंच झाली असून त्या स्थापनेचें सर्व श्रेय त्याला, त्याच्या शूर सेनापतींना व राजकारणपटु प्रधान-मंडळालाच आहे.

प्रकरण सव्विसावें

शिवरायाचें निर्याण

मरणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः ।
क्षणमप्यवतिष्ठते श्वसन्यदि जन्तुर्ननु लाभवानसौ ॥

— कालिदास

जंजिऱ्याच्या सिद्दीशीं युद्ध सुरू असतांच श्रीछत्रपति शिवाजी-महाराज यांनीं चैत्र शुद्ध १५ शके १६०२ (३ एप्रिल १६८०) रोजीं रायगडावर इहलोकींची यात्रा संपविली. ते २४ मार्च रोजीं शीतज्वरानें व रक्तातिसारानें आजारी पडले व त्यांचा काळ रविवारीं दोन प्रहरीं झाला. त्यासंबंधीं सभासद जड अन्तःकरणानें व भावनावश होऊन लिहितो, ‘राजियाचें देहावसान झालें ते दिवशीं पृथ्वीकंप जहाला. गगनीं धूमकेतु उदेला. रात्रीं जोड इंद्रधनुष्यें निघालीं. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्रीशंभुमहादेवी तळ्याचें उदक रक्तांबर झालें. पाण्यांतील मत्स्य बाहेर पडून अमासवणी (माशांवांचून) उदक जहालें. ऐशीं अरिष्टें जाहलीं. मग राजियांचें कलेवर चंदनकाष्टें व बेलकाष्टें आणून दग्ध केलें. स्त्रिया, राज-पत्न्या, कारकून व हुजरे सर्व लोकांनीं सांगितलें कीं, धाकटा पुत्र राजाराम यांनीं क्रिया करावी. सर्वांनीं खेद केला. राजाराम यांनीं अत्यंत शोक केला. त्यानंतर उत्तरकार्य कनिष्ठांनीं करावें असें सिद्ध केलें. वडील पुत्र संभाजीराजे वेळेस नाहींत याजकरितां धाकट्यांनीं क्रिया केली.’ त्याज-बरोबर त्यांची एक भार्या पुतळाबाई ही सती गेली.

शिवाजीच्या मृत्यूसंबंधीं निरनिराळ्या ठिकाणांहून निरनिराळ्या मजकुराचीं पत्रें गेलीं. राजापुराहून सुरतेच्या इंग्रजांकडे येणेंप्रमाणें कळ-विण्यांत आलें, “शिवाजी मरण पावला. त्याच्या मरणामुळें या भागांत पुष्कळच घोटाळा माजेल असें दिसतें. संभाजी राजानें पन्हाळ्यास आपलें ठाणें केलें असून त्याजकडे असंख्य सैन्य जाऊन मिळत आहे” – ता. १९ एप्रिल १६८० (प. सा. सं. खंड २, पृ. ६८८). त्यानंतर आठ दिवसांनीं

राजापुराहून मुंबईस पत्र आलें, " शिवाजीराजाच्या मृत्यूबद्दल तुम्हांस कळलेंच असेल. संभाजीराजानें कारभार हातीं घेऊन राजपदवीहि घेतली आहे. सुभेदार, हवालदार इत्यादि सर्व अधिकाऱ्यांना त्यानें आपल्याकडे बोलावलें आहे. कित्येकांना त्यानें कैद केलें व कित्येकांना कामावरून दूर केलें. त्याचा नवा सुभेदार येथें आला आहे " (प. सा. सं. खंड २, पृ. ६८८). २८ एप्रिल १६८० रोजीं मुंबईकर इंग्रजांनीं सुरतेस कळविलें, " शिवाजी राजा मेला अशी खात्रीलायक माहिती आम्हांस मिळाली आहे. बारा दिवस आजारी पडून रक्तातिसरानें तो मेला असें म्हणतात. त्याला मरून आज तेवीस दिवस झाले. तूर्त सर्वत्र शांतता असून संभाजीराजा पन्हाळ्यावर आहे " (प. सा. सं. खंड २, पृ. ६८९). ता. ३ जून १६८० रोजीं मुंबईचे इंग्रज सुरतेस लिहितात, " शिवाजी मेला हें अगदीं खरें असून, संभाजीला बापाच्या सर्वस्वाचा ताबा मिळाला. तो अद्यापि पन्हाळ्यावर आहे. त्यानें एक हजार स्वार तयार ठेवले असून त्यांना दोन महिन्यांचा पगार त्यानें अगाऊ देऊन ठेवला आहे. त्याचा धाकटा भाऊ रायरीला सुरक्षित असून त्याला तो दयेनें वागवील असें म्हणतात. अण्णाजी पंडिताचा शिरच्छेद झाला. मोरो पंडितावर मर्जी खप्पा झाली नाहीं. तथापि त्याला अजून विश्वासांत घेतलें नाहीं. देशांत थोडथोडी स्थिरस्थावर होत आहे " (प. सा. सं. खंड २, पृ. ६९२).

राजापुराहून सुरतेस पत्र ता. २६ जून १६८०, " संभाजी राजा आतां रायरीला गेला आहे. अण्णाजीचें डोकें कापलें नसून त्याचे साखळ्या (बेड्या) घालून हाल चालविले आहेत. देशांत स्थिरता येऊन संभाजी राजे झाल्याचें जाहीर झालें आहे. त्याजपाशीं २० हजार सैन्य आहे. तो फार मेहनती व सावध आहे असें लोक बोलतात " (प. सा. सं. खंड २, पृ. ६९३). नागापट्टण १४ जुलै (डच) – " सुप्रसिद्ध दरोडेखोर शिवाजी मेल्याबद्दल खात्रीलायक बातमी आली आहे. त्याचा पुत्र संभाजी यानें आपल्या धाकट्या भावाशीं भांडण करून गादी मिळविली. सेनापति रघुनाथ पंडित धन्याच्या मृत्यूनंतर मदुरा प्रांतांतून आपलें सैन्य काढून घेऊन पोर्टोनोव्हो व तेगनापट्टण या मार्गानें जिंजीकडे गेला. शिवाजीच्या मृत्यूबद्दल एक अवाक्षरहि न बोलतां एकोजी राजाशीं तोंडी बोलणें करून त्याजकडून खंडणीचा मोठा

वांटा त्यानें वसूल केला " (प. सा. सं. खंड २, पृ. ६९६). हुगळी ते मुंबई, पत्र ता. १३ डिसेंबर सन १६८०, " शिवाजी आजपर्यंत इतक्या वेळां मेला आहे कीं, तो कित्येकांना अमर आहे असें वाटूं लागलें आहे. त्याच्या कारभाराला उतरती कळा लागेपर्यंत त्याच्या मृत्यूच्या वार्तेवर कोणी विश्वास ठेवील असें वाटत नाहीं " (प. सा. सं. खंड २, पृ. ७०४). फ्रायर भाग ३ – " ता. १ जून रोजीं शिवाजी निसर्गाचें देणें देतां झाला. शिवाजीबरोबर अनेक लोकांनीं आपणांस जाळून घेतलें. शिवाजीच्या प्रधानांमध्यें कोणाला राजा करावें याबद्दल मतभेद होता. अण्णाजी पंडित धाकट्याच्या बाजूचा होता व मोरो पंडित संभाजीच्या हक्काचा पुरस्कार करीत होता. पुढें संभाजीच महाराज झाला " (प. सा. सं. खंड २, पृ. ७०६).

जेस्विट वृत्तान्त – " अखेरीस शिवाजीच्या मृत्यूची बातमी आली. ह्या वेळीं ती खरी ठरली. यापूर्वी आपल्या मृत्यूच्या बातम्या तो चोरी व लूट करण्यासाठीं लोकांस बेसावध ठेवण्याकरितां उठवीत असे. सर्व राष्ट्रांत राज्यकर्ता म्हणून परमेश्वरानें आपणांस अढळपद दिलें आहे अशी बढाई मारणारा हा जुलमी राजा शेवटीं मृत्यूच्या तावडींत सांपडला " (प. सा. सं. खंड २, पृ. ७०७). सुरतेची बातमी ता. १३ नोव्हेंबर इ. स. १६८०, " शिवाजी राजाच्या मृत्यूमुळें मोगल लोकांना कांहींच फिकीर वाटेनाशी झाली आहे. त्याच्यामागून अधिकारावर येणाऱ्या कोणाहि माणसामध्यें मोगल साम्राज्याला त्रास देण्याइतकें पुरेसें धैर्य व शहाणपण नाहीं, अशी त्यांची पक्की समजूत आहे " (प. सा. सं. खंड २, पृ. ७०३). मुंबई ते सुरत ता. ३ मे १६८०, " संभाजी राजा आपल्या नांवाची ग्वाही फिरवून बापाच्या गादीवर बसला आहे असें कळतें. मोरो पंडित, अण्णाजी पंडित वगैरे त्याचा हुकूम घेण्याकरितां पन्हाळ्यास गेले आहेत. रामराजा रायरीला आहे. तो तेथेंच राहणार असून तो किल्ला त्याच्याच ताब्यांत आहे. सर्व सुभेदार व हवालदार संभाजीनें तसेच ठेवले. त्यांत बदल केला नाहीं " (प. सा. सं. खंड २, पृ. ६९०). सुरत ते हुगळी २३ ऑक्टोबर १६८०, " शिवाजी राजाला त्याच्या दुसऱ्या बायकोकडून विषप्रयोग झाला असावा. त्याचा कनिष्ठ पुत्र गादीवर बसावयाचें घाटत होतें. त्याला तुरुंगवास प्राप्त झाला

आहे. आतां शिवाजीचा ज्येष्ठ पुत्र राज्य करीत आहे. त्याला थोड्या अडचणी आल्या असें नाहीं" (प. सा. सं. खंड २, पृ. ६९८).

शिवाजीचा मृत्यु ही भारतीय राजकारणांतील एक फार मोठी क्रांतिकारक घटना होती. त्या काळांत वार्ता-प्रसाराचीं साधनें गोगलगायीप्रमाणें मंद असल्यामुळें ही मृत्यूची बातमी अखिल हिंदुस्थानभर फैलावण्यास दीर्घकाळ लागला. ती प्रथम इंग्रज लोकांत राजापुराहून पसरली व खुद्द राजापुराहून ती बाहेर पडण्यास सोळा दिवस लागले. त्यानंतर तिचे सादपडसाद सर्वत्र आठ महिने उमटत होते. प्रथम तिजवर कोणा परकीयांचा विश्वासच बसेना. शिवाजीवर इंग्रज लोकांनीं जे आरोप केले आहेत त्यांपैकीं एक असा आहे कीं, शिवाजी आपल्या शत्रूंना गाफील ठेवण्याकरितां स्वतःच्या मरणासंबंधींहि खोटया बातम्या उठवितो. परंतु ज्या वेळेला त्याच्या मृत्यूविषयीं त्यांची खात्री झाली त्या वेळीं त्यांना हायसें वाटलें. 'बरी एकदांची ब्याद गेली' असा त्यांनीं समाधानाचा सुस्कारा सोडला. मोगलांना तर 'निर्वीर्यमुर्वीतलम्' झालें. महाराष्ट्रांत शिवाजीमागें केवढाहि मोठा मनुष्य पुढें आला तरी त्याला आपण भिण्याचें मुळींच कारण नाहीं असा मोगलांना आत्मविश्वास वाटूं लागला.

इंग्रजांच्या शिव्या व ओव्या

शिवाजी होता तोंपर्यंत इंग्रजांनीं त्याला शेलक्या शिव्या देऊन घेतल्या. त्यांचा त्याजबरोबर राजापूरच्या धरपकडीपासून संघर्ष सुरू होऊन तो राजापूर, सुरत, हुबळी, धरणगांव इत्यादि शहरीं त्यानें जी लूट व जाळपोळ केली तिजमुळें वाढत गेला व त्यांत आपणांस शिवाजी शेरास सव्वाशेर भेटल्याचें प्रत्ययास येऊन ते नाना प्रकारच्या शिव्याशापांनीं आपला जळफळाट व्यक्त करूं लागले. ते त्याची चांच्या, दरोडेखोर, अविश्वसनीय, फसव्या, जुलमी, लुटारू, शत्रु-मित्र न जाणणारा, देवाचीहि भीति न बाळगणारा अशा कठोर शब्दांनीं संभावना करीत. उलट प्रसंगविशेषीं .ते त्याचे गुणहि गात. तो मोठा चलाख व धोरणी योद्धा आहे, चळवळ्या आहे, कोणासहि शांतता लाभूं न देणारा आहे, मोगलांप्रमाणें आळशी नाहीं, पावसाळ्यांतहि त्याचा उद्योग थांबत नाहीं, असें ते म्हणत आणि निधड्या छातीचा वीर, हर्क्यूलसप्रमाणें सामर्थ्यवान् या शब्दांनीं त्यास गौरवीत आणि हानिबाल, शिकंदर, सीझर या जगप्रसिद्ध

योद्धयांच्या पंक्तीस त्यास बसवीत. तो रजपूत आहे व हिंदु धर्माचें रक्षण करण्याकरितां त्यांचा सेनाधिपति म्हणून पुढें आला आहे, अशी त्यांची खात्री झाली होती. हिंदुस्थानांतील आम जनता त्याजविषयीं काय म्हणते हेंहि त्यांच्या कानावर आलें होतें. आणि शिवाजी स्वतःस काय समजत असे हेंहि त्यांना माहीत झालें होतें. लोक समजत कीं, त्याचें शरीर वायूचें बनलें असून त्याला पंख आहेत, म्हणून तो कोठेंहि केव्हांहि उडून जातो! 'शाइस्ताखानावर हल्ला करण्याचा आदेश परमेश्वरानें आपणांस दिला' असें शिवाजी लोकांस सांगत असल्याचें त्यांना ठाऊक होतें.

शिवाजीविषयीं परकीयांचें, विशेषतः इंग्रज लोकांचें मत काय होतें हें त्यांच्याच उद्गारांच्या आधारें येथवर सांगण्यांत आलें. आतां त्याच्या मृत्यूविषयीं व मृत्यूनंतरच्या राजकीय घोटाळ्याविषयीं इंग्रज लोकांत काय बातम्या पसरल्या होत्या त्या पाहूं. 'शिवाजी रक्तातिसारानें बारा दिवस आजारी पडून ता. ८ एप्रिल रोजीं रायगडावर मेला. त्यांजबरोबर अनेकांनीं आपणांस जाळून घेतलें' असें फ्रायर लिहितो. राजा वा राणी मरण पावल्यानंतर त्यांच्या विशेष मर्जीतील कित्येक माणसें त्याच वेळीं स्वतःस जाळून घेत असल्याचीं उदाहरणें मुसलमानपूर्व काळांत घडलेलीं इतिहासांत नमूद आहेत. जपानांतील हाराकिरीसारखा हा एक आत्मयज्ञाचा प्रकार असून त्याचा अवलंब राजनिष्ठ माणसें भक्तीनें प्रेरित होऊन स्वेच्छेनें करीत. कल्याणचा चालुक्य राजा तैलप मरण पावला तेव्हां त्याचा तंत्रपाल तेपण्णा यानें स्वतःचें बलिदान केलें; महामंडलेश्वर सोवी देवरस याची राणी लच्छव्वादेवी निवर्तली तेव्हां तिचा नोकर बोका यानें प्राणार्पण केलें. अशीं कृत्यें मुसलमानपूर्व काळांत घडलीं असलीं तरी शिवाजीच्या काळांत तशी महाराष्ट्रांत रूढि होती याला कोठें आधार सांपडत नाहीं. पतीच्या मृत्यूनंतर पत्नीनें सहगमन केल्याचे असंख्य दाखले त्या कालांतील आहेत. त्याप्रमाणें शिवाजीची एक भार्या पुतळाबाई त्याजबरोबर सती गेली.

शिवाजी मरण पावला तेव्हां त्याचा ज्येष्ठ पुत्र संभाजी रायरीवर नसून पन्हाळ्यावर होता. पण त्यास शिवाजीनें तेथें अटकेंत ठेवलें होतें, असें इंग्रजांकडील कोणीहि लेखक सांगत नाहीं. मात्र शिवाजीच्या मृत्यूनें

घोटाळा माजेल असें एक सूचक वाक्य राजापूरच्या पत्रांत आहे. तें लक्षांत घेतल्यास शिवाजीच्या कुटुंबांत कलह होता, त्यामुळें शिवाजीच्या मृत्यूनंतर गादीवर कोणास बसवावें वा कोणीं बसावें, याविषयीं भांडणें होतील अशी लोकांस बळकट शंका आली होती. गादीवर बसविण्याच्या बाबतींत मंत्रिमंडळांत दुफळी असून आण्णाजी पंडित राजारामास गादीवर बसवावें असें म्हणणारा होता व पेशवा मोरोपंडित संभाजीचा पक्षपाती होता, अशी समजूत होती. त्यामुळें संभाजीनें आण्णाजी पंडिताच्या पायांत बेड्या ठोकल्या, इतकेंच नव्हे तर त्याचा शिरच्छेदहि केला, अशी वार्ता पसरली. संभाजीनें २७ एप्रिलच्या सुमारास राजा ही पदवी घेतली, आपल्या नांवाची ग्वाही फिरविली, राजारामास नजरकैदेंत ठेवलें, कित्येक शत्रुपक्षीयांना कैद केलें व कित्येकांना कामावरून दूर केलें. आपल्याविरुद्ध जर कोणी कांहीं उपद्व्याप करील तर त्याचें पारिपत्य करण्यासाठीं त्यानें एक हजार स्वारहि तयार ठेवले. शिवाजी ८ एप्रिल (३ एप्रिल) रोजीं मरण पावला. तेव्हांपासून संभाजी पन्हाळ्यावरच असून तो २६ जूनच्या सुमारास म्हणजे शिवाजीच्या मृत्यूनंतर सुमारें दीड महिन्यानें रायगडावर गेला.

इंग्रजांच्या बाजूची हकीकत वरील प्रकारची आहे. सभासदानें शिवनिधनानंतरचें वृत्त अगदीं त्रोटक दिलें व तेंहि भविष्यासारखें लिहिलें आहे. त्याचा सारांश, " सरकारकून (प्रधान) उभयतां बंधूंत राज्य वांटून द्यावें म्हणतील; संभाजी राजे सर्व सरकारकुनांस विश्वास देऊन धरतील, थोर थोर ब्राह्मणांस मारतील. आणि शिवाजीच्या वेळच्या थोरल्या कारकुनांस वांचूं देणार नाहींत." या अर्थाची भविष्यवाणी संभाजीविषयीं शिवाजीच्या तोंडीं सभासदानें घातलीं असून ती अगदी संदिग्ध व मोघम आहे. त्यापेक्षां मल्हार रामराव चिटणीस यांनीं संभाजीराजाचें चरित्र लिहिलें आहे, त्यांतील माहिती स्पष्ट व खुलासेवार आहे ती अशी :

संभाजीचा बंदोबस्त

" संभाजीमहाराज दिलेलखानाकडून आल्यावर शिवाजीमहाराजांनीं त्यांस बोध करून पन्हाळ्यावर ठेवलें. किल्ल्याचा व त्या प्रांताचा बंदोबस्त करण्यास कारभारी नेमले व त्यांनीं संभाजीचा खाजगी खर्च चालवावा.

बाजी मुरार याचे नातू विठ्ठल त्रिंबक महाडकर देशपांडे हे कारभारी पन्हाळ्यावर कारभार पाहूं लागले. त्यानंतर शिवाजीमहाराजांनीं अवतार समाप्त केला. ते समयीं मातोश्री सोयराबाईसाहेब यांनीं मुत्सद्दी हातीं घेऊन मोरोपंत प्रधान, निळोपंत अमात्य व अण्णाजी दत्तो सचिव हे प्रमुख व हबीरराव मोहिते हे सेनापति व रूपाजी भोसले, आनंदराव निंबाळकर, काटकर, महाडिक, गुजर, पालकर, शिर्के वगैरे सरदार यांसह विचार केला. त्यांत त्यांनीं संभाजी राजे उग्र प्रकृतीचे असल्यामुळें त्यांना राज्य आवरणार नाहीं व ते सर्वांचा नाश करतील. यास्तव त्यांस पन्हाळ्या-वर आहे तसेंच बंदोबस्तांत ठेवून राजारामास घेऊन व राज्य रक्षून कारभार चालवावा असें योजलें. संभाजीस हें खपणार नाहीं व तो रायरी-वर येणार हें ठरल्यासारखेंच होतें. याकरितां रायरी किल्ल्याचा बंदोबस्त हवालदार कान्होजी भांडवलकर व सरनौबत शहाजी भोसले यांनीं ठेवून दरवाजे लावून घ्यावे व फक्त दिंड्या उघड्या ठेवाव्या. किल्ल्यावर संभाजी येईल तर त्याला अडविण्याकरितां पायथ्याशीं पाचाड येथें माल सावंत यांच्या हाताखालीं दहा हजार सैन्य असूं द्यावें. सेनापति हंबीरराव मोहिते यांनीं कऱ्हाडावरून कोल्हापुराकडे जाऊन पन्हाळ्याची नाके-बंदी करावी. कांहीं सरदारांनीं रायगडाहून प्रतापगडास जावें व गोळे, पारठे वगैरेंनीं मावळे जमा करून सातारचा किल्ला संभाजीच्या ताब्यांत न जाईल यास जपावें.

“ इतकी सगळी योजना आंखली तरी त्यासंबंधाचे हुकूम बाळाजी आवजी चिटणीस यांनीं लिहावयास पाहिजे होते. पूर्ववहिवाटीप्रमाणें त्यांनीं ते लिहिले तरच ते मानले जावयाचे. या दृष्टीनें सोयराबाईनें त्यास तशी आज्ञा केली. पण त्यांनीं तसें करण्याचें नाकारलें. त्यांनीं सांगितलें कीं, ‘ राज्याचे धनी संभाजीमहाराज असतां आपण अशीं पत्रें कशीं लिहावीं? त्यापेक्षां माझा मुलगा आवजी बावा आहे त्यास तीं लिहावयास सांगावीं?’ म्हणून सोयराबाईसाहेबांनीं तीं पत्रें आवजी बावाकडून लिहवून रवाना केलीं. पन्हाळ्यास हवालदार बहिरजी नाईक इंगळे, सोमाजी नाईक बंकी, कृष्णाजी बंकी व हिरोजी फर्जंद होते. त्यांजकडे पत्रें घेऊन जासुदांचा नाईक खंडोजी नाईक व गणोजी कावळा हे गेले. जनार्दनपंत सुमंत कर-

वीरास होते. त्यांस हुकूम गेला कीं, महाराज निवर्तल्याचें वृत्त कोणास न सांगतां संभाजीमहाराजांस कैद करून बहुत सावधपणें असावें. संभाजी महाराजांसहि पत्र लिहिलें होतें, पण तें त्यांस पन्हाळयावर अडकून पडल्यावर द्यावें अशी जासुदास ताकीद करण्यांत आली होती.

संभाजीचें हत्याकांड

"इकडे रायगडावर महाराजांची क्रिया साबाजी भोसले यांजकडून करवून घेण्यांत आली. परंतु वर लिहिल्याप्रमाणें सावधगिरी बाळगली असतांहि ती अमलांत येण्याच्यापूर्वींच महाराजांच्या मृत्यूचें वर्तमान संभाजीच्या कानावर गेलें होतें. म्हणून रायगडाहून सोयराबाईचें पत्र घेऊन जासूद येतांच 'आबासाहेब कसे आहेत तें खरें सांगा, नाहीं तर पारिपत्य करीन' असा संभाजीनें धाक घातला. त्याबरोबर घाबरून जासुदांनीं सर्व वर्तमान सांगितलें. तें ऐकतांच जासुदास बेड्या घालून कैद करण्यांत आलें. हिरोजी फर्जंद सोयराबाईच्या पक्षाचा होता. तो जडजवाहिर घेऊन चिपळुणाकडे पळून गेला. सोमाजी नाईक बंकी व सूर्याजी कंक मावळा यांना ठार करण्यांत आलें. आणि पन्हाळयाचा पक्का बंदोबस्त करून संभाजी कांहीं दिवस गडावरच राहिला व तेथून कोल्हापुरास जनार्दनपंत फौजेसह होता त्याच्या फौजेंत त्यानें फितुर केला. रायगडावरहि फितुर झाला. सेनापति हंबीरराव मोहिते यांनाहि संभाजीनें पत्र लिहून सोयराबाईच्या पक्षांतून फोडलें. हिरोजी फर्जंदास चिपळुणाहून धरून आणून कैद केलें, जनार्दनपंत सुमंतासहि पकडून बेड्या घातल्या.

"हें विपरीत वृत्त रायगडीं कळल्यावर सर्वांचा धीर सुटला. संभाजीहि थोड्याच दिवसांत पन्हाळयाहून महाडास व महाडाहून पाचाडास आला. वाटेंत जे सरदार भेटले त्यांस त्यानें वश करून घेतलें. सरनोबत व येसाजी कंक त्यास मिळाले. त्यांनीं संभाजीस किल्ल्यावर घेतलें. कान्होजी भांडवलदार हवालदार सदरेस होते त्यांना कैद केलें. माल सावंत प्रभृति १०।१५ असामींना फितव्यांत असलेले पाहून त्याच समयीं मारलें, पिलाजी शिर्के याच्या हाताखालीं १०।१५ हजार मावळे देऊन रायगडाचा बंदोबस्त केला. सोमाजी नाईक बंकी याच्या पुत्राचा टकमकीवरून कडेलोट केला. बापूजी भाऊराव व सूर्याजी काळे यांची डोसकीं मारलीं. मोरोपंत

प्रधान व सचिव यांचीं घरें लुटून त्यांना बेड्या घातल्या. राजारामसाहेब यांस नजरबंद केलें. वाड्यांत संभाजीराजे आले. तेथील बायकांना त्यांनीं विचारलें, ‘ सोयराबाई कोठें आहेत ! ’ त्यांचा क्रोध पाहून बायका पळाल्या. मग ‘ तुम्ही राज्यलोभास्तव महाराजांस विषप्रयोग करून मारिलें ’ असा आरोप करून, भिंतीस कोनाडा करून त्यांत सोयराबाईस चिणोन घातलें. व ‘ आतां पुत्रास घेऊन राज्य करावें ’ असा वर्मी घाव घातला. त्यांना फक्त दूध घालण्याची आज्ञा केली. त्या स्थितींत तिसऱ्या दिवशीं त्यांचा प्राण गेला. ऐसेपरी उग्रपणें मातबर सरदार दोनशेंपर्यंत माणूस शासन करून उग्र दंड केला. प्रलय केला. येणेंप्रमाणें आषाढ शु. २ स किल्ल्यावर येऊन बंदोबस्त केला. श्रावण शु. ५ स मंचकारूढ झाले. ”

संभाजीच्या या हत्याकांडांत त्याची सापत्न माता, शिवाजीची लाडकी राणी व राजारामाची खास माता सोयराबाई हिचा अत्यंत अमानुष पद्धतीनें प्राण घेण्यांत आला. संभाजीच्या क्रूर, माथेफिरू व तापट स्वभावाचा हा सबळ पुरावाच होय. तिच्यावर इतका राग कां तर तिनें संभाजीस कैद करून राजारामास गादीवर बसविण्याचें कारस्थान रचलें याबद्दल. कदाचित् शिवाजीच्या हयातींत तिनें त्याचे कान संभाजीविरुद्ध भरले असतील, हेंहि एक कारण असूं शकेल. पण त्यासाठीं एवढी अमानुष शिक्षा अत्यंत क्रूरपणाची होय यांत शंका नाहीं. सोयराबाई ही त्याला अपराधी वाटत होती तर तिला त्यानें फार तर नजरबंद करावयाचें होतें. सोयराबाईच्या खालोखाल दुसरें क्रूर कृत्य म्हणजे आण्णाजीपंत सचिव यांच्या वधाचें. अण्णाजीपंतास त्यानें प्रथम बेड्या घालून ठेवलें, त्यांचें घर लुटलें. ‘ त्यांस ठार मारलें ’ असें चिटणीस लिहीत नाहींत. परंतु जेधे-शकावलींत मात्र ‘ आण्णाजी दत्तो यांस मार दिला. त्या मारानें आनाजीपंत, बाळ प्रभु, सोमाजी दत्तो व हिरोजी फरजंद यांस परळीखालीं ठार केले ’ असें आहे. त्याखेरीज इंग्रजांकडील पत्रांतहि आण्णाजी पंडिताचा शिरच्छेद केल्याची बातमी आहे. आण्णाजीस एवढी देहान्त शिक्षा देण्याचें मुख्य कारण असें दिसतें कीं, त्यानें राजारामास संभाजीच्या गैरहजेरींत वैशाख व. ३ शके १६०२ रोजीं मंचकारूढ करण्यांत पुढाकार घेतला होता. त्याशिवाय आण्णाजी पंडित व मोरो पंडित संभाजीविरुद्ध पन्हाळ्यावर चालून गेले

अशीहि माहिती जेधे शकावलींत आहे. तिचा उल्लेख चिटणिसांच्या बखरींत नाहीं. पण इंग्रजांकडील पत्रांत (३ मे १६८०) आण्णाजी पंडित व मोरो पंडित संभाजीचा हुकूम घेण्यास पन्हाळ्यास गेल्याचा मजकूर आहे. त्यावरून ते दोघे संभाजी पन्हाळ्यावर असतांना त्याजकडे गेले होते असें सिद्ध होतें. पण त्याचा हुकूम घेण्याकरितां कीं त्याला कैद करण्या-करितां, याचा निर्णय त्यायोगें लागत नाहीं. कैद करण्याकरितां ते गेले असले तर मोरोपंतासहि संभाजीनें कैद केलें या चिटणिसांच्या विधानास सत्यता येते. मोरोपंतास संभाजीनें ठार केल्याचा पुरावा पुढें येत नसला तरी कैदेनंतर मोरोपंत रायगडावर मेला, असें जेधे-शकावलींत आहे.

नररत्नांचा चक्काचूर

आण्णाजी पंडित व मोरो पंडित हे शिवाजीचे डावे उजवे हात. त्यांनीं शिवाजीबरोबर सगळे उन्हाळे-पावसाळे पाहिलेले, अनेक संकटें सोसलेलीं. त्याच्या जीवनाची चढती कमान त्यांच्या साहाय्यानें झालेली. ते त्याच्या अष्टप्रधानांतील तोलदार प्रधान. मोरोपंत तर त्याचा प्रत्यक्ष पेशवा. या दोघांची आहुति संभाजीच्या क्रोधाग्नींत पडली. बाळ प्रभु म्हणजे बाळाजी आवजी चिटणीस, शिवाजीचा अत्यंत विश्वासांतला कलम-बहाद्दर. शिवाजीच्या अंगांत भवानी आली कीं त्याच्या तोंडचे शब्द एकांतांत उतरून घेऊन त्यांलीं दाखविणारा. वास्तविक त्यानें आज्ञापत्रें लिहिण्याची सोयराबाईनें केलेली आज्ञा नाकारली होती, असें चिटणीस सांगतात. पण जेधे-शकावली म्हणते कीं, परळीखालीं बाळ प्रभूसहि मारलें. तर मग त्याच्या हत्येचें कारण काय? हिरोजी फर्जंद याजविषयीं काय लिहावें? आग्र्याहून शिवाजीची व संभाजीची सुटका, त्यानें प्राणांची कुर्बान करण्याचें कबूल केलें म्हणूनच झाली. तोहि निस्सीम शिवभक्त या जगांतून संभाजीनें नाहींसा केला. याशिवाय आणखी कोणाकोणांविषयीं अश्रु गाळावें? सोमाजी नाईक, त्याचा पुत्र, सूर्याजी कंक, माल सावंत यांचेंहि बलिदान झालें.

कैद झाले त्यांत जनार्दनपंत सुमंत यांजसारखे प्रमुख मुत्सद्दी व सेनापति होते. सारांश, शिवरायाची मूर्ति अन्तर्धान पावल्याबरोबर त्याची प्रभावळहि त्याच्यामागोमाग अस्तास गेली. संभाजीच्या क्रोधाचा स्फोट

रायगडावरच होऊन थांबला नाहीं, तर त्याचा धडाका समर्थांच्या सज्जनगडाच्या पायथ्याशींहि उडाला. तो ऐकून शिवरायाच्या स्वराज्याचें मंदिरच कोसळल्याचा भास होऊन समर्थ विषण्ण मनानें उद्गारले,

" कांहीं उग्र स्थिति सोडावी। कांहीं सौम्यता धरावी। चिंता लागावी परावी। अंतर्यामीं (२) मागील अपराध क्षमावे। कारभारी हातीं धरावे। सुखी करून सोडावे। कामाकडे (३) समय प्रसंग ओळखावा। राग निपटून सांडावा। आला तरी कळों न द्यावा। जनांमध्यें (१२) आहे तितकें जतन करावें। पुढें आणीक मेळवावें। महाराष्ट्र राज्यचि करावें। जिकडे तिकडे (१५) शिवराजास आठवावें। जीवित्व तृणसमान मानावें। इहलोकीं परलोकीं तरावें। कीर्तिरूपी (१७) शिवरायाचें आठवावें रूप। शिवरायाचा आठवावा साक्षेप। शिवरायाचा आठवावा प्रताप। भूमंडळीं "(२८).

पुण्यपुरुष समर्थ शिवरायाच्या ओव्या गाऊन त्याचा कित्ता गिरविण्यास वरीलप्रमाणें संभाजीस सांगतात आणि त्याच शिवाजीस इंग्रजांसारखे परकीय लोक शिव्या देतात. हें पाहून कोणासहि कोडें पडणार आहे. पण त्याचीहि सोडवणूक शिवाजीस नीटपणें ओळखणारास करतां येते. शिवाजीस ते लुटारू, लबाड, विश्वासघातकी समजतात. तथापि अशा शिव्या देणारांनीं शिवकालांतील भोंवतालची राजनीति कशी होती हें लक्षांत घ्यावयास पाहिजे. आपला मुलूख सोडून शत्रूच्या मुलखांत जाऊन लूट करणें हें तत्कालीन राजनीतींत न्याय्य समजलें जात होतें. मोगल, विजापूरकर, सिद्दी वगैरे परमुलखांत जाऊन गांवें लुटीत व जाळीत. यांत त्यांचा हेतु परराज्यांत धुंद माजवून तें राज्य डबघाईस आणणें हा एक असे. शिवाजीला स्वराज्यस्थापनेकरितां तें करणें आवश्यक होतेंच; पण त्याशिवाय स्वराज्य चालविण्यास व त्याचा प्रसार करण्यास सैन्य ठेवण्यासाठीं व राज्यकारभार करण्यासाठीं जें अगणित द्रव्य लागे त्याचीहि सोय पाहावयाची होती.

सांप्रत सुधारलेलीं राज्यें युद्धकाळांत स्वराज्यांतील प्रजेवर जबरदस्त कर बसवून व कर्ज उभारून पैसा उभा करतात आणि शत्रूस जिंकल्यावर त्याच्या मुलखांत शिरून शहरें लुटतात, जाळतात व कारखान्यांचा

विध्वंस करतात. ह्याहि एक प्रकारचा जुलूमच आहे, पण तो सुधारलेला आहे, त्याचा अवलंब स्वराज्यरक्षणासाठीं त्यांनाहि करावा लागतो. शिव-कालीन राजसत्ता स्वराज्यरक्षणासाठींच जुलूम करीत, पण तो जुनाट पद्धतीचा असे एवढाच फरक.

शिवाजीचें ध्येय

शिवाजीला केवळ चैनीकरितां, वैभवाकरितां किंवा मुसलमानांप्रमाणें आपला धर्म परक्यांवर लादण्याकरितां राज्य मिळवावयाचें नव्हतें. त्याचें ध्येय अत्युच्च व पवित्र होतें. त्याला स्वराज्य स्थापून, स्वधर्मरक्षण व स्वधर्मस्थापना करावयाची होती आणि आपल्या पददलित देशबांधवांना पारतंत्र्याच्या यातनांतून मुक्त करून स्वतंत्रपणें जीवित कंठण्यास, आपला ऐहिक व पारमार्थिक उद्धार करण्यास व जगांत इतरांप्रमाणें मान ताठ करून व्यवहार चालविण्यास संधि द्यावयाची होती. म्हणजे शिवाजीचें कार्य स्वार्थनिरपेक्ष होतें. त्यासाठीं त्यानें आपलें शिर सतत तळहातावर घेतलेलें होतें. त्याला चैन, वैभव व विलास पाहिजे असते तर सारा जन्म चिंतेंत, कष्टांत व जिवावरच्या संकटांत घालविण्याची जरूरी नव्हती. बापाप्रमाणें व आपल्या इतर भावांप्रमाणें त्यानें मुसलमान राज्यकर्त्यांची ताबेदारी पत्करली असती म्हणजे हीं सर्व सुखें त्याजपुढें हात जोडून उभीं होतीं.

श्रीमद्‌भगवद्‌गीतेंत सांगितलेल्या व्याख्येप्रमाणें शिवाजी हा मूर्तिमंत क्षात्रधर्म होता. तो जसा रणशूर, तेजस्वी, अलोट धैर्याचा, अत्यंत दक्ष, रणांगणास भिऊन कधींहि पाठ न दाखविणारा तसा दानशूर व ईश्वरभक्त होता. तो राज्यकारभार करीत असतां इतर राज्यकर्त्यांप्रमाणें त्यांत अगदीं लंपट झाल्यासारखा दिसत असे. परंतु त्याच वेळीं त्याचें लक्ष ईश्वरचरणींहि असे. स्वारीवर असतांनाहि प्रख्यात देवस्थानांचें दर्शन घेण्यास तो श्रद्धा-पूर्वक जात असे. तेथें गेल्यावर वैराग्य उत्पन्न होऊन आपलें शिरकमल शंकरजीस वाहण्यास तो श्रीशैल पर्वतावर कसा सिद्ध झाला होता, हें आपण पाहिलें आहे. तुकाराम, रामदास या साधुसंतांची संगत त्यास आवडत असून राजकारणाच्या जंजाळांतून कांहीं क्षण काढून तो रामदासांच्या

दर्शनास जाई व तेथें परमार्थात इतका दंग होई कीं, मला तें राज्य नको व त्यांत करावी लागणारी प्राणहानिहि नको असें त्यास वाटूं लागे व रामदासांना त्याच्या क्षात्रधर्माची त्यास आठवण देऊन पुनः राजधर्मास प्रवृत्त करावें लागे. याविषयीं अनेक कथा हनुमानस्वामींच्या बखरींत नमूद आहेत.

राजकारण व धर्म

शिवाजीच्या जीवनाचीं राजकारण व धर्म हीं दोन अंगें होतीं. तो राजकारण हें प्राप्त कर्तव्य म्हणून करीत होता. पण त्याच्या चित्ताचा ओढा परमार्थाकडे होता. 'सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत। कुर्याद्विद्वांस्तथासक्तः चिकीर्षुर्लोकसंग्रहम्॥' हें गीतेंतील प्रसिद्ध वचन शिवाजीस तंतोतंत लागूं पडतें. अज्ञानी लोक जगांतील व्यवहार त्या ठिकाणीं आसक्त होऊन करीत असतात, तसा ज्ञानी मनुष्यानें तोच व्यवहार आसक्ति न ठेवतां करावा, असा वरील वचनाचा अर्थ आहे. त्याप्रमाणेंच शिवाजी राज्यव्यवहार अनासक्त मनानें करीत होता. म्हणूनच समर्थासारख्या सर्वस्वी परमार्थास वाहिलेल्या संतशिरोमणींनें शिवाजीची ओतप्रोत स्तुति अनेकदां केली आहे.

शिवाजीचें निधन त्याच्या वयाच्या अवघ्या ५० व्या वर्षी झालें, तें अकालीं होय. त्यानें सतत तेहतीस वर्षें सोसलेले कष्ट व केलेले पराक्रम लक्षांत घेतल्यास तो शरीरानें बळकट, काटक व प्रकृतीनें निरोगी असला पाहिजे. त्याला सोयराबाईनें विष घालून मारलें असे शब्द चिटणिसांनीं आपल्या बखरींत संभाजीच्या तोंडीं घातले आहेत. पण हें पतिहत्येचें पातक कशाकरितां, तर म्हणे आपल्या राजारामाला राज्य मिळवून देण्याकरितां. या विधानाला कांहींसा आधार डचांच्या डाग रजिस्टरांत मिळतो. त्यांत लिहिलें आहे, 'शिवाजीराजाला त्याच्या धाकट्या बायकोकडून विषप्रयोग झाला असावा. त्याचा कनिष्ठ पुत्र गादीवर बसावयाचें घाटत होतें, त्याला तुरुंगवास प्राप्त झाला' (प. सा. सं. खंड २, पृ. ६९८). परंतु या विधानांत कांहीं हशील नाहीं. कारण राजाराम या वेळीं केवळ दहा वर्षांचा असल्याकारणानें त्याला स्वतःला त्या बालवयांत राज्य करणें अशक्य होतें. शिवाय तिच्या मसलतींत सामील होण्याइतका कोणीहि प्रधान

वा सेनापति अविचारी नव्हता. फार तर शिवाजी सन १६७६ त साताऱ्यास आजारी होता, तेव्हां तो आजार विषप्रयोगानें उद्भवला असल्यास त्याच्या दुष्परिणामांनीं शिवाजीचा अंत जवळ ओढून आणला असावा. त्यास ज्वराची व्यथा होऊन त्यांत त्याचा अंत झाला, असें सभासद म्हणतो. पण इंग्रजांकडील बातमी तो रक्तातिसारानें मेला अशी आहे.

बजबजपुरी कां माजली ?

असो. मरणापूर्वीं शिवाजीनें आपल्या पश्चात् राज्य चालविण्याची व्यवस्था काय केली होती हें समजत नाहीं. आपल्या घरांत भाऊबंदकी आहे याची जाणीव त्याला होती व तिचा लख्ख प्रकाश, संभाजी १६८० च्या प्रारंभीं दिलीरखानाकडून परत आला त्या वेळीं, त्याच्या डोक्यांत पडला होता. या भाऊबंदकीची कुणकुण त्याला आधींपासूनच असल्यामुळें कर्नाटक प्रांत संभाजीस व महाराष्ट्र राजारामास देऊन संभाजी व सोयराबाई यांजमधील तंटा तोडावा असा त्याचा बेत होता. संभाजी परत आल्यावर त्यास रायगडीं न आणतां पन्हाळगडावर ठेवण्यांत घरांत भांडणें नकोत हाच विचार प्रभावी असावा. त्यानें पन्हाळ्यावर संभाजीस त्याच्या खर्चाची तजवीज करून व त्याजपाशीं कारभारी नेमून ठेवलें होतें.

पन्हाळ्याहून रायगडास आल्यावर तीन महिन्यांच्या आंत शिवाजी मरण पावला. संभाजी वयानें मोठा, शूर व उपद्व्यापी होता हें शिवाजीस माहीत होतें. अशा स्थितींत आपण इतक्या कष्टानें स्थापन केलेलें व वाढविलेलें राज्य आपल्या पश्चात् नीट रीतीनें चालेल अशी तजवीज शिवाजीस जर करावयाची होती व संभाजी राज्य चालविण्यास नालायक आहे अशी जर त्याची खात्री होती, तर त्यानें संभाजीस पक्क्या कैदेंत ठेवावयाचें होतें. राजाराम अगदींच लहान असल्यामुळें तो वयांत येईपर्यंत आपल्या प्रधानमंडळास सर्व परिस्थिति नीट समजून सांगून सर्व राज्याचा भार त्याजवर टाकावयाचा होता व आपल्या जागीं प्रतिनिधि म्हणून मोरोपंताची किंवा दुसऱ्या कोणा लायक इसमाची नेमणूक करून त्यानें इतर प्रधानांच्या सल्ल्यानें राज्य चालवावें असें कागदोपत्रीं लिहून ठेवावयाचें होतें. याशिवाय आणखी एक गौण मार्ग म्हणजे संभाजीस कर्नाटकांत पाठवून आपल्या देखत तिकडचीं राज्यसूत्रें त्याजकडे सुपूर्त करावयाचीं

होती. तसें केलें असतें व महाराष्ट्रांतील राज्य वरील पद्धतीनें आपल्या मंत्रिमंडळाच्या स्वाधीन केलें असतें, म्हणजे तो मरतांक्षणीं एप्रिल ते जूनपर्यंतच्या दोन महिन्यांत जो राज्याचा बोजवारा, सर्वत्र गोंधळ, बजबजपुरी व यमपुरी झाली ती झाली नसती.

अशी कांहींच व्यवस्था लावली नसल्यामुळें सोयराबाईसारख्या कारस्थानी राणीशीं कसें वागावें हेंच मंत्र्यांना कळेना. त्यांना इकडे आड व तिकडे विहीर असें झालें. सोयराबाईचें ऐकावें तर संभाजीसारख्या जमदग्नीशीं गांठ पडल्यावर काय करावें व सोयराबाई ही रायगडासच असल्यामुळें तिचें न ऐकावें तर काय करावें, असा त्यांस पेंच पडला. अशा स्थितींत ज्यांस जसें सुचलें तसें तो करीत गेला. सगळ्या अष्टप्रधानांनीं एक विचारानें एखादी योजना आंखली असती व ती छातीठोकपणानें पार पाडण्याचें ठरविलें असतें तर त्यांस खात्रीनें यश आलें असतें. पण त्यांनाहि ती कल्पना सुचली नाहीं. ते सर्व शिवाजीच्या तालमींत तयार झालेले, त्याचें चरित्र जवळून पाहिलेले, समर्थ, शूर, चतुर, शहाणे व सुज्ञ होते. तरी त्यांच्या ठिकाणीं शिवाजीची हिंमत व धाडस नसल्यानें ते प्रवाहाबरोबर वाहत गेले. त्यांपैकीं बरेच जण प्राणांस मुकले व शिवरायाच्या स्वराज्यास ओहोटी लागत तें नऊ वर्षांच्या आंत नामशेष झालें.

नारायणराव पेशव्याचा वध झाल्यावर पेशवाईंत स्वराज्यावर असाच बिकट प्रसंग ओढवला होता. संभाजीसारखाच राघोबा यास तोंड देण्याचा प्रसंग सखाराम बापू, नाना फडणवीस, हरिपंत फडके प्रभृति मुत्सद्दी व कारभारी यांजपुढें होता. शिवाजीच्या पश्चात् लहान का होईना पण राजाराम हा त्याचा औरस पुत्र उभा होता. पण नाना फडणिसादिकांच्या हातांत तसा राघोबास प्रतिस्पर्धी असा पेशवे घराण्यांतला कोणीहि वारस नव्हता. जर कोणी असला तर तो नारायणरावाची स्त्री गंगाबाई हिच्या पोटांत होता. तरीपण तेवढ्यावर भिस्त ठेवून नाना प्रभृतींनीं प्रचंड कारस्थान रचून राघोबापासून स्वराज्य वांचविलें. तसें शिवकालीन स्वराज्य संभाजीपासून वांचविण्यास जें थोर राजकारणपटुत्व व धैर्य असावयास पाहिजे तें मोरोपंत, आण्णाजीपंत, हंबीरराव प्रभृतींत नव्हतें असेंच कबूल करावयास पाहिजे.

शिवाजी हा आदर्श पुरुष होता व जिजाबाई ही त्याची आदर्श माता होती, तर संभाजी हा कुलदीपक न होतां विध्वंसक कसा निपजला, असा एक विचार मनांत येतो. त्याची थोडी मीमांसा येथें केल्यास ती अनाठायीं ठरणार नाहीं. संभाजी १४ मे १६५७ त पुरंदरावर जन्मला. त्याची आई सईबाई ४ सप्टेंबर सन १६५९ त वारली. त्या वेळीं संभाजी दोन-सव्वा दोन वर्षांचा होता. त्याचें पालनपोषण करणें त्यामुळें त्याची आजी जिजामाता इजकडे मुख्यतः आलें. पिता या नात्यानें शिवाजीवर त्याच्या पालनपोषणाची जबाबदारी असली तरी, तो सतत स्वाऱ्याशिकारींत व राजकारणांत गढून गेला असल्यामुळें, त्याला संभाजीच्या दिनचर्येकडे लक्ष पुरविण्यास फुरसत नसे; तथापि बालपणीं जें शिक्षण द्यावयाचें तें त्यानें त्यास दिलें.

त्यानें त्यास शिकविण्याकरितां उमाजी पंडित नामक गुरुजीस ठेवलें होतें. 'बुधभूषण' नांवाचें एक संस्कृत काव्य त्याच्या नांवावर मोडतें. कदाचित् तें काव्य एखाद्या पंडितानें लिहून त्याच्या नांवानें प्रसिद्ध केलें असावें. एका संस्कृत दानपत्रावर संभाजीनें 'मतं मे शिवराजपुत्रस्य शंभुराजस्य' अशी सही केली आहे. त्यावरून शिवाजीनें संभाजीच्या शिक्षणाची शक्य तितकी काळजी घेऊन त्याला सुशिक्षित बनविलें होतें व आपल्या शिक्षणांत जी उणीव राहिली असेल ती मुलाच्या शिक्षणांत भरून काढली होती. त्यानें त्यास नऊ वर्षांचा असतांनाच औरंजेबाच्या भेटीसाठीं व त्याचा बडा दरबार त्यानें पाहिलेला असावा यासाठीं, आग्ऱ्यास बरोबर नेलें होतें. तो उत्तरेंतून परत आल्यावर त्यास मोगलांच्या पदरीं पंचहजारी मनसबहि त्यानें मिळवून देऊन त्याचा प्रत्यक्ष राजकारणांत प्रवेश करविला होता. सन १६७१ त म्हणजे केवळ चौदाव्या वर्षी त्यास त्यानें युवराज या नात्यानें राज्यकारभार सांगितला होता.

संभाजी बेताल कां झाला ?

शिवाजीनें आपल्यामागून संभाजी राज्य चालविण्यास पूर्णपणें लायक व्हावा यासाठीं योग्य दिसलें तें केलें. म्हणजे आपलें योग्य तें कर्तव्य बजावण्यांत त्यानें बिलकुल कसूर केली नाहीं. हें घराबाहेरील व्यवहाराचें झालें. आणि घरांत प्रत्यक्ष मातेची पाखर असणें याची मातबरी वेगळी

असली तरी, तिच्याऐवजीं त्याची आजी जिजाबाई होतीच. तिला जर शिवाजीस चांगलें वळण लावतां आलें तर संभाजीस कां लावतां येऊं नये ? पण या बाबतींत हें लक्षांत ठेवावयास पाहिजे कीं, जिजाबाई आतां म्हातारी झाली होती. संभाजी जन्मास आला तेव्हांच तिची साठी उलटून गेली होती; आणि तरुणपणीं मनुष्य कितीहि कडक असला तरी जों जों म्हातारपण येत जातें तों तों तो मऊ होत जातो. तशीच स्थिति आतां जिजाबाईची होत चालली होती. त्यांतून संभाजी आईवांचून पोरका म्हणूनहि त्याच्या पालनपोषणाचें पर्यवसान लाडांतहि होत असेल. संभाजी चांगला १६।१७ वर्षांचा जवान झाल्यावर आजीला जुमानीनासा झाला असेल. येथें आणखी एक घटना लक्षांत ठेवावयास पाहिजे व ती ही कीं, राजांच्या पदरीं हुजरे, दासी इत्यादि नोकर असून त्यांचा राजकुमारांना त्यांच्या लहानपणीं लळा असतो. हा नोकरवर्ग हीन मनोवृत्तीचा व खुशामतखोर असल्यास राजकुमारांना दुष्ट खोडी व अनिष्ट वळण लागण्याचा संभव असतो. तो संभव मातृहीन संभाजीच्या बाबतींत विशेषच घडण्याचा संभव होता.

घरांत आजीचा दाब नाहीं व बाहेर शिवाजीला वेळ नाहीं, या कारणानें संभाजी बेताल होत चालला व अखेर बंडखोर बनून बापावर उलटून शिवाजीच्या शत्रूस मिळाला; इतकेंच नव्हे तर शिवाजीच्या राज्यावर चालूनहि आला.

पुत्राकडून सुख लागण्याचा असा निकाल लागल्यावर बायकांकडून शिवाजीस कितपत सुख लाभण्याचा संभव होता हें पाहूं. सभासदाच्या माहितीवर विश्वास ठेवल्यास शिवाजीस एकंदर सात स्त्रिया होत्या. त्या अशा – (१) सईबाई ही फलटणच्या निंबाळकर घराण्यांतील. (लग्न ता. १७-४-१६४०) ती संभाजीची आई. तिच्या पोटीं संभाजीचा जन्म १४ मे १६५७ रोजीं पुरंदरावर झाला. (२) सोयराबाई. ही शिर्के घराण्यांतील. ती राजारामाची आई. तिच्या पोटीं राजारामाचा जन्म २४ फेब्रुवारी १६७० रोजीं राजगडावर झाला. तिला सन १६८० त संभाजीनें वधिलें. (३) पुतळाबाई. मोहित्यांची कन्या. सन १६८० त ती शिवाजीबरोबर सती गेली. ती जाधव वा इंगळे यांच्या घराण्यांतील होती, असें जेधे-

शकावलीवरून दिसतें. (४) सकवारबाई. ही गायकवाड घराण्यांतील होती. तिचें शिवाजीशीं लग्न जानेवारी १६५६ रोजीं झालें. रायगड मोगलांनीं सन १६८९ त घेतल्यावर ती मोगलांच्या कैदेंत बरींच वर्षें होती. (५) काशीबाई. ही १ मार्च १६७४ रोजीं मरण पावली. (६) सगुणाबाई. ही शिर्के घराण्यांतील होती. (केळुस्कर यांच्या माहितीप्रमाणें). (७) लक्ष्मीबाई. (केळुस्कर यांच्या माहितीप्रमाणें) (सरकारांनीं दिलेल्या काशीबाईऐवजीं केळुस्कर हे सगुणाबाई हें नांव देतात आणि गुणवंताबाई हें नांव देऊन सात नांवें पूर्ण करतात).

शिवाजीस मुलें पुढीलप्रमाणें होतीं – (१) संभाजी, (२) राजाराम, (३) सखूबाई, (४) अंबिकाबाई व (५) राजकुमारीबाई. सखूबाई ही बजाजी नाईक निंबाळकरांचा मुलगा महादजी नाईक यास सन १६५७ पूर्वीं दिली होती. ती व अंबिकाबाई या संभाजीच्या सख्ख्या बहिणी. अंबिकाबाई ही हरजी राजे महाडिक तारळेकर यांस दिली होती. सोयराबाईस राजाराम व दिपाबाई अशीं दोन मुलें होतीं. त्यांपैकीं दिपाबाई विसाजीराव नांवाच्या सरदारास दिली होती (केळुस्कर). सकवारबाईला कमळाबाई नांवाची मुलगी होती. ती जानोजी पालकर यांस दिली होती. पुतळाबाई अपत्यहीन होती. सगुणाबाईची कन्या राजकुमारीबाई ऊर्फ नानीबाई ही गणोजीराजे शिर्के यांजबरोबर विवाहबद्ध झाली होती. गुणवंताबाई व लक्ष्मीबाई या अपत्यहीन होत्या.

शिवाजीनें राज्याभिषेक-समयीं क्षत्रियाचे सर्व संस्कार वेदोक्त पद्धतीनें घरांत सुरू केल्यावर आपल्या दोघां पुत्रांचें उपनयनहि केलें. त्याप्रमाणें संभाजीचें उपनयन ४ फेब्रुवारी सन १६७५ त म्हणजे त्याच्या वयाच्या १८ व्या वर्षीं अर्थात् उशिरा झालें; पण राजारामाचें ७ मार्च सन १६८० रोजीं म्हणजे वयाच्या १० व्या वर्षीं अर्थात् योग्य वेळीं उरकण्यांत आलें. त्यानंतर आठच दिवसांनीं त्याचा विवाह प्रतापराव गुजराच्या कन्येबरोबर रायगडावर करण्यांत आला. सारांश, मृत्यूपूर्वीं शिवाजी आपल्या मुख्य कर्तव्यांतून मुक्त झाला होता. मात्र संभाजीची मुंज त्याच्या लग्नानंतर झाली असावी. कारण संभाजीस उमाजी नांवाचा मुलगा २५ नोव्हेंबर १६७४ मध्यें म्हणजे त्याच्या मुंजीपूर्वींच झाला होता.

शिवाजी वयाच्या बाराव्या वर्षी बेंगलुराहून महाराष्ट्रांत राहावयास आला; त्या अर्थी त्याचें लग्न त्यापूर्वीच बेंगळुरास झालें होतें. रामावतारापासून आपण पाहत आलों तर सर्व क्षत्रिय राजांना एकाच वेळीं अनेक भार्या असल्याचें दिसून येतें. एकटा रामच त्यास अपवाद. हीच वहिवाट महाराष्ट्रांतील राजघराण्यांत व मराठा जातींतहि कमी-अधिक मानानें चालू होती. शिवाजीस १६५७ या एका वर्षांतच एकाहून अधिक बायका होत्या. या वेळीं शिवाजी तारुण्याच्या ऐन भरांत होता. त्याचें पहिलें लग्न बेंगळुरास शहाजी व जिजाबाई यांच्या पसंतीनें झालें होतें. तो बालविवाह होता. आतांचे हे पुढील विवाह शिवाजीनें आपल्या पसंतीच्या मुली पाहून केलें म्हणून ते प्रौढविवाह होत. शेवटचें लग्न त्यानें ४४ व्या वर्षी केलें तें केवळ राज्याभिषेक-समारंभासाठीं होय. सारांश, शिवाजीला एकाच वेळीं सात जरी नसल्या तरी तीन-चार भार्या होत्या. त्यांपैकीं संतति अशी चौघींनाच झालेली दिसते. पुत्र फक्त दोघींच्याच वांट्यास आले, ही एक खैरच समजली पाहिजे. कारण त्यामुळें सापत्नभाव असा या दोघां मुलांपुरताच मर्यादित झाला. पण असेच तीन-चार बायकांना तीन-चार वा अनेक पुत्र असते तर शिवाजीच्या घरांत मत्सराग्नि किती भडकला असता हें कोणीं सांगावें ? बाकीच्या बायकांना मुलें नव्हतीं. त्या बायकाहि लेकुरवाळ्या बायकांचा मत्सर करावयाच्या व त्यांना घालून-पाडून बोलावयाच्या आणि उलटपक्षीं लेकुरवाळ्या बायकांनीं नवऱ्यास त्यांजविरुद्ध कागाळ्या सांगून त्याला सतावून सोडावयाचें ! असा ताप शिवाजीला तो मोहिमांची दगदग सोसून घरीं विश्रांतीसाठीं आल्यावर सहन करावा लागत असेल !

शिवाजीला मृत्यु अकालीं आला. मरणसमयीं तो केवळ पन्नास वर्षांचा होता, त्या दृष्टीनें त्यानें इतक्या अल्पवयांत असाधारण करामत करून दाखविली ! उपरिनिर्दिष्ट श्लोकांत कालिदासानें म्हटल्याप्रमाणें या कर्मभूमींत मानवास एक क्षणभर राहावयास सांपडलें तरी त्यानें आपणांस लाभवान् समजावयास पाहिजे. कालिदासाची ही उक्ति जर कोणास यथार्थत्वानें लागू पडत असेल तर ती शिवाजीसच होय. कारण त्याला पन्नास वर्षांच्या आयुष्यांतील असंख्य क्षणांचा सव्याज मोबदला स्वदेशबांधवांच्या पदरांत टाकतां आला.

प्रकरण सत्ताविसावें

उपसंहार

दाक्षिण्यं स्वजने दया परजने शाठ्यं सदा दुर्जने ।
प्रीतिः साधुजने नयो नृपजने विद्वज्जनेष्वार्जवम् ॥
शौर्यं शत्रुजने क्षमा गुरुजने नारीजने धूर्तता ।
ये चैवं पुरुषाः कलासु कुशलास्तैष्वेव लोकस्थितिः ॥

— नीतिशतकम्

शिवाजीमहाराजांच्या जन्मापूर्वी सुमारें सव्वातीनशें वर्षें श्रीमद्भगवद्गीतेचा भावार्थ ज्ञानेश्वरांनीं आपल्या रसाळ व काव्यमय वाणीनें मराठी भाषेंतून महाराष्ट्रीयांस सांगितला. त्यांच्या ज्ञानेश्वरीचा प्रसार महाराष्ट्रांत होतो न होतो तोंच महाराष्ट्रावर मुसल्मानी अमलाची काळरात्र पसरली. मुसलमानी अमलाच्या दणक्यानें व अभूतपूर्व जुलमानें महाराष्ट्रीय जनता अगदीं भयभीत होऊन किंकर्तव्यमूढ बनली. तिला ईश्वराशिवाय या भूलोकावर कोणी दुसरा त्राता दिसेना. हिंदु धर्मावरील हें संकट सर्व हिंदूंना समान असल्यामुळें धर्माच्या निशाणाखालीं त्या सर्वांत ऐक्याची भावना पसरली. इंग्रजी राज्यांत सर्व हिंदु आपसांतील भेदभाव विसरून स्वराज्याच्या चळवळीस मिळाले तसे तत्कालीन हिंदु-धर्मरक्षणार्थ खांद्यास खांदा लावून लढूं लागले. अर्थात् त्यांचा लढा अहिंसात्मक व शांततेचा होता. या लढ्यांत पुढारीपण नामदेव, एकनाथ, तुकाराम यांसारख्या अत्यंत थोर, निःस्वार्थी, सच्छील व भक्तिपरायण संतशिरोमणींकडे आलें. ते कीर्तनें करीत, पुराणें सांगत व भजनांत दंग होऊन जात. त्यांचा उपदेश ऐकून व आचरण पाहून त्यांना निस्सीम असे असंख्य अनुयायी मिळाले. त्यांच्या पुराणांचे व कीर्तनांचे विषय भारत, भागवत व रामायण यांतील उदात्त आख्यानांचे असत. त्या योगानें बहुजनसमाजाची नीतिमत्तेची, देवभक्तीची व धर्मनिष्ठेची पातळी पुष्कळच उंचावून त्यांच्यांत माणुसकीचे सद्गुण विकास पावले. जिकडे-तिकडे संत-मंडळें व भक्तमंडळें स्थापन

झाल्या. माणूस माणसास ओळखूं लागला व भूतदयेनें प्रेरित होऊन रंजल्या-गांजलेल्यांच्या उपयोगी पडण्यांत धन्यता मानूं लागला.

मुसलमानी वरवंट्याखालीं सांपडलेल्या सर्वसामान्य जनतेस व तिच्या पुढाऱ्यांस हेंच करतां येण्यासारखें होतें व तेंच त्यांनीं तीनशें-सव्वातीनशें वर्षेपर्यंत अव्याहत चालू ठेवलें. यांत भक्तिमान् पुढाऱ्यांच्या कितीतरी पिढ्या गेल्यामुळें महाराष्ट्रभूमि पावन झाली. येथील समाजाच्या विशिष्ट रचनेमुळें संत-मंडळांऐवजीं क्रान्तिकारक-मंडळें स्थापन करण्याची कल्पना सर्वसामान्य जनतेच्या पुढाऱ्यांना सुचणें शक्य नव्हतें. हें कार्य क्षत्रियांचें होतें व महाराष्ट्रांतील क्षत्रिय म्हणजे मराठे, देशमुख, सरदार व जहागीरदार यांनींच तें करावयास पाहिजे होतें. पण त्यांपैकीं कोणासहि अशी धाडसी कल्पना न सुचून ते मुसलमानी राज्यकर्त्यांची सेवा करून व आपला संसार चालवून जीवित कंठण्यापलीकडे अधिक भानगडींत पडत नव्हते. महाराष्ट्रीय जीवनाची आध्यात्मिक व नैतिक बाजू मुसलमानी अमदानीच्या सव्वातीनशें वर्षांत विकास पावून फक्त राज्यक्रान्तिकारकांची उणीव शिल्लक राहिली होती व ती शिवछत्रपतींनीं आपल्या आगमनानें भरून काढली. तुकाराममहाराजांपर्यंतच्या सर्व संतांची शिकवण प्रायः निवृत्तिपर होती. तिला स्वराज्यस्थापनेच्या वेळीं प्रवृत्तिपर कर्मयोगाची जोड मिळावयास पाहिजे होती. ती श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या वाङ्मयानें दिल्यावर श्रीशिवछत्रपतींच्या कारकीर्दींत महाराष्ट्र स्वराज्य-सोपान उत्साहानें चढूं लागला.

शिकंदर व शिवाजी

शिवाजीची तुलना तत्कालीन इंग्रज पत्रलेखक अलेक्झांडर, हानिबाल व ज्यूलियस सीझर यांजबरोबर करीत. हीं नांवें आपण मोठीं समजतों व त्यांच्याशीं शिवाजीची तुलना केल्यानें आपण क्वचित् हुरळूनहि जातों. पण त्यांची ऐतिहासिक कामगिरी समजून घेतल्यास त्यांच्या जीवनांत हुरळून जाण्यासारखें व आपल्या पदरांत न्यूनगंड बांधून घेण्यासारखें कांहीं नाहीं, असें लक्षांत आल्याशिवाय राहत नाहीं. या त्रिवर्गापैकीं अलेक्झांडर तथा शिकंदर हा मॅसिडोनियाचा राजा होता. त्याचा देश चिमु-

कुलाच पण स्वतंत्र होता. तथापि त्याची आकांक्षा फार मोठी होती. त्याला आपलें साम्राज्य युरोपियनांना ज्ञात अशा जगावर पसरावयाचें होतें. व त्याकरितां आपसांत भांडणाऱ्या ग्रीक नगरराज्यांचें ऐक्य घडवून आणून त्यांजवर आक्रमण करणारा इराणचा बादशहा डरायस तिसरा याचा निःपात करावयाचा होता. तो त्यानें केला, इतकेंच नव्हे तर सिंधु नदीपर्यंतचा प्रदेश जिंकून दक्षिणेस मिसरदेशहि (इजिप्त) पादाक्रान्त केला. हेंच त्याला माहीत असलेलें जग व तें जिंकल्यावर तो गर्वानें इतका फुगला कीं, तो स्वतःला प्रत्यक्ष देव समजूं लागला. त्याची ही अचाट कल्पना ज्यांना पसंत पडली नाहीं त्यांत त्याचे परम मित्र व सहकारी असून त्यांजवर संतापून त्यानें त्यांचा शिरच्छेद केला.

शिवाजीस शिकंदरासारखी साम्राज्यतृष्णा नव्हती. म्हणजे त्याला स्वतंत्र लोकांना परतंत्र करावयाचें नव्हतें. त्यालाहि हिंदुपदपादशाही स्थापावयाची होती. याचा अर्थ इतकाच कीं, त्याला आपल्या हिंदु बंधूंना मुसलमानांच्या जोखडाखालून सोडवावयाचें होतें. अर्थात् शिवाजीचें ध्येय शिकंदराच्या ध्येयाहून अगदीं विरुद्ध पण त्याहून कितीतरी उच्च व उदात्त होतें. इतर बाबतींत शिवाजी व शिकंदर या दोघांत बरेंच साम्य आढळतें. शिकंदरास त्याच्या वयाच्या तेराव्या वर्षी त्याचा पिता फिलिप यानें जगप्रसिद्ध तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल यास त्याचा गुरु म्हणून नेमलें. ॲरिस्टॉटलचें नांव घेतांच कोणासहि श्रीसमर्थ रामदासांचें स्मरण होईल. ॲरिस्टॉटलसारखे समर्थ तत्त्ववेत्ते होते. पण त्याहून श्रेष्ठ प्रतीचे साधु होते. ते ॲरिस्टॉटल-प्रमाणें सेवा पत्करून शिवाजीस शिकविण्यास गुरु म्हणून राहिले नव्हते. पण ते ॲरिस्टॉटलच्या निबंधाप्रमाणें अध्यात्मपर पण प्रवृत्तिपर ग्रंथलेखन करीत होते व त्यामार्फत एकट्या शिवाजीसच काय पण अखिल महाराष्ट्रास कालोचित शिकवण देत होते.

शिवाजीस वयाच्या तेराव्या वर्षीच शिक्षण देणारा दादाजी कोंडदेव हा त्याजपाशींच होता. त्यानें त्यास राज्यकारभार व लोकव्यवहार यांचें शिक्षण दिलें व त्याची माता जिजाबाई इजपासून त्यास गृहशिक्षण मिळालें. शिवाजी शिकंदराप्रमाणेंच राजकुलोत्पन्न असल्यामुळें त्याच्या वाड्यांत त्यास धार्मिक शिक्षण देण्यास शास्त्री, पुराणिक असत. त्यानें

त्यांच्या तोंडून वेदान्त श्रवण करावा आणि राम-रावण युद्ध, कौरव-पांडव युद्ध, जानकीहरण, सीताशुद्धि, आपल्या मातापित्यांस बंदींत घालणाऱ्या कंसाचें श्रीकृष्णानें केलेलें मर्दन, भीमसेनानें कुस्ती खेळून जरासंधाचें केलेलें चूर्ण यांसारख्या शौर्यवीर्याच्या कथा ऐकाव्या. त्या कथा श्रवणपुटांत सांठवून ठेवून श्रीकृष्णादिकांच्या अद्भुत कृत्याप्रमाणेंच स्वतः अद्भुत कृत्यें करून शिवाजीनें आपलें भावी चरित्र रंगविलें. शिवाजीची मनोघटना सत्त्वगुणप्रधान होती व शिकंदराची मनोघटना रजोगुणप्रधान किंबहुना आसुरी होती; या कारणानें आपल्या सुहृदांची हत्या करण्यास त्याचा हात वाहिला. पण तसें मित्रद्रोहाचें घोर व अनुचित कृत्य शिवाजीच्या हातून घडलें नाहीं. या दृष्टीनें शिवाजी शिकंदरापेक्षां संस्कृतीनें किती श्रेष्ठ होता हें कळून येतें. शिकंदरानें आपलें शौर्य व पराक्रम अवघ्या ३३ वर्षांच्या अल्पायुष्यांत प्रकट केला व शिवाजी वयाच्या ५० वर्षांपर्यंत झगडला तरी त्याचें राज्य शिकंदरापेक्षां फारच लहान होतें असें कोणी म्हणेल. त्याला उत्तर एवढेंच कीं, शिकंदराचा पिता एक स्वतंत्र राजा असून त्याचा वारसा शिकंदरास अल्पवयांतच प्राप्त झाल्यामुळें प्राथमिक झगड्यांत शिवाजीचीं पुष्कळ वर्षें जशीं वायां गेलीं तशीं शिकंदराचीं गेलीं नाहींत. त्यानें तेराच वर्षें राज्य केलें. पण त्या तेरा वर्षांत त्यानें फार मोठा मुलूख पादाक्रान्त केला म्हणून तो त्याच्या राज्यास कायमचा जोडला गेला असें झालें नाहीं. इतकेंच नव्हे तर त्याच्या पश्चात् त्याच्या कुटुंबाचा उच्छेद होऊन त्याच्या साम्राज्याचे तीन तुकडे पडले.

शिवाजीनें परकीय सत्तेपासून आपला देश सोडवून त्यांत स्वतंत्र राज्याची स्थापना केली हें कृत्य अद्भुत होय यांत शंका नाहीं. त्याला भारताच्या प्राचीन इतिहासांत तोड सांपडणें कठीण आहे. शक, हूण इत्यादि परकीयांनीं भारताचा पश्चिम भाग जिंकला पण त्यांच्या ताब्यांत सर्व भारत जाऊन त्यांतील सर्व राजे परतंत्र झाले नव्हते. यामुळें उरलेल्या स्वतंत्र राजांना त्यांचा पराभव करणें सोपें गेलें. शिवकालांत याहून स्थिति अगदींच वेगळी होती. अखिल भारत मुसलमानांनीं आक्रमिला होता. कर्नाटकांत कांहीं नायक स्वतंत्र राहिले होते; पण त्यांनाहि विजापूरच्या आदिलशहानें अखेरीस नरम आणलेंच.

रजपूत, द्रविड व कन्नड

मुसलमानांशीं झगडण्यास समर्थ अशा दोन शक्ति भारतांत होत्या. एक दिल्लीच्या आसपासचे रजपूत राजे व दुसरे तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील द्रविड व कन्नड संस्थानिक. या उभयतांचीं प्रस्थापित अशीं राज्यें होतीं. रजपूत राजे तर प्रबल सैन्यें बाळगून होते. फ्रेंच प्रवासी बर्नियर यानें तत्कालीन भरतखंडाचें सूक्ष्म अवलोकन केलें होतें. त्याच्या मतें राजपुतान्यांतील दोन-तीन राजे एक झाले असते तर त्यांनीं मोगली सत्ता धुळीस मिळविली असती. पण त्यांच्या आपसांतील बेबनावामुळें ते मोगली सत्ता नाहींशी करूं शकले नाहींत; इतकेंच नव्हे तर तिचे दास बनून स्वातंत्र्यवीर शिवाजी यास ‘ कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ’ या म्हणी-प्रमाणें दिल्लीपतीच्या वेसणेंत अडकविणें आपलें कर्तव्य समजूं लागले.

रजपूत राजे दिल्लीच्या आसपास व परकीय सत्ताकेंद्रापासून जवळ अतएव एक प्रकारच्या प्रतिकूल स्थितींत होते. तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील हिंदु राजे दिल्लीपासून फार दूर व विजापूर व गोवळकोंडा यांपासून जवळ होते. शिवाजी हा त्या तिन्ही सत्तांचा प्रतिस्पर्धी त्या सत्तांबरोबर झगडण्यास सिद्ध असल्यामुळें व मोगली सत्तेच्या आक्रमणामुळें आदिलशाही व कुतुबशाही बऱ्याच कमकुवत झाल्या होत्या. शिवाजीला जसा गडांचा आश्रय होता तसा दक्षिणेकडील नायकांनाहि होता. मालनाड या डोंगराळ प्रदेशांत ठिकठिकाणीं दुर्ग होते व त्यांत हिंदूंचीं स्वतंत्र राज्यें होतीं. विजयनगरच्या राजवंशांतील श्रीरंग हा पुरुष त्यांचें नायकत्व पत्करण्यास तयार होता आणि महंमद आदिलशहा यानें त्यांजविरुद्ध धर्मयुद्धहि पुकारलें होतें. अशा स्थितींत स्वधर्मरक्षणार्थ त्या सर्वांनीं संयुक्त आघाडी उभारून आदिलशाहीस व कुतुबशाहीस तोंड देण्याचें ठरविलें असतें तर ते त्यांचें आक्रमण सहज थांबवूं शकले असते. इतकेंच नव्हे, तर शिवाजी-च्या साहाय्यानें त्यांना विजापूरचें राज्य जमीनदोस्त करतां आलें असतें; पण तसें त्यांच्या हातून घडलें नाहींच, उलट ते आदिलशाहीचे अंकित होऊन राहिले.

याहून शिवाजीची भूमिका अगदींच भिन्न होती. त्याचें प्रारंभीं स्वतंत्र असें राज्य नव्हतेंच. होती ती लहानशी जहागीर. तिचा मालक

शहाजी हा विजापूरकरांचा ताबेदार सरदार. शिवाजीला या जहागिरीचा उपयोग झाला तो एवढाच कीं, तिच्या संरक्षणाकरितां त्याजपाशीं थोडीशी फौज व बापानें त्याजबरोबर बेंगळुराहून पाठविलेले मुत्सद्दी मिळाले. परंतु त्यांपैकीं कोणासहि स्वातंत्र्याची कल्पना सुचण्यासारखी नव्हती. शहाजी तर बोलून-चालून आदिलशहाचा ताबेदार, तो त्यास स्वतंत्र होण्याची फूस कशी देणार व ती त्यानें दिल्याचा नुसता संशय जरी आदिलशहास व त्याच्या मुसलमान सरदारांस आला असता तर त्यांनीं त्यास जिवंत तरी राहूं दिलें असतें काय? त्याला दोनदां कैद करण्यांत आलें तें अशा संशयावरूनच ना? शिवाजीची माता जिजाबाई कितीहि शहाणी स्त्री असली व दादाजी कोंडदेव कितीहि विश्वासू, धूर्त कारभारी असला तरी तीं दोघेंहि त्यास आगीशीं खेळ खेळण्यास सांगतीं ना. शिवाय अशीं महत्कृत्यें कोणाच्या सांगण्यावरून व उपदेशावरून होत नसतात. तेथें जातीचेंच लागत असतें. शिवाजींत स्वातंत्र्याची स्फूर्ति स्वयंभू होती. ती नसती तर त्यानें आपणांवर जिवावरचीं संकटें ओढवून न घेतां औरंगजेब वा आदिलशहा यांच्या पदरचा बडा सरदार होऊन आयुष्य सुखांत घालविलें असतें.

हानिबाल व शिवाजी

शिकंदरानंतर ज्याच्या नांवाचा उच्चार युरोपियन लेखक करतात तो हानिबाल. शिकंदर ख्रि. पू. ३२३ या वर्षीं बाबिलोनमध्यें मृत्यु पावला व त्याच्यानंतर सुमारें ७५ वर्षांनीं हानिबाल हा कार्थेज या नगरांत जन्मास आला. कार्थेज हें नगर आफ्रिकेच्या किनाऱ्यावर इटालीच्या अगदीं समोर होतें. प्राचीन काळीं भारतांत गणराज्यें होतीं, तशीं युरोपांत नगरराज्यें होतीं. कार्थेज हें अथेन्स वा रोम यांप्रमाणें नगरराज्यच असून तेंहि रोमप्रमाणें आपलें साम्राज्य स्थापण्याच्या उद्योगांत होतें. हानिबाल यासहि शिकंदराप्रमाणें साम्राज्यलालसाच लागून राहिली होती. म्हणून त्याचें नगर कार्थेज हें स्वतंत्र राज्य होतें तरी त्यानें स्पेनचा दक्षिण भाग जिंकून आपली सरहद्द इटालीला भिडविली. तेव्हां रोमन लोकांना हानिबाल सबंध स्पेन घशाखालीं घालणार, असा धाक पडून त्यास प्रतिबंध करण्याकरितां त्यांनीं हानिबालशीं युद्ध पुकारलें. त्या युद्धांत हानिबालचें युद्धकौशल्य व

चापल्य निदर्शनास येऊन त्यानें रोमन सैन्यास अल्पावधींत ठिकठिकाणीं माती चारली, इटालीचीं दक्षिणेकडील नगरें जिंकून रोमन लोकांना दिङ्मूढ केलें व रोमन लोकांच्या नाकासमोर तो इटालींत तेरा वर्षें घेतलेला प्रदेश हाताखालीं घालून बसला. शेवटीं रोमन लोकांनीं आपलें आरमार कार्थेजवर पाठवून त्यास शरण आणलें व नाक घासावयास लावलें. अशा रीतीनें सोळा वर्षांत हानिबालनें जें वैभव संपादिलें होतें तें त्वरित लयास गेलें. त्या वेळीं हानिबाल चाळीस वर्षांचा होता. हानिबालचें सेनानित्व व युद्धकौशल्य फक्त सोळाच वर्षें चमकून तो नाश पावला.

सीझर व शिवाजी

शिकंदर हा ग्रीक योद्धा व हानिबाल हा कार्थेजचा योद्धा. आतां तिसरा जगद्विख्यात योद्धा ज्यूलियस सीझर. ग्रीस देशानंतर रोमचें दैव उघडलें. रोममध्यें एक धनिकांचा व दुसरा शेतकऱ्यांचा पक्ष असून सर्व सत्ता धनिकांच्या (पॅट्रिशियन्स) हातांत होती. रोमन पार्लमेंटास सीनेट म्हणत; तें धनिकांच्या ताब्यांत होतें. त्यांचा व शेतकऱ्यांचा (प्लेबियन्स) लढा लागून इटालीच्या दक्षिण भागांत जे दंगे उद्भवले ते मोडण्याकरितां सीनेटला आपले सेनापति पाठविणें भाग पडलें. सेनापतींच्या स्वाधीन सैन्य असल्यामुळें सेनापति प्रबळ होऊन सीनेटला न जुमानणारे सर्वाधिकारी झाले. ज्यूलिअस सीझर त्यांपैकींच एक होता. तो सीनेटमध्यें कॉन्सल म्हणजे प्रमुख होता व त्यास फ्रान्सवर राजप्रमुख (गव्हर्नर) नेमण्यांत आलें होतें. त्यानें फ्रान्स, स्पेन व ऱ्हाइन नदीपर्यंतचा युरोपचा बराच भाग जिंकला व इंग्लंडहि पादाक्रांत केलें. त्या आक्रमणांत त्यानें आपल्या सैन्याची इतकी जय्यत तयारी केली व युद्धकौशल्य प्रकटिलें कीं, त्यामुळें त्याची जगप्रसिद्ध योद्ध्यांत गणना होऊं लागली. या विजयांनीं उन्मत्त बनून त्यानें सीनेटची सत्ता धाब्यावर बसविली असतां त्याचाच एक वेळचा मित्र पांपे हा सीनेटची बाजू घेऊन त्याजविरुद्ध उठला. पण त्यास सीझरनें नामोहरम केल्यावर पांपे इजिप्तमध्यें पळाला. पांपेच्या नाशानंतर सीझरला निर्वीर्यमुर्वीतलम् झालें. त्यानें आशियांत शिरून आशिया मायनर व आफ्रिकेचा कांहीं भाग घेतला.

सीझर या विजयपरंपरेनें इतका धुंद झाला कीं, त्यानें आपली रोमचा

सर्वाधिकारी (डिक्टेटर) म्हणून आजीव नेमणूक करून घेतली व सीनेट-मध्यें आपले बगलबच्चे भरले. तथापि सीझर हा एकतंत्री पण शहाणा राज्यकर्ता होता. त्यानें रोमचा राज्यकारभार पुष्कळच सुधारला व रोमचें चांद्रमासी पंचांग होतें, तें सौरमासी केलें. सीझरनें रोमचें राज्य सुराज्य करण्याचा प्रयत्न केला तरी स्वातंत्र्यप्रिय रोमन लोकांना त्याची हुकूमशाही पसंत न पडून, तो स्पेनमधील दंगे मोडून परत रोममध्यें आल्यावर कांहीं रोमनांनीं कट करून त्याचें मस्तक उडविलें. त्याच्या वधानंतर रोममध्यें लोकशाही राजवट सुरू झाली नाहीं ती नाहींच. उलट रोमन राज्यांत यादवी युद्ध मात्र पेटलें. सीझर १५ मार्च ख्रि. पू. ४४ मध्यें मारला गेला. सीझरच्या कर्तृत्वाचें सार काढावयाचें झालें तर तो मोठा योद्धा व शहाणा राज्यकर्ता होता. पण साम्राज्यवादी व सत्ताभिलाषी असल्यामुळें त्याची स्वतःची मात्र आहुति पडली.

शिकंदर, हानिबाल व सीझर हे योद्धे एका कोटींतील समजण्यास हरकत नाहीं. शिवाजीची कोटि त्यांच्याहून निराळी व उच्च होती. त्या त्रिवर्गापाशीं पूर्वीचीं सुसंघटित राज्यें होतीं व तीं त्यांनीं फक्त वाढविलीं. पण शिवाजीला मुळीं नवें राज्यच परकीय सत्तेमधून निर्मावयाचें होतें. हें कार्य त्या त्रिवर्गाच्या कार्यापेक्षां किती तरी बिकट होतें. तें करीत असतां त्या त्रिवर्गाप्रमाणें त्यानें तलवार गाजवून स्वतः कैक मोठमोठ्या लढाया मारल्या, पण त्यांनीं केलीं नाहींत तीं विलक्षण व विस्मयकारक अशीं धाडसाचीं महत्कृत्यें केलीं आणि त्यांजहून अधिक सुधारलेलें राज्य स्थापलें. या राज्यमंदिराचें काम पायापासून शिखरापर्यंत पार पाडतांना त्याला असंख्य अनुयायांची मदत घ्यावी लागली. प्रारंभीं त्याजपाशीं शहाजीनें दिलेले सहकारी होते. पण त्यांची पात्रता होती ती लहानशी जहागीर सांभाळण्यापुरती होती. ती स्वतंत्र राज्यस्थापनेस कमी पडूं लागल्यावर त्यानें महाराष्ट्रांतील जनतेच्या वेगवेगळ्या थरांतून आपणांस हवे तसे मुत्सद्दी, राज्यकार्यधुरंधर, मंत्री, योद्धे, सेनापति व धुरीण आपल्या-भोंवतीं जमविले. ते इतके विश्वासू, शिस्तबाज, धैर्यवान्, कर्तबगार, शूर व निरलस होते कीं, त्यांनीं त्यानें सांगितलेली कामगिरी यशस्वी रीतीनें पार पाडलीं नाहीं असें सहसा घडलें नाहीं व त्यांनीं त्याला कधींहि दगा दिला नाहीं.

शिवाजीनें आपल्या अंगचें अचाट शौर्य, साहस, धूर्तपणा, नीतिमत्ता व राजकारणपटुत्व या गुणांच्या जोरावर आपणांभोंवतीं जिवास जीव देणाऱ्या मुत्सद्द्यांचें व वीरांचें कडें उभें केलें व महाराष्ट्रीयांची जूट जमविली. त्याच्या अनुयायांत ब्राह्मण, मराठे, शेणवी, प्रभु इत्यादि अठरा पगड जातींचे असंख्य लोक होते. भारतीयांच्या चातुर्वर्ण्य पद्धतीस अनुसरून भूपाल होण्याचा हक्क क्षत्रियांचा. महाराष्ट्रांतील मराठे हे क्षत्रिय होत. त्यांपैकीं शिवाजी हा असल्यामुळें तो राजा होणार याचा विषाद कोणासहि वाटला नाहीं. ब्राह्मणांपासून खालच्या सर्व जाती त्याला मनापासून मानीत होत्या. जसे ब्राह्मण व अब्राह्मण शिवाजीशीं राजनिष्ठेनें व इमानानें वागत तसे ते परस्परांशीं सलोख्यानें व एकजुटीनें वागत असत; म्हणून शिवाजीच्या अनुयायांत एक प्रकारची मैत्री उत्पन्न झाली व तिनें त्याचें बिकट कार्य पुष्कळच सुकर झालें.

नवराष्ट्र-निर्माता

शिवाजीनें महाराष्ट्राचें प्रथमच नवराष्ट्र निर्माण केलें. स्वदेशाभिमान व स्वधर्माभिमान यांची सांगड त्यानें प्रथमच घातली. मुसलमानी आमदानींतील सव्वातीनशें वर्षांपूर्वीं महाराष्ट्रांत यादवांचें राज्य होतें व तें स्वराज्यच होतें. परंतु त्या वेळीं महाराष्ट्राला खऱ्या अर्थानें राष्ट्र ही संज्ञा प्राप्त झाली नव्हती व तिची तेव्हां प्रायः गरजहि नव्हती. ती गरज मुसलमानांची परकीय सत्ता महाराष्ट्रावर स्थापन झाली तेव्हां उत्पन्न झाली. शिवाजीचें स्वधर्मरक्षण हें ध्येय व स्वराज्यस्थापना हें साधन होतें. या ध्येयामुळेंच सामान्य जनता त्याच्या पाठीशीं राहून तिच्या साहाय्यानें त्याला स्वराज्य स्थापतां आलें. या नव्या ध्येयानें जनमनांत एक प्रकारचा नवा जोम उत्पन्न केला व त्या योगानें महाराष्ट्रीयांच्या सुप्त सद्गुणांचा, भावनांचा व सामर्थ्याचा आविष्कार झाला. महाराष्ट्रास शिवाजी हा अद्वितीय नेता मिळाला व त्यानें दिलेल्या स्फूर्तीनें महाराष्ट्र एकवटला.

यादवकाळांत व शिवकाळांत फरक होता तो हा कीं, यादवकाळांत मुसलमानांत जो धार्मिक आवेश होता तो शिवकालांत ओसरला होता. श्रेष्ठ प्रतीचीं शस्त्रास्त्रें, धार्मिक आवेश, वा धर्मवेड व धर्मप्रसाराच्या ध्येयानें मुसलमानांची बनलेली जूट या एकवटलेल्या सामर्थ्यापुढें महाराष्ट्रीयांचा

यादवकाळांत टिकाव लागला नाहीं. पण ही पहिली धडक संपून गेल्यावर व मुसलमानांशीं घनिष्ट संबंध आल्यावर मुसलमानी सत्तेंतील दौर्बल्य म्हणजे तिचें मरण महाराष्ट्रीयांच्या नजरेस हळूहळू येत चाललें. मुसलमानांना राज्य स्थापन करतां येत असे, पण तें दीर्घकाल टिकवितां येत नसे. राज्य स्थापून त्यापासून ऐश्वर्याचा उपभोग मिळूं लागल्यावर त्यांची धर्मप्रसारावरची नजर ढळून ती स्वार्थाकडे वळत असे आणि स्वार्थ हेंच जीवितांचें उद्दिष्ट ठरल्यानंतर मुसलमानांची धर्मैक्याची भावना मागें पडून धर्मप्रसाराऐवजीं राज्यप्रसारास अग्रस्थान प्राप्त झाल्यामुळें एक मुसलमानी राज्य दुसऱ्या मुसलमानी राज्याशीं लढूं लागे व तीं परस्परांशीं लढून अधिकच कमकुवत होत. त्याशिवाय त्यांच्यांत शिय्या व सुनी, पठाण व दक्षिणी अशींहि भांडणें असतच.

औरंगजेबाची चूक

दिल्लीच्या मोगलांना दक्षिणेंतील मुसलमान परकीय समजत. दिल्लीच्या मोगलांनीं शिवकालांत दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें समूळ नष्ट करून आपलें राज्य सर्वत्र स्थापलें नाहींच, उलट दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें दुबळीं व खिळखिळीं बनवून त्यांना कुरतडून खाऊन टाकण्याचें शिवाजीचें कार्य त्यांनीं सोपें केलें. यापेक्षां मोगल दक्षिणेंत आलेच नसते व त्यांनीं अहमदनगर, विजापूर व गोवळकोंडा हीं राज्यें आपापल्यापरीनें समर्थ राहूं दिलीं असतीं तर शिवाजीला स्वराज्यस्थापनेच्या बाबतींत जें यश आलें तें आलें असतें कीं नाहीं याविषयीं शंका वाटते. कदाचित् विजयनगरचें प्रबळ हिंदु राज्य जसें त्या तिघांनीं मिळून धुळीस मिळविलें तसें शिवाजीला त्यांनीं डोकेंहि वर काढूं दिलें नसतें. बरें, मोगल दक्षिणेंत आले ते आले, पण इकडे आल्यावर औरंगजेबाच्या काळांत मराठ्यांचें हिंदु राज्य आपल्या डोळ्यासमोर वाढीस लागत असल्याचें औरंगजेबास दिसत असतां त्यानें विजापूरकरांशीं ऐक्य करून प्रथम हा नवा अंकुर मुळासकट उपटून टाकावयास पाहिजे होता. पण इतकी दूरदृष्टि औरंगजेबाच्या ठिकाणीं नव्हती ही गोष्ट राज्यकर्ता या नात्यानें त्याची अपात्रताच सिद्ध करणारी आहे.

औरंगजेब दिल्लींत बसून दक्षिणेंतील राज्यें बुडविण्यासाठीं अट्टाहास

करीत होता. पण हा प्रकार उंटावर बसून शेळया हाकण्यासारखा होता. तो दिल्लीहून दक्षिणेंत आपले सरदार पाठवी. दिल्ली व दक्षिण यांमधील अंतर ७।८ शें मैलांचें. इतक्या दूर अंतरावरून त्याला दक्षिणेंतील बदलत्या राजकीय परिस्थितीचें योग्य आकलन व्हावें कसें ? या कारणानें औरंगजेब व त्याचे दक्षिणेंतील सेनापति यांच्या धोरणांत फेर पडून तो भलतेच हुकूम आपल्या सेनापतींना सोडी व त्यामुळें दक्षिणेंतील मोगली राजकारण बिघडून जाई. त्याचा प्रत्यय औरंगजेबानें मुअज्ज्मास व पुढें दिलीरखानास संभाजीला पकडून ठेवण्याचा हुकूम सोडला तेव्हां आलाच.

औरंगजेबाच्या कार्यपद्धतींत दुसरा दोष हा होता कीं, त्याच्या दक्षिणेंतील सैन्यांत बहुनायकी असे. जयसिंग व दिलीरखान या दोन सेनापतींत वारंवार मतभेद उत्पन्न होई आणि त्या दोघांच्या वा इतरांच्या धोरणांत एकवाक्यता न राहिली म्हणजे शिवाजी त्याचा फायदा घेण्यास चुकत नसे. कारण शिवाजीकडे बहुनायकी नसून एकनायकी असल्यामुळें त्याच्या धोरणांत सुसूत्रता व एकसूत्रता राही.

औरंगजेबाच्या वा विजापूरच्या सैन्यांत एकधर्मीय सैनिक नसत. हिंदु व मुसलमान या दोन धर्मीयांची त्यांत खिचडी होती व त्यांच्यांत रोहिले, पठाण, सिद्दी, मोगल यांसारख्या जातीहि होत्या. सेनापतींतहि तीच स्थिति असल्यामुळें स्वधर्मासाठीं हातावर शिर घेऊन लढणाऱ्या शिवसैनिकांविषयीं औरंगजेब व विजापूरकर यांच्या हिंदु सैनिकांना व सेनापतींना साहजिकच आपलेपणा व सहानुभूति वाटे. उरले मुसलमान सेनापति; त्यांजपुढें उच्च ध्येय असें कांहीं नसल्यामुळें त्यांना शिवाजीनें द्रव्याची लालूच दाखविली कीं ते त्यास आंतून वश होत. उलटपक्षीं शिवाजीचें सैन्य एकजात हिंदु होतें व त्याचे सेनापतीहि एखादा अपवाद सोडल्यास हिंदु होते. त्यांचें ध्येय उच्च होतें. मुसलमानांतील धार्मिक आवेश नष्ट होऊन तो मराठ्यांत आला होता व मुसलमानांत आतां फूट पडून मराठ्यांत एकजूट झाली होती. त्यांजवर लांचेचा मंत्र सहसा चालत नसे. हिंदूंना लायक असा नेता मिळाला म्हणजे त्याचें उद्दिष्ट साधण्याकरितां त्याजवरून आपले प्राण ओवाळून टाकण्यास ते बद्धपरिकर

कसे होतात. याचा अनुभव टिळककाल व गांधीकाल यांत आपणांस आला तसा शिवयुगांत शिवाजीस आला.

हिंदूंची समाजरचना

या ठिकाणीं कोणी असा आक्षेप घेईल कीं, जर हिंदूंत जातिभेद होता तर त्यांच्यांत शिवकालांत एकजूट झाली कशी ? पण या शंकेचें निरसन अगदीं सोपें आहे. हिंदूंत जाती होत्या, पण त्या जातींत परस्परांविषयीं द्वेष नव्हता. हिंदूंची समाजरचनाच मुळीं सहकारितेच्या तत्त्वावर करण्यांत आली आहे. जाती या एकमेकींस मारक नसून पूरक आहेत. या कारणानें मराठे, ब्राह्मण, प्रभु इत्यादि जातींतील गुणांची बनलेली मजबूत भिंत शिवाजीच्या पाठीशीं उभी होती. असो. औरंगजेबाचा शिवाजीस जिंकण्याचा प्रयत्न आणखी एका कारणामुळें फसला. अफजलखानाचा वध होईपर्यंत विजापूरच्या आदिलशाहींत बरीच ताकद होती. पुढें मोगली सैन्यांशीं झुंजण्यानें ती कमी होत गेली. शाइस्ताखान अफजलखानाच्या वधानंतर पुणें प्रांतीं शिवाजीवर आला, तेव्हां विजापूरकरांचें सामर्थ्य शाइस्ताखानाच्या मदतीस आलें असतें तर त्या दोन सामर्थ्यांनीं मिळून सन १६६१ तच शिवाजीला सहज बुडवून टाकलें असतें. पण तसें विजापूरकरांच्या दरबारांतील फुटीमुळें व सरदार-सरदारांतील मत्सरामुळें घडूं शकलें नाहीं. त्यानंतर जयसिंग व दिलीरखान आले. त्यांनीं खंडणीची बाकी उगवून घेण्याकरितां शिवाजीच्या मदतीनें आदिलशाही बुडविण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं आदिलशाहीच्या मदतीनें शिवाजीस समूळ नष्ट करण्याचें योजलें असतें तर शिवाजी इ. स. १६६५ पूर्वींच निर्माल्यवत् होऊन त्याचें स्वराज्यस्थापनेचें स्वप्न पार मावळलें असतें.

शिवाजी आग्र्याहून महाराष्ट्रांत परत आल्यानंतर मोगलांवर उलटणार हें जयसिंगानें ओळखलें होतें. पण औरंगजेबास तें ओळखतां आलें नाहीं. या वेळीं शिवाजीनें विलक्षण अक्कलहुशारी लढविली. वास्तविक आपणांस अन्यायानें कैद करून ठेवणाऱ्या औरंगजेबावर सूड उगविण्याचाच दुसऱ्या एखाद्या सामान्य राजानें निर्धार केला असता. पण शिवाजीनें तसें कांहीं न करतां, आपण अद्यापि जयसिंगाबरोबर पूर्वी केलेला तह पाळण्यास तयार आहों, असें औरंगजेबास अत्यंत

नम्रतापूर्वक कळवून त्यास बेसावध ठेवला व औरंगजेबाचा विश्वास संपादण्याकरितां दोन वर्षें तशी वर्तणूकहि ठेवली. कारण शिवाजीचें राज्य आतां इतकें लहान झालें होतें कीं, पुढील धोरण नीट आंखण्याकरितां त्याला फुरसतच पाहिजे होती. त्या दोन वर्षांच्या मुदतींत मुअज्झमास भुरळ घालून शिवाजीनें आपलें सैन्य मोगलांच्या अन्नावर पुष्ट करून मोगलांनीं घेतलेल्या आपल्या मुलखावर सोडलें व गेलेला सारा मुलूख स. १६७० पासून परत मिळविला; इतकेंच नव्हे तर मोगलांचा आणखीहि मुलूख जिंकला. याहि बाबतींत शिवाजीनें औरंगजेबावर राजनैतिक असा फार मोठा विजय संपादिला.

जयसिंगानें शिवाजीस शरण आणल्यानंतर सन १६६५ च्या अखेरीस आदिलशाहीची पाठ पुरविली व तो क्रम जयसिंग १६६६ त बऱ्हाणपुरास मरण पावल्यावरहि बहादुरखान व दिलीरखान यांनीं पुढें सामान्यतः १६८० पर्यंत चालविला. त्याचा परिणाम असा झाला कीं, आदिलशाहीची आक्रमकशक्ति समाप्त होऊन तिजपाशीं जेमतेम आत्मरक्षणाची म्हणजे बचाव करीत राहण्याची शक्ति शिल्लक राहिली. म्हणजे मोगलांनीं आपल्या चुकीच्या धोरणानें, सन १६६० पूर्वीं ज्या आदिलशाहींत शिवाजीला दाबांत ठेवण्याचें बळ होतें तें खर्ची करून, शिवाजीचें बळ मात्र वाढूं दिलें.

दोघांचें भांडण

मोगल व विजापूरकर या दोघांच्या भांडणांत 'दोघांचें भांडण त्यांत तिसऱ्याचा लाभ' या म्हणीप्रमाणें शिवाजी आपला कार्यभाग सारखा साधीत गेला. तो प्रारंभीं मोगलांशीं लढतांना विजापूरकरांशीं सख्य ठेवी तर कधीं विजापूरकरांशीं लढतांना मोगलांशीं मैत्रीनें राही. अशा रीतीनें तो आपलें राज्य व बळ सारखें वाढवीत गेला व अखेरीअखेरीस तो इतका प्रबळ झाला कीं, मोगल व विजापूरकर या उभयतांस एकाच वेळीं सामना देऊं लागला. मोगल व विजापूरकर या दोन मोठ्या सत्ता जिवंत असतां शिवाजी स्वराज्य स्थापून तें वाढवीत राहिला याचें इंगित हेंच होय. जितकें राज्य मोठें, तितकें सैन्यबळ मोठें व जितकें सैन्यबळ मोठें तितकी आक्रमकशक्ति मोठी, या नियमाप्रमाणें मोगल व विजापूरकर यांची शक्ति प्रारंभीं शिवाजीच्या शक्तीहून फारच मोठी होती. शिवाजी जावळीचे मोरे,

पालवणीचे दळवी व शृंगारपूरचे सुर्वे यांच्याशीं जोंपर्यंत झुंजत होता तोंपर्यंत त्याच्याजवळच्या लहान सैन्यबळावर त्याचें भागत होतें. परंतु त्यानंतर विजापूरकर व मोगल यांना तोंड देण्याचा त्याजवर प्रसंग आला तेव्हां त्याचें तें तुटपुंजें सैन्यबळ कमी पडूं लागलें. त्या काळीं सैनिक हवे तितके सहज मिळत, पण त्यांना पगार देऊन सांभाळणें तितकेंच अवघड असे. प्रत्येक गांवीं पाटील व देशमुख यांजपाशीं शेंपन्नास सैनिक सहज असत व बहुतेकांना युद्धकला अवगत असल्याकारणानें नवीन तरुणांना युद्धकला शिकवून संख्याबळ वाढविणें अगदीं सोपें असे. पण मुख्य प्रश्न त्या सैन्यास पोसण्याचा. ही अडचणच जेव्हां शिवाजीपुढें दत्त म्हणून उभी राहिली तेव्हां सधन नगरें लुटून जरूर तो पैसा उभा करण्याची क्लृप्ति शिवाजीला सुचली. त्यामुळें त्याचें राज्य अगदीं लहान होतें तरी, मोगल व विजापूरकर या मोठ्या राज्यांच्या सैन्याइतकें मोठें सैन्य ठेवण्याची ताकद शिवाजींत येऊन, तो त्यांजबरोबर यशस्वी रीतीनें लढण्यास समर्थ झाला.

जसजसे हे युद्धप्रसंग वरचेवर येऊं लागले तसतशी शिवाजीवर धनिक शहरें वारंवार लुटावयास जाण्याची पाळी अधिकाधिक येत चालली. त्या वेळीं त्यानें लुटीचें एक पद्धतशीर शास्त्रच बनविलें. लुटीच्या वेळीं लागणाऱ्या धोकट्या, पिशव्या, तट्टें, बिनबोभाट व जलद लूट जमविणारे कुशल सैनिक यांची त्यानें व्यवस्थित घडी बसवून दिली. यामुळें या बाब-तींत त्याचा हात धरणारा त्याच्या वेळीं दुसरा कोणीहि नव्हता. या दृष्टीनें तो जसा राजनीतिविशारद, युद्धशास्त्रविशारद तसा स्तेयकला-विशारदहि बनला! शिवाजीचें राजकारण व युद्धकर्म याहि हुन्नराच्या जोरावर प्रभावी झालें.

राज्यप्रसार करतांना शिवाजीस मिळालेले सैनिक तरी अफगाण, पठाण, मोगल, सिद्दी, उझबेग यांसारखे धिप्पाड, कडवे व सराईत लढवय्ये होते काय? तेंहि नाहीं. आधीं महाराष्ट्रीय लोक पंजाब्याप्रमाणें उंच, भव्य व उमदे नव्हते. ते बुटके पण आडव्या अंगाचे असत. या सर्व महाराष्ट्रीयांत महाराष्ट्राच्या पश्चिम भागांतील मावळे व कोंकणां-तील हेटकरी हे अगदींच खुजे व किरकोळ. सह्याद्रीच्या दोन्ही बाजू-च्या पश्चिम व पूर्व बरगड्यांत त्यांची वस्ती होती. ते पावसाळ्यांत

मांड्याइतक्या पाण्यांत उभें राहून भाताचीं रोपें लावीत, डोंगराच्या कड्यावरून गुरें राखीत हिंडत, पाठीवर ओझीं घेऊन व हातांतील काठीवर नेट देऊन डोंगर चढत व उतरत, नाचणीची भाकर खात व हुलग्याचें माडगें पीत. उन्हाळ्यांत त्यांना तेंहि मिळूं नये. त्या दिवसांत कधीं करवंदांवर, कधीं आंब्याच्या कैऱ्यांवर वा फणसांच्या गऱ्यांवर ते राहत आणि कधीं तर अर्ध-पोटीं असत. ते कधीं सबंध उपासहि काढीत आणि रिकामें पोट पाण्यानें भरून भुकेची आग निववीत. ते खोपटावर काड वा झावळ्या पसरून त्याखालीं राहत असे. ते शिवाजीच्या डोळ्यांत भरणारे नसले तरी मनांत भरले होते. कारण ते चलाख व शूर होते. ते वाघास वाघरू म्हणून हिणवीत आणि त्यास काठ्यांनीं बडवून काढून शेरडूं, मेंढरूं यांच्या पंक्तीला बसवीत !

शिवाजी हा रत्नपारखी होता. त्यानें या मावळ्यांची व हेट-कऱ्यांची बरोबर परीक्षा केली होती. जें साधन हातीं लागेल त्याचें प्रखर शस्त्र बनविण्याचें ज्ञान त्याला उपजत होतें. त्याला कोळशांत रत्नें दिसलीं व हाडांत पोलादाच्या कांबी दिसल्या. तींच रत्नें त्यानें मावळांतून व कोंकणांतून निवडून काढून त्यांची फौज उभारली आणि या काटक, कष्टाळू, चलाख, इमानी, गरीब व अल्पसंतुष्ट फौजेकडून मोगलांच्या व विजापूर-करांच्या धिप्पाड, लढवय्या व सराईत अशा रजपूत, पठाण, सिद्दी आदि सैनिकांचा धुव्वा उडवून दिला. सिद्दी, इंग्रज व पोर्तुगीज यांजबरोबर समुद्रांत लढणारे शिवाजीचे भंडारी, कोळी इत्यादि सैनिकहि शत्रूशीं झुंजण्यांत हार जाणारे नसत; किंबहुना आपल्या कल्पकतेनें व हिकमतीपणानें त्यांजवर मातहि करीत. तथापि त्या दर्यावर्दी लोकांपुढें त्यांचें नाविक बळच अल्प असल्यामुळें त्यांना अखेर हार खावी लागली ही गोष्ट निराळी.

बडा जादूगार

शिवाजी हा बडा जादूगार होता, मांत्रिक होता, दिव्यचक्षु होता. तो महाराष्ट्राचा आत्मा असल्यामुळें त्यानें महाराष्ट्राच्या हृदयाचा व साम-र्थ्याचा बरोबर ठाव घेतला होता. त्याला सह्याद्रींतील दऱ्या, खोरीं या हिऱ्यांच्या खाणी दिसत व त्यांतील माळावर माती पसरलेली नसून सोनें पसरलेलें भासे. त्यानें आपल्या दिव्य सामर्थ्यानें गिरिगव्हरांतील निद्रित हरींची जागृत सेना निर्माण केली. तिला वाटल्यास श्रीरामचंद्राची वानरसेना

समजावी, वाटल्यास त्यांस नरकेसरी मानावें, वा वाटल्यास वसिष्ठांनीं कामधेनूच्या अंगांतून बाहेर काढलेले प्रबळ योद्धे गणावे. त्यानें या हरिचमूस यवनांच्या गजालींवर सोडून त्या गजेंद्रांच्या गंडस्थळांतून नखाग्रांनीं विदारलेलीं मौक्तिकें रानोमाळ विखरविलीं !

शिवाजीचा खरा आश्रयदाता सह्याद्रि; त्यास शरण जाऊन त्यानें आपलें मुख्य राज्य कोंकण व मावळ या प्रदेशांत स्थापलें. कोंकणांतील मोरे, दळवी, सुर्वे व सावंत यांचें सामर्थ्य आटोक्यांतील असल्याचें हेरून त्यांचा मुलूख जिंकून त्यानें स्वराज्याची उभारणी पहिल्या झटक्यास तिकडे केली. यांत त्याची दूरदृष्टिच दिसून येते. पण समुद्रकांठचे सिद्दी, पोर्तुगीज व इंग्रज यांचें संयुक्त बळ मोठें असल्यामुळें कोंकणपट्टीची बंदरपट्टी त्यास निर्वेध करतां आली नाहीं. या ठिकाणीं त्याचें बळ जसें अपुरें पडलें तसेंच देशावरहि मोगल व विजापूरकर यांजपुढें तें तोटकें पडल्यामुळें त्याला देशावरची फारच अरुंद पट्टी आपल्या राज्यास जोडतां आली. पण कर्नाटकांत मात्र विजापूर व गोवळकोंडा हे अखेरीस दुर्बळ बनले असल्यामुळें त्याला कर्नाटकाच्या स्वारींत तिकडे हात चांगला मारतां आला.

परंतु शिवाजीचा मोठेपणा त्यानें केवढें विस्तृत राज्य मिळविलें यावर अवलंबून नसून, तें लहान का होईना पण मिळविलें व स्वतंत्र राखलें यावर आहे. तो चौथरा त्यानें आधींपासून बांधून ठेवला होता म्हणून महाराष्ट्रीयांच्या पुढील कर्तबगार पिढ्यांना त्याजवर हिंदवी साम्राज्याची भव्य इमारत उठवितां आली.

युगप्रवर्तक कसा ?

शिवाजी महाराजांना या ग्रंथांत युगप्रवर्तक म्हटलें आहे तें सहेतुक आहे. शिवाजीपूर्वी भारतांत मुस्लिमयुग सुरू होतें. त्याचा पायाच शिवाजीनें उखडून टाकून हिंदुयुग प्रवर्तित केलें व तें अठराव्या शतकांत एकसारखें वृद्धिंगत होत गेलें. त्यानंतर इ.स. १८१८ पासून ख्रिस्तीयुग भारतांत अवतरलें असून, इंग्रजी राज्य गेलें तरी तें त्याबरोबर अजूनपर्यंत गेलेलें दिसत नाहीं. राज्यकर्ता या दृष्टीनें विचार करतां शिवाजीची आपल्या अधिकाऱ्यांवर जरब विलक्षण होती. अधिकारी कितीहि मोठा असला तरी त्याच्या हातून चूक घडल्यास त्याचा तो मुलाहिजा ठेवीत नसे. प्रतापराव गुजर हा त्याचा अतिशय

पराक्रमी सेनापति; पण त्यानें उमराणीच्या लढाईंत बहिलोलखान कैद होत असतांहि त्यास पकडलें नाहीं याबद्दल शिवाजीनें त्याची निर्भर्त्सना केली. त्या अपमानानें चिडून, बहिलोलखानाचें पारिपत्य केल्याशिवाय महाराजांना तोंड दाखविणार नाहीं, असा निश्चय करून प्रतापराव निघाला व प्राणांस मुकला. याचा अर्थ शिवाजी आपल्या अधिकाऱ्यांना कस्पटासमान मानीत असे असा नव्हे. त्याच्या ठिकाणीं लोकसंग्रहाचा गुणहि मोठा होता. निळो सोनदेव मुजुमदार यास मोरोपंत पेशव्याचा हेवा वाटून तो त्याजप्रमाणें शिपाई-गिरीची परवानगी शिवाजीपाशीं मागूं लागला असतां गोड शब्दांनीं त्याचें समाधान करून शिवाजीनें वतनी कारभार सांभाळून राहण्यास त्यास सांगितलें व त्यानें तें मान्य केलें.

ईश्वराच्या व साधुसंतांच्या ठिकाणीं त्याची अढळ निष्ठा होती. श्रीशैल पर्वतावरील मल्लिकार्जुनापुढें तो आपलें शिर कापून ठेवण्यास सिद्ध झाला. हें दृश्य पाहिलें म्हणजे श्रीमद्भगवद्गीतेंत वर्णिलेला तो योगभ्रष्ट होता असेंच म्हणावें लागतें.

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥

या गीतेच्या अठराव्या अध्यायांतील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें त्याची मनःस्थिति असल्यामुळें त्याजकडून क्षात्रकर्म करीत असतां जीं दुष्कृत्यें घडलीं असतील त्या योगानें तो पापी वा दोषी ठरत नाहीं. सारांश, आर्यांचा वेदान्त त्याच्या अंगीं पूर्णपणें बाणला होता.

ऐक्याचें एकमेव प्रतीक

शिवाजी हें सर्व महाराष्ट्रीयांना आदरणीय व ऐक्यनिदर्शक असें एकमेव प्रतीक आहे. प्रारंभीं उद्धृत केलेल्या श्लोकांतील बहुतेक गुणांचें त्याच्या ठिकाणीं प्रतिबिंब पडलें होतें. त्याच्या पश्चात् त्याचें राज्य कांहीं काल नष्ट झाल्यासारखें दिसलें तरी त्याच्या राज्याच्या मुळ्या महाराष्ट्रीयांच्या हृदयांत फार खोल गेल्या होत्या. या कारणानें अनुकूलता प्राप्त होतांच 'कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें' या वचनाप्रमाणें तें पुनः वाढीस लागून त्याच्या राज्याचें साम्राज्य बनलें. त्याच्या छायेखालीं म्हैसूरपासून दिल्लीपर्यंतचा व पश्चिम समुद्रापासून पूर्व समुद्रापर्यंतचा प्रदेश

येऊन त्यांतील हिंदुधर्म व हिंदुसंस्कृति यांना तें साम्राज्य पोषक झालें. मराठ्यांचें हें साम्राज्यहि कालान्तरानें अस्तंगत होऊन मराठ्यांच्या नशिबीं इंग्रजांचें दास्य आल्यावरहि शिवाजीची पुण्यस्मृतिच महाराष्ट्रीयांना स्वातंत्र्यप्राप्तीच्या नवीन प्रयत्नास उद्युक्त करती झाली.

शिवाजीच्या नांवांतसुद्धां एक प्रकारची जादू आहे. त्या नांवामुळेंच इतर प्रांतीयांत नव्हता तो आत्मविश्वास लो. टिळकप्रभृति महाराष्ट्रीय पुढाऱ्यांत आला. तो सर्व महाराष्ट्रीयांत जागृत करण्याकरितां लोकमान्यांना श्री-शिवजयन्त्युत्सव सुरू करावा लागला व त्याचा जो सुपरिणाम व्हावयाचा तो झाला. नवीन तरुण पिढी शिवराजभक्त बनली. महाराष्ट्रीय तरुणांत क्रान्तीच्या कल्पना त्यांतूनच प्रादुर्भूत झाल्या, महाराष्ट्रांतील सार्वत्रिक राजकीय चळवळींना जोर त्यांतूनच चढला व महाराष्ट्र, स्वातंत्र्याच्या चळवळींत त्यामुळेंच आघाडीवर राहिला. आतां महाराष्ट्र व अखिल भारत स्वतंत्र झाला आहे. महाराष्ट्र अद्यापि भंगलेला आहे, तो एकत्र यावयाचा आहे. तसा तो आला म्हणजेच महाराष्ट्रीय संस्कृतीचें व प्रगतीचें स्वरूप निश्चित होईल व त्याचें खरें मार्गदर्शन शिवचरित्रच करील.

सारांश, शिवाजीचें राज्य स्वातंत्र्यार्थ व धर्मरक्षणार्थ होतें. हीं दोन्ही कार्यें शिवाजीनंतरच्या महाराष्ट्रीयांच्या पिढ्यांनीं सिद्धीस नेलीं. भारताचा बराच मोठा प्रदेश मुसलमानांच्या अमलाखालून त्यांनीं सोडविला व मुसलमानी धर्माची आक्रमक लाट कायमची मागें परतवून हिंदुधर्मावरील संकट टाळलें.

कालानुक्रम

इ.स.१४८९ – निजामशाहीची स्थापना.

१५०८ – बुऱ्हाण निजामशहा गादीवर बसला.

१५३० – बाबाजी भोसले याचा जन्म.

१५५० – मालोजी भोसले याचा जन्म.

१५५३ – विठोजी भोसले याचा जन्म.

१५९४ – शहाजीचा जन्म.

१५९६ – जिजाबाईचा जन्म.

१५९६ – वणगोजी नाईक निंबाळकर याचा दंगा.

१५९७ – शरीफजीचा जन्म.

१६०० – दानियलानें अहमदनगर घेतलें.

१६०३ – शहाजी व जिजाबाई यांचें लग्न.

१६०८ – मलिक अंबराचा अहमदनगरास वेढा.

१६०८ – रामदासांचा जन्म.

१६१७ – मलिक अंबराचा बऱ्हाणपुरास वेढा.

१६२० – मालोजीचा मृत्यु.

१६२२ – शहाजहानचें बंड.

१६२३ – पर्विज शहाजहानास अहमदाबादेंतून घालवितो.

१६२४ (ऑक्टोबर) – भातवडीचें युद्ध व त्यांत शरीफजीचा मृत्यु.

१६२५ – शहाजी निजामशाहींत सरलष्कर असतो.

१६२५ – शहाजी आदिलशाहीचा सेवक होतो.

१६२६ – शहाजहानचा जुन्नरास मुक्काम.

१६२७ – मलिक अंबराचा मृत्यु.

१६२८ (४ फेब्रुवारी) – शहाजहान बादशहा झाला.

१६२९ (२५ जुलै) – लुकजी जाधव व त्याचा पुत्र अचलोजी यांचा वध.

१६२९ (५ ऑक्टोबर) – खानजहानाचें आग्ऱ्याहून पलायन.

१६३० (१ मार्च) – शहाजहान बऱ्हाणपुरास आला.

इ.स.१६३० (१९ फेब्रुवारी) – शिवाजीचा शिवनेरीस जन्म.
१६३० (जुलै) – खानखानान यानें दौलताबाद घेतली.
१६३० (ऑक्टोबर) – शहाजी निजामशाही सोडून मोगलांस मिळतो.
१६३१ (२४ जानेवारी) – दर्याखान मारला गेला.
१६३१ – मुरार जगदेवानें पुणें जाळलें.
१६३१ – निजामशाही, आदिलशाही व कुतुबशाही यांची जूट.
१६३१ – रामदास यात्रेस निघतात.
१६३३ – शहाजी निजामशाहींत परत येतो.
१६३६ (सु. ८ जानेवारी) – शहाजहान दौलताबादेस येतो.
१६३६ (६ मे) – मोगल व विजापूरकर यांचा तह.
१६३६ (११ जून) – शहाजहान परत आग्र्याकडे जातो.
१६३६ (ऑक्टोबर) – शहाजीचें विजापुरास प्रयाण.
१६३७ (२५ फेब्रुवारी) – शहाजी आदिलशाहीचा सेवक होतो.
१६३९ – रुस्तुमजमा विजापुराहून म्हैसूर प्रांतीं जावयास निघतो.
१६३९ – शहाजीला बंगलोर जहागिरीची प्राप्ति.
१६४२ – शिवाजीचें पुण्यास आगमन.
१६४४ (३ जानेवारी) – महमद आदिलशहा विजापुराहून मालनाडांत जावयास निघतो.
१६४४ – रामदासांचें कृष्णातीरीं आगमन.
१६४५ – शिवाजीनें हिंदवी स्वराज्याची प्रतिज्ञा केली.
१६४५ (१७ एप्रिल) – दादाजी नरस प्रभूस शिवाजीचें पत्र.
१६४६ (५ जून) – मुस्तफाखान कर्नाटकाच्या मोहिमेवर निघतो.
१६४७ (१९ जुलै) – दादाजी कोंडदेवाचा मृत्यु.
१६४७ (२३ डिसेंबर) – शहाजी कुतुबशहाकडे नोकरीसाठी याचना करतो.
१६४७ – मोरया गोसाव्यास शिवाजीची सनद.
१६४८ (१२ जानेवारी) – मुस्तफाखानाची श्रीरंगावर स्वारी.
१६४८ – चाफळास श्रीरामाच्या उत्सवास सुरुवात.
१६४८ – आदिलशहाकडून चाफळच्या रामास उत्पन्न.

इ.स.१६४८ – बाजी घोरपडे याजकडून चाफळच्या रामास उत्पन्न.
१६४८ (९ नोव्हेंबर) – मुस्तफाखानाचा मृत्यु.
१६४९ – चंद्रराव मोरे याचा मृत्यु.
१६४९ (१० मार्च) – अफजलखान शहाजीस कैद करून विजापुरास नेतो.
१६४९ (१४ मार्च) – मुरादबक्षाचें शिवाजीस पत्र.
१६४९ (११ एप्रिल) – शिंगणवाडींत शिवाजीमहाराजास समर्थांचा उपदेश.
१६४९ (१६ मे) – शहाजीची विजापूरच्या अटकेंतून सुटका.
१६४९ (१० ऑगस्ट) – फत्तेखानाची शिवाजीवर स्वारी.
१६४९ (३० नोव्हेंबर) – मुरादबक्षाचें शहाजीस पत्र.
१६५१ – इंदूरबोधन मठाची स्थापना.
१६५१ – फोंड सावंताचा मृत्यु.
१६५२ (१४ जानेवारी) – मीरजुम्लाचा आदिलशहाकडून कोंडमारा.
१६५३ (१८ फेब्रुवारी) – गोपाळभटाकडून शिवाजीस मंत्रोपदेश.
१६५३ (१७ जुलै) – सिद्धेश्वरभट ब्रह्मे यांना १०० होनांचें वर्षासन.
१६५४ – तिसगांव मठाची स्थापना.
१६५४ (१८ डिसेंबर) – रामदासांचा शिवथरच्या घळींत 'दासबोध' ग्रंथ लिहिण्याचा निश्चय.
१६५५ (२७ एप्रिल) – समर्थांच्या झोळींत शिवाजीमहाराजांनीं चिठी टाकली.
१६५६ (१५ जानेवारी) – शिवाजीनें जावळीचा किल्ला घेतला.
१६५६ (४ नोव्हेंबर) – महमद आदिलशहाचा मृत्यु.
१६५७ (१० जानेवारी) – शिवाजीचें सकवारबाईशीं लग्न.
१६५७ (२४ ऑगस्ट) – आदिलशहाचा औरंगजेबामार्फत शहाजहानाशीं तह.
१६५७ (१४ मे) – पुरंदरावर संभाजीचा जन्म.
१६५८ (१३ फेब्रुवारी) – चाफळच्या उत्सवास शिवाजीचें २०० होनांचें वर्षासन.

इ.स.१६५८ – रघुनाथ बल्लाळ सबनीस यांची सिद्दीवर स्वारी.
१६५९ – शामराजपंत पेशवे व बाबाजी घोलप यांची जंजिऱ्यावर स्वारी.
१६५९ (५ मार्च) – खेम सावंत व लखम सावंत यांजबरोबर शिवाजीचा तह.
१६५९ (५ जून) – औरंगजेब गादीवर बसतो.
१६५९ (जून) – अफजलखान विजापुराहून शिवाजीवर येण्यास निघतो.
१६५९ (५ सप्टेंबर) – सईबाईचा मृत्यु.
१६५९ (३० सप्टेंबर) – अफजलखानाचें वाईस आगमन.
१६५९ (१० नोव्हेंबर) – अफजलखानाचा वध.
१६६० (सु. ४ फेब्रुवारी) – मराठ्यांची राजापुरावर चाल.
१६६० (४ फेब्रुवारी) – गिफर्ड शिवाजीचा कैदी होतो.
१६६० (सु. ४ फेब्रुवारी) – रुस्तुमजमाशीं शिवाजीचें रायबागेपाशीं युद्ध.
१६६० (२५ फेब्रुवारी) – शाइस्ताखानाचें पुण्याकडे कूच.
१६६० (३ मार्च) – शिवाजी पन्हाळ्यांत अडकतो.
१६६० (२ एप्रिल) – रेव्हिंग्टन पन्हाळ्याकडे यावयास राजापुराहून निघतो.
१६६० (५ एप्रिल) – शाइस्ताखान बारामतीस येतो.
१६६० (१ मे) – शाइस्ताखानाचा सासवडास मुक्काम.
१६६० (९ मे) – शाइस्ताखान पुण्यास आला.
१६६० (जून) – इंग्रजांचा जंजिरा विकत घेण्याचा बेत.
१६६० (१९ जून) – शाइस्ताखान पुण्याहून चाकणास जाण्यास निघतो.
१६६० (१३ जुलै) – शिवाजीचें पन्हाळ्याहून पलायन. बाजीप्रभूचें आत्मबलिदान.
१६६० (१४ ऑगस्ट) – शाइस्ताखानाचा चाकणावर हल्ला.
१६६१ (३ फेब्रुवारी) – शिवाजी व कारतलब यांची उंबरखिंडींत लढाई.

इ.स.१६६१ (२४ फेब्रुवारी) – शहाजी मीरजुम्लापासून तेगेनापट्टण घेतो.
१६६१ (मार्च) – शिवाजी राजापूर लुटतो, रेव्हिंग्टन, रेंडाल्फ प्रभृतीस अटक.
१६६१ (२९ एप्रिल) – शिवाजीचा शृंगारपुरांत प्रवेश.
१६६३ (१७ जानेवारी) – टेलर प्रभृतींची सुटका.
१६६३ (५ एप्रिल) – शिवाजीचा शाइस्ताखानावर छापा.
१६६३ (जून) – शाइस्ताखान पुणें सोडून औरंगाबादेकडे जातो.
१६६३ (नोव्हेंबर) – जसवंतसिंगाचा कोंढाण्यास वेढा.
१६६४ (६ जानेवारी) – शिवाजी सुरत लुटतो.
१६६४ (१५ जानेवारी) – शाइस्ताखान दिल्लीकडे रवाना.
१६६४ (२३ जानेवारी) – शहाजीचा मृत्यु.
१६६४ (२९ जुलै) – आदिलशहाचें कुडाळच्या सावंतास फर्मान.
१६६४ (१ ऑगस्ट) – भिकाजी पंडित विजापुरास जातो.
१६६५ – शिवाजीचें सिंधुदुर्ग आरमारी ठाणें झालें व बसनूरची लूट.
१६६५ (१३ फेब्रुवारी) – जयसिंग औरंगाबादेस येतो.
१६६५ (३ मार्च) – जयसिंग पुण्यास येतो.
१६६५ (२३ मार्च) – जयसिंग पुण्याहून पुरंदर घ्यावयास निघतो.
१६६५ (३० मार्च) – दिलीरखानाचा पुरंदरास वेढा.
१६६५ (३१ मार्च) – जयसिंगाचा सासवड व पुरंदर यांच्या दरम्यान मुक्काम.
१६६५ (१३ एप्रिल) – दिलीरखानाचा वज्रगडाच्या बुरुजावर हल्ला.
१६६५ (१४ एप्रिल) – वज्रगडाचा पाडाव.
१६६५ (२५ एप्रिल) – दाऊदखान मावळांत शिरतो.
१६६५ (३० एप्रिल) – दाऊदखान राजगडापर्यंतचीं खेडीं जाळतो.
१६६५ (२० मे) – रघुनाथपंत पंडितराव जयसिंगाशीं तहाचें बोलणें करण्यास जातो.
१६६५ (११ जून) – शिवाजी तहाचें बोलणें करण्यास जयसिंगाकडे येतो.
१६६५ (१४ जून) – शिवाजी राजगडास परत जातो.

इ.स.१६६५ (ऑगस्ट) शिवाजी व मोगल यांचा पुरंदरचा तह.
१६६५ (२७ सप्टेंबर) – शिवाजी जयसिंगाच्या छावणींत येतो.
१६६५ (२० नोव्हेंबर) – शिवाजी व जयसिंग विजापूरच्या स्वारी-वर निघतात.
१६६५ (१८ डिसेंबर) – जयसिंग व शिवाजी यांचा मंगळवेढ्यास मुक्काम.
१६६५ (२४ डिसेंबर) – जयसिंगाची विजापुरी सेनेशीं गांठ.
१६६५ (२५ डिसेंबर) – दिलीरखान व शिवाजी यांविरुद्ध सर्जाखान व व्यंकोजी यांचें युद्ध.
१६६६ (११ जानेवारी) – जयसिंगास सोडून शिवाजी पन्हाळ्याकडे जातो.
१६६६ (१५ जानेवारी) – जयसिंग विजापुरापाशीं येतो.
१६६६ (१६ जानेवारी) – शिवाजीचा पन्हाळ्यावर हल्ला.
१६६६ (१८ जानेवारी) – शिवाजी रांगणा घेतो.
१६६६ (५ मार्च) – शिवाजी आग्र्यास जावयास निघतो.
१६६६ (७ एप्रिल) – औरंगजेबाचें शिवाजीस पत्र.
१६६६ (११ मे) – शिवाजी आग्र्यापाशीं येतो.
१६६६ (१२ मे) – औरंगजेब व शिवाजी यांची भेट.
१६६६ (७ जून) – शिवाजीच्या फौजेची आग्र्याहून रवानगी.
१६६६ (१९ ऑगस्ट) – शिवाजीचें आग्र्याहून प्रयाण.
१६६६ (२० नोव्हेंबर) – शिवाजी राजगडास परत येतो.
१६६७ (१० जानेवारी) – जयसिंग भीमा नदी उतरून उत्तरेस जाण्यास निघतो.
१६६७ (२२ एप्रिल) – शिवाजीचें औरंगजेबास पत्र.
१६६७ (मे) – शिवाजीबरोबर बहिलोलखान व व्यंकोजी यांचें युद्ध.
१६६७ (५ जुलै) – पोर्तुगीजांतर्फे रामजी शेणवी शिवाजीचें राय-गडावर जाऊन अभिनंदन करतो.
१६६७ (२८ ऑगस्ट) – जयसिंगाचा बऱ्हाणपुरास मृत्यु.

इ.स.१६६७ (२७ ऑक्टोबर) – संभाजीची मुअझ्झमशीं औरंगाबादेस भेट व तह.

१६६७ (२८ ऑक्टोबर) – संभाजी औरंगाबादेस जसवंतसिंगास भेटतो.

१६६७ (नोव्हेंबर) – शिवाजीची बार देशावर स्वारी.

१६६७ (४ नोव्हेंबर) – संभाजी मुअझ्झमास भेटून औरंगाबादेहून परत निघतो.

१६६७ (११ डिसेंबर) – शिवाजी व पोर्तुगीज यांचा तह.

१६६८ – इंग्रज व मराठे यांची राजापुरापाशीं चकमक.

१६६८ (२ ऑगस्ट) – निराजी रावजी फौजेनिशी औरंगाबादेस जाण्यास निघतो.

१६६८ (५ ऑगस्ट) – प्रतापराव संभाजीसह फौजेनिशीं औरंगाबादेस जाण्यास निघतो.

१६६९ (जून) – शिवाजीचें सिद्दीशीं युद्ध.

१६६९ (ऑगस्ट) – औरंगजेबानें काशीविश्वेश्वराचें देवालय पाडलें.

१६६९ (ऑक्टोबर) – शिवाजीचा जंजिऱ्यास वेढा.

१६६९ (डिसेंबर) – मोगल व शिवाजी यांचा तह मोडला. प्रतापराव व आनंदराव औरंगाबादेहून राजगडास परत आले.

१६७० (४ फेब्रुवारी) – मराठ्यांनीं कोंढाणा किल्ला घेतला.

१६७० (२४ फेब्रुवारी) – राजारामाचा राजगडावर जन्म.

१६७० (८ मार्च) – निळोपंत मुजुमदार यांनीं पुरंदर घेतला.

१६७० (१७ मार्च) – शिवाजी राजे यांनीं कल्याण घेतलें.

१६७० (२९ मार्च) – दिलीरखान औरंगाबादेकडे नागपुराहून यावयास निघाला.

१६७० (३० मार्च) – मुअझ्झम औरंगजेबाविरुद्ध शिवाजीच्या साहाय्यानें बंड करणार अशी अफवा उठली.

१६७० (१३ मे) – मराठ्यांनीं माळ लावून लोहगड घेतला.

१६७० (१५ जून) – मराठ्यांनीं हिंदोळा घेतला.

१६७० (१६ जून) – मराठ्यांनीं माहुली घेतली.

इ.स.१६७० (२२ जून) – मराठ्यांनीं अर्नाळा घेतला.
१६७० (२४ जून) – मराठ्यांनीं रोहिडा घेतला.
१६७० (ऑगस्ट) – शिवाजीचा जुन्नरास वेढा.
१६७० (सप्टेंबर) – मुअज्झम दिलीरखानाचा पाठलाग सोडून बऱ्हाणपुराहून औरंगाबादेस येतो.
१६७० (४ ऑक्टोबर) – सुरतेची दुसरी लूट.
१६७० (१७ ऑक्टोबर) – दिंडोरीपाशीं शिवाजीची मोगलांशीं लढाई.
१६७० (डिसेंबर) – शिवाजीनें अहिवंत, रवळा, जावळा व मारकंडा हे गड व साल्हेर घेतली.
१६७१ (जानेवारी) – महाबतखान बऱ्हाणपुरास येतो.
१६७१ (१६ जानेवारी) – शिवाजीनें संभाजीस कारभार सांगितला.
१६७२ – शिवाजीचा उंदेरी-खांदेरी घेण्याचा बेत.
१६७२ (१३ जानेवारी) – दिलीरखान, महाबतखान व बहादुरखान पुणें व चाकण घेतात.
१६७२ (सु. २५ जानेवारी) – मोरोपंत रामनगरास येतो.
१६७२ (सु. १५ फेब्रुवारी) – मराठ्यांनीं साल्हेरगड मोगलांपासून पुनः घेतला.
१६७२ (१५ एप्रिल) – ले. उस्टिक रायगडीं जाण्यासाठीं चौलास येतो.
१६७२ (२१ एप्रिल) – अब्दुल कुतुबशहाचा मृत्यु.
१६७२ (एप्रिल) – शिवाजीची समर्थांस अज्ञात स्थळीं भेट.
१६७२ (मे) – महाबतखान उत्तरेकडे जातो.
१६७२ (जून) – मोरोपंत रामनगर घेतो.
१६७२ (२० जुलै) – मोरोपंत नाशिक घेतो.
१६७२ (ऑक्टोबर) – सिद्दीस औरंगजेबाची मदत.
१६७२ (२४ नोव्हेंबर) – दुसरा अली आदिलशहा याचा मृत्यु व शिकंदरशहा गादीवर बसतो.
१६७२ (डिसेंबर) – सिद्दी संबूळ मोगली आरमाराचा सुभेदार होतो.
१६७२ (डिसेंबर) – संबूळ मुंबईस येतो.
१६७२ (२९ डिसेंबर) – शिवाजी व विजापूरकर यांचा तह मोडला.

इ.स.१६७३ (६ जानेवारी) – शिवाजी अण्णाजी दत्तोस सातारा व पन्हाळा या भागांत पाठवितो.

१६७३ (मार्च) – सिद्दी शिवाजीपासून राजपुरीचा (पद्मदुर्ग) किल्ला घेतो.

१६७३ (१५ एप्रिल) – प्रतापराव व बहिलोलखान यांचें उमराणीस युद्ध.

१६७३ (१६ एप्रिल) – प्रतापराव हुबळी लुटतो.

१६७३ (सु. १० मे) – सिद्दी संबूळ मुंबईस येतो.

१६७३ (१९ मे) – टॉमस निकल्स मुंबईहून रायगडास जाण्यास निघतो.

१६७३ (२३ मे) – टॉमस् निकल्स् रायगडावर जातो.

१६७३ (२४ मे) – निकल्स् संभाजीस भेटतो.

१६७३ (३ जून) – निकल्स् व शिवाजी यांची भेट.

१६७३ (ऑक्टोबर–डिसेंबर) – शिवाजीची कारवारवर स्वारी.

१६७३ (८ डिसेंबर) – शिवाजीचा कुदेरा येथें मुक्काम. बहिलोलखान व सर्जाखान यांनीं बंकापूर व चंदगडनजिक मराठ्यांचा पराभव केला.

१६७३ (डिसेंबर) – शिवाजी कारवारांतून परत फिरतो.

१६७४ (मार्च) – संबूळ व दौलतखान यांची सातवळीच्या खाडींत चकमक.

१६७४ (मे) – ऑक्झिंडेन रायगडास जातो.

१६७४ (६ जून) – शिवाजीस राज्याभिषेक.

१६७४ (११ जून) – शिवाजी व इंग्रज यांचा तह.

१६७४ (१७ जून) – जिजाबाईचा मृत्यु.

१६७४ (ऑगस्ट) – सिद्दी संबूळ मुंबईस येतो.

१६७४ (१० डिसेंबर) – शिवाजीची खानदेशावर स्वारी.

१६७५ (४ फेब्रुवारी) – संभाजीची मुंज.

१६७५ (२७ फेब्रुवारी) – मोगल सैन्यानें कल्याण-भिवंडी लुटली.

१६७५ (१७ एप्रिल) – मराठ्यांनीं फोंड्याचा कोट सुरुंगानें उडविला.

१६७५ (२६ एप्रिल) – मराठ्यांनीं कारवारास जाळपोळ केली.

१६७५ (सु. ८ मे) – मराठ्यांनीं फोंडा घेतला.

१६७५ (२१ मे) – कारवार प्रांताचा बराच भाग मराठ्यांनीं घेतला.

इ.स.१६७५ (११ जून) – कारवार प्रांतांतून परत जातांना शिवाजीचा राजापुरास मुक्काम.

१६७५ (सप्टेंबर) – सिद्दी कासीम सुरतेहून जंजिऱ्याकडे निघाला.

१६७५ (२६ नोव्हेंबर) – मोगल सैन्य कल्याणपर्यंत आलें.

१६७६ (जानेवारी-फेब्रुवारी) – शिवाजी साताऱ्यास येऊन आजारी पडला.

१६७६ (२१ जानेवारी) – विजापूर दरबारांतील दक्षिणी पक्षाचा पुढारी सर्जाखान व पठाण पक्षाचा पुढारी बहिलोलखान (अब्दुल करीम) यांत यादवी.

१६७६ (मे) – मोरोपंत रामनगर घेऊन रायगडास परत.

१६७६ (३१ मे) – बहादुरखानाची विजापुरावर स्वारी.

१६७६ (१९ जून) – नेताजीचें शुद्धीकरण.

१६७६ (२० जून) – मराठ्यांनीं अथणी लुटली.

१६७६ (ऑगस्ट) – महिपतगडावर रामदास जाणार.

१६७६ (ऑगस्ट) – मोरोपंत दंडाराजपुरीस जातो.

१६७६ (६ ऑक्टोबर) – शिवाजी गोवळकोंड्याच्या स्वारीवर निघतो.

१६७७ (४ मार्च) – शिवाजी व कुतुबशहा यांची भेट.

१६७७ (एप्रिल) – सिद्दी कासीम सुरतेस जातो.

१६७७ (१३ मे) – शिवाजीनें जिंजी घेतली.

१६७७ (२३ मे) – शिवाजीनें वेलोरास वेढा घातला.

१६७७ (१६ जून) – दक्षिणी पक्षाची स्थापना.

१६७७ (२७ जून) – शेरखान तिरुवाडीपाशीं येतो.

१६७७ (६ जुलै) – शिवाजी तिरुवाडीपाशीं येतो.

१६७७ (१५ जुलै) – पांदेचरीहून फ्रेंच अधिकारी शिवाजीच्या भेटीस निघतात.

१६७७ (१६ जुलै) – शिवाजीचा तिरुवाडीस मुक्काम.

१६७७ (२७ जुलै) – व्यंकोजी शिवाजीस भेटून पळून जातो.

१६७७ (२ ऑगस्ट) – शिवाजी वृद्धाचलमूचें दर्शन घेतो.

१६७७ (ऑगस्ट) – शिवाजी तोरगलप्रांतीं येतो.

इ.स.१६७७ (ऑगस्ट-सप्टेंबर) – बहादूरखानास काढून त्याच्या सुभेदारीवर दिलीरखानाची नेमणूक.
१६७७ (२१ ऑक्टोबर) – दोघां सिद्द्यांचा समेट.
१६७७ (नोव्हेंबर) – शिवाजी रायगडास परत.
१६७८ (फेब्रुवारी) – दिलीरखान दिल्लीस जातो.
१६७८ (जून) – सर्जाखान अथणीस आला.
१६७८ (१८ सप्टेंबर) – दिलीरखान व मुअज्झम दक्षिणेंत येतात.
१६७८ (१३ डिसेंबर) – संभाजी दिलीरखानास मिळाला.
१६७८ (२८ डिसेंबर) दत्ताजीपंत वाकनिसाचा मृत्यु.
१६७८ (डिसेंबर) – शिवाजीचा जंजिरा घेण्याचा निर्धार.
१६७९ (२ एप्रिल) – दिलीरखानाचा भूपाळगडास वेढा.
१६७९ (ऑगस्ट) – शिवाजीचा खांदेरीवर दुर्ग बांधण्याचा बेत.
१६७९ (१८ ऑगस्ट) – दिलीरखानाची विजापुराविरुद्ध मोहीम.
१६७९ (नोव्हेंबर) – शिवाजीचा विजापूरकरांशीं तह.
१६७९ (४ नोव्हेंबर) – शिवाजी मोगलाई लुटण्यास निघाला.
१६७९ (१४ नोव्हेंबर) – दिलीरखान विजापूर सोडून पश्चिमेस निघाला.
१६७९ (१५ नोव्हेंबर) – शिवाजी जालन्यास गेला.
१६७९ (२० नोव्हेंबर) – दिलीरखानानें अथणी लुटली. संभाजी दिलीरखानास सोडून निघाला.
१६७९ (२२ नोव्हेंबर) – शिवाजी पट्टा किल्ल्यावर पोंचला.
१६७९ (२४ ते ३० नोव्हेंबर) – मराठे खानदेश व धरणगांव लुटतात.
१६७९ (३१ डिसेंबर) – शिवाजीचा सज्जनगडावर मुक्काम.
१६८० (१३ जानेवारी) – शिवाजी व संभाजी यांची पन्हाळ्यास भेट.
१६८० (२३ जानेवारी) – दौलतखानाचा उंदेरीवर हल्ला.
१६८० (२८ जानेवारी) – इंग्रज व शिवाजी यांचा तह.
१६८० (४ फेब्रुवारी) – शिवाजीचें सज्जननगडाहून प्रयाण.
१६८० (७ मार्च) – राजारामाचें उपनयन.
१६८० (३ एप्रिल) – शिवाजीचा मृत्यु.

सूचि

(व्यक्तिवाचक)

(स्थलवाचक)

समाप्त

प्रस्तुत ग्रंथकर्त्याचीं इतर पुस्तकें

प्रकाशित

१. मुसलमानपूर्व महाराष्ट्र (राजकीय इतिहास)	...	रु. ३-८-०
२. मुसलमानपूर्व महाराष्ट्र (सांस्कृतिक इतिहास)	...	रु. ४-८-०
३. शीघ्रसाहित्यादर्श (वृत्तपत्रव्यवसाय)	...	रु. २-८-०
४. पेशवेकालीन महाराष्ट्र	...	दुर्मिळ

★

अप्रकाशित

१. श्रीशिवाजीमहाराज (कार्य व परिस्थिति).

२. रशियांतील सर्वांगीण क्रान्ति.

३. हिंदुसमाजाची पुनर्घटना.

४. चमत्कार.

५. भारतांतील प्रेक्षणीय स्थळें.